Barcode - 2030020017475
Title - Lokamaanya T'ilak Yaan'chiin' Geliin' Aat'ha Vara~shha 1900 1908
Subject - GEOGRAPHY. BIOGRAPHY. HISTORY
Author - Kulakara~nd-ii Aappaajii Vishhnd-u
Language - Marathi
Pages - 470
Publication Year - 1909
Creator - Fast DLI Downloader
https://github.com/cancerian0684/dli-downloader
Barcode EAN.UCC-13
2030020017475

Dranched Boook

UNIVERSAL LIBRARY
OU_192237
UNIVERSAL LIBRARY

# लोकमान्य टिळक यांचीं गेलीं आठ वर्षें.

[ 'लेखका'चें निरीक्षण ]

१९००-१९०८

लेखक—आप्पाजी विष्णु कुळकर्णी.

मुंबई-इंदुप्रकाश स्टीम प्रेस.

( सर्व हक्क कर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत ).

सन १९०९.

किंमत २। रुपये.

# प्रस्तावना.

लो. बाळ गंगाधर टिळकांसारख्या राष्ट्रकार्याशीं अनेक रीतीनें संबंध असणाऱ्या, व्यापक उद्योगाच्या व बहुविध आणि सखोल आयुष्यक्रमाच्या पुरुषाचें चरित्र लिहिणें हें काम मोठ्या जोखमीचें आहे. त्यांतून त्यांच्या हयातींत, विशेषतः आजच लिहिणें जास्त जोखमीचें आहे. कारण, गेलीं कांहीं वर्षे सामाजिक, धार्मिक व राजकीय अशा कित्येक बाबतींत लोकमतांत फरक पडून कांहीं गोष्टींत लोकांचीं मनें द्विधा झालीं आहेत, कांहीं गोष्टींवर रणें माजलीं आहेत, व कांहीं गोष्टींत ठिणग्या पडून आपापसांतील कलह, मत्सर व दुही यांनीं पेट घेतला आहे. अशा वेळीं मतभेद असणाऱ्या कांहीं व्यक्तींस थोडें तरी दुखविल्याशिवाय, सार्वजनिक दृष्ट्या कित्येक व्यक्तींच्या मागील-पुढील विचारांची व वर्तनाची मनास झोंबणारी बाजू पुढें मांडल्याशिवाय, व प्रसगविशेषीं खासगी मत्सर राष्ट्रहिताच्या कामी कसा आड आला, याची स्फुटता केल्याशिवाय या लेखकाला त्यांचें चरित्र लिहितां येणें कठिण आहे. उलटपक्षीं, अशा पुरुषाचें चरित्र लिहिण्याचें काम दिरंगाईवर टाकणें हेंही बरेंच धोक्याचें आहे. कारण, दिरंगाईमुळें कित्येक ताज्या गोष्टी शिळ्या होऊन त्यांतील रहस्य नाहींसें होतें, मतभेद किंवा भानगडीच्या प्रश्नांतील सत्यासत्य निवडण्यास कठिण पडतें, लोकांच्या आठवणी नाहींशा होतात, व प्रसंग आणि चळवळी यांतील सजीवता कमी होऊन त्या नीरस वाटूं लागतात. थोर पुरुषाच्या हयातींतच त्याचें चरित्र प्रसिद्ध करण्यांत दुसरा असा एक फायदा आहे कीं, त्याच्यासंबंधीं लिहिलेल्या गोष्टींची कोणासही समक्ष विचारपूस करून खात्री करून घेतां येते; व त्याचे स्नेही आणि इतर समकालीन पुरुष यांच्या अनुभवानें त्यांचा पडताळा पाहण्यास सांपडतो. वरील विचार मनांत येऊनच मी हें चरित्र लिहिण्यास सुरवात केली व तें आज वाचकांपुढें मांडलें आहे.

टिळक यांच्या या चरित्रास साग्र चरित्र असें ह्मणतां येणार नाहीं. कारण, यांत त्यांच्या बालपणापासून आतांपर्यंतची हकीकत दिलेली नाहीं. गेल्या आठ वर्षांत त्यांच्याशीं लेखक या नात्यानें माझा जो सहवास घडला, व त्यांत त्यांचा जो आयुष्यक्रम माझ्या दृष्टीस पडला, तेवढ्याचेंच चित्र

र्मी यांत रेखाटलें आहे; ह्मणजे सबंध चरित्राचा हा एक भाग आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

आतां प्रस्तुत चरित्रांत टिळक यांच्या संबंधानें कांहीं बारीकसारीक गोष्टी किंवा त्यांच्या तोंडचे प्रासंगिक उद्गार देऊन त्यांवरून कांहीं अनुमानेंही काढलीं आहेत. तेव्हां थोर पुरुषासंबंधानें अशा गोष्टी किंवा असे उद्गार द्यावे किंवा नाहीं याबद्दल वाचकांस भ्रांती उत्पन्न होईल. खुद्द टिळक यांनीं तर एके प्रसंगीं अशा गोष्टी सांगणारांना ता. २६–१–०४ च्या केसरींतून असा इषारा दिला आहे कीं, "लहान मनुष्य काय आणि मोठा काय, प्रसंगविशेषीं निरनिराळ्या प्रकारचे व कधीं कधीं एकमेकांस विरुद्धही विचार प्रदर्शित करीत असतो. परंतु त्यामुळें त्याचीं तीं मतें कायमचीं होतीं, असें समजणें वेडेपणाचें होय. मनुष्याच्या शरीराप्रमाणें त्याचें मनही नेहमीं उमेदींत असतें असें नाहीं; त्याच्या मनांत कधीं दुःखाची तर कधी नाउमेदीची झांक येत असते; व अशा प्रसंगीं त्याच्या तोंडांतून निघालेले उद्गार जर जगापुढें मांडूं लागलें तर त्या मनुष्यास लवकरच मूर्ख बनवितां येईल! शिवाय असेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, आयुष्याच्या हरएक क्षणीं मनुष्य जें बोलतो तें तो पूर्णविचारांतीं बोलतो, असें नाहीं. इतकेंच नव्हे तर, त्याच मनुष्यास त्याच विषयावर जर सार्वजनिक तऱ्हेनें बोलण्याचा प्रसंग आला तर निराळ्याच तऱ्हेनें तो बोलत असतो. याकरितां मोठ्या मनुष्याचें चरित्र लिहिणारांनीं किंवा त्याच्या गोष्टी सांगणारांनीं जें लिहिणें किंवा सांगणें तें सारासार विचार पाहून लिहिलें किंवा सांगितलें पाहिजे." उलटपक्षीं, 'सुधारक'कारांनीं त्याच प्रसंगीं असें ह्मटलें आहे कीं, "खरें चरित्र लिहून चरित्रनायकाच्या आचारविचाराची, धर्मश्रद्धेची, समयसूचकतेची, वाक्चातुर्याची, हुशारीची व स्वभावाची प्रतिमा वाचकांपुढें उभी करावयाची असेल तर त्यास असल्या लहान लहान पण विश्वसनीय गोष्टींची जशी मदत होते, तशी दुसरी कसलीही होत नाहीं, हें अगदीं प्रसिद्ध आहे. प्रसिद्ध विद्वान् डॉ. जॉनसन याशीं आजच्या पिढींतील लोकांचाही जो निकट परिचय होतो व त्याच्या थोरपणाबद्दल आदर उत्पन्न होतो तो त्याच्या लेखांवरूनच होतो असें नाहीं, तर त्याचा चरित्र लेखक बॉसवेल यानें आपल्या पुस्तकांत डॉ. जॉनसनच्या लहान सहान गोष्टी लिहून

ठेवल्यामुळेंच होय. मनुष्य सावध असतां जपून बोलेल; परंतु याच कारणानें त्या भाषणांत त्याचें अंतरग दिसणार नाहीं. तो सावध नसतांही त्याचे शब्द व आचरण इतरांनीं दोष काढण्यासारखें नसेल तर तो खराच थोर, इतर लोक त्यापुढें अगदीं कमकस आहेत." यावरून बारीकसारीक गोष्टी लिहिण्यांत कोणता धोका आहे व कोणते फायदे आहेत, हें वाचकांस सहज कळून येईल. तथापि, या धोक्यांचा व फायद्यांचा नीट विचार करूनच मी या पुस्तकांत त्या गोष्टींचा संग्रह केला आहे. या गोष्टी त्यांच्या चरित्रास कोणत्याही रीतीनें बाधक नसून उलट त्यांचा संग्रह केला नसता, तर मात्र बाधक होऊन त्यांच्या चरित्राच्या तेजस्वितेची हानी झाली असती, अशी माझी समजूत आहे.

असो; या चरित्राचे मुख्य तीन भाग केले असून पाहिल्यांत त्यांचा नित्यक्रम, राहटी, संवयी, व्यवसाय व स्नेही—मंडळी, त्यांजवर आलेले बिकट प्रसंग, त्यांच्या सार्वजानिक चळवळी, स्वभाव, वर्तन, गुण वगैरे गोष्टींचें सामान्य विवेचन केलें असून पत्रकर्ते या नात्यानें त्यांची योग्यता किती मोठी आहे, याचें विशषे विवेचन दिलें आहे. दुसऱ्या भागांत त्यांच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय मतांचें स्वरूप दिलें आहे; व तिसऱ्यांत त्यांचीं संभाषणें, वक्तृत्व, ग्रंथरचना, मतांची परिणतता व उत्क्रांति, पुढारी या नात्यानें त्यांची योग्यता, वगैरे गोष्टींचा समावेश केला आहे. पहिल्या व तिसऱ्या भागांतील विषय जरी महत्वाचे आहेत, तरी दुसऱ्या भागांतील विषय त्याहींपेक्षां महत्वाचे आहेत, अशी माझी समजूत आहे. कारण, थोर मनुष्यांचीं मतें व विचार हाच त्यांच्या जीविताचा मुख्य भाग असून तीं त्यांनीं स्वतः लिहिलेलीं चरित्रेंच ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. या बाबतींत रा. रा. लक्ष्मण नारायण फडके यांनीं आपल्या 'अज्ञेयमीमांसा' या पुस्तकांत स्पेन्सर साहेबांचें चरित्र लिहितांना त्यांस उद्देशून जे उद्गार काढले आहेत ते मजप्रमाणेंच इतरांसही मान्य होतील अशी मला आशा आहे. ते ह्मणतातः—"माणसांचें जीवित मुख्यतः दोन प्रकारचें असतें: शारीरिक व मानसिक, किंवा बाह्य जीवित व अंतर्जीवित. पैकीं सामान्य जन पहिल्या प्रकारच्याच जीविताची जरी फार किंमत मानतात किंवा त्यासच जीवित हा शब्द सर्वथा लागतो असें जरी चुकीनें समजतात, तरी वास्तविक रीत्या मानसिक जीवित हाच

एकंदर जीविताचा मुख्य भाग होय; व निदान माणसामध्यें तरी त्याचीच प्राधान्येंकरून महती समजली पाहिजे. ह्या दृष्टीनें पाहतां, ज्या अनेक अमोलिक ग्रंथांतून आपले परिपक्क व सुंदर मानसिक विचार स्पेन्सर साहेबांनीं आजपर्यंत ग्रथित करून ठेविले आहेत व अद्यापही ग्रथित करून ठेवीत आहेत, तींच त्यांचीं वास्तविक व इतरांनीं लिहिलेल्या चरित्रांपेक्षां किती तरी अधिक विश्वसनीय अशीं 'आत्मचरितें' नव्हत काय?" टिळक यांचें बहुतेक आयुष्य लेखनांत व विचारांत गेलें आहे; व त्यांच्या लेखांनीं आणि विचारांनीं लोकसमाजावर जें कार्य झालें आहे तें इतर कार्याहून श्रेष्ठ आहे; व ह्मणून त्यांच्या मतांस व विचारांसच या चरित्रात मीं प्राधान्य देऊन त्यांचा विशेष विस्तार केला आहे.

वाचकांनीं यांतील गुणांचा स्वीकार करून दोषांबद्दल क्षमा करावी, अशी प्रार्थना आहे.

शेवटीं, पुस्तक प्रसिद्ध करण्याचे कामीं डॉ. दिनकर धोंडो साठये यांनीं मदत केल्याबद्दल व 'इंदुप्रकाश' चे व्यवस्थापक यांनीं लवकर छापून दिल्याबद्दल त्यांचा मी आभारी आहें.

मुंबई,
ता. २५।१।०९

**आप्पाजी विष्णु कुलकर्णी.**

# लो० टिळक यांचीं गेलीं आठ वर्षें.

[ 'लेखका' चें निरीक्षण ]

## भाग १ ला.

### प्रस्तुत पुस्तकाचा उद्देश.

इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका वगैरे हल्लींच्या काळच्या सुधारलेल्या राष्ट्रांतील थोर पुरुषांचीं चरित्रें लिहिण्याची तऱ्हा व आमच्याकडील थोर पुरुषांचीं चरित्रें लिहिण्याची तऱ्हा यांत जमिनअस्मानाचें अंतर आहे. तिकडे विद्या व शिक्षण यांचा अत्यंत प्रसार झाला असल्यामुळें लोकांत गुणग्राहकता फार वाढली आहे. अर्थात् सन्मान्य पुरुषासंबंधाच्या बारिक-सारिक गोष्टींसही महत्व येऊन त्या चरित्रांतून वर्णिल्या जातात, व लोकही मोठ्या आवडीनें आणि भक्तीनें त्या वाचतात. जॉनसन, शेक्सपीयर, नेपोलियन, वगैरे विख्यात पुरुषांच्या चरित्रांवर तिकडील लोकांच्या ज्या उड्या पडतात त्यांतील बीज हेंच होय. जॉनसनच्या ग्रंथांचा इंग्रजी समाजावर काय परिणाम झाला, शेक्सपीयरची अलौकिक बुद्धिमत्ता कशावरून दिसून येते, नेपोलियनच्या वैभवाचें इंगित कशांत आहे, इत्यादि गोष्टींची कोणी सांगोपांग मीमांसा करूं लागला तर त्याकडे तिकडील लोकांचें लक्ष तर वेधतेंच; पण नेपोलियन कसली टोपी घालीत होता, शेक्सपीयर कोणत्या खुर्चीवर बसत होता, जॉनसन कसल्या लेखणीनें लिहीत होता, इत्यादि बारिकसारिक गोष्टीही जाणण्याची तिकडील लोकांस इतकी कांहीं उत्कंठा असते कीं, त्याबद्दल कोणी कांहीं नवा लेख लिहिला कीं, तो पैदा करून ते वाचल्याशिवाय राहत नाहींत. आमच्याकडे अशा प्रकारचे लेख लिहिण्याची प्रवृत्ति नाहीं व लोकांतही अशा प्रकारची जिज्ञासा नाहीं. लोकांची जिज्ञासा व लेखकांची प्रवृत्ति हीं पुष्कळ अंशीं परस्परांवर अवलंबून आहेत. म्हणजे लोक जिज्ञासु असले कीं, त्यांची जिज्ञासा तृप्त करणारे लेखकही निपजतात; किंवा लेखक नवी आणि मनोवेधक माहिती देऊं लागले कीं, लोकांचीही ती

वाचण्याकडे प्रवृत्ति होते. आजपर्यंत मराठी भाषेंत एतद्देशीय थोर पुरुषांचीं अनेक चरित्रें झालीं आहेत; परंतु वर सांगितल्याप्रमाणें बारिकसारिक पण महत्वाच्या गोष्टींचें ज्यांत वर्णन केलें आहे असें चरित्र क्वचित् आढळून येईल. प्रस्तुत पुस्तकाचा उद्देश आजमितीला महाराष्ट्रांत किंबहुना साऱ्या भरतखंडांत विद्वत्ता, स्वार्थत्याग, देशसेवा इत्यादि गुणांनीं प्रसिद्धीस आलेल्या एका थोर पुरुषाच्या आयुष्यक्रमांतील कांहीं लहानसान पण महत्वाच्या गोष्टी सांगाव्या हा आहे. हे थोर पुरुष ह्मटले ह्मणजे प्रख्यात केसरीकार लो० **बाळ गंगाधर टिळक** हे होत.

टिळक यांचा मी १९०० सालच्या आगस्ट महिन्यापासून पुढें सुमारें ७ वर्षे 'लेखक' होतों. तेव्हां लेखक या नात्यानें त्यांचा जितका वेळ मला सहवास घडला तितक्या वेळांत त्यांची लेख सांगण्याची शैली, त्यांचें वाचन, केसरीच्या मजकुराची जुळवाजुळव व व्यवस्था करण्याची त्यांची तऱ्हा, निरनिराळ्या विषयांवर त्यांनीं केसरींतून व इतर प्रसंगीं प्रगट केलेले विचार, त्यांची वागणूक, त्यांचा स्वभाव, त्यांची कुटुंब-व्यवस्था, छापखाना व ऑफिस यांवरील देखरेख, त्यांच्यावर आलेले प्रसंग, त्यांचा उद्योग, त्यांचीं संभाषणें, त्यांचीं मतें, इत्यादि गोष्टींसंबंधानें माझें जें मत झालें आहे तेंच मुख्यत्वेंकरून या पुस्तकांत नमूद करण्याचा माझा संकल्प आहे. तात्पर्य, वरील कालापासून त्यांच्यासंबंधीं जी माहिती मला आहे ती लोकांस देऊन समाजस्थितीचें ज्ञान व राष्ट्रहिताची कल्पना हीं त्यांच्या मनांत बिंबवावीं व त्यांचें मोठें चरित्र कोणी लिहूं इच्छील त्यासही तिचा उपयोग व्हावा एवढीच माझी इच्छा आहे.

## वाडा, छापखाना, ऑफिस व लायब्ररी.

टिळक यांचा वाडा नारायणपेठेंत असून तो १९०४ सालीं श्री. सयाजीराव महाराज गायकवाड यांचेकडून त्यांस सुमारें साडेपंधरा हजार रुपयांस मिळाला. या वाड्याचें क्षेत्रफळ अदमासें सव्वा एकर असून इतका विस्तृत वाडा पुण्यास क्वचित्च आहे. हा वाडा पेशवाईच्या अमदानींतला असल्यामुळें व त्यावेळीं त्याचें महत्वही विशेष असल्यामुळे त्याची रचना आणि ठेवण हींही त्या कालास शोभतील अशींच होतीं. टिळक यांनीं हा वाडा घेतला त्या वेळीं तो मोडकळीस आला असल्यामुळें फक्त डागडुजी करून कांहीं भाग त्यांनीं तसाच ठेविला आहे, व कांहीं भाग

अजिबात उतरून तो पुन्हां नवा बांधला आहे. हा नवा बांधलेला भाग ह्मणजे त्यांची राहण्याची जागा हा होय. ही जागा पुढील मोठ्या दरवाज्यांतून आंत शिरल्यावर डाव्या हातास जो दुसरा लहान दरवाजा दिसतो त्याच्या आंत आहे. ही इमारत पाया कायम ठेऊन त्यांनीं सगळी नवी बांधली असून त्यास सुमारें आठ हजार रुपये खर्च आला. ही इमारत दुमजली असून खालच्या जागेंत जेवणाखाणाची सोय केली आहे; व वर दोन मोठे दिवाणखाने असून एकांत त्यांच्या निजण्याची सोय आहे; व एकांत त्यांची नेहमींची बैठक असते. या बैठकीच्या जागेपासून बाहेरच्या रहदारीच्या रस्त्यावरील दुमजल्यावर ' केसरी ' व ' मराठा ' पत्रांच्या संपादकांस बसण्यासाठीं ज्या खोल्या दिल्या आहेत तेथपर्यंत आंतील दरवाजावरून एक पूल केला आहे; व त्यायोगें प्रसंगविशेषीं त्यांच्याकडे इतर संपादकांचें काम असलें किंवा त्यांना इतर संपादकांकडे जावें लागलें तर सुलभ झालें आहे. राहण्याच्या जागेपुढेंच पटांगणाला लागून उत्तरेकडच्या बाजूस किंवा इतर संपादकांस ज्या खोल्या दिल्या आहेत त्यांना लागूनच पूर्वेकडील बाजूस सुमारें हजार लोक बसतील एवढा मोठा एक दिवाणखाना आहे; व त्यांत त्यांनीं जंगी लायब्ररी ठेविली आहे. रस्त्यावरील मोठा दरवाजा बराच उंच असल्यामुळें त्यावरील दुमजल्याचा दिवाणखानाही बराच उंच आहे, म्हणजे जवळच्या इमारतीपेक्षां ही जागा सरासरीनें अडीचपट उंच आहे; व या उंचीवरूनच त्या जागेस त्यांच्या लहान मुलांच्या ह्मणीवरून ' अडचावा मजला ' असें नांव पडलें आहे. या अडचाव्या मजल्याच्या हॉलमध्येंच कै. प्रो. श्रीधर गणेश जिनसीवाले यांच्या स्मरणार्थ त्यांची मोठी तसबीर लावून तेथें त्यांची लायब्ररी ठेविली आहे. संपादकांच्या खोल्याखालील जागेंत निरनिराळ्या सरकारी खात्यांचे आलेले रिपोर्ट* व वर्तमानपत्रांच्या आणि मासिक पुस्तकांच्या फायली

---

* हे रिपोर्ट कोणकोणत्या खात्यांचे आहेत याची माहिती व्हावी म्हणून त्यांची याद खालीं दिली आहे:—

1 Abkari; 2 Administration; 3 Agriculture; 4 Archæology; 5 Blue Books; 6 Census 7 Commissions; 8 Congress ( Indian National Congress ) Reports; 9 Cotton Duties; 10 Crop Experiment & Horticultural Gardens; 11 Customs; 12 Deccan Agricultural Relief Act; 13 Education; 14 Factories; 15 Finance;

व चिकट बुकें† ठेवण्याची सोय केली आहे. मोठ्या दरवाजाच्या अलीकडील भागाची ही व्यवस्था झाली. पलीकडचा भाग अलीकडच्या भागाप्रमाणेंच जरी दुघई आहे तरी तो एकमजलीच आहे; व त्यांत दरवाजास लागून केसरी–मराठ्याच्या व्यवस्थापकाचें ऑफिस आहे; व पलीकडे 'डिसपॅचिंग ऑफिस' अथवा वर्तमानपत्रें रवाना करणें व त्यासंबंधीं इतर कामें करण्याचें ऑफिस असून त्यांत कारकून, शिपाई वगैरेंस बसण्याची सोय केली आहे. याला जोडूनच पलीकडे छापखाना ठेविला आहे; व त्यांत इंग्रजी–मराठी खिळे जोडणारे, नवे खिळे पाडणारे, प्रेसमेन व इंजिन आणि मशिन चालविणारे, वगैरे निरनिराळ्या प्रकारचे लोक काम करीत असतात. वाड्याच्या आंतील बाजूस मध्यभागीं सुमारें पांच साहा हजार लोक बसतील एवढें थोरलें पटांगण असून तें नेहमीं मोकळें असतें; व या पटांगणांत, गणेशोत्सवाच्या किंवा इतर प्रसंगाच्या कित्येक सार्वजनिक सभा भरत असतात. वाड्याच्या पाठीमागच्या बाजूस सुमारें दोन पुरुष उंचीचें कुंपण असून घरास व कारखान्यास पाण्याचा पुरवठा होण्याकरतां एक मोठा हौद असून कांहीं ठिकाणीं नळ्यांचीही योजना केली आहे. इमारतीची खरेदी, तिची डागडुजी, छापखाना, फाउंडरी, ऑफिस व कारखान्याच्या सर्व

---

16 Forest; 17 Government Gazettes ( India and Bombay ); 18 Income tax; 19 Irrigation; 20 Jails; 21 Land Records and Agriculture; 22 Local Boards; 23 Lunatic Asylum; 24 Medical Department; 25 Municipalities; 26 Native States ( Annual Reports &c. ) 27 Opium; 28 Plague; 29 Police; 30 Railways; 31 Reformatory Schools; 32 Registration; 33 Revenue; 34 Salt; 35 Sanitation; 36 Stamps; 37 Vaccination; 38 Veterinary; 39 Famine; 40 Judicial Administration—Statistics; 41 Railway & Sea Borne Trade; 42 Government Papers; 43 Chemical Analyser; etc. etc.

† निरनिराळ्या इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रांच्या मागील सर्व फायली जपून ठेवणें त्रासदायक असल्यामुळें त्यांतील महत्वाचे विषय कापून ते कोऱ्या बुकांत चिकटवून ठेविलेले असतात. या बुकासच 'चिकट बुक' असें नांव पडलें आहे. अशीं 'चिकट बुकें' केसरी ऑफिसमध्यें सुमारें १५ असून केसरी–मराठा निघाला त्या वेळेपासूनचे लेख या बुकांत आहेत. एकाद्या मागील विषयाची माहिती पाहिजे झाल्यास या चिकट बुकांचा तेथें चांगला उपयोग होतो.

सोयीं यासाठीं टिळक यांस एकंदर खर्च सुमारें ३५ हजार रुपये आला आहे.

यांची खासगी बैठकीची जागा विशेष शृंगारलेली नसून तेथें एक दोन आराम-खुर्च्या, चार दोन साध्या खुर्च्या व खुर्चीसारखींच पाठीचीं एक दोन बाकें, लिहिण्याचें एक मोठें टेबल, पुस्तकांचीं दोन तीन कपाटें, एक दोन शेल्फ्स, एवढेंच सामान सदोदित असतें. लायब्ररीचा दिवाणखाना विशेष रीतीनें शृंगारिला असून त्यांत वांटोळें टेबल, खुर्च्या, कपाटें हीं ठेविलीं आहेत; व गणपती, गोपालकृष्ण इत्यादि देवांच्या व मालाकार चिपळूणकर, न्या. तेलंग, रानडे, ब्राडला, ह्यूम, दादाभाई नौरोजी, ग्लॅडस्टन, वगैरे थोर पुरुषांच्या तसबिरी लाविल्या आहेत. या खेरीज तेथें व त्यांच्या खासगी बैठकीच्या जागींही आणखी कांहीं तसबिरा व इतर जिन्नस आहेत. यांत सार्वजनिक कामानिमित्त ठिकठिकाणीं हे गेले असतां तेथें दिलेलीं मानपत्रें, यांच्यासहित तेथील मंडळीचे घेतलेले फोटो, कॉलेजांतील सहाध्यायी, लॉक्लासमधील विद्यार्थी व शिक्षकवर्ग, आपल्या कुटुंबांतील माणसांचे व आपले जांवई रा. रा. केतकर, वैद्य व साने यांच्या कुटुंबांतील मंडळीचे फोटो, स्वतःच्या ऑइल-पेंटिंगच्या एक दोन मोठ्या तसबिरा, व नजर केलेले कारागिरीचे कांहीं जिन्नस हे मुख्य होत. मानपत्रांपैकीं पुणें येथील रहिवासी, चित्रशाळेंतील लोक व 'सद्वर्तनप्रवर्तक मंडळी' यांनीं १८९५ मध्यें मध्यभागांतील डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डतर्फें मुंबईच्या कायदेकौन्सिलांत निवडून आल्यावर दिलेलें मानपत्र, लाहोर येथें १९०० सालीं राष्ट्रीय सभेस गेले असतां तेथील विद्यार्थ्यांनीं दिलेलें मानपत्र, सिताबर्डी, नागपूर, कोल्हापूर, शिरवळ व जुन्नर या ठिकाणचीं मानपत्रें, हीं तेथें लटकविलीं असून त्यांपैकीं लाहोरचें मानपत्र काळ्या कापडावर सोनेरी शाईनें छापलेलें असून शिरवळचें मानपत्र हातानें लिहिलेलें आहे व त्यावरील टिळक यांची तसबीर हातानें काढली आहे ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

मोठ्या दिवाणखान्यांत जी लायब्ररी आहे तींत इतिहास, वाङ्मय, कायदा, शास्त्र, राजकारण, वगैरे निरनिराळ्या विषयांवरचे सुमारें दहा हजार ग्रंथ असून त्यांचीं निरनिराळीं बत्तीस कपाटें आहेत. हीं कपाटें दोन खिडक्यांच्यामध्यें एकेक अशीं भिंतीकडेला दोन्हीं बाजूनें रांगेनें

ठेवलीं असून समोरच्या भिंतीला लागून जीं कपाटें आहेत त्यांतील एकांत एनसायक्लोपीडियाचे नवे जुने मिळून एकंदर ३५ भाग ठेविले आहेत. ' लोकहितवादी ' या नांवानें प्रसिद्ध असलेले कै. गोपाळराव हरि देशमुख यांच्या व कै. रा. सा. वामन मोरेश्वर सोहनी यांच्या खासगी पुस्तकांचा सर्व संग्रह टिळक यांनीं या लायब्ररीकरतां डॉ. देशमूख व रा. रा. गणपतराव सोहनी यांजकडून मिळविला असल्यामुळें जुने कित्येक ग्रंथ आज जे दुर्मिळ झाले आहेत त्यांचा संग्रह अनायासेंच या लायब्ररींत झाला आहे. वेदांचीं भाषांतरें, बखरीं, ऐतिहासिक लेख; तुकाराम, मोरोपंत, वामनपंडित, वगैरे कवींचीं काव्यें, इत्यादि मराठी पुस्तकांचाही यांत संग्रह असून रा. रा. दाभोळकर, ग्रंथ-संपादक-मंडळी, जावजी दादाजी, वगैरेंनीं प्रसिद्ध केलेले ग्रंथ, आणि केसरीकडे अभिप्रायार्थ आलेलीं पुस्तकें यांचींही निराळीं कपाटें ठेविलीं आहेत. या खेरीज कै. नामजोशी यांनीं मराठी भाषेच्या लिहिलेल्या कोशाचे पंधरा सोळा हस्तलिखित व्हाल्यूम व इतर कांहीं हस्तलिखित ग्रंथ यांचाही निराळा संग्रह आहे; व होतां होईल तों इंग्रजी, मराठी, संस्कृत वगैरे निरनिराळ्या भाषेंत जे निरनिराळे उपयुक्त ग्रंथ आहेत त्या सर्वांचा संग्रह करून या लायब्ररीचा लोकांना चांगल्या तऱ्हेनें उपयोग होईल अशी टिळक हे तजवीज करून ठेवणार आहेत. ' अडचाव्या मजल्या ' वर प्रो. जिनसीवाले यांच्या पुस्तकांचा जो संग्रह केला आहे त्यांत धर्म, इतिहास, वाङ्मय या ग्रंथांचा विशेष भरणा असून या लायब्ररीची किंमत सरासरी सात हजार रुपये होईल. पुण्यास लोकांस उपयोगी पडेल अशी चांगली लायब्ररी आजपर्यंत नव्हती; पण टिळक यांच्या प्रयत्नानें ह्या दोन्ही लायब्ऱ्या यांच्या संस्थेसच नव्हे तर, एकंदर पुणें शहरास भूषण झाल्या आहेत असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति मुळींच होणार नाहीं.

## नित्यक्रम, राहटी व संवयी.

टिळक हे बहुधां सकाळीं साडे सहा वाजतां निजून उठत. पण कांहीं कारणानें रात्रीं जाग्रण झाल्यास ते सकाळीं साडेसातपर्यंतही उठत नसत. रात्रीं कितीही जाग्रण झालें असलें तरी यापुढें ते निजलेले माझे पाहण्यांत आलें नाहीं. दिवसा दोनप्रहरीं जेवल्यावर मात्र त्यांना नेहमीं निजण्याची संवय आहे; व अलीकडे प्रकृति थोडी अशक्त झाली

असल्यामुळें रात्रीं ज्या मानानें श्रम किंवा दगदग झाली असेल त्या मानानें दोनप्रहरीं विश्रांति घेऊन ते उठत असत. तरी पण दोन तासांपेक्षां दिवसां अधिक वेळ त्यांनीं झोंपेंत अगर विश्रांतींत कधींही घालविला नाहीं. एकादे वेळीं जरूरीचें कांहीं काम असल्यास किंवा वाचनाकडे तंद्री लागल्यास या झोंपेसही फांटा मिळे. सकाळीं ७ वाजतां सिटी—पोस्टांतून टपाल आणविल्यावर ते अगोदर आपली खासगी पत्रें वाचीत असत, व मग महत्वाचीं वर्तमानपत्रें चाळीत, आणि नंतर ऑफिस किंवा छापखान्यासंबंधाच्या पत्रांचा कांहीं विशेष खुलासा पाहिजे असल्यास तो आपले भाचे व ‘ केसरी—मराठा ’ पत्रांचे व्यवस्थापक रा. रा. धोंडोपंत विध्वंस यांस सांगत. नंतर कोणी भेटावयास आले असले तर त्यांची ते भेट घेत; नाहींपेक्षां लायब्ररींतील एखादा ग्रंथ काढून आपल्या खासगी बैठकीचे जागीं आरामखुर्चीवर तो वाचीत पडत. तात्पर्य, सकाळीं उठल्यापासून रात्रीं निजेपर्यंत यांचा सगळा वेळ बहुधां लेखन, वाचन, मनन व संभाषण यांत जाई. प्रपंचावर यांच्या कुटुंबाची देखरेख असल्यामुळें जरूरीच्या प्रसंगाखेरीज ते त्यांत फारसें मन घालीत नसत. यांचा पोषाख व राहटी अगदीं साधी असते. अंगांत एक पांढरा सदरा, त्यावर एक पांढरा अंगरखा, पायांत पुणेरी जोडा, नेसावयास साधीं धोत्रें, पांघरावयाला साधीं उपरणीं, व डोकीवर एक पुणेरी तांबडी पगडी, हाच त्यांचा नेहमींचा पोषाख. या पोषाखांत आज कैक वर्षे त्यांनीं फरक केलेला कोणाच्या पाहण्यांत नाहीं. पावसाळ्यांत किंवा थंडीच्या दिवसांत अलीकडे हे सदऱ्यावर अंगरख्याच्या आंत लोंकरीचा शर्ट घालीत, व प्रवासांत असले ह्मणजे कधीं कधीं ओव्हर—कोटाचा उपयोग करीत. बूट, पाटलोण, जाकीट, पटका किंवा अशाच तऱ्हेचा दुसरा पोषाख त्यांनीं कधीं वापरला नाहीं. ते पांघरावयाला जीं साधीं उपरणीं घेत त्याऐवजीं कधीं कधीं पांढऱ्या रेशमी कांठाची घेत; व वेळ समजण्याकरितां अंगरख्याच्या आंत सदऱ्याच्या खिशांत घड्याळ बाळगीत. घरीं पोषाख उतरून ते नुसता सदरा अडकवून बसले असतां कधीं कधीं हंगेरियन कॅपच्या धर्तीवरची टोपी डोक्यास घालीत. यांचें जेवण साधें असतें. सकाळीं किंवा दोनप्रहरीं निजून उठल्यावर हे चहा घेत, व अलीकडे चहाची त्यांना संवयच लागली होती; पण आतां त्यांनीं चहा मुळींच सोडिला आहे.

यांना मुख्य संवय ह्मटली ह्मणजे एक सुपारी खाण्याची; आणि तीही पण विलक्षण आहे; इतकी कीं, कोणाला जेवल्यावर, तोंड वाईट झाल्यास किंवा तहान वगैरे लागल्यास तिची आठवण होते. पण यांना सकाळ असो, संध्याकाळ असो, वेळीं अवेळीं सुपारीशिवाय चैन पडत नाहीं. त्यांच्या या संवयीमुळें घरांत ठिकठिकाणीं दगडी सुपाऱ्यांनीं भरलेल्या तीन चार लहान लहान टोपल्या व दोन तीन पोलादी आडकित्ते टाकलेले असतात ! पत्नी सुशील व मुलेंमाणसें आज्ञाधारक असल्यामुळें यांना कौटुंबिक सुखाचा पूर्ण लाभ झाला आहे. तथापि, अलीकडील शिकलेल्या कित्येक लोकांचा पत्नीशीं होत असलेला फाजील संवाद किंवा सहवास अथवा मुलांचे फाजील लाड करण्याची तऱ्हा हीं त्यांचे ठायीं मुळींच दृष्टीस पडत नसत; एवढेंच नव्हे तर, माझ्यासारख्या सहवासांतल्या मनुष्याच्या देखत कारणाशिवाय ते घरच्या माणसांबरोबर सहसा बोलतही नसत. यांचे वीस एकवीस वर्षांचे सर्वांत वडील चिरंजीव विश्वनाथपंत ह्मणून होते ते १९०३ सालीं प्लेगनें वारले. हल्लीं यांना रामभाऊ या नांवाचा १४ वर्षांचा एक व बापू नांवाचा १२ वर्षांचा एक असे दोन लहान मुलगे असून तीन मुली आहेत. मुली विवाहित असून त्यांना लिहितां वाचतां चांगलें येतें. लहान मुलीला तर सावित्री–गीत रुक्मिणी–गीत, सीता–गीत वगैरे गीतें शिकविलीं असून तिच्याकडून भारत–रामायणांतील कांहीं कथाही वाचून घेतल्या आहेत. लहान मुलांस शिकविण्याकारितां टिळक यांनीं घरीं कांहीं दिवस शिक्षक ठेविले होते. थोरल्या मुलाचा घरीं इंग्रजी तिसऱ्या यत्तेपर्यंत अभ्यास झाल्यावर १९०६ सालीं त्याला 'न्यू इंग्लिश स्कूल' मध्यें घातलें. दोन्ही मुलांना हे स्वतः घरीं केव्हां केव्हां कांहीं विषय समजावून देत; व ब्रह्मकर्म आणि गीतापाठ सांगण्याकरितांही यांनीं एका शिक्षकाची कांहीं दिवस योजना केलेली होती. विश्वनाथपंत होते त्या वेळीं टिळक त्यांना गणित, संस्कृत वगैरे विषय विशेष मेहनतीनें शिकवीत असत, व ते बुद्धीचे इतके तीव्र नसल्यामुळें एकादा विषय त्यांना समजेनासा झाला तर टिळक थट्टेनें, विनोदानें किंवा रागें भरूनही तो समजावून सांगत; व क्वचित् प्रसंगीं त्यांच्या मनाला चटका लागावा म्हणून 'हा पुढें केसरी चालविणार!' असा त्यांना टोमणाही मारीत. धाकटा मुलगा थोडा हट्टी असल्यामुळें हे कधीं कधीं त्याला

रागें भरत व धाकही दाखवीत. पण मुलांना धाकदपटशा दाखवून किंवा मारून शिक्षण देण्याच्या पद्धतीचा यांना तिटकारा असल्यामुळें ही पद्धत ते सहसा अमलांत आणीत नसत. गोडीगुलाबीनें, त्यांच्या तंत्रानें व त्यांच्यांत समंजसपणा उत्पन्न होईल अशाच रीतीनें ते त्यांना शिक्षण देत; व आपल्या मुलांच्या शिक्षणासंबंधानें एके प्रसंगीं गोष्ट निघाली असतां ते असेंही म्हणाले कीं, "मी मुलांना कधीं मारीत नाहीं. थोरल्यास शहाणा करणार आणि तुला खुळा ठेवणार, असें झटलें कीं धाकटा रडूं लागतो आणि आपला हट्ट सोडतो." हे व्यायाम घेण्याकरितां कधीं कधीं बाहेर जात असत; पण विशेष जात नसत; आणि यांची मूळची प्रकृति निरोगी असून लहानपणीं तालिम खेळून ती सुदृढ केली असल्यामुळें 'व्यायाम न घेण्यानें प्रकृति बिघडली' अशा तऱ्हेची कुरकुर त्यांनीं कधीं केली नाहीं. शहरांत कोठेंही काम लागल्यास हे केव्हां केव्हां पायीं जात, व केव्हां केव्हां गाडींतूनही जात. आपल्यास मोठी योग्यता प्राप्त झाली आहे, सबब आपण आतां गाडींतूनच गेले पाहिजे असा विचार त्यांच्या मनामध्यें कधींही आला नाहीं. एवढेंच नव्हे तर, निकडीचें काम असल्यास गाडीची वाट न पाहतां घाईघाईनें अंगरखा पागोटें घालून ते इतक्या जलदीनें पायीं निघत कीं, आपण कशा रीतीनें चाललों आहों याचें त्यांना भानही राहत नसे. प्रतिष्ठित माणसें कामकाजास चाललीं असतां साधारणपणें गाडीघोडा, नोकरचाकर किंवा स्नेही यांपैकीं कोणीतरी बरोबर घेऊन जात असतात; पण ही तऱ्हा यांच्या अंगीं नसून बरोबर कोणी असो वा नसो, एकटेच हातांत छत्री घेऊन शहरांत कोठेंही पायीं जाण्यास त्यांना बिलकुल शंका वाटत नसे. बरें, यांना वरील सोयींपैकीं एकाद्या सोयीची अनुकूलता नाहीं असें नाहीं. पण 'सोय असली असली, नसली नसली' असें मानण्याकडेच त्यांची प्रवृत्ति असल्यामुळें त्यांना त्याचें कांहींच वाटत नसे.

## व्यवसाय व स्नेही-मंडळी.

टिळक यांचा मुख्य व्यवसाय म्हटला म्हणजे लेखन-वाचन हा होय. पण याखेरीज संभाषण व सल्लामसलत हींही यांच्या व्यवसायाचीं दोन अंगें होऊन बसलीं होतीं. मुखमार्जनादि प्रातर्विधि आटोपून वाचण्याच्या हेतूनें एकादा ग्रंथ हातीं घेतला न घेतला तोंच 'अमका भेटावयास आला

आहे, तमका आपली गांठ घ्यावी म्हणतो ' अशा तऱ्हेच्या निरोपास सुरवात होई; व यांना भेटण्याचा कोणास मज्जाव नसल्यामुळें निरोप आणणारे व भेटणारे गृहस्थ एकदमच येऊन दाखल होत! हे भेटीस आलेल्या गृहस्थांचा त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें चांगला आदर करीत; व एकाद धोंगड्या असो किंवा जहागीरदार असो, त्याच्याशीं निर्भिडपणाचें पण ममतेचें भाषण करून त्याला योग्य सल्ला देत. कायदा उत्तम जाणणारे व देशाविषयीं खरी कळकळ बाळगणारे अशी यांची सर्वत्र ख्याति झाली असल्यामुळें खेड्यापाड्यांतील गोरगरीब, कागदपत्रांचीं पुडकींच्या पुडकीं घेऊन सल्लामसलत विचारण्याकरितां त्यांच्या भेटीस येत; व सवड असल्यास त्यांचे सगळे कागदपत्र पाहून हे त्यांना योग्य सल्ला देत. कायद्याच्या या सल्ल्याबद्दल मोबदला ह्मणून त्यांनीं कोणापासून कधीं पैही घेतली नाहीं. उलट, गोरगरीबांचे अर्ज फुकट लिहिल्यावर ते रवाना करण्याकरतां त्यांच्याजवळ पैसे नसल्यास कधीं कधीं आपल्या पदरचीं तिकिटें लावून हे ते रवाना करीत. अलीकडे अशा प्रकारचा सल्ला देण्यास त्यांना मिळावा तितका वेळ मिळत नसल्यामुळें कित्येक लोकांना विमुख जावें लागे. बंगाल, मद्रास, पंजाब, इकडील जे कित्येक लोक यांना भेटावयास येत त्यांपैकीं कित्येक यांच्या विद्वत्तेबद्दल ख्याति ऐकून येत; व आजपर्यंत तिकडून आलेल्या कांहीं गृहस्थांबरोबर ज्योतिष, वेद, धर्मग्रंथ, प्राचीन शोध, वाङ्मय, इत्यादि विषयांवर त्यांचीं संभाषणेंही झालेलीं माझे पाहण्यांत आहेत. केसरीच्या जाहिराती, वर्गणी, छपाईचीं कामें वगैरेसंबंधाची व्यवस्था ऑफिसमध्यें निराळीं माणसें नेमून केली असल्यामुळें त्यासंबंधीं सहसा कोणी यांच्याकडे येत नसे. तथापि, क्वचित प्रसंगीं एकादा मनुष्य अज्ञानानें ह्मणा किंवा मुद्दाम यांना पाहण्याच्या निमित्तानें ह्मणा, वर्गणी अगर जाहिरात देण्याकरितां यांच्याकडे येई. बाकी केसरींत मजकूर प्रसिद्ध करावा म्हणून, किंवा पुस्तकावर अभिप्राय द्यावा ह्मणून, अथवा एकाद्या महत्वाच्या प्रश्नासंबंधानें खुलासा करून घेण्याकरितां ह्मणून, पुष्कळ लोक नेहमीं यांच्या भेटीस येत असत. या खेरीज डॉ. गर्दे, प्रो. पाठक, ह. प. भिंगारकर बोवा, रा. सा. बापट, रा. रा. वासुदेवराव जोशी, वे. पारखी शास्त्री, ओक शास्त्री वगैरे पुण्यांत राहणारे; व ना. दाजी आबाजी खरे, रा. ब. महाजनी, प्रो. विजापूरकर,

डॉ. देशमूख, रा. रा. माधवराव बोडस, खापर्डे, गजानन भास्कर वैद्य, उपासनी, गों. ना. केळकर, पळशीकर, वगैरे बाहेरचे स्नेही उतरण्यास, भेटण्यास, किंवा गप्पा मारण्यास कधीं कधीं येत असत. प्रो. जिनसीवाले हे यांचे गुरु व मित्र असून ते व रा. सा. सोहनी हे मरेपर्यंत नेहमीं यांच्या घरीं येत असत. पूर्वी सार्वजनिक सभेच्या हॉलमध्यें प्रो. शि. म. परांजपे ( काळकर्ते ), आण्णासाहेब पटवर्धन, श्री. बाळासाहेब नातू, रा. रा. आप्पासाहेब मांडे, बेहेरे, दंडवते, वगैरे मंडळी संध्याकाळीं जमत असे तेव्हां तेथें हे केव्हां केव्हां जात असत; व संभाषण, वादविवाद वगैरे गोष्टी करून रात्रीं ८–८॥ च्या सुमारास घरीं परत येत असत. अलीकडे ही मंडळी क्वचित् प्रसंगीं तेथें जमत असल्यामुळें हेही तिकडे फारसे जात नसत. फर्ग्यूसन कॉलेजकडील बाजू घराच्या जवळ असल्यामुळें केव्हां केव्हां हे बहुधां तिकडेच फिरावयास जात. घरीं परत आल्यावर कोणी भेटावयास आले असल्यास त्यांची हे गांठ घेत व नंतर जेवावयास उठत. नऊ साडेनऊ वाजण्याच्या सुमारास यांचें जेवण आटोपे. जेवण आटोपल्यावर लगेच न निजतां ते कोणतें तरी पुस्तक वाचीत आरामखुर्चीवर पडत; व एकादे वेळीं वाचनाकडे तंद्री लागली म्हणजे बारा किंवा एक दोन वाजले तरी झोंपेची दाद लागत नसे! केसरीच्या दिवशीं म्हणजे सोमवारीं* तर यांची कोणतीही वेळ बांधली नसून कधीं कधीं तर रात्रीं बारावर दोन दोन तीन तीन वाजतांही त्यांनीं मजकूर सांगितलेला आहे! यांचा सुट्टीचा असा कोणताच दिवस नसे. वर सांगितल्याप्रमाणें यांच्या व्यवसायाचें रहाटगाडगें सारखें सुरू असे; व ज्या दिवशीं कमी लोक भेटावयास अगर सल्लामसलत विचारावयास येत तोच दिवस यांच्या सुट्टीचा असें म्हटलें तरी चालेल. वर्तमानपत्राखेरीज १९००–१९०१ या सालांत ' आर्यांचें मूलस्थान ' हा इंग्रजी ग्रंथ ते लिहीत असल्यामुळें त्यांतच यांचा विशेष वेळ जाई; व त्याला लागणारीं पुस्तकेंच बहुधां ते वाचीत असत. अलीकडे या विषयासंबंधानें अधिक माहिती मिळवून त्याचीच

---

* केसरी मंगळवारीं निघत असून केसरीचा दिवस सोमवार असें जें वर लिहिलें आहे त्याचा अर्थ असा घ्यावयाचा कीं, केसरीबद्दल काम करावयाचा दिवस सोमवार हाच आहे; व त्या दिवशीं जेव्हां काम करावें तेव्हां तो मंगळवारीं निघतो.

एक पुस्तकी लिहिण्याचा त्यांचा प्रयत्न होता; व त्याकरतां खाल्डिया वगैरे प्रांतांतील प्राचीन शोधासंबंधीं ते ग्रंथ वाचीत असत. तसेंच भगवद्गीतेवरही एक टीका मराठींत लिहिण्याचा त्यांचा विचार असल्यामुळें त्यासंबंधींही कांहीं टिपणें ते करून ठेवीत असत. १९०० साल अखेरपर्यंत लॉक्लास चालू होता. पण पुढें तो बंद करण्यांत आला; व अद्यापही तो बंदच असून यापुढें सुरू करण्याचा त्यांचा विचार नाहीं. त्यांचा मुख्य व्यवसाय केसरीपत्र चालविणें हा असून त्या बाबतींतच त्यांचें सानिध्य मला प्राप्त झाल्यामुळें त्यांच्या या व्यवसायासंबंधानें व तदनुषंगिक इतर गोष्टीसंबंधानें प्रथमतः विवेचन करणें इष्ट असल्यामुळें मी आतां तिकडे वळतों.

## संपादक या नात्यानें योग्यता.

वर्तमानपत्रकर्त्यांचा धंदा किती महत्वाचा व किती बिकट आहे हें वाचकांस सांगावयास नको. अगोदर वर्तमानपत्रें हीं परदेशी रोपें आहेत. तीं हिंदुस्थानांत परकीय अमलाखालच्या हवेंत उत्तम रीतीनें वाढणें कठिण आहे. त्यांतून अलीकडे दहा बारा वर्षांत त्यांच्यावर एक प्रकारचा रोग पडून त्यांतून तीं कशीं निभावतात असा पुष्कळांना धाक पडला आहे. अशा स्थितींत त्यांची उत्तम रीतीनें जोपासना करून त्यांस खतपाणी घालून जो वाढवील तो खरा देशभक्त होय. केसरीपत्र निघण्यापूर्वीच्या महाराष्ट्रांतील लोकमतांत व निघाल्यानंतरच्या लोकमतांत किती अंतर पडलें आहे, हें गेल्या पंचवीस वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहासाकडे लक्ष दिलें असतां कोणालाही समजून येईल. केसरीपत्र निघालें त्यावेळेपासून कांहीं दिवस त्यांत राजकीय, सामाजिक, औद्योगिक वगैरे बऱ्याच विषयांवर लेख येत असत; तरी पण त्यावेळींही राजकीय विषयांचीच विशेष माहिती लोकांना करून देण्याकडे त्याची प्रवृत्ति होती; व पुढें पुढें टिळक यांचे हातीं तें पत्र आल्यावर त्याची या बाबतींत कायम दिशा ठरून आजमितीसही तें याच दिशेनें जात आहे. राजकीय बाबतींत महाराष्ट्रांतील लोकांची विचारक्रांति होण्यास ज्या कित्येक गोष्टी कारणीभूत झाल्या आहेत त्यांत केसरीपत्र मुख्य असून त्याकडेच अग्रेसरत्वाचा मान येईल. हा मान केसरीस मिळण्यास त्याचें चालकत्व टिळक यांचेकडे असून त्यांच्या अंगचे विद्याव्यासंग, कायद्यामधील

प्रविणता, स्वार्थत्याग, लोकांविषयीं खरी कळकळ, अंग मोडून मेहनत करणें, इत्यादि गुणच कारणीभूत आहेत यांत शंका नाहीं. हल्लींच्या काळीं राजकीय बाबतींत चळवळ करण्याची दिशा ज्या पत्रानें रोंखली आहे त्याच्या संपादकाच्या अंगीं कायद्याचें ज्ञान अवश्य असलें पाहिजे. तें नसेल तर सुकाणू नसलेल्या जहाजाप्रमाणेंच त्याची गति होईल. महाराष्ट्रांत आज मितीस देशी भाषेंत जीं पत्रें निघत आहेत त्यांपैकीं बहुतेक याच दिशेनें जात आहेत. पण त्यांच्या संपादकांपैकीं पुष्कळांना कायद्याचें ज्ञान नसल्यामुळें कित्येक वेळां त्यांना केसरीसारख्या पत्रावरच अवलंबून राहावें लागतें; एवढेंच नव्हे तर, कित्येकांना इंग्रजी भाषाही येत नसल्यामुळें पुष्कळ पत्रें केसरीचे प्रतिध्वनिच होऊन बसलीं आहेत. पत्राचें वजन वाढण्यास त्यांत विचारांचें वजन पाहिजे. म्हणजे कोणताही विषय हातीं घेतला तरी साधकबाधक प्रमाणें देऊन तो अशा कांहीं मुद्देसूद रीतीनें लिहिला पाहिजे कीं, तो वाचतांच विद्वान् व मोठ्या योग्यतेच्याही माणसावर त्याची छाप पडली पाहिजे.* केसरीचें वजन वाढण्यास ही एक मुख्य गोष्ट आहे. पुष्कळ पत्रांकडे पाहिलें म्हणजे त्यांत सत्व थोडें आणि फोल फार असाच प्रकार दिसून येतो. कित्येक आपल्या अलंकारिक भाषेनेंच लेखांस सजवितात, बाकी त्यांत खरें पाणी थोडेंच असतें; व कित्येक, मुद्दाही नाहीं आणि भाषाही नाहीं, कोणी-कडून तरी पत्र काढावयाचें म्हणून काढतात! ही स्थिति वाईट आहे; व ती सुधारण्यास पत्रकर्त्याचें कर्तव्य जाणणाराच्याच हातीं तो धंदा असला पाहिजे. पत्रकर्त्याच्या अंगीं कोणकोणते गुण असले पाहिजेत, व पत्र कसें चालवावें हा बोध टिळक यांच्या उदाहरणावरून घेण्यासारखा आहे. यांना संस्कृत भाषेचें उत्तम ज्ञान असल्यामुळें त्यांतील ग्रंथांची माहिती व त्यांत भरलेलें ज्ञानभांडार हीं त्यांच्या हस्तगत झालेलीं आहेत;

---

* मि. मलबारी यांनीं आपल्या 'व्हॉइस ऑफ इंडिया' नामक पत्रांत पत्र-कर्त्याच्या अंगीं मुख्य गुण कोणते पाहिजेत, हें लिहितांना एके ठिकाणीं वरील गुणासच प्राधान्य दिलें आहे. ते म्हणतातः—

"What, in fact, is the most important qualification of a journalist? It is quick, yet sound judgment, a capacity for coming to proper decisions after carefully weighing facts not the mere pros and cons mentioned in manuals but the stern-facts staring the public in the face."

ज्योतिष, गणित, इतिहास, इत्यादि विषयांत त्यांनीं प्राविण्य संपादन केलें आहे; इंग्रजी भाषा उत्तम रीतीनें अवगत आहे; व कायदा तर हात जोडून त्यांचेपुढें उभा आहे! अशा स्थितींत त्यांनीं चालविलेल्या पत्राचा लौकिक कां पसरूं नये? इतर कांहीं पत्रकर्त्यांकडे संस्कृत भाषेंतील लेख पाठविले असतां ते शुद्ध आहेत कीं अशुद्ध आहेत, हें समजण्याचीच त्यांना मारामार पडते; मग त्यांतील विचार मुद्देसूद आहेत किंवा नाहींत, तसेंच ते विषय प्रतिपादनास योग्य आहेत किंवा नाहींत, हें समजण्याची कथा लांबच राहिली! केसरीकडे आजपर्यंत अशा प्रकारचे लेख बरेच आले असून ते तपासण्यास व त्यांतील मर्म ताबडतोब ओळखून उपयोगी व गैरउपयोगी पाहून ते दुरुस्त करून देण्यास टिळक यांस मुळींच विलंब लागलेला नाही. ज्योतिष, गणित, तत्वज्ञान, या विषयासंबंधानेंही त्यांचें असेंच आहे. ज्ञानेश्वर, शिवाजी महाराज, नाना फडणवीस, मोरोपंत, वगैरे पुरुषासंबंधाच्या जन्मकुंडल्या व कालनिर्णयासंबंधाची माहिती आली असतां किंवा रामायण, महाभारत अथवा प्राचीन ग्रंथ यांतील विकट प्रश्नासंबंधानें चर्चात्मक लेख आले असतां ताबडतोब त्यांतील रहस्य समजून घेऊन व हां हां म्हणतां वाचून दुरुस्त करून ते छापखान्यांत पाठविले आहेत. कायद्याचें प्राविण्य तर त्यांच्या बहुतेक लेखांत दिसून येतें; विशेषतः लँड रेव्हिन्यू बिलावरचीं आर्टिकलें, म्युनिसिपालिट्यांचा कायदा, जमिनीच्या हक्कांची नोंदणी, खोतीबिल, गौप्यगोपनाचा व युनिव्हर्सिटीचा कायदा, वगैरे लेख वाचले असतां मी म्हणतों याचा प्रत्यय कोणासही येईल. तसेंच अर्थशास्त्र, धर्म व नीति यांविषयींही अनेक गहन विचार त्यांनीं प्रदर्शित केले आहेत; व राजनीतीचें रहस्य पूर्णपणें ओळखून राजकीय सुधारणेचा पिच्छा पुरविण्याचें व्रत त्यांनीं स्वीकारिलें असल्यामुळें या विषयाचा त्यांनीं सारखा खल सुरू ठेविला आहे. शिवाय विषयानुरूप भाषा, कोटिक्रम, विनोद, विषय खुलविण्याची शैली वगैरे जे गुण संपादकाचे अंगीं असावे लागतात तेही ह्यांच्या अंगीं असल्यामुळें लॉर्ड ह्यू सेसिल यांनीं ग्लॅडस्टन साहेबांस उद्देशून लिहिल्याप्रमाणें "जरुरीच्या प्रसंगाचा बिगुल वाजला कीं, फ्रेडरिक धि ग्रेटच्या धर्तीनें तयार झालेल्या सैन्याप्रमाणें यांच्या बुद्धीच्या

सर्व शक्ति आपापलीं शस्त्रास्त्रें घेऊन जय्यत तयार राहतात "* तात्पर्य, संपादक या दृष्टीनें त्यांची योग्यता सर्वांत मोठी आहे; व या त्यांच्या योग्यतेचा प्रत्यक्ष अनुभव मला कांहीं दिवस घ्यावयास सांपडल्यामुळें मला एक प्रकारचा विशेष आनंद वाटतो; एवढेंच नव्हे तर, या अनुभवाची आठवण झाली ह्मणजे मनास एकप्रकारची शांती मिळते. असो; आतां केसरीच्या मजकुराची तयारी, त्यांची लेख सांगण्याची तऱ्हा, विचारसरणी, वगैरेसंबंधानें विशेष माहिती क्रमाक्रमानें पुढें देतों.

## केसरीच्या मजकुराची तयारी.

केसरीचा मजकूर कसा व केव्हां तयार होतो हें जाणण्याची इच्छा पुष्कळांना आहे; व त्यासंबंधानें माझ्या ओळखीचे लोक व स्नेही मला नेहमीं प्रश्न करीत असतात. तेव्हां यासंबंधाची देतां येण्यासारखी माहिती येथें नमूद करणें इष्ट आहे. कित्येकांना वाटतें कीं, केसरींत एवढे महत्वाचे लेख येतात त्याअर्थी टिळक यांना ते तयार करण्यास निदान चार दोन दिवस तरी लागत असतील; कित्येकांना वाटतें कीं, केसरींतून प्रगट केलेल्या विचारांचें अगोदर मनन करण्यास त्यांना एक आठवडा तरी लागत असेल; व कित्येकांना वाटतें कीं, महत्वाच्या विषयांवरील लेख अगोदर एक दोन महिने तरी लिहून ठेवीत असतील. या कल्पना हीं मनुष्यें आपापल्या समजाप्रमाणें व त्यांना मिळालेल्या शिक्षणाप्रमाणें करीत असतात; व कोणत्याही महत्वाच्या गोष्टीसंबंधानें मनुष्यानें अनेक प्रकारच्या कल्पना कराव्या हा त्याचा स्वाभाविक धर्म आहे; व म्हणून वरील कल्पना क्षुद्र न मानतां एके प्रकारें त्या महत्वाच्याच आहेत असें म्हटलें पाहिजे. 'टिळकांच्या लेखांत जादू आहे, व ते वाचले असतां आम्ही भारून जातों' अशा प्रकारचे जे उद्गार कित्येक प्रसंगीं लोकांनीं काढलेले माझ्या कानावर आले आहेत तशाच प्रकारचे उद्गार त्यांच्या मजकुराची तयारी करण्यासंबंधानें व लेख लिहिण्यासंबंधानें सांगण्याचा सुप्रसंग आज आला आहे, याबद्दल मला आनंद वाटतो. त्यांच्या मजकुराच्या तयारींत निःसंशयपणें एक प्रकारची जादू आहे, व ती त्यांना अशी कांहीं

* When the bugle sounded every faculty was in its place and at command, armed and clothed with all the resources of knowledge & drilled after Fredick the Great's fashion, to march " like a pair of compasses "—Ninenteenth Century. *March 1906.*

उत्तम साधली आहे कीं, ती पाहून आमच्या सारख्यांची नजर बंदच होते ! हजारों खंडी वजन भरलेलें जहाज किंवा लाखों खंडी वजन भरलेली आगगाडी चालविण्यास ज्याप्रमाणें वाफेची प्रचंड शक्ति लागते त्याप्रमाणें केसरीसारखें महत्वाचें व वजनदार पत्र चालविण्यास पोक्त विचार, उत्तम माहिती व अनुभव इत्यादिकांची प्रचंड शक्ति पाहिजे हें कोणासही कबूल करावें लागेल. ही शक्ति त्यांनीं कांहीं आज काल पैदा केलेली नाहीं. ती पैदा करण्यास त्यांना कैक दिवस विद्याव्यासंग करावा

घेत असतां जसा आणखी दगडी कोळसा किंवा लांकडें घालीत असतात तद्वत् यांच्या ठिकाणीं उत्पन्न झालेल्या शक्तीचा उपयोग होत असतांही पत्रकर्त्याला लागणाऱ्या अवश्य माहितीचा व ज्ञानाचा सांठाही हे वरचेवर करीत असत; पण तो इतक्या लवकर व इतक्या जलदीनें करीत असत कीं, त्यांच्यासारख्या विलक्षण बुद्धीच्या माणसाशिवाय तो करतां येणें शक्य नाहीं. पूर्वी केसरीचा मजकूर दहा कॉलमच असल्यामुळें व केसरी ' आर्यभूषण ' छापखान्यांत निघत असल्यामुळें त्याचा मजकूर नेहमीं सोमवारीं तयार होत असे. अलीकडे पत्राचा आकार दुप्पट झाल्यापासून व मजकूरही दुप्पट होऊन स्वतःचा प्रेस आणविल्यामुळें कांहीं मजकूर शनिवारीं व रविवारीं द्यावा लागतो व कांहीं सोमवारीं द्यावा लागतो. पण १९००–०१ सालांत सोमवार खेरीज दुसऱ्या कोणत्याही दिवशीं ते मजकुराकडे लक्ष देत नसत. क्वचित् प्रसंगीं रविवारीं थोडीबहुत तयारी करीत; पण असा प्रसंग वर्षांतून एखादा दुसराच येई. पत्राकरितां म्हणून हे जीं पुस्तकें अथवा

वर्तमानपत्रें वाचीत असत तीं बहुधां इंग्रजींच असत. त्यांत मुख्यत्वेंकरून मुंबईचीं 'टाइम्स,' 'ग्याझेट,' 'ॲडव्होकेट'; मद्रासचीं 'हिंदु,' 'स्टँडर्ड,' 'पेट्रिअट'; कलकत्त्याचीं 'अमृतबझार पत्रिका,' 'बेंगाली,' 'इंडियन मिरर,' 'वंदेमातरम्'; लाहोरचें 'ट्रायब्यून,' हीं दैनिक असून 'इंडियन स्पेक्टेटर' (मुंबई), 'युनायटेड इंडिया' (मद्रास), 'इंडियन पीपल' (अलहाबाद), 'न्यू इंडिया' (कलकत्ता), 'गुजराती' (मुंबई), 'पंजाबी' (लाहोर), 'वेन्स्डे रिव्ह्यू' (मच्छलीपट्टण), 'ॲडव्होकेट' (लखनौ), वगैरे कांहीं आठवड्यांतून एकदां, दोनदां किंवा तीनदां निघणारीं आहेत. विलायतेंतील पत्रांपैकीं 'लंडनटाइम्स' ते पूर्वी घेत असत; पण पुढें तें बंद करून तिकडील सर्व पत्रांतील हिंदुस्थानासंबंधाचे महत्वाचे लेख कापून पाठविणारी कंपनी आहे तिच्याकडून असले लेख विकत आणवीत असत. हे लेख दर आठवड्यास सुमारें ५०—७५ तरी असत. याखेरीज 'इंडिया,' 'जस्टिस,' 'इंडियन सोशिआलॉजिस्ट', 'गेलिक अमेरिकन,' 'न्यू सेंचरी पाथ,' 'इंडियन ओपीनियन,' वगैरे इंग्लंड, अमेरिका, आफ्रिका, येथें प्रसिद्ध होणारीं कांहीं पत्रेंही यांच्याकडे येत असत. इकडील इंग्रजी मासिक पुस्तकांपैकीं ' इंडियन रिव्ह्यू ' ( मद्रास ), ' मद्रास रिव्ह्यू ' ' हिंदुस्थान रिव्ह्यू ' ( अलहाबाद ). ' मॉडर्न रिव्ह्यू ' ( कलकत्ता ) ,' थिआसाफिस्ट ,' ' अस्ट्रॉलॉजिकल म्यागेझिन ,' ' ब्रह्मवादिन्,' ' प्रबुद्धभारत ', ' ईस्ट अँड वेस्ट, ' ' इंडियन इकॉनामिस्ट ' ( कलकत्ता ), ' कमर्शिअल ॲकॅडमी जर्नल ' ( लाहोर ), ' टेक्स्टाइल जर्नल ' (मुंबई), ' इंडियन वर्ल्ड ' ( कलकत्ता ), हीं व विलायतेंतील मासिक पुस्तकांपकीं ' रिव्ह्यू ऑफ् रिव्ह्यूज ', ' नाइन्टीन्थ सेंचरी ', ' फॉर्ट नाइटली रिव्ह्यू ', ' कॉन्टेपररी रिव्ह्यू ', ' अपकारी, ' ' पॉझिटिव्हिस्ट ', व अमेरिकेंतील ' वेदान्त ', ' ओपन कोर्ट ,' ' इकलेक्टिक म्यागेझिन ', ' लाइट ऑफ् इंडिया ' हींही केव्हां केव्हां वाचीत असत. याखेरीज ' मराठा ' पत्रास मोबदला येणाऱ्या शेंदीडशें इंग्रजी पत्रांपैकीं प्रसंगोपात्त कांहीं पत्रें चाळीत असत. टाइम्स, पायोनियर, वगैरे कित्येक ॲंग्लो—इंडियन पत्रें नेटिवांचा द्वेष करणारीं असल्यामुळें त्यांतील कुत्सित लेखांचें खंडन करून नेटिवांची बाजू व नेटिवांचे हक्क स्पष्टपणें सरकारापुढें मांडण्याची यांची प्रवृत्ति असल्यामुळें असा कोणताही प्रसंग आला तरी ते तो

सहसा वायां जाऊं देत नसत. राजकीय प्रश्नांचा ऊहापोह करते वेळीं अनेक प्रसंगीं निरनिराळे सरकारी रिपोर्ट, कागदपत्र व ठराव वाचल्याशिवाय ते राहत नसत; व त्यामुळें सरकारी अधिकाऱ्यांच्या चुका व राज्यपद्धतींतील दोष मुद्देसूद रीतीनें व सप्रमाण ते दाखवीत असत. मराठी मासिक पुस्तकांपैकीं 'विविधज्ञानविस्तार', 'ग्रंथमाला'. 'सरस्वतीमंदीर,' 'विश्ववृत्त,' 'प्रभात,' हीं व वर्तमानपत्रांपैकीं 'इंदुप्रकाश,' 'ज्ञानप्रकाश,' 'सुधारक,' 'नेटिव ओपीनियन,' 'सुबोधपत्रिका.' हीं ते मधून मधून पहात असत. बाकींच्याकडे त्यांचें फारसें लक्ष नसे. तथापि, क्वचित् प्रसंगीं एखाद्या महत्वाच्या स्थानिक विषयासंबंधानें लिहावयाचें झाल्यास त्या त्या ठिकाणचीं पत्रे ते पाहत असत. आंतल्या बाजूसाठीं सोमवारीं सकाळीं आठ नऊ वाजण्याचे सुमारास छापण्यासारखा असेल तो पत्रव्यवहार पाहून ते छापावयास देत; व अशा तीन चार कॉलमची भरती झाली म्हणजे दोनप्रहरीं किंवा संध्याकाळीं ते व इतर संपादक मिळून बाकीच्या मजकुराची भरती करून देत. एकेक वेळीं रात्रीं बारावर एक दोन वाजतांही त्यांनीं मजकूर सांगितलेला आहे. 'हिंदु', 'अमृतबझार', 'बेंगाली', 'स्टँडर्ड', 'ट्रायब्यून,' 'इंडियन पेट्रिअट' 'वंदेमातरम्', हीं पत्रें नेटिवांच्या बाजूचीं व वजनदार असल्यामुळें त्यांतील बरेच विचार यांना ग्राह्य असत. तरी पण हे स्वतः विद्वान् असल्यामुळें विचारसरणींत पुष्कळ वेळां त्यांच्याही वर ताण करीत. मि. दादाभाई नौरोजी, ह्यूम, केन (मृत), डिग्बी (मृत), वेडरबर्न, श्यामजी कृष्णवर्मा, मॅक्समूलर (मृत), बानर्जी, दत्त, सुब्रम्हण्यय्यर, मोतीलाल, बिपिनचंद्र पाल, लजपतराय, नरेंद्रनाथ, सेटलूर, वीरराघवचारीयर (मृत), प्रो. रंगाचार्य, स्वामी विवेकानंद (मृत), अभेदानंद, अगम्यगुरु, वगैरे विलायतेंतील, अमेरिकेंतील आणि हिंदुस्थानांतील लोकपक्षाचे व विद्वान् पुढारी यांचे स्नेही असल्यामुळें प्रसंगविशेषीं पुष्कळ वेळां खासगी पत्रद्वारें एखाद्या गोष्टीचा खल होई; व वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करण्यासारख्या असतील त्या गोष्टी प्रसिद्ध करण्याविषयीं ते कळवीत असत. तसेंच आफ्रिका, चीन, जपान, इंग्लंड, अमेरिका, वगैरे ठिकाणीं गेलेल्या कित्येक लोकांची व यांची ओळख असल्यामुळें तिकडील माहिती अगर त्या देशांत हिंदुस्थानच्या हिताहितासंबंधीं गोष्ट निघाल्यास

तीं ते कळवीत, व प्रसंगविशेषीं तिकडील वर्तमानपत्रेंही ते धाडीत. ट्रान्सवाल, चीन, जपान, रशिया वगैरे ठिकाणीं लढाईची धामधूम चालू असतां अशा प्रकारचीं कांहीं पत्रें केसरीकडे आलीं होतीं; व त्यावरून बरीच नवी आणि खरी माहिती लोकांना मिळालेली आहे. हिंदुस्थानांत व विशेषतः महाराष्ट्रांत तर ठिकठिकाणीं यांचे स्नेही असल्यामुळें एकाद्या स्थानिक महत्वाच्या गोष्टीसंबंधाने तावडतोब यांना माहिती मिळे; व पत्राचें महत्व आणि वजन जाणून इतर लोकही केसरीकडे अनेक तऱ्हेचा मजकूर व तारा प्रसिद्ध करण्याकरितां पाठवीत. याखेरीज मुंबईहून 'अनंत' या सहीचीं पत्रें, रा. पांगारकर, राजवाडे, आठल्ये, काळे, पारसनीस, वगैरे गृहस्थांकडून इतिहास, धर्म, काव्य, वगैरे विषयांवरचे लेख प्रसंगानुसार येत असत. सारांश, मजकुराच्या तयारीला बाहेरून जेवढा पुरवठा पाहिजे तेवढा सहज होई; एवढेंच नव्हे तर, पुष्कळ वेळां तो अधिक होऊन पत्र लहान असल्यामुळें दोन दोन, तीन तीन आठवडे कित्येकांचा मजकूर शिल्लक ठेवावा लागे. हे स्वतः अग्रलेख व कांहीं स्फुट सूचना लिहीत असत. पण कांहीं कारणानें फावलें नाहीं तर रा. रा. बोडस, केळकर किंवा दुय्यम संपादक रा. रा. खाडिलकर किंवा लिमये यांपैकीं कोणावर तरी मुद्दे सांगून आपला मजकूर लिहिण्याचें काम सोंपवीत. मद्रास, बंगाल, पंजाब, वायव्यप्रांत वगैरे ठिकाणचे ग्रंथकार यांची विद्वत्ता जाणून आपण केलेले ग्रंथ अभिप्रायाकरितां यांना पाठवीत; व इंग्लंड आणि अमेरिका येथील विद्वानांचेही कित्येक ग्रंथ यांना नजर ह्मणून केव्हां केव्हां येत. ही सामग्री इतर पत्रकर्त्यांस दुर्मिळ असल्यामुळें नवे शोध, नवे विचार, नवी माहिती, यांचा पुरवठा सगळ्यापेक्षां यांना जास्त व अगोदर होई. अर्थात् सगळ्यापेक्षां केसरींत ताजी व महत्वाची माहिती अगोदर येई. याखेरीज म्युनिसिपालिटी, कायदेकौन्सिल वगैरे संस्थांतून यांनीं काम केलें असल्यामुळें व त्या त्या संस्थांची रचना व काम करण्याची पद्धत हीं त्यांना अवगत असल्यामुळें इतर लेखांप्रमाणेंच यासंबंधीं लेखांतही खुबी व मर्म घेऊन ते ते लेख लोकांस प्रिय होत.

## मजकूर सांगण्याची शैली.

साधारणपणें सोमवारीं सकाळीं किंवा दोन प्रहरीं निजून उठल्यावर टिळक केसरीच्या मुख्य मजकुराच्या तयारीस लागत असत. ही तयारी

बहुधां वर सांगितलेलीं वर्तमानपत्रें व मासिकपुस्तकें वाचून किंवा त्या त्या विषयांवरील सरकारी रिपोर्ट किंवा इतर ग्रंथ वाचून ते करीत, हें वर सांगितलेंच आहे. सन १९०० सालांतील बऱ्याच सोमवारीं केसरीचा मजकूर ऑफिसमधील संपादकांच्या खोलींत (सदाशिव पेठेंतील गांधी यांच्या वाड्यांत) लिहिला आहे. हा मजकूर लिहिते वेळीं ते अंगांत नुसता सदरा घालून एका आरामखुर्चीवर पडत; व जवळच्या एक दोन साध्या खुर्च्यांवर वर्तमानपत्रें, मासिकपुस्तकें, रिपोर्ट किंवा इतर ग्रंथ ठेवीत. हा प्रकार अलीकडेही नेहमीं आपल्या घरांतील बैठकीच्या जागीं मजकूर सांगतांना चालू असे. दोनप्रहरीं बारावर एक दोन वाजतां छापखान्यांत मजकुराची खोटी झाली व 'मजकूर पाठवा' असे व्यवस्थापकाचे निरोप येऊं लागले कीं, मग हे मजकूर लिहिण्याचें मनावर घेत. पण अनुभवानें आणि सरावानें कोणत्या वर्तमानपत्रांत कोठें काय असतें, कोणाची विचारसरणी कशी आहे, कोणता मुद्दा महत्वाचा आहे, याची पूर्ण माहिती झाली असल्यामुळें महत्वाचीं वर्तमानपत्रें चाळण्यास त्यांना फार वेळ लागत नसे. त्यांतून सकाळचे वेळीं हे नेहमीं टपाल पाहत असल्यामुळें व आठवड्यांतील महत्वाच्या चळवळीसंबंधाच्या लेखांवर नजर टाकीत असल्यामुळें या वेळीं कित्येक लेख अचूक रीतीनें काढून वाचण्यास त्यांना फारसा विलंब लागत नसे. तथापि, एकादा लेख वाचला नसल्यास किंवा एकादा ताजा विषय उपस्थित झाल्यास यानंतरही ते वाचनास सुरवात करीत. या वेळीं दुसरा कोणी स्नेही अगर परका गृहस्थ भेटीस आला कीं, हें वाचनाचें काम बंद पडे; व बाहेरच्या किंवा गांवच्या गृहस्थांपैकीं कोणी कोणी या दिवशीं त्यांची गांठ पडेल ह्मणून मुद्दाम भेटण्यास येत. अशा गृहस्थांबरोबर बोलण्याचालण्यांत किती वेळ जाई याचा कांहीं नियम नसे; व एकेक दिवशीं असे पांच चार गृहस्थ या वेळीं भेटीस आले ह्मणजे मजकुराची इतकी खोटी होई कीं, सांगून सोय नाहीं! घरच्या बैठकीच्या जागीं या वेळचें वाचन चाललें असतां खोलीचा दरवाजा केव्हां केव्हां ते स्वतः बंद करीत; व केव्हां केव्हां मजकूर लवकर मिळावा ह्मणून मीही बंद करीत असे. पण बंद करण्याचा कांहीं एक उपयोग होत नसून पुष्कळ लोक हा दरवाजा बेलाशक उघडून त्यांना भेटण्यास आंत येत. पत्रें व पुस्तकें वाचल्यावर हे कोणकोणते विषय

लिहावयाचे त्याचें एक टिप्पण करीत; व बहुधां आधीं पत्रकर्त्यांच्या सूचना सांगून नंतर अग्रलेखास सुरवात करीत. सूचना अगोदर सांगण्याचा हेतु पत्रांत ताजे ताजे विषय यावे, कोणताही राहूं नये हा असे. अग्रलेखाचा विषय अगोदर ठरविला असल्यामुळें जागेच्या मानानें तो एका लेखांत लिहितां येण्यासारखा नसेल तर त्याला दोन तीन आठवडे देत; व असें करण्यास कोणतीही हरकत नसे. पण चालू चळवळीसंबंधानें असें करतां येत नसल्यामुळें त्यावर जेवढी टीका व जेवढे विचार प्रदर्शित करतां येण्यासारखे असतील तेवढे त्याच आठवडयांत प्रसिद्ध करीत. असें जरी होतें तरी विषय फार आणि जागा थोडी असें पुष्कळ वेळां होई, व त्यामुळें कित्येक विषय मागें ठेवावे लागत. वाफ भरून तयार झालेलें एंजिन केव्हां एकदां गति मिळेल म्हणून जशी वाट पाहत असतें, व एकदां गति दिली ह्मणजे तें जसा आपला मार्ग भराभर आक्रमण करतें, तद्वत् लिहवायाच्या विषयावर सर्व विचार एकदां त्यांच्या डोक्यांत भरले ह्मणजे ते प्रगट करण्याची अत्यंत स्फूर्ति होऊन लिहावयास सुरुवात केल्यावर सर्व मजकूर हां हां म्हणतां भरून जाई. मात्र एंजिनास अडथळा आला ह्मणजे गाडी जशी थांबते तद्वत् मजकूर सांगतां सांगतां मध्येंच कोणी भेटावयास किंवा कामकाजास आला तर त्यांच्या विचाराच्या गतीस अडथळा होऊन कांहीं वेळ लिहिण्याचें काम बंद पडे; बाकी यांची मजकूर सांगण्याची गाडी एकदां सुटली कीं, दुसऱ्या विषयाचें स्टेशन येईपर्यंत ती कधींही थांबत नसे!

यांची मजकूर सांगण्याची शैली तर फारच विलक्षण व आश्चर्यकारक असे. हे मजकुराचे एक सारखे पाच पांच सहा सहा शब्दच सांगत असें नाहीं तर, वाक्यापाठीमागें वाक्येही सांगत. आणि यांची सर्वांत मोठी खुबी ह्मटली ह्मणजे ही कीं, हीं वाक्यें जलद सांगूनच्या सांगून मागें काय झालें किंवा कोठपर्यंत आलें हें ते सहसा विचारत नसत; व कित्येक वेळां विचारल्यावर मी वाचण्यास सुरवात करतांच वाक्य सबंध वाचण्याची मला फुरसत न देतां तें कितीही लांब असलें तरी लिहिलेला कागद जणूं काय आपल्या पुढेंच ठेविल्याप्रमाणें त्यांतील शब्द जसेच्या तसेच भराभर त्यांनीं पुष्कळ वेळां उच्चारल्याचें मला स्मरतें. या गोष्टीवरून त्यांची स्मरणशक्ति किती तीव्र असे व विचारांशीं त्यांची

वृत्ति किती तादात्म्य झालेली असे, हें सहजी दिसून येईल. हा अनुभव दुसऱ्यास सांगतां येणें शक्य नसल्यामुळें यापेक्षां शब्दांनीं तो जास्त व्यक्त करतां येत नाहीं. विचार दाटून डोक्यांत भरले असले किंवा विषय अत्यंत चळवळीचा असून त्यानें अंतःकरण खळबळून गेलें असलें ह्मणजे यांच्या जिव्हेस अशी कांहीं गति मिळे कीं, सर्व मजकूर लक्षांत ठेऊन त्यांना येऊन गांठण्याची मला मारामार पडे ! यांना जाण्याची कोठेंतरी घाई असावी किंवा निकडीचें दुसरें एकादें काम असावें, अथवा मजकुराची खोटी झाली असल्यामुळें छापखान्यांतील माणसांच्या येरझाऱ्या सारख्या सुरू झाल्या असाव्या, आणि लेखाचा विषय तर अत्यंत महत्वाचा आणि चळवळीचा असावा; मग काय ? यांचा वाग्वारु इतका कांहीं भरधांव सुटे कीं, त्याबरोबर पळतां पळतां माझ्या सारख्याची त्रेधा उडे ! अशा वेळीं दौतींत टाक बुडवून घेण्यास जो वेळ लागतो तोही व्यर्थ जातो असें वाटून पुष्कळ वेळां फाउंटन पेन बाळगावें असें वाटे; व एकेक वेळीं तर बोलण्याबरोबर तसेच शब्द कागदावर उमटण्याचें जर एखादें यंत्र निघेल तर किती बहार होईल असें माझ्या मनांत येई ! यांनीं वाक्यें सांगितलीं आणि तीं मी लिहिलीं ह्मणजे पुन्हां तीं सबंध वाचण्याचें कारण पडत नसे; शेवटचा एक शब्द उच्चारिला कीं, पुन्हां पुढच्या वाक्यास हे सुरवात करीत. ही मजकूर सांगण्याची तऱ्हा पाहून पुष्कळ वेळां मला तार ऑफिसांतील तार घेणाऱ्या यंत्राची आठवण होई. दुसऱ्या ठिकाणाहून तार येत असली ह्मणजे इकडचा तारमास्तर ती उतरून घेत असतां मधून मधून एकेक ठोका देत असतो; हेतु एवढाच कीं, 'झालें,' 'समजलें,' 'पुढें चालू दे,' हें तिकडच्या तारमास्तरास कळावें. त्याचप्रमाणें वाक्यें एकेक असोत किंवा दोन दोन असोत, लहान असोत अथवा मोठीं असोत, तीं लिहून झाल्याची खूण समजून हे पुढील मजकूर सांगत. अशा प्रकारचें हें तारायंत्राचें काम सारखें झपाट्यानें चाललें असतां चार पांच कॉलमचा मजकूर लिहिण्यास अवघे तीन चार तास लागत; व माझ्यापेक्षां एकादा जलद लिहिणारा लेखक असता तर तो हें काम दोन अडीच तासांतच आटोपता. हे जो मजकूर सांगत तो बालबोध लिपींत लिहावा लागे; व तो जितका शुद्ध असेल

त्या मानानें छापखान्यांतील लोकांना जुळविण्यास किंवा शुद्ध करण्यास कमी त्रास पडे, ह्मणून मजकूर शुद्ध व स्वच्छ लिहवेल तितका लिहिण्याविषयीं मी खबरदारी घेई. यांच्या जलद सांगण्यामुळें खरबरीत कागदानें हात भरून येत, ह्मणून पातळच पण गुळगुळीत कागद मी घेई. यांची स्मरणशक्ति इतकी तयार असे कीं, अमुक विषय अमक्या ग्रंथांत वाचला आहे किंवा अमुक लेख अमक्या सालांत लिहिला आहे एवढेंच ते सांगत असें नाहीं तर, पुष्कळ वेळां त्या पुस्तकांतील अथवा फाइलींतील त्या विषयाचे नेमकें पानही तावडतोब काढून देत. तसेंच मराठी भाषाही त्यास इतकी वश असे कीं, विषयानुरूप शब्द आठविण्यास यांना मुळींच विलंब लागत नसे, एवढेंच नव्हें तर, विचारांबरोबर यांच्या शब्दांचा प्रवाहही सारखा सुरू असे. लेख सांगण्याच्या या त्यांच्या अलौकिक शक्तीमुळें अग्रलेखांची अथवा स्फुट विषयांचीं जीं पानें लिहून होत त्यांतील दोन दोन तीन तीन पानांत सुद्धां खोडाखोड केलेली क्वचित् सांपडे; आणि खोडाखोडीचे कित्येक प्रसंग येत त्यांपैकीं बरेच त्याच्या दोषानें येत असें ह्मणण्यापेक्षां माझ्याच दोषानें येत असें मला म्हणावें लागतें. अस्खलित रीतीनें लेख सांगण्याची यांची तऱ्हा कशी असे, हें प्रत्यक्ष वाचकांस पहावयास मिळावें म्हणून मागें (ता. १९ जुलै १९०४च्या) केसरींत प्रसिद्ध झालेल्याच एका लेखाची मूळ हस्तलिखित प्रत रद्दी चाळींत असतां एकदां ऑफीसमध्यें मला सांपडली. ती त्यांच्याच परवानगीनें फोटो घेऊन येथें दिली आहे. हा लेख नेहमींच्या लेखाहून भिन्न व सांगण्यास बिकट असतांही त्यांनीं तो किती बिनचूक रीतीनें सांगितला आहे याचाही लेख पाहतांना वाचकांनीं विचार करावा. सदर लेखांतील दुसऱ्या पानावरील शेवटच्या ओळींतील "टिंब देऊन (जसें, ·च)" हे शब्द; पांचव्या पानांमधील "अग्निमीळे पुरोहितं" हे शब्द; व पान सात मधील शेवटच्या ओळींतील "मी आपल्यां घरीं गेलों" हे शब्द खुद्द त्यांच्या हातचे आहेत; व हा लेख सांगून ते परगांवीं जाणार होते ह्मणून पेन्सलीनें त्यांनीं तो शुद्ध करून दिलेला आहे.

लेख सांगतांना यांना मधून मधून 'झालें?' असें ह्मणण्याची फार संवय आहे; व ती तोंडानें लेख सांगण्याची पद्धत पडल्यामुळें ह्मणा किंवा

यांचें सांगणें जलद आणि लेखकांचें लिहिणें सावकाश यामुळें म्हणा त्यांना लागली असावी. हा शब्द उच्चारण्याची संधी त्यांना न द्यावी या हेतूनें मी पुष्कळ खटपट करी, व केव्हां केव्हां ती सफलही होई. तरी पण पुष्कळ वेळां तो शब्द उच्चारल्याशिवाय ते राहत नसत; व आजपर्यंत आमच्या सारख्या लेखकांच्या अनुभवावरूनच ही संवय त्यांना लागली असावी, असे माझें अनुमान आहे. ही संवय त्यांना इतकी जडली आहे कीं, पुष्कळ वेळां मी 'झालें' म्हटलें तरी पुन्हां ते 'झालें?' ह्मणून विचारीत. केव्हां केव्हां तर 'झालें' हा शब्द त्यांच्या विश्रांतीचा होऊन पुढील विचार सुचण्यास तो एक उत्तेजकच होई. ही 'झालें?' म्हणण्याची संवय त्यांच्या इतकी अंगवळणी पडली आहे कीं, कांहीं कांहीं प्रसंगीं 'पॅरा कर' असें ह्मणत, व काहीं वेळानें 'झालें?' ह्मणून विचारीत! हें एक असो, पण केव्हां केव्हां इंग्रजी अगर मराठी वर्तमानपत्रांतील लेख किंवा त्यांनीं सांगून मी लिहिलेला लेख स्वत: मोठ्यानें वाचीत असतांही ते मधून मधून 'झालें?' ह्मणत असत! यांचा आवाज मोठा असून यांना मोठ्यानें बोलण्याची संवय आहे. ही संवय ऐकावयास कमी येत असल्यामुळें यांना जडली असावी; व 'ज्याला कमी ऐकावयास येतें तो नेहमीं मोठ्यानें बोलतो' याचें हें एक उदाहरण आहे. मोठ्यानें बोलण्याची यांची ही संवय आजकालची आहे असे नाहीं, पुष्कळ दिवसांची आहे. तथापि, 'मागें दाजी साहेबाच्या (खरे यांच्या) घरीं तापानें आजारी पडल्यावर कोयनेल फार घेतल्यानें माझ्या कानाला कमी ऐकूं येऊं लागलें आहे' असें त्यानीं एकदां बोलून दाखविल्यावरून त्या वेळेपासून ती वाढली असावी असें माझें अनुमान आहे. या त्यांच्या संवयीमुळें त्यांचा आवाज ओळखणारास ते घरांत आहेत किंवा नाहींत हें पुष्कळ वेळां बाहेरच्या दरवाज्यांतूनच कळे. कारण, घरीं नेहमीं कोणी नाहीं कोणी तरी भेटावयास आलेले असत, व त्यांच्याशीं यांचे मोठ्यानें संभाषण किंवा वादविवाद चाललेलाच असे. यांच्या ओरडून बोलण्यासंबंधानें लक्षांत राहण्यासारखे आजपर्यंत जे प्रसंग आले त्यांत १९०१ सालच्या मार्च महिन्यांत तापानें आजारी पडले असतां कोणा युरोपियनाच्या प्लेगसंबंधीं शास्त्रीय व्याख्यानांतील मुद्यांवर रा. रा. न. चिं. केळकर यांच्याशीं संभाषण करीत असतांना; व १९०४ च्या आगस्ट

महिन्यांत डॉ. गर्दे यांच्याशीं भगवद्गीतेवर वाद चालला असतां, बोलत होते ते दोन मुख्य होत. पहिल्या प्रसंगीं संभाषण चालतां चालतां तर ते एवढ्या मोठ्यानें वाद करूं लागले कीं, त्यांत संताप उत्पन्न होऊन पुन्हां ताप उलटतो कीं काय, अशी मला भीति वाटली. असो; मोठ्यानें बोलण्याच्या यांच्या संवयीमुळें हे कितीही लांब बसले असले तरी नेहमीं स्पष्ट ऐकूं येई; व ऐकूं न आल्यासंबंधाची कुरकुर मला एक दिवसही करावी लागली नाहीं. वाचावयाच्या नादांत असले ह्मणजे संध्याकाळ होऊन अगदीं दिसेनासें झालें तरी हे वाचीत असत, व मजकूर कितीही बारिक टाइपांत असला तरी तो त्यांना दिसे, यावरून त्यांची दृष्टी किती शाबूत आहे याचे अनुमान होईल. अलीकडे मात्र यांच्या दृष्टींत किंचित् फरक पडत चालल्याचें केव्हां केव्हां दिसून येई; व एके प्रसंगीं त्यांनींही 'मी लांबचा मनुष्य त्याच्या चालण्याच्या ढबीवरून ओळखतों, बाकी दूरचं आतां स्पष्ट दिसत नाहीं' असें म्हटलेलें मला स्मरतें. ऑफिसमध्यें ( गांवी यांच्या वाड्यांत ) मागें रात्रीं मजकूर लिहीत बसत होतों त्यावेळीं तेथें चिमणीवर ग्लोब घातलेला किंवा साध्या चिमणीचा पण स्टँड असलेला दिवा टेबलावर ठेवलेला असे. हें टेबल त्यांना लिहिण्याकरितां ह्मणूनच ठेवलेलें असे. तथापि, केसरीचा किंवा इतर मजकूर ते ज्या वेळीं तोंडानें सांगत त्या वेळीं याच टेबलावर तो मी लिहीत असे. हें टेबल दाराला लागून ठेवलेलें असे, व त्यावर दिवा ठेवला ह्मणजे मध्यभागची आपली आरामखुर्ची उचलून ते त्याला लागून घेत. ह्मणजे प्रसंगविशेषीं वर्तमानपत्र अगर पुस्तक पाहावें लागलें तर दिव्याच्या उजेडानें त्यांना तें सहज वाचतां येई. दुसऱ्या वर्षापासून मजकूर बहुधां ते विंचूरकरांच्या वाड्यांतील आपल्या घरीं सांगूं लागले; व तेथें गोड्या तेलाच्या समया होत्या तरी लिहिण्याचे वेळीं टेबलावर मेणबत्तीचें शामदान ठेवीत असत. अलीकडेही असेंच शामदान टेबलावर असून तें ऑफीसमधील शिपाई, मी किंवा यांच्या घरांतील मुलांपैकीं कोणी तरी लावीत असे. पण एकादे वेळीं मी मजकूर लिहिण्यांत गुंतलों असलों व जवळपास कोणी नसलें तर संध्याकाळ होताच कोणाची वाट न पाहतां आपणच काडी ओढून शामदान लावीत; व त्यांत मेणबत्ती नसली तर खालीं जाऊन केव्हां केव्हां स्वतः ती घालून शामदान तयार करून आणीत. त्यांच्या दृष्टींत थोडा दोष

असल्यामुळें पत्र अगर पुस्तक वाचतांना मधून मधून ते डोळे आकुंचित करीत व पुन्हां प्रसृत करून पाहत. मजकूर लिहिण्याचें काम ज्या खोलींत चालत असे त्या खोलींत लिहिण्याचे वेळीं ते कोणास बसूं देत नसत; व कोणी बसले असले तरी "आह्मी आतां मजकूर लिहिणार, तुह्मी पाहिजे तर पलीकडच्या खोलींत बसा" असें ते स्पष्ट सांगत. एक दोन वेळीं बाहेरच्या इसमांना मजकूर कसा सांगतात हें पाहण्याची जिज्ञासा होऊन त्यांनीं तेथें बसण्याची परवानगी विचारली होती, पण ती त्यांनीं दिली नाहीं; व अशी परवानगी न देणेंच इष्ट आहे, असें मला वाटतें. याचें कारण एक तर मंडळी पुष्कळ असली ह्मणजे लिहिण्याचें काम चालावें तसें चालत नाहीं. दुसरें असें कीं, वर्तमान-पत्रांतून लेख प्रसिद्ध होईपर्यंत संपादकांना त्यांत फरक करावयाचा असतो, तेव्हां विचार प्रसिद्ध होण्यापूर्वी त्यांची स्फुटता न होणें हेंच चांगलें. पैकीं टिळक यांच्यासंबंधीं पाहतां पहिलें कारणच त्यांना लागू पडतें. कारण, "आमची एकाग्रता बिघडते" असें त्यांनीं वेळोवेळीं पुष्कळांना बोलून दाखविलें आहे; व विचार प्रसिद्ध होण्यापूर्वी ते बाहेर पडूं नयेत असें त्यांना वाटत नसे; याच कारण लिहिते वेळीं लेखांतील प्रमुख विचार ते अगोदरच दुसऱ्याजवळ पुष्कळ वेळां बोलून दाखवीत; व 'मी असें असें लिहिणार आहें' ह्मणूनही सांगत. आतां एकाग्रतेसंबंधानें अडथळा येत नसल्यास मंडळीस बसूं देण्यास कांहीं हरकत नाहीं; व केसरीच्या मजकुराचे वेळीं अशीं एक दोन माणसें बसत असत. पण हा प्रकार केव्हां तरीच घडे. बाकी नेहमीं मजकूर चालला असतां आम्हां दोघांखेरीज तेथें तिसरा कोणी नस. मराठीप्रमाणेंच इंग्रजी मजकूरही हे जलद सांगत. रा. रा. न. चिं. केळकर हे पुण्यास नसले किंवा कांहीं कारणानें त्यांना लिहावयास बनलें नाहीं, तर 'मराठा' पत्राचे अग्रलेख व स्फुट विषय हे लिहून देत. मराठीसारखा इंग्रजी मजकूर लिहिण्याचा मला सराव नसल्यामुळें या वेळीं मधूनमधून पुष्कळ विचारावें लागे; व तेही न रागावतां थांबून थांबून सांगत. विषय साधा असो अथवा गहन असो, मराठीप्रमाणेंच इंग्रजींतही यांची सांगण्याची भरारी सारखी सुरू असे. याचा अनुभव 'मराठ्या'चा मजकूर लिहित असतांनाच आला आहे असें नव्हे तर, लाहोर येथें १९०० सालीं राष्ट्रीय सभेस गेले असतां त्यांनीं

वेदकालासंबंधानें तेथें जें व्याख्यान दिलें होतें व त्यावर तेथील ' ट्रिब्यून ' पत्रांत जी टीका आली होती तिजवरील उत्तर; गव्हर्नर, व्हाइसरॉय, स्टेट सेक्रेटरी, वगैरेंकडे पाठविलेले लोकांचे अर्ज; ' आर्यांचें मूलस्थान ' या पुस्तकाच्या उपसंहाराचा भाग,† बाबा महाराजांच्या इस्टेटीसंबंधानें यांच्यावर उपस्थित झालेल्या खटल्यांतील अर्ज, वगैरे लिहितांना चांगला आला आहे. तात्पर्य, मराठी व इंग्रजी भाषेंतील लेख हे फारच खुबीनें आणि जलद सांगत हें वरील विवेचनावरून कोणाच्याही नजरेस येईल.

## यांच्या लेखांत काय विशेष आहे ?

यांचे स्वतःचे जे मुख्य लेख आहेत ते लक्षपूर्वक अवलोकन केले ह्मणजे त्यांत ठिकठिकाणीं महत्वाचे विचार व सिद्धांत ग्रथित केलेले आढळून येतील. आणि महत्वाचे विचार आणि सिद्धांत हेच भारदस्त लेखांचें जीवन आहे, हें कोणासही कबूल करावें लागेल; व उत्तम लेखक आपल्या लेखांत हें जीवन घातल्याशिवाय कधीं राहत नाहीं. शब्दलालित्य, अलंकारिक भाषा, चुरचुरीत वाक्यें हीं लेखांचीं भूषणें आहेत, नाहींत असें नाहीं; पण शरीरांत जीव नसला तर नुसते अलंकार जसे कुचकामाचे आहेत, तसेच लेखांत वरील प्रकारचा जीव नसला तर ते लेखही कुचकामाचे आहेत असें म्हटलें पाहिजे. आतां वर निर्दिष्ट केलेल्या वरवरच्या भूषणांनीं सजविलेल्या लेखांनीं कांहीं लोकांस घटकाभर करमणूक होऊन क्षणभर त्यांचे डोळे दिपून जातील; पण गारुड्याचा खेळ संपला ह्मणजे त्यापासून जसें कांहीं निष्पन्न होत नाहीं, व झालेल्या खेळांतही कांहीं वेळानें तथ्य नसून जशी निवळ हातचलाखी वाटूं लागते, तद्वत् वरील जीवन नसलेल्या लेखांपासून सुज्ञ वाचकांच्या मनावर विशेष परिणाम होत नाहीं, व मागाहूनही त्याचें महत्व राहत नाहीं. मराठी वर्तमानपत्राच्या आजपर्यंतच्या इतिहासाकडे पाहिलें ह्मणजे अशा प्रकारचे भारदस्त रीतीनें लिहिलेले लेख फारच थोड्या पत्रांतून प्रसिद्ध झाले आहेत; व ह्मणूनच

† ' आर्यांचें मूलस्थान ' ( The Arctic Home in the Vedas ) या इंग्रजी पुस्तकाच्या उपसंहाराचा कांहीं भाग तर टिळकांनीं तोंडानें सांगून स्वतः मी हातानें लिहिला आहेच; पण हा सबंध ग्रंथ त्यांनीं तोंडानें सांगून दुसऱ्याकडून लिहविला आहे; यावरून गहन विषयांवरील लेखसुद्धां झपाट्यानें तोंडानें सांगण्याची त्यांची शक्ति किती विलक्षण आहे याचें अनुमान वाचकांस करितां येईल.

केसरीला एक प्रकारचें महत्व आलें आहे. मागें जसें बर्वे प्रकरण, क्राफर्ड प्रकरण, संमत्तीवयाचा कायदा, राजद्रोहासंबंधानें वर्तमानपत्रांवर केलेले खटले, इत्यादि वर्तमानपत्रांच्या बाल्यावस्थेंत लोकमतांत खळबळ उडवून देणारे महत्वाचे विषय होते. तसेंच गेल्या सात आठ सालांत जमिनमहसुलाचा कायदा, एडवर्ड बादशाहाचें राज्यारोहण, दिल्लीदरबार, गौप्यगोपनाचा व युनिव्हर्सिटयांचा कायदा, वंगभंग, स्वदेशी चळवळ, इत्यादि विषय महत्वाचे होते; व त्यांवर यांच्या लेखणीनें अशी कांहीं भरधांव मारलेली आहे कीं, ती पाहून वाचकांची नजर चकित झाल्यावांचून कधींही राहणार नाहीं. वर्षाकालीं महानदीच्या प्रवाहांत खाचखळगे, खड्डे, व तुटलेले कडे आले म्हणजे त्याला जशी एक प्रकारची तीव्र गति मिळून तो आपला मार्ग जसा जास्त जोरानें व भराभर आक्रमण करतो व त्याचे उग्र स्वरूप पाहून प्रेक्षकांचे मन जसे थक्क होऊन जातें तद्वत् विषय कठिण, चळवळीचे व अत्यंत महत्वाचे असावेत म्हणजे यांच्या सरस्वतीचा प्रवाह असा कांहीं जोरानें वाहत चाललेला दृष्टीस पडेल कीं, तो पाहून वाचकांचें मन थक्कच होईल. गेल्या आठ वर्षांत वर सांगितलेले प्रसंग अशाच प्रकारचे होते; व त्या वेळचे त्यांचे लेख काढून पाहिले असतां मी म्हणतों याची सत्यता पुष्कळांना पटेल. मागील पंधरा वर्षांपेक्षां गेल्या आठ वर्षांतील त्यांच्या लेखांत दिसून येणारी विशेष महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे ही आहे कीं, मागील अनुभव, नवें वाचन व समाजस्थितीचें मनन, इत्यादि गोष्टींनीं त्यांचे विचार परिपक्क झाले असल्यामुळ हिंदुस्थानच्या राजकीय, औद्योगिक व सांपत्तिक प्रश्नांवर व इंग्लंडचें साम्राज्य, आमचा व्यापार, धर्म व वेदांत या विषयांवर त्यानीं अनेक गंभीर व पोक्त विचार प्रदर्शित केलेले पुष्कळांना पाहण्यास मिळतील.

यांचे लेख भारदस्त होण्यास दुसरें कारण असें कीं, ज्या विषयासंबंधानें लेख लिहावयाचा त्या विषयावरील जेवढी म्हणून उपलब्ध माहिती मिळेल तेवढी मिळवून लेख लिहीत असत. माहितीसंबंधानें एखादें पुस्तक अगर वर्तमानपत्र त्यावेळा जवळ नसलें तर मुद्दाम तें कोठून तरी पैदा करून आणीत. पण अमुक पुस्तक अगर वर्तमानपत्र या वेळीं जवळ नाहीं तर नाहीं. असें म्हणन ते कधींही चालढकल करीत नसत;

एवढेंच नव्हे तर पुष्कळ वेळां एकादा सरकारी ठराव, कायदेकौन्सिलांतील बिल, कायदा किंवा भाषण, अथवा एकाद्या मनुष्यानें एकाद्या विषयावर एकाद्या वर्तमानपत्रांत अगर मासिकपुस्तकांत लिहिलेला लेख याची दुसऱ्या एकाद्या वर्तमानपत्रानें नक्कल दिली असल्यास तें दुसरें वर्तमानपत्र यांना चालत नसून मूळचें वर्तमानपत्र अगर सरकारी ग्याझेट हेंच पुढें असावें लागे. आणि उत्तम माहिती देणारानें किंवा खऱ्या टीकाकारानें याच गोष्टीचें अवलंबन केलें पाहिजे; नाहींतर नक्कल करून घेणाऱ्या वर्तमानपत्राच्या चुकाही त्यालां भोंवतात. ह्मणून टिळक होतां होईल तों अशा पुस्तकांचा संग्रह करीत. राजकीय विषयांचीं कांहीं पुस्तकें घरच्या ऑफिसमध्यें किंवा लायब्ररींत नसलीं तर तीं केव्हां केव्हां सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांतून आणवीत; इतिहासाचीं किंवा वाङ्मयाचीं लागलीं तर डेक्कन किंवा फर्ग्यूसन कॉलेजमधून अथवा मुंबईच्या 'रॉयल एशियाटिक सोसायटी'च्या लायब्ररींतून आणवीत; व या चारही ठिकाणीं एकादें पुस्तक मिळालें नाहीं तर 'आनंदाश्रम' किंवा आपले स्नेही अथवा ओळखीचे कोणी तरी गृहस्थ यांच्याकडून आणवीत. एकाद्या विषयावर अमुक एक पुस्तक अगर लेख आहे आणि प्रयत्न करूनही तो मिळाला नाहीं ह्मणजे यांच्या मनाला थोडी चुटपुट लागे, व नाइलाजास्तव ती एकीकडे ठेवून हे लेख सांगण्यास सुरुवात करीत. प्रांतिक व हिंदुस्थान सरकारचीं बजेटें, दुष्काळ–कमिशनचा रिपोर्ट, होळकर सरकारचा राजीनामा, पोलिस–खात्याची सुधारणा, मुंबई इलाख्यांतील जमिनधाऱ्याची पद्धत, खोतांसंबंधाचा कायदा, ( हे स्वतः कोकणांतील एका गांवचे खोत असल्यामुळें त्या बाबतींत यांना विशेष अनुभव आहे. ) तिबेटची मोहीम, रूसो–जपानी युद्ध, राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी चळवळ, वगैरे विषयांवर त्यांनीं जे लेख लिहिले आहेत ते ग्रंथ वाचून व अनेक तऱ्हेची माहिती मिळवूनच लिहिले आहेत. ही माहिती मिळविण्यास व त्यासंबंधाचीं पुस्तकें वाचण्यास कितीही वेळ लागला तरी तो त्यांनीं खर्च केला आहे. एकाद्या विषयाकडे चित्त लागलें ह्मणजे त्यांना वेळेचें भान कसें राहत नसे हें पुढील उदाहरणावरून कळून येईल. एकदां लॉर्ड कर्झन यांनीं राणीच्या जाहिरनाम्यास 'अशक्य सनद' ह्मणून ह्मटलेलें त्यांनीं वर्तमानपत्रांतून सहजी तीं चाळतां चाळतां वाचलें

होतें; व त्यावर केसरींत त्यांना लिहावयाचें होतें. पण तें कोणत्या पत्रांत वाचलें होतें हें त्यांना नीट स्मरेना. परंतु तें शोधून काढल्याशिवाय तर त्यांना चैन पडेना. ह्मणून त्यांनीं ऑफिसमधील बहुतेक दैनिक इंग्रजी पत्रांच्या फाइली सकाळपासून दोनप्रहरपर्यंत सारख्या चाळल्या. शेवटीं बारा वाजतां जेव्हां त्या विषयासंबंधाची हकीकत ' मद्रास स्टँडर्ड ' पत्राच्या एका अंकांत मिळाली तेव्हां त्यांना बरें वाटलें !

यांच्या लेखांतील तिसरी महत्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे, होतां होईल तितकी ताजी बातमी देणें ही होय. इलाख्यांत ठिकठिकाणीं यांच्या ओळखीचीं माणसें व कोठें कोठें स्नेही असल्यामुळें केसरी पत्रास अनेक तऱ्हेची ताजी माहिती मिळे. पण जेथें अशीं माणसें नसत तेथें प्रसंगीं आपला मनुष्य पाठवून मुद्दाम माहिती आणवीत. अशा प्रकारच्या साहित्यानें बातमी देण्याच्या कामीं केसरी पत्र केव्हां केव्हां मुंबईच्या टाइम्स आदिकरून इंग्रजी दैनिक पत्रांच्याही पुढें आघाडी मारी. मुंबईच्या मंगळवारच्या इंग्रजी दैनिक पत्रांत जी बातमी प्रसिद्ध होई, ती केव्हां केव्हां केसरींतून अगोदरच वाचावयास मिळे; व केव्हां केव्हां मुंबईच्या मंगळवारच्या दैनिक पत्रांतही जी बातमी नसे ती केसरींतून अगोदरच प्रसिद्ध होई. देशी संस्थानांतील राज्यकारभारासंबंधानें व इतर प्रकरणासंबंधानें तर असा प्रकार हरहमेष होत असे; व मागें होळकरांच्या राजीनाम्यासंबंधाची बातमी जी पहिल्यानें कळली ती ' केसरी–मराठ्या 'सच कळून त्यावरूनच मुंबईच्या टाइम्सनें ती प्रसिद्ध केल्याचें पुष्कळांना स्मरत असेल. पुष्कळ वेळां मंगळवारीं पहाटेस केसरी यंत्रावर जात असतां तारेनें बातम्या आल्या आहेत; व कितीही त्रास पडला तरी त्या ताबडतोब जुळवून मंगळवारच्या केसरींत प्रसिद्ध केल्या आहेत. एकादी बातमी अत्यंत महत्वाची असली व केसरी निघण्यास बराच अवकाश असला तर जादापत्रकांतून ती पुण्यास तर प्रसिद्ध करीतच; पण इलाख्यांतील मुख्य मुख्य ठिकाणींही केव्हां केव्हां जादापत्रकें रवाना करीत.

यांच्या लेखांतील चवथी विशेष गोष्ट ह्मटली ह्मणजे हे जी बातमी अथवा माहिती देत ती खरी देत. पुष्कळ पत्रकर्ते अनुमानधपक्यांवर बऱ्याच बातम्या अथवा माहिती प्रसिद्ध करतात. त्यामुळें पुष्कळ वेळां त्यांना आपला लेख परत घ्यावा लागतो व त्यानें त्यांच्या पत्रास कमीपणा

येतो. टिळक यांचें मात्र केसरीपत्रासंबंधानें असें नसे. इंग्लंडांतील प्रख्यात वक्ता व मुत्सद्दी मि. कॉब्डेन हा आपल्या भाषणांचा ठसा लोकांच्या मनावर उमटावा म्हणून जी काळजी घेत असे† तीच काळजी टिळक हे लेख प्रसिद्ध करण्याच्या कामीं घेत. ह्मणजे यांचे ठिकठिकाणचे स्नेही आणि बातमीदार हुषार व चाणाक्ष असल्यामुळें त्यांकडून जी माहिती येई ती बहुधां खरीच असे. तथापि, अन्य रीतीनेंही त्यासबंधानें चांगला पडताळा पाहिल्याशिवाय ते प्रसिद्ध करीत नसत. त्यामुळें चुकीची अथवा परत घेण्यासारखी माहिती सहसा त्यांच्या लेखांतन कधींही प्रसिद्ध झाली नाहीं. या त्यांच्या लेखांच्या बाण्यावरून पुष्कळ लोक 'अमकी बातमी केसरींतून प्रसिद्ध झाली आहे ना ? ती खरी असलीच पाहिजे,' असा भरंवशाचा वाद दुसऱ्याशीं करीत असतांना अनेक वेळां माझ्या नजरेस आलें आहे.

याच्या लेखांतील पांचवी महत्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे लेख वाचतां वाचतां वाचकांचीं अंतःकरणें त्या त्या विषयासंबंधानें खळबळून सोडणें ही होय. ही गोष्ट वरील सर्व गोष्टींपेक्षां अत्यंत महत्वाची आहे; एवढेंच नव्हे तर, लेखास जें लेखत्व येतें तें याच गोष्टीनें येतें, असें ह्मटलें असतां मुळींच वावगें होणार नाहीं. आतां विचारगांभिर्य आणि ताजी व खरी माहिती यांशिवाय लेखांत खळबळ उडवून देण्याची शक्ति येत नाहीं ही गोष्ट आहे. तथापि, चित्रकार

---

† आपल्या भाषणासंबंधाने एका मित्रास लिहितांना मि. कॉब्डेन याने एके ठिकाणीं असे ह्मटले आहे:—

"Rhetorical or oratorical merit does not belong to them· their sole value—if they have any—consists in the facts they contain, which have been always very carefully prepared; and in no case has their truth been invalidated. My rule has always been never to state a fact publicly which does not either rest on official documents or for which I have not the corroborative testimony of more than one private authority. I have found this plan absolutely necessary as a protection against the host of correspondents who have tendered me information upon public questions, without always duly verifying the accuracy of their statements."

उत्तम नसेल तर उत्तम कलम किंवा उत्तम रंग असून नसून जसें सारखेंच, तद्वत् वरील गोष्टी जरी महत्वाच्या आहेत तरी त्यांची योग्य ठिकाणीं योग्य रीतीनें योजना करणारा नसेल तर त्याही असून नसून सारख्याच आहेत. कलम व रंग हीं एकच असतात; पण हुषार चित्रकार आपल्या अंगच्या कुशलतेनें पाहिजे तें चित्र असें कांहीं खुलवून देतो कीं, तें पाहून प्रेक्षकांचें मन गारीगार होतें. तसेंच बातमी एकच व माहितीही एकच; पण टिळकांनीं आपल्या खुबीदार शब्दांनीं किंवा वाक्यरचनेनें ती अशी कांहीं सजविली आहे कीं, प्रख्यात अमेरिकन पत्रकार मि. चार्लस ए. डना यांनीं 'धी आर्ट ऑफ् पेपर मेकिंग' या पुस्तकांत ह्मटल्याप्रमाणें मि. नॅथेनल हॅथॉर्न यांच्या भाषेप्रमाणें वाचकांस जणूं काय आपण नवी भाषा वाचायाला लागलों आहों, व आपणास शब्दांचे नवे नवे अर्थ कळ लागले आहेत असें वाटतें!* यांचा कोणताही लेख घ्या. ता वाचण्यास आरंभ केला कीं, वाचकाला संपविल्याशिवाय राहवत नाहीं; व वाचण्यापूर्वी मरतमढीं असलेल्या माणसांचेही अंगीं वाचल्यावर एक प्रकारचा उत्साह व वीरश्री आल्याचें अनेक वेळां माझे निदर्शनास आलें आहे. बिकन्सफील्डनें अशा प्रकारच्या अंतःकरण खळबळून सोडणाऱ्या कृतीवरूनच थोर मनुष्याचें एक लक्षण बांधलें आहे, यावरून ही गोष्ट किती महत्वाची आहे याची वाचकांना सहजी कल्पना होईल.

तसेंच कृत्रिम व अवघड वाक्यरचना न करतां सरळ लिहिणें, होतां होईल तों इंग्रजी शब्दांचा उपयोग न करणें, विषय स्पष्ट रीतीनें व कळकळीनें सांगणें, आणि सरते शेवटीं वाचकांच्या मनांवर लेखांचा ठसा उठविणें; सारांश, वरील अमेरिकन पत्रकर्त्यानें प्रख्यात ग्रंथकार डॉ. कॅनिंग यांच्या लेखनपद्धतीची ज्या गुणांवरून स्तुति केली आहे ते गुण

---

* मि. नॅथेनल हॅथॉर्न यांच्या भाषेसंबंधाने मि. डना. ह्मणतातः—

"In his writing we are charmed with the new sense and meaning that he seems to give to familiar words. It is like reading a new language to take a chapter of Hawthorne; yet it is perfectly lovely, because with all its suggestiveness it is perfectly clear; and when you have done with it you wish you could do it yourself."

यांच्या लेखांत पूर्णपणें वास करीत आहेत, असें ह्मटलें असतां वावगें होणार नाहीं.*

## अग्रलेखांतील विशेष.

यांच्या अग्रलेखासंबंधानें दोन तीन गोष्टी विशेष लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. साप्ताहिक पत्रांतील अग्रलेख ह्मणजे तो एकाद्या चालू चळवळीच्या व महत्वाच्या विषयावर तर पाहिजेच; पण पत्र ज्या हेतूनें काढलें असेल तो हेतु ज्या विषयानें साध्य होईल असाच विषय बहुधा निवडला पाहिजे, व पत्राच्या धोरणाप्रमाणेंच त्याची त्यांतून चर्चा केली पाहिजे. राजकीय बाबतींत चळवळ करणें व त्यासंबंधानें लोकमतास एक प्रकारचें विशिष्ट स्वरूप देऊन त्यांत जोम आणणें हा 'केसरी'चा मुख्य हेतु असल्यामुळें त्याचे अग्रलेख याच धोरणानें लिहिले जात असत; व त्यामुळें या लेखांस जितकें शास्त्रशुद्ध स्वरूप देतां येईल तितकें देण्याचा टिळक यांचा प्रयत्न असे. अर्थात् लेख लिहितांना तो लिहिण्याचा उद्देश, विषयासंबंधानें आपलें मत, त्यास प्रमाण, व शेवटीं सिद्धांत, एवढ्या गोष्टींकडे ते अवश्य लक्ष पुरवीत; व अशा रीतीनें ते लेख लिहीत ह्मणूनच त्या लेखांची उत्कृष्ट लेखांत गणना होते.¶ आतां चालू चळवळींवरील प्रत्येक लेखांत ही गोष्ट साधली आहे असें नाहीं. तथापि, मराठी वर्णमाला,

---

* डॉ. कॅनिंगच्या लेखनपद्धतीसंबंधानें मि. डना ह्मणतातः—

"It was perfectly simple, translucent throughout, without effort, never leaving you in any doubt as to the idea; and you closed the book with the feeling that you had fallen in with the most sympathetic of minds, whose instructions you might sometimes accept or sometimes reject, but whom you could not regard without entire respect and admiration."—*The Art of Paper Making.*

¶ विलायतेंत अनेक वर्षें पत्रकर्त्यांचा धंदा करून लौकिक मिळविलेले मि. जॉन डॉसन यांनीं आपल्या 'प्रॅक्टिकल जर्नालिझम' या ग्रंथांत उत्तम लेखाचें लक्षण पुढीलप्रमाणें बांधलें आहे. ते ह्मणतातः—

"A leader should have a beginning, middle and finish; or in other words, a head, body and tail.—In the first pararaph you, as it were, state your case; in the next paragraph you adduce arguments for or against the question under consideration; and in the third and last pararaph, you draw the conclusions which may be deduced from your previous remarks."

महाराष्ट्र भाषेची वाढ, पंचांग-शोधन, महाभारत, रामायण, या व धर्म, शास्त्र, जीवनवृत्तांत, वाङ्मय वगैरे विषयांवरील लेखांत ही गोष्ट अनेक वेळां त्यांनीं अमलांत आणलेली वाचकांच्या दृष्टीस पडेल.

दुसरी गोष्ट अग्रलेख कंटाळवाणा न व्हावा ह्मणून तो बहुधां दोन सव्वा दोन कॉलमपेक्षां जास्त लिहीत नसत. एकादे वेळीं याहीपेक्षां जास्त वाढे; पण असे प्रसंग क्वचित् येत.

तिसरी गोष्ट अग्रलेखामध्यें हे सहसा उतारे घेत नसत. याचें कारण उताऱ्यांतील विचार चांगले असून बाकीचा लेख सुमार असेल तर अग्रलेखाचें वजन पडत नाहीं. त्यापेक्षां उताऱ्यांतील विचार आपल्या भाषेनें लेखामध्यें गोंवून तो लिहिल्यानें जास्त वजन पडतें. उलटपक्षीं उतारा वाईट असला तर तो जशाचा तसाच देऊन आपल्या लेखाचा पाणउतारा करून घेण्यापेक्षां उताऱ्यांतील विचारांवर टीका करून आपलें वजन राखणें चांगलें असें त्यांचें मत आहे; व हें मत आपल्याच शब्दांनीं त्यांनीं एके प्रसंगीं पुढीलप्रमाणें व्यक्त केलें:—"उतारा चांगला असला तरी तो लेखास खातो व वाईट असला तरी लेखास खातो; यापेक्षां उतारा न घेणेंच चांगलें." तात्पर्य, उताऱ्यासंबंधानें त्यांची वरील प्रकारची दृष्टी असल्यामुळें आपल्या लेखांमध्यें उतारा न घेतां प्रसंगविशेषीं स्वतंत्र रीतीनें आपल्या भाषेनें चांगल्या मतांचा अनुवाद करीत किंवा वाईट मतांबद्दल प्रतिकूल टीका करीत. यावेळीं हीही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, विचारांचे कामीं पुष्कळ वेळां इतर पत्रकर्त्यांपेक्षां किंवा ग्रंथकारांपेक्षां यांची सरशी असल्यामुळें उताऱ्यासंबंधानें यांचें मत अशा प्रकारचें असणें स्वाभाविक आहे; व पत्र लहान पडल्यामुळें उतारा घेऊन लेख सजविण्यास किंवा उतारा घेऊन त्यावर टीका करण्यास त्यांचेजवळ स्थळ नसल्यामुळें त्यांनीं स्वीकारलेला मार्ग बरा नव्हता, असें कोणासही वाटणार नाहीं.

**अग्रलेखाचा मथळा घालण्याची** यांची **खुबी** तर फारच थोड्यांना साधेल. वेळेस अनुसरून कित्येक प्रसंगीं त्यांनीं असे कांहीं खुबीदार मथळे घातले आहेत कीं, त्यानें लेखाचें निम्में कार्य झालें आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. याची प्रचीती वाचकांस पाहण्यास सांपडावी ह्मणून कांहीं उदाहरणें येथें देतों. विद्याखात्याचे डायरेक्टर ना. जाइल्स

यांना देशी ग्रंथांत राजद्रोह दिसल्यावर त्यांच्यासंबंधानें जे लेख लिहिले आहेत त्यांपैकीं एकावर 'नामदार जाइल्स साहेब यांचें राजद्रोहाचें पिसें' असा मथळा घातला आहे; दुसऱ्यावर 'नामदार जाइल्स यांचीं मुक्ताफळें' असा मथळा घातला आहे; व तिसऱ्यावर दिपवाळीची आलेली संधी पाहून 'ना. जाइल्स साहेब यांची ओंवाळणी' असा घातला आहे. मि. ह्यूम, मि. दादाभाई नौरोजी व सर डब्ल्यू वेडरबर्न या राष्ट्रीय सभेच्या तिघां पुरस्कर्त्यांनीं सोळाव्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांच्या नांवानें एक महत्वाचा पत्रव्यवहार पाठविला होता. हा पत्रव्यवहार पंधरा वर्षे राष्ट्रीय कामाकरितां जिवापाड मेहनत करून अनुभव घेतलेल्या हिंदुस्थानच्या खऱ्या हितचिंतकांकडून आला असल्यामुळें त्यांतील पोक्त विचार, व राष्ट्रीय सभेनें पुढें आपला कार्यक्रम कसा ठेवावा यासंबंधानें केलेल्या सूचना, या गोष्टी ध्यानांत आणून टिळक यांनीं त्यास 'मुनित्रयाचा खलिता' असा मथळा घातला आहे. सन १९०० सालच्या दुष्काळांत पंचवीस हजार मुलें मिशनरींच्या हातांत पडलेलीं पाहून धर्मसंरक्षणार्थ लोकांनीं झटावें या उद्देशानें जो लेख लिहिला आहे त्याला 'जागे व्हा किंवा मरा' असा मथळा घातला आहे. जमिनमहसुलाच्या कायद्यासंबंधानें लिहितांना त्यांनीं पुढील मथळे घातले आहेत:—'शेतकऱ्यानो व सावकारानो, सावध व्हा'; 'जमिनीची मालकी बुडाली'; 'सावकार मेला आणि कुणबीही मेला'; 'खालसा जमीन कोणाची?'; 'बिलाचें तत्वच आह्मांस मान्य नाहीं'; 'उठा, अजून वेळ गेली नाहीं'; 'दुराग्रही सरकार व निर्बल लोकमत.' या मथळ्यांनीं शेतकऱ्यांचे जमिनीवरील हक्क नाहींसे झाले; जमिनी गहाण घेणारे सावकार बुडाले; खालसा झालेल्या जमिनीवरची शेतकऱ्यांची मालकी बुडाली; बिलाचें तत्व कायदे—कौन्सिलांतील कित्येक सभासदांनीं मान्य केल्यासारखें केलें होतें, पण लोकांस तें पसंत नव्हतें; बिलाचें दुसरें व तिसरें वाचन होण्यापूर्वी अर्जद्वारें लोकमत सरकारास कळविणें किती अगत्याचे होतें, व पुढें तें कळविल्यावर त्याला धाब्यावर बसवून सरकारानें कायदा कसा पास केला; वगैरे गोष्टींचा थोडक्यांत कसा खुलासा होतो हें वाचकांच्या ध्यानांत येईल पुणें शहरास मलमूत्र वाहून नेण्याचा मोठा थोरला नाला करण्यासंबधानें वाटाघाट चालली असतां 'पुण्यावर पन्नास लाखांचा धाड!' व सॅनिटरी

इंजिनियरचा हा धाड आणण्याचा प्रयत्न जेव्हां फसला तेव्हां 'मि. पॉटिंजर यांचा जळफळाट !' असे जे मथळे घातले आहेत तेही खुबीदार आहेत. गुजराथेंतील साऱ्याची वसुली सक्तीनें झाली कीं नाहीं याची चौकशी करण्याकरितां जें कमिशन बसलें होतें त्यानें जेव्हां सक्ती झाली नाहीं अशा अर्थाचा निकाल दिला तेव्हां 'डोंगर पोखरून उंदीर निघाला' असा मथळा घातला आहे. नोकरीच्या व्यवहारास जरूर लागतील तसलेच शिक्षक तयार होतील अशाविषयीं कल ठेऊन युनिव्हर्सिटी–कमिशननें ज्या सूचना केल्या होत्या त्यासंबंधानें लिहितांना "युनिव्हर्सिट्या ऊर्फ सरकारी हमालखाने" असा मथळा घातला आहे. विलायतेंत लिवार्नर साहेबांनीं मुंबई इलाख्यावर व्याख्यान देऊन तो इलाखा सर्व बाजूंनीं श्रेष्ठ आहे व तेथील लोकांत शांतता ठेवणें व त्यांना कह्यांत वागविणें हें कठिण काम सिव्हिलियनांना करावें लागतें म्हणून सांगून आपली जी फुशारकी मारली होती त्यांत प्रजेला कांहीं हक्क न देतां तिला निव्वळ जनावराप्रमाणेंच वागविण्यांत कांहीं पुरुषार्थ नाहीं अशा अर्थाच्या लिहिलेल्या लेखावर "उत्तम गुराखी कोण ?" हा मथळा घातला आहे. बाबा महाराजांच्या इस्टेटी संबंधीं उद्भवलेल्या खटल्यांत आपण आरोपमुक्त झाल्यावर निष्कारण वैर करून खटल्याची उभारणी करणारी मंडळी कोण, नुसतें आपलें नांवच आस्टनसारख्या जज्जास खटला करण्यास कितपत कारणीभूत झालें, खटल्याचे कामीं ताईमहाराज 'सोरा' व नागपूरकर 'गंधक' अशा दोन वस्तु मिळाल्यावर सरकारानें त्यांत कोळशाची भर घालून कसा बार उडविला, इत्यादि गोष्टींचें चित्र रेखाटतांना त्यांनीं "कुटाळ ऊर्फ पा–जी मंडळ," "बेलास तांबडी चिंधी," व "सरकारी कोळसा," हे मथळे घातले आहेत. युनिव्हर्सिटी बिल पास होण्याचे वेळीं विरुद्ध मत देणाऱ्या किंवा बिलाविरुद्ध बोलणाऱ्या गृहस्थांच्या चकवणीस आपण फसलों नाहीं असें दाखविण्याच्या हेतूनें डॉ. भांडारकर यांनीं आपल्या भाषणांत पंचतंत्रांतील तीन धूर्तांची गोष्ट सांगितली. पण बिलाचें धोरण काय व त्या धोरणानें युनिव्हर्सिट्यांचा खरा हेतु सिद्धीस जाईल कीं नाहीं हे प्रश्न केवळ विद्वानाचे नसून मुत्सद्याचे आहेत; करितां त्या बाबतींत बिलास आपलें अनुकूल मत देतांना उलट तीच तीन धूर्तांची गोष्ट डाक्टर साहेबांच्या गळ्यांत कशी आली, हें दाखवितांना त्यांनीं "धूर्त कोण आणि फसला कोण?"

हा मथळा घातला आहे. शाळांतून धार्मिक शिक्षणाची आवश्यकता आहे काय, या विषयावर रँग्लर परांजपे यांनीं ' ईस्ट अँड वेस्ट ' या मासिक पुस्तकांतून जेव्हां एक लेख प्रसिद्ध केला तेव्हां धार्मिक शिक्षणानें राष्ट्राची हानी होईल, धर्म म्हणजे वेडगळ समजुतींचा भारा आहे, इत्यादि त्यांत केलेल्या विधानांनीं लोकांचीं मनें कलुषित होतील—विशेषतः महाराष्ट्रांतील एका उच्च विद्यापीठांतील प्रिन्सिपालाच्या लेखणींतून निघालेल्या विधानांनीं जास्त कलुषित होतील—असें वाटून त्यांचा निषेध करण्याच्या हेतूनें तयार झालेल्या लेखावर त्यांनीं " प्रासादशिखरस्थोऽपि काको न गरुडायते, " असा मथळा घातला आहे. राज्यव्यवस्थेच्या अवाढव्य खर्चामुळें हिंदुस्थान सरकारच्या खजिन्यांत शिल्लक कशी ती पडत नव्हती; तथापि, नाण्याच्या कायद्यामुळें शिल्लक पडल्यावर मिठावरील करापैकीं थोडासा कर कमी करून लोकांस मोठी सूट दिल्याचा आव जेव्हां १९०५ सालीं सरकारनें घातला तेव्हां महत्वाच्या सुधारणा किंवा सवलती एकीकडे ठेऊन थोडीशी सूट दिल्याबद्दलचा डंका वाजविण्याचें जें काम सरकारानें चालविलें होतें तें गैर होतें हें दाखविण्याच्या उद्देशानें लिहिलेल्या लेखावर त्यांनीं " कराची सूट आणि बाकीची लूट ! " असा मथळा घातला आहे. स्वदेशी चळवळीचे वेळीं बंगाल्यांतील विद्यार्थ्यांवर व पुढाऱ्यांवर तेथील अधिकाऱ्यांचा रोष होऊन त्यांनीं जी दंडेली केली त्याचा परिणाम भयंकर होईल या भीतीनें राजनीतीचें धोरण बदलून मोर्ले साहेबांनीं जेव्हां सहानुभूति दाखविली त्या वेळीं स्थानिक अधिकाऱ्यांनींही वंदेमातरंचें सर्क्युलर परत घेऊन व स्वदेशी चळवळींत पडलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हां शाळेंत घेण्याची परवानगी देऊन त्यांची री ओढली त्या वेळीं ' दुधाची तहान केवळ ताकाच्या पाण्यावर भागविण्या ' चें धोरण सरकारानें सुरू केलें, हें दाखविण्याच्या उद्देशानें १९०६ मध्यें लिहिलेल्या एका लेखावर त्यांनीं " सहानुभूतीचा पूर ! " असा मथळा घातला आहे.

## अवतरणें घेण्याची तऱ्हा.

मथळे घालण्यांत यांची जशी खुबी आहे तशीच प्रसंगास अनुसरून मथळ्याखालीं योग्य अवतरणें घालण्याचीही यांची खुबी आहे. याचीं दोन तीन उदाहरणें येथें दिलीं असतां वाचकांची सहज खात्री होईल. बाबा महाराजांच्या इस्टेटी संबंधाच्या खटल्यांत हायकोर्टानें न्याय देऊन आपणास

जेव्हां आरोपमुक्त केलें तेव्हां त्यांनीं त्या वेळच्या मुख्य लेखाच्या मथळ्याखालीं मनूचा पुढील श्लोक दिला आहे:—

" अदण्ड्यान् दण्डयन् राजा दण्ड्यांश्चैवाप्य दण्डयन् ।
अयशो महदाप्नोति नरकं चैव गच्छति ॥ १ ॥ "

**भावार्थ:**—" जे शिक्षेस पात्र नाहींत त्यांस शिक्षा केल्यानें व जे शिक्षेस पात्र आहेत त्यांस शिक्षा न केल्यानें राजाची अतिशय दुष्कीर्ति होते, आणि तो नरकासही जातो ! "

सन १९०२ सालांत मद्रासच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं मि. ह्यूम यांनीं, वर्षांतून एक वेळ कॉंग्रेसच्या मंडपांत येऊन चढाओढीच्या भाषणानें नुसती ओरड करण्यापेक्षां आतां राजकीय चळवळीच्या बाबतींत कांहींतरी पुढें पाऊल टाका, असा जो कॉंग्रेसभक्तांस कळकळीचा निरोप पाठविला होता त्यावरील लेखाच्या मथळ्याखालीं त्यांनीं ऋग्वेदांतील मंडूकसूक्ताच्या पुढील ऋचा घातल्या आहेत:—

" गोमायुरेको अजमायुरेकः पृश्निरेको हरित एक एषां ॥
देवहितिं जुगुपुर्द्वादस्य ऋतुं नरो न प्रमिनंत्येते ॥ "

**भावार्थ:**—" एकजण बैलासारखा तर एकजण बोकडासारखा ओरडतो ! ह्यांपैकीं एक पिंवळट तर एक टिपकेदार ! .... हे बेटे ( बेडूक ) देवानें नेमलेली बाराव्या महिन्याची वेळ जपून पाळतात, कधींच चुकवीत नाहींत ! [ पावसाळ्यांत वर्षारंभ धरून ' बारावा ' हें पद आहे. कॉंग्रेसही इंग्रजी वर्षाच्या अखेर बाराव्या महिन्यांतच भरते ! ] "

## खुबीदार शब्द व वाक्यें.

लेखांत खुबीदार शब्द व वाक्यें घालण्यांतही यांचा मोठा हातखंडा आहे. यांचे कोणतेही लेख काढून वाचले असतां असले शब्द व असलीं वाक्यें वाचकांस क्षणोक्षणीं आढळून येतील. तीं सर्व येथें देणें म्हणजे केसरीचे कैक लेख जसेच्या तसेच येथें उतरून घेणें होय. आणि असें करणें अगदीं अशक्य असल्यामुळें वाचकांना अगदींच निराश न करतां त्यांची स्मृति जागृत व्हावी या हेतूनें पुढील कांहीं खुबीदार शब्द व वाक्यें येथें देतों. ना. जाइल्स साहेबांचें राजद्रोहाचें पिसें काढतांना त्यांना एके ठिकाणीं 'दंडुके साहेब' ह्मटलें आहे; त्यांच्या रिपोर्टास ' भवानी ' नांव दिलें आहे; प्रोफेसर जाइल्स व डायरेक्टर जाइल्स यांतील भेद

दाखवून 'त्यांच्यामध्यें रामरावणाच्या सोंगाइतकें अंतर पडलें आहे' असें ह्मटलें आहे; व राजद्रोहाची घाण काढतांना ते कसे दिसतात याचें पुढीलप्रमाणें त्यांनीं चित्र रेखाटलें आहे:—' मि. चाटफील्ड यांच्या मागून जाइल्स साहेब आले आणि तेही अशा वेळीं आले कीं, राजद्रोहानें इला-ख्यांतील सर्व वातावरण त्या वेळीं अगदीं दूषित होऊन गेलें होतें. मग काय विचारता? 'आधींच मर्कट' इत्यादि प्राकृत ह्मणीप्रमाणें राज-द्रोहरूपी प्लेगनें दूषित झालेलें हें वातावरण डिसइन्फेक्ट करण्याचें आपलें काम आहे अशी आपल्या मनाची खोटीच समजूत करून घेऊन

कल्याणाचें असलें पाहिजे, हा वरील सिद्धांताचाच कुलेरी आहे; किंवा वरची कुलेरी धरल्यास हा खालचा अँग्लो–इंडियनचा सिद्धांत समजला पाहिजे.

सन १९०१ सालीं मुंबईस भरलेल्या प्रांतिक सभेचें काम घाई घाईनें आटोपलें त्यामुळें मुखत्यारांचें दळणवळण वाढावें तसें वाढलें नाहीं, अशी टीका करीत असतां त्यांनीं पुढील वाक्यांत 'पुस्त्या' हा मजेचा शब्द वापरला आहे:—' त्यांतून सामाजिक व धार्मिक परिषदेच्या दोन पुस्त्या घाईतल्या घाईतच प्रांतिक सभेस जोडावयाच्या असल्यामुळें व गणेशोत्सवासही दुसऱ्या दिवशीं सुरवात होत असल्यामुळें मुखत्यारांची बरीच धांदल उडाली असावी.' राष्ट्रीय सभेचे पुढारी वर्षांतून एकदां चढाओढीचीं भाषणें करण्यापलीकडे कांहीं करीत नाहींत ह्मणून त्यांच्या ओरडण्यास जसें मंडूक सूक्तांतील उपमा देऊन बेडकांचें ओरडणें ह्मटलें आहे, तसेंच वर्षभर स्वस्थ बसून शेवटीं राष्ट्रीय सभा भरविणें ह्मणजे 'नाताळांत कोठें तरी वर्षश्राद्ध करण्यासाठीं जमण्यासारखेंच आहे' असें

ह्मटलें आहे. युनिव्हर्सिट्यांच्या नव्या कायद्यासंबंधानें लिहितांना विद्यापीठासंबंधानें असें म्हटलें आहे:—'खरें विद्यापीठ ह्मणजे तेथें राजकीय, सामाजिक, शास्त्रीय, औद्योगिक किंवा व्यावहारिक विषयासंबंधानें निर्भिडपणें विचारपूर्वक मत देणारे विद्वान् निपजले पाहिजेत. पण जीं विद्यापीठें दारूच्या गुत्त्याप्रमाणें सरकारच्या लायसेन्साप्रमाणें चालावयाचीं तेथें सत्यनिष्ठेपासून उत्पन्न होणारें धैर्य किंवा करारीपणा तरी कोठून नजरेस पडणार?' शाळाखात्यांतील क्रमिक पुस्तकांची सुधारणा करण्याकरितां नेमलेल्या कमिटीस टोमणा मारतांना 'धोबी' व 'निर्लेप' हे शब्द पुढील वाक्यांत खुबीनें योजिले आहेत:—"हजारों रुपये खर्च करून शाळाखात्यांतील क्रमिक पुस्तकें सुधारण्याकरितां आतां कमिटी बसणार आहे; व या कमिटीचें काम पुरें झालें ह्मणजे आमच्या शाळांतील क्रमिक पुस्तकांतून धर्माचा, देशाभिमानाचा किंवा अधिकाऱ्यांच्या दृष्टीनें राजद्रोहाचा मल धोब्याप्रमाणें ही कमिटी काढून टाकून शाळांतील क्रमिक पुस्तकें अगदीं निर्लेप बनवील; अशीं कीं, तीं वाचल्यानें कोणाच्याही मनांत 'मेंढ्यावरी लोंकर दाट भारी' याच्या पलीकडचे विचार कधींही उद्भवूं नयेत." रा. ब. विष्णु मोरेश्वर भिडे यांच्या मृत्युलेखांत त्यांच्या स्वभावाचें वर्णन टिळक यांनीं एकाच वाक्यांत केलें आहे. तें वाक्य हें:—"यांचा स्वभाव फार मनमिळाऊ, मिळून मिसळून वागण्याचा आणि उदार होता, यामुळें हे कोणत्याहि पक्षांत असले तरी त्याबद्दल यांचा स्वतःचा कांहीं स्वतंत्र आग्रह नसे." याप्रमाणेंच कर्झन साहेब राजीनामा देऊन निघाले असतां त्यांच्या गुणांची प्रजेच्या दृष्टीनें पारख कशी ठरते याचें एकाच वाक्यांत पुढीलप्रमाणें चित्र रेखाटलें आहे:—"यांच्या अंगीं गुण बरेच होते; पण प्रत्येक गुणाचा अतिरेक होऊन साखरेची ज्याप्रमाणें दारू बनते त्याप्रमाणें यांच्या गुणांचें प्रजेच्या दृष्टीनें पाहतां मातेरें झालें होतें."

## विशिष्ट शब्दांचा खुलासा.

वर्तमानपत्रांतील लेखांत राजकीय, औद्योगिक वगैरे विषयांवर लिहितांना कित्येक संस्थांसंबंधीं विशिष्ट शब्द* योजण्यांत येतात. असले

* हे शब्द कशा प्रकारचे असतात हें वाचकांस कळावें ह्मणून कांहीं येथें देतों:—'ब्ल्यू बुक;' 'शेरीफ;' 'सेंट आंड्र्यूज डिनर'; 'चेंबर ऑफ कॉमर्स' इ.इ.

शब्द वरचेवर लेखांत येत असल्यामुळें ते वाचकांच्या परिचयाचे होतात व त्यांतील अर्थाची त्यांना पुसट पुसट कल्पना येते. पण लेखांतील रहस्य किंवा बारिकसारिक खुब्या कळण्यास त्या त्या संस्थांची रचना किंवा व्यवस्था माहित असावी लागते. अशा प्रकारची थोडी बहुत माहिती लेख लिहितां लिहितां अनायासें कळावी ह्मणून विषयास सोडून दूर न जातां सहजासहजी एक दोन वाक्यांत ते देत असत. या त्यांच्या हातोटीचीं कांहीं उदाहरणें येथें देतों, ह्मणजे वाचकांची खात्री होईल. सन १९०३ सालांत युनिव्हर्सिटी–बिलासंबंधानें लिहित असतां पुढील वाक्यांत 'सिंडिकेट' चा अर्थ थोडक्यांत दर्शविला आहे:—"युनिव्हर्सिटीची रचना जर बदलणें असेल तर निदान ती म्युनिसिपालिट्यांच्या रचनेप्रमाणें तरी नको काय? .... सिंडिकेट किंवा म्युनिसिपालिटीच्या भाषेंत म्यानेजिंक कमिटीमध्यें निम्मे लोक कॉलेजांतीलच असावेत, असाही निर्बंध केलेला आहे." "होम व फॉरिन पॉलिसी" याचें स्पष्टीकरण पुढील वाक्यांत त्यांनीं एका लेखाच्या आरंभीं असें दिलें आहे:— "लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीत हिंदुस्थान देशांतील लोकांच्या हिताचे आणि हिंदुस्थान सरकारची आशियाखंडांत इभ्रत वाढविण्याचे अथवा इंग्रजींत ज्यास 'होम आणि फॉरिन पॉलिसी' ह्मणतात त्या दोन्ही तऱ्हेच्या प्रश्नांची वाटाघाट होऊन कसा निकाल लागत आहे याची कल्पना, अलीकडे जे कांहीं हिंदुस्थान सरकारचे ठराव प्रसिद्ध झाले आहेत अथवा जीं कृत्यें सरकार करीत आहे, त्यावरून कोणासही उघड कळून येण्यासारखी आहे." रशिया व जपान यांच्यामध्यें जेव्हां युद्ध सुरू झालें तेव्हां इंग्लंडनें उदासीन राहण्याचा संकल्प केला. युद्धाचे वेळीं राष्ट्रानें 'उदासीन राहणें' ह्मणजे काय व त्याचें कर्तव्य कोणतें याचा थोडक्यांत त्यांनीं येणेंप्रमाणें उल्लेख केला आहे. 'इंग्लंड देशानें या लढाईत उदासीन राहण्याचा संकल्प केल्यामुळें हिंदुस्थान देशाच्या सरकारास किंवा लोकांस जपानी राष्ट्रास कांहीं मदत करतां येत नाहीं, ही गोष्ट खरी आहे. उदासीन राष्ट्रानें आपल्या बंदरांत लढणाऱ्या राष्ट्रांपैकीं कोणाचींही गलबतें आलीं असतां त्यांस चोवीस तासांपेक्षां जास्त थारा देऊं नये अथवा त्या त्या राष्ट्राचें जें जवळचें बंदर असेल तेथें जाण्यास अवश्य लागेल त्यापेक्षां जास्त कोळ-

शाचा पुरवठा करूं नये, असा नियम असल्यामुळें तो इंग्रजसरकारच्या बंदरांतून सक्तीनें पाळला जाईल यांत शंका नाहीं.' याप्रमाणेंच 'बॅटलशिप,' 'क्रुइझर,' 'टार्पेडो बोट,' वगैरे शब्दांची व विलायतेंतील कांहीं संस्थांची माहिती किंवा व्याख्या प्रसंगोपात थोडक्यांत कोठें कोठें त्यांनीं सांगितल्या आहेत. त्या सर्व येथें देण्याचें प्रयोजन नाहीं. मासल्याकरितां म्हणून कांहीं उदाहरणें वर दिलीं आहेत.

## टीका करण्याची तऱ्हा.

यांची टीका कधीं पोकळ नसते. त्यांत पुरावा व माहिती पुष्कळ असून युक्ति व तर्क यांच्या कसोटीसही ती पूर्णपणें कशी उतरते हें पुढील उताऱ्यांवरून कळून येईल.

सन १९०० सालच्या सप्टेंबर महिन्यांत पुण्यास प्लेग आला असतां सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत जाहिरसभा भरून लोकांचीं गाऱ्हाणीं सरकारास कळविण्याचें ठरलें होतें. त्यावेळीं कित्येक वेश्या सभेस आल्या होत्या हें पाहून 'सुधारका'दि पत्रांनीं नीतिमत्ता बिघडल्याबद्दल उलट पक्षाच्या नाकांत काड्या घालण्याच्या हेतूनें टीका केली होती. ही टीका किती अप्रयोजक होती व नागरिक हक्कांच्या संरक्षणार्थ वेश्यांस सभेंत येऊं दिल्यानें समाजाची नीतिमत्ता कशी बिघडत नाहीं, हें दाखविण्याकरितां टिळक यांनीं पुढील दोन स्फुट लेख लिहिले आहेत.:—

"येथें परवां शनिवारीं प्लेगनियमासंबंधानें लोकांचीं गाऱ्हाणीं सरकारास कळविण्याकरितां जी सभा झाली होती त्या सभेंत शुक्रवार पेठेंतील दोन तीन घरवाल्या नायकिणी आणि २०।२५ कुणबी वगैरे जातींच्या घरंदाज बायका आल्या होत्या; व त्याचप्रमाणें सदर पेठेंत घरें असणारे चांभार लोकही सभेस हजर होते. अशा प्रकारचे लोक नेहमींच्या जाहिरसभेस फारसे येत नाहींत; पण प्लेगनियमाप्रमाणें शुक्रवार पेठेंतील घरें खालीं करण्याच्या ज्या नोटिसा काढल्या आहेत त्या घरांचे मालक किंवा त्यांतील बिऱ्हाडकरू वर सांगितलेल्या स्त्रिया व लोक असल्यामुळें ते आपलीं गाऱ्हाणीं कळविण्याकरितां आपण होऊनच सभेस आले होते. त्यांस कोणी मुद्दाम बोलाविलें नव्हतें अगर त्यांजकरितां स्वतंत्र जागा पूर्वीच राखूनही ठेविली नव्हती. 'ज्याचें पोट दुखतें तो ओवा खातो' हा न्याय सार्वजनिक हक्कांसही लागू आहे. आणि केवळ सार्वजनिक सुखदुःखें, अडचणी किंवा गाऱ्हाणीं सरकारास कळविण्याकरितां जी सभा भरविली जाते त्यांत सदर हक्क असणाऱ्या प्रत्येक इसमास—मग तो स्त्री असो वा पुरुष असो, चांभार असो वा

श्रोत्रीय ब्राह्मण असो, सुधारक असो वा दुर्धारक असो, दारूबाज असो किंवा टीटोटलर असो, नायकीण असो किंवा पतिव्रता असो—सभेंत हजर राहून मत देण्याचा व बोलण्याचा अधिकार आहे. सुधारककारांस हें तत्व अद्याप समजलें नसेल तर त्यांची बुद्धि अद्याप व्हावी तितकी संस्कृत झाली नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. शुक्रवारांतच बावनखणीचा समावेश आहे, आणि त्या पेठेंतच जर प्लेगच्या नियमाप्रमाणें विशेष सक्ती झाली आहे, तर ज्यांवर ही सक्ती झाली आहे त्यांपैकीं कांहीं नायकिणीही असणें अगदीं संभवनीय आहे. शुक्रवार पेठेंतील नायकिणींस म्युनिसिपल कमिशनर निवडून देण्याचा हक्क आहे, व त्यांचीं 'व्होटें' मिळविण्याकरितां कमिशनर व म्याजिस्ट्रेट यांच्या घरीं हेलपाटे घालीत असतात; इतकेंच नव्हे तर, फर्ग्यूसन कॉलेजास दिलेल्या देणग्यांपैकीं एक देणगी एका कसबिणीचीच आहे ! नीतिविषयक प्रश्नांचा आणि सार्वजनिक हक्कासंबंधाच्या प्रश्नांचा भेद केला पाहिजे. पहिल्या बाबतींत मत देण्याचा अधिकार ज्यांस नाही ते दुसऱ्या बाबतींत पूर्ण अधिकारी असतात, हें तत्व राष्ट्रीय सभेसही मान्य झालें आहे. तेव्हां उगीच कांही तरी न्यूनपणा काढून शहरांतील लोकांच्या हक्कांचें संरक्षण करण्याकरितां भरविलेल्या सभेतील प्रमुख गृहस्थांवर तोंड सोडणें हें अज्ञानपणाचें नसल्यास कुत्सितपणाचे लक्षण आहे. ब्राह्मणांच्या सार्वजनिक सभेंतही चांभारांनीं येऊं नये असे म्हणणारे ज्याप्रमाणें जुन्या मंडळींत कित्येक लोक आहेत त्याप्रमाणें लोकांच्या हक्करक्षणाकरितां भरलेल्या सभेतही नायकिणींनी येऊं नये, असें म्हणणारी वर्तनानें नव्हे तर तोंडानें सुधारक बनलेली कांहीं मंडळी आहेत. या मंडळीपेक्षां नीतिमत्तेची आम्हांस कांही कमी काळजी आहे असें नाहीं. पण नागरिक या नात्यानें जे हक्क शहरांतील लोकांस असतात ते चांभारास व ब्राह्मणास, नायकिणीस व पतिव्रतेस सारखेच असतात हें तत्व आम्हांस पूर्णपणें मान्य असल्यामुळें भलत्याच ठिकाणी नीतिमत्तेचा डौल मारून हे हक्क कमी करण्याचा कोणी प्रयत्न केल्यास तें आम्हांस कधींही मान्य होणार नाही. त्यांतून हल्लींच्या प्रसंगीं या नायकिणींच्या घरांसच जर नोटिसा लागल्या होत्या तर त्यांची तक्रार ऐकून घेण्यास नको होतें काय ? त्यांच्यापासून इन्कमटॅक्स घेण्यास तयार, त्यांच्याजवळ 'व्होटें' मागण्यास तयार, तर मग नागरिक या रीतीनें जी कांहीं त्यांची गाऱ्हाणीं असतील तीं सार्वजनिक पुढाऱ्यांनीं स्वस्थपणें ऐकून घ्यावयास नकोत काय ? उद्यां म्याजिस्ट्रेटापुढें फिर्यादी म्हणून जर एकादी नायकीण उभी राहिली तर म्याजिस्ट्रेट साहेबांस ती नायकीण आहे एवढ्यावर तिचा अर्ज नामंजूर करतां येईल काय ? हाच प्रकार परवांच्या सभेच्या अध्यक्षांचा होय. यापेक्षां या विषयावर जास्त लिहिण्याची कांहीं जरूर नाहीं. नीतिमत्ता, सार्वजनिक हक्क, सामाजिक सुधारणा, राजकीय सुधारणा इत्यादि निरनिराळ्या विषयांची व्याप्ति किती हें आपल्या बुद्धीनें ठरविण्याची

ज्यांस ताकद नाहीं त्यांनीं असल्या विषयांत न पडणें हेंच चांगलें. बांधलेली सिधोरी कांहीं फार दिवस पुरत नाहीं. ”

* * * *

“ यासंबंधानें भरलेल्या जाहिरसभेवर कित्येकांचे जे आक्षेप होते ते चुकीचे आहेत हें गेल्या अंकीं आह्मी लिहिलेंच होतें; व तेंच आमचें मत अद्यापहि कायम आहे. वेश्यांस आपल्या धंद्याचे पैसे वसूल करण्याकरितां कोर्टांत फिर्याद करतां येत नसली तरी म्युनिसिपालिटींतील कमिशनर निवडण्याचे वेळीं मत देण्याचा व कमिशनरचें नांव सुचविण्याचाही कायद्याप्रमाणें जोंपर्यंत त्यांस अधिकार आहे तोंपर्यंत त्यांस नागरिकांचे हक्क नाहींत असे ह्मणणें अगदीं वेडगळपणाचे आहे. पिनलकोडा-प्रमाणें वेश्येवरही बलात्कार करतां येत नाही, ही गोष्ट लक्षांत आणली ह्मणजे कायद्याचें खरें स्वरूप काय आहे हे कोणाच्याही लक्षांत येईल. पण कायदा, व्यवहारचातुर्य, नीतिमत्ता, ही सगळीच जेथें उसनी आणावीं लागतात त्यांस या गोष्टी कोठून कळणार ? बरें, एवढ्या नीतिमत्तेचा डौल मारणारांचीं नाकें तरी स्वच्छ असावयास पाहिजे होतीं; पण तींही शेंबडानें भरलेलीं ! कोळसा उगाळावा तेवढा काळाच. फर्ग्यूसन कॉलेजासंबंधानें त्या कॉलेजास दिलेल्या देणग्यांपैकीं एक देणगी एका कसबिणीची आहे असें आह्मीं विधान केलें होते. हें विधान खोडसाळ आहे असें आमचे एक बंधु ह्मणतात, व ते मत्सरानें केले असावें असेंही लोकांस सांगतात ! परंतु आह्मी जीं अक्षरे लिहिलीं आहेत तीं बरोबर आहेत असें आह्मी पुन्हां विधान करतों. कसबिणीने देणगी दिली पण फर्ग्यूसन कॉलेजने घेतली नाहीं हें ह्मणणें चुकीचें आहे. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या कौन्सिलानें तसा ठराव केला आहे. पण जी गोष्ट सोसायटी उघडपणे करण्यास तयार नाहीं तीच गोष्ट सदर कसबिणीच्या एका विश्वासू ट्रस्टीमार्फत घडून येत आहे व फर्ग्यूसन कॉलेजचे लोक यांस ही गोष्ट माहित आहे, इतकेंच नव्हे तर, त्यांचें एका रीतीनें तीस अनुमोदनही मिळालें आहे. सारांश, खरा प्रकार असा आहे कीं, तोंडानें कसबिणीचें दान नको ह्मणावयाचें आणि पाठीमागें हात करून तेंच दान दुसऱ्यास नकळत घ्यावयाचें. आमच्या मतें उघड दान घेण्यापेक्षां हा प्रकार अधिक निंद्य आहे. कारण, पहिल्यांत नीतिमत्तेबद्दल मतभेद असला तर दुसऱ्यांत कपट आहे. ही गोष्ट अशा तऱ्हेनें पुढें आणण्याची आमची इच्छा नव्हती; पण आमचे प्रतिपक्षी असें कांही चतुर आहेत कीं, ते आमच्या इच्छेविरुद्धही कांहीं गोष्टी आह्मांस प्रसिद्ध करावयास लावितात. या सर्व गोष्टी एके ठिकाणीं केल्या ह्मणजे “ फर्ग्यूसन कॉलेजास दिलेल्या देणग्यांपैकीं एक देणगी कसबिणीची आहे ” असें जें आह्मी गेल्या अंकीं विधान केलें होतें तेंच खरें ठरतें. मात्र त्यास एक पुरवणी जोडावी लागते; आणि ती ही कीं, सदर देणगी उघड रीतीनें नाकबूल करण्याचा आव घालून अप्रत्यक्ष

रीतीनें पण जाणून बुजून तिचा फायदा कॉलेज घेत आहे. यास नीतिमत्ता ह्मणावयाचें की काय हें आह्मी सांगावयास नकोच. वर सांगितलेंच आहे कीं, कोळसा उगाळावा तितका काळा; करितां यासंबंधानें जास्त वाटाघाट करण्याची आमची इच्छा नाहीं. नागरिक हक्कांच्या संरक्षणार्थ वेश्यांस सभेंत येऊं दिल्यानें समाजाची नीतिमत्ता बिघडते असें आमचे मत नाहीं; व ज्यांचें असें मत असेल त्यांनीं निदान वेश्या किंवा वेश्यांची संपत्ती मागील दाराने घरांत घेण्याचा क्रम तरी बंद केला पाहिजे. ”

यांची टीका जशी सयुक्तिक असते तशीच झणझणीतही असते. प्रतिपक्षावर वायफळ बार झाडणें किंवा आडून गोळी मारणें हा प्रकार यांच्या टीकेंत नसून ‘ प्रतिपक्ष्याशीं आखाड्यांत समोरासमोर तोंड देणें, त्याच्याशीं दोन हात करून त्याला खालीं पाडणें व छाताडावर बसून वर आणखी दोन ठोंसे लगावणें ’ असें जें कलकत्त्याच्या ‘ इंडियन नेशन ’ नामक पत्रानें एकोणिसाव्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष बाबू लाल मोहन घोस यांच्या भाषणासंबंधानें लिहिलें आहे तेंच हुबेहुब यांच्या टीकेस लागू पडते.* अशा प्रकारच्या टीकेचा मासला वाचकांस पाहावयास मिळावा ह्मणून पुढील उतारा मुद्दाम येथें देतों.

‘ टाइम्स ऑफ् इंडिया ’ पत्राचे संपादक मि. बेनेट हे १९०१ मध्यें विलायतेस चालले असतां मुंबईच्या सर भालचंद्रादि पुढाऱ्यांनीं त्यांस पानसुपारी केली त्या वेळीं पुढील लेख त्यांनीं लिहिला आहे:—

“ ‘ टाइम्स ऑफ इंडिया ’चे एडिटर मि. बेनेट हे या देशांत कांहीं वर्षें राहून व एका प्रमुख इंग्रजी पत्रांत नेटिवांस शिव्या देऊन पैसे मिळवून विलायतेस स्वगृहीं जात आहेत ह्मणून त्यांस पानसुपारी देण्याबद्दल मुंबईस सर भालचंद्र यांनी जी नुकतीच खटपट केली ती पाहून आमच्यांपैकीं पुढारी ह्मणविलेल्या कांहीं गृहस्थांनीं हल्लीं जो एक नेभळेपणाचा वर्तनक्रम स्वीकारला आहे तो चांगला निदर्शनास येतो;

---

* ‘ इंडियन नेशन ’ पत्रानें एकोणिसाव्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांच्या भाषणास उद्देशून पुढील मजकूर लिहिला आहे:—

“ He does not seek to expose his adversary with playful irony or even to wither him up with the cold breath of logic, but attacks him with might and main, fights him tooth and nail, knocks him down with heavy blows, and scarcely spares him when he is down on the ground.”

व देशांत असे पुरुष उत्पन्न होऊं लागले याबद्दल अत्यंत खेद होतो. बेनेट साहेब ह्मणज कांहीं विद्वान् नव्हेत, वक्ते नव्हेत, मुत्सद्दी नव्हेत किंवा योद्धेही नव्हेत. विलायतेंतून पोट भरण्याकरितां रिपोर्टरचा धंदा पतकरून हे इकडे आले आणि आमच्याकडील एकाद्या हुषार कारकुनाप्रमाणें तरतरी दाखवून हळूहळू टाइम्स पत्राचे एडिटर बनलें. ह्मणजे विलायतेच्या मानानें पाहिले तर तिसऱ्या चवथ्या प्रतीतील एकाद्या पत्राच्या एडिटराइतकी यांची योग्यता आहे. पण हिंदुस्थानांत सर्वच कांहीं विचित्र आहे. एकादां अर्धवट शिकलेला पण तरतरीत साहेब इकडे आला, व तो टाइम्ससारख्या पत्राचा एडिटर बनून त्याला सरकारचें थोडेसें पाठबळ असलें ह्मणजे आमच्याकडील चांगले बुद्धिमान व श्रीमान् गृहस्थही त्याच्या भजनीं लागतात; इतकेंच नव्हे तर, तसें करण्यांत त्यांस गौरव वाटतो! परकीय राज्याखालीं देशांतील पुढाऱ्यांच्या अंगच्या तेजाची जी पायमल्ली होत असते ती हीच होय. ज्या बेनेट साहेबांस मानपत्र देण्याकरितां सर भालचंद्र यांनी आतां इतकी धडपड केली, त्याच बेनेट साहेबांनीं कांहीं कालापूर्वी सर भालचंद्र यांस ‘महामूर्ख’ (Idiot) असे आपल्या ‘टाइम्स ऑफ इंडिया’ पत्रांत लखलखीत सर्टिफिकीट दिलें होतें; व असें केल्याबद्दल पुढें कधींही खेद प्रदर्शित केला नाहीं किंवा तो शब्द परत घेतला नाहीं. तथापि, आमचे सर भालचंद्र हे बेनेट साहेबांची आरती ओंवाळण्यास आज तयार आहेत ते आहेतच! आतां आह्मांला एवढेंच गूढ पडलें आहे कीं, ज्याअर्थी बेनेट साहेबांनी सर भालचंद्र यांस महामूर्ख असें सर्टिफिकीट दिलेलें आहे व आज सर भालचंद्र हे बेनेट साहेबांचे गुणानुवाद वर्णन करण्यास तयार आहेत त्या अर्थी एक बेनेट साहेबांचे गुणानुवाद तरी खोटे असले पाहिजेत किंवा सर भालचंद्र तरी खरोखरच महामूर्ख असले पाहिजेत. एरव्ही या कोड्याची कांहीं उपपत्ती लागत नाहीं. कोणी तरी तिसऱ्या चौथ्या वर्गातील युरोपियनांच्या नादीं आमच्यांतील प्रमुख मंडळींनीं लागावे हे आमचे दुर्दैव होय. बेनेट साहेबांची आह्मांसही थोडीबहुत ओळख आहे, नाहीं असे नाहीं; व त्यावरून आमची अशी खात्री झालेली आहे कीं, जेव्हां प्रसंग येईल तेव्हां बेनेट ते बेनेट किंवा ‘काकः काकः पिकः पिकः’ असाच प्रकार होईल. ही गोष्ट ओळखण्याइतकी सर भालचंद्र यांच्यासारख्या पुढाऱ्यांच्या अंगीं अक्कल नाहीं असें नाहीं; पण युरोपियन लोकांच्या समाजांत जो कोणी आपल्याबद्दल एकादा शब्द चांगला बोलेल त्याच्या नादीं लागण्याची यांची इच्छा इतकी अनावर असते की, त्यामुळें आपल्या समाजाच्यासंबंधानें किंवा देशासंबंधानें आपलें कांहीं कर्तव्य आहे कीं नाहीं हा प्रश्नच यांस दिसेनासा होतो. ज्या पत्रकाराने आपलें आयुष्य एकदोन प्रसंग खेरीज करून बहुतेक नेटिवांस शिव्या देण्यांत घालविलें त्याचेही कांहीं चहाते आमच्या पुढारी ह्मणविण्याऱ्या मंडळीमध्यें निघतात; तेव्हां ब्रह्मदेवानें जगामध्य निर्गुण अशी कांहीं वस्तु ठेवलीच नाहीं, अशी जी एक ह्मण आहे ती खरी आहे असें

ह्मणावें लागतें. सँढर्स्ट साहेबांची भालचंद्रादिकांनीं पूजा केली, त्यास सँढर्स्ट हे गव्हर्नर तरी होतें असें ह्मटल्यास उगाच कांहीं तरी सोडवणूक होऊं शकेल. पण हेंच श्वत्रृत्तित्व बेनेट साहेबांपर्यंत जेव्हां येऊन पोहोंचतें तेव्हां कार्य, कारण, प्रसंग वगैरे कांहीं सबब नसतांही केवळ युरोपियन या नात्यानें फाटक्या साहेब लोकांचीही मर्जी संपादन करण्याची आह्मांस अतिशय वाईट संवय लागली आहे किंवा लागत चालली आहे असें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागते. गेल्या चार वर्षांतील घडामोडी पाहून भयानें ऊर्फ नेमस्तपणानें, लोभानें अथवा 'पॉलिसी'नें जर असा परिणाम व्हावयाचा असेल तर ही निंद्य, अश्लाघ्य आणि अननुकरणीय पद्धत लोकांच्या तिरस्काराला जितकी लवकर पात्र करतां येईल तितकी करणें आमचें कर्तव्य आहे. बेनेट साहेब सर भालचंद्र यांस महामूर्खपणाची टोपी घालीत आहेत आणि इकडे सर भालचंद्र हे बेनेट साहेबांस मानपत्र देत आहेत, असा जर कोणीं देखावा काढला तर तो वरील प्रसंगाचें हुबेहुब स्मारक होईल !"

सरकारावरची यांची टीका तर निस्पृहपणाची व निर्भयतेची असून त्यांत कायद्याचें विशद ज्ञान व त्यांतील खाचाखोचा आणि सूक्ष्म डावपेंच हींही नजरेस पडतात. याचें उदाहरण 'भाला पत्रावरील खटला आणि राजद्रोह' या १९०६ च्या लेखांतील पुढील उताऱ्यावरून कळून येईल. ते म्हणतात:—

"प्रथमतः सरकारासंबंधानें विचार करूं. कोणतेंही सरकार घ्या—स्वदेशी घ्या किंवा विदेशी घ्या—त्यास आपल्या कायमपणाची तजवीज करणें अवश्य आहे. मनुष्य ज्याप्रमाणें आपल्या जिवास जपतो त्याप्रमाणें सरकारही आपल्या जिवास जपत असतें. त्यांतून परकीय सरकार असलें तर तें फारच जपतें; व पदोपदी त्यास लोकांचा वहीम येत असतो. तीस कोटी लोकांवर केवळ साठ हजार गोऱ्या सैन्याच्या साहाय्यानें सहा हजार कोसांवरून येथें येऊन अंमल करणें कांहीं लहानसान काम नव्हे. त्याकरितां जितकी दक्षता ठेवावी तितकी थोडीच आहे. परंतु अशी दक्षता ठेवतांना सापाचा संशय घेऊन दोरीस जर सरकार बडवावयास लागलें तर तें सरकार लोकांच्या उपहासास नाहीं तरी अनुकंपेस तरी खास पात्र होईल. प्रजेची प्रीति राजावर जडण्यास राजाचें वर्तन सर्वस्वीं प्रजेच्या हिताचेंच असलें पाहिजे, हें तत्व फार प्राचीन कालापासून चालत आलेलें आहे. "व्यतिषजति पदार्थानान्तरः कोऽपि हेतुः" असें जें भवभूतीनें ह्मटलें आहे तें अक्षरशः खरें आहे. सर्व रोग कांहीं शस्त्रक्रियेनें बरे होत नसतात, त्यांस पोटांत औषध द्यावें लागतें; आणि तेंही जितकें गोड करवेल तितकें करून द्यावें लागतें, ही गोष्ट चांगल्या वैद्यांस माहित आहे. राज्यकर्त्यांची गोष्ट याच मासल्याची आहे. प्रजा राजावर अनुरक्त राहण्यास ती सुखी, उत्साहयुक्त आणि संपन्न

असावी लागते. प्रजेच्या अंतःकरणांत प्रीति उत्पन्न करण्याचा मार्ग हाच होय; आणि तो केवळ कायद्यानें कधींही साध्य व्हावयाचा नाहीं. कायदा प्रजाजनांपैकीं प्रत्येकाचें तोंड, हात वगैरेंचे बाह्य व्यापार नियंत्रित करूं शकेल. अमक्यानें अमुक बोलावें किंवा बोलूं नये, अमक्यानें अमुक लिहावें, अमक्यानें अमुक करावें, अमुक उलाढालींत पडावें, अमुक उलाढालींत पडूं नये, वगैरे व्यवस्था कायद्यानें करतां येते; पण हे सर्व बाह्योपचार आहेत. प्रजेच्या अंतःकरणांतील विकार किंवा विचार यांनीं नियंत्रित होत नाहींत; आणि प्रजेचीं अंतःकरणें जर राजाच्या हातीं लागलेलीं नसलीं तर केवळ बाह्योपचारानें फार दिवस निभाव लागत नाहीं. एकाद्या ठिकाणीं आगंतुक कारणानें उत्पन्न झालेलें गळू कापून त्यावर मलमाची पट्टी लावल्यानें तें बरें होईल; पण शरीरांतील रक्त बिघडल्यानें उत्पन्न झालेलें एकादें गळू मलमपट्टी लावून बरें केलें, तरी तशाच प्रकारचें किंवा त्याहून निराळ्या प्रकारचें गळू शरीराच्या दुसऱ्या भागांत पुन्हां उद्भवतें ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. आमच्या समाजाची स्थिति सध्यां अशाच प्रकारची झालेली आहे; आणि एवढ्याचकरितां आह्मी असें ह्मणतों कीं, भालपत्रकारास शिक्षा करून समाजाचें आरोग्य सुधारण्याचा सरकारनें हल्लीं जो प्रयत्न केला तो अशास्त्रीय आहे.

'राजद्रोह' या शब्दाचा खरा अर्थ ह्मटला ह्मणजे राजाचा द्रोह; अर्थात् राजाचा पाडाव करून त्याचा अधिकार किंवा सत्ता नष्ट करण्याची बुद्धि, हा होय. जेव्हां अशा प्रकारची बुद्धि प्रजाजनांपैकीं कोणाच्या मनांत संचारलेली असते तेव्हां तो मनुष्य राजाचा शत्रु होतो, आणि त्या शत्रूचा नाश करणें हें सरकारचें कर्तव्य बनतें. शत्रु प्रबल असल्यास लढाई करून त्याचा नाश करावा लागतो, आणि आपल्या मुलखांतीलच एकादा दुसरा इसम असल्यास राजद्रोहाच्या आरोपावर त्यास तुरुंगांत ठेवावें लागतें किंवा हद्दपार करावें लागतें. हा स्वसंरक्षणाचा उपाय होय, व या मार्गाचें कोणाही राजानें किंवा सरकारानें अवलंबन केल्यास त्यास दोष देतां येणार नाहीं. सन १८९८ सालापूर्वी राजद्रोहाची व्याख्या अशाच प्रकारची होती. "सरकारचा हुकूम तोडा, शस्त्रें घ्या आणि सरकाराविरुद्ध उठा" अशा प्रकारचा जोंपर्यंत कोणी उपदेश करीत नाहीं तोंपर्यंत त्याचा लेख किंवा भाषण कितीही कडक असलें तरी त्याच्या हातून राजद्रोहाचा गुन्हा होत नाहीं, अशी राजद्रोहाची तेव्हां पिनकोडांत व्याख्या होती. ही व्याख्या पहिल्यानें केसरीवरील खटल्यांत स्ट्राची साहेबांनी शब्दांची ओढाताण करून बदलली; आणि तेव्हांपासून द्रोह ह्मणजे द्वेष, द्वेष ह्मणजे अप्रीति, अप्रीति ह्मणजे प्रीतीचा अभाव, प्रीतीचा अभाव ह्मणजे प्रीति नसणें, आणि युक्लिडच्या पहिल्या प्रत्यक्ष प्रमाणाप्रमाणें राजावर प्रीति नसणें ह्मणजे राजद्रोह अशा प्रकारच्या कोट्या सुरू झाल्या! पुढें १८९८ सालीं पिनलकोड दुरुस्त करून सरकारनें

या कोव्यांस लोकमतास न जुमानतां केवळ आपल्या मनगटाच्या जोरावर कायद्याचें स्वरूप दिलें. या नव्या कायद्याप्रमाणें राजद्रोह हा गुन्हा पूर्वी जो राजाविरुद्ध बंड करण्यास चिथावण्याचा होता तो केवळ राजाच्या बेअदबीचा होऊन बसला आहे. हल्लीं राजद्रोहाची अशी व्याख्या आहे कीं, जो कोणी शब्दानें, लेखानें, चित्रानें किंवा दुसऱ्या कोणत्याही तऱ्हेनें लोकांच्या मनांत सरकाराबद्दल "शत्रुभाव, द्वेष किंवा तिरस्कार" उत्पन्न करील तो राजद्रोही समजला जाईल. यास अपवाद म्हणून जें एक कलम दिलें आहे त्यांत सरकारावर कडक टीका करण्याची मोकळीक दिली आहे; पण तीही इतकी मर्यादित आहे कीं, अशा प्रकारची टीका करतांना लेखकानें किंवा वक्त्यानें सरकाराबद्दल लोकांच्या मनांत "द्वेषबुद्धि अगर तिरस्कार" उत्पन्न न होईल याबद्दल खबरदारी घेतली पाहिजे, असें त्यांत लिहिलें आहे. सारांश १८९८ सालीं जेव्हां हा कायदा पास झाला तेव्हांच या देशांतील लेखकांच्या व वक्त्यांच्या गळ्याभोंवती सरकारानें दोरी गुंडाळून ठेवलेली आहे. कारण असें पहा कीं, जेव्हां एकाद्या अधिकाऱ्याच्या किंवा सरकारच्या विरुद्ध टीका करावयाची, अथवा सरकारानें अमुक गोष्ट केली ती न्याय्य नाहीं, लोकांनीं ती गोष्ट सरकाराकडून फिरवून घेतली पाहिजे अशी बुद्धि लोकांमध्यें जागृत करावयाची, तेव्हां ती गोष्ट सरकारच्याबद्दलची पूज्यबुद्धि थोडी बहुत तरी कमी केल्याखेरीज कशी करतां येणार! सरकारच्या राज्यपद्धतीचें धोरण आमच्या देशास घातूक आहे, ही राज्यपद्धत प्रत्यहीं आह्मांस सामर्थ्यहीन व द्रव्यहीन करीत आहे, असें लोकांच्या मनांत भरवून त्याचा प्रतिकार करण्यास त्यांस जर उद्युक्त करावयाचें असलें तर लोकांच्या मनांत सरकाबद्दल असलेला पूज्यभाव थोडाबहुत तरी कमी झालाच पाहिजे. आणि पूज्यभाव जितका कमी तितका तिरस्कार ज्यास्ती अशा कोटिक्रमानें सर्व कांहीं राजद्रोही ठरणार! बरें यापासून राज्याचें हित होतें ह्मणावें तर तेंही नाहीं. राज्याचा सुरक्षितपणा आणि सरकारबद्दलचा पूज्यभाव या दोन गोष्टी अगदीं स्वतंत्र आहेत. एवढा मोठा रामराजा कीं, ज्यानें रावणादिकांचासुद्धां नाश केला त्याच्या राज्यांत देखील त्याच्याबद्दल पूज्यभाव नसणारा एक परीट निघाला होता! पण त्या महाथोर रामराजानें या परिटास राजद्रोहाबद्दल तुरुंगांत टाकलें नव्हतें अगर दंड केला नव्हता, इतकेंच नव्हे तर,

**स्नेहं दयांच सौख्यंच अपिवा जानकीमपि।**
**आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा॥**

असे ह्मणून सीतेचाही त्याग केला! हे दिवस आतां गेले हें आह्मी जाणून आहों; व श्रीरामचंद्राची ही कसोटी इंग्रजसरकारास आह्मी लावूं इच्छित नाहीं व ती लागणारही नाहीं. परटाचें समाधान करण्याकरितां कोणीही राजा या युगांत धर्मपत्नीचा त्याग करील असें घडून येणें शक्य नाहीं. परंतु परटाच्या ह्मणण्याकडे दुर्लक्ष करणें

किंवा त्याला बोलावून त्याची समजूत काढणें शक्य नाहीं काय ? सरकारास कदाचित् असें वाटत असेल कीं, नव्या दुरुस्त केलेल्या पिनलकोडाच्या १२४ अ कलमाचा अर्थ आह्मी कोर्टमार्फत व ज्यूरीमार्फत खरा करून घेतला. परंतु आमच्या मतें ही चूक आहे. सरकारच्या टंकसाळींतूनच निघालेला रुपया अशा रीतीनें वाजवून खरा करून घेण्याचें सरकारास कांहीं कारण नव्हते. राजद्रोहाची व्याख्याच आतां इतकी संकुचित झालेली आहे कीं, कर्झन साहेब राहूं द्या, पण पोलिस शिपायास जरी अवरंगझेबाची उपमा दिली तरी तो राजद्रोह होऊं शकेल; मग 'नरकांतील दरबारा'ची गोष्ट तर राहूंद्याच. राजद्रोह हा आतां बेअदबीचा गुन्हा झाला आहे; आणि जोंपर्यंत युरोपियनाप्रमाणे नेटिवांस आपल्या जातीची ज्यूरी मागण्याचा कायद्यानें अधिकार दिलेला नाहीं तोंपर्यंत खटला करण्याचा मात्र अवकाश कीं, सरकाराविरुद्ध लिहिणाऱ्या कोणाही लेखकास किंवा वक्त्यास शिक्षा ही ठेवलेलीच समजावी ! कारण सरकाराबद्दल तिरस्कार उत्पन्न झाला कीं राजद्रोह होतो, असा कायदाच झालेला आहे; आणि तिरस्कारबुद्धि या सदरांत अपमान, थट्टा, अनादर, किळस, या सर्वांचा समावेश सहज करतां येण्यासारखा आहे. सन १८९७ सालीं स्ट्राची साहेबांना शब्दांची ओढाताण करावी लागली; पण ९८ सालच्या पिनलकोडांतील दुरुस्तीनें आतां तशा प्रकारचा वाक्छल किंवा वाक्पांडित्य कोणत्याही जज्जांस करण्याची जरूर नाहीं. त्याने फक्त ज्यूरीस एवढेच सांगावयाचें कीं, " या लेखानें सरकाराबद्दल लोकांच्या मनांत तिटकारा उत्पन्न होईल की नाहीं; होईल असें वाटत असल्यास आरोपी राजद्रोही आहे, नाहीं तर नाहीं. " 'भाल्या'वरील खटल्यांत सरकारतर्फे अॅडव्होकेट-जनरलास, किंवा ज्यूरीस खटला समजावून देतांना न्यायाधीशास फारसें वाग्डंबर माजवावें लागलें नाहीं याचे खरें कारण हेंच होय. राजद्रोहाची हल्लीची व्याख्याच इतकी मर्यादित झालेली आहे कीं, अमुक एक प्रकारचा लेख राजद्रोही असें ठरविण्यास फार बडबड करावयास नको. सरकारची अदबी अगर अब्रू कमी करण्यासारखा लेख असला ह्मणजे त्यापासून सरकारच्याबद्दल लोकांच्या मनांत तिटकारा येणारच; आणि तिटकारा असला कीं राजद्रोह हा झालाच, असा हल्लीचा कायदा व कोटिक्रम आहे. हा कायदा ज्या वेळीं पास झाला त्या वेळीं याच्या घातुक व्यापकपणाबद्दल हिंदुस्थानांत चोहोंकडे ओरड होऊन सरकारास अर्ज गेले होते. पण सरकारानें त्या वेळीं असें उत्तर दिलें कीं, ' आह्मी राजद्रोहाची जी ही व्याख्या अधिक कडक केली आहे त्यापासून लोकांनीं भीति बाळगण्याचे कारण नाहीं. आमच्या हातांत अधिकार रहावा एवढ्याकरितां मुद्दाम बेअब्रूस देखील राजद्रोहाच्या सदरांत घातलें आहे. पण लोकांचा विनाकारण छळ होऊं नये ह्मणून आह्मी अशी तजवीज योजिली आहे कीं, राजद्रोहाचा खटला करण्याचें काम केवळ पोलिसाच्या मर्जीवर न ठेवतां त्यास सरकारच्या मंजुरीची अट ठेविली आहे. महत्वाच्या बाबीखेरीज सरकार मंजुरी

देणार नाहीं. राजद्रोहाची बाब किरकोळ असेल तर आरोपीस प्रथमतः इषारा दिला जाईल ( क्रिमि. प्रो. को. क. १०८ ), व तो इषारा उपयोगी न पडेल तर खटला करण्यास मंजुरी मिळेल, एरव्हीं मिळणार नाहीं.' या आश्वासनाचा खरा अर्थ असा आहे कीं, 'बाबानो, तुमच्या गळ्याभोंवती जरीं दोऱ्या गुंडाळलेल्या आहेत तरी आजच तुह्मांला फांशी देतों असें समजूं नका. ही दोरी आवळण्याचें काम पोलिसाकडे न ठेवतां आह्मी आपल्या हातांत ठेवलें आहे; व किरकोळ बाबतींत आह्मीं निदान इषारत दिल्याखेरीज तरी दोरी आवळणार नाहीं.' हें आश्वासन हल्लींच्या प्रसंगीं सरकारानें पाळलें की नाहीं याचा विचार करण्याचें काम आह्मीं वाचकांवरच सोंपवितों. ज्यूरीनें 'भाला'पत्रकारांस सर्वानुमतें दोषी ठरविलें खरें; किंबहुना हल्लींच्या कायद्याच्या निर्दय व्याख्येप्रमाणें 'भाला'पत्रकार राजद्रोहाच्या व्याख्येच्या चिमट्यांत सांपडतो, असें याच काय, पण दुसऱ्या कोणत्याही ज्यूरीनें ह्मटलें असतें. हा ज्यूरीचा दोष नव्हे, ज्यूरीपुढें मांडलेल्या कायद्याचा आहे. पण या खटल्यांत ज्यूरी एवढेंच मत देऊन राहिली नाहीं; तर आरोपी कायद्याप्रमाणें गुन्हेगार असला तरी तो दयेस पात्र आहे. अशी त्यांनी सर्वानुमतें जज्जांस शिफारस केली. आतां सरकारास आमचा एवढाच प्रश्न आहे की, ज्यूरीनें जज्जांस जी ही शिफारस केली त्याप्रमाणें सरकारास शिफारस करणारे अंमलदार कोणी निघाले होते काय ? भाल्यावर खटला करावा अशी शिफारस कोणी केली ? सरकारानें लीगल रिमेंब्रन्सर किंवा ॲडव्होकेट—जनरल यांजकडे हे प्रकरण पाठविलें होतें किंवा नाहीं; आणि असल्यास भालापत्रकार नवीन निर्दय कायद्याप्रमाणें गुन्हेगार असला तरी हा खटला कोर्टांत आणण्यासारखा नाहीं, अशी त्यांनी सरकारास सल्ला दिला कीं नाही ? भालापत्रकार तुरुंगांत गेल्यानें राज्यावरील कांहीं मोठे अरिष्ट टळलें असें नाहीं; व तो तुरुंगांत न गेला असतां तर पुढें मागे एखादें अरिष्ट उद्भवलें असतें असेंही नाही. इंग्रजी राज्यपद्धतीबद्दल लोकांच्या मनांत जो वाईट ग्रह झालेला आहे तो कांहीं भालापत्रकाराच्या लेखानें उत्पन्न झालेला नाही अगर त्यास शिक्षा झाल्यानें मोडतो असेंही नाहीं. जोंपर्यंत हिंदुस्थानांतून प्रतिवर्षी चाळीस कोट रुपये आर्थिक मोबदल्या-खेरीज बाहेर जात आहेत, जोंपर्यंत दुष्काळाचा प्रतिकार रिलीफ कामांखेरीज अन्य रीतीनें करण्याचें सरकारच्या मनांत येत नाहीं, व जोंपर्यंत हिंदुस्थानांतील लोकांस उत्साह, धैर्य, संपत्ती वगैरे बाबतींत लंगडे पांगळेच ठेवण्याचें सरकारचें धोरण आहे, तोंपर्यंत या राज्यव्यवस्थेबद्दलचें लोकांचें मत कधींही चांगलें व्हावयाचें नाहीं अगर ते अथवा त्यांचे पुढारी संतुष्ट राहणार नाहींत. हा असंतोष लोकांच्या मनांत जागृत आहे, जळत आहे; आणि त्याच्या ज्वाला प्रकृतीमाना-प्रमाणें कोठें सौम्य, कोठें तापट, तर कोठें बीभत्स रीतीनें बाहेर पडत आहेत. हल्लींच्या राजद्रोहाच्या व्याख्येप्रमाणें पाहिलें तर हा सर्वच राजद्रोह होय. परंतु अंतः-करणेंच जेथें जळत आहेत तेथें या असंतोषाग्नीच्या ज्वाला बाहेर पडण्याचें एकाद-

दुसरें किंबहुना सर्व द्वारें बंद केल्यानें कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. भालापत्रांतील लेखांत जर कांहीं दोष असला तर तो हाच कीं, त्यांत बीभत्सरस (नरकाचे वर्णन आदिकरून) अधिक ओतला गेला होता. परंतु त्याबद्दल भालापत्रकारास शिक्षा केल्यानें सध्यांच्या इंग्रजी राज्यपद्धतीबद्दल लोकांच्या मनांत जो वाईट ग्रह आहे तो नाहींसा होईल असें मानणे चुकीचें होय. हा वाईट ग्रह जोंपर्यंत हल्लींची सदोष राज्यपद्धति कायम आहे तोंपर्यंत कधींही नाहींसा व्हावयाचा नाहीं. कांहीं लोक चांगल्या शब्दांनीं तर कांहीं लोक तो ग्राम्य शब्दांनीं व्यक्त करतील; व ग्राम्य शब्दांनी व्यक्त करणें एवढाच गुन्हा असल्यास तितक्या पुरता कदाचित् तो बंद होईल. परंतु रोगाचे मूळ यानें नाहींसें व्हावयाचें नाही, हें सरकारानें पक्कें लक्षांत ठेवलें पाहिजे. वर सांगितलेंच आहे कीं, एका गळवास मलमपट्टी लावल्याने दूषित रक्त शुद्ध होत नाहीं. हिंदुस्थानांतील प्रजेची स्थिति हल्लीं याच मासल्याची झालेली आहे; व या प्रजेचे जे पुढारी आहेत त्यांनीं ही स्थिति सरकारच्या व लोकांच्या लक्षांत आणून देणें व ती सुधारण्याचे उपाय सुचविणें व करणें, हे त्यांचें कर्तव्य होय. हें कर्तव्य करीत असतां एकादा मनुष्य जहाल गेला, किंवा दुसरा एकादा बीभत्स बोलूं लागला, अगर कांहीं गोष्टी अलंकारिक भाषेनें सांगूं लागला तर त्यास साध्या कैदेंत कां होईना, पण सहा महिने तुरुंगांत धाडणें न्यायी व सुधारलेले म्हणविणाऱ्या राज्यकर्त्यांस कधींही भूषणास्पद नाही अशी आमची समजूत आहे. सरकारची अदबी राखून बोलावें हें खरे आहे. पण हजारों वेळां ती तीच गोष्ट सांगितली तरी तिचा जेथें प्रतिकार होत नाहीं तेथे भीक मागणारांचेंही डोकें फिरून जातें ही गोष्ट विसरतां कामा नये.याकरितां सरकारास आमची विनंति आहे कीं,उगीच अतिप्रसंग करून विनाकारण एकाद्यास सतावूं नका. हिंदुस्थानांतील प्रजा सध्यां ज्या दुःखांनी गांजलेली आहे तीं दुःखें वास्तविक आहेत आणि प्रत्यक्ष आहेत. भाल्यासारख्या एखाद्या पत्रकारास शिक्षा दिल्यानें तीं कधी कमी व्हावयाचीं नाहींत अगर त्यांचा बंदोबस्तही व्हावयाचा नाहीं. प्रजा जर संतुष्ट किंवा अक्षुब्ध रहावयास पाहिजे असली तर या दुःखांचा आधी विचार केला पाहिजे. राजद्रोहाचा कायदा अधिकाधिक कडक केल्यानें निर्वाह लागणार नाही. बीभत्सरसांत आमच्या दुःखांचें रडगाणें गावयाचें नसल्यास तें आह्मी हास्य, करुण, अद्भुत, अथवा भयानक रसांत गाऊं. परंतु जोंपर्यंत दुःख कायम आहे तोंपर्यंत सरकारी राज्यपद्धतीविरुद्ध तक्रार करण्याचें काम व ती बदलून घेण्याचा उद्योग कधींही थंड पडणार नाहीं, व थंड पडून उपयोगीही नाहीं. भाल्यासारख्या पत्रकारास कैदेंत पाठविल्यानें हा उद्योग अधिक वाढेल; व दुःख व्यक्त करण्याचे मार्ग कमी न होतां अधिक होतील. मागें आह्मीं लिहिलेंच आहे कीं, राजद्रोहाचा कायदा बदलल्यानें बाटलीवर कसरत करण्याचा प्रसंग वर्तमानपत्रकारांवर येऊन ठेपला आहे. हेंही सरकार बंद करील तर दोरीवर कसरत करूं; पडूं, पण उद्योग सोडणार नाहीं. कारण, सरकारच्या परवानगीवर हा उद्योग अवलंबून

नाहीं. देशाच्या दुःखाचें मूळ काय ही गोष्ट शास्त्रोक्त विचारानें सिद्ध झालेली आहे, व त्या दुःखाचें मूळ अमुक एक आहे, अशी जोंपर्यंत मनाची पूर्ण समजूत आहे, तोंपर्यंत तें दुःख कमी करण्याबद्दल झटणें किंवा दुःखाचें स्वरूप आणि कारण लोकांपुढें मांडून तें कमी करण्याबद्दल झटावयास त्यांस सांगणें, हें देशाकरितां आमचें कर्तव्य होय. यांतच राजा व प्रजा या दोघांचेही कल्याण आहे; व प्रजाजनांपैकीं अशा तऱ्हेचा उद्योग कोणी करीत असतां गफलतीनें, गैरसावधपणानें, गैरसमजानें, राजद्रोहाच्या कायद्याची कैची अलीकडे किती आवळली आहे इकडे लक्ष न गेल्यामुळें त्याचें पाऊल निर्दयपणानें संकुचित केलेल्या मर्यादेच्या जरा बाहेर पडलें तर गरुडपक्ष्याप्रमाणें त्याजवर झडप घालून त्यास एकदम तुरुंगांत नेऊन ठेवणें हें खऱ्या मुत्सद्दीपणाचें लक्षण नव्हे व हा राजमार्गही नव्हे, असें ह्मणण्यास आह्मांस बिलकुल दिक्कत वाटत नाहीं."

इंग्रजींत टीका करण्याची यांची हातोटी कशी आहे हें 'मराठा' पत्रांतील पुढील उताऱ्यावरून कळून येईलः—

### HUMOUR—A CRIME IN A NATIVE.

We are not very much surprised at the incapacity of the Bombay *Times* to understand the writings in the native press, as evidenced by the comments on the humorous skit on Lord Curzon which appeared in the vernacular columns of the *Gujarati* a fortnight ago. To construe such a writing seriously or to scant the arguments in it logically betrays an utter want of appreciation of the humorous element in the same. We do not think that the writer in the *Times* would have ventured to construe in the same way a similar paragraph in a London paper. But the *Times* perhaps thinks that the natives of this country have no right to criticise the acts of the bureaucracy or its head in a spirit of sarcastic humour, and that it is nothing less than sedition to speak of Viceroys and Governors except in a tone of reverential submission or with a proper recognition of the exalted position of the subject of the article and the correspondingly degraded position of the writer. The *Times* has naively asked the question how far writing of this sort is consistent with the law of the land, and whether it would not be an attempt to create enemical feeling against Government. But we assure the *Times* that unless the Penal Code is amended again there is no chance of such writings coming under the clutches of law, whatever the conceited bureaucracy or its admirers may think of them. A humorous and sarcastic article does and will contain statements which may not be strictly or logically true, much in the same way as the detailed features of a comic picture in the *Punch* are not expected to accurately represent the personal appearance of the object so portrayed. But our enraged contemporary is strongly under the impression that it is highly profane for a native to

speak of Lord Curzon, the ideal Viceroy of the *Times*, with such levity or humour " Are not the Gujaratis, " asks the *Times*, " endowed with sober and eminently likeable qualities" and its sense of propriety is shocked at the idea of a Gujarati paper indulging in the occupation of throwing ridicule upon what the *Times* considers to be the most benevolent of the Indian Viceroys. Self-conceit, stupidity and wanton or deplorable disregard of the ordinary laws of literary criticism could hardly go further than what we find in the *Times*' attack on the *Gujarati*. It only betrays uncompromising intolerence of criticism and a perverse desire to distort facts and statements with the malevolent object of bringing into scrape people, who, in criticising the bureaucracy, use the same weapons as are used by journalists all over the world. But India, the *Times* would say, is an exception to the rule; and if the legislation of the country were left to itself, it would certainly enact that it is a crime in a native to speak even humorously of the *de facto* Governors in the land, and perhaps also of the writers or journalists who may be pleased to take cudgels, be it through sheer sense of duty or otherwise, in their behalf. The incident only shows how the malevolent activity of the leading Anglo-Indian journal is ever ready to detect anything that can be construed into an attack against Government even though it be by far-fetched or morbid imagination. The *Times* with its usual tactics has not failed, even in this writing, to appeal to the sobriety or moderation of native or Congress leaders in the hope of creating a breach in the adversary's camp. But tactics like these are now too patent to deceive anybody; and we have no doubt that all Indian leaders would condemn the folly or the malice of the *Times* in failing to read aright the writings in the Vernacular press. The *Gujrati*, we think, deserves to be congratulated not so much on humorously exposing Lord Curzon as on bringing to light the extravagent conceit and intolerence of the self-styled leading paper of Asia." 3—12—1905.

यांची ग्रंथांवरील टीका मेकॉलेच्या पद्धतीची असून ग्रंथांतील गुणदोष तर हे दाखवीत असतच; पण त्याबरोबर आपणास सांगावयाची माहिती व त्यावरून निघणारे सिद्धांत यांचाही त्यांत खुबीनें ते समावेश करीत. याचीं उदाहरणें पाहावयाचीं असल्यास रा. ब. चिंतामणराव वैद्य यांनीं इंग्रजींत प्रसिद्ध केलेलें 'महाभारत' व 'रामायण' हे ग्रंथ, वे. शा. सं. पारखीशास्त्री यांचा 'बाणभट्टावरील निबंध', रा. रा. दाभोळकर यांनीं प्रसिद्ध केलेल्या 'ज्ञेयाज्ञेयमीमांसा,' या ग्रंथांवरील त्यांची केसरींत आलेली टीका वाचकांनीं अवश्य वाचावी.

## दृष्टांतादि अलंकार.

यांचे दृष्टांतादि अलंकार प्रसादयुक्त असतात. ह्मणजे ते ओढून ताणून

न आणतां सहजासहजीं येतात, व विषयास अगदीं बरोबर लागू पडतात. तसाच यांचा विनोद व कोटिक्रमही सुसंस्कृत असतो; व वेळींअवेळीं त्याची रेलचेल करून चव न घालवितां प्रसंगविशेषींच त्याची योजना ते करीत असल्यामुळें त्यानें त्यांच्या लेखास खुमारी येते.* याचीं कांहीं उदाहरणें वाचकांस पाहावयास मिळावीं ह्मणून तीं येथें देतों.

मि. मलबारी यांनीं १९०३ सालांत 'ईस्ट अँड वेस्ट' या मासिक पुस्तकांत 'रानडे आणि त्या वेळची स्थिति' या विषयावर इंग्रजींत लेख लिहितांना 'आपणास लोक काँग्रेसचे शत्रु समजतात,' ही चूक आहे असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. यासंबंधानें लिहितांना टिळक यांनीं पुढील वाक्यांत एक मजेदार उपमा देऊन कोटिक्रम केला आहे:—

"काँग्रेस ही संस्था आपल्याच घरांतून पहिल्यानें बाहेर पडली, आपल्याच घरांत काँग्रेसचें पहिले प्रसिद्धीपत्रक व ठराव एका मोठ्या इंग्रजी मुत्सद्यानें लिहिलें, असें मलबारी शेटजींनी मोठ्या गौरवानें प्रसिद्ध केलें आहे. परंतु दैवयोग असा विचित्र आहे कीं, शकुंतला कण्वाश्रमांतून बाहेर पडल्यानंतर जशी ती पुन्हां कण्वाश्रमास परत गेली नाहीं, तशी मलबारी शेटजीच्या कन्येची स्थिति होऊन शेटजी काँग्रेसला कधी गेले नाहीत व काँग्रेस सभेनेंही शेटजींच्या पुन्हां घरीं जाऊन त्यांचा सल्ला घ्यावा तो घेतला नाहीं!"

पोलिस—कमिशनच्या रिपोर्टासंबंधानें लिहितांना पोलिसखात्याची स्थिति कशी आहे, हें पुढील अवतरणांत दाखविलें आहे:—

"ज्या खात्याचा पाया सात किंवा आठ रुपयांच्या अडाणी, अशिक्षित व लोभी शिपायावर रचलेला, ज्याच्या इमारतीतील मधला भाग या शिपायाच्या दर्जापासून वाढलेल्या व त्याचे दुर्गुण अंगी मुरलेल्या चीफ कान्स्टेबल किंवा इन्स्पेक्टरांनीं भरलेला; आणि ज्याचा कळस मोठ्या युरोपियन अमलदारांच्या उनाड व टोणप्या पोरांकरितां राखून ठेवलेला, तें खातें आदि, मध्य, व अंत मिळून सर्व ठिकाणी एकसारखें कुजलेलें असणे अगदीं स्वाभाविक आहे."

'मराठी भाषेची लेखनपद्धति' या निबंधांत ऱ्हस्व, दीर्घ, सानुनासिक किंवा निरनुनासिक शब्दांसंबंधानें घोंटाळा काढण्याचा जो प्रयत्न चालला

* विनोदासंबंधानें अतिप्रसंग न करतां त्याचा कसा उपयोग करावा याचा कलकत्त्याच्या 'न्यू इंडिया' नामक पत्रानें एका लेखांत एकाच वाक्यांत येणेंप्रमाणें उल्लेख केला आहे:—

"Humour is like seuse to the intellect, and to convert it into its staple food, is to pervert the use of humour on the one hand and to strave the intellect on'the other." 11—5—04.

822

होता तो सयुक्तिक नाहीं, हें दर्शवितांना त्यांनीं पुढील कोटिक्रम केला आहे:—

“ मराठी भाषा अद्याप बाल्यावस्थेंत आहे; व एव्हांच जर तिच्या स्वरूपाचें निरीक्षण करून त्याच्या वाढीची दिशा मर्यादित केली तर चिनी स्त्रियांच्या पायां-प्रमाणें तिच्या सौंदर्याची स्थिति होऊन तें कांहीं थोड्या सोंवळ्या किंवा आग्रही लोकांखेरीज कोणासही पसंत पडणार नाहीं. ... भाषेंतील घोंटाळा काढूं नये, असें आमचें ह्मणणें नाहीं. उलट, भाषेंतील घोंटाळे काढणे हेंच वैय्याकरणांचें कर्तव्य आहे, असें आह्मीं समजतों. स्त्रियांस केशसंस्कार किंवा केंस विंचरून वेणीफणी करणें हें जितकें इष्ट व अवश्य आहे तितकेंच भाषेंतील शब्दांस सुसंस्कृत करणें अवश्य होय. तथापि, केशसंस्कारांत केंस कापण्याचा किंवा वपनाचा जसा अंतर्भाव होत नाहीं, त्याप्रमाणेंच शब्दांची वाढ कुंठित करणें किंवा कापणें या गोष्टी व्याकरण संस्कारांत येत नाहींत.”

सन १९०१ सालीं जमिन–महसुलाचा कायदा पास करते वेळीं ना. मेथा आदिकरून कांहीं मंडळी मुंबई सरकारच्या कायदेकौन्सिलातून उठून आली; त्या वेळीं लोकमतास न जुमानतां सरकारानें जी अरेरावी केली तीस उद्देशून त्यांनीं असा टोमणा दिला आहे:—

“ लोकांचे प्रतिनिधी कायदेकौन्सिलांत घेऊन अशाच तऱ्हेनें जर त्यांचा बोज ठेवावयाचा असेल तर यापेक्षां पांच सहा संगमरवरी दगडाचे पुतळे करून त्यांचीच कायदेकौन्सिलांत निरनिराळ्या ठिकाणीं स्थापना करावी; आणि निरनिराळ्या भागां-च्या निवडणुकी झाल्या, ह्मणजे एका पुतळ्यास ना. मेथांची टोपी तर दुसऱ्यास प्रो. गोखल्यांचें पागोटें घालून चटावरील श्राद्धाप्रमाणे कायदेकौन्सिलांतील फार्स उरकून घेण्याचा एकादा नवा कायदा पास करून घ्यावा.”

‘ सरकारी नोकरांनीं काम करावयाचें तें पगारासाठीं न करतां कर्तव्य ह्मणून करावें, ’ असा उपदेश लॉर्ड कर्झन यांनीं १९०२ सालीं कलकत्ता येथील पदवीदानसमारंभाचे वेळीं आमच्या लोकांस केला होता, त्यास उद्देशून ते ह्मणतात:—

“ फलाची आशा न धरतां कर्तव्यबुद्धि ठेऊन कामें करावीं व तीं परमेश्वरास अर्पण करावीं, असा उपदेश वेदांतामध्यें केलेला असतो; परंतु त्यापासून मोक्ष मिळत असतो. तसा तो सरकारी नोकरीपासून मिळत असल्यास वरील उपदेश सर्वांशीं ग्राह्य आहे यांत शंका नाहीं! परंतु हा वेदांतोपदेश पावड्यांनीं पगार ओढणाऱ्या बड्या इंग्रजी अधिकाऱ्यांनीं शंभर दोनशें रुपड्यांच्या आंतील पगारांच्या

नेटिव नोकरांस करणें, ह्मणजे दुसऱ्याच्या घरचे चमचमीत जेवण जेऊन घरच्या यजमानास मिताहाराचा उपदेश करण्यासारखें हास्यास्पद नव्हे काय?"

युनिव्हर्सिटी–बिलास डॉ. भांडारकर यांनीं अनुकूल मत दिल्यावर त्यांच्याविरुद्ध लिहितांना टिळक यांनीं पुढील कोटिक्रम योजिले आहेत:—

"गंडकींत ज्याप्रमाणें शालिग्रामच निपजावयाचे तद्वत् सरकारी नोकरीची स्थिति आहे. तिच्या प्रवाहांत जे एकदां सांपडले त्यांचे कानेकोपरे झिजून जाऊन कांहीं वर्षांनीं ते शालिग्रामाप्रमाणें आपणांस लोकांनीं पूज्य मानावें, असें समजूं लागतात. ... आपल्या भाषणाच्या आरंभीं 'पुढें काय बोलणार हें कळण्यापूर्वींच लोकांनीं मजविरुद्ध टीका करण्यास आरंभ केला,' ह्मणून डॉक्टर साहेबांनीं आश्चर्य प्रदर्शित केलें आहे, आणि लोकांस दोषही दिला आहे. पण आह्मांस त्यांत कांहीं आश्चर्य वाटत नाहीं. सगळा जन्म शाळाखात्यांत घालविलेले डॉक्टर साहेब कितीही विद्वान् असले तरी लॉर्ड कर्झन साहेबांच्या राजकीय धोरणासंबंधाने बोलतांना हे चकतील अशी पूर्वींच पुष्कळांनीं अटकळ केली होती. ही अटकळ बांधण्यास डॉक्टर साहेबांचें भाषण होण्याची वाट पाहणें जरूरच होतें असें नाहीं. हरिदासाचे दिवाण झालेले माणकेश्वर जेव्हां पालखींत बसून खडकीच्या समरांगणावर लढाई मारण्यास निघाले, तेव्हांच पुण्यांतील कांहीं शाहाण्या लोकांस लढाईचा परिणाम कळून चुकला होता; आणि त्यांस जर कोणी असें विचारलें असतें कीं, 'कायरे, तुह्मी लढाई होण्यापूर्वींच तिच्या परिणामाविषयीं अटकळ कां करितां?' तर त्यांनीं जो जबाब दिला असता तोच आज आह्मी डाक्टर साहेबांस देऊं शकतों. ... ज्यांनीं जन्मभर शाळेंत शिकविण्यापलीकडे कांहीं केले नाही; आणि परकीय राजे आपल्यावर कोणत्या रीतीनें अंमल करतात, अथवा त्यांच्या राजनीतीचें धोरण कसें असतें, अगर तें अहितकारक असून हितकारक आहे असें लोकांस दाखविण्याचा कसा प्रयत्न चालला असतो, इत्यादि गोष्टींचा ज्यांनीं विचार केला नाहीं त्यांनीं जन्मभर आपण युनिव्हर्सिटींत होतों ह्मणून युनिव्हर्सिटी–बिलावर मत देण्याच्या आपल्या पात्रतेची टिमकी वाजविणें, ह्मणजे नेहमीं मी पाण्यांत राहतों ह्मणून बेडकानें सृष्टींत होणाऱ्या पावसाच्या घडामोडीवर अभिप्राय देण्यासारखेंच होय! ... शिक्षणाचें काम लोकांच्या हातीं असेल तितकें चांगलें; किंबहुना लोकांनींच तें हातांत घेतलें पाहिजे, अशा तऱ्हेचा अभिप्राय हंटर साहेबांच्या एज्युकेशन कमिशननें दिला होता; व आह्मांस असें आठवते की, तो आपल्यास मान्य असल्याबद्दल डॉक्टर साहेबांनीं त्या वेळीं एक दोन ठिकाणीं उद्गारही काढले होते. पण आज सरकारचा मोर्चा फिरल्याबरोबर डॉक्टर साहेबांचाही मोर्चा फिरला आहे. त्यांतूनही विशेष दुःखाची गोष्ट हीच कीं, सरकारानें या वेळीं डॉक्टर साहेबां-

सारख्या शास्त्रयाचा फायदा घेऊन मुत्सद्यांचा पराभव करण्याकरितां शस्त्राऐवजीं त्यांचा उपयोग केला आहे.'

युरोपियन नोकरांपेक्षां हिंदु नोकरांच्या संख्येचेंच प्रमाण शेंकडां अधिक वाढलें आहे, यावरून वाढलेल्या नोकऱ्यांचे मालक हिंदु लोकच आहेत, असा सरकारानें नोकऱ्यासंबंधानें एक ठराव काढून कोटिक्रम केला होता. त्यावर टिळक यांनीं उलट कोटिक्रम करून सरकारचीं बोटें सरकारच्याच डोळ्यांत येणेंप्रमाणें घातलीं आहेत:—

" शेंकडां अमुक जागा सरकार नेटिवांस देतें या म्हणण्यांत कांही अर्थ नाहीं. घरांत यजमानापेक्षां नोकरच जास्त असतात; पण तेवढ्यावरून ह्मणजे घरांतल्या एकंदर माणसांच्या मानानें पाहिलें तर शेंकडां नोकरांचेच प्रमाण जास्त आहे अशी कोटी करून हें सर्व घर नोकरांचेच आहे; यजमान काय दररोज पावशेर भात खाऊन राहतो, असे जर कोणी प्रतिपादन करूं लागला तर त्याचा कोटिक्रम जितका हास्यास्पद होईल तितकाच हिंदुस्थान सरकारच्या ठरावांतील कोटिक्रम हास्यास्पद, भ्रामक, आणि चुकीचा झालेला आहे. "

## शब्दांच्या खुबीदार व्याख्या.

डॉ. जॉन्सनप्रमाणेंच* यांनीं कांहीं शब्दांच्या खुबीदार व्याख्या कोठें कोठें केलेल्या आहेत. त्यांचींही दोन तीन उदाहरणें येथें देतों.

दिल्ली-दरबारचे वेळीं एतद्देशीय राजेरजवाड्यांच्या स्थितीचें चित्र रेखाटतांना 'मोठया संस्थानिका'ची व्याख्या येणेंप्रमाणें केली आहे:—

"आज मोठा संस्थानिक ह्मटला ह्मणजे इंग्रज सरकारास संस्थानें खालसा करावयाचीं नाहींत ह्मणून त्यांच्या खुषीनें, परवानगीनें, व सल्ल्यानें कांहीं विवक्षित मुलखावर राजकीय सत्तेचे कांही अधिकार चालविणारा, आणि इंग्रज सरकारानें नेमलेल्या शिक्ष-

---

* 'निबंधमाला'कारांनी डॉक्टर जॉन्सनचें चरित्र लिहितांना त्याच्या डिक्सनरींतील Pension (पेन्शन) व Pensioner (पेन्शनर) या दोन शब्दांच्या व्याख्या येणेंप्रमाणें दिल्या आहेत:—

*Pension*:—Pay given to a state hireling for treason to his country, ह्मणजे फितूर राहून देश बुडविण्याकरितां सरकारच्या बंद्या गुलामास जो पगार देतात तो.

*Pensioner*:—A slave of state hired by a stipend to obey his master, ह्मणजे तोंडावर तुकडा टाकून सरकारानें वश करून घेतलेला बंदा नोकर.

—निबंधमाला, पान ७५३; टीप पाहा.

काचे हातीं तयार झालेला एक जुन्या राजकुलांतील औरस अगर दत्तक राजपुरुष होय, असें ह्मणण्यास हरकत नाहीं."

ता. १०।१२।१९०१ च्या केसरींत 'राष्ट्र' या शब्दाची व्याख्या त्यांनीं अशी केली आहे:—

"राष्ट्र ह्मणजे समुद्र आणि नद्या यांनी मर्यादित पृथ्वीचा भाग अशी जर कोणी व्याख्या करीत असेल तर ती चुकीची आहे. पृथ्वीच्या कांही मैल चौरस तुकड्यास राष्ट्र ह्मणावयाचे तर साहरा वाळवंटासही राष्ट्र ह्मटलें पाहिजे; किंवा उत्तरध्रुवाजवळील वर्फाच्छादित प्रदेशासही राष्ट्र ह्मणतां येईल. परंतु राष्ट्र शब्दाचा तसा अर्थ नाहीं, व त्याचप्रमाणें नुसता लोक-समुदाय ह्मणजेही राष्ट्र नव्हे हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे. ज्या लोकसमुदायांत एक प्रकारचा धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय आपलेपणा भरलेला नाहीं, ज्याचे घटकावयव सामान्य बंधनांनीं एकत्र बांधलेले नाहीत, अथवा ज्यांच्या अंगांत इतर समुदायाहून भिन्न अशा प्रकारचें वैशिष्ट्य वास करीत नाहीं ते लोक किंवा त्यांचा समुदाय कधींही राष्ट्र या संज्ञेस पात्र होत नाहीं."

युनिव्हर्सिटी–बिलावर टीका करतांना 'सरकार' या शब्दाची व्याख्या येणेंप्रमाणें केली आहे:—

"या इंग्रजी राज्यांत सरकार ह्मणजे राज्यसत्ता विशिष्ट एक प्राणी नाहीं; अर्थात् त्यास शरीर नाहीं आणि आत्माही नाहीं, असें पुष्कळांचे ह्मणणें आहे! अशा प्रकारच्या सरकारचा अमुक एक कृत्य करण्यांत काय हेतु आहे हें पाहणें असेल तर त्याचें अनुमान सदर सरकारच्या कृतीवरूनच केलें पाहिजे, अंतःकरणावरून करतां येत नाहीं; कारण, सरकारास अंतःकरणच नाहीं!"

## थोडक्यांत पण चटकदार लिहिण्याची तऱ्हा.

कोणताही विषय थोडक्यांत व चटकदार भाषेनें लिहिणें ही एक कला आहे; व ती टिळक यांच्या अंगीं पूर्णपणें बाणली असून दर अंकांत तिची थोडी तरी झांक दिसून आल्यावांचून राहत नाहीं. विषय जास्त होऊन पत्राची बहुतेक जागा आडली असावी आणि एकादा नवीन विषय उपस्थित होऊन त्याला स्थळ देणें इष्ट असावें, अशा वेळीं यांच्या या कलेची बारिकसारिक अंगेंही दिसून येतात. नमुन्याकरितां अशा लेखाचें एक उदाहरण येथें देतों.

सन १९०४ सालीं वकीलीच्या परीक्षेंत अगदींच थोडे उमेदवार पास झालेले पाहून त्यांनीं पुढील स्फुट लेख लिहिला आहे:—

" गरीब बिचाऱ्या वकीलीच्या परीक्षेच्या उमेदवारांची नोटीस न देतां कत्तल करण्यांत परीक्षकांस किंवा हायकोर्टास काय आनंद होत असेल कोण जाणे ! साडे-तीनशेंतील आठ पास ह्मणजे शेकडा मुमारें २॥ असें प्रमाण पडते. अर्थात् बाकी राहिलेले साडेसत्याण्णव अजागळ, मूर्ख किंवा खुशालचेंडू असें परीक्षकांचे मत आहे असें दिसतें. परंतु ह्याच प्रसंग जर परीक्षकांवर येऊन ठेपला तर शेंकडा २॥ च्या ऐवजी शेंकडा त्यांतले १। तरी शहाणे ठरतील कीं नाही याचा आह्मांस वानवा आहे. परीक्षा कठिण घ्या किंवा सोपी घ्या; कांहीं झालें तरी त्याची यत्ता आधीं नियमित ठरली पाहिजे. आज एक तऱ्हेचा प्रश्नाचा कागद निघतो तर पुढील सालीं त्याहून भलताच, अथवा आज कागद तपासण्याची एक पद्धत तर पुढील सालीं त्याहून सौम्य किंवा कडक. हा भेद सामान्य लोक शहाणपणाचा दर्शक न समजतां तऱ्हेवाईक-पणाचा व आचरटपणाचा समजतात. अशा तऱ्हेच्या परीक्षांत पास होणें ह्मणजे रूसो-जपानी युद्धांतील पोर्टआर्थरच्या हल्ल्यांतून जिवंत परत येण्यापेक्षाही अधिक कठिण आहे; आणि अशा तऱ्हेचा न्याय हायकोर्टाच्या देखरेखीखालीं होणाऱ्या परीक्षेंत मिळावा हें मोठेंच आश्चर्य होय. मॅकॉलेनें एका ग्रंथाबद्दल एके ठिकाणी असें लिहिलें आहे की, त्या ग्रंथाचे नांव ह्मणजे इतर ग्रंथाची प्रस्तावना; आणि त्या ग्रंथाची प्रस्तावना ह्मणजे इतर समग्र ग्रंथ होऊं शकेल. ह्याच न्याय यंदाच्या सालच्या परीक्षेच्या प्रश्नांस लावला असतां प्रत्येक विषयावरील एक लहानसें पुस्तकच होतें असें दिसून येईल. ह्या कागद वाचण्यासच आधीं अर्धा तास लागणार, मग उत्तर देण्यास किती वेळ लागेल हे सांगावयास नकोच ! उमेदवारांचा अशा रीतीनें छल करण्यापेक्षां वकीलीच्या परीक्षेस बसणें ही एक शिक्षाच ठरवून कोणी कांहीं गुन्हा केल्यास त्यास त्याबद्दल पीनलकोडांत ही शिक्षा सांगण्याचें नमूद केल्यास फार चांगलें होईल ! "

## भाषांतराची हातोटी.

इंग्रजीचें मराठींत भाषांतर करण्याचीही यांची हातोटी चांगली आहे. भाषांतर करतांना शब्दास शब्द न ठेवतां विवक्षित अर्थ जोरदार भाषेनें कसा व्यक्त करतां येईल याकडे त्यांचें मुख्य लक्ष असतें. अशा प्रकारच्या भाषांतराचा एक मासला, लॉर्ड कर्झन यांनीं १९०५ सालीं कलकत्ता युनिव्हर्सिटींतील विद्यार्थ्यांस सत्यानें व नीतीनें वागण्याचा उपदेश केला असतां ' खोटे कोण ? ' या अग्रलेखांत ' प्रॉब्लेम्स ऑफ धि फार ईस्ट ' या पुस्तकांतील त्यांचेच उद्गार देऊन त्यांचीं बोटें त्यांच्या डोळ्यांत घालतांना, जो सहजी आला आहे तो येथें देतों.

लॉर्ड कर्झन यांचे खालील उद्गार प्रथमतः ' अमृतबझार पत्रिका '-कारांनीं आपल्या पत्रांत देऊन त्यावर त्यांनीं अशी टीका केलेली आहे:—

FROM "PROBLEMS OF THE FAR EAST" BY GEORGE N. CURZON, PP. 155 AND 156.

"Before proceeding to the royal audience, I enjoyed an interview with the President of the Korean Foreign Office. . . . I remember some of his questions and answers. Having been particularly warned not to admit to him that I was only thirty-three years old, an age to which no respect attaches in Korea, when he put to me the straight question (invariably the first in an Oriental dialogue), 'How old are you?' I unhesitatingly responded 'Forty.' 'Dear me.' he said, 'You look very young for that. How do you account for it?' 'By the fact,' I replied, 'that I have been travelling for a month in the superb climate of His Majesty's dominions'. —Finally. 'He said to me 'I presume you are a near relative of Her Majesty the Queen of England.' 'No,' I replied, 'I am not. But, observing the look of disgust that passed over his countenance, I was fain to add, 'I am, however, as yet an unmarried man,' with which unscrupulous suggestion I completely regained the old gentleman's favour."

It must be added that this latter passage, containing the interview of Lord Curzon with the President of the Korean Foreign Office, has been discreetly omitted from the last edition of "Problems of the Far East."

टिळक यांनीं त्याचें भाषांतर येणेंप्रमाणें केलें आहे:—

"अगदीं क्षुल्लक कामाकरितां देखील बिनदिक्कत खोटें बोलण्याची लार्ड कर्झन यांस संवय लागलेली आहे असे त्यांनी आपल्या एशियाखंडांतील प्रवासासंबंधाचे जें बुक लिहिले आहे, त्यांतील एका गोष्टीवरून दिसून येतें. या प्रसंगाचा त्यांच्या ग्रंथांतील उतारा आमचे बंधु ' अमृतबझारपत्रिका 'कार यांनी आपल्या पत्रांत दिला आहे. हिंदुस्थानांत व्हाइसरॉय होण्यापूर्वी लॉर्ड कर्झन हे एशियाखंडांतून प्रवास करून गेले. या प्रवासांत कोरिया द्वीपकल्पाच्या राज्यांतील फॉरिन ऑफिसचे प्रेसिडेंट यांस भेटण्याकरितां लॉर्ड ( त्या वेळीं नुसते मिस्टर ) कर्झन यांची स्वारी गेली होती. भेटीस जाण्यापूर्वी मि. कर्झन यांस असें समजलें होतें कीं, कोरिया देशांत तरुण मनुष्यास फारसा मान देत नाहींत; तेव्हां भेटीच्या वेळीं कर्झनसाहेबांनीं कोरियाच्या प्रधानास जी उत्तरें दिलीं ती खालीं लिहिल्याप्रमाणें:—

**कोरियाचे प्रधानः**–तुमचें वय काय ?

**कर्झनः**–( बिनदिक्कत ) चाळीस.

**को. प्रधानः**–वयाच्या मानानें आपण फारच तरुण दिसतां, यांचें कारण काय असावें ?

**कर्झन**:-कारण मी आपल्या राज्याच्या सुंदर हवेच्या मुलखांत आज महिनाभर प्रवास करीत आहें.

लॉर्ड कर्झन यांचें वय यावेळी फक्त ३३ वर्षांचें होतें. असें असून केवळ कोरियाच्या प्रधानास खुष करण्याकरितां व त्यांचें आपल्याबद्दल चांगलें मत व्हावें ह्मणून आपलें वय ४० वर्षांचें आहे असें त्यांनी सांगितलें, आणि तेंही बिनदिक्कत (unhesitatingly) सांगितलें असें मोठ्या फुषारकीनें त्यांनी आपल्या ग्रंथांत लिहिलें आहे! बरें, हें जें चाळीस वर्षांच्या वयांत दिसणारें अपूर्व तारुण्य याचें कारण काय? असा जेव्हां कोरियाच्या प्रधानानें प्रश्न केला तेव्हां लॉर्ड कर्झन यांनी मोठ्या शिताफीनें कोरियाच्या राज्याच्या सुंदर हवेची स्तुति करून वेळ मारून नेली आहे. परंतु एवढ्यानेंच संपलें असे नाहीं. कोरियाच्या धानानें पुढें आणखी असें विचारलें कीं:—

**को० प्रधान**:—आपण इंग्लंडच्या राणीसाहेबांचे जवळचे आप्त आहां?

**कर्झन**:—नाहीं. (हें उत्तर कोरियाच्या प्रधानास आवडलें नाहीं असें पाहून) परंतु माझें लग्न अद्याप व्हावयाचें आहे.

लॉर्ड कर्झन साहेबांचे हे उत्तर त्यांसच लबाडीचें वाटले. (unscrupulous) असें त्यांनी आपल्या ग्रंथांतच ह्मटलें आहे. परंतु अशा लबाडीच्या उत्तरानें कोरियाच्या वृद्ध प्रधानाची मर्जी संपादन केली असे लिहिलें आहे. मि. कर्झन हे हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन झाल्यानंतर काढलेल्या नव्या आवृत्तींत हें संभाषण गाळलें आहे, ही छपवाछपवीही लक्षांत ठेवण्यासारखी आहे."

## यांच्या लेखांची भाषा.

"यांच्या लेखांत काय विशेष आहे?" याविषयीं आतांपर्यंत जें विवेचन केलें आहे त्यावरून यांच्या लेखांच्या भाषेसंबंधानें बऱ्याच गोष्टी वाचकांस कळून येतील. तथापि, त्यासंबंधानें आणखी कांहीं गोष्टी स्वतंत्र रीतीनें सांगणें इष्ट वाटतें ह्मणून त्या येथें देतों. या ठिकाणीं मुख्य गोष्ट ही लक्षांत ठेविली पाहिजे कीं, टिळक यांची भाषा ह्मणजे केसरीची भाषा असा अर्थ घेणें बरोबर नाहीं. कारण, कोणतेंही वर्तमानपत्र जरी एकाच्याच नांवानें निघतें व त्यांतील लेखांबद्दल एकच मनुष्य जरी जबाबदार असतो तरी नियतकालीं प्रसिद्ध होणें हा पत्राचा धर्म पडल्यामुळें एकाद्या ग्रंथाप्रमाणें त्यांतील सर्व लेख एकाच्याच हातून लिहिले जातात असें नाहीं. पत्राचा संपादक असतो तो सदासर्वकाळ ठिकाणावर असतोच किंवा ठिकाणावर असला तरी सदोदित तोच सर्व लेख लिहितो, असें

ह्मणतां यावयाचें नाहीं. तसेंच ग्रंथाप्रमाणें वर्तमानपत्रांत ज्याच्या हातून लेख लिहिला जातो तो स्वतःच आपण लिहिलेला लेख तपासून दुरुस्त करून देतों असें नाहीं. तर पुष्कळ वेळां जरुरीमुळें किंवा अडचणीमुळें एकानें लिहिलेला लेख दुसऱ्यास दुरुस्त करावा लागतो. अर्थात् वाक्यरचना किंवा भाषापद्धतीसंबंधानें लेखांत पुष्कळ फिरवाफिरव होते. खुद्द टिळक यांनीं लिहिलेल्या लेखांत दुसऱ्यांनीं केलेली फिरवाफिरव फारच थोडी आहे, किंबहुना नाहींच असें ह्मटलें तरी चालेल; व ह्मणून केसरींतील लेखांच्या भाषेचा विचार न करतां टिळक यांच्या भाषेचा—अर्थात् त्यांच्याच लेखांच्या भाषेचा—मी विचार करणार आहे, असें जें वर ह्मटलें आहे तें एवढ्याचकरितां होय.

आतां टिळक यांच्या भाषेचा विचार करावयाचा ह्मणजे व्याकरण-शास्त्रांतील किंवा भाषाशास्त्रांतील बारिकसारिक नियमांच्याही कसोटीस ती कितपत उतरते हा विचार न करतां सामान्यपणें त्यांच्या भाषेचें स्वरूप काय, व मराठी वाङ्मयाच्या दृष्टीनें तिनें कोणतें कार्य केलें आहे, एवढेंच आपणास पाहावयांचें आहे. टिळकांनीं केसरींत जे लेख लिहिले आहेत तें तोंडानें सांगून लिहिले आहेत. अर्थात् मनुष्याच्या मनांत आलेले विचार तो नेहमीं दुसऱ्यापाशीं ज्या भाषेनें व्यक्त करतो तीच भाषा हे नेहमीं वापरीत. यामुळें त्यांत कृत्रिमपणा, ओढाताण किंवा अवजडपणा न येतां विचारांचें जसें शुद्ध स्वरूप असतें व ते विचारही जसे एकापाठीमागून एक सुचत जातात तसेंच यांची भाषा अथवा भाषण* ह्मटलें तरी चालेल शुद्ध स्वरूपानें बाहेर पडली आहे. भाषेच्या या स्वरूपावरून प्रख्यात तत्त्ववेत्ते स्पेन्सर साहेब यांच्या भाषे-संबंधानें त्यांच्या एका चरित्रकारानें जे उद्गार काढले आहेत त्याची येथें आठवण झाल्यावांचून राहत नाहीं. तो ह्मणतोः—" त्यांचें प्रतिभारूप दर्पण जर स्वच्छ व साफ आहे, तर त्याच्यावर कोणत्याही विचाराचें प्रतिबिंब तरी पुसट किंवा वांकडे कसे पडणार? किंवा भाषारूप लेखणीच्या

* " माझे लेख मी स्वतः न लिहितां दुसऱ्यास लिहावयास सांगतों याचें कारण सध्यां आपण बोलतों त्या भाषेंत ते यावेत ह्मणूनच सांगतों, " असें संभाषणप्रसंगीं त्यांनीं एकदां ह्मटलें होतें, यावरून त्यांच्या लेखांस त्यांचें भाषण ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं हें कोणासही कळून येईल.

द्वारां त्यांनीं रेखाटलेलें जें त्या विचाराचें मूर्त चित्र त्यांत तरी किंचित्‌ही दोषास अवकाश कसा सांपडणार ? ''* असो; यांची भाषा साधी असून त्यांत विवक्षित अर्थ केवळ सरळ रीतीनें व्यक्त केलेला असल्यामुळें साहित्यशास्त्राच्या दृष्टीनें ती प्रसादयुक्त असून निबंधमालाकारांनीं चांगल्या भाषापद्धतीचें वर्णन करतांना एके ठिकाणीं ह्मटल्याप्रमाणें ती ' रसिक वाचकांस पसंत होऊन कितीही काळ लोटला तरी तिच्या रमणीयत्वाची हानी होणार नाहीं. '

साधेपणा व सरळपणा याबरोबरच टिळकांच्या भाषेंत सुबोधपणाही असतो. ह्मणजे विषय कितीही कठिण किंवा गहन असो, तो सामान्य वाचकाच्या आटोक्यांत आणून सोडतां येईल अशा रीतीची भाषा हे वापरीत. खेड्यापाड्यांतील लोकांतही वाचनाची अभिरुचि उत्पन्न होऊन गेल्या पंचवीस वर्षांत राजकीय, सामाजिक व धार्मिक विचारांत आमच्या समाजाची बरीच प्रगति करण्यास यांच्या लेखांतील हा भाषेचा सुबोधपणाच कारणीभूत झाला आहे, हें कोणासही कळून येईल. हे आपल्या लेखांत सहसा इंग्रजी शब्द घालीत नसत. तथापि, इंग्रजी शब्द घालावयाचेच नाहींत असा कांहीं यांचा बाणा नसे. तसेंच इंग्रजी शब्दांबद्दल मराठींत संस्कृतभाषेच्या आधारें नवे नवे शब्द बनविण्याकडेही यांची प्रवृत्ति नसून जे शब्द हल्लीं मराठींत प्रचारांत आले आहेत किंवा येत चालले आहेत ते जसेच्या तसेच हे ठेऊन देत. उदारणार्थ—कॉंग्रेस, कान्फरन्स, इलेक्शन, ट्रस्टी, प्लँटर, प्लॅन, हॉल, पोर्टट्रस्ट, चेंबर—ऑफ्—कॉमर्स, युनिव्हर्सिटी, सेनेट, एडिटर, इत्यादि. अशा प्रकारच्या शब्दांस केव्हां केव्हां मराठींतीलही प्रतिशब्द घालीत, नाहीं असें नाहीं. पण त्याकरतां लेख सांगतांना थांबत नसत. सांगण्याच्या ओघांत जशा प्रकारचे शब्द येतील तसलेच ते घालीत, हाच यांतील मुख्य मुद्दा आहे. यांच्या लेखांतील अलंकार, विनोद, कोटिक्रम, अवतरणें, हीं कोणत्या प्रकारचीं असतात हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. त्यासंबंधानें येथें विशेष सांगण्याचें कारण नाहीं. तथापि, एवढी गोष्ट येथें सांगितली पाहिजे कीं, त्यांपैकीं कोणा-

---

* रा. रा. फडकेकृत ' अज्ञेयमीमांसा ' या पुस्तकांतील स्पेन्सरचें चरित्र. पान ३० पहा.

चीही ओढाताण न करतां सहजासहजी आल्यास त्याचा ते उपयोग करीत व त्यामुळेंच त्यांच्या लेखांचें तेज विशेष खुले. वर्तमानपत्रांतील लेख तात्पुरत्या चळवळीस विशेष उपयोगीं पडतात हें जरी खरें आहे, तरी गहन विषयांचें प्रतिपादन, अर्थगांभिर्य व प्रसाद या गुणांनीं युक्त असल्यामुळें यांचे बरेच लेख वाङ्मयाच्या दृष्टीनेंही अगदीं चिरस्थाई होतील यांत तिळमात्र संशय नाहीं. अशा प्रकारच्या लेखांची यादी देण्याचें हें स्थळ नव्हे. तथापि, हर्बर्ट स्पेन्सर, कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, न्या. रानडे, प्रो. जिनसीवाले, मॅक्समूलर, ज्ञेयाज्ञेयमीमांसा, पंचांगशोधन, मराठी भाषेची लेखनपद्धति, आमच्या वर्णमालेचा खून, बाणभट्ट, महाभारत, रामायण, इत्यादि इतिहास, व्याकरण, तत्वज्ञान किंवा चरित्रविषयक जे लेख गेल्या आठ वर्षांत प्रसिद्ध झाले आहेत ते पहावे ह्मणजे वाचकांची खात्री होईल.

टिळकांची भाषा जशी साधी, सरळ व सुबोध असते तशीच कडकही असते. त्याचीं निराळीं उदाहरणें येथें देण्याचें कारण नाहीं. तीं मागील विवेचनांत सहज येऊन गेलीं आहेत; विशेषत: ‘ टाइम्स ’चे संपादक मि. बेनेट हे विलायतेस निघाले असतां मुंबईच्या सर भालचंद्रादि पुढाऱ्यांनीं त्यांस जें मानपत्र दिलें, त्या वेळच्या लेखांत हें उदाहरण चांगलें दिसून येतें. अशा प्रकारचे अनेक लेख आजपर्यंत केसरींत येऊन गेले आहेत. या कडक भाषेसंबंधानें कोणी कोणी असे आक्षेप घेतात कीं, ‘ त्यापासून काय उपयोग आहे ? उलट सरकार किंवा सरकारी अधिकारी अशा कडक भाषेनें चिडून जातात व त्यांच्या मनांत लोकांबद्दल जी कांहीं सहानुभूति असते ती निघून जाते. यापेक्षां सौम्य अथवा नेमस्त भाषेनें आपलें काय ह्मणणें असेल तें सरकारापुढे मांडून आपली दाद लावून घ्यावी. बरें, इतर गृहस्थांसंबंधानें लिहिलेल्या कडक भाषेची गोष्ट घ्या. आपल्यांतील पुढारी किंवा इतर लोक यांचीही अशा कडक लिहिण्यानें मनें दुखविल्यामुळें तेही आपल्या विरुद्ध नाहींत कां होत ? व त्यांचीही सहानुभूति नाहीं कां कमी होत ? यापेक्षां ‘ दादा ’ ‘ बाबा ’ ह्मणून कोणाला लागेल अशी भाषा न वापरतां काम करून घेणें चांगलें.’ अशा प्रकारचे आक्षेप वर्तमानपत्रांतून उघडपणें फारसे जरी कोणीं घेतले नाहींत किंवा व्याख्यानांतून आणि सभांतून त्यांचा जरी कोणीं खल केला नाहीं,

तरी प्रसंगविशेषीं आजपर्यंत उलट बाजूच्या पत्रांतून या मताचा ध्वनि पुष्कळ वेळां निघाला आहे; व हल्लींही केव्हां केव्हां त्याचा प्रतिध्वनि होत असतो. तसेंच सभांतून, व्याख्यानांतून किंवा खासगी संभाषणांतूनही अशा प्रकारचे उद्गार केव्हां केव्हां कानीं पडतात. तेव्हां हे मत कितपत सयुक्तिक आहे, कडक भाषा कां वापरावी व खुद्द टिळक यांचें या बाबतींत काय मत आहे, याचें विवेचन करणें अप्रासंगिक होणार नाहीं, ह्मणून त्यासंबंधानें दोन शब्द येथें लिहितों.

टिळक यांच्या वर्तमानपत्रांतील कडक लेखानें महाराष्ट्रावर नसतें संकट ओढवून तो राजकीय हक्कांस [illegible]

[illegible] णार होता! कडक भाषेनें हक्क जातात आणि सौम्य अथवा नेमस्त भाषेनें हक्क मिळतात हा निवळ भ्रम आहे. उलट जर कांहीं कार्य होईल तर तें कडक भाषेनेंच होईल. कारण, सरकारावरची यांची कडक टीका ह्मणजे राज्य उलथून टाकून सरकाराला येथून घालवून देण्याची टीका नव्हे; आणि असा जर कोणी यांच्या कडक टीकेचा अर्थ करीत असेल तर त्याचा विचारही येथें करण्याचें कारण नाहीं. कडक टीका याचा अर्थ मी कळकळीची टीका असें समजतों; व कळकळ अंतःकरणांत जितकी जास्त असेल तितक्या जास्त जोरदार शब्दांनीं ती बाहेर पडावयाचीच. बॉयलरांत वाफ कमी असेल तर शिटीचा आवाज निघावा तसा निघत नाहीं; तीच वाफ भरपूर असली ह्मणजे ती जास्त जोरानें वाजते. याप्रमाणेंच सरकारानें लोकहितार्थ अमुक करावें, तमुक करावें, असें अंतःकरणपूर्वक यांना वाटत असल्यामुळे सरकारचें राजकीय धोरण चुकून त्यानें प्रजेस व त्याबरोबर सरकारास अपाय होत असेल, तर सरकारास कळकळीचा आणि स्पष्टपणाचा सल्ला सागण्यास यांनीं कधींही मागेंपुढें पाहिलें नाहीं. खरी राजनिष्ठा ती यांतच आहे. इंग्रज सरकारचें राज्य उलथून पडूं नये एवढीच यांची इच्छा आहे असें नाहीं, तर आपलें ह्मणणें कायदेशीर रीतीनें त्यांच्या कानावर घालण्याची जेवढी मोकळीक आहे तेवढी सगळी घेऊन राज्यकारभाराचे कामीं त्यास मदत करावी अशी यांची प्रेरणा असल्यामुळेंच पहिल्या राजद्रोहाच्या खटल्यानंतर १८९९ सालात ‘ पुनश्च

हरिः ॐ ' ह्मणून जेव्हां केसरीचें सुकाणू पुन्हां आपल्या हातीं घेतलें, त्या वेळीं त्यांनीं पुढील उद्गार काढले आहेत :—

" आमचे हातांत शस्त्रें नाहींत व तीं घेण्याचेंही आमचे मनांत नाहीं; परंतु सरकारानें जी मोकळीक दिली असेल तिचाच पूर्ण उपयोग करून आमचें सार्वजनिक कर्तव्य बजावण्याचा आमचा इरादा आहे. सरकार आह्मांस किती मोकळीक देते तें सरकाराने एकदा इमानें इतबारें आह्मांस सांगावे, ह्मणजे आह्मी त्याप्रमाणे वागूं. आह्मांस ज्या कांही गोष्टी कर्तव्य आहेत त्या राजद्रोहाच्या नाहीत. त्या शब्दाने कशा व्यक्त करावयाच्या एवढ्याबद्दल कायतो वाद आहे. करितां ही मर्यादा जर सरकार एकदां कायमची ठरवील तर त्यांत आमचे हितच आहे. मर्यादा कितीही संकुचित असली तर त्याची आह्मी काळजी करीत नाही. उलट, आमची अशी समजूत आहे कीं, संकुचित मर्यादेंतच आपले सर्व विचार व्यक्त करणे यांतच जास्त कसब आहे. मैदानावर कसरत करण्यापेक्षां बाटल्यावर टेबल ठेऊन त्यावर कसरत करणाराची करामत जास्त हे सर्वत्रांस माहित आहेच, व तोच न्याय प्रकृत स्थलीही लागू आहे. सरकारानें मात्र आपली मर्यादा कायती निश्चित ठरवावी व तींत पुन्हां फेरबदल करणे असल्यास कायद्यानें करावा, बळी घेऊन करूं नये, एवढीच कायती आमची सरकारास विनंति आहे. कायदेशीर मोकळिकीची एकदां इयत्ता ठरली ह्मणजे त्या इयत्तेंत वागण्यास आह्मी तयार आहो. त्या इयत्तेचा जितका फायदा घेतां येईल तितका घेण्यास मात्र आह्मी कधीही कचरणार नाही, किंबहुना तसा फायदा घेणें हें आमचे एक प्रकारचे कर्तव्यच आहे असें आह्मी समजतो."

सरकारच्या आवडीनावडीकडे न पाहतां त्याचा आपल्यावर गैरविश्वास होणार नाहीं एवढें धोरण ठेवून राज्यपद्धतींतील दोषांवर कडक टीका करणें हें पत्रकर्त्यांचें कर्तव्यच आहे, असें १९०४ सालीं, ' काळ ' कर्त्यावर ' टाइम्स 'नें काहूर उठविल्यावर जो लेख लिहिला आहे त्यांत टिळक यांनीं स्पष्ट ह्मटलें असून, त्यावेळचे त्यांचे उद्गार येणेंप्रमाणे आहेत:—

" सरकारच्या आवडीकरितां कांहीं आह्मीं पत्रें काढिली नाहींत; व सरकारावर कडक टीका केल्यानें त्याचा रोष आमच्यावर झाला तर त्याची आह्मांस पर्वाही नाही. सरकारच्या जुलमी राज्यपद्धतीवर जर कडक टीका करावयाची नाहीं व ती पद्धत परिणामीं लोकांस व राज्यकर्त्यांस जाचेल असे निर्भीडपणे ह्मणावयाचे नाहीं तर वर्तमानपत्र काढावे तरी कशाला? सारांश, आमची मते व भाषा कितीही कडक असो, तो मनाचा धर्म आहे. ज्याचें अंतःकरण जसे जळत असेल त्याप्रमाणे तो बोलेल किंवा लिहील. बाकी एवढे मात्र खरे की, विलायतेंत एकजातीय राजा आणि प्रजा यांच्यामध्यें जो विश्वास आहे तितका विश्वास हिंदुस्थानांतील परकीय

राजे आणि प्रजा यांचेमध्यें असणे शक्य नाहीं, हे लक्षांत ठेऊन आपल्या लेखांबद्दल सरकारास राग आला तरी चालेल, पण गैरविश्वास वाटूं नये एवढी खबरदारी हल्लींच्या राज्याच्या व कायद्याच्या स्थितीत ठेवणे जरूर आहे. ”

कडक भाषेनें टिळक विनाकारण कित्येक पुढाऱ्यांचीं मनें दुखवितात, असा जो त्यांजवर आक्षेप आहे त्यांतही कांहीं अर्थ नाहीं. अमुक एक गोष्ट खोटी आहे अशी मनाची पक्की खात्री झाल्यावर तिचा निषेध करणें हें आपलें कर्तव्य आहे असें ते समजतात. अर्थात् निषेध लोकांच्या मनांत बिंबावा असें ज्या मानानें वाटत असते त्या मानानेच यांची भाषा बाहेर पडत असते. ह्मणजे या ठिकाणींही पुष्कळ अंशीं लोकांबद्दल कळकळ हीच भाषा अधिक कडक होण्यास कारणीभूत होते. पुढाऱ्यांनीं केवळ भाषेच्या कडकपणाचा विचार न करितां त्यांतील मुद्यांचा विचार केल्यास त्यांची सहानुभूति कमी होण्याचें मुळींच कारण नाहीं. उलट, लोकमत जागृत करण्यास भाषा हें एक चांगले साधन आहे असें समजून ज्यानें त्याने आपली चूक सुधारल्यास पुष्कळ कार्य होईल. यासंबंधानें लिहितांना खुद्द टिळकांनींच ता० २।४।१९०१ च्या केसरींत जे विचार प्रगट केले आहेत तेच येथें देतों; ह्मणजे कडक भाषा वापरण्यासंबंधानें त्यांचें काय मत आहे हें वाचकांस कळून येईल. ते म्हणतातः—

“ एकदां लढाईस सुरुवात झाल्यावर प्रतिपक्षानें आपली शस्त्रास्त्रे अधिक तीक्ष्ण करण्याची खबरदारी ठेविली होती अशी ओरड करीत बसणे ह्मणजे आपल्या दौर्बल्याचा दोष विनाकारण लोकांच्या माथीं मारणे होय. आपल्या देशांतील लहानमोठ्या लोकांस आपले विचार कळवावे अशी ज्यास उत्कट इच्छा असेल त्यास स्वभाषेखेरीज दुसरें साधन नाही हें इंग्रजी शिकलेल्या लोकांनी पक्के लक्षांत ठेविले पाहिजे; व ज्यास लोकांबद्दल कळकळ नाही किंवा त्यास कांहीं ज्ञानाच्या गोष्टी सांगणें अवश्य आहे असे वाटत नाही, त्याच्या हातून स्वभाषेचा कधी उत्कर्षही व्हावयाचा नाहीं. एकाद्या इंग्रजी बुकाचें साफ भाषांतर करणे किंवा साळुबाईची गोष्ट सजवून सांगणें यास मराठी भाषेचे ज्ञान लागत नाही असे नाही; पण मला लोकांच्या मनांत अमुक एक गोष्ट भरवून दिली पाहिजे अशा कळकळीने ज्याचें अंतःकरण जळत नाही त्याच्या हातून स्वभाषेची खरी सेवा होणे अशक्य होय. रंगभूमीवर हावभाव किंवा अंगविकार यांच्या सहायानें वक्त्यास किंवा नटास आपले मनोविकार सभाजनांस कमजास्त प्रमाणानें व्यक्त करतां येतात; पण पांढऱ्यावर काळे करून तद्वारां लोकांचें चित्ताकर्षण करून घेणे अंतःकरणांत खरी कळकळ असल्याखेरीज शक्य नाहीं. ‘ तेथें पाहिजे जातीचें ! येर गबाळाचें काम नोहे ! ’ असें जें तुकारामबुवांनी ह्मटलें आहे

तें प्रस्तुत प्रकरणीं अगदीं बरोबर लागू पडतें. कित्येक लोकांची अशी समजूत आहे कीं, चांगला लेख कोणता तर ज्यांत दोहो पक्षांचा समतोलपणा राखून कोणासही न दुखवितां दरबारी रीतीनें विषयाचें विवेचन केलेलें असतें. चांगल्या लेखाची ही व्याख्या दरबारी लोकांनीं पाहिजे तर लक्षांत ठेवावी. पण ज्यास आपल्या विचारांची लोकांवर छाप बसवावयाची असेल, किंवा वाग्देवीच्या प्रसादानें लोकांच्या मनोवृत्ति जागृत करावयाच्या असतील, त्याने " अमर्षशून्येन जनस्य जंतुना न जातहार्देन न विद्विषादरः " हाच न्याय स्वीकारला पाहिजे. "

## मोठा केसरी.

सन १९०२ सालांत टिळक यांचे हातून जी एक विशेष गोष्ट झाली ती केसरीचा आकार वाढवून त्यांत केलेली सुधारणा ही होय. 'केसरी वाढणार', 'केसरी वाढणार,' अशी पूर्वी एक दोन वर्षांपासून बातमी पसरली होती, व त्यामुळें कोणी त्याचा आकार दुप्पट किंवा तिप्पट होणार म्हणून कल्पना करीत, तर कोणी तो आठवड्यांतून दोनदां किंवा तीनदां निघणार म्हणून कल्पना करीत; व कोणी कोणी तर 'केसरी रोजचा निघणार काय?' असाही मोठ्या उत्सुकतेनें प्रश्न करीत. टिळकांसारख्या योग्यतेच्या पुरुषानें झीज सोसून वर्तमानपत्राचें काम वीस बावीस वर्षे एकसारखें नेटानें चालविलेलें पाहून केसरी वाढवावयाचा ठरल्यावर त्यासंबंधीं वरील प्रकारच्या कल्पना लोकांनीं कराव्या यांत कांहीं नवल नाहीं; व टिळकांपेक्षां कमी योग्यतेचीं माणसेंही जर मराठी भाषेंत निघणारीं रोजचीं वर्तमानपत्रें चालवितात तर टिळकांना आपलें पत्र रोजचें करण्यास मोठें अवघड नाहीं, असें पुष्कळांना वाटावें यांतही वस्तुस्थितीस कांहीं सुटून नाहीं. पण टिळकांनीं आपलें पत्र रोजचें किंवा आठवड्यांतून दोनदां किंवा तीनदां निघणारें कां केलें नाहीं, व हल्लीं जें स्वरूप दिलें आहे तेंच कायम ठेवण्याचें त्यांनीं कां मुक्रर केलें; तसेंच त्यांत कोणकोणत्या सुधारणा त्यांनीं केल्या व आणखी कोणत्या करण्याचा त्यांचा विचार होता यासंबंधानें दोन शब्द येथें नमूद करतों.

मराठी भाषेंत रोजचें वर्तमानपत्र काढावयाचें म्हणजे मुख्यत्वेंकरून लोकांची स्थिति व वाचनाची अभिरुचि या दोन गोष्टींचा विचार कोणासही केला पाहिजे. तसेंच पत्र काढणाराचा मगदूर, स्थानिक परिस्थिति, धंद्यास लागणारें साहित्य, इत्यादि गोष्टींकडेही त्यानें लक्ष पुरविलें पाहिजे. वाचनाच्या अभिरुचीविषयीं पाहिलें तर ती

मोठमोठ्या शहरांतून जशी दिसून येते तशी लहान गांवांतून दिसून येत नाहीं; आणि याचें कारण उघड आहे कीं, मोठ्या शहरांत शाळा कॉलेजें, सरकारी ऑफिसें, म्युनिसिपालिट्या वगैरे संस्थांतून सुशिक्षित लोकांचा भरणा असून व्यापारधंदा, कलाकौशल्य, वगैरे कामानिमित्तानें अनेक समंजस लोक तेथें राहत असतात. अर्थात् वर्तमानपत्रांचा मुख्य खप ह्मटला ह्मणजे अशा प्रकारच्या शहरांतूनच व्हावयाचा. महाराष्ट्रांत अशा प्रकारचीं जीं कांहीं शहरें आहेत त्यांत मुंबई व पुणें हीं मुख्य होत. या प्रमुख शहरांतच प्रथमतः साप्ताहिक मराठीं पत्रें सुरू झालीं; व हल्लीं याच शहरांत प्रात्याहिक पत्रें निघूं लागलीं आहेत. केसरी पत्राचा हल्लीं मुख्य खप जो होत आहे तो या दोन शहरांतच होत आहे; किंबहुना सरासरी एक चतुर्थांश वर्गणीदार या दोन शहरांतच आहेत असें ह्मटलें तरी चालेल. हल्लीं साप्ताहिक केसरी पंचवीस हजार खपतो—हा खप १९०२ सालांत सुमारें पंधरा हजार होता—ह्मणून तो रोजचाही तितकाच खपेल असें नाहीं. कारण, पुष्कळ वर्गणीदार असे आहेत कीं, त्यांना एक पत्र आठ दिवस वाचण्यास पुरतें; रोज वाचण्याइतकी त्यांची जिज्ञासाच नसते. रोजचें पत्र चालण्यास वर्गणीदारांना केव्हां एकदां पत्र येईल आणि केव्हां एकदां आपण वाचूं असें होऊन गेलें पाहिजे. पण ही स्थिति तूर्त तरी महाराष्ट्रांत आली नाहीं; एवढेंच नव्हे तर, पुष्कळ सुशिक्षित लोकांचीही विद्याव्यासंगाकडे प्रवृत्ति नसल्यामुळें कित्येक साप्ताहिक पत्रांचीही व्हावी तशी भरभराट होत नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, आमच्या लोकांत रोजचें पत्र घेण्याची पुष्कळांना ऐपतही नाहीं. रोजच्या पत्रास कमींत कमी वर्षास ट. हा. शिवाय चार पांच रुपये तरी वर्गणी पडते; आणि इतकी वर्गणी भरून पत्र घेणारा ऐपतीचा वाचकवर्ग मुंबई-पुण्यासारख्या ठिकाणींही तूर्त भरपूर मिळेल किंवा नाहीं याची वानवाच आहे. तिसरी गोष्ट, रोजच्या वर्तमानपत्रास स्थानिक वर्गणीदारच फार मिळावयाचे. पण स्थानिक चळवळी विशेष जोराच्या असल्याशिवाय स्थानिक वर्गणीदार मिळणार कसे? मुंबईस म्युनिसिपालिटी, युनिव्हर्सिटी, पोर्टट्रस्ट, हायकोर्ट, वगैरे सारख्या मोठमोठ्या संस्था व व्यापाराचे आणि उद्योगधंद्याचे जंगी कारखाने असल्यामुळें तेथें रोजचीं वर्तमानपत्रें चालतील; व हल्लींही कांहीं

चालत आहेत. पण पुण्यास वरच्यासारख्या मोठमोठ्या संस्था नसल्यामुळें व उद्योगधंदा किंवा व्यापार यासारखी चळवळही कमी असल्यामुळें तेथें रोजचें वर्तमानपत्र चांगल्या रीतीनें चालण्यास आजमितीस अनेक अडचणी आहेत. आतां हल्लीं केसरी जरी पुण्यास निघतो तरी त्याचा बराच खप मुंबईस असून सर्व प्रकारच्या सोयी करून प्रात्यहिक काढल्यास मुंबसही तो खपेल, नाहीं असें नाहीं. पण मुंबईसही निवळ मराठी पत्र वाचणारांची संख्या व ऐपत आणि आजपर्यंत ज्या जोमानें केसरी निघाला त्या जोमाचा रोजचा केसरी काढण्याकरितां लागणारें साहित्य याचा विचार केला ह्मणजे हीही गोष्ट हल्लींच्या स्थितींत बरीच कठिण आहे असें ह्मणावें लागतें. खेड्यापाड्यांतील वर्गणीदारांचें ज्ञान कमी, वाचनाची अभिरुचि कमी व ऐपतही कमी. शिवाय तेथें रोज टपाल येण्याचीही सोय नसते. अशा स्थितींत प्रात्यहिक पत्राचा प्रसार शहराखेरीज अन्य ठिकाणीं विशेष होणें कठिण आहे. हें सामान्यपणें लोकांच्या अभिरुचीसंबंधानें व ऐपतीसंबंधानें झालें. आतां पत्रकर्त्यांचा पत्रें चालविण्याचा मगदूर व साहित्य याकडे पाहिलें ह्मणजे तिकडूनही समाधान मानण्यासारखी गोष्ट आहे असें नाहीं. आठवड्याच्या पत्रापेक्षां रोजच्या पत्राकडे बातम्य पुरविण्याचें काम जरी विशेष असतें तरी त्यांत लेख लिहिणारे इसम विद्वान् व हुषार असले पाहिजेत; किंबहुना एका दृष्टीनें यांतील लेख आठवड्यांतील पत्रापेक्षां एकेक वेळीं अधिक चागले आले पहिजेत. याचें कारण ताज्या व चळवळीच्या विषयावर एकदम मत प्रगट केल्यानें त्याचा समाजावर ताबडतोड चागला किंवा वाईट परिणाम होण्याचा संभव असतो. शिक्षणाच्या बाबतींत विलायतेप्रमाणें किंवा इतर पाश्चात्य राष्ट्रांप्रमाणें आजमितीला आमची स्थिति नसल्यामुळें नुसत्या बातम्या किंवा तारा दिल्यानें त्यावरून आमच्या वाचकांस कोणत्याही महत्वाच्या विषयासंबंधानें बरोबर अनुमान किंवा तर्क करतां येणार नाहीं. हल्लीं मराठींत जीं दैनिक पत्रें निघत आहेत त्यांत सटरफटर बातम्या, इंग्रजी पत्रांतील तारांचें अक्षरशः भाषांतर—या गोष्टींना कांहीं अपवाद आहेत; पण ते फार थोडे आहेत—यापलीकडे फारशी मजल गेलेली नाहीं, असें ह्मटल्यास त्यांत चूक होईल असें मला वाटत नाहीं. स्वतंत्र लेख लिहून लोकमत चांगल्या रीतीनें तयार करण्याची शक्ति तर फार थोड्या लेखकांत आहे; व टीका,

बातम्या किंवा स्थानिकवृत्त हींही असावीं तशीं नसतात. लेखांसंबंधानें हा जसा कमकुवतपणा आमच्या मराठी दैनिक पत्रांत आहे तसाच पत्र वेळेवर काढणें, वेळेवर रवाना करणें, छपाई चांगली ठेवणें, चित्रें वगैरे देणे याही गोष्टींत आहे; आणि या गोष्टी केवळ पैशावर अवलंबून असल्यामुळें पत्रकर्त्यांची सांपत्तिक स्थिति चांगली असल्याशिवाय दैनिक पत्र चांगल्या रीतीनें निघणें कठिण आहे. आतां टिळक यांची पत्र चालविण्याची योग्यता किती आहे हें मागें सांगितलेल्या हकीकतीवरून कोणासही कळून येईल; व त्यांनीं केसरी दैनिक केला तर त्यांत पुष्कळ लेख भारदस्त येऊन इतर दैनिक पत्रांपेक्षां पुष्कळ चांगल्या रीतीनें तो निघेल यांत कांहीं शंका नाहीं. पण लोकांत ऐपत व अभिरुचि नसतां केवळ दैनिक पत्र काढून त्याचा प्रसार करणें ह्मणजे डळमळीत पायावर इमारत उभारण्यासारखेंच आहे. लोकांत अभिरुचि उत्पन्न करून पत्रांचा प्रसार व्हावयाचा, कीं पत्राचा प्रसार झाल्यावर लोकांत अभिरुचि उत्पन्न व्हावयाची हा सध्यांच्या काळीं आमच्या इकडे एक महत्वाचा प्रश्न उत्पन्न झाला आहे; व जोंपर्यंत सरकार आणि लोक शिक्षणाचे कामीं औदार्य दाखविणार नाहींत किंवा स्वार्थत्याग करणार नाहींत, व जोपर्यंत लोकांचें दारिद्र्य कमी होऊन त्यांची एकंदर स्थिति सुधारणार नाहीं तोपर्यंत ज्यांना कळतें व ज्यांना ऐपत आहे त्यांनीं आपापल्यापरी लोकशिक्षणाचें काम हातीं घेतलें पाहिजे; व अशा दृष्टीनेंच वर्तमानपत्राचे कामीं टिळक यांनीं एकदम वरच्या पायरीवर उडी न टाकतां हळू हळू खालच्या पायऱ्या चढून वर जाणाचा निश्चय केला आहे. ह्मणजे अगोदर आठवड्याचेंच पत्र सर्व तऱ्हेनें वाचनीय करून लोकशिक्षणांत भर टाकावी व लोकमत जागृत करावें असा त्यांचा विचार आहे. लोकाभिरुचि कोणत्या प्रकारची आहे, त्यांस ऐपत किती आहे, रोजचा केसरी फार खपेल किंवा नाहीं व केसरी थोडक्या किंमतींत पूर्वीपेक्षां दुप्पट देण्याचें धोरण कोणतें याविषयीं मोठा केसरी झाला त्या वेळीं ता. ११ फेब्रुवारी १९०२ च्या अंकांत त्यांनीं जे उद्गार काढले आहेत तेंच येथें देतों; ह्मणजे त्यांच्या विचाराचें स्वरूप वाचकांच्या ध्यानांत येईल. ते ह्मणतातः—

"केसरी आठवड्यांतून दोनदां, तीनदां किंवा रोजचा करावा अशाबद्दल कांहीं गृहस्थांच्या सूचना आमच्याकडे पुष्कळ दिवसांपासून येत आहेत, व तसें करणें

आम्हांस फारसे अवघड आहे असेंही नाहीं. पण रोजचा केसरी झाला असतां त्याची वर्गणी कमींत कमी (ट. ह. सह) बारापासून पंधरा रुपयांपर्यंत ठेवावी लागेल व आठवड्यांतून दोनदां केला तरी त्याची वर्गणी तीन रुपये दहा आणे होईल. एवढी वर्गणीची रक्कम सालीना देण्यास हल्लीच्या केसरीच्या वाचकवर्गापैकीं बऱ्याच लोकांस ताकद नाहीं हे आम्हांस माहीत आहे. खेडेगांवांतील शाळामास्तर किंवा लिहितांवाचतां येणारे हलक्या पगाराचे शिपाई यांस देखील स्वतःचा केसरी घेतां येऊन तो त्यांनी वाचावा अशी आमची इच्छा आहे. किमत वाढवून वर्गणीदार कमी झाले तरी हल्लीइतका किंबहुना त्याहूनही जास्त नफा राहण्याचा संभव आहे. पण वर सांगितल्याप्रमाणें वाचकवर्गाची मर्यादा व व्याप्ति अधिकाधिक वाढावी हाच आमचा प्रमुख हेतु असल्यामुळे वाचनाची अभिरुचि असणाऱ्या गरीब वाचकांच्या शक्तीच्या बाहेर केसरीची वर्गणी जाईल अशा रीतीनें केसरीची सुधारणा करण्यास आमचें मन धजत नाहीं. ... छापखाना किंवा वर्तमानपत्र काढून तंट्याबखेड्यांत न पडतां सहज चरितार्थ चालविणें हा केसरीचा मूळ उद्देश नव्हे, असे सन १८८४च्या आरंभीच आह्मी जाहीर केलें आहे; व तोच आमचा हेतु अद्यापही कायम असल्यामुळे वाचकवर्गाची वाढ अधिकाधिक होईल अशा रीतीनेंच केसरी पत्रांत आह्मांस सुधारणा केली पाहिजे. अशी सुधारणा ह्मटली ह्मणजे किमत फार न वाढवितां त्यांतल्या त्यांतच मजकुराची वाचकांकरितां जास्त सोय करणें ही होय."

लोकांत अद्याप वाचनाचि अभिरुचि यावी तितकी आली नाहीं व त्यांना छापखान्याचें आणि वर्तमानपत्रांचें महत्व कळत नाहीं ही गोष्ट वरील विवेचनावरून कोणाच्याही ध्यानांत येईल. तथापि यासंबंधानें आणखी कांहीं विचार येथें सादर करतों. वर्तमानपत्राच्या सद्यःस्थितीकडे पाहिलें ह्मणजे बहुतेक पत्रांचे कांहीं तरी बुडवे वर्गणीदार असतातच. 'पत्र सुरू करा, आह्मी मागाहून वर्गणी देऊं,' असें सांगून वर्ष सहा महिने पत्र घेणारे व मागाहून "आह्मी मागेंच बंद करावयास सांगितलें असतां तुह्मीं कां बंद केलें नाहीं," किंवा "आह्मी मुळीं मागणीच केली नव्हती; केली असल्यास आमच्या हातचें पत्र दाखवा. आपण होऊन तुह्मीं पत्र सुरू केलें, त्याअर्थी त्याबद्दल तुह्मीच जबाबदार आहां," असें ह्मणून 'वर्गणी देत नाहीं' ह्मणणारे किंवा पत्र एकसारखें घेऊन अखेर व्ही. पी. नें अंक गेला असतां 'मालक परगांवीं गेला आहे किंवा मालकाचा पत्ता नाहीं' अशा सबबीवर परत करून वर्गणी बुडविणारे थोडे तरी लोक प्रत्येक पत्रापाठीमागें असतातच; व केसरीही अशा वर्गणीदारांपासून अजिबात मुक्त आहे असें नाहीं. पण इतर पत्रांपेक्षां केसरीला वर्गणीची किंवा

जाहिरातींच्या पैशाची बूड कमी आहे, एवढी गोष्ट निर्विवाद आहे. पुष्कळांचें असें ह्मणणें आहे कीं, पत्राला जी बूड येते त्यांत पत्रकर्त्याचा दोष नसून लोकांचा आहे; व या त्यांच्या ह्मणण्यांत कांहींच अर्थ नाहीं असेंही नाहीं. तथापि पत्रकर्त्यांत जर योग्यता, व्यवहारदक्षता, हिंमत इत्यादि गोष्टी असून पत्राची उपयुक्तता दाखविण्याइतकी जर त्याच्या अंगीं धमक असेल, तर तो सद्यःस्थितींतही आपलें डोकें वर काढल्याशिवाय कधीं राहणार नाहीं. यासंबंधानें लिहितांना ता. २४।११।०३ च्या केसरींत खुद्द टिळक यांनींच असे उद्गार काढिले आहेत:—

" मलबारी शेटजींनीं वर्तमानपत्रकार या नात्यानें सांगितलेला आपला अनुभव खोटा आहे असें नाहीं.* तथापि, याचा दोष सर्वांशीं लोकांस देणें ह्मणजे पुढाऱ्यानें एक प्रकारें आपले नामर्दपण कबूल करण्यासारखें आहे असें आह्मी समजतों. इंग्रजींत अशी एक ह्मण आहे की, अडाणी कारागीर नेहमीं आपल्या हत्यारास नांवें ठेवीत असतो किंवा अमुक एक काम बिघडलें असतां ते हत्यार चांगलें नाहीं ह्मणून बिघडलें अशी सबब पुढें आणीत असतो. ' नाचतां येईना ह्मणून आंगण वांकडें ' अशी आपल्यांत जी एक ह्मण आहे तीही याच अर्थाची आहे."

केसरी वाढवावयाचा असा विचार १९०० सालापासूनच चालला होता; फक्त तो पक्का होऊन अमलांत येण्यास पुढें दोन वर्षें लागलीं. आणि

---

* मि मलबारी यांनी वर्तमानपत्राचे वर्गणीदार किंवा लोकाश्रय यासंबंधानें आपल्या पत्रांत लिहितांना पुढील उद्गार काढले आहेत:—

" The *Indian Spectaor* and the *Voice of India* have the same tale to tell-one copy read by ten readers and the one subscriber sometimes in arrears running up his bill for five, seven and ten years and then asking for his original order, threatening to pay at leisure but forgetting to carry out the threat. These details are too paltry to mention, but the straw shows which way the wind blows. No wonder the press in India draws but few men of character and talent that there are journals without editors and editorial staffs without a library or even a few reference books, that those who run the papers have no means of studying the questions they are supposed to discuss, no collateral reading to enlighten their criticism and the writings lack variety and speciality. The struggles of these pressmen in the absence of literary or financial co operation are really heart-breaking. It is no fault of theirs that they fail, the fault lies with the public. This is daily experience and we all feel the cruelty of the fate. And yet some one ventures to say that the Country is wanting in public spirit or political appriciation he is set down as an enemy."

एवढा अवधी लागणें स्वाभाविक होतें. याचें कारण एक तर पैसा ह्मटला कीं, तो घरच्या पेटींतून हवा तितका काढावा अशी टिळक यांची स्थिति नसल्यामुळें छापण्याच्या यंत्रास व इतर सामुग्रीस लागणाऱ्या दहा बारा हजार रुपयांची कांहीं तरी तरतूद करणें जरूर होतें. नेटिवांनीं चालविलेल्या कित्येक गुजराथी किंवा इंग्रजी पत्रांस कोणीं कोणीं मोठ्या देणग्या दिल्या असल्यामुळें तीं जोमानें चालण्यास बरीच मदत झाली आहे. पण टिळक यांना पत्र काढल्यापासून पत्राकरितां ह्मणून कोणी देणगी किंवा मदत दिली नसल्यामुळें तें जोमानें कसें चालवावें याचा विचार त्यांचा त्यांनाच करणें भाग होता. अशा स्थितींत नित्याचा खर्च कायम ठेवून वरील रक्कम त्यांना जमा करावयाची होती. दुसरें असें कीं, पंधरा सोळा हजार प्रती एका दिवसांत छापून निघण्यासारखें व थोड्या किमतींत मिळण्यासारखें यंत्र हिंदुस्थानांत नसल्यामुळें त्याकरतां विलायतेकडे पाहणें भाग पडलें. तिसरें असें कीं, वयपरत्वें त्यांची शक्ति कमी होत चालल्यामुळें मोठा केसरी लिहिण्यास त्यांना दुसऱ्या माणसांची मदत घेणें जरूर होतें. पुढें पैशाची तजवीज करून जेव्हां यंत्रें आणविलीं व लेख लिहिणारीं माणसेंही कायमची आपल्या मदतीस घेतलीं, तेव्हां १९०२ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत त्यांनीं मोठा केसरी सुरू केला. केसरी मोठा करण्यास जाहिरातींची वाढ—अर्थात् उत्पन्नाची वाढ—ही गोष्ट जरी पुष्कळ अंशीं कारणीभूत झाली आहे, तरी तो मोठा करण्यांत निव्वळ स्वार्थ नसून त्याबरोबर लोकशिक्षणासही विशेष चलन मिळावें हा दुसरा उदात्त हेतु आहे; व या हेतूसंबंधानें त्यांनीं आपले विशेष विचार ता. ११ फेब्रुवारी १९०२ च्या अंकांत प्रगटही केले आहेत. यंत्रसामुग्री व मदत करणारीं कांहीं माणसें मिळालीं तरी जोखमीचा सर्व भाग त्यांच्यावरच असल्यामुळें या नव्या गाड्यास गति देऊन तो सुरळीतपणें चालला आहे किंवा नाहीं हें पाहण्याची दगदग त्यांनाच करावी लागली; व अजूनही आपल्या मनाप्रमाणें या गाड्यास गति न मिळाल्यामुळें ते या दगदगींतून मुक्त झाले नव्हते. मोठा केसरी छापण्यासाठीं त्यांनीं जीं यंत्रें आणलीं आहेत त्यांत मुख्य दोन आहेत. एक 'ऑइल एंजिन' ह्मणजे राकेल तेलानें चालणारें एंजिन, व दुसरें दोन पंख्यांचें छापण्याचें यंत्र. हीं दोन्ही यंत्रें पेट्यांतून भरून आल्यावर पेट्या फोडण्यासून तों यंत्रें बसवून चालू

करीपर्यंत सर्व देखरेख यांचीच होती; व यांची मदत नसती तर तीं यंत्रें पुण्यांतील छापखानेवाल्यांपैकीं कोणास लवकर बसवितां आलीं असतीं किंवा नाहीं याची वानवाच आहे ! बुधवार पेठेंतील ' आर्यभूषण ' छापखान्याला जोडूनच स्वतंत्र इमारत बांधून त्यांत त्यांनीं हीं यंत्रें प्रथमतः ठेविलीं होतीं; व प्रसंग पडला तर दुसऱ्या छापखान्याच्या तोंडाकडे न पाहतां आपली छापावयाची सोय व्हावी अशी योजना यांत केली होती. पण त्यावेळीं ती अमलांत न आणतां ' आर्यभूषण ' छापखान्यांत मजकुराचे खिळे जुळवून ते सबंध उचलून आणून या नव्या यंत्रावर केसरी पत्र छापलें जात होतें. ऑइल एंजिन ठेवण्यास पासाची अडचण नसून तें कमी खर्चाचें व विशेष सोयीचें वाटलें ह्मणून त्यांनीं तें आणलें; व त्यानें छापण्याच्या यंत्रास जी गति मिळते तिनें तासांत तीन हजार प्रती छापल्या जातात. छापावयाचें जें यंत्र आहे तें हातानें फिरविण्याच्या यंत्रासारखेंच आहे. फक्त तें मोठें असून त्याला दोन्हीकडे दोन पंखे आहेत व त्यांवरून दोन्हीकडे दोन पत्रें एकाच वेळीं छापून पडतात. हीं डबल–फीडरचीं अथवा दोन पंख्यांचीं यंत्रें हिंदुस्थानांत अगदीं कमी असून त्याला ' केसरी डबल–फीडर मशिन ' असें नांव त्यांनीं दिलें आहे; व तें बसवावें कसें याच्या माहितीचा एक कागदही इंग्रजींत छापून काढला आहे. पत्राचा प्रसार अधिक वाढल्यामुळें घड्या घालण्याचेंही एक यंत्र त्यांनीं आणविलें आहे व तें ऑईल एंजिनच्या शक्तीनेंच चालविलें जात असून मोठ्या कागदाच्या चार घड्या एका पाठीमागून एक अशा या यंत्रांतून होत असतात. हल्लीं आपल्या वाड्यांतच छापखाना व हीं यंत्रें ठेविलीं आहेत व सर्व कामें तेथेंच होत असतात. ऑइल एंजिनाचा ' भकभक ' आवाज, छापण्याच्या व घड्या घालण्याच्या यंत्राची खडबड, आणि तेथें काम करीत असलेल्या शेंपन्नास माणसांचा गोंगाट हीं मंगळवारीं पाहांटेस ज्याच्या कानीं पडतात त्याला केसरीनें पुण्यास छापण्याचा एक बडा कारखाना सुरू केला आहे असें वाटल्यावांचून कधीं राहणार नाहीं. हल्लीं निघतो एवढ्या मोठ्या केसरीचें काम वास्तविकपणें सोमवारीं सकाळपासून मंगळवार पहांटेपर्यंत आटपावयास पाहिजे. पण त्याला अनेक अडचणी असल्यामुळें तेवढ्या वेळांत तें होत नाहीं. हल्लीं केसरीची एक बाजू–ज्यांतील दोन पानांवर जाहिराती व दोन पानांवर वर्तमानसार, पत्रव्यवहार, स्वदेशी चळवळीची

हकीकत वगैरे विषय असतात ती—रविवारीं तयार होऊन सोमवारीं सकाळीं निघते; व दुसरी बाजू—ज्यांतील दोन पानांवर अग्रलेख, स्फुट सूचना, इहवृत्त वगैरे विषय असून दोन पानांवर जाहिराती असतात ती—सोमवारीं रात्रीं तयार होऊन मंगळवारीं पहांटेस निघते. नवीं आणलेलीं हीं यंत्रें टिळक यांनीं स्वत: आपल्या हातांनीं बसविलीं व अद्यापही त्यांपैकीं एकाद्या यंत्रास विघ्न आलें तर सगळीं कामें एका बाजूस ठेऊन तीं सुरू करून देण्याकरितां त्यांना तिकडे जावें लागत असे. 'आर्यभूषण' छापखान्यास जोडून हीं यंत्रें ठेविलीं असतां एकदां एका सोमवारीं अशी गोष्ट घडली कीं, मजकुराची तर घाई होती व यंत्रें तर अडून बसलीं; तेव्हां स्वत: तेथें जाऊन त्यांनीं तीं सुरू केलीं. पण दहा पांच मिनिटें गेलीं न गेलीं तोंच पुन्हां तीं अडलीं. याप्रमाणें तास दीड तास जेव्हां पाहिलें तेव्हां लिहिण्याच्या सर्व सामानानिशीं मला तिकडे बोलावून त्यांनीं तसल्या किटकीटींत मजकूर सांगून टाकला!

केसरी मोठा करण्यांत कोणता हेतु होता हें वर सांगितलेंच आहे. पण त्याखेरीज आणखीही एकदोन हेतु होते, ते येथें सांगणें जरूर आहे. 'केसरी टिळकांचा व टिळकांनीं चालविला तरच तो चालावयाचा' अशी जी स्थिति त्याला प्राप्त झाली होती, ती नाहींशी होऊन योग्य माणसांच्या शिरावर त्याची जबाबदारी यावी हा एक मुख्य हेतु होता. केसरीचें धोरण आतां ठरल्यासारखें झालें आहे. तथापि, तें सांभाळून त्यांत प्रगति करण्याची योग्यता असणारीं माणसें महाराष्ट्रांत आजमितीस फार थोडीं आहेत; व जीं थोडीं आहेत त्यांतही सरकारी नोकरी वगैरेंच्या बंधनापासून मुक्त असलेलीं फारच थोडीं आहेत. ही स्थिति नाहींशी होऊन केसरी जोमानें चालविणारे लेखक आपल्या डोळ्यादेखत निपजावेत अशी टिळक यांची इच्छा असे; व ती सफल करण्याविषयीं त्यांचे प्रयत्नही चालू होते. सव्वीस सत्तावीस वर्षें पाणी घालून वाढविलेला व जोमांत आणलेला वृक्ष आपल्या पाठीमागें एकदम उन्मूलन न पडतां त्याला उत्तम फळें येऊन तीं आपल्या देशांतील लोकांनीं चाखावीं अशी त्यांची इच्छा असणें स्वाभाविक आहे; व त्या इच्छेच्या जोरावर त्यांनीं पुढील इमारत चढविण्याचा आरंभ केला. या इमारतीस टेंका देण्याचें काम आमच्यांतलि सुशिक्षित व बुद्धिवान् लोकांचें आहे; व देशाचें भावी हित जाणून त्यांनीं तें अवश्य केलें

पाहिजे. महाराष्ट्रांत किंबहुना साऱ्या हिंदुस्थानांत ‘एडिटर’ तयार करण्याच्या शाळा नाहींत ही गोष्ट खरी आहे. पण ज्याला इच्छा आहे त्याला एडिटर तयार करणारा एक तरी गुरु आहे, ही गोष्ट कांहीं कमी समाधान मानण्यासारखी नाहीं.* ‘मला आपला ह्मणा, आपल्या पाठशाळेंत घ्या, आपली संथा द्या,’ असें ह्मणणारे कांहीं विद्यार्थी आजमितीस तयार झाले आहेत व कित्येकांनीं या बाबतींत पत्रें पाठवून तर कित्येकांनीं समक्षही रदबदली केली होती. पण असे विद्यार्थी अगदीं थोडे आहेत. ते जर पुष्कळ होतील व योग्यतेनेंही चांगले असतील तर हा गुरु यांची चीज केल्यावांचून कधींही राहणार नाहीं.

राजकीय विषयांची माहिती करून देऊन राजकीय उन्नतीविषयीं झटणें, ही जरी केसरीची मुख्य दिशा आहे व याच दिशेनें जरी तो यापुढेंही जाणार आहे, तरी आतां त्याला बाकीच्या दिशांकडेही थोडें बहुत पाहतां येण्यासारखें आहे. यापूर्वी पत्र लहान व दिशा एकच अशी स्थिति

---

* एडिटरांच्या शाळांपासून व्हावा तसा उपयोग होतोच असे ह्मणतां येत नाहीं. तसे असतें तर इंग्लंड अमेरिकेसारख्या सुधारलेल्या राष्ट्रांत तशा प्रकारच्या स्वतंत्र शाळा असूनही तिकडे चांगले एडिटर निपजत नाहींत अशी कुरकुर न होती. एडिटराचा कैक वर्षे धंदा करून प्रख्यातीस आलेले मि. चार्लस ए. डना यांनीं ‘धि आर्ट ऑफ पेपर मेकिंग’ या पुस्तकांत अशा शाळांपेक्षां एकाद्या चांगल्या एडिटराचें ऑफिस हीच एडिटर तयार करण्याची चागली जागा असते असे ह्मटलें आहे. ते ह्मणतातः—

“It is impossible, in my judgment that there should be any special school which will take a young man intending to pursue the profession of journalism, after he has finished his college studies, and give him much valuable instruction in the duties and labors of his future professional life, and in that general experience in business which I recommend as most indispensable. There is only one school for that purpose, and that is the newspaper office; and the better the new-paper office, the more complete, the more varied and the more extensive the labors that it aims at and performs, and the better educated the young man who is going to learn his trade there, the more effectually will he earn it. The news-paper office is the best post-graduate college that the student of the news-paper profession can have. Let him get the best education possible and then go to work in a news-paper office, and the better the editor the better the instruction.”

असल्यामुळें औद्योगिक, धार्मिक, सामाजिक, वाङ्मयात्मक इत्यादि विषयांच्या चर्चेस त्यांत जागा मिळत नसे; व त्यामुळें पुष्कळ लोकांचें नुकसान होऊन कांहीं लेखकांनाही नाखुष करण्याचा प्रसंग येई. केसरी मोठा झाल्यामुळें ही अडचणही दूर झाली आहे; व हुषार लेखकांना निरनिराळ्या विषयांवर आपले विचार प्रदर्शित करण्याला चांगला मार्ग झाला आहे. या मार्गाचें कोणीं कसें अवलंबन केलें आहे व त्यांत काय सुधारणा झाल्या पाहिजेत याचें क्रमाक्रमानें विवेचन येईलच.

मोठा केसरी केला त्या वेळीं टिळक यांनीं आपल्या संस्थेकडे धंद्याच्या दृष्टीनेंही थोडेंबहुत लक्ष दिलें आहे. ह्मणजे वर्तमानपत्राचा धंदा फायदेशीर कसा होईल याही गोष्टीचा त्यांनीं विचार केला आहे. भांडवलवाल्यांचें लक्ष जाण्याइतका हिंदुस्थानांत वर्तमानपत्राचा धंदा भरभराटीस आलेला नाहीं, जी कांहीं भरभराट झाली आहे ती कित्येक देशाभिमानी गृहस्थांच्या कळकळीनेंच झाली आहे.* अशा स्थितींत टिळक यांनाच पत्राचे

---

* टिळक यांच्या कळकळीमुळे महाराष्ट्रांत जशी केसरीची भरभराट झाली तशी मद्रासेतील कांहीं देशाभिमानी गृहस्थांच्याच कळकळीने तिकडे 'हिंदु' पत्राची भरभराट झाली. सन १९०३ च्या सप्टेंबर महिन्यांत 'हिंदू'स पंचविसावे वर्ष संपून जेव्हां सव्विसावे लागले, त्या वेळीं त्याच्या व्यवस्थापकांनी जो समारंभ केला त्या वेळीं हिंदुस्थानांतील एकंदर पत्राच्या व विशेषतः 'हिंदु' पत्राच्या स्थितीविषयी त्यांनीं असा उल्लेख केला आहे:—

"News-paper enterprise in this country has not so far attracted the attention of capitalists and speculators. It has thriven by the efforts of patriotc men who disregarding the rewards of the legal profession or of the public service have affianced themselves to it. This is peculiar to Journalism in India, It has been specially so to the *Hindu*....... We were not unaware of the financial difficulties looming before us; but with the buoyancy of youth we thought we could surmount them. All of us were fresh from the College and had therefore no capital to speak of....... The brunt of the work fell upon Mr. Subramania Aiyar and myself ( Mr. Viraragavachari ); and it was therefore not possible for us to start anything more than a weekly paper,...... We resolved to issue the paper thrice a week, and in this form the paper was first launched on the 1st October 1883, ...... In 1889 we decided to run the Hindu as a daily paper, and accordingly from the 1st of the official year the paper took this form. I need hardly state that this new venture was not financially as successful as was anticipated. Though many of the

संपादक व्हावें लागलें आहे व यांनाच पत्राचे मालक होऊन सर्व व्यवस्थाही पाहावी लागली आहे. अर्थात् लेख लिहिण्याच्या जबाबदारीबरोबर पत्रांत नफा होतो कीं तोटा होतो, कोणतीं कामें कोणत्या वेळीं कशीं करवून घेतलीं पाहिजेत, धंद्यांत भांडवल किती घातलें पाहिजे व त्यांत काय सुधारणा केल्या पाहिजेत इत्यादि गोष्टींचा त्यांनाच विचार करणें भाग पडलें आहे. अलीकडे आठ दहा वर्षांत केसरी पत्रापासून टिळक यांना द्रव्यदृष्टीनें थोडा फायदा होत आहे. पण हा फायदा त्यांच्या योग्यतेच्या व श्रमाच्या मानानें अगदींच कमी आहे असें ह्मटलें पाहिजे. यासंबंधानें विशेष विवेचन पुढें करीन. येथें मुख्यत्वेंकरून एवढें नमूद करावयाचें आहे कीं, फायदा सगळा पदरांत टाकून कोणीकडून तरी संस्था चालवावयाची अशी त्यांची दृष्टी नाहीं. यामुळें ऑफिसमध्यें व कारखान्यामध्यें दुय्यम संपादक, म्यानेजर, प्रुफें तपासणारे, मनिऑर्डरी घेणारे, व्ही. पी. करणारे, पत्रांची नोंद करणारे व उत्तरें धाडणारे, पत्त्यांची व्यवस्था ठेवणारे, जमाखर्च लिहिणारे, मशिन्स चालविणारे, टाइप पाडणारे, खिळे जुळणारे, पत्रें वाटणारे, टपाल करणारे, वगैरे लहान मोठ्या दर्जाचे अनेक इसम अनेक हुद्यांवर नेमून त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांना पगारही देण्यांत येतो. तसेंच कामाची व पगाराची व्यवस्थाही बरी आहे. आतां अशा तऱ्हेचे महाराष्ट्रांत हें

---

subscribers to Triweekly gladly consented to pay the additional subscription, still there was a considerable deminution in the number of subscribers, and we had for a long time to conduct the paper irrespective of financial considerations...... I however recognized that the concern was a solemn trust and that, whatever became of me, it was necessary to place the *Hindu* on a satisfactory footing. I thought that the time was ripe for placing the whole concern on a popular basis and accordingly requested some of my friends to start a Company for conducting the Hindu and enlarging its usefulness. They readily responded to the call, and I hereby tender my heartfelt thanks to them for their ready response. A prospectus was issued and shares were invited. Nearly half the number of shares were taken up, there appeared to be no prospect of the other half being taken up, as public servants were not sure if they could take up shares in the concern. I accordingly asked the Government whether its servants could subscribe for shares, and my disappointment was great indeed when a *fiat* came forth that no officials could take shares or have interest of any kind in any of the Joint Stock concerns."

पहिलेंच ऑफिस असल्यामुळें व अद्याप तें पूर्णावस्थस आलें नसल्यामुळें त्यांत उणीवा असणें स्वाभाविक आहे. पण एकंदरींत ही संस्था चिरस्थाई व्हावी व ती आपल्या पाठीमागेंही अबाधितपणें चालावी अशी टिळक यांची इच्छा असल्यामुळें ती आपल्याच पायावर उभी राहण्याचे जितके प्रयत्न आहेत तितके करण्याचा त्यांचा संकल्प आहे ही गोष्ट विसरतां कामां नये.

## केसरीसंबंधीं आणखी कांहीं गोष्टी.

टिळक यांनीं मोठा केसरी चालविण्यास जे गृहस्थ मदतीस घेतले त्यांत रा. रा. दत्तात्रय गोपाळ लिमये बी. ए., व रा. रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर बी. ए. हे मुख्य होत. हे दोघेही नव्या उमेदीचे आहेत; व टिळक यांच्या सहवासानें आणि शिक्षणानें केसरी पत्रांत लेख लिहिण्याची चांगली पात्रताही त्यांच्या अंगीं आली असून साधारणपणें आज सात आठ वर्षें दुय्यम संपादकाचें कामही ते करीत आहेत. रा. रा. लिमये हे जितके मेहनती आहेत तितकेच व्यवस्थित व सोशिकपणानें काम करणारे असल्यामुळें स्फुट लेखांतील माहितीची मांडणी किंवा इतर लेखांची जुळणी ही ठाकठिकीनें होत असते. रा. रा. खाडिलकर यांच्या लेखनव्यवसायास टिळक यांजवरील १८९७ सालच्या राजद्रोहाच्या खटल्यानें चलन मिळालें; व टिळक यांच्या गैरहजेरींत उघडपणें नाहीं तरी अप्रत्यक्ष रीतीनें वर्ष दीडवर्ष केसरी लिहिण्याचें जोखमीचें काम आपखुषीनें त्यांनीं पतकरलें असल्यामुळें लेखणींत जोर कसा आणावा याचें अनुभवसिद्ध ज्ञान त्यांना सहजी प्राप्त झालें. त्या वेळच्या त्यांच्या लेखांनीं केसरीची इभ्रत कशी राखली याबद्दल खुद्द टिळक यांनींच "पुनश्चहरिःॐ" या लेखांत रा. रा. खाडिलकर यांनीं आपले पश्चात् 'बेमालुम सांधा जडविला' ह्मणून त्यांचा जो उघडपणे गौरव केला आहे त्यावरून सहजी व्यक्त होते.

दुय्यम संपादकाचे अथवा सब एडिटराचें काम जितकें जोखमीचें आहे तितकेंच महत्वाचें आहे; किंबहुना पत्राचें महत्व व वजन वाढण्यास पुष्कळ अंशीं दुय्यम संपादकच कारणीभूत होतो. राजकीय, सामाजिक, धार्मिक इत्यादि विषयांसंबंधानें लोकमत विवक्षित रीतीनें तयार कसें करावयाचें व पत्राचें धोरण कसें राखावयाचें यांकडे मुख्य संपादकाचें लक्ष असतें, व

तदनुरोधानें तो पत्रांतील अग्रलेखांसंबंधाची सगळी व्यवस्था जरी करीत असतो, तरी हें धोरण ओळखून इतर किरकोळ लेख, बातम्या, पत्रव्यवहार यांची परीक्षा करून त्यांची निवड करणें व ते व्यवस्थेशीर रीतीनें पुढें मांडणें हें काम दुय्यम संपादकाचेंच आहे. करितां त्या कामांत वाकबगार इसमाचीच जरूर लागते.* गेल्या सात आठ वर्षांत हें काम रा. रा. लिमये व खाडिलकर यांनीं पुष्कळ मेहनतीनें केलें असून त्यांची कामगिरी आज लोकांपुढें आहेच. ट्रान्सवालची लढाई, रूसो-जपानी युद्ध, स्वदेशी चळवळ इत्यादि विषयांची निवडक, आटपशीर व वाचकांची वाचनाकडे प्रवृत्ति होईल अशा पद्धतीनें त्यांनीं जी मांडणी केली आहे तीच त्यांच्या कामगिरीची मोठी साक्ष आहे. अलीकडे लोकांत वाचनाची अभिरुचि बरीच उत्पन्न झाली असून नुसत्या हिंदुस्थानांतील प्रचलित विषयासंबंधानें नव्हे, तर परदेशच्या लढाया, कारस्थानें किंवा इतर उलाढाली यांचीही त्यांना आवड उत्पन्न झाली आहे; अर्थात् या विषयांत मन घालून लोकांची भूक भागविणेंही पत्रकर्त्यांना जरूर झालें आहे. केसरी पत्रांत परदेशच्या या उलाढालीसंबंधाचे लेख लिहिण्याकडे रा. रा खाडिलकर यांची प्रवृत्ति विशेष असून एके प्रसंगीं अशा प्रकारची माहिती केसरींत लिहितेवेळीं टिळक खाडिलकरांना उद्देशून विनोदानें म्हणाले कीं, "हे

---

* विलायतेंतील प्रख्यात पत्रकार मि. जॉन डॉसन यांनी आपल्या 'प्रॅक्टिकल जर्नालिझम्' नामक ग्रंथांत सब--एडिटराचें महत्व येणेप्रमाणें वर्णिलें आहे:—

"To contribute towards the making of a good journal no one is so essential as an efficient Sub-editor. I think my brothren of the Press will agree with me that the sub-editor does more even than the editor to influence the success or non-success of a journal, particularly if that journal be a daily news-paper, or weekly sheet of general news. Every body reads news, but very few indeed peruse leading-articles, dramatic *critiques*, or the columns of matter which are frequently unjustly dignified by the name of art criticism. Setting aside the original matter-namely the leading-articles, dramatic and art criticism, etc., which the editor takes under his own control-all the literary contents of the journal are accepted, managed and arranged by the sub-editor and his assistants. It will, therefore, be readily understood how highly important it is that the services of a good " sub " should be secured if a news-paper venture is to succeed. Thoroughly capable " subs " are very rare on the Press, and the paper which possesses a throughly efficient man as the occupant of the sub-editorial chair may consider itself truely fortunate."

आमचे फॉरिन सेक्रेटरी आहेत; ते ही माहिती देतील!" असो; अशा रीतीनें दुय्यम संपादकांचें काम रा. रा. लिमये व खाडिलकर यांनीं सांभाळिलें असल्यामुळें टिळक यांच्यावरील बराच बोजा कमी झाला होता इतकेंच नव्हे, तर टिळकांचा अनुभव व ज्ञान यांची जोड या दोघां दुय्यम संपादकांच्या उत्साहास व मेहनतीस मिळाल्यामुळें जुन्या आम्रवृक्षाचें कलम नव्या झाडावर केल्याप्रमाणें होऊन त्याचीं गोड फळें हजारों वाचकांस चाखावयास मिळत आहेत.

मराठी वर्तमानपत्राच्या आजपर्यंतच्या इतिहासावरून पाहिलें तर वर्तमानपत्रांत बहुधां राजकीय, सामाजिक व धार्मिक विषयांवरच लेख पुष्कळ आले आहेत; व हल्लींही येत असतात. शेतकी, कलाकौशल्य, व्यापार, शास्त्र, वाङ्मय हे विषय फारसे कोणी हातीं घेत नाहीं व त्यावर मेहनतीनें आणि स्वानुभवानें लिहिलेले लेख तर क्वचित्च दृष्टीस पडतात. एखाद्या विषयाचें परिशीलन करून त्यावर हौसेनें लेख लिहिणाऱ्या गृहस्थांची तर फारच उणीव आहे. ही गोष्ट पुष्कळ अंशीं काल व परिस्थिति यांस अनुरूपच आहे. तथापि, धंद्याच्या दृष्टीनें चांगल्या चांगल्या लेखकांस कोणी हातीं धरल्यास वर्तमानपत्राच्या हल्लींच्या स्वरूपांत पालट झाल्यावांचून राहणार नाहीं. टिळक यांचा उद्देश अशा लेखकांस हातीं धरण्याचा होता; व योग्य प्रसंगीं तो ते तडीसही नेणार होते. ठिकठिकाणच्या बातमीदारांना नाखुष करणें भाग पडूं नये या हेतूनें त्यांनीं 'पत्रांचा सारांश' ह्मणून एक सदर केसरींत घातलें आहे. पण महत्वाच्या स्थानिक बातम्यांचा अद्यापही बाहेरून चांगला पुरवठा होत नाहीं. हा पुरवठा व्हावा ह्मणून हिंदुस्थानांतील—विशेषतः महाराष्ट्रांतील—मुख्य मुख्य ठिकाणीं चांगले व विश्वासू बातमीदार मिळविण्याचाही त्यांचा प्रयत्न चालू असे; व असे बातमीदार मिळतील तर केसरीचें वजन व उपयुक्तता याहीपेक्षां अधिक वाढेल. मुंबईस तर निरनिराळ्या प्रकारच्या उपयुक्त बातम्या पाठविणारे किंवा स्थानिक चळवळीवर सणसणीत लेख लिहिणारे एक दोन इसम अवश्य पाहिजेत. हल्लीं 'अनंता'चीं पत्रें केसरींत येतात तीं व्याख्यानांच्या किंवा सभांच्या वर्णनांचीं असतात. त्यांत व्यापारविषयक गोष्टींची चर्चा किंवा सामान्य जनांस गोडी लागेल अशा प्रकारची इतर माहिती कमी असते. मुंबई हें तर व्यापाराचें आगर आहे; व तेथील

बऱ्याच गुजराती व इंग्रजी पत्रांचा खप त्यांतील व्यापारविषयक लेखांनींच वाढलेला आहे. केसरीचे बरेच वर्गणीदार मुंबईस असून मुंबईच्या व्यापारी बातम्या इतर ठिकाणच्या लोकांसही लागतात. तेव्हां व्यापारविषयांत हुषार असणारा व विशेषतः बाजाराची ज्याला चांगली माहिती आहे असा आणखी एकादा हुषार बातमीदार मिळाल्यास त्याचाही उपयोग केसरीकडे करून घेण्याचा टिळक यांचा विचार असून तो अमलांत आणण्याचे त्यांचे प्रयत्नही चालू होते.

इतर ठिकाणच्या बातम्याप्रमाणेंच पुण्यांतील बातम्या अथवा स्थानिक वृत्त हेंही अद्याप केसरींत व्हावें तसें प्रसिद्ध होत नाहीं; तसेंच पुस्तकपरीक्षणाचें कामही केसरीकडून व्हावें तसें होत नाहीं. ह्मणून या कामांकडे स्वतंत्र मनुष्यांची योजना ते करणार होते. बुद्धिबळाचे डाव देऊन तो खेळ प्रिय असणाऱ्या लोकांचें लक्ष कांहीं दिवस त्यांनीं केसरीकडे वेधलें होतें. पण डाव देणारे गृहस्थ रा. रा. टोपे हे वारल्यामुळें तें काम अलीकडे बंद पडलें आहे. तथापि, हत्ती, घोडे इत्यादि चित्रांची आपल्या फाउंडरींत ओतविण्याची सोय करून कांहीं दिवसांनीं हा क्रम पुढें चालू ठेवण्याचा त्यांचा विचार होता. चरित्रात्मक किंवा मृत्युलेख लिहितांना अथवा लढाईच्या प्रसंगीं त्यांनीं कांहीं थोर पुरुषांचीं व प्रसिद्ध योद्धयांचीं चित्रें किंवा नकाशे देऊन वाचकांचें मन वाचनाकडे अधिक वळविण्याचा प्रयत्न केला होता, व उत्तरोत्तर हा प्रयत्नही जास्त करण्याचा त्यांचा मानस होता. इंग्रजी पत्राप्रमाणें 'शॉर्ट ॲडव्हर्टाइजमेंट्स' अथवा 'छोट्या जाहिराती' याचें एक व 'गृह्यसंस्कार' यांचें एक अशीं दोन सदरें काढून तीं आंतील मजकुराजवळ घालण्याची व्यवस्था केली आहे. या व्यवस्थेनें तात्पुरत्या व जरूरीनें जाहिराती देणारांची थोडी अधिक सोय झाली आहे. तथापि, जाहिराती जास्त आणि जागा थोडी यामुळें जाहिरातवाल्यांना पुष्कळ वेळां नाखुष व्हावें लागतें. ही गैरसोय केसरीचें आणखी एक पान वाढविण्याचा जो त्यांचा विचार होता त्यानें दूर झाली असती असें वाटतें. मजकुराजवळ मोठ्या जाहिराती घ्यावयाच्या नाहींत असें त्यांनीं ठरविलें असल्यामुळें 'पिंकपिल्स'सारखी जाहिरात पैशाची मोठी लालूच दाखविली असतांही त्यांनीं नाकारली. तसेंच पैशाच्या लालुचीनें अगर भिडेखातर मजकुरांत जाहिरातीदाखल एकाद्या क्षुल्लक

गोष्टीचा ते उल्लेख करीत नसत;* व हा नियम आपल्या गैरहजेरींत क्वचित् प्रसंगीं मोडला जातो, ह्मणून तसा न मोडण्याविषयीं ते व्यवस्थापकाला वरचेवर बजावीत असत. ऑफिस व कारखाना यांत निरनिराळ्या कामावर निरनिराळीं माणसें जरी ठेवलीं आहेत तरी श्रमविभाग व धंद्याच्या दृष्टीनें हीं कामें चालावीं तशी अद्याप चालत नाहींत. त्यामुळें प्रसंगविशेषीं ऑफिस किंवा कारखाना यांचें नुकसान होतें व प्रसंगविशेषीं काम करणाऱ्या इसमाचेंही नुकसान होतें. ही अडचण दूर करण्याचाही त्यांचा प्रयत्न होता; व यापुढें त्यांच्या संस्थेतील व्यवस्था करणारीं माणसें जितकीं जास्त मेहनती, सचोटीचीं, व्यवहारदक्ष, सुस्वभावाचीं, व उदार मनाचीं निघतील तितकें त्यांच्या इच्छेस अधिक यश येईल.

## ‘ मराठा. ’

‘ केसरी ’ बरोबर ‘ मराठा ’ नांवाचेंही एक इंग्रजी साप्ताहिक वर्तमानपत्र टिळक यांच्या मालकीचें आहे; व केसरी पत्र निघालें त्याच वेळीं या पत्राचा जन्म झाला हेंही पुष्कळांस माहित असेल. देशी भाषा प्रांताप्रांतांतून चालत असल्यामुळें त्या भाषेंतील पत्रांचा खप फार झालें तर त्या प्रांतांतून व्हावयाचा. पण इंग्रजी भाषा हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं चालत असल्यामुळें त्या भाषेंतील पत्रांचा प्रसार होण्यास प्रदेशाचीही व्याप्ति अधिक आहे. तथापि, एका रीतीनें वर्तमानपत्रांच्या संस्थेचें महत्व अद्याप कळावें तितकें कळत नसल्यामुळें, व एका रीतीनें ही संस्था जोरानें फोंफावण्यासारखें हिंदुस्थानचें वातावरण अनुकूल नसल्यामुळें प्रदेशाची व्याप्ति जरी अधिक असली तरी इंग्रजी पत्रांचा खप व्हावा तसा होत नाहीं, ही गोष्ट निर्विवाद आहे. बंगाल व मद्रास या प्रांतांतील इंग्रजी वर्तमानपत्रांची स्थिति आमच्या प्रांतांतील वर्तमानपत्राच्या स्थितीपेक्षां बरीच समाधानकारक आहे; व तिकडे नेटिवांनीं चालविलेलीं साप्ताहिकच नव्हत तर कित्येक दैनिक पत्रेंही चांगल्या जोमानें चाललेलीं आहेत. मुंबई इलाख्यांत नेटिवांनीं जोमानें चालविलेलीं साप्ताहिक इंग्रजी पत्रें फार थोडीं आहेत;

---

* मि. डना यांनीं पत्रकर्त्यास जे आठ नियम घालून दिले आहेत त्यांत हा एक आहे:—

“ Never print a paid advertisement as news-matter. Let every advertisement appear as an advertisement, no sailing under false colours. ”

व कलकत्ता किंवा मद्रास येथील नेटिवांनीं चालविलेल्या पत्रांच्या धर्तीवर एकही दैनिक पत्र इकडे नाहीं. एवढेंच नव्हे, तर निवळ नेटिवांनीं चालविलेलें असें दैनिक इंग्रजी पत्रच मुळीं मुंबई इलाख्यात नाहीं! अशा स्थितींत 'मराठा' वर्तमानपत्रांसारखें इंग्रजी वर्तमानपत्र अंगावर असलें तर त्यांत कांहीं मोठें नवल नाहीं. आतां हें पत्र नफा नसतां अंगावर ठेवण्यांत काय मतलब आहे, असा साहजिकपणें प्रश्न उत्पन्न होतो. करितां त्यासंबंधानें दोन शब्द लिहून नंतर आवांतर गोष्टीकडे वळतों. इंग्रजी भाषेंतील वर्तमानपत्रांकडे हरएक प्रकारच्या लोकशिक्षणाचें काम तर आहेच; पण लोकांचें काय ह्मणणें आहे, त्यांच्या अडचणी कोणत्या आहेत, त्यांच्या गरजा काय आहेत, इत्यादि गोष्टी सरकारच्या कानावर घालण्याचें–विशेषतः राजकीय विषयाची चर्चा करण्याची दिशा ज्या पत्रांनीं पतकरली आहे त्यांचें–काम आहे; व हें काम त्यांना सुलभ रीतीनें करतां येतें. मराठी पत्रांतील लेखांचीं भाषांतरें होण्यास व तींहीं बरोबर होऊन सरकारच्या कानावर जाण्यास किती तरी अवधी लागत असतो. तसा अवधी या इंग्रजी पत्रांचे कामीं न लागतां व दुभाष्याची किंवा इतर कोणा मनुष्याची जरूर न लागतां आपलें ह्मणणें आहे तसेंच सरकारच्या कानावर जातें. तसेंच एका प्रांतांतील लोकांचे विचार दुसऱ्या प्रांतांतील लोकांस कळण्यास इंग्रजी पत्र हेंच हल्लीं मुख्य साधन आहे. तात्पर्य, लोकांची बाजू सरकारापुढें मांडण्यास व ठिकठिकाणच्या लोकांत दळणवळण वाढण्यास इंग्रजी पत्र हें उत्तम साधन असल्यामुळें टिळक यांनी 'मराठा' पत्र हें मुद्दाम आपल्या अंगावर कां ठेविलें आहे याची वाचकांना कल्पना होईल. 'मराठा' पत्रास सुमारें हजार वर्गणीदार आहेत; व त्याचा आकार किंवा पृष्ठें हींही मोठीं नाहींत. तथापि, सर्वच गोष्टी कांहीं बाहेरच्या स्थूल आकारावर अवलंबून नसतात. 'मराठा' पत्र ज्या जोमानें चालविलें जातें तो जोम लक्षांत घेतला असतां, टिळक हे स्वदेशहिताच्या कळकळीनेंच ही झीज सोसण्यास तयार झाले आहेत असें कोणासही वाटल्यावांचून राहणार नाहीं.

'मराठा' पत्राची आतांची स्थिति पूर्वींच्या स्थितीहून भिन्न आहे. टिळक यांच्याकडे 'मराठ्या'ची मालकी आल्यावर केसरीबरोबरच या पत्राचेंही चालकत्व त्यांना पतकरावें लागलें. पण मराठी व इंग्रजी अशा

दोन्ही पत्रांचीं जोखमीचीं कामें नियमित वेळीं व बिनबोभाट पार पाडण्याचें काठिण पडूं लागल्यामुळें 'मराठ्या'चा बराच भार पुढें दुसऱ्यावर टाकणें भाग पडलें. या व्यवस्थेनेंच कै. नामजोशी, रा. रा. बोडस वगैरे 'मराठ्या'चे अनेक संपादक होऊन संपादकाचें काम आतां रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर यांच्यावर सोंपविण्यांत आलें आहे. मराठी वर्तमानपत्रापेक्षां इंग्रजी वर्तमानपत्र थोड्या निराळ्या पद्धतीनें चालवावें लागतें. याचें कारण इंग्रजी जाणणारे गृहस्थ मराठी जाणणाऱ्या गृहस्थांपेक्षां बरेच सुशिक्षित असतात; व निव्वळ मराठी वाचकांना ज्या गोष्टी प्रथमतः समजून द्याव्या लागतात त्यांपैकीं बऱ्याच त्यांना अवगत असल्यामुळें त्यापुढील शिक्षणाचा मार्ग त्यांना क्रमावा लागतो. दुसरें असें कीं, राजकर्त्यांची भाषा इंग्रजी पडल्यामुळें ते अथवा त्यांचे अधिकारी यांना कायदेकानू, राजकारण-शास्त्र, वादविवादाची पद्धत, इत्यादि गोष्टी माहित असल्यामुळें सरकारच्या कानावर घालावयाच्या गोष्टी वरील प्रकारास साजतील अशाच रीतीनें मांडाव्या लागतात. शिवाय इंग्रजी अंमलामुळें तिकडून इकडे आलेल्या ज्या संस्था आहेत त्यांचें ज्ञान, हेतु व उपयुक्तता हीं देशी भाषेपेक्षां इंग्रजी भाषेच्या द्वारें ज्यांनीं शिक्षण मिळविलें आहे त्यांना अधिक कळतात. त्यामुळें मराठी पत्रकर्त्यांना लोकमत तयार करण्याच्या अगोदर जशी वाचनाची अभिरुचि उत्पन्न करावी लागते तशी इंग्रजी पत्रकर्त्यांना करावी लागत नसून, मूळच्या पायावर चांगली इमारत कशी उठवावी एवढेंच काम त्यांच्याकडे असतें. कांहीं वर्षांपूर्वी केसरीचा टाक एक प्रकारचा कां आणि मराठ्याचा एक प्रकारचा कां, म्हणून जो प्रश्न निघाला होता, त्यास माझ्या मतें वरील विवेचनांत थोडेंबहुत समाधानकारक उत्तर मिळेल. आतां, मराठी भाषा ही किती झाली तरी आपली जन्मभाषा आहे व एका भाषेंतील स्वारस्य दुसऱ्या भाषेंत कशानेंही यावयाचें नाहीं; त्यांतून जेथें इंग्रजी भाषासरणी किंवा त्यांतील विचारपद्धतीचा कांहींच उपयोग व्हावयाचा नाहीं तेथें मराठी भाषा व त्यांतील विशेष रीतीची विचारपद्धति यांचेंच अवलंबन केलें पाहिजे, हीही गोष्ट वरील प्रश्नाचा विचार करतांना लक्षांत घेतली पाहिजे. हा मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रांतील फरक ज्या पत्रांत मराठी व इंग्रजी अशा दोन्ही प्रकारच्या भाषेंत मजकूर येतो—मग दोन्ही मजकूर लिहिणारे लेखक निरनिराळे असोत किंवा एकच असो—

त्यावरून कळून येईल. अशा दृष्टीनें पाहिलें ह्मणजे ' मराठा ' पत्राचें स्वरूप केसरीच्या स्वरूपापेक्षां किंचित् भिन्न कां, हें वाचकांस कळून यईल. या भिन्न स्वरूपामुळेंच आपल्या कामांत दक्ष असणारा संपादक इंग्रजी पत्रास पाहिजे. रा. रा. न. चिं. केळकर हे ' मराठ्या 'चे संपादक होण्यापूर्वी मराठ्यांत जरी चांगले लेख येत असत तरी धंद्याच्या दृष्टीनें निव्वळ संपादकाचें काम करणाऱ्या इसमाची त्याकडे योजना झाली नसल्यामुळें नुसत्या लाडक्या मुलाप्रमाणें त्याची स्थिति झाली, व त्याचे निवळ कोड पुरविल्यामुळें पोषण व वाढ याबरोबर त्याच्या अंगीं जे इतर गुण यावयास पाहिजे होते ते आणतां आले नाहींत. केळकर यांच्या हातीं तें पत्र आल्यावर त्यांत जरी सर्व गुण आले नाहींत तरी त्याला थोडें अधिक व्यवस्थित स्वरूप येऊन त्यांतील लेखांची मांडणी आणि दिशा हींही पुष्कळ अंशीं बदललीं आहेत यांत कांहीं शंका नाहीं.

राज्यपद्धतींतील दोष निर्भीडपणे दाखविण्याचें काम ' केसरी ' जसें करतो तसेंच ' मराठा 'ही करतो. त्यासंबंधानें सविस्तर विवेचन करण्याचें व उदाहरणें देण्याचें येथें कारण नाहीं. गेल्या आठ वर्षांत जमिनमहसूल, गौप्यगोपन, युनिव्हर्सिटी, वगैरेसंबंधीं जे अनेक कायदे पास झाले व दिल्ली—दरबार, वंगभंग, स्वदेशी चळवळ वगैरेसारखे जे प्रसंग घडले, त्यावेळीं ' मराठ्या 'नें ही कामगिरी किती अप्रतिम रीतीनें बजावली हें त्या पत्राच्या फायली चाळल्या असतां कोणासही दिसून येईल. राज्यपद्धतींतील दोषांबरोबर आमच्या पुढाऱ्यांच्या विचारांतील आणि वर्तनांतील दोषाविष्करणही ' मराठ्या 'नें वेळोवेळीं केलें आहे. हें राष्ट्रीय सभा, सामाजिक परिषद, स्वदेशी चळवळ, राष्ट्रीय शिक्षण, वगैरे त्यांत जे लेख आले आहेत त्यांवरून कळून येईल; व धर्म आणि नीति यासंबंधानेंही आपले उच्चतम विचार गणेशोत्सव, बिझांटबाई व मिसेस स्टॅनर्ड यांचें पुण्यास आगमन, रँग्लर परांजपे यांचा ' ईस्ट अँड वेस्ट ' मधील लेख वगैरे प्रसंगीं उत्तम रीतीनें व्यक्त केले आहेत. त्याचा थोडाबहुत मासला या पुस्तकांत कोठें कोठें त्यांतून जीं अवतरणें घेतलीं आहेत त्यांवरून वाचकांस कळून येईल. ' मराठा ' पत्रांतील विचारांची दिशा व लेखांचें धोरण हीं सामान्यपणें केसरींतील विचारांच्या दिशेप्रमाणें व धोरणाप्रमाणेंच असून तीं स्वाभिमान, स्वदेशाभिमान व स्वधर्माभिमान—

प्रेरक असतात. केळकर यांना पुष्कळ वेळां जरी टिळकांच्या मताप्रमाणें मराठ्यांत लिहावें लागलें आहे तरी त्यांचीं बरींच मतें टिळकांच्या मतांशीं जुळती आहेत व त्यांचा उत्साह, तरतरितपणा, विद्याव्यासंग, समता, इत्यादि गोष्टींची त्यांस जोड मिळाल्यामुळें कित्येक वेळां तीं फारच खुलून दिसतात.

द्रव्याच्या दृष्टीनें ' मराठा ' पत्रापासून टिळक यांस प्रत्यक्ष फायदा नसून उलट तें अंगावर आहे, हें वर सांगण्यांत आलेंच आहे. पण पैशा-खेरीज इतर गोष्टींसंबंधानें त्यापासून जे फायदे आहेत ते पुष्कळच आहेत. त्यांपैकीं मुख्य एक फायदा असा आहे कीं, इकडील भागांत हें पत्र वजनदार असल्यामुळें कलकत्ता, मद्रास, लाहोर या ठिकाणचीं अमृतबझार, बंगाली, स्टँडर्ड, हिंदु, ट्रायब्यून वगैरे सारखीं नेटिवांनीं जोमानें चालविलेलीं सुमारें १९—२० दैनिक पत्रें व हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत आठवड्यांतून एकदां, दोनदां किंवा तीनदां निघणारीं सुमारें पाउणशें इंग्रजी वर्तमानपत्रें व कांहीं मासिक पुस्तकें त्यास मोबदला येतात. याखेरीज इंग्लंड, अमेरिका, आफ्रिका, तुर्कस्थान, जपान, वगैरे परदेशांतीलही कांहीं पत्रें मोबदला येत असून वेळोवेळीं अभिप्रायाकरितां चांगले ग्रंथही येत असतात. ही सर्व सामग्री खरेदी करूं ह्मटल्यास वर्षास निदान तीन चार हजार रुपये तरी लागतील; व ' मराठ्या ' करतां केसरीस पैशाची बरीच झीज जरी सोसावी लागते तरी अशा रूपानें ' मराठा ' केसरीचें उसनें फेडल्याशिवाय राहत नाहीं. अशा प्रकारें भावाभावांतील परस्परांस मदत करण्याची बुद्धि व प्रेम हीं खरोखर अप्रतिम असून दोघांचीही देशहिताबद्दलची कळकळ कशी आहे हें सर्वांना महशूर आहे.

## बाबामहाराजांच्या इस्टेटीसंबंधाचा खटला.

पुण्यास बाबामहाराज ह्मणून एक पहिल्या वर्गांतील ब्राह्मण सरदार होते. ते वारले त्या वेळीं मृत्युपत्र करून त्यांनीं आपल्या इस्टेटीची व्यवस्था पाहण्याकरितां कांहीं पंच नेमिले. त्यांत टिळक हे एक होते. पुढें बाबा महाराजांच्या कुटुंबास पंच नकोसे वाटून त्यांनीं पंचांची व्यवस्था रद्द करण्याविषयीं सरकारांत दावा आणिला. या कामीं टिळक यांची जबानी झाली; त्यावरून त्यांनीं खोटी साक्ष दिली असा पुण्याचे डिस्ट्रिक्ट जज्ज मि. आस्टन यांनीं आरोप ठेवून त्यांच्यावर फौजदारींत काम चालविलें. या

प्रकरणाचे पोटींच ताईमहाराजांस ( बाबामहाराजांचे कुटुंबास ) वाड्यांत कोंडून ठेविलें; व रा. रा. नागपूरकर ( ताई महाराजांच्यातर्फे वागणारे एक पंच ) यांच्यावर दागिन्यांसंबंधानें विश्वासघाताची खोटी फिर्याद केली वगैरे गोष्टी उद्भवून हा खटला विकोपास गेला. खटला प्रथमतः स्पेशल म्याजिस्ट्रेट मि. क्लेमंट्स यांजपुढें चालून त्यांनीं टिळक यांस अठरा महिने सक्तमजूरी व एक हजार रुपये दंड अशी शिक्षा दिली. त्यावर डि. जज्ज मि. ल्यूकस यांजकडे अपील होऊन त्यांनीं दंड कायम ठेऊन अठरा महिन्याची शिक्षा सहा महिने केली. पुढें हायकोर्टांत चीफ जस्टिस मि. जेन्किन्स व जस्टिस बॅटी यांजपुढें तपासणी—अर्जाची चौकशी चालून अखेर टिळक हे सर्व आरोपांतून मुक्त झाले. खटला कसा उपस्थित झाला व त्याचा शेवट कसा झाला याची थोडक्यांत हकीकत एवढीच आहे. खटल्यांत किती साक्षी झाल्या, कमिशनें कोठें कोठें भरलीं, बॅरिस्टर व वकील कोण होते, कोणत्या कोर्टापुढें किती दिवस खटला चालला होता, कागदपत्र किती दाखल झाले इत्यादि गोष्टींचें एक 'भारत' असून तें देण्याचें हें स्थळ नव्हे व कारणही नाहीं. ज्याला ही हकीकत पाहिजे असेल त्यानें 'केसरी'च्या किंवा 'मराठ्या'च्या १९०२।०३।०४ या सालच्या फायली चाळाव्या. मला या ठिकाणीं मुख्यत्वेंकरून ज्या गोष्टींचें विवेचन करावयाचें आहे त्या ह्या कीं, खटल्याचें मूळ कोठे आहे, तो दुणावला कसा, टिळक यांजवर त्याचा परिणाम किती झाला, एकंदर समाजास तो कितपत भोगावा लागला, सार्वजनिक दृष्टया या खटल्याचें स्वरूप कसें होतें व अशा खटल्यापासून काय बोध घ्यावयाचा.

खटल्याचें मूळ कशांत आहे व तो कशानें दुणावला हें माझ्या शब्दांनीं सांगण्यापेक्षां टिळक यांच्याच शब्दांनीं सांगणें मला इष्ट वाटतें. ता. ८ मार्च सन १९०४ च्या केसरींत ते ह्मणतातः—

" 'गांव आहे तेथें म्हारवडा आहेच,' या ह्मणीप्रमाणे आमच्या पुणें शहरांतही बाण कवीनें ह्मटल्याप्रमाणें कांहीं 'अकारणाविष्कृत-वैर-दारुणाः' असे उपद्व्यापी लोक आहेत. ही मंडळी अमुकच एका मताची किंवा पक्षाची आहे असें नाहीं. ह्मणजे ते सर्व सुधारकही नाहींत आणि धर्माभिमानीही नाहींत; अथवा सर्व सुशिक्षितही नाहींत आणि अशिक्षितही नाहींत. यांच्या मैत्रीचें तत्व निराळेंच आहे. तें कोणतें ह्मणाल तर स्वार्थपरायणता आणि एकाद्या चांगल्या कृत्यास विघ्न आणण्याची हौस, किंवा पुरुषाचा द्वेष करण्याची बुद्धि हें होय. या तत्वावर एकत्र

झालेली एक लिमिटेड मंडळी आमच्या शहरांत आहे; आणि तिचे भागीदार वकील, व्यापारी, बॅंकर, कांहीं सुखवस्तु कायदेपंडित तर कांहीं सुशिक्षित व अशिक्षित गृहस्थ आहेत. हे सर्व तरुणच आहेत असें नाहीं, तर ज्यांच्या गोमय पुतळ्या ओंकारेश्वरावर गेल्या आहेत असे आबा, दादा किंवा भाऊसाहेबही यांत आहेत. या मंडळीचा उद्योग ह्मटला ह्मणजे श्रीमद्व्यासांनीं भारतांत सांगितल्याप्रमाणें "अन्ये मृतस्य क्रीडन्ति दारैरपि धनैरपि" हा होय. नागपूरकर जेव्हां शुद्धीवर होते तेव्हां खापर्डे यांस लिहिलेल्या पत्रांत अशा मंडळीस त्यांनी 'कुटाळ' ही संज्ञा दिलेली आहे; आणि या मंडळीपासून ताईमहाराजांस अलिप्त राखण्याबद्दल ते प्रयत्न करीत असत. पण पुढे जेव्हां ट्रस्टीची जबाबदारी न ओळखतां ते बिथरून गेले, तेव्हां याच मंडळीच्या कटांत सामील होऊन ज्या बाबामहाराजांनी त्यांस वाढविलें त्यांच्याशीं कृतघ्नपणा करण्यास त्यांनीं सुरुवात केली. नागपूरकर यांचीं हीं पत्रें कज्जांत दाखल झाली आहेत; करतां वरील विधानाच्या सत्यतेबद्दल आतां कांही शंका नाहीं. मि. ल्यूकस यांनीं आपल्या निवाड्यांत टिळक यांस शत्रू आहेत असें जें ह्मटलें आहे ते शत्रू हेच होत. यांस खऱ्या खोट्याचा फारसा विधिनिषेध नाहीं. उलट खऱ्यापेक्षां खोट्यासच ते जास्त महत्त्व देतात, व आपला नित्यक्रमही याच तत्वावर चालवितात. आज दोन अडीच वर्षे चालत आलेल्या खटल्याची पहिली उभारणी याच मंडळीनें केलेली आहे, व त्यांच्याच तत्वानें वागणाऱ्या कांहीं बड्या मंडळीचेंही त्यांस साहाय्य आहे. ताईमहाराजांच्या मांडीवर कोणी तरी लवकरच दत्तक देऊन ट्रस्टींनीं मोकळें व्हावें, असें सुचविणारे गृहस्थही हेच; आणि औरंगाबादेस त्यांच्या मांडीवर मुलास दत्तक देऊन येथें आल्यावर त्या कामांत कांही प्राप्ती झाली नाहीं असें पाहून नागपूरकर व ताईमहाराज यांस उलट भर देण्यासही हेच "पा-जी-" पंचक किंवा ल्यूकससाहेबांनी आपल्या निवाड्यांत म्हटल्याप्रमाणें unscrupulous लोकांचे मंडळ होय. परंतु या उपद्यापी लोकांस एवढें पक्कें माहीत होतें की, केवळ आपल्या प्रयत्नानें टिळक आणि खापर्डे यांच्याशीं आपणांस सामना देतां यावयाचा नाहीं. याकरतां त्यांनी एक अजब युक्ति काढली, आणि त्या युक्तीमुळें खटल्याचें स्वरूप अगदीं पालटून जाऊन त्यास इतकें महत्व आलें. ... ... ... वर सांगितलेल्या "पा-जी-" पंचकास आपला व्यूह सिद्धीस नेण्यास कोणा तरी समर्थाची जरूर होती; आणि तें सामर्थ्य सरकारच्या अंगीं आहे हें त्यांस माहीत होतें. परंतु सरकार आपल्या बाजूस कसें वळणार? बाजू कांहीं न्यायाची नव्हती; तेव्हां या मंडळीनें अशी युक्ति केली कीं, सरकारास जो मनुष्य अत्यंत अप्रिय आहे असें त्यांस वाटत होतें त्याचें, ह्मणजे टिळकांचें नांव पुढें केलें. आणि ताईमहाराजांस आस्टनसाहेबांच्या बंगल्यावर पाठवून त्यांच्यापुढें दीनवाणीनें "टिळकांनीं केलेला मुलगा मला पसंत नाहीं, टिळक आग्रही आहेत, करितां मला साहेबांखेरीज कोणी आतां त्राता राहिला नाहीं," अशी रड गायली! पंडितमहाराज

व येथील कुटाळमंडळी यांच्या कपटनाटकाची ही पहिली प्रस्तावना होय. आस्टन साहेबांपेक्षां कमी दुराग्रही किंवा विकारवश अंमलदार जर एजंटच्या जागेवर त्या वेळीं असता तर ही युक्ति या मंडळीच्या गळ्यांतच आली असती. पण ज्या साहेबानें वर्तमानपत्रांत एका एडिटरानें सरकाराविरुद्ध लेख लिहिला ह्मणून त्यास काळेपाण्याची शिक्षा देण्याचें सोडलें नाहीं, तो पुणें मुक्कामी ही मोठी शिकार सरकारच्या घरांत घालण्याची आलेली संधी फुकट कशी दवडणार? इंग्रजीत ह्मण आहे त्याप्रमाणें "बैलास जशी तांबडी चिंधी" त्याप्रमाणे या साहेबांस टिळकांचे नांव वाटत होतें; व त्यामुळें टिळकांवर केलेला हा आरोप खरा किंवा खोटा हे ऐकून घेण्याचीही त्यांस शुद्धि राहिली नाहीं. त्यांतून वर सांगितलेल्या उपद्यापी मंडळींपैकीं दिसण्यांत संभावित अशा कांही वयोवृद्ध लोकांची ताईमहाराजांस मदत आहे, असें कळल्याबरोबर तर साहेबांचें पित्त अधिकच भडकलें व त्यांनीं असा निश्चय केला कीं, अनायासें हातांत आलेली ही बडी शिकार साधून सरकारच्या ऋणांतून सुटून आपण कृतकृत्य व्हावें. ताईमहाराजांसारख्या तरुण विधवेनें अनाथ होऊन केलेली विनंति, त्यांस अनुकूल असलेल्या संभावित दिसणाऱ्या लोकांची इच्छा, व सरकारास अप्रिय झालेल्या टिळकांचा उच्छेद करण्याची संधी, इतक्या गोष्टी एकाच सपाट्याने करण्याची संधी आल्यावर आस्टनसारख्या दुराग्रही साहेबांची मति गुंग होऊन गांवांतील उपद्यापी गृहस्थांस त्यांचें पुरें पाठबळ मिळालें, व ताईमहाराजांस त्यांनी आपल्या पंखाखालीं घेऊन त्यांच्या संरक्षणार्थ सरदारांचे एजंट व डिस्ट्रिक्ट जज्ज या दोन्ही नात्याने ते तयार झाले यांत नवल तें कोणतें? मुंबईसरकारास टिळक हे कधीच प्रिय नव्हते. तेव्हां आस्टनसारख्या अनुभविक व हुषार जज्जानें पकडलेली शिकार योग्यच असेल असें त्यांस वाटणें अगदी साहजिकच आहे."

मि. क्लेमंट्स् यांजपुढें खटला सुरू झाला तेव्हां खटल्याच्या अगदीं आरंभीच्या स्वरूपावरूनसुद्धां त्यांत कांहीं जीव नाहीं असें पुष्कळांना वाटूं लागलें होतें; व पुढें पुढें तर टिळक यांच्यातर्फे जसजसा अधिक पुरावा येत चालला तसतसें "सरकार अजून हा खटला काय ह्मणून चालवितें?" असें ह्मणून खेड्यापाड्यांतील लोकसुद्धां आश्चर्य प्रगट करूं लागले. हा खटला चालविण्यांत सरकारचा कांहीं हेतु असो वा नसो, त्यापासून टिळकांचें व त्याबरोबर एकंदर समाजाचें पुष्कळ नुकसान झालें आहे एवढी गोष्ट खरी आहे. व्यक्तिशः टिळक यांचें प्रत्यक्ष जें नुकसान झालें तें एक द्रव्याच्या दृष्टीनें व दुसरें शरीराच्या दृष्टीनें. पैशाच्या बाबतींत त्यांनीं सरकाराबरोबर टक्कर मारणें किती दुर्घट होतें याची कोणासही कल्पना करतां येईल. तथापि, एकदां झुंज सुरू झाल्यावर मागेंपुढें पाहून उपयोगी

नाहीं असें समजून यांनीं लागेल तेवढा पैसा खर्च केला. या कामीं त्यांना कमींत कमी तीस हजार रुपये खर्च आला; व त्यांचे स्नेही किंवा इतर मंडळी यांनीं त्यांस मदत केली नसती तर ही रक्कम दुपटीच्या घरांत गेली असती! द्रव्यदृष्टीनें त्यांची तीस हजारांची तर हानी झालीच, पण शरीर-दृष्टीनें त्यांची जी हानी झाली तिची किंमतही करतां येत नाहीं. आज अमुक वाजतां कोर्ट भरावयाचें आहे, निघा घाईघाईनें जेवण करून; उद्यां अमक्या साक्षीदारास अमुक प्रश्न विचारावयाचे आहेत, ठेवा त्यांचें टिप्पण करून; परवां हायकोर्टांत अपील आहे, करा मुद्यांचा खल; मधाशीं अर्ज लिहिला, तर आतां तार केली पाहिजे; काल उमरावतीस होतों, तर आज औरंगाबादेस गेलें पाहिजे व आज औरंगाबादेस आहे तर उद्यां पुण्यास गेलें पाहिजे; तसेंच आज अमका वकील येत नाहीं ह्मणतो, करा दुसऱ्याची तजवीज; उद्यां अमक्या कागदानें नडणार आहे, आणा तो कसेंही करून; याप्रमाणें दररोज कांहीं नाहीं कांहीं तरी खटल्याचें शुक्लकाष्ट पाठीमागें असल्यामुळें वर्ष दीडवर्ष त्यांच्या जिवाला स्वस्थता कशी ती मिळाली नाहीं; व त्यांचें धैर्य कांहीं विलक्षण असल्यामुळें त्यांनीं ह्मणूनच तो त्रास सोसला; इतर कोणी असता तर त्याच्या तोंडचें पाणी केव्हांच पळालें असतें. वयपरत्वें अगोदर त्यांची शक्ति क्षीण होत चाललेली, त्यांतून १८९७ सालच्या त्रासाची छाया त्यांच्या तोंडावर पूर्णपणें न मावळलेली; अशा स्थितींत पुन्हां दगदगीचा मार्ग तुडविण्याचा प्रसंग आल्यामुळें शरीरस्वास्थ्य बिघडून त्यांचें फार नुकसान झालें. या अस्वास्थ्यानें त्यांच्या आयुष्याचीं निदान पांचचार वर्षें तरी तोडलीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं; व पुढाऱ्यांची अशी पांचचार वर्षांची हानी ह्मणजे राष्ट्राच्या आयुष्याची किती हानी याची वाचकांनींच कल्पना करावी! असो; या खटल्यानें त्यांचें स्वतःचें तर पुष्कळ नुकसान झालेंच; पण त्याबरोबर महाराष्ट्राचेंही पुष्कळ नुकसान झालें आहे. यांना स्वस्थता मिळती तर त्यावेळीं पोलिस कमिशनपुढें यांची जी साक्ष होणार होती ती झाली असती व त्यांत पोलिस खात्यांतील कित्येक दोष त्यांनीं दाखविलें असतें. तसेंच केसरींत अनेक प्रकारच्या सुधारणा होऊन त्यांचे प्रगल्भ विचारांनीं भरलेले पुष्कळ लेख महाराष्ट्रांतील लोकांस वाचावयास मिळाले असते; व निरनिराळ्या संस्थांत जास्ती तरतरी येऊन त्या अधिक

जोमानें चालल्या असत्या. थोर पुरुषाची एक कल्पना ह्मणजे हजारों हत्तींचें बळ, व थोर पुरुषाचा एक अनुकूल शब्द ह्मणजे कार्याची हां हां ह्मणतां उठावणी, असा सामान्य नियम आहे. या नियमाप्रमाणें टिळक हे वरील व्यवधानापासून मुक्त असते व त्यांचे लेख सतत त्यावेळीं केसरींतून यत असते तर महाराष्ट्र चैतन्यानें भरला राहून त्याची केवढी प्रगति झाली असती! महाराष्ट्राच्या या प्रगतीस सरकारानें जाणूनबुजून अडथळा केला नसला तरी सरकारी अधिकाऱ्यांच्या वर्तनानें तो उत्पन्न झाला एवढी गोष्ट खरी आहे; व पुढेंमागें विसाव्या शतकाच्या आरंभीचा महाराष्ट्राचा कोणी इतिहास लिहिला, तर तो या गोष्टीचा प्रमुखत्वानें उल्लेख केल्यावाचून कधींही राहणार नाहीं. आतां या खटल्यापासून जसे कांहीं तोटे झाले आहेत तसेंच कांहीं नफेही झाले आहेत. त्यांत एक नफा असा आहे कीं, थोर मनुष्यावर संकट आलें असतां तो धैर्यानें त्याशीं कशी टक्कर देतो हें टिळक यांनीं प्रत्यक्षपणें आपल्या उदाहरणानें दाखविलें. त्यांच्या खासगी वर्तनास धोका यावा अशा प्रकारची या खटल्याची उभारणी होती; पण सत्याच्या जोरावर त्यांनीं ती सपशेल ढांसळून पाडली. दुसरें असें कीं, या खटल्यासंबंधानें “ विकत श्राद्ध घेऊन तुह्मी कशाला तर्पण करतां? ताईमहाराज जाणे, त्यांची इस्टेट जाणे. कांहीं कां होईना, तुह्मी घरीं स्वस्थ बसा, ” असा उपदेश करणारीं माणसें पुष्कळ भेटलीं होतीं; पण टिळक यांनीं त्यास न जुमानतां बाबामहाराजांच्या वचनास स्मरून त्यांनीं जी एकदां कंबर बांधली ती शेवटपर्यंत सोडली नाहीं. या त्याच्या वर्तनावरून थोर माणसें मैत्रीला किती महत्व देतात ही गोष्ट लोकांस चांगली पटली. वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें केसरी पत्रांत वर्ष दीडवर्षांत टिळक यांनीं लिहावे तितके लेख न लिहिल्यामुळें प्रत्यक्षपणें महाराष्ट्रदेश त्यांच्या सुविचारास कांहीं काल पावेतों मुकला ही गोष्ट खरी आहे. तथापि, संकटांशीं धैर्यानें तोंड देणें, मित्राचें अंगिकारलेलें कार्य शेवटास नेणें, इत्यादि गोष्टींनीं महाराष्ट्रांतील लोकांस जो त्यांनीं अप्रत्यक्षपणें उपदेश दिला तो कांहीं कमी महत्वाचा नाहीं, ही गोष्ट पण ध्यानांत धरली पाहिजे.

कित्येक लोक हा खटला सार्वजनिक न समजतां व्यक्तिविषयक समजतात. पण माझ्या मतें ही चूक आहे. टिळक हे एक महाराष्ट्रांतील पुढारी आहेत; व पुढारी पुरुष ही अनेक दृष्टीनें खासगी व्यक्ति नसून राष्ट्रीय व्यक्ति

आहे. अर्थात् अशा पुरुषाच्या कृतीचा परिणाम राष्ट्रावर होत असतो. टिळक हे आजपर्यंत अनेक अडचणींतून तावून सुलाखून निघाले असल्या-मुळें व कांहीं थोडे लोक त्यांच्याविरुद्ध असले व त्यांतही कांहीं त्यांचे शत्रु असले तरी आपल्या कृतीनें त्यांनीं बहुजनसमाजाचा विश्वास व प्रीति संपादन केली असल्यामुळे त्यांच्या हातून वर सांगितल्याप्रमाणें भयंकर अपराध कधींच घडावयाचे नाहींत, अशी लोकांची बालंबाल खात्री होती; व ह्मणूनच त्यांस त्रास होण्यासारखी यःकश्चित् गोष्ट जरी खटल्यांत उत्पन्न झाली तरी त्याबद्दल लोकांस हळहळ लागून त्यांचा जीव खालवर होई. टिळक यांसही जें मोठें जड गेलें तें हेंच होय. हिंदुस्थानांत सार्वजनिक कामांत पुढारीपणा घेणाऱ्या गृहस्थाची नीतिमत्ता वाईट असते, असें सिद्ध कर-ण्याच्या प्रयत्नानें जाणूनबुजून हा खटला उपस्थित झाला असून त्याला अडचणींची खुबिदार जाळीं अथवा सापळे तयार करणाऱ्या आस्टन सारख्या हुषार जज्जाच्या मेंदूची मदत मिळाल्यामुळें "मी खरोखरच गुन्हा केला आहे, अशी लोकांची समजूत होईल काय?" अशा विचारांनीं त्यांचें मन किती उद्विग्न होत असेल याची वाचकांनींच कल्पना करावी!* असो;

---

* या वेळीं रा. रा. टिळक हे कोणत्या अडचणीत होते व त्यांची किती चमत्कारिक स्थिति होती याचे 'मराठा' कर्त्यांनी ता. ६ मार्च १९०४ च्या अंकांत पुढीलप्रमाणें चित्र रेखाटलें आहे:—

"The commitment was made on the 4th of April 1902 which may be taken as perhaps the darkest day that ever dawned for Mr. Tilak throughout his life, though his life has admittedly been one filled with events and vicissitudes. Just conceive a man of Mr. Tilak's position, standing before the world, which already contained a large number of prejudiced critics, a fair number of active and bitter opponents, and the whole world of officialdom as his sworn enemy–conceive a man in these conditions judiciously denounced by a District Judge as an obstinate, high-handed, unchivalrous and unscrupulous character whose hand did not stop even at perjuries and forjuries against a weak and defence-less girl in a high family who had not yet emerged out of her teens! Here was a man who was already convicted for sedition and violence, an offence, however of a purely public character; but now was his turn come for the bottom being knocked out of him and for his being exposed to the world as a character as un-worthy in private as it had been proved to be in public life!! The world wondered and stared and then blinked and stood aghast! Mr. Aston figured for the hour as a successful fisherman who had

उभयपक्षीं जो इतका त्रास झाला तो टिळक ही राष्ट्रीय व्यक्ति असल्या-मुळें त्यांच्या खटल्यास सार्वजनिक स्वरूप येऊनच झाला.

या खटल्यास सार्वजनिक स्वरूप येण्याचें दुसरें कारण असें कीं, वास्त-विकपणें हा खटला दोघा पक्षकारांमध्येंच चालवयास पाहिजे होता, सर-कारानें त्यांत पडण्याचें विशेष कारण नव्हतें. पण ताईमहाराजांचीं भांडणें भांडण्याचें काम सरकारानें जेव्हां आपल्या अंगावर घेतलें व त्यांत रय-तेच्या पाऊण लाख रुपयांचा जेव्हां चुराडा उडविला, तेव्हां लोकांचें लक्ष साहजिकच या खटल्याकडे वेधलें. बरें, ताईमहाराजांचा एक पक्ष सरका-रानें उचलला तो उचलला; पण चौकशीच्या कामीं सरकारची वागणूक न्यायास अनुसरून तरी असावयास पाहिजे होती. ताईमहाराजांस वेळीं अवेळीं हव्या त्या सवलती देण्यांत याव्या, व टिळक यांस तरवारीच्या

caught in his fine and far reaching net the big truculent fish that had run riot in the waters of public life in scornful defiance of the efforts of tho Police and the other patent agencies of Government! Mr. Aston's was adjuded to be a thorough haul to the success of which, however, his legal acumen as a Judge and his skill as an investigator of facts deemed to have contributed as much as his good fortune that comes round but rarely! It is not every Civilian that gets such a golden opportunity to distinguish himself and to serve his masters andMr. Aston had apparently made the best of the one he had got! His interest in the case could obviously be only of a judicial character, and what possible end other than that of doing juscice could he have in view in sitting as he did day after day late till the court-house had to be lit up with candle light, racking his brain and wearing his flesh to the obvious neglect and even detriment of other work Civil and Criminal that had accumulated for disposal by him for about two months? Mr. Tilak himself was a lawyer and was represented in Mr. Aston's Court by pleaders; and it must, it was naturally believed by many, evidently be put to the total want of a case for him that he could not put one before Mr. Aston! The gag that was applied to his month apparently came from the disclosure of hideous truth, and both the unsympathsing and even sympathising world wondered whether and what sort of a defence Mr. Tilak might be able to make before the Magistrate! To a man of Mr. Tilk's education and position the hour must have indeed proved the darkest! But as will be shown later on the lamp of faith was burning bright within him and those few alone who knew the kind of faith he had in him could discern the faint and the distant silver lining with which even the heavy and the black clouds hanging over his head were relieved."

धोरेवर धरावें हा कोणासही उघड उघड पक्षपात दिसल्याशिवाय राहणार नाहीं. हें एक असो; पण ताईमहाराजांचा पक्ष उचल्यावर तो कितपत टिकेल, यांत जय येईल कीं नाहीं याचा विचार न करतां टिळकांनीं गुन्हा केलाच आहे अशा प्रकारचें आपलें मन कलुषित करून घेऊन जो पुरावा पुढें आणला त्यानें उलट सरकारचें हंसें मात्र झालें; एवढेंच नव्हे तर, ' ताईमहाराज हें सरकारच्या हातांतलें शस्त्र आहे, कीं सरकार ताईमहाराजांच्या हातांतलें शस्त्र आहे ' असें वाटून सरकारच्या न्यायपद्धतीचा लोकांस अचंबा वाटला! न्यायाची पद्धत सर्वत्र सारखी असली पाहिजे; पण टिळक यांच्यावरील खटल्यांत ती तशी नसल्यामुळें, एवढेंच नव्हे तर उलट ती विलक्षण असल्यामुळें सर्व लोकांचें लक्ष आपोआपच तिकडे लागलें. सारांश, राष्ट्रीय व्यक्ति, पुढारी, सार्वजनिक पैशाचा विनियोग, न्यायपद्धति इत्यादि गोष्टींनीं या खटल्यास सार्वजनिक स्वरूप आलें होतें, ही गोष्ट कोणासही नाकारतां यावयाची नाहीं.

असो; अशा प्रकारचें सार्वजनिक स्वरूप या खटल्यास आल्यामुळें टिळक यांस वेळोवेळीं जो त्रास झाला त्याबद्दल महाराष्ट्रांतील लोकांसच नव्हे, तर हिंदुस्थानांतील सर्व लोकांस वाईट वाटलें. यासंबंधानें त्या वेळचें ठिकठिकाणचें लोकमत थोडक्यांत येथें दिलें असतां अप्रासंगिक होणार नाहीं.

मि. क्लेमंट्स यांनीं जेव्हां शिक्षा सांगितली त्यावेळीं लाहोरच्या ' ट्रायब्यून ' पत्रानें पुढील उद्गार काढले आहेत :—

" It is needless to say that all India will await with suspended breath the result of the appeal from the Magistrate's judgment. We must add that the majority of our countrymen are not waiting for the higher Court's verdict in order to rebuild their estimate of Mr. Tilak, his work and character. His hold on the minds of his host of friends and admirers is not of a nature to be affected by verdicts of Law Courts. He has lived and worked in full view of the public, as it were, all his days. There is no mistaking such a character; it is unfolded to its inmost depths before the eyes of all who know him. A Court of law, on the other hand, is liable to errors and misconceptions. "

मि. क्लेमंट्स हे टिळक यांना शिक्षा देणार असें साधारणपणें पूर्वीच लोकांस कळून चुकलें होतें. पण मि. ल्यूकस यांच्यासंबंधानें तसें नव्हतें. त्यांच्यापुढें चाललेल्या चौकशीच्या एकंदर स्वरूपावरून टिळक हे सुटतील अशी पुष्कळांना आशा होती. पण तेथेंही जेव्हां निराशा झाली त्यावेळीं

लोकांना फारच वाईट वाटलें. यासंबंधाची हकीकत देतांना पुण्याच्या 'डेक्कन हेरल्ड' नांवाच्या इंग्रजी दैनिक पत्रानें दुसरे दिवशींच्या अंकांत असें ह्मटलें आहे :—

"The announcement of the sentence came as a rather unexpected revelation."

'अमृतबझार पत्रिका'कारांना तर या शिक्षेनें दुःखाबरोबर संताप उत्पन्न होऊन त्या आवेशांत त्यांनीं पुढील उद्गार काढले आहेत :—

"The news of Mr. Tilak's imprisonment, it is needless to say, will create profound sensation in the country. That the case would end in this way was not even dreamt of by any one. But, it seems, Mr. Tilak was born at an unlucky moment, and so it is his lot to suffer. In the Kolhapur case he was sent to jail; in the 'Kesari' case he met with the same fate; and the present case has also proved disastrous to him. One of the gentlest of men, Mr. Tilak has scarcely any enemy amongst his countrymen except a few who belong to a rival faction. Endowed with high intellectual powers, he commanded the respect of even such an illustrious Svant as Prof. Max Muller. But he has never been able to please the authorities and therefore he suffers. His only consolation lies in the fact that there are millions of hearts who will weep for him. If bitter tears can remove misery, Mr. Tilak will be able to bear up this fresh misfortune with fortitude. We fear, however, this time he will not return alive; for he has not yet been able to fully recover from the effects of his last incarceration. We wish he were not born at all, or he had died long ago; for then his countrymen would not have been subjected to all this excruciating pain on his account."

मि. ल्यूकस यांच्या निकालानें लोकांना दुःख तर झालेंच; पण त्याहीपेक्षां पोलिसांनीं त्यावेळीं टिळक यांच्या हातांत बेड्या घालून त्यांना अपमानास्पद रीतीनें तुरुंगांत नेल्याबद्दल जास्त वाईट वाटलें. या संबंधानें लिहितांना कलकत्याच्या 'पीपल अँड प्रतिभाषी' नांवाच्या दैनिक इंग्रजी पत्रानें असें ह्मटलें आहे :—

"We were not by any means prepared for the startling and shameful tidings which reached us yesterday; the news of a distinguished Native Gentleman of Bombay having been in the Court, and in the presence of the Dist. Judge of Poona manacled as a common felon. We say at once, and we say with the strongest feeling, shame upon all the perpetrators of this foul and disgraceful act. Whence the necessity for hand-cuffing Mr. Tilak? Was it through fear of his escaping? Nothing of the kind. It was, some might say, to gratify the spite of a few Government underlings, who experienced the delight which the

coward always feel by treading on the fallen man. This barbarous and inhuman treatment of Mr. Tilak brings forcibly to our minds the treatment which the Great Earl of Montrose met with at the hands of the Scottish covenanters:—

" They brought him to the water-gate "
" Hard bound with hempen span. "
" As if they held a lion there, and not a fenceless man. "

In such a predicament, we say, Mr. Tilak now stands. Our only wonder is and we wonder much indeed, why the Governor of Bombay stands by, with his hands in his pockets, and in his Presidency such a shameful act takes place, an act, the consequence of which may be very far-reaching indeed. It was first but a small matter that set the Indian Mutiny afoot, and if would we think be well to avoid a repetition of such unfortunate mistakes. "

'सुधारक'कारांनाही सदर कृत्याबद्दल वाईट वाटून त्यांनीं ता. ११।१।०४ च्या अंकांत पुढील उद्गार काढिले आहेत :—

" आमच्या पोलिस अधिकाऱ्यांनीं मात्र आपल्या अधिकाराचें वाजवीपेक्षां फाजील प्रदर्शन केलें असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. टिळकांस शिक्षा सांगितल्यानंतर कांही वेळ ते कोर्टांतच बसले होते. पोलिस बहादुरांचा त्यांजवर पहारा होता, हे सांगणे नकोच. थोड्या वेळाने त्यांस कोर्टाच्या अंगणांत उभी असलेल्या गाडीकडे नेतांना त्यांनी तशीच सौम्यता धारण केली असती तर बिघडलें असते असे नाहीं. टिळक त्यांच्या हातावर तुरी देऊन पळून जात नव्हते किंवा दुसरा कांही अनिष्ट प्रकार घडत नव्हता. असे असतां त्यांच्या हातांत हातबेड्या घालण्यास त्यांनी कमी केले नाही. हात अशा रीतीने बांधलें गेल्यामुळे त्यांस गाडींत चढण्यास बराच त्रास झाला. बंदोबस्त कडेकोट ठेवणें हें पोलिसाचे काम आहे; पण प्रसंगांत सांपडलेल्या सभ्य मनुष्याच्या दुःखावर डाग देण्यासाठीं त्याचा अधिक अपमान करणें हे आपलें कर्तव्य आहे, असे पोलिसांनीं मानण्याची गरज नव्हती असे आह्मांस वाटतें. "

मुंबई हायकोर्टानें यांना आरोपांतून मुक्त केल्यावर तर या खटल्यासंबंधानें बहुतेक सर्व वर्तमानपत्रांतून टीका होऊन यांच्यासंबंधानें त्यांनीं चांगली सहानुभूति प्रगट केली. या सर्व टीकांचा येथें समावेश होणें अशक्य असल्यामुळें महत्वाच्या टीकांपैकीं थोडा थोडा भाग येथें देतों :—

" A case of this character has a very prejudicial effect on the mind of those who are always endeavouring to impress with the soundness and impartlality of British justice. In this case the personality of Mr. Tilak has nothing whatever to do with the

question. A grave injustice has been inflicted on a subject, and it has only been by persistence, the expenditure of considerable sums of money, and finally, an appeal to the High Court, that justice has been obtained."

*The Advocate of India.*

*   *   *   *

"If the judgment of the High Court has saved Mr. Tilak's moral character, it has also done an important service in other directions. It will check at least partially the spirit of Lee-Warnerism the dominating influence of which may be traced in some of the phases of the history of Mr. Tilak's trial. Educated Indians, whether Brahmins or non-Brahmins had a heavy stake in the criminal proceeding, instituted against them. Their honour and reputaion was also at stake to a extent. We, therefore heartily welcome the decision of the High Court on personal as well as larger grounds........Let us sincerely hope that his recent troubles and misfortunes will now be the last and that no other countyman of ours will ever be made to undergo such ill-deserved prosecution or be made the victim o such heartless persecution."

*The Gujarathi.*

*   *   *   *

"The Tilak case exhibits, in its unrevised stages, one of the most extraordinary miscarriage of justice that have been known in India. To find a parallel to such a failure of Magisterial and Sessions Court law we must go back to the lurid days of Hastings and Nankomar, though unfortunately for Nankomar, in his case it was the High Court that failed and there was no power to which he could appeal from the failure. Had there been any possibility of formulating in the Tilak case charges of equal gravity with those upon which the un-happy Nankomar was done to death, there would seem to be little room for doubting that the unrevised sentence in the latter case would have been as fatal as in the former. But Mr. Tilak has to thank his stars that the times have changed and that, although there are probably still in India a plentiful crop of would be Hastings, the Supreme Courts are no longer dominated by judges of the stamp of Impey, and we may add, of Jeffreys." —*The Oriental Review.*

*   *   *   *

"Mr. Tilak's character has shone forth more brilliantly like gold after being tested by fire. But the blot in the Character of Government will not so easily be effected."

*The Amrit Bazar Patrika.*

*   *   *   *

"He ( Mr. Tilak ) has had to spend large sums of money to defend himself against an unjust and unrighteous prosecution. He was humiliated in all possible ways, even when there was no

necessity or justification for subjecting him to humiliation. And the only satisfaction that he can now have is that the attack on his honour has miserably failed. The Government, which, dragged him into this prosecution, is not likely to think of paying him a compensation. Yet it cannot now deny that it has inflicted the cruelest hardship and injustice on him."—*The Hindu.*

* * * *

"The large powers with which criminal courts in this country are entrusted were certainly never intended for executive officers of Government to try with. It is certainly no joke to keep a criminal prosecution hanging over the head of an innocent person for over two years. We have no means of finding out the names of the persons who advised Government to undertake this prosecution. But we may say this much that never was official incompetence and official imprudence carried to such extremes as in the imitation of criminal proceedings against Mr. Tilak on grounds which have now been judicially pronounced by the highest tribunal in the land, to have been of the filimiest.... The special Magistrate had done the special work entrusted to him according to his lights or according to his instructions and he is already in the enjoyment of a good reward for his inestimable services. But his judgment will ever remain a monument of his special Magisterial gifts. The punishment which Mr. Clements inflcted on Mr. Tilak was certainly Draconian. But fortunately his decision was subject to revision by two higher tribunals and did nothing more than astound the public by its enormity.

*The Indu Prakash.*

वरील उताऱ्यावरून टिळक यांजबद्दल लोकांची किती सहानुभूति होती हें समजून येईल. पत्रकर्त्यांच्या या सहानुभूतीखेरीज लोकांचीही सहानुभूति बरीच होती, हें त्यांच्याकडे वेळोवेळीं ज्या शेंकडो तारा व पत्रें आलीं त्यावरून उघड होत आहे. स्पेशल म्याजिस्ट्रेट मि. क्लेमंट्स यांनीं शिक्षा दिल्यावर हे जेव्हां जामिनावर सुटून आले त्यावेळीं एक दोन दिवसांनीं पुण्यास जो गणेशोत्सव झाला त्यांत अखेरच्या दिवशीं समारंभानें मिरवणूक निघाली असतां "आह्मांस तुह्मांला डोळेभर पाहून घेऊं द्या," असें ह्मणून वाटेंत हजारों स्त्रीपुरुषांनीं त्यांच्या गळ्यांत हार घालून त्यांच्या पायांवर लोटांगण घेतलें तो देखावा तर अपूर्व होता! त्यावेळीं लोकांची वाटेंत इतकी गर्दी झाली होती कीं, 'आपल्यामुळें इतकी गर्दी झाली आहे, आपण जर पुढें जाल तर आह्मांस बंदोबस्त करण्यास ठीक पडेल' असा पोलिसांनाही त्यांना विनंति करण्याचा प्रसंग आला. मुंबई हायको-

टानें ज्या दिवशीं त्यांना आरोपांतून मुक्त केलें त्या दिवशींही पुण्यांतील लोकांनीं फारच चांगला समारंभ केला होता. त्यांना गाडींतून मिरवीत नेऊन ठिकठिकाणीं पानसुपारी केली व आनंदप्रदर्शनार्थ पेढ्यांचीं ताटेंच्या ताटें वाटलीं* एवढेंच नव्हे तर, पुढें रेमार्केटच्या पटांगणांत जंगी जाहीरसभा भरवून त्यांचें व त्यांच्यातर्फे काम करणारें ना. दाजीसाहेब खरे व दादासाहेब करंदीकर यांचें उघड रीतीनें मोठ्या थाटानें अभिनंदन केलें. यावेळीं इतकी दाटी झाली होती कीं, माणसास पाय ठेवावयास मध्यें जागा नव्हती. गांवच्याप्रमाणेंच परगांवचेही पुष्कळ लोक जमले असून बाहेरगांवच्या कित्येक लोकांकडून व संस्थांकडून त्यांना मानपत्रेंही आलीं होतीं. याच वर्षी जुन्नर सारख्या ठिकाणीं शिवाजीउत्सवाच्या निमित्तानें हे गेले असतां त्यांजवर एकाद्या राजाप्रमाणें चवऱ्या ढाळून व चवल्या पावल्या आणि मोती उधळून आजपर्यंत त्यांचा झाला नव्हता इतका मन्मान केला!

असो; लोकांची सहानुभूति ही एक शक्ति आहे, व ती असल्याशिवाय पुढाऱ्यास स्वकर्तव्य बजावण्यास कधींच हुरूप येणार नाहीं. सुधारलेल्या राष्ट्रांतून या संघशक्तीचा हा उपयोग तर होत असतोच; पण त्याबरोबर न्यायाच्या तराजूची दांडी समतोल राखण्याकडेही तिचा उपयोग होत असतो. आमच्या देशांत या शक्तीस तशा प्रकारचें स्वरूप अद्याप आलें नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. टिळक यांच्या खटल्यांत लोकांनी अगोदरच जर ' त्यांच्या हातून असा गुन्हा झालेला नाहीं, आपण त्याचा विनाकारण छळ चालविला आहे ' असें स्पष्ट व निर्भीडपणें सरकारास कळविलें असतें तर त्याचा कांहींच उपयोग झाला नसता असें नाहीं. पुष्कळ लोकांना या खटल्यासंबंधानें सरकारी बड्या अधिकाऱ्यांशीं बोलण्याच्या प्रसंग आला

---

* या वेळचें वर्णन एका इंग्रजी पत्रानें असें दिलें आहे:—

" News of the judgment of the High Court of Bombay on Mr. Tilak's appeal was received in Poona at 12—30 noon, and spread like wild fire all over the city. Mr. Tilak Commenced to receive visitors shortly after, each party garlanding him, dou bing his forehead with red powder and making him a present of sweetmeats. The road in front of his house was blocked by carriages & pedestrians. Special thanks-giving services were held in principal temples. Mr. Tilak visited the chief Hindu temple to offer his devotions and was cheered by enthusiastic crowds. He received more than two hundred telegrams of Congratulation. "

असेल; पण त्यांपैकीं एकानें तरी धैर्य धरून आपलें मत स्पष्टपणें त्यांच्यापुढें मांडलें असेल अशी कल्पनाही करण्यास जागा नाहीं. वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें कोणतीही गोष्ट होऊन गेल्यावर त्याबद्दल आनंद अथवा खेद प्रदर्शित करणें हें सहानुभूतीचें एक अंग आहे; पण तें उत्तरांग होय. या पूर्वीचें काम ह्मटलें ह्मणजे या शक्तीचा अगोदरच उपयोग झाला पाहिजे. सुधारलेल्या राष्ट्रांतून तो तशाच रीतीनें होत असतो; व तो आमच्या राष्ट्रांत जेव्हां होईल तेव्हांच आमच्या हातून कांहीं तरी कार्य होईल. राज्यकर्ते परकी असल्यामुळें पाश्चिमात्य राष्ट्रांपेक्षां आमची स्थिति थोडीशी निराळी आहे हें खरें आहे; पण सार्वजनिक सहानुभूति किंवा लोकमत हल्लींच्यापेक्षां अधिक जागृत होण्यास त्यामुळें कांहीं विशेष अडचण येईल असें वाटत नाहीं. टिळक यांजकडे वेळोवेळीं ज्या तारा व अभिनंदनपर पत्रें आलीं व त्यांच्यासंबंधानें ठिकठिकाणीं जे समारंभ झाले त्यावरून अशा प्रकारचें धैर्य समाजांत येण्याचीं बरींच चिन्हें दिसत आहेत; व या खटल्यापासून सार्वजनिक दृष्टीनें जर कांहीं विशेष फायदा झाला असेल तर तो हाच होय. सभावित मानले जाणाऱ्या हिंदी लोकांचा करारीपणा उत्तरोत्तर किती कमी होत चालला आहे व क्षुल्लक गोष्टींतही सरळ मार्ग झुगारून देऊन सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांची थुंकी झेलून त्यांच्या तंत्रानें वागण्याकडे त्यांची किती प्रवृत्ति झाली आहे हें या खटल्यांतील कित्येक साक्षीदारांच्या जबानीवरून सहज दिसून येणार आहे.* तसेंच नेटिव्ह संस्थानिकही स्वमतास पारखे होऊन कसे परावलंबी बनत चालले आहेत हेंही या प्रकरणांतील दत्तकासंबंधाच्या कोल्हापूर सरकारच्या वर्तनावरून सहज दिसून येईल. अशा प्रकारचें वर्तन घातक असून राष्ट्रास फार अपायकारक आहे. यासंबंधानें लिहितांना खुद्द टिळक यांनींच ता. ८।३।०४ च्या अंकांत असे उद्गार काढले आहेत:—

"बाळामहाराज दत्तक होण्यापूर्वी औरंगाबादेस ताईमहाराजांच्या मांडीवर दत्तक दिल्याची सर्व हकीकत कोल्हापुरचें सरकार व त्यांचें कौन्सिल यांच्यापुढें स्पष्ट-

---

* टिळक यास शिक्षा दिल्या वेळच्या ठरावांत सुद्धां से. जज्ज मि. ल्यूकस यांनीं फिर्यादीतर्फेच्या एका साक्षीदारासंबंधानें तर असें ह्मटलें आहे:—

"One of the prosecution witnesses is an Honorary Magistrate in Poona city, and yet I cannot be convinced that he has spoken the truth."

पर्वे मांडलेली होती; आणि अशा स्थितींत बाळामहाराजानें दत्तक होऊं नये असेंही तेव्हां त्यांचें मत होतें. पण नेटिव संस्थानचे आधिपती हे प्रायः इंग्रजसरकारच्या धोरणानें चालणारे असल्यामुळें आस्टनसाहेबांचें जेव्हां पूर्ण आनुकूल्य पंडितमहाराजांच्या पक्षास मिळालें, तेव्हां कोल्हापूर दरबारही तिकडेच वळलें. अशा रीतीनें एकदम उलट खाण्यांत आपण कांहीं गैर करतों, असें आमच्या संस्थानिकांस वाटत नाहीं ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय. पण त्यास कांहीं इलाज नाहीं. सरकार अमुक बाजूस आहे असें समजल्यावर आमच्याकडील नेटिव किंवा युरोपियन म्याजिस्ट्रेटही, पॉलिसीनें ह्मणा किंवा भीतीनें ह्मणा, जर आपल्या मनाविरुद्ध एकाद्या कज्जाचा निकाल करण्यास तयार होतात, तर लहानसहान किंवा प्रसंगविशेषीं मोठ्या संस्थानिकांनीं याच तत्वाचें अवलंबन केल्यास त्यांत मोठेंसें आश्चर्य ते कोणतें! या गोष्टी ते वाईट बुद्धीनें करतात असें नव्हे, तर पुष्कळ दिवसांच्या दास्यानें हा अवगुण जणूं काय त्यांच्या हाडीच खिळलेला असतो. या खटल्यापासून जर कांही सार्वजनिक बोध घेण्यासारखी गोष्ट असेल तर ती हीच होय. गोम्याविरुद्ध सोम्याच्या खटल्यांत निःपक्षपाताने न्याय देणे कांही अवघड नाहीं; पण एका बाजूला सरकार आणि एका बाजूला रयत असा जेव्हां प्रसंग येतो, तेव्हां ज्याचें मतस्वातंत्र्य किंवा व्यक्तिस्वातंत्र्य पंचवीस वर्षांच्या नोकरीच्या चरकांत पिळून निघालेले आहे त्याच्या हातून न्याय मिळणें कधींही शक्य नाहीं. नेटिव प्रजेच्या, सुशिक्षित लोकांच्या किंवा अमलदारांच्या अंगांत करारीपणा नसतो, असा आमच्यासंबंधानें इंग्रज लोकांचा आक्षेप आहे. हा आक्षेप बऱ्याच अंशीं खरा आहे; पण त्याचें कारण इंग्रज लोकांची राज्यपद्धतच होय, हे सदर आरोप करणारांनींच लक्षांत ठेवलें पाहिजे. सरकार आणि रयत यांच्या दरम्यानच्या खटल्यांत नेटिव म्याजिस्ट्रेटापेक्षां युरोपियन म्याजिस्ट्रेटाकडून न्याय मिळण्याचा अधिक संभव असतो, अशी जी लोकांची समजूत झाली आहे त्याचेंही कारण हेंच होय; आणि नेटिव म्याजिस्ट्रेट व नेटिव संस्थानें यांच्यामध्यें या बाबतींत आवडनिवड करण्यासारखें कांहीं नाहीं."

याखेरीज सार्वजनिक कामांत पुढारीपणा घेणाऱ्या गृहस्थांची नीतिमत्ता वाईट नसून उलट सरकारी अधिकारी कधीं कधीं लुच्चे लोकांस हाताशीं घेऊन त्यांचा विनाकारण कसा छळ करतें, ज्यांचा पगार व बढती सरकारच्या ताब्यांत असते असल्या म्याजिस्ट्रेटांच्या हातून असल्या कामीं न्याय मिळावयाचा संभव कमी असतो, करितां न्यायदानाच्या पद्धतींत सुधारणा झाली पाहिजे वगैरे गोष्टीही या खटल्यासंबंधानें महत्वाच्या आहेत. एकंदरींत सार्वजनिक दृष्टीनें या खटल्यापासून आमच्या लोकांना बराच बोध घेण्यासारखा आहे हें वरील विवेचनावरून कोणाच्याही ध्यानांत येईल.

## आदा व खर्च.

टिळक यांची विद्वत्ता, हुषारी व कर्तबगारी ऐकून बाहेरच्या कित्येक लोकांनीं 'ते दरमहा काय मिळवितात ?' ह्मणून मला अनेक वेळां प्रश्न केला आहे; व माझ्या उत्तराची वाट न पाहतां 'त्यांना दरमहा हजार दोन हजार रुपये तरी मिळत असतील नाहीं ?' असें ह्मणून आपणाला पाहिजे तेंच उत्तर देऊन त्यांनीं समाधानही मानलें आहे. टिळक यांना दरमहा हजार दोन हजार रुपये मिळावे अशी लोकांची इच्छा असणें स्वाभाविक आहे. पण लोकांच्या इच्छेप्रमाणेंच सर्व गोष्टी असतात असें नाहीं. अलीकडील सात आठ वर्षांतील त्यांचा आदा व पूर्वीचा आदा यांत जरी महदंतर पडलें आहे तरी त्यांच्या योग्यतेच्या मानानें ही आद्याची स्थिति समाधानकारक आहे असें मुळींच ह्मणतां येत नाहीं. १८९७ सालीं राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना किती त्रास झाला हें सर्वांना माहीत आहे. पण या त्रासानें त्यांचा जसा लौकिक वाढविला तशीच त्यानें त्यांच्या आद्यांतही भर टाकली ही गोष्ट विसरतां कामा नये. सत्त्याण्णव सालापूर्वी केसरीचे वर्गणीदार सुमारें आठ हजार होते; ही संख्या हल्लीं तिपटीवर गेली आहे; व वर्गणी आणि जाहिरातीचे पैसे मिळून यांचें वार्षिक उत्पन्न सरासरी पस्तीस चाळीस हजारांचें झालें आहे. ही उत्पन्नाची बाब झाली. पण खर्चाची बाब अशीच मोठी आहे. कारखान्याचे व ऑफिसचे कामगार, कारकून व इतर लोक यांचा पगार; आणि कागद, छपाई व किरकोळ खर्च मिळून वर्षाचे काठीं पंधरा हजार रुपयांचा नियत खर्च आहे. याशिवाय फाउंडरी, छापखान्याची इमारत, नवीं यंत्रें इत्यादिकांच्या खेरदीस कमींतकमी वीस हजार रुपये तरी लागले आहेत. अशांतच वाड्याची खेरदी आणि खटल्याचे बोजे! मग काय ? उत्पन्न आणि प्रपंचास लागणारा खर्च यांची कोणीकडून तरी तोंडमिळवणी होतां होतां मारामार पडली आहे! यापुढेंही वाढत्या उत्पन्नाबरोबर वाढता खर्च आहे; पण योग्य व्यवस्था राहिल्यास त्यांच्या तिजोरीची स्थिति बरीच समाधानकारक होण्याचा संभव आहे. बाकी आजामितीस पाहिलें तर त्यांच्याजवळ निवळ शिल्लक अशी कांहीं नसून उलट पंचवीस तीस हजार रुपये कर्जच आहे. नाहीं ह्मणावयास आपल्या मालकीचा वाडा,

छापखाना, लातूरच्या जिनिंग फ्याक्टरीचा हिस्सा व आयुष्याचा दहा हजारांस उतरेला विमा एवढीच कायती त्यांची इस्टेट आहे.

## शारीर अस्वास्थ्य व प्रापंचिक दुःखें.

सन १८९७ सालच्या कारागृहवासाचा असा कांहीं जबर परिणाम टिळकांच्या शरीरावर झाला आहे कीं, ते सुटून आल्यापासून त्यांच्या शरीरांत एक प्रकारचें कायमचें अस्वास्थ्य उत्पन्न झालें आहे. या अस्वास्थ्याचा परिणाम केव्हां केव्हां मूत्राशय व वृषणस्नायु यांजवर होऊन प्रसंगविशेषीं ते स्नायु वृद्धिंगत पावत असल्यामुळें त्यांवर शस्त्रप्रयोग करण्याची पाळी येते, व असे प्रयोग एक दोन वेळ करण्यांतही आले. १९०१ च्या मार्च महिन्यांत एकदां तर ते या विकारानें आठ दहा दिवस आजारी पडले होते; व त्यांत ताप भरून तो १०३ डिग्रीपर्यंत गेला होता. हा विकार कमी होण्यास त्यांना चांगली विश्रांति मिळावयास पाहिजे होती. पण मोठा केसरी, बाबामहाराजांच्या इस्टेटीचें प्रकरण व त्यासंबंधीं खटला हीं कामें त्या वेळीं उद्भवल्यामुळें व उमरावती, औरंगाबाद वगैरे ठिकाणीं वरचेवर प्रवास करावयास लागल्यामुळें त्यांना विश्रांति मिळाली नाहीं; व त्यामुळें या अस्वास्थ्यांत अधिकच भर पडली. या सुमारासच त्यांचा एक पाय लचकून गुडघ्याचें हाड दुखावलें होतें, व त्यामुळें एक वर्षभर त्यांना नेटानें चालावयास येत नव्हतें. इतकें झालें होतें तरी त्यांची शरीराची काठी जात्याच बळकट व काटक असल्यामुळें त्यांनीं या अस्वाथ्यासही जुमानलें नाहीं. यांतच त्यांचीं मुलेंबाळें केव्हां केव्हां आजारी पडत, तेव्हां त्यांच्याही औषधपाण्याची यांना तरतूद करावी लागे. पण प्रापंचिक दुःखांत सर्वांत मोठा धक्का जो त्यांना बसला तो त्यांचे वडील चिरंजीव विश्वनाथपंत यांच्या मृत्यूचा होय! विश्वनाथपंत हे वीस एकवीस वर्षांचे असून कॉलेजमध्यें जात होते; व वर्तमानपत्राची जोखीम पतकरण्याइतकी जरी त्यांच्या अंगांत शक्ति आली नव्हती तरी प्रपंचाच्या व्यवस्थेचा बराच बोजा उचलून त्यांनीं टिळक यांस त्यांच्या व्यवसायांत अनेक प्रकारानें मदत केली असती यांत कांहीं शंका नाहीं. उतारवयांत हातातोंडास आलेल्या पुत्राचा वियोग किती दुःसह होईल याची वाचकांनींच कल्पना करावी. पण टिळक यांनीं हें दुःख निमूटपणें गिळलें व तेंही त्यांना साजेल अशाच रीतीनें गिळलें. विश्वनाथपंत हे अगदीं आज्ञाधारक असून

ते वडिलास फार पूज्य मानीत. म्याट्रिक परीक्षा पास झाल्यावर त्यांना मराठींत लेख लिहिण्याचा नाद लागला होता व वडिलांकडून कांहीं मुद्दे विचारून घेऊन त्यांनीं 'श्रावणी' वगैरे दोन तीन विषयांवर लेख लिहिले होते; व ते 'जगद्धितेच्छु' वर्तमानपत्रांतून प्रसिद्धही केले होते. हे आणखी जगते तर पुढेंमागें केसरींतही लेख लिहिण्याची योग्यता त्यांच्या अंगीं आली असती. पण भवितव्यता कांहीं निराळी असते. १९०३ च्या जानेवारी महिन्यांत फर्ग्यूसन कॉलेजजवळील त्यांच्या राहण्याच्या झोंपडींत प्लेगनें त्यांना जें गांठलें तें अगदीं बेशुद्ध होऊन पडले; व एक दिवस जातो न जातो तों त्यांतच त्यांचा अंत झाला! मरणसमयीं ते अविवाहित होते एवढी कायती दुःखांत सुख मानण्यासारखी गोष्ट होती. विश्वनाथपंत यांच्या मृत्यूमुळें झालेलें दुःख स्पष्टपणें जरी टिळक यांच्या तोंडावर दिसत नव्हतें, तरी त्यामुळें त्यांचें अंतःकरण करपून गेलें होतें एवढें कोणाही बारीक नजरेच्या माणसास दिसल्यावांचून राहत नव्हत.*

अशा प्रकारचें दुसरें संकट पुढील सालीं त्यांचे चुलते रा. रा. गोविंदरावजी व त्यांची पत्नी हीं उभयता वारलीं त्या वेळीं त्यांजवर आलें. गोविंदरावजी यांचें वय सुमारें ७५ वर्षांचें असून ते अगदीं वृद्ध झाले होते. टिळक यांजपासून ते जरी वेगळे झाले होते तरी टिळकांवर ते

---

* टिळक यांना वडिल चिरंजीवाच्या मृत्यूबद्दल वाटणारे दुःख व त्याबरोबरच तें गिळून टाकण्याचे त्यांचे धैर्य कितपत होतें हें सहजी एका चमत्कारिक प्रसंगावरून व्यक्त झाले. तो प्रसंग असा:—विश्वनाथपंत यांना वारून आठ दहा दिवस झाले असतील नसतील. त्या वेळीं एके दिवशीं ते पटांगणापुढील उजव्या हाताच्या माडीवर (विंचूरकरांच्या वाड्यांत) कांहीं पुस्तक वाचीत एकटेच बसले होते. माडीचा पुढील दरवाजा बंद असून त्यास कडी लावली होती. त्या दिवशीं ते कांहीं लिहिणार होते म्हणून त्यांनीं मला दोनप्रहरीं बोलाविले होते. मी जिना चढून वर गेल्यावर दारास धक्का दिला त्याबरोबर 'कोण आहे?' म्हणून त्यांनी विचारलें. मीं माझें नांव सांगितलें. तेव्हां नेहमींच्या संवयीप्रमाणे दार उघडण्यासाठी त्यांनीं मोठ्यानें 'विश्वनाथ?' म्हणून हाक मारली व लगेच घाईनें उठून दाराची कडी काढली. या वेळीं मुलगा वारला आहे वगैरे विचार एकदम त्यांच्या मनांत येऊन दुःखाचा आलेला उमाळा त्यांनी ताबडतोब कसा गिळून टाकला हें त्या वेळच्या त्यांच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत होतें!

आपल्या पुत्राप्रमाणें प्रेम करीत असत. त्यांचेही यशवंतराव नांवाचे चिरंजीव विश्वनाथपंताच्या पूर्वीच कांहीं दिवस प्लेगनें वारल्यामुळें त्यांना अतोनात दुःख झालें होतें. त्यांतून त्यांचे कुटुंबही वृद्ध असून पोटीं दुसरें पुत्रसंतान नसल्यामुळें या ह्याताराह्यातारीचा सगळा जीव टिळक यांजवर होता. टिळक यांजवर गोविंदरावजींचें जितकें प्रेम होतें तितकीच गोविंदरावजीची त्यांच्याबद्दल पूज्यबुद्धिही होती. गोविंदरावजी जितके विनोदी व उल्हासी असत तितकेच केंव्हां केंव्हां मितस्तही असत. आपणास इंग्रजी येत नाहीं व अलीकडील कायदेकानूचें व स्थितिरीतींचें ज्ञान नाहीं असें वाटून खटल्यासंबंधीं किंवा इतर कित्येक गोष्टीसंबंधानें टिळक यांच्याशीं ते भीत भीतच बोलत. एवढेंच नव्हे तर, त्यासंबंधीं एकादी माहिती विचारावयाची असली तर एकदम टिळक यांजपाशीं न जातां जवळ बसलेल्या कोणा तरी ओळखीच्या मनुष्याजवळ जाऊन ते त्याच्या कानाशीं कुजबुजत व त्याकडे टिळकांचें लक्ष वेधलें ह्मणजे हळूच एकादा प्रश्न ते विचारीत किंवा बातमी सांगत. खटल्याचे वेळीं तर दीड वर्षपर्यंत गोविंदरावजींच्या जिवास चैन ह्मणून कसली ती नव्हती. कसलीही बारिकसारिक बातमी ऐकली कीं, रात्रबेरात्र असली तरी टिळक यांचे घरीं जाऊन त्याबद्दल समाधान करून घेतल्याशिवाय ते जात नसत ! गोविंदरावजींचें अंतःकरण किती कोंवळें होतें व टिळक यांजबद्दल तें किती तिळतिळ तुटत होतें याचें एक उत्कृष्ट उदाहरण मला दिसलें तें अजून मूर्तिमंत माझेपुढें उभें आहे. ज्या दिवशीं क्लेमंट्स साहेबांनीं खटल्याचा निकाल सांगितला त्या दिवशीं सकाळीं ९ वाजतां बाबा महाराजांच्या इस्टेटीकडील टिळकपक्षाचे कारकून रा. रा. यशवंतराव कुलकर्णी, मी व आणखी एक दोन इसम टिळक यांच्या घरीं ( विंचूरकरांच्या वाड्यांत ) लिहिण्याच्या खोलींत कांहीं कामानिमित्तानें बसलों होतों. त्यावेळीं टिळकही तेथें बसले होते. इतक्यांत गोविंदरावजीही तेथें आले व जवळच पसरलेल्या जाजमावर बसले. क्लेमंट्स शिक्षा देणार असें अगोदरच टिळक यांस वाटत असल्यावरून त्यांनीं अपील करून जामिनावर सुटून येण्याविषयींची तजवीज चालविली होती. वर्ष दीडवर्ष खटला चालून त्याचा निकाल कायतो तासा दोन तासांत लागणार व तो कसा लागणार याची कल्पना नसल्यामुळें ज्याच्या

त्याच्या मनास हुरहुर लागली होती. त्यांत आपणास शिक्षा होणार अशी खुद्द टिळक यांची पक्की खात्री होऊन त्याप्रमाणें ते तजवीज करीत आहेत, हें पाहून आह्मां सर्वांना फारच वाईट वाटून नेहमींप्रमाणें कोणी कोणाशीं उल्हासानें बोलत नव्हता. अशा वेळीं टिळक हे कांहीं कामाकरतां आंत उठून गेले. त्यावेळीं गोविंदरावजींना रडें कोसळून त्यांच्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा वाहूं लागल्या. आपलें दुःख दुसऱ्यास कळूं नये ह्मणून त्यांनीं तोंड फिरविण्याचा व नकळत डोळ्याचें पाणी पुसण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण तो सफल न होतां यशवंतरावांच्या व माझ्या दृष्टीस पडून आमच्याही डोळ्यांस पाणी आलें! शेवटीं राहवेना ह्मणून यशवंतराव त्यांना ह्मणाले कीं, "काका, हें काय? तुह्मीच जर असें करूं लागला तर आमच्यासारख्यांनीं काय करावें?" इतक्यांत टिळक आंतून बाहेर आले व काय झालें हें न दाखविण्याच्या उद्देशानें डोळे पुसून सर्वजण आपापल्या उद्योगास लागले. तात्पर्य, टिळक यांजविषयीं गोविंदरावजींचें प्रेम किती दृढ होतें याची साक्ष यावरून सहजी पटेल. यासंबंधाचें दुसरें उदाहरणही अशाच प्रकारचें किंबहुना याहीपेक्षां जास्त हृदयद्रावक आहे असें ह्मटलें तरी चालेल. ल्यूकस साहेबांच्या निकालास एक दोन दिवस राहिले होते तोंच गोविंदरावजींनीं पूर्वीप्रमाणें धास्ती घेतली; व 'काय होतें काय कीं?' या मंत्राचा रात्रंदिवस जप चालविला. पुढें निकालांत शिक्षा झाली हें ऐकून त्यांची कंबर बसून गेली व त्यांनीं जें एकदां आंथरूण धरलें तें शेवटपर्यंत सोडलें नाहीं! त्यांना सडकून ताप भरला व त्यांत प्लेगचीं चिन्हें दिसूं लागलीं. इकडे हायकोर्ट बंद असल्यामुळें टिळक यांस जामिनावर सुटून येण्यास चार दिवस लागले. तेवढ्या अवधींत ह्माताऱ्याची अत्यवस्था होऊन एक पळीभर पाणी घोटेना कीं तोंडांतून एक शब्द उमटेना! बिचारा कसा तरी जीव धरून आंथरुणावर पडला होता. पुढें टिळक जेव्हां जामिनावर सुटून आले तेव्हां पहिल्यानें आपल्या घराकडे न जातां त्यांच्या घराकडे गेले. त्या वेळीं गोविंदरावजी जे दोन शब्द त्यांच्याशीं बोलले तेच अखेरचे होते. त्यावर त्यांच्याकडून कांहीं भाषण झालें नाहीं. शेवटीं ताप भडकून त्यांतच त्यांचा अंत झाला! गोविंदरावांचा मृत्यु पाहून त्यांच्या कुटुंबानेंही आंथरूण धरलें व पंधरा दिवसांच्या आंतच त्यांनींही

परलोकचा मार्ग स्वीकारला ! याप्रमाणें आपल्या जिव्हाळ्यांचीं, आपल्या-वर निस्सीम प्रेम करणारीं व आपल्याच कुटुंबांतील दोन वृद्ध माणसें एका पाठीमागून एक अशीं गेल्यामुळें टिळक यांस त्या सालींही फार दुःख झालें. पण तें सर्व बाजूस ठेऊन त्यांनीं आपला मार्ग मोठ्या धैर्यानें आक्रमिला.

## नंतर

लो. टिळक यांचा 'लेखक' या नात्याचा माझा संबंध मार्च १९०७ अखेर सुटला. त्यानंतर आतांपर्यंत त्यांच्या आयुष्यक्रमांत ज्या महत्वाच्या गोष्टी घडल्या त्यांचें निरीक्षण 'नंतर' या सदराखालीं थोडक्यांत येथें करण्याचें योजिलें आहे.

## सुरतेची राष्ट्रीय सभा.

सन १९०७ ची सुरतेची राष्ट्रीय सभा ही टिळकांच्या आयुष्यक्रमांती-लच नव्हे, तर आमच्या राष्ट्राच्या आयुष्यक्रमांतील एक अत्यंत महत्वाची गोष्ट झाली असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. टिळक या वेळेपर्यंत राष्ट्रीय सभेला अनेक वेळां गेले होते; व तेथें त्यांनीं अनेक विषयांवर अनेक भाषणेंही केलीं होतीं. पण या वेळीं टिळक आणि राष्ट्रीय सभा यांची जितकी सांगड पडली तितकी यापूर्वीं कधींही पडली नव्हती; व सर्व राष्ट्रापुढें टिळक या वेळीं जसे आले तसे पूर्वीं कधींही आले नव्हते. या गोष्टीस मुख्य कारण राष्ट्रांत उत्पन्न झालेले नवे विचार व नवा जोम हें तर आहेच; पण त्याबरोबर या विचारास चलन देऊन नवा जोम वाढविण्याची जी विलक्षण कर्तबगारी टिळकयांनीं दाखविली तीही पुष्कळ अंशीं कारणीभूत झाली, हें विसरतां कामा नये.

राष्ट्रीय सभेनें पिछेहाटीचे धोरण न स्वीकारतां बावीस वर्षांच्या परिश्रमानें घातलेल्या पायावर बळकट इमारत उभारण्याचा उपक्रम करण्याकरितां टिळक यांनीं कंबर बांधलेली पाहून कित्येक आश्चर्यानें तर कित्येक भयानें चकित झालें; व त्यांचा पुढारीपणा कसास लागलेला पाहण्याची प्रत्यक्ष वेळ जेव्हां राष्ट्रीय सभेच्या उच्चासनावर आली त्या वेळीं त्यांनीं जें अलौकिक धैर्य दाखविलें त्याची तारीफ शब्दांनीं करणें अशक्य आहे. राष्ट्रीय सभा भरण्यापूर्वीं सुरतेस जमलेल्या लोकांस व्याख्यानें देऊन स्पष्ट व निर्भीड भाषेनें त्यांची कानउघाडणी करणें; समेटानें कार्य होईल

ह्मणून मानापमान लक्षांत न आणतां मध्यस्थांमार्फत उलटपक्षाकडे खटपट करणें; ही खटपट निरर्थक झालेली पाहून त्यांस उद्वेग येणें; या उद्वेगानें 'विराट स्वरूप' प्राप्त झालेल्या लोकमताशीं तादात्म्य पावून राष्ट्रीय सभेच्या मंडपांतील स्थंडिलावर दंड ठोकून उभे राहणें, व माझें ह्मणणे सभेस सांगण्याचा मला हक्क आहे, मला येथून उचलून नेल्याशिवाय मी हालणार नाहीं असें निधड्या छातीनें भरसभेस सांगणें, ह्या गोष्टी ज्यांनीं प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिल्या असतील त्यानीं सुरतेची राष्ट्रीय सभा व टिळक यांची सांगड कां घातली पाहिजे याचा उमज पडेल; व राष्ट्राच्या इतिहासांत न विसरण्यासारखी ही गोष्ट कां झाली याचेंही बरोबर अनुमान करतां येईल. टिळकांनीं राष्ट्रीय सभा मोडली, कीं टिळकांच्या वर्तनानें सभेचें कार्य दुणावलें, याचा विचार ज्याचा त्यानें शांतपणें आपल्या मनाशीं केला ह्मणजे त्याला दुसरेंच अनुमान काढावें लागेल. राष्ट्र प्रगतीस कोणत्या मार्गानें लागतें याचा विचार स्वतंत्र रीतीनें पुढें करण्यांत येईल. तूर्त एवढी गोष्ट येथें नमूद केली पाहिजे कीं, राजकीय प्रगति करणाराला जो करारीपणा, जी निस्पृहता, जें धैर्य, जी अंतःस्फूर्ति व जी निष्ठा लागते ती टिळकांचे अंगीं या वेळीं पूर्णपणें बाणलेली दिसून आली, व त्यामुळें राष्ट्रीय सभेच्या व त्याबरोबरच राष्ट्राच्या इतिहासांत एक प्रकारची महत्वाची क्रांति झाली.

## सार्वजनिक चळवळी व लोकतर्फेची कामगिरी.

**प्लेगची लस व पत्रकारांचें संमेलनः**—टिळक यांनीं १९०८ सालांत ज्या कांहीं लोकतर्फेच्या कामगिऱ्या बजावल्या, त्यांतच जानेवारी महिन्यांत गव्हर्नर साहेबांच्या निमंत्रणावरून वर्तमानपत्रकर्त्यांच्या भरलेल्या समेलनांत केलेलें भाषण ही एक होय. हें समेलन प्लेगची नवी लस कशी तयार करतात हें सप्रयोग दाखविण्याच्या हेतूनें मुंबईस भरविलें होतें. इनॉक्युलेशनच्या बाबतींत मुल्कावल ( पंजाब ) येथें जो हानिकारक प्रकार घडला त्यामुळें इनॉक्युलेशनवरील लोकांचा विश्वास नाहींसा होऊन त्या बाबतींत जे गैरसमज उत्पन्न झाले होते ते दूर व्हावेत, ह्मणून या संमेलनांत प्लेगची लस तयार करतांना किती काळजी घेतली जाते हें दाखविण्यांत आलें. लस तयार करण्याचे कामीं काळजी घेण्यांत येते, याबद्दल या संमेलनांत टिळक यांनीं उघडपणें प्रयोगशाळेवरील अधिकाऱ्यांचें अभिनंदन केलें. तथापि,

इनॉक्युलेशनचें काम अद्याप प्रयोगावस्थेंत आहे; अशा वेळीं या गोष्टीचा दुसऱ्या अनेक दृष्टींनें विचार करून इनॉक्युलेशन हें लोकांच्या खुषीवर ठेवणें अगत्याचें आहे, असें त्यांनीं निर्भीडपणें सांगितलें.

**विभागणी–कमिशनपुढील साक्षः**—यानंतरची लोकतर्फेची दुसरी कामगिरी ह्मटली ह्मणजे मार्च महिन्यांत त्यांची विभागणी–कमिशनपुढें झालेली साक्ष ही होय. राजसत्तेचें केंद्रीकरण झाल्यामुळें राज्यव्यवस्थेंत सुधारणा नीटपणें करतां येत नाहींत असें जें स्थानिक अधिकाऱ्यांचें ह्मणणें आहे त्यांतच अधिकारविभागणीबद्दलच्या ओरडीचें बीज असून लोकांना राज्यकारभारांत प्रत्यक्ष कांहीं अधिकार दिल्याशिवाय व सरकारी अधिकारी व लोकांचे पुढारी यांच्यांत पूर्वीं होता तसा सलोखा असल्याशिवाय नुसत्या अधिकारविभागणीनें इष्ट कार्य घडून येणार नाहीं, असा त्यांनीं या साक्षींत चोख जबाब दिला. ही साक्ष अत्यंत महत्वाची असून तिचा उल्लेख पुढील भागांत त्यांच्या राजकीय मतांत केला असल्यामुळें या ठिकाणीं त्याचें विशेष विवेचन केलें नाहीं.

**पुणें जिल्हापरिषद्:**—टिळकांची तिसरी सार्वजनिक चळवळ ह्मटली ह्मणजे पुणें येथें मार्च महिन्यांत जिल्हापरिषदेची भरविलेली बैठक ही होय. राष्ट्रीय सभा कार्यकारी होण्यास प्रांतिक सभा, जिल्हासभा, तालुकासभा यांत जोम येऊन त्यांच्याद्वारें लोकमतास योग्य वळण लागलें पाहिजे, असें टिळक यांचें ठाम मत असल्यामुळें त्यांनीं या सालांत सार्वजनिक सभेमार्फत पुण्यास जिल्हासभेची स्थापना करून निरनिराळ्या तालुक्यांतील निरनिराळ्या दर्जाच्या व शिक्षणाच्या लोकांस एकत्र करून आपल्या गरजा व अडचणी काय आहेत, आपली सुधारणा कशी केली पाहिजे यांचा ऊहापोह केला. खेरीज सुरतेस राष्ट्रीय सभा मोडल्यानें राष्ट्रांतील लोकांच्या महत्वाकांक्षेस एकप्रकारें जबर धक्का बसून राष्ट्रीय व नेमस्त पक्षांच्या लोकांत दुही माजून दोघांचीं तोंडें दोन दिशेस जीं झालीं होतीं तीं एका दिशेस कोणत्या रीतीनें करतां येतील, याचाही विचार टिळक यांनीं ही सभा भरवितेवेळीं केला होता; व, ह्मणून रा. ब. जोशी यांच्यासारख्या विद्वान् व पोक्त मनुष्याची अध्यक्षाचे जागीं योजना करून दोहोंपक्षाच्या लोकांच्या तंत्रानें हें जिल्हापरिषदेचें काम त्यांनीं नीटपणें तडीस नेलें. या सभेंत त्यांनीं

राष्ट्रीय शिक्षण, मद्यपाननिषेध, जमीनमहसूल, जंगल, हत्यारांचे परवाने, वगैरे विषयांवर भाषणें केलीं. यांतील विचारांचाही त्यांच्या राजकीय मतांत व अन्यत्र समावेश झाला असल्यामुळें त्यांचें विवरण येथें करण्याचें कारण नाहीं.

**मद्यपाननिषेध व पुण्यांतील पिकेटिंग:**—टिळक यांची चवथी सार्वजनिक चळवळ ह्मटली ह्मणजे मद्यपाननिषेधाची चळवळ ही होय. मद्यपानाचें व्यसन लोकांत दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळें त्यांच्या शरीराची, मनाची व वित्ताची सारखी हानी होऊं लागल्यामुळें हें व्यसन कमी करण्याच्या हेतूनें टिळकांनीं ही चळवळ या वर्षी जोरानें सुरू केली. अपकारी—खात्याचें उत्पन्न वाढविण्याच्या हेतूनें सरकार मद्यपानास उत्तेजन देतें; व कंत्राटदारांची कड घेऊन भर लोकवस्तींत दुकानें घालण्यास परवानगी देतें ही गोष्ट गैर आहे, असें कित्येक दिवस त्यांना वाटत होतें; व ह्मणून मजूरवर्गांत व न्हावी, कोष्टी, तेली, तांबोळी वगैरे खालच्या दर्जाच्या लोकांत वेळोवेळीं मद्यपाननिषेधावर व्याख्यानें देऊन दारूपासून त्यांचीं मनें वळविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला होता. पण या कामास आजपर्यंत मिळावें तितकें चलन न मिळाल्यामुळें प्रत्यक्ष काम करणाऱ्या लोकांच्या मदतीनें त्यांनीं ही चळवळ या वर्षाच्या एप्रिल महिन्यांत जोरानें सुरू केली. १९०७च्या जुलै महिन्यांत पुणें येथें ना. गोखले यांच्या अध्यक्षतेखालीं एक 'टेंपरन्स असोसिएशन' स्थापन झाली असून तिच्या म्यानेजिंग कमिटीचे टिळक हे एक सभासद होते. या मंडळीचें काम व्यवस्थित रीतीनें हळूहळू चाललें होतें; पण नुसते कागदी घोडे नाचविल्यानें या मंडळीच्या कामास यावा तितका जोर येणार नाहीं, असें टिळक यांना वाटून त्यांनीं प्रत्यक्ष अंगमेहनत करून या चळवळीस जोरानें उत्तेजन देणारी स्वयसेवक मंडळी निवडून काढली व त्यांच्या कामासंबधीं नियम ठरवून त्यांच्यामार्फत दारूच्या गुत्त्यांजवळ 'पिकेटिंग' ऊर्फ पाहरा करण्याचें काम सुरू केलें; व कोणावर सक्ती किंवा जुलूम न करतां उपदेशानें व विनवणीनें लोकांचीं मनें दारूपासून परावृत्त करण्याविषयीं त्यांना सल्ला दिला. या चळवळीस रा. रा. ल. रा. पांगारकर ( मुमुक्षुकर्ते ), नरसिंह चिंतामण केळकर, शंकर गणेश लवाटे, ल. र. गोखले वकील, भावे, देशपांडे, पारनाईक वगैरे सुशिक्षित लोकांचें चांगलें

पाठबळ मिळाल्यामुळें पुण्यांतील बऱ्याच गुत्त्यांवरील दारूची विक्री ८।९ दिवसांतच अगदीं कमीं होऊं लागली; व जिकडे तिकडे या गोष्टीचा गवगवा होऊन या चळवळीकडे लोकांचें व सरकारचें लक्ष वेधलें. पुढें रा. भावे व देशपांडे याच्यासारख्या स्वयंसेवकांवर पिकेटिंग संबंधानें सिटीम्याजिस्ट्रेटपुढें खटले करण्यांत आले, व त्यांच्यावर बेकायदेशीर जमावांत सामील होणें, सरकारी कामगारांच्या कामास अडथळा करणें, गर्दी मोडण्याचा हुकूम अमान्य करणें, हे आरोप ठेऊन त्यांना दंडही करण्यांत आला. या खटल्यांत टिळक यांची आरोपींतर्फे जी साक्ष झाली त्यांत त्यांनीं असें सांगितलें:—

" पुणे येथे टेम्परन्स असोसिएशन गेल्या वर्षी जुलै महिन्यांत स्थापन झाली. तिचे अध्यक्ष ना. गोखले हे आहेत. त्या संस्थेच्या मॅनेजिंग कमिटीचा मी एक मेंबर आहें. तंटा होण्यापूर्वी ह्मणजे ता. ५ एप्रीलचे पूर्वी सुमारें आठ दहा दिवस, कांही स्वयंसेवक गुत्त्यापाशी जाऊन पिकेटिंगचे काम करूं लागले. हे स्वयंसेवक टेम्परन्स असोसिएशनने निर्माण केलेले नाहीत; प्रथम ते स्वयंस्फूर्तीनेंच काम करूं लागले. त्यांनी कामास सुरुवात केल्यानंतर त्यांचें काम कसें काय चाललें आहे हे पाहण्यासाठी मी गुत्त्यांवर जाऊं लागलो व त्यांनी कोणत्या धर्तीवर काम करावे हे टेम्परन्स असोसिएशनकडून पुढे चारपांच दिवसांनी ठरविण्यात आले. दर गुत्त्यावर या स्वयंसेवकांची संख्या चारपासून आठपर्यंत असल्याचे माझ्या पहाण्यांत आले. दारू पिण्याकरिता गुत्त्यांत जाणारास " दारू पिऊं नका " अशी ते नुसती विनंतीच करीत असत. तंट्याचे दिवशीं मी दुसऱ्या एका गुत्त्यावर पहाणी करण्यास गेलो असतां कांही स्वयंसेवकांस साहेबांनी मारल्याची खबर मला मिळाली; ह्मणून मी ताबडतोब तंट्याचे जागीं ह्मणजे गणेशपेठेच्या गुत्त्याजवळ गेलो, तो तेथे दोन्ही आरोपी पोलिसच्या कबज्यांत असलेले मला दिसले. त्यांस मी हकीकत विचारली, तेव्हां " आह्मांला साहेबांनी मारले " असे त्यांनी मला सांगितलें. आरोपी सांगतात हें खरें आहे किंवा नाहीं हे समजून घेण्याकरितां मी अंडरसनसाहेबांचा शोध करण्यासाठीं दोनतीन ठिकाणी गेलो; परंतु मला त्यांचा शोध लागला नाहीं. नंतर आरोपींस जामीनावर सोडविण्याची आह्मी खटपट केली. टेम्परन्स असोसिएशनचा हेतु माझ्या मते to push this movement to the utmost within the limits of law ( कायद्याच्या मर्यादेत आपल्या प्रयत्नांची शर्थ करावयाची ) हा आहे.

## उलट तपासणी.

( मि. दावर यांच्या सवालास. )

**टिळक:**—मी जहाल नाहीं. 'जहाल' शब्दाचा अर्थ तुह्मी काय समजतां ते मला सांगा.

दावर:—जहाल ह्मणजे extremist.

**टिळक** यांनी उत्तर दिले की extremist ही vague term (स्पष्टार्थ-वाचक शब्द नाहीं) आहे; मी काय आहे असा आपण मला प्रश्न विचारा, ह्मणजे मी कोण आहें हे सांगेन.

**मि. दावर:**—सरकारच्या measures ना (योजनांस) obstruction (अडथळा) raise करावा, असे तुमचे creed (बाणा) आहे किंवा नाहीं ?

**टिळक:**—सरकारच्या unlawful (बेकायदेशीर) measures (योजना) ना अडथळा करावा असे माझे मत आहे.

ता. ५ रोजी मी प्रथम जेव्हां गणेशपेठेच्या गुत्त्यावर गेलो, त्या वेळेस आरोपीस पाहिल्याचे मला आठवत नाहीं. गणेशपेठेंत गुत्ता ज्या ठिकाणीं आहे तो रस्ता फार अरुंद असल्यामुळे व तेथे गर्दी असल्यामुळे लोकांस जाण्यायेण्यापुरतीच कायती रीघ होती. ही गर्दी साहेबाचा व आरोपीचा जो तंटा झाला त्यामुळे जमली असावी.

**मि. दावर:**—साहेबांनी आरोपीस मारले या बातमीवर तुमचा ताबडतोब विश्वास बसला किंवा नाहीं ?

(हा प्रश्न विचारण्याची जरूर नाहीं असे कोर्टानें सांगितले.)

स्वयंसेवकांनी कोणत्या रीतीनें काम करावें याबद्दल टेम्परन्स असोसिएशनने ठराव केलेला आहे. स्वयंसेवकांच्या कामास माझा मॅनेजिंग कमिटीचा मेंबर या नात्याने Support (पाठिंबा) आहे."

या चळवळींत टिळक यांनीं थोडेंबहुत द्रव्य खर्चीं घालून पिकेटिंग बेकायदेशीर आहे कीं काय याचा पिच्छा पुरवून सरकारमार्फत निकाल लावून घेण्याचें मनांत आणिलें होतें. पण पुढें त्यांच्यावरच राजद्रोहाच्या खटल्याचा प्रसंग गुदरून त्यांच्या हातून हें काम नीटपणें तडीस न गेल्यामुळें 'डेप्युटेशन'ला उत्तर देऊन सरकारानें या प्रकरणाची कशी वासलात लाविली हें वर्तमानपत्रांतून वाचकांस कळलेंच आहे.

**राष्ट्रीय शिक्षण व समर्थविद्यालय:**—टिळक यांची पांचवी कामगिरी ह्मटली ह्मणजे राष्ट्रीय शिक्षणासंबंधीं लोकांचीं मनें तयार करून निदान महाराष्ट्रापुरती तरी त्याची कांहीं तरी कायमची व्यवस्था लावावी असा त्यांनीं संकल्प केला; व तळेगांवच्या समर्थविद्यालयासाठीं सोलापूर, बार्शी, कल्याण, वगैरे ठिकाणीं जाऊन पंधरावीस हजार रुपये फंड जमविला. हा फंड ६।७ लाखपर्यंत जमविण्याची त्यांची ईर्षा होती; व त्यांतून, पैसा—फंडांतून कांचेचा कारखाना जसा उभारला आहे तसेंच

निरनिराळे धंदे तेथें सुरू करून व्यवहारोपयोगी रसायनशास्त्र, विणकाम, वगैरेंचेंही शिक्षण या विद्यालयांतील मुलांस मिळण्याची तजवीज करण्याचें त्यांनीं योजिलें होतें. पण राजद्रोहाच्या आकस्मिक खटल्यामुळें ही त्यांची इच्छा जागच्याजागींच राहिली!

**राष्ट्रमत:**—टिळकांची सहावी कामगिरी म्हटली म्हणजे राष्ट्रीय पक्षाच्या मताचें एक दैनिक पत्र सुरू करणें ही होय. सुरतेच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं राष्ट्रीय पक्षासंबंधीं प्रतिपक्षानें भलभलत्या बातम्या प्रसिद्ध करून या पक्षासंबंधानें गैरसमज उत्पन्न केलेला पाहून आपल्या पक्षाचें मराठी दैनिक पत्र असणें अगत्याचें आहे असें त्यांना वाटलें; व सुरतेस अशा प्रकारचें पत्र काढण्याची वाटाघाट तेथें जमलेल्या मंडळींत करून त्यांनीं 'नॅशनल पब्लिशिंग कंपनी' नांवाची एक कंपनी मुंबईस स्थापन केली व तिचें भांडवल जमा करून तिच्या डायरेक्टरापैकीं आपण एक डायरेक्टरही झाले; व कंपनीच्या मालकीचें 'राष्ट्रमत' नांवाचें दैनिक पत्र सुरू करण्याचा त्यांनीं बेत केला. पण 'राष्ट्रमता'ची सर्व तयारी होण्यास व खटल्याचा प्रसंग गुदरण्यास एकच गांठ पडल्यामुळें टिळकांना आपल्या तंत्राप्रमाणें हें पत्र सुरू करण्याचा अवसर मिळाला नाहीं. तथापि, त्यावर नेमलेल्या मंडळीनें त्यांच्या पाठीमागें हें पत्र सुरू करून त्यांच्या इच्छेस दृश्य स्वरूप आणिलें; व ता. २९ जूनपासून हें पत्र निघूं लागलें.

याखेरीज केसरी पत्रद्वारें अध्यक्षाचे अधिकार, सुराज्य व स्वराज्य, सनदशीर चळवळ, वगैरे लेख लिहून व धुळयाच्या प्रांतिक सभेंत राजकीय चळवळींत एकीनें काम कसें करतां येईल याची चांगली फोड करून त्यांनीं लोकांना जें शिक्षण दिलें तेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

चालू सालीं त्यांनीं निरनिराळ्या विषयांवर जे अनेक ग्रंथ वाचले त्यांत रशियासंबंधीं ग्रंथांचा संग्रह मोठा असून* त्यावरून केसरींतही काहीं लेख

---

* टिळक यांचा सहवास सुटल्यानंतर एके प्रसंगी मी त्यांना भेटण्यास गेलों असतां ते रशियासंबंधीं एक ग्रंथ वाचीत बसले असून त्यांच्या टेबलावरही अशा ग्रंथांचा ढीग पडला होता. त्यांत पुढील ग्रंथ असलेले मला आढळून आलें:—

1 Russia what she was and what she is—By Jackoff Prelooker. 2 Russia as it really is—By Carl Joubert. 3 Russia (Story of The Nations Series)—By W. R. Morfill. 4 All the Russians—By Henry Norman. 5 Russia—By D. Mackenzie

लिहिण्याचा त्यांचा विचार होता. रशिया हा देश हिंदुस्थानासारखाच शेतकीवरचा देश असून तेथील लोकांच्या स्थितींत व आपल्या स्थितींत कसें साम्य आहे, सरकारी अधिकाऱ्यांच्या जुलमामुळें तेथील लोकांवर काय परिणाम झाले, व अखेर लोकपक्षाची सरशी होऊन राज्यव्यवस्था सुरळीत चालविण्यासाठीं त्यांनीं झार साहेबांकडून ड्यूमा सभेची कशी स्थापना करविली, इत्यादि गोष्टींची माहिती ते आपल्या पत्रांतन देणार होते. तसेंच आरिस्टॉटल, प्लेटो, फ्रीमन, सिली, ब्लँटश्ली इ. पाश्चात्य राजनीतिशास्त्रज्ञ व आपल्या इकडील मन्वादि शास्त्रज्ञ यांच्या ग्रंथांतील तत्वांचें परीक्षण करून राजनीतिशास्त्रावरही एक ग्रंथ लिहिण्याचा त्यांचा मानस होता; व त्यासंबंधीं त्यांनीं कांहीं टिपणेंही करून ठेविलीं होतीं. पण हे विचार व हीं टिपणेंही जागचेजागींच ठेऊन ते मंडाले येथील कारागृहवास भोगण्यास आज निघून गेले आहेत!

## १९०८ चा राजद्रोहाचा खटला.

चालू सालीं लो. टिळक यांजवर आलेलें व सर्वांत मोठें संकट ह्मटलें ह्मणजे त्यांच्यावर झालेला राजद्रोहाचा खटला हें होय. हा खटला जितक्या तऱ्हेनें त्यांना जाचक झाला तितक्याच तऱ्हेनें त्यांची विद्वत्ता, बुद्धिमत्ता व धैर्य हीं कसास लागून आजपर्यंत मिळविलेल्या कीर्तिमंदिरावर या वेळच्या अनेक सद्गुणांनीं त्यांनीं कळस चढविला असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. हा खटला टिळक या एका व्यक्तीवर जरी होता तरी टिळक हे एका वजनदार पत्राचे संपादक, समाजाचे पुढारी व राजकीय चळवळीचे पुरस्कर्ते असल्यामुळें या खटल्यांत हिंदुस्थानच्या सद्यःस्थितीचें प्रतिबिंब उमटलें असून त्यांच्या चरित्राबरोबरच राष्ट्राच्या इतिहासांतही तो महत्वाचा झाला आहे, असें ह्मणण्याला हरकत नाहीं. या खटल्याची प्रथम थोडी हकीकत देऊन नंतर त्यासंबंधानें दोन शब्द लिहितों.

---

Wallace ( Vols. I and II. ) 6 Impressions of Russia—By Dr. George Brandes. 7 Underground Russia—By Stepnick. 8 Russia its Industries and Trade. 9 Russia in Revolution—By C. H. Perris. 10 The Down-fall of Russia—By Hugo Gauz. 11 The Rise of The Russian Empire—By Hector H. Munro. 12 Russian Literature—By K. Walis Ziwski. 12 Behind the scenes in the Country of the Tsar—By B. Von Sydaoff. 14 Russian life in Town and Country—By Francis H. E. Pamler. 15 Russian History—By A. S. Rappoport.

## खटल्याची संक्षिप्त हकीकत.

**प्रारंभ—म्याजिस्ट्रेट कोर्टापुढील काम**:—टिळक हे "काळ" कर्ते प्रो. परांजपे यांच्यावरील राजद्रोहाच्या खटल्यासंबंधाने मुंबई येथें 'सरदारगृहां' त आले होते. मित्रमंडळींत त्यासंबंधींच चर्चा करीत असतां ता. २४ जून रोजीं पोलिस सुपरिंटेंडंट मि. स्लोन हे चीफ प्रेसिडेन्सी म्याजिस्ट्रेटाचें वारंट घेऊन आले, व टिळक यांजवर तें बजावून त्यांना गाडींतून म्या. कोर्टांत घेऊन गेले. त्याच दिवशीं इन्स्पेक्टर मि. सुलिव्हान हे मुंबईहून निघून पुण्यास गेले; व तेथील पो. इन्स्पेक्टर मि. किंग यांना बरोबर घेऊन रात्रीं 'केसरी' ऑफिसांत गेले; व टिळकांच्या बायका-मुलांस एका खोलींत ठेऊन सर्व खोल्यांस मोहरा केल्या. दुसरे दिवशीं ह्मणजे ता. २५ रोजीं त्यांनीं वाड्याची झडती घेऊन रजिस्टर बुकें, जमाखर्चाच्या वह्या व इतर कागदपत्र जप्त केले; व लगेच सिंहगडावर जाऊन त्यांच्या बंगल्याचीही झडती घेतली. परंतु बंगल्यांत कांहीं सांपडलें नाहीं. टिळक यांस पकडल्याची वार्ता विद्युद्वेगानें मुंबईप्रमाणेंच पुण्यासही पसरली; व लोकांना अत्यंत दुःख होऊन व्यापाऱ्यांनीं दुकानें बंद केलीं, विद्यार्थी शाळेंत व कॉलेजांत गेले नाहींत, व कित्येकांनीं अन्नग्रहणही केलें नाहीं! मुंबईस मि. आस्टन यांच्यापुढे ता. २५ पासून खटला सुरू झाला. सरकारतर्फे सॉलिसिटर मि. बोवेन हे काम चालवीत असून, टिळक यांच्यातर्फे बॅ. मि. दावर व रा. रा. बोडस व दीक्षित हे काम चालवीत होते. ता. १२ मेच्या केसरींतील 'देशाचें दुर्दैव!' या लेखाबद्दल पि. को. च्या १२४ अ व १५३ अ या कलमांन्वयें टिळकांवर राजद्रोहाचा आरोप ठेवण्यांत आला. या लेखाचें इंग्रजी भाषांतर दाखल केल्यावर पो. सु. मि. स्लोन यांची टिळकांना वारंटानें पकडल्याबद्दल, केसरीपत्राचा तो अंक प्रसिद्ध होऊन विकत घेतल्याबद्दल व पत्रास मुंबईस पुष्कळ वर्गणीदार असल्याबद्दलची जबानी झाली. नंतर खटला ता. २९ पर्यंत तहकूब राहिला. मध्यंतरीं टिळकांना जामिनावर सोडण्याचा अर्ज करण्यांत आला; पण म्याजिस्ट्रेटांनीं जामिनावर सोडण्याचें नाकारिलें. तसेंच टिळकांना त्यांच्या स्नेह्यांस भेटतां यावें, ह्मणून १८९७ सालीं जसें त्यांना पोलिस-चौकींत ठेवण्यांत आलें होतें तसेंच या वेळींही ठेवावें, ह्मणून रा. दीक्षित यांनीं अर्ज केला; पण तोही नामंजूर होऊन त्यांना डोंगरीवर ठेवण्यांत आलें. पुढें त्यांना कोर्टाच्या कोठडींत ठेविलें व तेथें त्यांच्या स्नेह्यांस भेटण्याची परवानगी मिळाली. ता. २७ जून रोजीं पो. सु. मि. स्लोन हे सरकारी वकील मि. बोवेन यांच्यासह चौ. प्रे. म्या. कोर्टांत गेले; व केसरीच्या ता. ९ जूनच्या अंकांतील 'हे उपाय टिकाऊ नाहींत' हा लेख राजद्रोही आहे, ह्मणून त्यासंबंधानें त्यांनीं वारंट मागितलें; व ता. २९ रोजीं तें तुरुंगांतच टिळकांवर बजावलें. याप्रमाणें

रोजीं खटल्याची चौकशी होणार ह्मणून कळतांच कोर्टाबाहेर लोकांची गर्दी झाली; व गडबड उडून लोकांनी दंगा केला; पोलिसांस दगड बसले; व सब इ. जेराई यानाही एक दगड लागला. याबद्दल सहा इसमांस गैरकायदा मंडळींत सामील झाल्याच्या आरोपावरून पकडले. या दिवशी फिर्यादीतर्फे बॅ. बिनिंग व पब्लिक प्रॉ. मि. बोवेन हे काम चालवीत असून, टिळकांतर्फे बॅ. दावर, इंद्रजित, काळाभाई व गाडगीळ, व वकील रा. बोडस आणि दीक्षित हे काम चालवीत होते. काम चालू झाल्यावर आरंभी बॅ. दावर यांनी 'अॅडव्होकेट,' 'टाइम्स,' 'बॉंबे ग्याझेट' या पत्रांनी खटल्याची बातमी देण्यापलीकडे टीका वगैरे करूं नये अशी ताकीद देण्याविषयी कोर्टास विनंति केली; व कोर्टाने सदर पत्रांच्या बातमीदारांस तशी ताकीद दिली. नंतर टिळकांवर दोन खटले केले आहेत, सबब ते निरनिराळे चालावे अशी सरकारी बॅ. मि. बिनिंग यांनी कोर्टास विनंति केली. यावर बॅ. दावर यांनी दोन्ही लेखांबद्दल एकच आरोप असून वेळेचा अपव्यय होऊं नये ह्मणून एकाच वेळीं चौकशीचें काम चालवावें असे सांगितले. पण म्या.नीं चौकशी निरनिराळी करण्याचे ठरविलें. नंतर मि. बिनिंग यांनी केसरीचे संपादक, मुद्रक व प्रकाशक ह्मणून टिळकांनी केलेले प्रतिज्ञा–लेख कोर्टांत हजर केले. पुढे ओरिएंटल ट्रान्सलेटरच्या ऑफिसांतील फर्स्ट असि. मि. भास्कर विष्णु जोशी यांची केसरींतील लेखांची इंग्रजी भाषांतरें केल्याबद्दल साक्ष झाली व ती भाषांतरें खटल्यांत दाखल केली. नंतर रा. नारायण जगन्नाथ दातार 'केसरी'चे मुंबईचे एजंट, यांची मुंबईतील वर्गणीदारांना अंक पोंचवीत असल्याबद्दलची साक्ष झाली. पुढे इ. सुलिव्हान यांची केसरी ऑफिसची झडती घेतल्याबद्दल जबानी झाली; व त्यांत त्यांनीं टिळकांच्या लिहिण्याच्या टेबलाचे उजव्या खणांत आपणास एक पोष्ट कार्ड सांपडलें, ते पोस्टांतून आलेलें नसून त्यावर एका बाजूस मजकूर लिहिलेला आहे असें सांगितले. हें झाल्यावर म्या.नी १२४ अ व १५३ अ कलमाखालीं आरोप ठेऊन खटला सेशनकमिट केला. नंतर ता. ९ जूनच्या लेखाबद्दलही असेंच काम चालून त्यासंबंधानेंही आरोप ठेऊन खटला सेशनकमिट केला. खटला से. कमिट झाल्यावर टिळकांना जामिनावर सोडण्याचा अर्ज केला. तो ता. २ जुलै रोजी ज. दावर यांजपुढें निघून त्यांनीं टिळकांना जामिनावर सोडण्याचें नाकारिलें. ता. ३ जुलै रोजीं अॅडव्होकेट मि. ब्रॅन्सन यांनीं ज. दावर यांच्यापुढें खटला स्पेशल ज्यूरीपुढें चालावा असा अर्ज दिला. यावर टिळकांतर्फे बॅ. बॅप्टिस्टा यांनीं स्पेशल ज्यूरी नेमण्याने आरोपीचें अनेक तऱ्हेनें नुकसान होणार आहे ह्मणून तक्रार केली; पण ती बाजूस सारून ज. दावर यांनीं स्पेशल ज्यूरीपुढेंच खटला चालावा असा हुकूम केला; व खटल्याची तारीख १३ जुलै ही नेमिली.

**हायकोर्टांतील खटला:**—ता. १३ जुलै रोजीं हायकोर्टांत ज. दावर यांच्यापुढें खटला सुरू झाला. त्या वेळीं कोर्टांत व बाहेर पोलिस शिपायांच्या तुकड्या व लष्करी

लोक आणवून फार बंदोबस्त ठेविला होता. या दिवशी गिरण्यांतील कित्येक लोक कामावर गेले नाहींत व मूळजी जेठा, लक्ष्मीदास खिमजी वगैरे बाजार बंद होते; व कांहीं व्यापाऱ्यांनीं खटला चालू असेपर्यंत दुकानें उघडावयाचीं नाहींत असा निश्चय केला होता. आधले दिवसापासूनच टिळकांना हायकोर्टांत आणून ठेविलें होतें. खटल्यास ११॥ वाजतां सुरुवात झाली. सरकारतर्फे अॅ. ज. मि. ब्रॅन्सन, मि. बोवेन, मि. बिनिंग व मि. इन्व्हरॅरिटी हे असून टिळक स्वतः आपलें काम चालवीत होते; व त्यांना बॅ. बॅप्टिस्टा, रा. रा. दादासाहेब खापर्डे, करंदीकर, न. चि. केळकर, बोडस, दीक्षित, गांधी हे मदत करीत होते. टिळकांना अॅ. जनरल यांच्या मेजाजवळ खुर्ची देण्यांत आली होती.

आरंभीं दोन्ही आरोप सारख्या स्वरूपाचे असल्यामुळे त्याबद्दल खटले एकदम व एकाच स्पेशल ज्यूरीपुढे चालावेत असा मि. ब्रन्सन यांनी अर्ज केला. या अर्जास टिळकांनी हरकत घेतली व २७३ कलमाप्रमाणे दोन्हीही खटल्याची चौकशी निर राळी व्हावी असे सांगितलें. दोन्ही पक्षांचे ह्मणणे ऐकून घेऊन ' गुन्ह्यास कारणीभूत झालेला व्यवहार एकच नाही. तथापि, चार आरोपांपैकीं एक आरोप काढून घेण्यास अॅ. जनरल तयार असतील तर दोन्ही खटले एकदम चालावेत असा मी निकाल देईन ' असे ज. दावर यांनी सांगितल्यावर पहिल्या खटल्यांतील १५३अ खालचा आरोप काढून घेण्यांत आला; व दोन्हीं खटल्यांचे काम एकदम चालू झाले. नंतर टिळक यांस आरोपीच्या पिंजऱ्यांत उभे करून त्याच्यावरील आरोप वाचून दाखविण्यांत आले; व ' मी निर्दोषी आहें, ' असा टिळकांनी जबाब दिल्या-वर त्यांना पुन्हां आपल्या खुर्चीवर येऊन बसण्याची परवानगी दिली; व पुढील कामास सुरुवात झाली. यानंतर क्लार्क ऑफ दि क्राऊन यांनी आक्षेपार्ह लेख व त्यांची इंग्रजी भाषांतरे वाचून दाखविल्यावर ' भाषांतरें चुकीची आहेत, ' असें टिळकांनीं सांगितलें. नंतर कित्येक ज्यूरर्सबद्दल दोन्ही पक्षांच्या हरकती होऊन सहा युरोपियन, एक ज्यू, व दोन पारशी अशा गृहस्थांची स्पेशल ज्यूरी नेमण्यांत आली; व तिच्यापुढे खटला सुरू झाला.

प्रथमतः बॅ. इन्व्हरॅरिटी यांनी पिनल कोडांतील राजद्रोहाचें कलम वाचून दाखवून ' देशाचें दुर्दैव, ' व ' हे उपाय टिकाऊ नाहींत, ' हे लेख त्या कलमाखालीं कसे येतात व यांतील दुसरा लेख १५३ अ कलमाखालीं कसा येतो हें सांगितलें. १५३ अ कलमाखाली ठेवण्यांत आलेला आरोप शाबीत करण्याकरितां ते केसरीच्या आणखी कांहीं लेखांतील उतारे वाचूं लागले; पण पुराव्यांत दाखल केल्याखेरीज हे लेख वाचूं नयेत, अशीं टिळकांनीं हरकत घेतल्यामुळें लेख वाचण्याचें काम बंद केलें; व त्यावरील टीकाही तहकूब केली. नंतर खटल्यांतील पुरावा घेण्यास सुरुवात झाली. या पुराव्यांत फिर्याद करण्याविषयीं सरकारची मंजुरी, लेखांचीं इंग्रजींत

केलेली भाषांतरे वगैरे दाखल करण्यांत आलीं. दाखल केलेल्या लेखांत ता. १२ मेच्या केसरींतील तिसरी व चवथी स्फुट सूचना होती. त्यासंबंधानें टिळक ह्मणाले की, 'हे लेख वाईट हेतु सिद्ध करण्याकरितां दाखल करतां येत नाहींत. लेख कोणत्या प्रसंगीं लिहिले ह्याचा खुलासा करण्यासाठीं असले लेख दाखल करण्यांत यावेत. यासंबंधानें मेनच्या ५२२ पानावर जो स्पष्ट उल्लेख आहे तो जज्ज साहेबांनीं पहावा.' 'वाईट हेतु ( animus ) दर्शविण्यासाठीं मागील खटल्यांत घेतल्याप्रमाणेच हे लेख दाखल करता येतात, असें जज्ज साहेबांनी सांगून ते व ता. १९ मेच्या अंकांतील 'दुहेरी इषारा,' ता. २६ मेच्या अंकांतील 'बॉब गोळ्याचा खरा अर्थ,' ता. २ जूनच्या अंकांतील 'बॉब गोळ्याचे रहस्य' या मथळ्यांखालचे लेख, व ता. ९ जूनच्या अंकांतील ११ नंबरची स्फुट सूचना हे लेख दाखल करून घेतले. नंतर टिळकांनी रा. जोशी यांची भाषांतरासंबंधानें सुमारें दोन दिवस उलट तपासणी केली; व त्यांतील कित्येक चुका कोर्टाच्या नजरेस आणल्या. ही तपासणी चालली असतां 'बॉबे गॅझेट' पत्रानें 'बक्षिस मिळविण्यासाठीं धडपडणाऱ्या उमेदवाराची परीक्षा जितकी कसून घेतली जाते तितकी साक्षीदाराची उलट तपासणी करण्यास आरोपीस मोकळीक देण्यांत आली होती,' अशा अर्थाची जी टीका आपल्या पत्रांत केली होती ती गैरकायदा आहे, असें टिळकांनी कोर्टास दाखविल्यामुळे कोर्टानें त्या पत्रास अशी टीका पुन्हां न करण्याबद्दल ताकीद दिली. नंतर रा. जोशी यांची फेरतपासणी होऊन रा. दातार यांची केसरीचे आपण एजंट आहों, व आपण पत्रे पोंचवितों, अशा अर्थाची सरकारतर्फे साक्ष झाली. पुढे पो. इ. मि. सुलिव्हान यांची साक्ष झाली. त्यांत पुण्यांतील टिळकांच्या घराची व ऑफिसची झडती घेतल्याबद्दल सांगून त्यांनीं झडतींत टिळकांच्या टेबलांत एक कार्ड सांपडलेले दाखविलें. अॅ. जनरलांनी तें कार्ड पुराव्यांत घ्यावें असें सांगितलें; व टिळकांनीं 'या खटल्यांतील गोष्टीशीं कार्डांतील मजकूर गैरलागू आहे व ह्मणून ते पुराव्यांत घेऊं नये,' अशी हरकत घेतली; पण कोर्टानें ती अमान्य करून कार्ड पुराव्यांत घेतलें. नंतर इ. सुलिव्हान यांनीं घरांत किती कागद जप्त केले यासंबंधीं उलटतपासणीचे कांहीं प्रश्न होऊन दुसरे दिवसाचें काम संपलें. तिसरे दिवशीं ह्मणजे ता. १५ जुलै रोजीं खटल्याचे काम सुरू झालें त्यावेळीं मुंबईचे शेरीफ द्वारकादास धरमसी, ज. नाइट व मुंबईचे रशियन कॉन्सल हे मुद्दाम खटला ऐकण्याकरितां कोर्टांत आले होते. कामास सुरुवात झाल्यावर इ. मि. सुलीव्हान यांच्या उलट तपासणीस सुरुवात झाली. त्यांत वारंटांत सिंहगडचे घराचें नांव केव्हां नमूद केलें, तेथें झडतीला जातेवेळीं आपल्या माणसांपैकीं कोणास नेलें होतें कीं नाहीं, किल्ल्यां नसल्यामुळें कपाटे कशीं फोडलीं वगैरेसंबंधानें टिळकांनीं कांहीं प्रश्न विचारले. नंतर कोर्टांत झडतींत सांपडलेले कागदपत्र आणविण्यांत व ते चाळ-

ण्यांत सुमारें दीड तास गेला, व पुन्हां मि. सुलीव्हान यांची थोडी उलटतपासणी होऊन आणलेल्या कागदांपैकीं बरेच कागदपत्र टिळकांनीं पुराव्यांत दाखल केले. नंतर टिळकांनी कोर्टास आपला लेखी जबाब दिला. त्यांत केसरी-पत्राची सर्व प्रकारची कायदेशीर जबाबदारी मजवर आहे, राजकीय विषयांची चर्चा करतांना मी इंग्रजी शब्दांस प्रतिशब्द ह्मणून कांहीं शब्द मराठींत वापरले आहेत. हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत कोणत्या सुधारणा अवश्य आहेत यासंबंधाने अधिकार-विभागणी-कमिशन पुढें दिलेलें माझें मत काय आहे; व ज्वालाग्राही पदार्थासंबंधाचा कायदा पास झाल्यावर त्या पदार्थासंबंधाच्या व्याख्येवर टीका करण्याचा माझा इरादा होता ह्मणून त्यासंबंधाच्या पुस्तकांचीं नांवे किंमतीसह एका क्याटलागांतून, पुढें आणलेल्या या पोस्टकार्डावर, मी लिहून ठेविली आहेत, अशा अर्थाचे मुद्दे नमूद केले आहेत. नंतर टिळकांनीं एकाएकी कागदपत्र कोर्टांत हजर केल्यामुळें त्यांचा शेवटी बोलण्याचा हक्क नाहीसा होतो यावर थोडी ' भवति न भवति ' होऊन मि. ब्रॅन्सन यांजकडून उत्तरादाखल जे भाषण होईल त्यांत काही अगदीं नवीन गोष्टी जर पुढे आल्या तर त्यासंबंधाचा खुलासा करण्यास मी तुह्मांस परवानगी देईन असें ज. दावर यांनीं सांगितल्यावर टिळकांनी ज्यूरींस उद्देशून भाषण करण्यास प्रारंभ केला.

**टिळकांचें भाषणः**—टिळकांचें भाषण बुधवार ता. १५ जुलै रोजी तिसऱ्या प्रहरानंतर जें सुरू झाले ते गुरुवार सबंध दिवस, शुक्रवारी २॥ वाजेपर्यंत, सोमवार व मंगळवार सबंध दिवस व बुधवारीं निम्मा दिवस, असे एक सारखे ४॥ दिवस चाललें असून त्यांत कायदा, आक्षेपित लेखांचा उद्देश, भाषांतरें कशी चुकली आहेत, उतारे दाखल करण्याचा हेतु, ज्यूरींचीं कर्तव्यें, मुद्रण–स्वातंत्र्य, हिंदुस्थानची परिस्थिति वगैरे लहानमोठ्या अनेक विषयांचें उद्घाटण असून ते अनेक दृष्टीनें महत्वाचें असल्यामुळें या पुस्तकांत त्याचा अक्षरशः समावेश करतां येत नाही. तथापि, त्यांच्या भाषणाचें स्वरूप कळावे ह्मणून त्यांतील महत्वाच्या गोष्टीचा अतिसंक्षेपानें येथें समावेश करितो. ते ह्मणालेः–

"माझ्या अंगीं ॲडव्होकेट–जनरला इतकें वक्तृत्व नाहीं; व त्यांच्या इतकीं निरनिराळी कारणें देऊन विषयाची सुगम मांडणीही मला करतां येणार नाहीं. तथापि, माझ्या स्वतःच्या लेखासंबंधानें मी स्वतःच खुलासा करणें बरें, ह्मणून मीं हें काम शिरावर घेतलें आहें. माझ्यावर ठेवलेले आरोप स्पष्ट व विवक्षित नाहींत. सबंध लेखच आरोपांत सामील करण्यांत आले आहेत; सबब फिर्यादीपक्षाचा भर ज्या वाक्यांवर किंवा भागांवर असण्याचा संभव आहे त्या वाक्यांचा अगर भागांचा उल्लेख करण्याची जबाबदारी मजवर येऊन पडली आहे. फिर्यादीपक्षानें फक्त मझ्या लेखांतील शब्दरचनेवरून तुह्मांस कांहीं अनुमाने काढण्यास सांगितली आहेत, याशिवाय

दुसरें कांहीं नाहीं. 'कृत्यांचा स्वाभाविक परिणाम हाच कृत्यें करण्यांत मनुष्याचा हेतु असतो,' या तत्वाप्रमाणे वागून मला राजद्रोही ठरविण्यास तुह्मांस सांगितलें आहे. लेखांची प्रसिद्धि, लेखांतील लाक्षणिक अर्थ आणि ध्वनितार्थ व या लेखांचा हेतु अशा रीतीनें या खटल्याचे तीन विभाग करता येतात. प्रसिद्धीची जबाबदारी मी घेतली आहे; भाषांतरें अर्थांचा अनर्थ करणारीं असल्यामुळे त्यांवरून लाक्षणिक व ध्वन्यर्थ काढण्यांत येऊं नयेत. हेतु सिद्ध करण्याकरितां फक्त एक पोस्ट–कार्ड पुढें आणलें आहे; व त्याला दुसऱ्या लेखांच्या भाषांतरांची जोड दिली आहे. ज्या समाजाविषयीं तुह्मांला बहुधां काडीचीही माहिती नाहीं त्या समाजांत चुकीच्या भाषांतरांतील कांहीं शब्दांनी द्वेषभाव किंवा तिरस्कार उत्पन्न होईल असें मानून मला दोषी ठरविणे सुरक्षित नाही, इतकेच नव्हे तर भयंकर आहे. फ्रेंच भाषेत, फ्रेंच लोकांकरितां एकाद्या लिहिलेल्या लेखाचा इंग्लंडातील लोकांवर काय परिणाम होईल, हे त्याच्या इंग्रजी भाषांतरांवरून ठरविण्याचे काम इंग्लंडांतील ज्यूरी घेईल काय? तसेच सभोंवारच्या गोष्टींचीही माहिती असल्याशिवाय तुह्मांस निर्णय करतां येणें शक्य नाही. कृत्याचे साहजिक परिणाम हाच हेतु धरला पाहिजे, या तत्वाचा खल सुमारें शंभर वर्षांपूर्वी इंग्लंडांतील ज्यूरीपुढे झाला आहे. १७९२ सालीं फॉक्सचा लायबेल ॲक्ट पास होण्यापूर्वीचा हा आहे. हें तत्व आतां चुकीचे ठरले आहे. भोंवतालच्या स्थितीवरूनच अशा खटल्याचा ज्यूरी तिकडे निकाल देते; व त्यानेंच मुद्रणस्वातंत्र्याचें तिकडे रक्षण झालें आहे. राजद्रोहाचा कायदा इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशांत जवळ जवळ एकच आहे. तथांपि, तिकडे ज्यूरी आपल्या अधिकाराचा उपयोग करते; व नुसत्या कायद्याच्या अक्षरांकडे लक्ष देण्याचें नाकारून कधीं कधी जज्जानें अमुक प्रकारचा निकाल द्या, असें ज्यूरीस सांगितलें तरी आपल्या अधिकारासाठीं ज्यूरींतील लोक भांडले आहेत. १२४ अ कलम बारकाईने पाहिलें तर त्यांत दोन भाग आपणांस दिसून येतील; व पहिल्यांत प्रत्यक्ष राजद्रोह करण्यासंबंधाचा मुद्दा आहे. पण या भागाखालीं फिर्यादीपक्षानें मजवर आरोप ठेविला आहे असें मला वाटत नाही. कारण, माझ्या लेखांनीं कोठे शांतताभंग झाल्याचा पुरावा तुमच्यापुढें मांडण्यांत आला नाही. दुसरा भाग अप्रीति उत्पन्न करण्याच्या प्रयत्नासंबंधानें आहे. 'अप्रीति' हा भावरूपी मनोविकार आहे; आणि त्याचा अर्थ प्रजाधर्मापासून दूर करणें असा आहे. 'प्रयत्न करणें' याचा अर्थ कायद्याच्या भाषेत निराळा होतो. 'भाला' पत्रावरील खटल्याचे वेळीं ज. बॅटी यांनीं असे म्हटलें आहे कीं, "हेतुपुरस्सर पूर्वी विचार करून कृत्य करण्यास प्रवृत्त होणें" याचें नांव 'प्रयत्न करणें.' प्रयत्न शेवटास गेला, सिद्ध झाला, ह्मणजे त्या कृत्याचा प्रयत्न करण्यांत आला असे म्हणावयाचें नाहीं, तर तें कृत्य झालें असेंच म्हणावयाचें. सिद्धिविरहित जे कृत्य त्यालाच केवळ 'प्रयत्न' म्हणतां

यावयाचे नाही. प्रयत्न सिद्धीस न जाणे हे जेव्हां कर्त्याच्या इच्छेबाहेरचें असते म्हणजे कर्त्याच्या हातांत नसलेल्या इतर गोष्टींमुळे जेव्हां ते काम तडीस जात नाहीं, तेव्हा नुसता प्रयत्न केला असे म्हणतात. कर्त्याच्या शक्तीबाहेरच्या इतर कारणां-मुळे कृत्य ज्या वेळीं शेवटास जात नाही तेव्हां त्या कृत्याचा ' प्रयत्न ' झाला असें म्हणतात. खरोखर प्रयत्न म्हणजे गुन्हाच. मात्र या गुन्ह्यांत गुन्ह्याचे शेव-टील कृत्य असतां कामा नये. गुन्ह्याची नुसती तयारी करून चालत नाही. ही तयारी इतकी पुढे गेलेली पाहिजे की, गुन्हा होणे हे तयारी करणाराच्या हातांत राहतां कामा नये. तयारी पूर्ण असतांही कांहीं विवक्षित परिस्थितीमुळें एकाद्या कृत्यांत सिद्धि न येणे याचें नांव प्रयत्न. तेव्हा माझ्या शक्तीबाहेरच्या कांहीं गोष्टी-मुळें माझ्या प्रयत्नांत मला यश आलें नाही हे दाखविले पाहिजे. पण अशा प्रकारचा पुरावा तुमच्यापुढे मांडलेला नाही. केवळ एकाद्या लेखाचे प्रसिद्धि-करण हा कांहीं ' प्रयत्न ' होऊं शकत नाही. प्रयत्नास गुन्हा करण्याचा हेतु पाहिजे. प्रथम मनांत गुन्हा आला पाहिजे, व नंतर त्याचा विचार होऊन तो करण्याचे ठरले पाहिजे. त्यानंतर तो गुन्हा सिद्धीस नेण्यासाठीं कमी अधिक प्रमाणाने तयारी करावयास पाहिजे, व तो गुन्हा करण्याचे कृत्य झाले पाहिजे. या कृत्यांत त्याला अडथळा येईल अगर ते तडीस जाईल; व त्या मानाने गुन्हेगाराच्या मनांत असलेला हेतु सिद्धीस जाईल अगर जाणार नाही. याचे नांव प्रयत्न. जेव्हा ते कृत्य पूर्णपणे शेवटास जाते आणि हेतु सिद्धीस जातो तेव्हा त्याला प्रयत्न असे म्हणत नाहीत; असे ज. स्टीफन्स यांनी इंग्लंडांतील फौजदारी कायद्याच्या इतिहासांत सांगितले असून मेनच्या कायद्यांतही अशाच तऱ्हेची चर्चा केली आहे; व त्यांतील पान ९३२–९३३ मधील उदाहरणे लक्ष देण्यासारखी आहेत. हेतु दाखविण्यासाठीं लेखांचे प्रसिद्धीकरण पुढे आणण्यांत आले आहे; पण नुसत्या प्रसिद्धिकरणाने कोणताही हेतु सिद्ध करतां येणे शक्य नाही. ज्या गोष्टीमुळे प्रकाशकाचा हेतु लेखांत ' अप्रीति ' उत्पन्न करण्याचा होता, असें दाख-वितां येईल त्या गोष्टीवरून हेतु सिद्ध केला पाहिजे. केवळ लेखांचे प्रसिद्धीकरण हाच जर ' प्रयत्न ' सिद्ध करण्यास पुरेसा पुरावा असला तर कोर्टाच्या शिरस्ते-दारानेंही तुह्मांस लेख वाचून दाखवून एक प्रकारे प्रसिद्ध केले आहेत; तेव्हां त्याच्यावरही राजद्रोहाची फिर्याद कां होऊं नये ? तसेच हिंदुस्थानांतील बहुतेक वर्तमानपत्रांतून हे लेख प्रसिद्ध झाले आहेत, म्हणून ते राजद्रोह करण्याच्या प्रय-त्नाचे गुन्हेगार आहेत काय ? नाही. कारण, लोकांना माहिती देण्यासाठीच हे लेख प्रसिद्ध करण्यांत आले होते. हल्लींच्या कायद्याचे लॉर्ड कॉकबर्न यांनीं असें स्पष्टीकरण केलें आहे:—" दुष्ट हेतूने केलेली अगर करण्याचा प्रयत्न केलेली आगळीक ही आगळीक खरीखुरी असून दुष्ट हेतूनें केलेली असली अगर करण्याचा प्रयत्न केलेली

असली पाहिजे. " गुन्हा करण्याचा हेतु असणारें मन पाहिजे. दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा विचार न करतां फक्त भाषेच्या प्रयोगांत राजद्रोह असूं शकतो ही जी समजूत आहे ती चुकीची आहे. या चुकीबद्दल फार सावधगिरी ठेविली पाहिजे. सार्वजनिक चर्चा करण्याचा जो हक्क आहे त्याशीं हें तत्व विसंगत आहे. लेख प्रसिद्ध करणें हा एक पुरावा धरला तर तो रुपयांत एक आणा आहे, असें समजलें पाहिजे. पंधरा आणे पुरावा दुसरीकडे पाहिला पाहिजे. अर्थात् परिस्थितीचा तुह्मांस विचार केला पाहिजे व त्यावरून आरोपीच्या मनांत विवक्षित हेतु होता किंवा नव्हता हें तुह्मी ठरविले पाहिजे. हेतु सिद्ध करण्याची फिर्यादीपक्षाची इच्छा नाहीं. लेख कोणत्या परिस्थितींत लिहिले अगर लेख लिहिण्यांत हेतु काय होता हे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीवर टाकली आहे. पिनलकोडांतील कांहीं कलमांना अपवाद असतात; व फिर्यादीनें पुराव्याने आरोप सिद्ध केल्यानंतर या अपवादांत आपलें कृत्य पडते म्हणून मी निरपराधी आहे, असें सिद्ध करण्याचा बोजा आरोपीवर पडतो. १२४ अ कलमाला अपवाद नाहींत; पण तीन खुलासे आहेत. हे खुलासे माझ्या उपयोगी नाहीत, हे सिद्ध करण्याचा बोजा फिर्यादीपक्षावरच आहे. राजद्रोहाच्या फिर्यादींत सांप्रत असे करण्यांत येतें कीं, खुलाशांचा फायदा आरोपीला कां दिला पाहिजे हे आरोपीनेच सिद्ध करून दाखवावें असे सांगण्यांत येतें. पण तसें न करतां टीका करण्याच्या अखत्याराची सीमा उल्लंघिली आहे हे फिर्यादीनेच दाखविलें पाहिजे. हेतु दाखविण्याकरितां व खुलाशांचा फायदा मिळावा म्हणून आरोपीनें पुरावा दिला असतां शेवटीं बोलण्याचा आरोपीचा हक्क नाहींसा होतो, असें कोर्टानें एक दोन प्रसंगी मला बजावले आहे. सभोंवारच्या गोष्टी पाहून विचार केल्याने वर्तमानपत्राचें स्वातंत्र्य ज्यूरी रक्षण करते. तसेंच खुलाशाचें उल्लंघन झाले या संबंधाचा पुरावा ज्यूरीनें मागितला पाहिजे. एरव्हीं, निर्णय देतां कामा नये. हेतु कसा ओळखावा? हेतु ही कांहीं एकादी जडवस्तु नाहीं. दुसऱ्याच्या अंतःकरणांत काय आहे, हे समजणे कठिण आहे. अर्थात् हेतु कृत्यावरूनच ठरविला पाहिजे. हेतु नेहमीं अनुमानानेंच काढावयाचा असतो; व हें अनुमान एकाद्या दुसऱ्या गोष्टीवरून न काढतां सभोंवारच्या सर्व गोष्टींवरून काढलें पाहिजे. इंग्लंडांतील कित्येक विद्वानांचे असेच मत आहे. लेखांतील धाटणीचें अनुमान सकृद्दर्शनीच शब्दांवरून करतां येणार नाहीं; आणि असें होईल तर कायद्याचें उल्लंघन केल्याबद्दल प्रत्येक कोशकारालाही तुरुंग दाखवावा लागेल! 'अर्स्किनची राजद्रोहावरील भाषणे' या पुस्तकांत 'सेंट असफच्या डीन (पाद्री) वरील खटल्यांत आरोपीची तरफदारी करतांना केलेल्या भाषणांत पुढीलप्रमाणें शब्द आहेत. राजधर्मशास्त्रासंबंधानें लिहितांना 'अधिकाराचें अतिक्रमण केल्यास राजा आणि एकादा पोलिस शिपाई यांत कांहीं फरक नाहीं,' असे लॉकने ह्मटलें

आहे. लॉकचें एवढेंच वाक्य घेणें रास्त होईल काय ? आर्स्किनच्या पुस्तकांतला मी आणखी एक उतारा वाचून दाखवितो. हा उतारा बायबलासंबंधाने आहे. त्यांत ' परमेश्वर नाहीं ' एवढेच शब्द वाचले तर ती ईश्वराची निंदा होईल. करितां संदर्भ पाहिला पाहिजे. सरकारानें आरोप ठेवला ह्मणजे ज्यूरीने ' होय ' ह्मणावयाचे नाहीं. तर सभोवारच्या गोष्टींचा विचार करतां यावा ह्मणून ज्यूरींतील इसम लोकांतूनच निवडलेले असतात. इंग्लंडांतील ज्यूरीचें एकमत झाल्याशिवाय निकाल लागत नसतो. त्यांपैकीं एक जरी विरुद्ध असला तरी ती ज्यूरी मोडून दुसरी बोलावतात; व असा प्रकार दोन तीन वेळां झाला तर आरोपीला सोडून देण्यांत येतें. १२४ अ कलमांत ' एक्साइट ' ( Excite ) ह्मणजे चेतविणे असा शब्द आहे. पण ' द्वेष ' किंवा ' तिरस्कार ' मी कसा चेतविला हे मला समजत नाहीं. समजा, देशांत असंतोष आहे आणि चौकशी करण्याकरितां धाडलेल्या एकाद्या अमलदाराने ' असंतोष कांहीं कारणामुळे उपस्थित झाला असून तो सरकारला सहज दूर करतां येण्यासारखा आहे, ' असा जर रिपोर्ट केला तर तो राजद्रोही होईल काय ? अप्रीतिमय मनोविकार वाढविण्यास तुह्मी जर कांहीं एक केलें नाहीं, लोकांत असलेली अप्रीति तुह्मी जर व्यक्त केली, नुसता तुह्मी जर रिपोर्ट केला किंवा प्रचलित विचार व्यक्त केले तर तें कृत्य १२४ अ कलमाखालीं येत नाहीं. कोणाच्याही विरुद्ध लिहिल्याने तो नाखुष होणार; पण हा कांहीं राजद्रोह नव्हे. सरकारी कृत्यांवर नापसंती व्यक्त करणाऱ्या टीकेसंबंधीं जो खुलासा आहे त्यावरून हे सहजीं व्यक्त होतें. वर्तमानपत्रकारांना इतके स्वातंत्र्य आहे हे दाखविण्याकरितां तरी हा खुलासा असला पाहिजे एक, नाहीं तर याला मुळींच अर्थ नसला पाहिजे एक. राजद्रोहाची बरोबर व्याख्याच नाहीं. लॉर्ड केनियान सारख्या एका विद्वान् व सन्मान्य जज्जाने सुद्धां असें ह्मटले आहे कीं, "माझ्या देशबांधवांपैकीं कोणत्याही बाराजणांनीं एकमतानें एकादा अग्रलेख अगर लेख दोषार्ह आहे असें सांगितले तर तो राजद्रोह होईल. राजद्रोहाविषयींची बरोबर कल्पना तुह्मांला कोणत्याही व्याख्येने येणे शक्य नाहीं." पेटर्सननें ' वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य ' नामक पुस्तक लिहिले आहे त्यांत लॉर्ड केनियानने ज्यूरीला खटला समजावून देतांना जें भाषण केले आहे ते मी तुह्मांस वाचून दाखवितों ह्मणजे त्यावरून या गोष्टींचा खुलासा होईल. पीनलकोडांत सरकार या शब्दाची व्याख्या आहे. त्यांत सरकार याच्या मागे ' कायद्यानें प्रस्थापित झालेलें ' असे शब्द अथवा विशेषण आहे; आणि त्यावरून सरकार याचा अर्थ अधिकाऱ्यांव्यतिरिक्त जी सरकारची सत्ता ती असा आहे. अधिकारीवर्ग (ब्यूरॉक्रसी) ह्मणजे सरकार की काय, या प्रश्नाचा आपणास विचार केला पाहिजे. अधिकारीवर्ग नाहींसा झाला अशी कल्पना केली तर, सरकारही नाहींसें होईल काय ? १२४ अ कलमांतलि सरकार ह्मणजे अधिकारीवर्ग नव्हे. शिवाय अंतिम साध्य ( Ideal )

पीनलकोडाच्या कलमांखालीं पडत नाहीं. एकादी विशिष्ट प्रकारची राज्यपद्धति देशाच्या हिताची आहे, असें ह्मणण्यास मला कांहीं एक हरकत नाहीं, इतकेंच नव्हे तर या मताचा प्रसार करण्यासही कांहीं प्रत्यवाय नाहीं. जोंपर्यंत मी अप्रीति उत्पन्न करीत नाहीं तोंपर्यंत माझे मत व्यक्त करण्यास मला पूर्ण मोकळिक आहे. असे असल्याखेरीज जगाची प्रगतिच व्हावयाची नाही. 'भाला' पत्रावरील खटल्याचे वेळी ज. बॅटी यांनीं असे ह्मटले आहे की, विशिष्ट प्रकारची राज्यपद्धति असूं नये हे ह्मणण्यास कोणासही परवानगी आहे. त्यामुळें सरकारशीं कोणत्याही प्रकारचे शत्रुत्व आहे असें होत नाही. एकाद्या मुद्याची चर्चा तात्विक दृष्टीनें करीत असतांना जर १२४ अ कलमाचा उपयोग कडकपणे केला तर जगांतील ज्या ज्या तत्ववेत्त्यामुळें जगाची प्रगति झाली आहे त्या त्या सर्व तत्ववेत्त्यांना तुरुंगांत पाठवावें लागेल! कान्स्टिटयूशनल राज्यपद्धति इंग्लंड देशाच्या हिताची नाही, असे जर एकाद्याने इंग्लंडांत लिहिलें तर अशा प्रकारचे मत व्यक्त करणे राजद्रोहाचें नाही असें सांगण्यांत आलें आहे, हे मोर्ले साहेबांच्या 'काम्प्रोमाइज' ( Compromise ) नांवाच्या ग्रंथांतील मी वाचून दाखवितो त्या उताऱ्यावरून व्यक्त होईल. समजा, मला लक्षाधीश व्हावयाचे आहे, एवढे ह्मटल्याबरोबर माझी दरवडा घालण्याची इच्छा आहे, असे ह्मणतां येईल काय? त्याचप्रमाणे 'ब्यूरॉक्रसीत' (अधिकारीवर्गात) पालट झाला पाहिजे किंवा त्याची सत्ता मर्यादित केली पाहिजे असें मी ह्मटले तर तेवढ्यावरून माझा बेत बंड करण्याचा आहे किंवा सरकाराविरुद्ध द्वेष उत्पन्न करण्याचा आहे असे होईल काय? मराठी लेखाच्या वाचनाने काय परिणाम होईल ह्याचे अनुमान त्या समाजाच्या मनोवृत्तीचा व स्थितीचा विचार करूनच तुह्मांस काढले पाहिजे. माझे विद्वान् मित्र मि. बॅप्टिस्टा यांनी मला सुचविलेलेच उदाहरण घ्या. गोवधासंबंधाने तुह्मी जर एका विशिष्ट पद्धतीनें लेख लिहिला तर त्याने मुसलमानांना राग येणार नाही, व हिंदूंना तो लेख झोंबल्याशिवाय राहणार नाहीं. अशा प्रसंगी समाजाची स्थिति, विशिष्ट काळ, इत्यादि गोष्टींचा अवश्य विचार केला पाहिजे. राजद्रोह हें एक समीकरणाचें उदाहरण आहे. यांत तीन अविज्ञात रकमा आहेत. त्यांपैकी एकाच रकमेची किंमत समजल्याने समीकरणाची किंमत समजणार नाहीं. मुद्रणस्वातंत्र्याचें संरक्षण करण्यासाठीं तुह्मी बसला आहा. तुह्मांला टिळकाचा अगर टिळकाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणाचा निकाल करावयाचा आहे, हा कांहीं मुद्याचा प्रश्न नाही. माझा लेख व माझीं मते तुह्मांला पसंत नसतील. निरनिराळ्या समाजाचीं निरनिराळीं मते असतात. आणि प्रत्येक समाजाला आपली मतें व्यक्त करण्याला संधी मिळाली पाहिजे. **मी न्याय मागण्यासाठीं उभा आहे; दया करा अशी माझी मुळींच मागणी नाहीं.** लोकांच्या हितासाठीं असा लेख लिहिणें माझे कर्तव्य

समजून मी लिहिला आहे. सरकारची मजवर मेहरनजर नाही, हे मला माहीत आहे; पण यामुळे मला न्याय मिळूं नये असे नाही. सरकारचें मत काय आहे हें न पाहतां तुम्ही आपले स्पष्ट मत दिले पाहिजे. सरकारचें धोरण निराळे आणि न्यायाचे कोर्ट निराळे. येथें न्याय तुम्हांस संभाळावयाचा आहे, सरकारचे धोरण संभाळावयाचें नाही. 'प्रयत्न' सिद्ध करण्यास प्रयत्न करणाराच्या डोळ्यापुढे कोणता उद्देश होता अगर कोणते साध्य होते, याचा प्रत्यक्ष पुरावा पाहिजे. हल्लाच्या खटल्यांत प्रयत्न दुसऱ्या कांही गोष्टीमुळे फसला असें दाखविण्यास कांहीं एक पुरावा नाहीं. प्रयत्न दोन प्रकारचे आहेत; एक पूर्ण प्रयत्न व दुसरा अपूर्ण प्रयत्न. ५११ कलमांत प्रयत्न शब्दाचा जो अर्थ आहे तो १२४ अ कलमांतील प्रयत्न शब्दाचा नाही. ५११ कलमांत खालच्या दर्जाचा प्रयत्न म्हणजे शेवटच्या थरापर्यंत न गेलेला प्रयत्न असें स्पष्टपणे सांगितले आहे. १२४ अ कलमाप्रमाणें शिक्षा होण्यास प्रयत्न पूर्ण स्वरूपाचा पाहिजे. माझ्या मार्गात कोणीतरी आडवा आला व त्यामुळे माझा प्रयत्न फसला, हे दाखवण्यास तुमच्यापुढे काडीचाही पुरावा नाही. माझा हेतुही केवळ कायद्याच्या तत्वावरून काढूं नका; तर वस्तुस्थितीवरून काढा. हेतु काय आहे हे ठरवितांना उद्देशाचाही विचार केला पाहिजे. व उद्देशाचा पूर्ण विचार केल्याशिवाय तुम्हांला हेतूही पूर्णपणे समजणार नाही. कायद्याची अमलबजावणी करणे निराळे व कायदा काय आहे, हे पाहणें निराळे. कायदा काय आहे हे पाहण्याचा तुम्हांस अधिकार नाही असें समजूं नका. आपल्याला जज्जानें केलेला कायदा ( Judge-made law ) माहीत आहे. त्याचप्रमाणे ज्यूरीने केलेला कायदाही ( Jury-made law ) माहीत आहे; मात्र हा फरक अद्याप पावेतो कायद्याच्या पुस्तकांतून दिसून येत नाही. मुद्रणस्वातंत्र्याचे रक्षण ज्यूरीने केलेल्या कायद्यानेंच झालेले आहे. जज्जाला आपल्या निकालाने ज्याप्रमाणे कायद्याला एक विशिष्ट स्वरूप देण्याचें सामर्थ्य आहे त्याप्रमाणे ज्यूरीलाही कायद्याच्या स्वरूपामध्ये योग्य आणि न्याय्य ते फेरबदल करण्याचे सामर्थ्य आहे. इंग्लंडमध्ये ज्यूरीनें मुद्रणस्वातंत्र्याचें रक्षण कसें केले याचा इतिहास मी थोडक्यांत आपणास सांगतो. हा प्रश्न प्रथमतः १७८२ मध्ये सेंट असफच्या डीन ( पाद्री ) वरील खटल्यांत उपस्थित झाला. हा खटला 'शिपकिस' या नांवानेही प्रसिद्ध आहे. हा खटला म्हणजे ज्यूरर, कायदेपंडित व मुत्सद्दी आणि जज्ज व इतर गृहस्थ यांजमधील एक विलक्षण झगडा होता. प्रजापक्षाला आणि ज्यूरींतील गृहस्थांना अधिक स्वातंत्र्य पाहिजे होते; पण कायद्याप्रमाणे हें स्वातंत्र्य त्यांना मिळेना. दुसऱ्या जेम्सच्या कारकीर्दीत जेम्सने धर्माध्यक्षांना विवक्षित प्रकारचें मत लोकांना वाचून दाखविण्याचा हुकूम केला; पण त्यांनीं नाकारल्यामुळे सात धर्माध्यक्षांवर राजद्रोहाचे खटले करण्यांत आले. पण जज्जाचा हुकूम न मानतां ज्यूरीनें त्यांस निर्दोषी ठरविले. याचा गवगवा झाला;

आणि अखेर कायद्याचेंच वर्चस्व जरी स्थापित झालें तरी पुढील खटल्यांवर त्याचा चांगला परिणाम झाला. सेंट असफच्या डीनवरील खटल्यांत पहिल्यानेंच जज्ज व ज्यूरी यांच्यामध्यें मतभेद झाला. १७९२ च्या सुमारास इंग्लंडमध्यें आणि इतर युरोपियन देशांमध्यें फार अस्वस्थता माजली होती. फ्रान्समध्यें नुकतीच राज्यक्रांति झाली होती; व त्यामुळें लोकांचीं मनें अस्थिर झालीं होती. क्रांतिकारक विचारांची सांथ युरोपांत सर्वत्र पसरली होती. ही सांथ निदान आपल्या तरी देशांत येऊं नये ह्मणून प्रत्येक देशांतील सरकाराकडून हरप्रयत्न करण्यांत आले होते. १७९२ मध्ये फ्रान्स देशांत लोकसत्ताक राज्यपद्धति स्थापली गेली; आणि त्याच साली फॉक्सचा लायबेल ॲक्ट पास करण्यांत आला. सेंट असफच्या पाद्रीवर जेव्हां आरोप ठेविला त्या वेळी इंग्लंड देशाची साधारण स्थिति याप्रमाणें होती. अगदीं तीच स्थिति हल्लीं हिंदुस्थानांत आहे. हिंदुस्थानांत हल्ली अस्वस्थता आहे; व इंग्लंडांतही त्या वेळी अशीच होती. ही अस्वस्थता नाहींशी करण्यासाठी काही लोकांवर राजद्रोहाचे खटले करावे व जमल्यास त्यांना अंदमान बेटांत अगर आस्ट्रेलियामध्ये हद्दपार करावे, असा सरकारचा विचार आहे. आज हिंदुस्थानांत ज्याप्रमाणे खटले चालले आहेत तसेंच त्या वेळी तिकडे खटल्याचा मुळसुळाट चालला होता ही दोन्ही ठिकाणची स्थिति एकसारखीच आहे; आणि ह्मणूनच त्यावरून जो धडा घ्यावयाचा आहे तो महत्त्वाचा आहे. सेंट असफच्या पाद्र्यावरील खटल्याची हकीकत अशी आहे कीं, त्याने एका शेतकऱ्याचा व सभ्य गृहस्थाचा संवाद लिहिलेले एक पत्रक, पार्लमेंटांत सुधारणा घडविण्याच्या उद्देशानें स्थापण्यांत आलेल्या एका कमिटीपुढें, वाचून दाखवून त्याची शिफारस केली. ह्या पाद्र्याची बहिण शाकुंतल नाटकाचे पहिलें भाषांतरकार व कलकत्त्याच्या हायकोर्टाचे माजी न्यायाधीश सर विल्यम जोन्स यांना दिली होती. हे जज्ज पुढें विलायतेंतल्या वरिष्ठ कोर्टाचेही न्यायाधीश होते. यांनी ते पत्रक लिहून आपल्या विलायतेंतील मेव्हण्याकडे प्रसिद्धीकरतां पाठविले होते. पार्लमेंटांत सुधारणा केली पाहिजे, त्यांत सर्व लोकांचे प्रतिनिधि योग्य तऱ्हेनें येऊं शकत नाहींत, असे दाखविण्याचा या पत्रकांतील संवादाचा हेतु होता. रिफॉर्म ॲक्ट ( पार्लमेंटच्या सुधारणेचा कायदा ) पास होण्यापूर्वी ही गोष्ट घडली. पार्लमेंटांत सुधारणा केली पाहिजे की नाहीं, हा त्या वेळेस लोकांपुढे प्रश्न होता. असे असतां ह्या पत्रकासंबंधाने राजद्रोहाचा खटला होऊन तो जज्ज व ज्यूरी यांच्यापुढें आला. जज्ज बुल्लर होते. त्यांनी पत्रक प्रसिद्ध करण्यात राजद्रोहाचा हेतु होता कीं नाही हें सांगणे माझें काम आहे; आणि हा संवाद प्रसिद्ध झाला की नाही व ह्यर्थी शब्द आहेत कीं नाहीत हे ठरविण्याचें काम ज्यूरीचे आहे असें सांगितले. पत्रक प्रसिद्ध झालें होतें, त्यांत सरकारावर कांहीं आरोप केले होते, आणि त्यावरून लेखकाचा राजद्रोह करण्याचा हेतु दिसून येतो असें न्यायाधीशास

वाटलें, व ज्यूरीनें आरोपी दोषी आहे असा निकाल द्यावा, असें सांगण्यांत आले. आरोपीतर्फेचा वकील मि. अर्स्किन याने जोरदार व मुद्देसूद भाषण करून आरोपी निर्दोषी आहे असें सिद्ध कले. शेवटीं ज्यूरीनें आरोपी फक्त पत्रक प्रसिद्ध करण्याबद्दल दोषी आहे असे सांगितले. तरी न्यायाधीशानें आरोपीला दोषी ठरवून शिक्षा दिली. या खटल्यांत हा निकाल चुकीचा झाला असें मागाहून ठरलें. चोरीसारख्या खटल्यांत ज्यूरीचें एकमत नसले तरी चालेल; कारण त्यांत व्यक्तीचें नफानुकसान असते. पण जेव्हां सरकार एका बाजूला आणि लोक दुसऱ्या बाजूला असतात तेव्हां ज्यूरीनें खटल्याची चौकशी केली पाहिजे व तिनेच वर्तमानपत्राचे व सार्वजनिक चर्चेचें स्वातंत्र्य राखलें पाहिजे. मागच्या न्यायाधीशाचा कित्ता पुढचा न्यायाधीश गिरवितो. पण पुढें त्याचा चमत्कारिक परिणाम होऊन नवा कायदा करावा लागतो. देशांतील कायदा अशा अवस्थेला केव्हां पोचतो हे न्यायाधीशांना कळत नाही, ह्मणून कोर्ट ऑफ् इक्विटी अस्तित्वांत आले; व न्यायाधीशाच्या विरुद्ध तक्रारीचा येथेही समाधानकारक निकाल लागला नाही तर ते प्रकरण पार्लमेंटांत जातें. १७९२ साली तर प्रत्यक्ष कायदा पास होऊन राजद्रोहाचा हेतु होता की नाही हे ठरविण्याचें काम न्यायाधीशाचे नसून ज्यूरीचे आहे; व हा कायदा तेव्हांपासून आतांपर्यंत इंग्लंडांत अमलांत आहे. इंग्लंडांत जो कायदा आहे तोच हिंदुस्थानांत आहे. आणि एका अर्थी म्याजिस्ट्रेटपुढे चौकशी न होतां मुंबईत हायकोर्टच्या जज्ज व ज्यूरी यांच्यापुढे हा खटला आला, हे चांगले झाले. १८९८ साली जे अनिष्ट फेरफार करण्यांत आले त्यांत राजद्रोहाच्या गुन्ह्याची चौकशी पहिला वर्ग म्याजिस्ट्रेटास करतां येऊं लागली आहे. पण त्यामुळें ज्यूरीच्या सल्ल्यास आरोपी आंचवतो. १७९२ नंतर अशा तऱ्हेचे खटले तिकडे अनेक झाले. ते सर्व सांगून मी आपला वेळ घेत नाही. कांहींची नावे सांगतों. १८१० मध्यें ' मॉर्निंग क्रॉनिकल ' पत्राचे संपादक व मालक लॅबर्ट आणि पेरी यांच्यावर खटला करण्यांत आला होता. सरकारच्या राज्यकारभारांत सुधारणा झाली पाहिजे असें या पत्रानें ह्मटले होते. आह्मीही तेच ह्मणतो. दुष्काळानें आणि दारिद्र्यानें देशांत ठाणे दिलें असतां ब्रिटिश–हिंदुस्थानची मर्यादा वाढविणें निरुपयोगी आहे. या पत्रांत लष्करी खर्चांत उधळेपणा होतो असें ह्मटलें होते. हिंदुस्थानांतही आज मित्तीला तीच स्थिति आहे. या खटल्यांत ज्यूरीनें आरोपीला निर्दोषी ठरविलें. जॉन ग्रीव्हज्; जॉन बर्नेस्; बर्न्स, हिंडमन आणि आर्स; अमेरिकेंतील झेंगर; यांच्यावरील खटले अशाच स्वरूपाचे असून त्यांत ज्यूरीनें मुद्रणस्वातंत्र्याचें रक्षण केलें आहे. हिंदुस्थानांतील मुद्रणस्वातंत्र्याचेंही रक्षण करणें तुमच्या हातांत आहे. आह्मांला लोकल सेल्फगव्हर्मेंट ( स्थानिक स्वराज्य ) किंवा लोकल होमरूल ( स्थानिक स्वराज्य )– तुह्मी त्याला कांहीं का नांव द्याना–तें आह्मांस पाहिजे, असें आमचें ह्मणणें आहे.

पण यावर सरकार काय ह्मणतें ? सरकार ह्मणते की, हे लोक असंतुष्ट झाले आहेत, आणि यांना राज्यकारभारांत वांटा पाहिजे आहे. हे लोक सरकाराशीं बेअदबीनें वागत आहेत. असें ह्मणणें आमच्या अभिमानाला आणि वजनाला कमीपणा आणणारें नाहीं काय ? या गोष्टीचा विचार जर अशा रीतीनें करावयाचा असेल, आणि राजद्रोहाचे कायद्याचा जर इतक्या कडक रीतीनें उपयोग करावयाचा असेल तर प्रत्येक खटल्यांत आरोपी दोषी आहे असे दिसून येईल. यापेक्षां आमची चौकशी न केलेली बरी. चौकशीशिवाय एकाद्या इसमाला अंदमानला धाडणें सरकारच्या हातचें आहे. सरकारच्या राज्यपद्धतीविषयीं कुरकुर करणे, आणि राज्यकारभारांत वांटा मागणे, ह्मणजे राजद्रोह करणें नव्हे. ह्मणून मी ह्मणतों कीं, इंग्लंडांत जर असा कायदा आहे तर हिंदुस्थानांतही तो तसाच आहे; व इंग्लंडांतील ज्यूरी ज्या धोरणानें असल्या खटल्यांचा निकाल करते तशाच धोरणाने तुह्मीही येथे निकाल द्या. आक्षेपित लेखांपैकीं ता. १२ मे १९०८ च्या लेखांत माझा उद्देश व हेतु असा स्पष्टपणे मी सांगितला आहे:—"हें अनिष्ट प्रकार घडूं नयेत, अशी जर राज्यकर्त्यांची इच्छा असेल तर स्वतःच्या राज्यपद्धतीसच त्यांनी पहिल्यानें आळा घालावा, अशी त्यांस आमची सूचना आहे; व तेवढ्याच हेतूनें आजचा लेख लिहिला आहे." मुझफरपूर येथे बॉबचा शोचनीय प्रकार घडल्यानंतर ॲंग्लोइंडियन, हिंदु, व मुसलमान, या सर्वांनीच त्या विषयाची चर्चा सुरू केली. हा प्रकार शोचनीय होता, याबद्दल कोणाचाही मतभेद नव्हता. या प्रकाराची पुनरावृत्ति होण्याचें कशानें थांबेल, या प्रश्नाचा सरकाराला निकाल करावयाचा होता. या शोचनीय प्रकाराचें कारण काय होते, हा प्रश्न वादविवादाकरितां घेणें पूर्णपणें कायदेशीय होते. कित्येक ॲंग्लोइंडियनपत्रे यासंबंधानें हवे तसे लिहून हिंदी लोकांचा उपमर्द करीत होतीं, त्यांना उत्तर देण्याच्या हेतूनेंही मला हे लेख लिहावे लागले आहेत, असें त्या लेखांतील कित्येक वाक्यांवरून स्पष्टपणे दिसून येईल. मला जर उपदेश किंवा सल्ला द्यावयाचा होता तर मी अधिकाऱ्यांकडे जाऊन तसें करावयाचें होते, असेंही तुह्मांला कदाचित् वाटेल. पण हे पत्रकर्त्यांचे कर्तव्य नव्हे. अधिकाऱ्यांची गांठ घेण्यासाठी मला कांहीं पगार मिळत नाहीं. अधिकाऱ्यांची गांठ घेण्याचा प्रयत्न केल्यास ते माझ्याशीं कशा रीतीनें वागतील हेंही मला माहित नाहीं. सार्वजनिक प्रश्नांवरील माझीं मते मी स्पष्टपणे वर्तमानपत्रांतून मांडतों; व हीं मते माझ्या समाजांतील मतांचीं निदर्शक असतात. अनियंत्रित अधिकारीवर्ग आणि लोक यांच्या दरम्यान वर्तमानपत्रें असतात; व वर्तमानपत्रें सरकारापुढें खरें खरे लोकमत मांडतात. लोकांचें मत काय आहे, हें जाणण्यासाठीं सरकारानें आपले अधिकारी ठेविले असतील. पण सरकारी अधिकाऱ्यांच्या द्वारें जें लोकमत येतें, तें वस्तुस्थितीचा विपर्यास करणारें असतें. स्वतंत्रपणं

दिलेल्या मतालाच कांहीं तरी किमत देतां येईल. प्रचलित विषयाची व सार्वजनिक प्रश्नांची चर्चा करण्यासाठीं आणि देशांत लोकमत बनविण्यासाठीं आह्मी वर्तमानपत्रे काढलेलीं आहेत. आह्मी जे कांहीं ह्मणतों ते लोकांना आवडो अगर न आवडो किंवा सरकाराला तें रुचो अगर न रुचो, आमचीं मतें आह्मांला ताबडतोब ठरवावीं लागतात. दुसऱ्या पक्षांचीं पत्रें त्यांना वाटतात ते विचार लिहितात. या विचारांपैकीं किंवा मतांपैकीं कोणतें मत बरोबर आहे, हें ओळखून काढण्यास लोक शिकतात. अशा प्रकारें वर्तमानपत्रकारांचे कर्तव्य बजावीत असतांना मी हे लेख लिहिले आहेत; सरकारच्या विरुद्ध अप्रीति उत्पन्न करण्याच्या हेतूनें लिहिलेले नाहीत. बांबगोळा उडाला असतांना त्यासंबंधाने चर्चा करावयाची नाहीं तर काय करावयाचें ? अशा प्रसंगीं आह्मां पत्रकर्त्यांचा मार्ग धोक्याचा असतो, हे खरें. पण ज्याला या प्रसंगीं कर्तव्य करावयाचें नसेल त्यानें तो धंदाच सोडून द्यावा हे चांगलें ! वादाच्या मंथनातून सत्य बाहेर पडते. बांबगोळ्यानें निर्माण केलेल्या परिस्थितीबद्दलचा वाद आह्मां पत्रकर्त्यांनीं केलाच पाहिजे. ही परिस्थिति काय होती, कोणी कोणता वाद उपस्थित केला, त्यावर कोणी कसे उत्तर दिलें, या सर्व गोष्टींचा विचार तुह्मी केला पाहिजे. देशांत एकादी गोष्ट घडली ह्मणजे निरनिराळे पक्ष होऊन वाद माजतोच; तरी ह्या वादाचे स्वरूप लक्षांत घेतल्याशिवाय लेखाचा उद्देश व हेतु ध्यानांत येणार नाहीं. समाजांत जेव्हां एकाद्या विषयावर चर्चा सुरू होते, तेव्हां ॲंग्लोइंडियन, मुसलमान, हिंदु, पार्शी, ह्यांपैकीं प्रत्येकजण आपआपल्यापरीने ह्या विषयाची चर्चा करीत असतो. इंग्लंडांत आणि त्याचप्रमाणे सुधारलेल्या देशांतही पक्ष हे असतातच. हिंदुस्थान देशांत निरनिराळ्या जाती आहेत; इकडे कांही ठराविक तत्वांवरून निरनिराळे पक्ष बनून एकाद्या विषयावर मत व्यक्त करण्यांत येतें असें नाहीं; तर निरनिराळ्या जातींमुळें जे पक्ष होतात, त्या पक्षाचें मत व्यक्त करण्यांत येतें. बांबगोळ्याचा शोचनीय प्रकार घडल्यानंतर निरनिराळीं दोन प्रकारचीं मतें आमच्यापुढें मांडण्यांत आलीं होतीं. एक मत असे होतें कीं, हे बांबगोळे कॉंग्रेसनें खालपर्यंत किंवा वरपर्यंत जी राजकीय चळवळ केली, त्यामुळे उत्पन्न झाले आहेत. कॉंग्रेसची चळवळ, कॉंग्रेसच्या खालच्या दर्जाची चळवळ व कॉंग्रेसच्या वरच्या दर्जाची चळवळ, या सर्व चळवळींमुळे बॉबगोळा उत्पन्न झाला ! त्यांचें असे ह्मणणे होतें कीं, कॉंग्रेसमधील पुढारी फक्त तें आपले मत व्यक्त करीत असत. कॉंग्रेस ही कांही कायदे करणाऱ्या मंडळीसारखी मंडळी नाही. उलटपक्षीं या सर्वांचे खापर राष्ट्रीय पक्षाच्या माथ्यावरच फोडलें पाहिजे. या राष्ट्रीय पक्षांतील लोकांच्या चळवळीमुळेंच बॉंबचा जन्म झाला, असें या पत्रकारांनीं सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता. या पत्रकारांनीं असे ह्मटलें आहे कीं, जर बॉंबचें हें कारण असेल, तर कॉंग्रेस आणि अशा प्रकारच्या ज्या दुसऱ्या संस्था आहेत, त्या

एकदम बंद करून टाका. पायोनियर, इंग्लिशमन, टाइम्स ऑफ् इंडिया आणि लंडन टाइम्सचें सुद्धां असेंच मत होतें. दुसऱ्या पत्रांचीं नांवें देण्याची मला जरूर वाटत नाहीं. यावरून काय होतें? तर सरकाराने अधिक कडकपणाने सर्व चळवळींचा नायनाट करावयास पाहिजे, असे त्यांचें ह्मणणे होतें. नेमस्त, जहाल, कायदेकौन्सिलांत ठाकठिकीने बोलणारे, या सर्वांना या पत्रकारांनीं जबाबदार धरले आहे. कायदेकौन्सिलांत बेताने बोलणारे हा सांखळीचा पहिला दुवा, कॉंग्रेसमध्ये नेमस्त बोलणारे हा दुसरा दुवा, यानंतर जहालपक्ष व गावगुंड वक्ते व यानंतर बॉंबपक्ष, अशी सांखळी किंवा परंपरा या पत्रकारांनीं दाखविली आहे. अशा स्थितीत माझे कोणतें कर्तव्य होतें? खरोखरी पाहिले तर कॉंग्रेसची चळवळ ही कशाकरितां आहे? अधिकारी-वर्गात (ब्यूरॉक्रसींत) सुधारणा व्हावी म्हणूनच आहे. पायोनियरने ज्या दृष्टीने विचार केला त्याच दृष्टीनें मीही विचार केला. मीही असें म्हटले आहे की, सांखळीच्या फक्त कांहीं दुव्यांचा अगर शिडीच्या कांहीं पायऱ्यांचाच तुह्मी विचार करीत आहां. पण या दुव्यांशिवाय अगर पायऱ्यांशिवाय अधिकारीवर्ग हा जो एक दुवा आहे तो मी उघडकीस आणला आहे. जुन्या गोष्टींतल्याप्रमाणें वाटोळ्या टेबलाभोंवती बसलेल्या दहा माणसांपैकीं प्रत्येकाने मोजतांना आपणास सोडून जशीं नऊ माणसे मोजावयाचीं, तद्वत् बॉंब-गोळ्यांबद्दल जबाबदार कोण, याची चर्चा करतांना अधिकारी-वर्ग स्वतःस मोजण्याचें विसरून जाऊन इतरांची तेवढी मोजदाद करीत आहे. एका पक्षाचे म्हणणे असें आहे. दुसऱ्या पक्षाचें म्हणणे काय आहे? तें असे आहे. तुमच्या विचारांची सांखळी आह्मांला कबूल आहे; पण आम्ही याहीपेक्षां जरा पुढें जातों. आमचें असें म्हणणें आहे की, अधिकारी-वर्गांतील कांहीं दोषांमुळेच राष्ट्रीय सभा (कांग्रेस) जन्मास आली आहे. जर तुह्मांला बॉंबगोळे बंद करावयाचे असतील, तर कांग्रेसची चळवळ नाहींशी करून चालणार नाहीं. पहिल्या प्रथम तुह्मी अधिकारीवर्ग कह्यांत ठेविला पाहिजे अगर त्यांत सुधारणा तरी केली पाहिजे. तुमच्यापैकीं कित्येकांना हे विचार पसंत पडणार नाहीत, हें मला माहीत आहे. पण त्याला इलाज नाहीं. सरकार यांपैकीं कोणतें तरी मत मान्य करील, अगर कोणत्या तरी मताला आपली अनुकूलता दाखवील. पण न्यायाधीशाला या गोष्टीचा निकाल अगदीं निराळ्या रीतीनें करावयाचा असतो. हिंदुस्थानांतील ॲंग्लो-इंडियन लोकांना मग ते अधिकारी असोत वा नसोत विशिष्ट प्रकारचें स्वातंत्र्य उपभोगावयास सांपडत आहे, हें आम्हांस दिसून येतें. आह्मांलाही तेंच स्वातंत्र्य उपभोगण्याचा हक्क आहे. बॉंबचीं कारणे काय आहेत व ते बंद करण्यास काय उपाय योजिले पाहिजेत यासंबंधीं मीं माझे मत वर्तमानपत्रांतून दिलें आहे. हा वाद अजून सुरू आहे. "देशाचे दुर्दैव" या

समुच्चय वापरणे पूर्ण कायदेशीर आहे; आणि राजकीय विषयांवर लिहितांना प्रत्येक हिंदी लेखकानें हा वापरलेला आहे. हे शब्द वापरल्याने गुन्हा होतो असें यापूर्वी कधींही मानलेलें नाहीं. हायकोर्टाच्या भाषांतरकाराच्या अंगी राजकीय भाषेंतील शब्दांचें बरोबर भाषांतर करण्याची लायकी नाही, हा त्यांचा दोष नव्हे. मराठी भाषा ही वाढती भाषा आहे. पन्नास वर्षांपूर्वी या राजकीय कल्पना आमच्या समाजांत नव्हत्या, त्या इंग्रजी शिक्षणाने उत्पन्न झाल्या आहेत; व आजच्या स्थितींत त्या इंग्रजी शब्दाने प्रथम मनांत येतात, व नंतर मराठींत नवीन शब्द बनवून आह्मांस त्या व्यक्त कराव्या लागतात. अशा स्थितींत शब्दांतील भेद हायकोर्टाच्या भाषांतरकारालाही समजलेले नाहीत. बरें, भाषांतरांत जर इतक्या चुका आहेत तर त्यांतील प्रत्येक चूक शोधून काढणे माझे कर्तव्य आहे असे तुह्मी ह्मणाल काय? खात्रीने नाही. हायकोर्टांतील भाषांतरकाराची भाषांतरें फुकट शुद्ध करण्यासाठी मला या ठिकाणी बोलावलेले नाही! वाढत्या मराठी भाषेचे भाषांतर पन्नास वर्षांपूर्वीच्या कोशाच्या साहाय्याने करून चालणार नाही. कायद्याचा असा नियम आहे की, जर एकादा आरोप ठेवतांना एकादी महत्वाची चूक झाली तर दोषमुक्त करा ह्मणून ह्मणण्याचा अगर फिरून चौकशी करा, असे ह्मणण्याचा आरोपीला हक्क आहे. भाषांतर चुकलेलें आहे, असे दाखविल्यानंतर मला दोषमुक्त का करण्यांत येत नाहीं? "दडपशाहीचें हे भूत पाच दहा वर्षांनीं हिंदुस्थान सरकारच्या अंगांत संचार करीत असतें," यांतील 'दडपशाहीचें भूत' याचें भाषांतर 'धि फीन्ड ऑफ ऑप्रेशन' असे केले आहे. यावरून असे वाटण्याचा संभव आहे की, आह्मी हिंदुस्थान-सरकारला भूत किंवा राक्षस ह्मणतो. याचे भाषांतर 'डीमन ऑफ ऑप्रेशन' असे केलें नाहीं हे माझ्यावर मोठे उपकारच आहेत! "इव्हल जिनिअस हॅज टेकन पझेशन ऑफ यू" ही ह्मण नेहमीच्या प्रचारांतली आहे व ती या ठिकाणी चांगली लागू पडते. उलटपक्षीं 'माथेफिरू,' 'आततायी,' असल्या निंदाव्यंजक व महत्पापदर्शक शब्दांनी मी बॉंब फेंकणाऱ्यांचा निषेध केला आहे. पण भाषांतरांत हे सर्व शब्द सौम्य होऊन गेले आहेत. तात्पर्य, हे भाषांतर ह्मणजे एक निराळाच लेख आहे. हा लेख मी लिहिलेला नसून हायकोर्टाच्या भाषांतर करणारानें लिहिलेला आहे; व या भलत्याच लेखाबद्दल मी तुरुंगांत कां जावे हे मला समजत नाहीं. मजवर ठेवलेला आरोप सिद्ध करण्याचा मुख्य मार्ग ह्मटला ह्मणजे केसरीच्या वाचकांपैकीं कित्येकांना साक्षीला बोलावून या लेखांचा परिणाम त्यांच्या मनांवर काय झाला, हें विचारणें हा होता. पण त्याचा मुळींच अवलंब केला नाहीं. मी माझ्या पत्रांतून ॲंग्लोइंडियन पत्रांच्या टीकेस उत्तर दिलें आहे. हल्लींच्या वादांत ॲंग्लोइंडियन समाज व हिंदी समाज असें ह्मणण्या ऐवजी अधिकारी वर्गाची तरफदारी करणारा पक्ष (प्रोब्यूरोक्रॅटिक)

व अधिकारी वर्गाशीं विरोध करणारा पक्ष ( ॲन्टी ब्यूरोक्रॅटिक ) असें ह्मणणे आधिक सयुक्तिक होईल. अधिकारी-वर्गाशीं विरोध करणारा पक्ष असें ह्मणणे जर तुह्मांस आवडत नसेल तर आपण त्याला कॉंग्रेसला अनुकूल असणारा पक्ष असे ह्मणूं. या दोन्ही पक्षांचे हितसंबंध जातीवर अवलंबून नाहींत, हें दाखविण्यासाठींच हे शब्द मीं मुद्दाम वापरले आहेत. ॲंग्लोइंडियन समाजांतीलही कांहीं लोक कॉंग्रेस-पक्षाचे होते, व कांहीं अधिकारी-वर्गाची तरफदारी करणाऱ्या पक्षाचे होते. इंग्लंडांत कॉन्सरव्हेटिव व लिबरल या दोन पक्षांमध्यें लढा माजलेला असतो; त्याचप्रमाणें इकडेही दोन परस्पर विरोधी हितसंबंधांमध्ये लढा [illegible]

[illegible]

पत्रकारांच्या पक्षाचे आहेत असें दिसून येईल. उलटपक्षीं, कित्येक अँग्लोइंडियन लोकही एतद्देशीय पत्रकारांच्या पक्षाचे आहेत. प्रत्येक पक्षाला आपली मते आपल्या समजुतीप्रमाणें व्यक्त करण्याचा हक्क आहे; व एवढ्याचकरतां मी वर्तमानपत्रें पुराव्यांत दाखल केलीं आहेत. कोणाचे म्हणणें बरोबर आहे व कोणाचें चुकीचें आहे, हा कांहीं प्रश्न नाही. दोन्ही पक्षांना आपापलीं मते पुढे मांडण्याचा हक्क आहे, तर दोन्ही पक्षांच्या म्हणण्याचा विचार कायद्याच्या व न्यायाच्या दृष्टीनें सारख्याच रीतीनें व्हावयास पाहिजे. इंग्लंडमध्ये दोन पक्षांत जर अशा प्रकारचा वाद चालला असता, तर एका पक्षाने दुसऱ्या पक्षाला अधिकारारूढ असण्याचा हक्क नाहीं, असें म्हटले असते. सांप्रत लिबरल पक्ष अधिकारारूढ आहे; पण त्याने अधिकारारूढ असतां कामा नये, असे कॉन्सरव्हेटिव पक्ष म्हणत आहे. खुद्द लॉर्डांच्या सभेच्या अस्तित्वाबद्दल हल्ली एक वाद उपस्थित झाला आहे. हा वाद राजद्रोहाचा आहे, असें तुह्मांस ह्मणतां येइल काय ? असे असेल तर नुकतेच परलोकवासी झालेले मुख्य प्रधान यांसही लॉर्डांच्या सभेच्या विरुद्ध भाषण केल्याबद्दल तुरुंगांत पाठवावयास पाहिजे होते ! पण आपली मते प्रदर्शित करण्याचा हक्क असल्यामुळें याबद्दल त्यांना एकानेंही प्रश्न विचारला नाहीं. आतां मी दाखल केलेल्या वर्तमानपत्रांचे तीन किंवा चार वर्ग करितां येतील. पायोनियर, इंग्लिशमन, स्टेट्समन, सिव्हिलमिलिटरी ग्याझेट, टाइम्स ऑफ् इंडिया, एम्पायर, या इंग्रजी पत्रांनीं प्रसिद्ध केलेले विचार एका वर्गांत घालतां येतील. यानंतर बंगाली, हिंदू, मद्रास–स्टॅंडर्ड, पत्रिका, पंजाबी, वगैरे पत्रांनीं या इंग्रजी पत्रांच्या टीकात्मक लेखांना दिलेलीं प्रत्युत्तरें दुसऱ्या वर्गांत घालतां येतील. याप्रमाणें पहिल्यानें इंग्रजी वर्तमानपत्रांची मतें आपणास पाहावयास सांपडतात; नंतर विलायतचीं पत्रें व तिकडील लोकमत आपल्या हातीं येतें. मी जे लेख लिहिले आहेत

ते निष्कारण लिहिलेले नाहीत; व मला उत्तरादाखल जें काय लिहावयाचें होतें ते मीं शांतपणानें व सौम्य भाषेनें लिहिलें आहे. आघात व प्रत्याघात अशांतला हा प्रकार आहे. आघाताच्या मानानें माझी भाषा सौम्यच आहे. आघात किती भयंकर भाषेंत केलेला आहे, हें पायोनियर, एशियन, व इंग्लिशमन या पत्रांवरून कळून येईल. माझ्या मतांप्रमाणें दुसऱ्या कोणाचीं मतें नाहींत असें नाहीं. मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांमध्यें किती पक्ष आहेत, असा एक प्रश्न मी जोशी यांना विचारला होता. त्याचा उद्देश एवढाच होता कीं, निरनिराळ्या सर्व पक्षांतील वर्तमानपत्रांच्या लेखकांचीं व मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व लोकांचीं मतें माझ्या सारखीच होती, हें ज्यूरीला कळावें. आता दाखल केलेल्या पत्रांकडे पाहा. ता. ७ मे १९०८ च्या पायोनियरच्या अंकांत 'धि कल्ट् ऑफ् धि बॉंब ( बॉंबसांप्रदाय ) या मथळ्याखालीं लेख आला आहे. हा मथळा व माझ्या लेखाचा 'बॉंबचें रहस्य' हा मथळा ताडून पाहण्यासारखा आहे. पायोनियरच्या या लेखांत कायदेकौन्सिलांतील नामदार हिंदी गृहस्थांपासून तों थेट बॉंब टाकणारापर्यंत सर्व लोक एकाच माळेचे मणी आहेत, आणि एका इंग्रजाच्या केसास दुखापत झाल्यास दहा नेटिवांना गोळी घालून ठार करावें, अशा तऱ्हेचा आसुरी उपदेश पायोनियरने राज्यकर्त्यांस केलेला होता. निरपराधी माणसांची सुद्धां कोणत्याही प्रकारचा भेदाभेद न करतां सरहा कत्तल करण्यास या लेखांत सुचविलें आहे. " दोहोंपैकीं एक कमी वाईट गोष्ट या न्यायानें इंग्रजी सत्ता लोकमताच्या आड येत नसेल तोपर्यंत कांहीं दिवस आपण निरुपाय ह्मणून मान्य केली पाहिजे, असें कॉंग्रेसमधील नेमस्तांचें ह्मणणे आहे " असें या लेखांत ह्मटलें आहे. कॉंग्रेसच्या हेतूविषयीं अशा दृष्टीनें विचार करणें ह्मणजे तिच्या हेतूचा विपर्यास करणें आहे. " राष्ट्रीय पक्षांतील निरनिराळया वर्गांचे पुढारी राजकीय चळवळीचा उपाय या नात्यानें बॉंबला प्रत्यक्ष प्रोत्साहन देत आहेत, असें ध्वनित करण्याचा आमचा इरादा आहे, असे कोणीं समजणार नाहीं, " या वाक्यांत आमच्यावर अप्रक्षत्यपणें असा आरोप करण्यांत आला आहे की, आमच्या पैकी प्रत्येकाला बॉंब फेंकण्यांत येणार आहेत, हें माहीत होतें. 'एशिया' पत्रानें असें ह्मटलें आहे की, " किंग्सफर्ड साहेब गोळ्यांनीं भरलेली एक भली थोरली पिशवी पैदा करून आपल्या जवळ बाळगतील अशी आह्मांस आशा आहे. कोणाही नेटिवावर त्याला न दिसतां व आपल्या खिशाबाहेर पिस्तुल न काढतां आंतूनच त्याच्यावर गोळी घालण्याचा अभ्यास मि. किंग्सफर्ड यांनीं करावा. त्यांना ही उत्तम संधि मिळाली आहे, व या संधीला जरूर असलेल्या गोष्टींचें त्यांनी आकलन करावें, अशी आमची इच्छा आहे." इंग्लिशमन पत्रांत असें म्हटलें आहे कीं, " माझी अशी सूचना आहे की,

असें ह्मटले आहे की, रशियन अधिकाऱ्यांविरुद्ध लिहितांना पायोनियरनें एक प्रकारचें मत प्रतिपादिले आहे; व हिंदुस्थानांतील अधिकारीवर्गासंबंधीं लिहितांना निराळेंच मत प्रतिपादिले आहे. मद्रासच्या लोकप्रिय 'इंडियन पेट्रिअट' या दैनिक पत्रानें १४।५।०८ च्या अंकांत असें ह्मटलें आहे कीं, "दडपशाहीमुळें लोकांच्या मनोवृत्ती शांत न होता वैरभाव व द्वेष अधिकच वाढेल." याच पत्रानें ता. १५।५।०८ च्या अंकांत असें लिहिले आहे की, "लोकांना भाषणस्वातंत्र्य आणि मुद्रणस्वातंत्र्य असल्याखेरीज परकी अधिकारीवर्गाची सत्ता राहणें अशक्य आहे. हल्लींच्या राज्यपद्धतीत एकमुखी अधिकाऱ्यांवर कोणाचाही दाब नसल्यामुळें या राज्यपद्धतीने लोकांना गुलाम केले आहे." ९।५।०८ च्या 'पंजाबी'त असें ह्मटलें आहे की, "हल्लीं हिंदुस्थानांत फक्त अराजक व सरकारचे स्तुतिपाठ गाणारे अथवा खुशामत करणारे लोक आहेत, सरकारला उपदेश करणारे कोणीही नाहीत;" व याबद्दल त्याने दुःख प्रदर्शित केलें आहे. ५।५।०८ च्या अंकांत इंदुप्रकाशांत —हे पत्र केसरीच्या पक्षाचें नाहीं असे जोशी यांनी आपल्या साक्षीत सांगितलें आहे अधिकारीवर्ग सुधारला पाहिजे असें ह्मटले आहे. १९।५।०८ च्या ज्ञानप्रकाशांत असें लिहिलें आहे कीं, "प्रतिनिधित्वाचे थोडेसे हक्क दिल्याने हे अनर्थ टळणार नाहींत." या प्रमाणेंच चिकित्सक, सुधारक, सुबोधपत्रिका, गुजराती, वगैरे इकडील आणखी कांहीं पत्रांचे व विलायतेंतील इंडिया, कॉंटेम्परेरी रिव्ह्यू, वगैरे पत्रांचे जे उतारे मीं दिले आहेत त्यांतील विचार माझ्याच ह्मणण्यास पुष्टी देणारे आहेत, असें आपणांस दिसून येईल. मी जे सत्तर उतारे दाखल केले आहेत त्यांवरून लेख लिहिण्याच्या वेळची परिस्थिति काय होती हें आपणास कळून येईल. मी जे लेखांत मुद्दे दाखविले आहेत ते कांहीं नवीन शोधून काढले नाहींत; मी ते फक्त निराळ्या स्वरूपानें मांडले आहेत. मुद्यांबद्दल सर्व पक्ष जबाबदार आहेत. मी जीं जी मतें लिहितों तीं मराठी वाचकवर्गाच्या अगदीं परिचयाचीं आहेत. मग ह्या लेखांचा त्यांच्या मनावर काय परिणाम होणार? त्यांचीं मनें माझ्या लेखानें कशीं चेतणार? ते एवढेंच ह्मणतील कीं, बरें झाले, खासें उत्तर दिलें! गेल्या अठ्ठावीस वर्षांत मी जे लिहिलें आहे त्या व्यतिरिक्त या लेखांत दुसरें कांहीं नाहीं. मी जीं मतें लिहिलीं आहेत तीं आमच्या पक्षांतील पुढाऱ्यांनीं मागेंच व्यक्त केलीं आहेत. ॲंग्लोइंडियनांचा व कॉंग्रेसचा असे देशांत दोनच पक्ष आहेत. प्रत्येकाचीं पत्रें निराळीं, पुस्तकें निराळीं, वाङ्मय निराळें. प्रत्येकाला आपलीं मतें प्रामाणिकपणें सत्य वाटतात. देशी पक्षास हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंत आपला शिरकाव व्हावा असें स्वाभाविकपणेंच वाटतें; आणि अशा प्रकारें आपणास हळू हळू Self-Government ह्मणजे स्वराज्य प्राप्त होईल अशी या पत्राची खात्री आहे. दुसऱ्या ह्मणजे अधिकारी पक्षाचें ह्मणणें असें पडतें कीं, अधिकारीवर्गानें हिंदु-

स्थानाकडे पाठ फिरविली ह्मणजे हा देश सफाई बुडून जाईल! आज हा वाद १० वर्षे चालू आहे. हिंदीपक्षाच्या बाजूस कांहीं थोडे इंग्रज लोक आहेत तर अधिकारीपक्षाच्या बाजूसही कांहीं हिंदी लोक आहेत. तेव्हां हा जातीजातीचा प्रश्न खास नव्हे. हाच वाद व याच कल्पना माझ्या लेखांत आहेत. दर आठवड्यास नवीन कल्पना उत्पन्न करणे हें कोणासही शक्य नाही. कल्पना निराळ्या शब्दांनीं लोकांपुढे मांडल्या आहेत एवढेंच. केसरीचे कित्येक दहा दहा बारा बारा वर्षांचे वर्गणीदार आहेत, व कोणचीही नवीन गोष्ट घडली तर त्यासंबंधानें केसरींत कोणतें मत येईल हें ते अगाऊच सांगू शकतात. तेव्हां हे लेख वाचून ते फार तर ह्मणतील कीं, 'जुन्याच कल्पना चांगल्या भाषेत नीट मांडल्या आहेत." हिंदुस्थानांतले दोन पक्ष आजकालचे नाहीत; सुमारें १८५० सालपासूनचे आहेत, हें मि. इव्हॅन्सबेल यांच्या पुढील ह्मणण्यावरून दिसून येईल. १८५० सली हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेविषयीं लिहितांना ते ह्मणतात:—"आह्मी हिंदुस्थानचे ट्रस्टी नसून जेते आहोत. आह्मी हिंदुस्थानच्या लोकांचें हित सांभाळण्याकरितां येथें त्यांचे व्यवस्थापक किंवा ट्रस्टी ह्मणून आलो आहोंत, असें ह्मणणें मूर्खपणाचें आहे. आह्मी आमच्या हिताकरितां आलों आहोंत; परंतु बरेच कालपर्यंत हिंदुस्थान आह्मांला ताब्यांत ठेवावयाचे असेल तर लोकांस जास्त जास्त हक्क देऊन खूप ठेविल्याशिवाय गत्यंतर नाही. भविष्यत्काली हिंदी लोकांची नीट तरतूद लागावी, या दृष्टीने हिंदुस्थानचें राज्य चालविण्यांत येत नाहीं. तें आपण आपल्या स्वार्थाकरितां चालवीत आहो, ही गोष्ट छपवून ठेवण्यांत अर्थ नाहीं. केवळ आपल्याच स्वार्थावर दृष्टी ठेऊन राज्य हांकणें चुकीचे आहे; इतकेंच नव्हे तर तें मूर्खपणाचे आहे." लोक हे शांतताप्रिय आहेत; पण राजकीय हक्कांसाठी धडपडणाऱ्या कित्येक उपद्यापी चळवळ्यांनीं लोकांत असंतोष माजविला आहे.व जर या चळवळ्या लोकांना चिरडून टाकले तर लोकांत शांतता नांदेल असें जे ह्मणणें आहे त्याला ता. १२ मेच्या माझ्या लेखांत "हिंदुस्थान देश आज पुष्कळ वर्षे परकी राज्याच्या अमलाखाली असल्यामुळें हिंदी लोकांच्या अंगचें तेज, आवेश किंवा त्वेष पुष्कळ कमी झालेला आहे खरा; पण कांही झालें तरी या त्वेषाचें अगर संतापाचें मान शून्य डिग्रीवर येऊन तो अजीबात गोठून जाणें शक्य नाही," या वाक्याच्या उत्तरार्धानें उत्तर दिले आहे. आमचें असें ह्मणणे आहे कीं, असंतुष्ट होणें हा मनुष्य-स्वभावच आहे. शांतताप्रियतेला आणि सन्मान्य-बुद्धीलाही कांही मर्यादा आहे. कांहीं एक अंशापर्यंत मनुष्य-स्वभाव शांतताप्रिय असतो. माझें असें ह्मणणें आहे की, तुह्मी माझ्या पक्षाला शिव्या द्या अगर कल्पनेची टवाळी करा; पण लोकांत अभिमानबुद्धि किंवा तेज मळींच नाही या म्हणण्याचें समर्थन तुह्मांला करतां येणार नाहीं. मी ज्याप्रमाणें उद्गार काढिले आहेत त्याप्रमाणेंच

मोठमोठ्या लोकांनींही काढिले आहेत. मि. थॉर्बर्न यांनींसुद्धां राज्यकारभारांत हिंदी लोकांचें जितकें हित संभाळावयास पाहिजे तितकें संभाळलें जात नाहीं, असें ह्मटलें आहे. अधिकारी-वर्गाची सत्ता कमी करून ती लोकांच्या हातीं आली पाहिजे. इंग्रजांनीं स्वार्थानें राज्यकारभार चालविला तरी चालेल; पण आम्हांला ह्मणजे लोकांना जास्त जास्त सत्ता व हक्क मिळाले पाहिजेत, असे माझें ह्मणणें आहे. फिर्यादीतर्फेच्या बॅरिस्टरांनीं असे सांगितले की, मला सत्ता पाहिजे; मीही असेच सांगतों की, मला ह्मणजे लोकपक्षाला सत्ता पाहिजे. मी लेखांतच असें ह्मटलें आहे असें नाहीं तर खुद्द बादशाहानें नेमलेल्या अधिकारविभागणी कमीशनपुढेंही मी असेंच सांगितले आहें. मी आपले ह्मणणे गुप्तपणानें मराठींतच प्रसिद्ध केले आहें असें नाहीं, तर हल्लींचा असंतोष नाहींसा करण्यास उपाय शोधण्यासाठी इंग्लंडांतून मुद्दाम आणलेल्या रॉयल कमिशनपुढेही मी असेंच सांगितलें आहे. गेल्या पन्नास वर्षांत लोकपक्षाच्या पुढाऱ्यांची हीच तक्रार आहे. बॉंबचे अत्याचार कशामुळें झाले याची कारणे मी या लेखांत स्पष्टपणे सांगितलीं आहेत. एका पक्षाचे म्हणणें असे आहे की, अत्याचार हिंदी वर्तमानपत्रांतील लेखांमुळें, कॉंग्रेसमधील जहालांमुळे व सर्व प्रकारच्या चळवळ्या व उपद्व्यापी गृहस्थांमुळें झाले. मी असें म्हणतो की, हे अत्याचार राज्यकारभारांतील दोषांमुळें झाले; व जर राज्यपद्धतींत सुधारणा होईल तर ही चळवळ बंद पडेल. खरोखरीच राज्यपद्धतींत दोष आहेत म्हणूनच राष्ट्रीय सभेची व राजकीय पुढाऱ्यांची ही सर्व चळवळ सुरू आह. लोकांच्या हातीं जास्त राजकीय सत्ता पाहिजे ही महत्वाकांक्षा जर राजद्रोही असेल व अशी महत्वाकांक्षा मनांत बाळगणे जर गुन्हा असेल तर मी ज्या अनेक पुस्तकांतून माझ्या विचारसरणी सारखेच उतारे वाचून दाखवीत आहे तीं सर्व पुस्तके सरकाराने जप्त करून फाडून तोडून टाकली पाहिजेत अगर जाळली पाहिजेत. ना. गोखले यांनी १९०८ च्या मार्चमध्ये बजेटावर भाषण करतांना खुद्द कायदेकौन्सिलांत देशस्थितीचा याप्रमाणेच विचार केला:—" बंगाल्यांतील कांहीं थोड्या लोकांनी नवीन मत प्रतिपादण्यास सुरवात केली आहे व त्यांच्या मताचा तुरळक प्रतिध्वनि देशांत कोठे कोठे ऐकूं येत आहे. या उपदेशकांचें लोकांवर जे इतके वजन पडले आहे, त्याची कारणें अशीं आहेत. राज्यपद्धतींतील सुधारणेविषयीं सर्वत्र निराशा झाली आहे, व आपली गाऱ्हाणीं दूर होणें फार दुरापास्त आहे हें समजल्याने आपल्या दैन्याची लोकांत जाणीव उत्पन्न झाली आहे, व त्यामुळेच नवीन मताला पाठिंबा मिळत आहे. ह्मणून ही स्थिति सुधारण्याचा खरा उपाय दडपशाही नसून सरकारनें शहाणपणानें व धिमेपणानें लोकांना गोडीगुलाबीनें वागविलें पाहिजे हाच होय." १९०६ साली डॉ. रासबिहारी घोस यांनीं असा इषारा दिला आहे कीं, " आजपर्यंत जगांत जितके लोक झाले त्यांतील

अत्यंत संतुष्ट आणि अत्यंत मोठ्या साम्राज्याचे नागरिक होण्यांत अभिमान बाळगणारे लोक राहावेत किंवा पूर्वेकडे दुसर आयर्लंड उत्पन्न व्हावें या दोन गोष्टींपैकी एका गोष्टीची तुह्मांला निवड करावयाची आहे. कारण, मी कांहीं पोकळ धमकी देत नाहीं किंवा कांहीं तरी बरळत नाहीं. हल्लींच्या बंगाल्यांतील तरुण पिढीची वृत्ति कशा प्रकारची आहे, हें मला थोडेंबहुत माहीत आहे. कदाचित् बंगाल प्रतिरशिया बनेल अशी स्थिति आहे." बाबचे अत्याचार घडण्यापूर्वी ज्याअर्थी डॉ. घोस यांनी हे उद्गार काढले आहेत त्याअर्थी बंगाल्यांतील गुप्त कटाची त्यांना कांहीं तरी माहिती असावी असे इंग्लिशमनने म्हटले आहे. बरें, इषारा दिला नसता तर तुम्ही सरकारास वेळींच इषारा देत नाहीं, असेंही हे अँग्लो-इंडियन लोक ह्मणाले असते. याप्रमाणें दोन्हीकडून आमचा कोंडमारा आहे. मानवी स्वभावाकडे अधिकारीवर्गानें दुर्लक्ष केलें हेंच मला दाखवावयाचें होतें. माझ्यासारखेच विचार ना. मेथा यांनींही १९०४ मध्यें राष्ट्रीयसभेच्या प्रतिनिधींचें स्वागत करतांना काढले आहेत. राज्यपद्धतींतील दोष हे अत्याचाराचें कारण असे निदान केल्यावर रोग नष्ट करण्यास लोकांना सवलत देणें व अनियंत्रित पद्धतीस आळा घालणें हे उपाय मी सुचविले आहेत. सरकारची सत्ता नाकबूल केलेली नाहीं. आपल्या हातांतून सत्ता जावी असें अधिकारीवर्गाला वाटत नाहीं, पण हा जर लोभ ते सोडतील तर तें शहाणपणाचें होईल. ह्या अत्याचारापासून त्यांनीं हाच धडा घेऊन देशाची स्थिति कशा प्रकारची आहे हे समजून घेतले पाहिजे; अधिकाऱ्यांचा खून करण्यांत कांहीं हांशील नाहीं, असे लेखांत ह्मटले आहे. मोठमोठ्या अधिकाऱ्यांचा खून केल्यानें इंग्रजी राज्याच्या इमारतीला धक्का बसेल, असे समजणे मूर्खपणाचे आहे. 'तुमचीं कृत्यें दुष्टपणाचीं आहेत व अशा रीतीने तुह्मांला सरकारचे कांहीं एक वांकडे करतां येणार नाहीं,' असा मी लोकांना उपदेश केला आहे. "हीं कृत्ये दुष्टपणाचीं आहेत व तीं अवश्यमेव बंद केलीं पाहिजेत; पण या कृत्यांची पुनरावृत्ति होऊं नये ह्मणून लोकांना कांहीं हक्क दिले पाहिजेत," अशा प्रकारचा उपदेश मी सरकारला केला आहे. पायोनियर सारख्या पत्रांनीं तुमच्या संबंधानें जर एवढें लिहिलें आहे तर तुह्मी त्यांच्यावर फिर्याद कां करीत नाहीं असें ह्मणाल. तर त्याला माझें असें उत्तर आहे कीं, ही फिर्याद १५३ अ कलमा खालीच लाविली पाहिजे. पण त्याला सरकारची मंजुरी लागते; व सरकार अशी मंजुरी देईल हे संभवत नाहीं. अँग्लो-इंडियन पत्रांनीं कितीही दुष्टबुद्धीनें लेख लिहिले तरी सरकार त्यांच्यावर खटला करीत नाहीं, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. नुकतीच एका अँग्लो-इंडियन पत्रानें अशी सूचना केली होती कीं, बनारस येथील हिंदु हायस्कूलचे हेडमास्तर मि. अनंडेल यांना फटके मारण्यांत यावे. मि. अनंडेल हे एक इंग्रज गृहस्थ आहेत. हिंदी लोकांशीं सहानुभूति दाखविणाऱ्या इंग्रजांनाही फटके मारण्याची सूचना

करणाऱ्या या पत्रावर फौजदारी कां करण्यांत आली नाहीं, असा प्रश्न मि. ओग्रेडी यांनीं पार्लमेंटांत विचारला होता; पण त्याला कांहीं एक उत्तर मिळालें नाहीं. आज माझी जशी स्थिति आहे त्याच स्थितीमध्यें दुसऱ्या एकाद्या पत्राचा संपादक असावा अशी माझी इच्छा नाहीं. माझ्या शत्रूवर देखील असा प्रसंग यावा अशी माझी इच्छा नाही. पण मी उदाहरणादाखल नुसतें सांगितले. वस्तुतः पायोनियरपेक्षां अधिक कडक भाषा वापरण्याचा मला हक्क आहे; कारण पिनल कोडांत असें सांगितले आहे कीं, आत्मसंरक्षणासाठी जे कांही करण्यांत येतें तो गुन्हा होत नाही. अशा प्रकारचें विधान मालमत्तेबद्दल लिहितांना पिनल कोडांत केलें आहे. माझें म्हणणे असें की, मालमत्तेमध्ये अब्रूचाही समावेश होतो. उत्तर देण्याचा हक्कही आम्हांला असूं नये काय? अधिकारी ह्मणजे सरकार नाही. अधिकारीवर्गच आपल्याला चाकर असे ह्मणवून घेतो. पण १२४ अ कलमाकरतां तोच अधिकारीवर्ग चाकराचा मालक अथवा राजा बनतो. मेजर इव्हॅन्सबेल यांच्या ' अवर ग्रेट व्हॅसल एम्पायर ' या पुस्तकांत सरकार ह्मणजे राज्यकारभार नव्हे, असे स्पष्ट ह्मटले आहे. अधिकारीवर्ग हाच सरकारचा राज्यकारभार चालविणारा वर्ग आहे, पण तो कांही ब्रिटिश साम्राज्याचा आधारस्तंभ नाही. हिंदुस्थानांतील प्रत्येक लेखकाने सरकारामध्ये आणि राज्यकारभारामध्यें फरक केला आहे. आणि आतां इंडियन लॉ रिपोर्ट ३४ कलकत्ता यामध्यें असा ठराव आहे की, **स्वराज्याकरितां भांडणें राजद्रोहाचें होत नाहीं.** अधिकारीवर्गाला असे वाटते कीं, कायद्यानें प्रस्थापित झालेलें सरकार ह्मणजे आपणच. तुह्मी सरकार नाही असें सांगणे त्यांना नापसंत, त्रासदायक आणि अप्रिय असेल; पण हा कांही राजद्रोह नाही. सर चार्लस् डिल्कच्या " प्राब्लेम्स् ऑफ् ग्रेटर ब्रिटन " या पुस्तकांतील पुढील उतारा वाचून दाखवितों:—" हिंदुस्थानांतील आपली राज्यपद्धति जुलमी (डेसॅपॉटिक) नाहीं, असें जें ह्मणण्यांत येते त्यावर परकीय टीकाकार कडक टीका करतात. उलटपक्षी ही राज्यपद्धति आटोक्रसी ( स्वतंत्र राज्य-पद्धति) ची पूर्णावस्था आहे या मुद्यावर कित्येक तिचें समर्थन करितात. सोइस्कर आणि हितकर राज्यपद्धति जगाच्या पाठीवर जर कोठें असेल तर ती या देशांतच आहे, असें त्यांचे ह्मणणें आहे. आमची हिंदुस्थानांतील राज्यपद्धति जुलमी ( डेस्पॉटिक ) नाहीं, या ह्मणण्याचे समर्थन कोणत्या मुद्यावर करतां येणे शक्य आहे, हें समजणें खरोखर कठिण आहे. **कर देणाऱ्या लोकांच्या राज्यव्यवस्थेवर मुळींच दाब नाहीं.** या देशाचे राज्यकर्ते अधिकारी दूरच्या ठिकाणाहून नेमण्यांत येतात. लोकांच्या प्रतिनिधींच्या **संमतीशिवाय कायदे केले जातात.** अशा प्रकारची स्थिति जुलमी राज्यपद्धतींत अगर खुद्द हिंदुस्थानांत जुलमी मोंगलाईंतही नव्हती. देशांतील लोकांना बहुशः सार्वत्रिकपणें लष्करी खात्यांत वरिष्ठ दर्ज्याची जागा

देण्यांत येत नाहीं, आणि सिव्हिलसर्व्हिसकडेही वरच्या दर्जाच्या जागा साधारणपणें देण्यांत येत नाहींत; अशी स्थिति मोंगलाईतही नव्हती. थोड्याशा हिंदी गृहस्थांची कौन्सिलांत नेमणूक करण्यांत येते; पण ही केवळ फसवणूक आहे. हिंदुस्थान सरकार कांही कायद्यांना प्रमाण मानते ह्मणून तें जुलमी नाहीं, असें कोणाला छातीठोक विधान करतां येणार नाही. या तत्वाप्रमाणे रशियन राज्यपद्धतिही जुलमी ( डेस्पॉटिक ) नाही असें ह्मणतां येईल. कारण, रशियाचा झार देखील आपल्या बादशाही सभेंतील ( इम्पेरियल् सेनेट मधील ) लोकांचा आपल्या मताला पाठिंबा असल्याशिवाय कोणतीही गोष्ट करीत नाही." अधिकारीवर्गाची तरफदारी करणाऱ्या पक्षाचे ह्मणणे अशा प्रकारचें आहे. राजकीय चर्चेत 'डेसपॉटिक' हा शब्द वापरतात; आणि तोच शब्द मीही वापरला आहे. सर चार्लस् डिल्क हा एका काळी प्रधानमंडळांतील एक सभासद होता व या मताचा तो पुढारी होता याची तुह्मांला आठवण करून दिली पाहिजे. 'रिप्रेझेंटेटिव्ह गव्हर्मेंट' या पुस्तकांतून मी वाचलेल्या उताऱ्यावरून मिल्लने जें मत दिले आहे तिकडेही मी आपलें लक्ष वेधतों. इंग्रजी ग्रंथकारांची मते अशा प्रकारची आहेत. युनायटेड स्टेट्सच्या लोकप्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धतीच्या अध्यक्षाच्या जागेकरितां उमेदवार असलेल्या मि. ब्रायनचेही विचार असेच आहेत. 'इंडिया अंडर ग्रेटब्रिटन' ह्मणजे ग्रेटब्रिटनच्या अमलाखाली असलेले हिंदुस्थान या पुस्तकांत "हिंदुस्थानांतील राज्यपद्धति अनियंत्रित आणि जुलमी ( अरबिट्ररी व डेसपॉटिक ) आहे," असें म्हटले आहे. ता. १९ मे, २६ मे, ता. २ जून, ता. ९ जून हे लेख, मध्यंतरी इतर पत्रांतून जे लेख आले, त्यांना उत्तरा-दाखल लिहिले होते. बांबच्या अनर्थाच्या वादविवादांत दरभंग्याच्या महाराजांसारखे लोक सामील झाले; व त्यांनीही पायोनियरचीच री ओढून आमच्या पक्षाविरुद्ध मत दिलें. वस्तुतः दरभंग्याच्या महाराजांसारखे लोक आमच्या पक्षाचेच आहेत. अशा वेळी समाजाच्या हिताच्या दृष्टीने चळवळ करणाऱ्या लोकांवर जे आक्षेप करण्यांत आले होते, ते खोडून काढून या सभांचें खरें स्वरूप उघडकीस आणणें आवश्यक होतें. सर्व हिंदुस्थानभर सभा भरविण्यांत आल्या नव्हत्या; तर ह्या सभा कांहीं मतलबी लोकांनी भरविल्या होत्या, असें आपणास दिसून येईल. अर्थात् स्वपक्षमंडनार्थ ह्या सभांचा पोकळपणा उघडकीस आणणें आवश्यक होतें. ह्या सभा लोकमतदर्शक नाहीत याबद्दल सरकारलाही इषारा द्यावयाचा होता; व दरभंग्याच्या महाराजांसारखे गृहस्थ सामान्य जनतेचे प्रतिनिधि नाहीत हें उघड करून दाखवावयाचें होतें. म्हणूनच या लेखास 'दुहेरी इषारा' असा मथळा दिला आहे. या लेखांतच खरी वस्तुस्थिति सरकारापुढें न मांडणाऱ्या लोकांस कांहीं सूचना केल्या आहेत; व या लोकांच्या नादीं लागून सरकारनें दडपशाहीचें धोरण स्वीकारूं नये अशी सूचना केली

आहे. आमचें असें ह्मणणें आहे की, दरभंग्याच्या महाराजांसारख्या लोकांचा, विरुद्धपक्ष पाहिजे तसा उपयोग करून घेत आहे. कसे ते पाहा. अँग्लोइंडियन लोक ह्मणतील की, चळवळ्या लोकांच्या भाषणांमुळें व लेखांमुळें बॉबगोळे उडाले असे दरभंग्याचे महाराजही ह्मणतात; मग आह्मी नवीन कायदे कां पास करूं नयेत ? अधिकारीवर्गाला असे ह्मणण्याची संधी त्यांनीं देऊं नये, ह्मणून त्यांना इषारा देणे जरूर होते. या लेखांतच प्रारंभीं मी असे दाखविलें आहें कीं, मुझफरपूर प्रकरणाचा उपयोग दोन्ही पक्ष करून घेत आहेत. अँग्लोइंडियन पत्रें असा उपयोग करून घेतील व दडपशाहीचें धोरण स्वीकारा ह्मणून सांगतील, हे लेखांत मी स्पष्टपणे लिहिले आहें. अशा रीतीने करण्यांत येणाऱ्या उद्योगांना आह्मी नेटिवांनी मदत करूं नये ह्मणून हा इषारा दिला आहे. भलत्यासलत्या कबूल्या देऊं नका; ह्या कबूल्यांचा उपयोग आमच्याविरुद्ध करण्यांत येतो, अशी सावधगिरीची सूचना देण्यांत आली होती. मुझफरपूर–प्रकरणांत खेद प्रदर्शित करूं नका, असे आपचे ह्मणणे नाहीं. एकवेळ सोडून दहावेळ दुःख प्रदर्शित करा, असे मी स्पष्ट ह्मटले आहे. ही गोष्ट निंद्य आहे, माथेफिरूपणाची आहे, आततायीपणाची आहे व कोणालाही संमत नाही, असा या प्रकरणाचा मी या व इतर लेखांत वारंवार निषेध केला आहे. सभा भरवून निषेध प्रदर्शित करणे निराळे आणि चळवळ बंद पाडणें निराळे. बॉब गोळे फेकणे हा स्वराज्यसंपादनाचा मार्ग नव्हे, असे मी या लेखांत ह्मटले आहे. हा मार्ग युक्तिवादाला धरून नाहीं व याला नीतीचाही पाठिंबा नाहीं. मी आपल्या पक्षाच्या सर्व वाङ्मयाचा उल्लेख करीत बसत नाहीं. पण माझा पुरावा इतका भरभक्कम आहे कीं, त्यामुळे प्रत्येकाची अशी खात्री होईल की, लोकांच्या बुद्धिमत्तेचा विकास झाल्यामुळे हल्लींची राज्यपद्धति लोकांस नकोशी झाली आहे. एखादा मनुष्य सोमल खाऊन आत्महत्या करतो ह्मणून सोमलाचा उपयोग अजीबात करूं नये असे होत नाहीं. कधीं कधीं अग्नि घरे जाळतो ह्मणून अग्निच अजिबात नाहीसा केला पाहिजे काय ? एखादा माथेफिरू मनुष्य अत्याचारास प्रवृत्त होतो, ह्मणून सर्व राजकीय चळवळ बंद पाडली पाहिजे काय ? अशा प्रकारची कारणे चुकीचीं आहेत, हें मी ता. १९ मेच्या लेखात दाखविलें आहे. आयर्लंड, फ्रान्स, जर्मनी आणि रशिया या देशाचा इतिहास आमच्या डोळ्यांपुढे असल्यावर राजकीय चळवळ करणारांच्या चळवळीमुळे अगर तरुणांनी वर्तमानपत्रांतील लेख वाचल्यामुळे बांबचे अत्याचार घडून आले नाहींत, असें आपणांला दिसून येईल. आमचे ह्मणणें एवढेच आहे कीं, वस्तुस्थिति अशा थराला आली आहे की, कांहीं तरी सुधारणा घडून आल्या पाहिजेत. व्हाइसराय साहेबाचे मतही असेच आहे. सिव्हिलसर्विस डिनरच्या प्रसंगीं लॉ॰ मोर्ले यांनीही हेच मत प्रतिपादिलें आहे. नुसत्या दडपशाहीच्या धोरणानें भागणार नाही, असे ते ह्मणाले.

' बांबचा खरा अर्थ ' हा ता. २६ मेचा लेख असून विलायतेंतील लोकमत आल्यावर हा लेख लिहिला आहे. इंग्लंडांत देखील दोन पक्ष होते हे लॉर्ड कर्झन व लॉ. मोर्ले यांच्यांत झालेल्या वादावरून कळून येईल. " लष्करी कायदा सुरू केला पाहिजे, सुधारणाबिधारणांचे खूळ कांहीं एक नको, " असें लॉर्ड कर्झनचें मत होतें, तर त्याविरुद्ध लॉ. मोर्ले यांचें मत होते. दडपशाहीच्या धोरणाचे अवलंबन करण्याची सूचना करणाऱ्या मि. रीग यांस मी या लेखांत मि. स्पेन्सरच्या मताचा अनुवाद करून उत्तर दिले आहे. सुधारणा घडवून आणण्यासाठी चळवळ चालू असतां तिच्याकडे लक्ष न देतां सरकारी अधिकारी बेगुमानपणे दडपशाहीच्या उपायांचे अवलंबन करतील तर त्याचा परिणाम सत्ताधारी व प्रजा यांच्यामध्ये झगडा उत्पन्न करण्यास कारणीभूत होईल, असे मि. स्पेन्सर यांनी प्रतिपादिले आहे. बांब-गोळ्याविषयीं तुमचे मत काय आहे ? तुमच्या पक्षाचे धोरण काय आहे ? कित्येक लोक ह्मणतात की, जर तुह्मी बॉबगोळ्याचा निषेध करता तर तुह्मी सरकाराला दडपशाहीच्या कृत्यांत मदत केली पाहिजे. जणूंकाय दुसरा मार्गच नाही ! एक तर बॉब-गोळ्याचा निषेध करून सरकाराला मदत करा; नाहीं तर तुह्मी राजद्रोहाचा आरोप आपल्या माथ्यावर घेण्यास तयार व्हा; अशा प्रकारचा मुद्दा पुढें मांडण्यांत आला होता. या मुद्याला उत्तर देण्यासाठींच ता. २ जूनचा लेख लिहिण्यांत आला होता. बॉबचे अत्याचार करणारांना शिक्षा करण्यासाठी दडपशाहीचे उपाय योजा; पण या पलीकडे दडपशाहीच्या उपायांची जरूरी नाही, असे आह्मांस वाटते. आमचे धोरण अशा प्रकारचे आहे. वर्तमानपत्राचा कायदा ता. ८ जून रोजी सिमल्यास पास व्हावयाचा होता व त्याप्रमाणे तो झालाहीं. आह्मी लेख लिहिले त्यावेळीं हा कायदा पास करण्याचा सरकारचा हेतु आह्मास समजला होता. सन १८९४ च्या ' कॉटेम्पोररी रिव्ह्यू ' नामक मासिक पुस्तकात 'धि एथिक्स ऑफ धि डायनामाइट' हा लेख आला होता. १८९३ मध्ये ज्वालाग्राही पदार्थ जवळ बाळगून डायनामाइटचा उपयोग करणारा कोणी तरी गृहस्थ सांपडल्यावरून पार्लमेंट सभा ताबडतोब भरली व कायदा पास झाला. त्या वेळीं इंग्लंडांत बरीच चळवळ उडून गेली होती; व 'कॉटेम्पोररी रिव्ह्यू ' मध्ये जे विचार प्रदर्शित केले आहेत तेच मी या लेखात व्यक्त केले आहेत. ना. सय्यद महमद यांनीही व्हाइसरॉय साहेबांच्या कौन्सिलांत 'कॉटेम्पोररी रिव्ह्यू'तील उतारा वाचून दाखविला होता. बॉबगोळ्यानें सरकार नाहींसे होत नाहीं, किंवा सरकाराला नाहींसें करण्याचें त्याच्या अंगी सामर्थ्य नाहीं. पण असल्या कृत्याचा परिणाम काय होतो, याचा मीं तात्त्विक दृष्टीने विचार केला आहे. हीं कृत्ये दुष्ट आहेत अगर भयंकर आहेत असें ह्मणा; पण यामुळें मनुष्याचें लक्ष या गोष्टीकडे वेधलें जाऊन आपल्या आयुष्यक्रमांत कोणता मार्ग स्वीकारावयाचा यासंबंधीं विचार करण्यास मनुष्य लागतो. मेजर इव्हॅन्स बेल यांनी आपल्या पुस्तकांत लिहिलें आहे

कीं, "जोंपर्यंत राज्यकारभार सुरळीतपणें चालला आहे, तोंपर्यंत अधिकारीवर्गाला असें वाटतें कीं, सर्व कांहीं ठीक चाललें आहे. कांहीं तरी अस्वस्थता उघडकीस आल्याखेरीज राज्यकारभारांत कोठें चूक होते कीं काय हें पाहण्याची ते काळजी घेत नाहींत. अशी अस्वस्थता दिसून आली ह्मणजे मात्र अधिकारी-वर्ग परिस्थितीचा विचार करण्यास सुरवात करतो." इंग्लंडात, १८९३ सालीं झालेल्या ज्वालाग्राही पदार्थांच्या कायद्याचे धर्तीवर या देशांतील ज्वालाग्राही पदार्थांचे कायद्याची रचना करण्यांत आली आहे. या कायद्याचा विचार सविस्तर करण्याकरितां ता. ९ जून व ता. १६ जूनचे लेख लिहावे लागले. हिंदी सभासदांनी व्हाइसरायांच्या समक्ष या कायद्यास हरकत घेतली. अत्याचाराची कृत्ये करणारास शिक्षा होण्याच्या विरुद्ध कोणीही असूं शकणार नाही; परंतु प्रजेस त्रासदायक होणारे अधिकार कायद्यानेच पोलिसांस दिल्यास त्याची अंमलबजावणी प्रजेस जाचक होण्याचा संभव आहे. कायद्यांतील कलमांमुळे उद्योगधंद्यांशी संबंध असलेल्या कित्येक गृहस्थांस विनाकारण त्रास देण्यास पोलिसांस एक नवीन साधन होईल, असें त्यांचे ह्मणणे होते. ज्वालाग्राही या शब्दाची व्याख्याही फारच लवचिक आहे. हा कायदा इंग्लंडच्या कायद्याबरहुकूम आहे, असे सांगण्यांत आले आहे. पण तिकडे कायद्याची अंमलबजावणी कशा प्रकारें होते हे पार्लमेंट सभा डोळ्यांत तेल घालून पाहते. येथे तशी स्थिति नाहीं. येथे पोलिसास पार्लमेंटसारख्या संस्थेची भीति बाळगण्याचें कारण नसल्यामुळे या देशात सर्वच सत्ता पोलिसाच्या हाती जाईल व त्यामुळे पोलिसच सर्व शक्तिमान् होईल. कांही तरी हक्क दिल्याशिवाय नुसत्या पोलिसास यापेक्षां जास्त अधिकार दिले, तरी असले अत्याचार बंद पडणे अशक्य आहे, असें 'हे उपाय टिकाऊ नाहीत' या लेखांत मी दाखविले आहे. राष्ट्राचा विकास करणारी व राष्ट्रीय तेज उत्पन्न करणारी जी कारणे असतील, त्यांची गति खुंटवून त्यांना मागें खेचणे याचें नांव पिच्छेहाटीचे किंवा दडपशाहीचे धोरण. वर्तमानपत्राचा कायदा पास केल्याने राष्ट्राची प्रगति खुंटते, हे इतिहासांतील अबाधित तत्त्व मी नमूद केलें आहे. तें मीं इंग्लिश ग्रंथांतून घेतले आहे. चांगल्या चांगल्या सनदशीर लेखकांचेंही असेच मत आहे हें अमॉसकृत 'सायन्स ऑफ् पॉलिटिक्स' (राजधर्मशास्त्र) या ग्रंथांतील मी वाचून दाखविलेल्या उताऱ्यावरून व अर्स्किन या कायदेपंडिताने पेनचे डिफेन्सच्या वेळी केलेल्या भाषणाच्या उताऱ्यावरून कळून येईल. सरकारास आपण नेहमी निर्दोष अथवा पूर्ण (Perfect) आहोंत असे वाटते; परंतु वर्तमानपत्रें त्याच्या चुका उघडकीस आणून सुधारणेचा मार्ग खुला करतात. **भाषणस्वातंत्र्य व लेखनस्वातंत्र्य हे फार महत्वाचे सनदशीर हक्क आहेत.** ह्यांच्या अभावीं सुधारणा (Reforms) करितां याचना केली पाहिजे, किंवा त्या विकत घेतल्या पाहिजेत; त्या हक्कानें मागतां याव-

याच्या नाहींत. वास्तविक मुद्रणस्वातंत्र्याची जर कोठें खरोखर जरूर असेल तर ती हिंदुस्थानांतच आहे. **इंग्लंडपेक्षां हिंदुस्थानांत जास्त मुद्रणस्वातंत्र्य पाहिजे.** कारण, इकडे लोक अडाणी आहेत, व जुलमी राज्यपद्धतीला आळा घालण्यास मुद्रणस्वातंत्र अवश्य पाहिजे. सर हार्वे अॅडमसन यांनीं ता. ८ जून रोजी ज्वालाग्राही पदार्थांचा कायदा कौन्सिलपुढे मांडतांना आपल्या भाषणामध्यें असे उद्गार काढिले आहेतः—" दुर्दैवाने आपल्याला एका सुव्यवस्थित टोळीशी तोंड द्यावयाचे आहे; ही टोळी गुन्हे करणाऱ्या खालच्या वर्गातील नसून सुशिक्षित लोकांची आहे. समाजांत एकमेकांचे जे परस्पर हितसंबंध असतात, त्याची पर्वा न करतां हे शिकलेले लोक एकत्र जमले आहेत; चांचेलोकांप्रमाणेंच हे मानव जातीचे शत्रू आहेत. " कांहीं बंगाली लोक अराजक वृत्तीचे आहेत व त्यांना कोणत्याही प्रकारच्या सरकारची सत्ता नको आहे, असें सर हार्वे अॅडमसन यांनीं कौन्सिलांत सांगितले आहे. पण असे ह्मणणें चुकीचे आहे. या मताविरुद्ध ' फॉल ऑफ् लॉर्ड कर्झन ' या नवीन पुस्तकांत किंवा रशियावरील कोणत्याही अर्वाचीन पुस्तकांत लागेल तितका ऊहापोह कोणालाही पहावयास सांपडेल. **कार्ल जोबर्ट** यांच्या ' फॉल ऑफ् लॉर्ड कर्झन ' या पुस्तकांत ६५ पानावर पुढील उतारा आहे. " विध्वंसक लोकांना कशाचाही धरबंद नाहीं, कारण त्यांचा कशावरही विश्वास नाहीं. त्याना ईश्वर नको, धर्म नको, कायदा नको, सरकार नको, प्रेम नको, कांहीं एक नको. अशा प्रकारचे कांहीं माथेफिरू लोक आहेत याबद्दल वाद नाहीं. अशा प्रकारच्या लोकांपासून समाजाने आपले रक्षण करून घेतलें पाहिजे. पण एकाद्या मनुष्याला अगर जमावाला अराजक किंवा विध्वंसक ह्मणण्यापूर्वी आपण सावधगिरी ठेविली पाहिजे. कारण, जर हे लोक कांहीं राजकीय हेतूने प्रेरित झाले असतील किंवा त्यांना केलेल्या अपायाबद्दल सूड घेण्याच्या बुद्धीनें जर ते एकादें ( अनन्वित ) कृत्य करण्यास प्रवृत्त झाले असतील, तर शिक्षा देण्यास योग्य अशा गुन्ह्यांबद्दल ते दोषी असूं शकतील; परंतु त्यांना अराजक ( अनार्किस्ट ) किंवा विध्वंसक असे ह्मणतां येणार नाहीं. मी अशा प्रकारचे हजारो लोक तुरुंगात खितपत पडलेले पाहिले आहेत. पण ज्याला स्वातंत्र्याचें प्रेम नाहीं, ज्याला कायदे व बंदोबस्त मुळींच नको किंवा ज्याला सुनियंत्रित राज्यसत्ता असावी असे वाटत नाहीं, असा एकही मनुष्य मला आढळला नाहीं. * * * रशियन लोक अराजक व विध्वंसक आहेत काय ? ह्या रशियन लोकांचे स्वातंत्र्यावर प्रेम आहे व सर्व लोकांना सारखे कायदे व सारखे हक्क असावेत असे याचे मागणे आहे. आपले उद्योगधंदे यत्किंचितही त्रास न पोंचतां आपणास स्वतंत्रपणे करतां यावेत, आपल्या पदरच्या खर्चाने आपल्या मुलाबाळांना शिक्षण देतां यावे, आपल्या कुटुंबांतील मंडळीस स्वस्थपणानें बायबल वाचून दाखवितां यावें, आपल्या मातृभाषेंत नीट रीतीनें

बोलतां यावें, व आपल्याला जें खरें वाटतें तें आपल्या मनाप्रमाणें जगापुढें मांडतां यावें, ह्मणूनच हे लोक स्वातंत्र्यासाठी धडपडत आहेत. अशा लोकांची गणना अराजक किंवा विध्वंसक लोकांमध्ये करतां येईल काय ? " अशाच प्रकारचा भेद मी आपल्या लेखात केला आहे, असे आपणास दिसून येईल. समाजव्यवस्थाच बिलकुल नसावी असें ह्मणणारा गृहस्थ अराजक किंवा विध्वंसक समजला जाईल. समाज नको, व्यवस्था नको, असे बंगाली तरुणांचे ह्मणणे नाहीं. ह्या ठिकाणी मी जी भाषा वापरली आहें, तीच भाषा हिंदुस्थानच्या दारिद्र्याचें वर्णन करतांना अनेक ग्रंथकारांनीं वापरली आहे. दादाभाई नौरोजी यांनी आपल्या 'पॉव्हर्टी अँड अनब्रिटिश रूल इन् इंडिया' नांवाच्या पुस्तकांत टॉरेन्स यांचा एक उतारा घेतला आहे, त्यावरूनही हेंच सिद्ध होईल. 'बाब गोळे तयार करा' असला व्यंग्यार्थ माझ्या लेखांतून काढतां येत नाही. बांबगोळे सहज तयार करतां येतात, अशा प्रकारच्या वर्णनाबद्दल जर मी जबाबदार असेन तर 'टाइम्स ऑफ इंडिया' किंवा दुसरीं अँग्लोइंडियन पत्रेंही याबद्दल काय ह्मणून जबाबदार नाहीत ? त्यांनीच एका तज्ज्ञ साक्षीदाराची साक्ष प्रसिद्ध केली आहे; त्यावरून ही माहिती त्यांनीच प्रसिद्ध केली आहे. बॉबगोळे, स्फोटक द्रव्यें, ज्वालाग्राही पदार्थ या संबंधाने त्या वेळी चर्चा चालली होती. ह्मणून तीही माझ्या पत्रांत आली. असे गुप्तार्थ काढूं लागलें तर प्रत्येक लेखकावर कोणता तरी गुन्हा केल्याचा आरोप येईल. मी प्रचलित विषयाची चर्चा केली आहे व लोकमत प्रदर्शित केले आहे. पूर्वीचाच असंतोष आहे व सर्वांचीच मते अशी आहेत. मग मी नवीन असंतोष उत्पन्न केला व राजद्रोह चेतविला असे कसें ह्मणतां येईल ? नुकतेंच लॉर्ड कर्झन यांनी काबूलच्या अमीराविषयी हाऊस ऑफ् लॉर्ड्समध्ये भाषण केले. लॉ. कर्झनचे उद्गार अमीर साहेबांस कळल्यास बखेडा उत्पन्न होण्याचा संभव आहे, असे मोर्ले साहेब ह्मणाले; व त्यांनी कर्झन साहेबांच्या उद्गारांविषयीं नापसंती व्यक्त केली. पण हिंदुस्थान सरकाराविरुद्ध अमीरसाहेबांना चिथविल्याबद्दल किंवा सरकाराविरुद्ध त्यांच्या मनांत द्वेष किंवा तेढ उत्पन्न करण्याचा लॉ. कर्झन यांनी प्रयत्न केला, ह्मणून कर्झनसाहेबांवर खटला करण्याचा विचार मोर्लेसाहेबांच्या डोक्यांत मुळींच आला नाही. याचप्रमाणे वर्तमानपत्रकार या नात्यानें माझीं मते मोकळेपणानें व्यक्त करणे माझे कर्तव्य होते. पुराव्यांतील पोस्ट-कार्डाचा खुलासा असा आहे की, ज्वालाग्राही पदार्थांची व्याख्या पाहून मला नव्या पास झालेल्या कायद्यावर टीका करावयाची होती ह्मणून एका कॅटलागांतून किंमतीसह व कर्त्यांच्या नांवासह ग्रंथाचीं त्यावर नांवें लिहून घेतली होतीं. हे कार्ड नेहमींच्या कागदपत्रांत उघड्या खणांत सांपडले यावरून माझ्या हेतूसंबंधानें संशय घेण्याला मुळीच जागा नाहीं,

असें आपणांस दिसून येईल. १५३ अ कलमाप्रमाणें जातींजातींत वैमनस्य उत्पन्न केल्याचा मजवर आरोप नसून वैमनस्य उत्पन्न करण्याचा प्रयत्न केल्याचा मजवर आरोप आहे. अप्रीति उत्पन्न करण्याला ज्याप्रमाणे उद्देशाची व हेतूची अवश्यकता आहे त्याप्रमाणें या बाबतींतही आहे. साध्याशिवाय प्रयत्न होणें शक्य नाहीं. १५३ अ कलमाखालीं रिपोर्टीत नमूद केलेला खटला एकच आहे. तो ' पंजाबी ' वरील खटला आहे. हा पंजाब वुइक्ली रिपोर्टर नं. १४ एप्रिल १९०७ मध्यें दिला आहे. या खटल्यांत चीफ जस्टिस यांनीं " जातींजातींत द्वेष उत्पन्न करण्याचा हेतु बुद्धिपुरस्सर असला पाहिजे, असें ह्मटलें आहे. " नुसत्या लेखांवरून हा हेतु काढावयाचा नसून इतर पुराव्यानें तो सिद्ध झाला पाहिजे. १५३ अ कलमांत " बादशाहाच्या प्रजाजनांपैकीं दोन वर्ग " असे शब्द आहेत; मग हे दोन वर्ग कोणते समजावयाचे ? ' वर्ग ' या शब्दानें राजकीय वादांतील दोन पक्ष होऊं शकतील काय ? निरनिराळ्या तत्वावर बनलेले दोन राजकीय पक्ष किंवा ' वर्ग ' असा या कलमांतील ' वर्गा ' चा अर्थ नाहीं, असें ह्मणण्याचें मी धाडस करतो. आतां बादशहांचे प्रजाजन कोण ? बादशहाचे प्रजाजन ह्मणजे युरोपियन व हिंदी रहिवाशी असें सांगण्यांत येतें. ज्या दोन वर्गांत विशिष्ट रीतीनें भेद आहे अशा प्रकारचे निरनिराळे वर्ग बादशाहाचे प्रजाजन ह्मणून मानण्यांत यावयाचे आहेत. पण मी असें ह्मणतों कीं, कलमाच्या हेतूचा विचार केला ह्मणजे राजकीय पक्षांचा समावेश या कलमाखालीं होतो असें मला वाटत नाहीं. एका जातीनें दुसऱ्या जातीविरुद्ध वागूं नये एवढ्याचकरतां जातीजातींत वैरभाव किंवा द्वेष उत्पन्न करूं नये, असा या कलमांतील हेतु आहे: किंबहुना याच हेतूनें हें कलम रचण्यांत आलें आहे. या कलमाखालीं गुन्हा होण्यास गुन्हा करण्याच्या हेतूनें प्रयत्न करण्यांत आला होता, असें सिद्ध केलें पाहिजे. दोष दाखविण्याच्या हेतूनें किंवा भेदभाव कमी करण्याच्या हेतूनें कांहीं लिहिलें अगर बोललें तर चालेल, पण गुन्हा करण्याचा हेतु मात्र नसला पाहिजे. १२४ अ यांतील खुलाशाप्रमाणें या खुलाशांतही ही गोष्ट स्पष्ट केली आहे. हा खुलासा आहे व तो फक्त मूळ पॅरिग्राफांतील शब्दांची फोड करण्याच्या हेतूनेंच लिहिला आहे. अर्थात् माझे लेख या खुलाशाखालीं येत नाहींत हें सिद्ध करण्याचा बोजा फिर्यादीवर आहे. फिर्यादीनें जर असें केलें नाहीं, तर या खुलाशाचा फायदा मला मिळाला पाहिजे. शिवाय कोणत्या शब्दांवरून आरोप ठेवण्यांत आला आहे व कोणत्या जातींत वैमनस्य उत्पन्न करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप ठेवला आहे, हें सांगण्यांत आलें नाहीं. अधिकारीवर्ग हा या कलमांतील वर्ग होऊं शकत नाहीं; कायद्याच्या दृष्टीनें म्हणाल तरी देखील या लेखांवरील आरोपाचें समर्थन करतां येणार नाहीं. १२४ अ कलमाखालील गुन्हा शाबीत करण्यासाठीं अधि-

कारीवर्ग ह्मणजे सरकार असा अर्थ करावयाचा; व १५३ अ कलमाखालील गुन्हा शाबीत करण्यासाठीं तोच शब्द विशिष्टजातिवाचक मानावयाचा. अशा प्रकारें एकाच लेखांतील शब्दांची ओढाताण करणें बिलकुल बरोबर नाहीं. ज्यूरींतील सभ्य गृहस्थहो, मजवर ठेवलेले आरोप अस्पष्ट व संदिग्ध आहेत, लेखांचीं भाषांतरें चुकलीं आहेत, लेख लिहिण्यांत हेतु काय होता हें पाहा, लेखांचा विचार करतेवेळीं असलेल्या परिस्थितीचा विचार करा, वादविवादाचें स्वरूप कोणत्या तऱ्हेचें होतें हें लक्षांत आणा, व मुद्रणस्वातंत्र्याचे आपण संरक्षक आहां हें जाणून आपण योग्य निकाल द्या. शेवटीं, आपण इतका वेळ माझें भाषण शांतपणानें ऐकून घेतलें याबद्दल व ॲडव्होकेट-जनरल यांनींही शिष्टाचाराप्रमाणे मला वागवून माझ्या भाषणास अडथळा आणला नाहीं, याबद्दल मी आभार मानतों.

यानंतर **ॲडव्होकेट-जनरल** मि. ब्रॅन्सन यांनीं ज्यूरीला उद्देशून भाषण केलें. त्यांत ते म्हणालेः—" राजकारण व देशांतले दोन पक्ष यासंबंधानें जो वादविवाद तुह्मांला सांगण्यांत आला तो सर्व बाजूला ठेवा. तुह्मांला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाही. सरकाराविरुद्ध केलेल्या तक्रारी खऱ्या असोत वा खोट्या असोत, लेखांत वापरलेली भाषा १२४ अ कलमाखालीं येते की नाहीं हा मुद्याचा प्रश्न आहे. लेखांतलीं विधानें खरीं आहेत हा मुद्दा दिवाणींत अब्रुनुकसानीच्या कायद्यान्वयें केलेल्या फिर्यादींत चालेल. परंतु फौजदारी खटल्यांत रा. टिळक त्याचा उपयोग करूं पाहताहेत. राजद्रोहाचा आरोप ठेवलेल्या लेखांत खरीं विधानें असोत वा खोटीं विधानें असोत राजद्रोहाशीं खऱ्याखोट्याचा संबंध नाहीं, असें प्रीव्हीकौन्सिलनें ठरविलें आहे. टिळकांचें भाषण मला महत्वाचें वाटत नाहीं. त्यांची चर्चा सगळी विसंगत होती. त्यांनीं काळाचा अपव्यय केला. लेखांचा अमुक अर्थ लावावयाचा असें जें टिळक सांगतात, त्यांत कांहीं तथ्य नाही. त्यांनीं तुमच्या डोळ्यांत धूळ टाकण्याचा प्रयत्न केला आहे. ' मी अमुक लिहिलें त्याचा असा अर्थ नव्हता, मी आतां सांगतों असा अर्थ आहे,' हें उत्तर चूक आहे. लेख लिहिण्याच्या वेळेस टिळकांच्या मनांत कोणता अर्थ होता याचा लेख वाचून निवाडा करण्याचें काम तुमचें आहे. अमुक अर्थ आहे तर तो लेखांत योजलेल्या शब्दांमध्यें कां दिसत नाहीं ? एकदा फिर्यादीपक्षानें आरोपीविरुद्ध खटल्याची उभारणी ठाकठीक केली ह्मणजे मग आपणांवर आरोप शाबीत होत नाही असें सिद्ध करण्याचें ओझें आरोपीच्याच माथीं येते. एका काळीं ज्यूरीने केलेला कायदा व सरकारानें केलेला कायदा अशा प्रकारचा भेद विलायतेंतल्या ज्यूरींतील गृहस्थ करीत असत; पण या देशांत विलायतेंतल्या ज्यूरीचे अनुकरण करतां कामा नये. विलायतेंतला कायदा हिंदुस्थानांत येत नाही, असा या हायकोर्टाचा निकाल आहे. वर्तमानपत्रांच्या स्वातंत्र्याचे तुह्मी रक्षक आहांत असें टिळकांनीं सांगितलें. किती मूर्खपणा हा ! जसा मी वर्तमान-

पत्रांच्या स्वातंत्र्याचा रक्षक नाहीं, तसेंच तुह्मी नाहीं. परमेश्वरापुढे तुह्मी पिनलकोडाचे रक्षक आहात आणि पिनलकोड वर्तमानपत्रांचे रक्षक आहे. प्रसिद्ध झालेल्या लेखांचा कायद्यानें प्रस्थापित झालेल्या सरकाराविरुद्ध द्वेष उत्पन्न करण्याचा हेतु होता, असें तुह्मी मत दिलें ह्मणजे मग हा हेतु सिद्धिस गेला किंवा नाही हा प्रश्न उरत नाही. टिळकांचें ह्मणणे असें की, मनुष्याच्या शक्तीबाहेरील आगंतुक कारणांनीं यत्न निष्फळ झाला नाही, तर तो प्रयत्नच नव्हे. ह्मणजे एकंदरीत निष्फळ होण्याचे कारण व प्रयत्न करणारा मनुष्य यांचा संबंध असतां कामा नये. हा विचार अगदी वेडेपणाचा आहे. आरोपीवर आरोप शाबीत होण्यापूर्वी लेखांच्या शिवाय दुसरा कांही तरी पुरावा दाखवावा लागतो, अशी टिळकांची समजूत दिसते. ही समजूत खास चुकीची आहे असे कलकत्त्याचे चीफ. ज. सर कोमर पॅथेराम यांच्या निकालावरून मी सिद्ध करून दाखवितो. (कलकत्ता लॉ. रि. १९ पृ ३५ वाचतात.) एकाद्या मनुष्याच्या मनांत काय आहे त ओळखण्याचा मार्ग ह्मटला ह्मणजे त्याने लिहिलेले लेख वाचणें आणि त्यानें केलेली भाषणें ऐकणे हा होय, असे आपणांस दिसून येईल. मी अमुक ह्मटलें अगर लिहिलेले, परंतु त्याचा अर्थ अमुक नव्हता असें एकादा मनुष्य सांगेल. परंतु आपले ह्मणणें सिद्ध करण्यास त्याच्याजवळ पुरावा नसेल तर त्याच्या ह्मणण्याकडे लक्ष न देतां त्याच्यावर आरोप शाबीत ठेवावा हा रोखठोक मार्ग होय, असे जीफ. ज. सर लॅारेन्स जेनकिन्स यांचे मत आहे. लोकांना सरकारच्या कृत्यांवर सभांमधील भाषणात अथवा वर्तमानपत्रांतील लेखांत टीका करण्याचा अधिकार नाही, असे कोणी ह्मटले होतें कायद्याचे बंधन इतकेंच की, या स्वातंत्र्याचा वाटेल तसा उपयोग कोणी करूं नये. तुह्मी वाटेल तितकी कडक भाषा योजा; परंतु सरकारविरुद्ध लोकांच्या मनांत द्वेष किंवा तिरस्कार उत्पन्न करतां कामा नये, अगर उत्पन्न करण्याचा प्रयत्नही करतां कामा नये. इतकी थोरली स्वतंत्रता केवळ कायद्यानेच नव्हे, तर न्यायाधीशांनी दिलेल्या निकालांनीही लोकांना मिळाली आहे, हे टिळकांना माहीत असले पाहिजे. यांतला एक निकाल तर प्रत्यक्ष त्यांच्या संबंधानेच होता. ब्रिटिश सरकार इंग्लंड देशांत संपत्ति नेण्याच्या उद्देशाने हिंदुस्थानच्या लोकाना लुबाडीत आहे, असे टिळकांनी लिहिलें होतें. स्वातंत्र्याच्या नांवाखाली असें लिहिण्याचा टिळकांना अधिकार नाहीं. वर्तमानपत्रांच्या स्वातंत्र्याचा सरकाराला शिव्या देण्याचे कामीं वाटेल तसा उपयोग करून घेण्यांत येत आहे. या स्वातंत्र्याला मर्यादाच नाही. सरकारला शिव्या देण्याचा हा एक आपल्याला परवानाच मिळाला आहे, असें त्यांना वाटतें. इतके असून हे लोक तक्रार करतात कीं, सांप्रतच्या सरकारच्या अमलांत वर्तमानपत्रांना स्वातंत्र्य मिळणें शक्य नाहीं. आरोपीचें ह्मणणें अगदींच विसंगत आहे. ते काय ह्मणतात तिकडे लक्ष द्या. वर्तमानपत्रांच्या स्वातंत्र्यावर दाब ठेवण्याचा अधिकार

सरकारला असतां कामा नये. हा अधिकार सरकारनें आपल्याकडे घेतला की, लगेच त्याला जुलमी सरकार ह्मटलेंच. शिवाय सरकारला अधिकार असला कीं, त्या सरकारच्या अमदानीत वर्तमानपत्रांना स्वातंत्र्य मिळणें शक्य नाही असा बोभाटा होतो. एकंदरीत काय की, आह्मांला असलें सरकारच नको, टिळकांच्या सगळया भाषणाचे हें ध्रुवपद आहे. विचार करा, यापेक्षां जास्ती भयंकर काय आहे ? आरोपीचा हेतु तुह्मी लेखांवरून ताडला पाहिजे; त्याचप्रमाणें लेखकाच्या भोंवतालीं असलेल्या परिस्थितीकडे तुह्मी लक्ष दिलें पाहिजे, हेंही मला कबूल आहे. लेखांत वापरलेल्या भाषेकडे लक्ष द्या; आणि यावरून काय निकाल करावयाचा तो करा. आरोपीनें उतारे वाचण्यांत घाई केली; आपल्या विरुद्ध येण्यासारखे मुद्दे होते, ते त्यानें गाळून टाकले; व भाषांतर करणाराच्या विरुद्ध तुमचें मन कलुषित करण्याचा प्रयत्न केला. ज. स्ट्राची व चीफ ज. सर चार्लस फयारन यांनी मागें निकाल दिलेले नीट पहा; कायद्याचा अर्थ जज्जानें ज्यूरीला सांगावयाचा व प्रत्यक्ष कोणता प्रकार घडला एवढें फक्त ज्यूरीनें ठरवावयाचें ही गोष्ट ध्यानांत आणा; पुराव्याच्या आक्टातल्या १०५ कलमाप्रमाणें आरोप शाबीत होत नाही हें सिद्ध करण्याची जबावदारी आरोपीवरच आहे. फिर्यादीपक्षावर टिळकांनी ही जबाबदारी टाकली आहे त्यात काही अर्थ नाही, याचाही तुह्मी विचार करा; १५३ अ व १२४ अ या दोन कलमांप्रमाणे दोन आरोप ठेवतां येत नाहींत, हें आरोपीचें ह्मणणें मतलबीपणाचें असून कार्डाचीही चाळवाचाळव व्यर्थ आहे, या सगळया गोष्टी ध्यानांत आणून तुह्मी योग्य निकाल द्या.

यानंतर **न्यायाधीशांनीं ज्यूरीस उद्देशून भाषण केलें.** त्यांत ते ह्मणाले:—या खटल्यांत आपले मत निश्चित करण्याचे कामी कोणचाही मनोविकार किंवा वाईट ग्रह किंवा कोणतीही बाहेरील माहिती यांचा पगडा तुह्मी आपल्या मनावर बसूं देऊं नका. आरोपीचा तुमच्यावर व तुमच्या निकालावर विश्वास आहे, हे ऐकून मला समाधान वाटतें. तुमच्यापुढें उभा असलेला आरोपी तुमचा एक प्रजाबंधु आहे, असेंच तुह्मी समजावें, असें माझें सांगणें आहे. आरोपीने ज्या ज्या गोष्टींचा विचार करण्यास तुह्मांस सांगितलें आहे त्याचा तुह्मी सहानुभूतिपूर्वक विचार करा आणि भीति किंवा भीड न धरतां आपला निकाल द्या. मात्र तुह्मांला एक गोष्ट बजावावयाची आहे ती ही की, या खटल्यांत सरकार फिर्यादी आहे, या गोष्टीला तुह्मीं भलतेंच महत्त्व देता कामा नये. सरकारास किंवा सरकारच्या कायद्यासंबंधीं जबाबदार अधिकाऱ्यांस कायद्याचे उल्लंघन झाले आहे असें वाटतें तेव्हां खटला करणें हें सरकारचें कर्तव्य आहे. आरोपीवर ठेवलेले आरोप सार्वजनिक अगर राजकीय स्वरूपाचे आहेत. या कलमांन्वयें पोकळ किंवा कलहमूलक खटले होऊं न देण्याची खबरदारी घेण्याकरितां सरकारच्या मंजुरीशिवाय असे खटले होऊं नयेत, असा

निर्बंध घालून वर्तमानपत्रकार, प्रकाशक व सार्वजनिक वक्ते यांचें संरक्षण कायद्यानें केलें आहे. येथें आपण कर्तव्य करावयास आलों आहों; व आपल्या सदसद्विवेक-बुद्धीला जागून आपलें काम सरळपणें व नीट केलें पाहिजे. न्यायाधीशाचीं कर्तव्यें क्रि. प्रो. कोडांत सांगितलीं आहेत, तीं सर्व सांगून मी आपला वेळ घेत नाहीं. न्यायाधीशानें आपल्या समारोपांत कोणत्याही वस्तुस्थितीच्या प्रश्नासंबंधानें किंवा वस्तुस्थिति व कायदा ह्यांच्या मिश्रप्रश्नासंबंधानें आपलें मत वाटल्यास सांगावें. नंतर ( क्रि. प्रो. को. चे २९९ क. वाचून दाखविलें ) ज्यूरींचे कर्तव्य काय हें त्यांनीं सांगितलें. माझें मत सांगण्याचा मला हक्क आहे. तुह्मांला दिशा दाखविण्याचा माझा हक्क आहे, परंतु आरोपीनें तुमच्यावर विश्वास टाकला आहे व सर्व खटल्याचा विचार सर्वस्वी तुमच्यावर सोपविला आहे. त्या जबाबदारींत मी भर घालीत आहे. १२४ अ व १५३अ या कलमांन्वयें आरोप असून आरोपीनें लिहिलेले लेख तुमच्यापुढें आहेतच. एकादा मनुष्य भाषणांनीं किंवा लेखांनीं किंवा उघड उपायांनी कांहीं विशेष गोष्टी करतो किंवा करण्याचा प्रयत्न करतो त्याचा प्रतिकार किंवा निवारण अशा दृष्टीनें ही कलमें समजलीं जातात कीं काय एवढेंच तुह्मांला पाहावयाचें आहे. इतकेंच नाहीं तर त्यानें कायद्यानें प्रस्थापित झालेल्या सरकाराबद्दल तिरस्कार किंवा द्वेष उत्पन्न करतां किंवा उत्पन्न करण्याचा प्रयत्न करतां कामा नये. तिरस्कार व द्वेष या शब्दांच्या व्याख्या केल्या पाहिजेत काय ? आपल्या सर्वांना मनोवृत्ति आहेत तेव्हां त्यांजवरून सहजी ताडतां येईल. ' अप्रीति ' हा एक विशेष शब्द आहे. तो परस्पर दोन माणसांबद्दल वापरीत नाहींत; तो राजा व प्रजा ह्यांच्याबद्दल जास्त वापरण्यांत येतो. कलमास जोडलेले खुलासे तुह्मी नेहमी ध्यानांत ठेविले पाहिजेत. सरकारी ठराव व राज्यकारभाराचीं कृत्यें यांजवर केलेली टीका खुलाशानें या कलमाखाली येत नाहीं. मुद्रण–स्वातंत्र्य हा निःसंशय महत्वाचा हक्क आहे. पण कायद्यानें प्रस्थापित झालेल्या सरकाराविषयीं तिरस्कार किंवा द्वेष उत्पन्न कर-ण्याच्या कामीं त्याचा उपयोग करतां कामा नये. हेतूचा पुरावा लेखांतून काढतां येतो. ' वंगवासी ' च्या खटल्यांतील ज. सर क्रोमर पॅथेराम यांचा समारोप, १८९८ सालच्या अलहाबाद हायकोर्टांतील एका खटल्यांत सर जॉन एज यांनी दिलेलें मत, सर लॉरेन्स जेन्किन्स यांचा समारोप, यांतील कांहीं भाग वाचून दाखवितों ह्मणजे त्यावरून राजद्रोहाचा कायदा काय आहे याची तुह्मांला कल्पना येईल. प्रयत्न हा शब्द तुह्मी नेहमींच्याच अर्थानें घेतला पाहिजे. एकादा मनुष्य एकाद्या गोष्टीचा प्रयत्न करतो ती गोष्ट त्याच्या कृत्याचा स्वाभाविक परिणाम होय, हें जाणूनबुजून तो त्या गोष्टीचा प्रयत्न करतो असें समजलें पाहिजे; त्याला अपयश आलें, तर त्यानें प्रयत्न केला नाहीं ह्मणून नव्हे तर दुसऱ्या कांहीं कारणामुळें तसें झालें. त्याला यश मिळो न मिळो, कायद्याचें ह्मणणें असें आहे कीं, द्वेष किंवा तिरस्कार उत्पन्न

करण्याचा प्रयत्न होता कामा नये. आरोपीनें पंजाब लॉ. रिपोर्ट्स मधून तुह्मांला कांहीं भाग वाचून दाखविला; परंतु त्याचा शेवट तुह्मांस वाचून दाखविला नाहीं. त्या खटल्यांतील कुऱ्हाड घेऊन धावणारा आरोपी खुनाच्या आरोपांतून जरी सुटला तरी जबर दुखापतीचा प्रयत्न केल्याचा आरोप त्याच्यावर लागू झाला असें मला आढळून आलें. तसेंच या वेळीं इंग्लंडांतील कांहीं खटल्याचा निर्देश करण्यांत आला. पण हे खटले शेंकडो वर्षांपूर्वीचे निरनिराळ्या देशांतले असून त्यावेळीं परिस्थितिही अगदीं निराळी होती. आरोपीनें भाषांतराविषयीं तक्रार केलेली आहे. रा. जोशी यांनीं साक्ष देतांना त्यांच्या मनांत आरोपीविषयीं कोणताही पूर्वग्रह किंवा आकस नव्हता असें मला वाटतें व या तपासणीत त्यांनीं दाखविलेलें मराठी भाषेचे ज्ञान तर त्यांच्यासारख्या मराठी भाषेच्या व्यासंगी मनुष्याला भूषणास्पद असेंच होतें. शब्दांचीं भाषांतरें देण्यास ते तयार होते व त्यांचा कोश त्यांच्या हाताशीं होता. अधिकाऱ्यांना सरकारी भाषांतरेंच घेणें भाग आहे. तथापि, मनुष्यप्राणी हा चुकीस पात्र आहे आणि भाषांतरकारही एकादे वेळस चुकत असतील. दुसरीं भाषांतरें कोर्टापुढें आणण्याची आरोपीला पूर्ण मोकळीक आहे. आरोपीनें आपणास सर्व कांहीं सांगितलें आहे, त्याच्या सर्व दुरुस्त्या कबूल करा व त्यानें तुमच्या मनावर कदाचित् निराळा परिणाम होत असल्यास त्याचा फायदा आरोपीस अवश्य द्या. एकादा लेख वाचतांना त्याच्या शब्दप्रयोगाकडे आपण लक्ष देतों कां त्यांतील विचारांकडे पाहतों? भाषांतरें चुकीचीं आहेत असें तुह्मांस वाटल्यास आरोपीचीं भाषांतरें स्वीकारा आणि त्यांत दिसून येणारे विचार सरकारी भाषांतरांत दिसून येणाऱ्या विचारापेक्षां कांहीं निराळे होतात कीं काय हें पाहा. तसेंच परिस्थितीचाही विचार करा. (हेतु व उद्देश यासंबंधानें मेनच्या पुस्तकांतील उतारा वाचून दाखवितात). या लेखांत सरकाराविरुद्ध द्वेष, तिरस्कार व राजद्रोह उत्पन्न करण्याचा प्रयत्न झाला आहे की नाहीं याचा निर्णय करावयाचा आहे. आतां हें पुराव्यानें सिद्ध करणे शक्य आहे काय? आरोपीच्या बाजूचे शंभर लोक बोलाविले तर ते द्वेष किंवा तिरस्कार उत्पन्न न होतां उलट प्रीतिच उत्पन्न होते असें ह्मणतील; आणि दुसऱ्या बाजूचे शंभर लोक बोलावले तर ते द्वेष व तिरस्कार उत्पन्न होतो असे ह्मणतील. या बाबतींत खरी पारख ह्मटली ह्मणजे तुह्मीच लेखांचा विचार करून तुमच्या मनावर काय परिणाम होतो हेंच पाहिलें पाहिजे. हें पाहतांना पौर्वात्य विचार–पद्धति, भाषा–पद्धति, शब्दयोजना यांचाही विचार करून व सात्विक अर्थ लावून आरोपीनें कायद्याचें अतिक्रमण केलें आहे किंवा नाहीं याचा निकाल द्या. प्रजेनें सरकारावर प्रेम केलें पाहिजे किंवा प्रीति केलीच पाहिजे असें ह्मणण्याचा सरकारला हक्क नाहीं, ही गोष्ट आरोपीला अनुकूल ह्मणून लक्षांत ठेवली पाहिजे. एकाद्या मनुष्याच्या मनांत सरकाराबद्दल अत्यंत द्वेष किंवा पूर्ण राजद्रोह वागत असेल. परंतु त्यानें दुसऱ्याच्या मनांत ते

विचार उत्पन्न होतील अशा कोणत्याही रीतीनें तो व्यक्त करतां कामा नय. वाटल्यास हस्तलेख लिहावेत, ते खिशांत ठेवावेत किंवा घरीं ठेवावेत. पण ते लेखी किंवा तोंडी प्रसिद्ध करतां कामा नये. अर्थात् आपण स्वत:खेरीज आरोपीला दुसऱ्या कोणाशी कांहीं कर्तव्य नाही, हें तुह्मी ध्यानांत ठेविलेंच पाहिजे. लेख घाईघाईनें व ताबडतोब लिहिल्यामुळे कायद्यांत सांपडण्यासारखे आहेत असे जर आपणांस वाटेल तर आपण आरोपीला सवलत द्या. ही बसली घटका मेच्या १२ तारखेस सुरू झाली व बांबचे अत्याचार एप्रिलच्या अखेरीस घडले. ह्या गोष्टीनंतर पंधरवड्यानें लिहिलेले लेख बसल्या घटकेला लिहिलेले आहेत असें जर तुह्मांला वाटेल तर त्याचा तुह्मी खुशाल विचार करा. आरोपीनें दुसऱ्यांचे लेख पुरावा ह्मणून दाखल केले आहेत. पण 'कांही काळपर्यंत दुसरे कोणी राजद्रोही लेख लिहीत होते ह्मणून मीही राजद्रोही लेख लिहिले' अशा तऱ्हेची आरोपीची सबब चालणार नाहीं. बांब संबंधाचा विषय पाच सहा लेखांत चर्चेला घेतला आहे. त्याची चर्चा यथा-योग्य झाली आहे असे तुह्मांला वाटल्यास आरोपीला दोषमुक्त करा. बांब हें राजकीय चळवळीचे सदनशीर साधन आहे, असे प्रतिपादन करण्यास आरोपी तयार आहे काय? व तसा अर्थ त्या लेखांतून निघतो काय? असें असल्यास त्याच्या वाचकांचे मनावर काय परिणाम होईल हे तुह्मी ठरवावे. कॉन्स-र्वेटिव्ह, लिबरल, नॅशनल, वगैरे पक्ष आहेत त्याप्रमाणे बांब–पक्ष आहे. रा. जोशी यांनीं कांही पक्ष सांगितले; पण बांब–पक्ष सांगितला नाही. त्याचा उल्लेख प्रथम आपल्याला या लेखांत मिळाला. हा उल्लेख व तो करण्याची तऱ्हा यामुळे सरकाराविषयी द्वेष व तिरस्कार उत्पन्न होईल की नाही हे तुह्मी ठरवा. आरोपीनें कार्डासंबंधीं असा खुलासा केला आहे की, स्फोटक द्रव्यांच्या कायद्यावर टीका करण्याकरितां त्यावर लिहिलेली पुस्तकें वाचण्याचा त्याचा इरादा होता. हे खरें असेल. बांबच्या कृतीसंबंधाने हीं पुस्तके आहेत की काय हे आपणास माहीत नाहीं. जर बांबच्या कृतीशी त्यांचा कांहीं संबंध असता तर कार्डाला कांही तरी अर्थ होता. आरोपीच्या विरुद्ध तुमचा ग्रह करण्यासारखा हा पुरावा नाहीं. आरो-पीनें बांबची चर्चा केली आहे व स्फोटक द्रव्याच्या कायद्यासंबंधी कोणत्या तरी रूपानें चर्चा करण्याची त्याची इच्छा असेल. प्रत्येक आरोपाचा स्वतंत्र विचार करून स्वतंत्र निकाल शक्य असल्यास तो एकमताने द्या असे माझे तुह्मांस सांगणें आहे. तुमच्या अभिप्रायाप्रमाणें मला अंमलबजावणी करावी लागेल.

नंतर ज्यूरी रात्री ८ वाजून ३ मिनिटांनी एकांतांत गेली व ९ वाजून २० मिनि-टांनीं परत आली; व १२४ अ व १५३ अ या कलमाखालील आरोपासंबंधानें सात विरुद्ध दोन अशा मतांनी त्यांनीं आरोपीस दोषी ठरविलें; व ज्यूरीच्या अभिप्रायाला अनुसरून आपणास निकाल सांगितला पाहिजे ह्मणून मला आता शिक्षा दिल्या-शिवाय गत्यंतर नाहीं असें जज्जांनीं सांगितलें.

**टिळकांचे अखेरचे उद्गारः**—शिक्षा देण्यापूर्वी 'आणखी काय सांगावयाचें आहे काय?' असें जज्जांनीं टिळकांना विचारल्यावर टिळकांनीं अखेर असे उद्गार काढले:—

**"ज्यूरीनें कसाही निकाल दिला असला तरी मी पूर्ण निर्दोषी आहें अशीच माझी मनोदेवता मला अद्यापि सांगत आहे. सृष्टीच्या भवितव्यतेवर या कोर्टापेक्षां वरिष्ठ असलेल्या परमेश्वरी सत्तेचें प्रभुत्व असतें. माझ्या स्वातंत्र्यापेक्षां माझ्या हालअपेष्टांनींच मीं अंगीकृत केलेलें राष्ट्रकार्य अधिक भरभराटीस यावें असाही परमेश्वराचा संकेत असेल!"**

यानंतर जज्जांनी पहिल्या दोन आरोपांबद्दल टिळकांना तीन तीन वर्षे मिळून ६ वर्षे काळे पाणी व तिसऱ्या आरोपाबद्दल एक हजार रुपये दंड अशी शिक्षा सांगितली; व ॲ. जनरल यांनीं चवथा आरोप काढून घेतल्यावर त्या संबंधानें दोषमुक्त करण्यांत आलें.

याप्रमाणें खटला संपून टिळकांना ता. २२ जुलै रोजीं रात्रीं ९॥ वाजतां ज. दावर यांनीं शिक्षा दिली, व लगेच त्यांना मोटारमधून स्टेशनावर आणलें व तेथून स्पेशल गाडीनें साबरमतीच्या तुरुंगांत नेलें. या दिवशीं रात्रीं खटला संपण्यास इतका कां वेळ लागला ह्मणून चिंतातुर होऊन कांहीं तरी बातमी लागेल ह्मणून लोकांचे थवेच्या थवे हायकोर्टाच्या आजूबाजूस हिंडत होते; पण सुटकेसंबंधीं अखेर निराश होऊन ते अश्रु ढाळीत परत घरीं आले. शिक्षेची बातमी शहरांत हां हां ह्मणतां पसरली व दुसरे दिवशीं तर कित्येक विद्यार्थी शाळेंत गेले नाहींत; कांहीं दुकानें व कारखाने बंद होऊन शहरांत जिकडे तिकडे उदासीनता दिसूं लागली. भायखळा, परळ, वगैरे बाजूकडील बहुतेक गिरण्यांतील लोक ही वार्ता ऐकून कामावर गेले नाहींत. कांहीं गिरण्या बंद पडल्या; व त्यातील कामकरी व पोलिस यांच्या झटापटी झाल्या. लोक चवताळून जाऊन त्यांनीं बंदोबस्ताकरितां आलेल्या लष्करी लोकांवर दगडांचा वर्षाव चालविला. या वेळीं गोळ्या झाडण्यांत येऊन बरींच माणसें जखमी झालीं व कांहीं मेलीं. सट्टा बाजारासारखे कधींही बंद न होणारे बाजार बंद पडले; व दुःखातिरेकामुळें कांहीं लोक कामधंदा सोडन घरीं स्वस्थ बसले. शिक्षेची वार्ता मुंबईप्रमाणेंच इतर ठिकाणींही ताबडतोब पसरली व जिकडे तिकडे औदासिन्य व दुःख यांचा एकच देखावा दिसं लागला! कैक ठिकाणीं सहानुभूतिपर सभा भरल्या व टिळकांच्या कुटुंबाला सांत्वनपर शेंकडों तारा व संदेश

आले. या वेळीं कोणीं त्यांच्याबद्दल दुःखाचे ‘ उसासे ’ काढले तर कोणी देवाचा ‘धांवा’ केला; कोणी त्यांचे गुणानुवाद गाऊन त्यांना ‘ नमस्कार ’ केला, तर कोणी त्यांचे अखेरचे उद्गार पुढें ठेऊन त्यांवर काव्यें रचलीं; कोणी स्मारक ह्मणून ‘टिळकाश्रमा’ ची कल्पना काढली, तर कोणी ‘टिळक सांप्रदायी मठा’ची कल्पना काढली.* याप्रमाणें टिळकांबद्दल प्रीति, भक्ति, पूज्यबुद्धि, यांपैकीं जें जें ह्मणन दाखवितां येईल तें तें दाखवून या महापुरुषाबद्दल त्यांनीं कृतज्ञता व्यक्त केली. कित्येक दिवस कवींच्या, लेखकांच्या, वक्त्यांच्या व सार्वजनिक चळवळ करणारांच्या पुढें टिळकांची शिक्षा हा एकच महत्वाचा विषय होऊन बसला होता. शिक्षेनंतरच्या या सर्व चळवळींमुळें ह्मणा अगर सरकारास दया आली ह्मणून ह्मणा टिळकांची शिक्षा साधी करून त्यांचा दंड माफ केला; व मंडाले येथें चांगल्या रीतीनें ठेऊन त्यांना पुस्तकें वगैरे वाचूं देण्याचीही सवलत दिली. हल्लीं रा. रा. दादासाहेब खापर्डे यांनीं या खटल्यासंबंधीं अपील प्रीव्हि कौन्सिलमध्यें दाखल करण्याचा प्रयत्न चालविला असून त्याच्या निकालाकडे सर्वांचे डोळे लागून राहिले आहेत.

टिळकांना झालेली शिक्षा पाहून कित्येक हिंदी व विलायतेंतील पत्रकर्त्यांनीं व पुढारी गृहस्थांनीं त्यांच्यासंबंधानें किती सहानुभूति दाखविली व काय उद्गार काढले, हें पुढील उताऱ्यांवरून कळन यईल:—

“ रा. टिळक यांचें अनुपम धैर्य, विलक्षण करारीपणा व असाधारण बुद्धिमत्ता ही त्यांच्या कट्टया शत्रूच्याही मनांत त्यांच्याविषयीं आदरभाव उत्पन्न करतील. मग जे त्यांचे देशाभिमानी देशबंधू आहेत त्यांच्याविषयीं बोलावयासच नको. रा. टिळक हे केवळ राजकीय चळवळीमुळेंच प्रसिद्ध आहेत असे नाहीं. वेदादिक ग्रंथांचा अभ्यास, ज्योतिषगणितादि शास्त्रांतलि पारंगतता व कायद्याचें ज्ञान याविषयीं त्यांची चांगली प्रसिद्धि आहे. हे सर्व गुण त्यांच्या ठिकाणीं एकवटलेले असल्यामुळें ‘अधिकस्याधिकं फलम्’ या न्यायानें त्यांच्या कीर्तीमध्यें पुष्कळ भर

* शिक्षेसंबंधी केसरीतील ( १८।८।०८ ) ‘देशभक्ताचे उसासे’; मुमुक्षूंतील ( ३०।७।०८ ) ‘सत्यभामे ’चा ‘ धावा;’ राष्ट्रमतांतील ( ८।८।०८ ) ‘ नमस्कार त्या बाळ गंगाधराला’ या कविता; सरदार अजितसिंह यांनीं ‘ टिळकाश्रमा ’बद्दल राष्ट्रमतांतून ( २३।८।०८ ) सुचविलेली कल्पना, व बागलकोट येथें ‘ टिळक सांप्रदायी मठा ’ची स्थापना करण्याविषयींचे प्रयत्न ( राष्ट्रमत २७।८।०८ ), यासंबंधाची माहिती वाचकांनीं त्या त्या पत्राचे अंक मिळाल्यास अवश्य वाचून पाहावी.

पडलेली आहे. तसेंच त्यांचे खासगी आचरण निष्कलंक असल्यामुळेंही त्यांच्याविषयीच्या आदरबुद्धीला विशेष प्रकारचें स्वरूप प्राप्त झालेले आहे. हिंदुस्थानांतील राजकीय चळवळीमध्यें रा. टिळक यांची व्यक्ति ह्मणजे एक स्वतंत्र शक्तीच बनून गेलेली आहे.......राम वनवासाला गेला असतां अयोध्या जशी ओसाड दिसूं लागली, पांडव वनवासास गेल्यावर हस्तिनापुरीतील नागरिकांच्या मुखांवर जशी प्रेतकळा आली, त्याप्रमाणे आज मुंबापुरीची स्थिति झालेली आहे. रा. टिळकांस शिक्षा झालेली ऐकून प्रत्येकाच्या हृदयाला भयंकर धक्का बसला आहे. ज्याच्या त्याच्या तोंडांतून शोकोद्गार निघत आहेत. ज्याप्रमाणे एकाद्या कुटुंबांतला आवडता मनुष्य अंतरावा त्याप्रमाणे बळवंतरावजींच्या वियोगदुःखानें मुंबापुरीतील लोकांस वाटत आहे व त्यांची अंतःकरणे वज्रपाताने विदीर्ण झालेली आहेत. रा. टिळक यांस झालेली शिक्षा ह्मणजे राष्ट्रीय आपत्तिच होय, असे एकंदर देखाव्यावरून उघड दिसत आहे. "—**इंदुप्रकाश.**

* * * *

"केसरीवरील खटल्याचा भयंकर निकाल ऐकून ज्याच्या काळजास दुःखोद्वेगानें विद्युद्वेगाप्रमाणे धक्का बसला नाही, असा एक तरी मनुष्य महाराष्ट्रांत सांपडेल असें आह्मांस वाटत नाही. कोणी कोणत्याही मताचा किंवा पंथाचा असला तरी त्याला गुणवंताचे गुण घेण्यास यत्किंचितही दिक्कत वाटतां कामा नये....रा. टिळक यांस हिंदुस्थानदेश पारखा झाल्यामुळे महाराष्ट्रांतील कर्त्या पुरुषांत जी खिंड पडली आहे ती ते मुक्त होऊन पुनः परत येईपर्यंत दुसरा कोणी भरून काढूं शकेल असें आह्मांस वाटत नाही. प्रत्येक प्राप्त झालेल्या प्रसंगापासून जो धडा शिकवयाचा तो शिकणें व निधड्या छातीने पुनः न डगमगतां पुढचा मार्ग आक्रमित जाणें यांतच राष्ट्राचे कल्याण आहे, असे रा. टिळक यांनी आपल्या शेवटल्या सूत्रमय वाक्यांत सुचविले आहे. "—**ज्ञानप्रकाश.**

* * * *

"रा. टिळक यांच्यावरील खटल्याच्या चौकशीचा परिणाम अत्यंत हानिकारक आणि उद्वेगजनक झाला आहे. कुटुंबांतील एकादा प्रियकर आप्त सोडून गेल्यामुळें त्यांत जशी शोकाकुलता उत्पन्न होते, तशी अवस्था या प्रसंगी सर्व महाराष्ट्रांत होऊन गेली आहे....आपल्या देशाची आणि देशबांधवाची उन्नतावस्था व्हावी ह्मणून, आपल्या कल्पनेप्रमाणे उपाय चिंतून योजना करणारावर असा घोर प्रसंग येऊन त्यास सहा कष्टमय वर्षे कारागृहवास आणि जन्मभूमीचा, कदाचित् कायमचा, वियोग सोसण्याची पाळी यावी काय? त्याचा तो उत्साह, तो दीर्घ प्रयत्न, ती महत्वाकांक्षा, प्रत्येक अडथळ्यानें वृद्धि पावणारा तो दृढनिश्चय, ती तीक्ष्ण आणि विस्तीर्ण बुद्धिमत्ता, आणि तो आत्मसुखाविषयीं निरभिलाष, या सर्वांचा शेवट अशा

खेदकारक रीतीनें व्हावयाचा काय ? अशा प्रसंगीं शोकावेगानें चित्त भांबाऊन जाते आणि निष्ठावंताची निष्ठाही डळमळूं लागते.... हल्लींच्या खेदकारक प्रसंगांतून निभावून रा. टिळक आपल्या आप्तस्वकीयांचा आणि देशबांधवाचा विरह दूर करोत, आणि आजन्म केलेल्या कष्टानंतर श्रमपरिहारार्थ सुखाने कांहीं वर्षे तरी प्रियजनांच्या समागमांत घालवोत, अशी आमची प्रार्थना आहे. "—सुधारक.

* * * *

" लो. टिळक ही कांहीं सामान्य व्यक्ति नाहीं, सरकाराने लक्षांत ठेवावयास पाहिजे होतें. ही आमच्या राष्ट्राची विभूति आहे, आमच्या चळवळीचे उगमस्थान आहे, आमच्या धर्माचे मूळ कारण आहे. ही व्यक्ति स्वदेशीचा जन्म आहे, बहिष्काराचा जनक आहे आणि राष्ट्रीय शिक्षणाचा पालक आहे. आह्मां हिंदुस्थानांतील सर्व लोकांची ही व्यक्ति बुद्धि आहे, वैभव आहे आणि लौकिक आहे. आमच्या सर्वांचे सामर्थ्य, संपत्ति, आणि सैन्य या व्यक्तीमध्ये एकवटून राहिले आहे. ही व्यक्ति आमच्या आशेचा सूर्य आहे, निराशेचा काळ आहे. आम्ही आपल्या भावी उत्कर्षाचे प्रतिबिंब या व्यक्तीच्या आदर्शामध्ये पाहत असतों. व्यक्ति आमच्या हिंदुस्थानचा अलंकार आहे...हिंदुस्थाना! महाराष्ट्रा! आतां तुझे पुढे काय होणार? अथवा तूं पुढे काय कर्तव्य बजावणार? लो. टिळकांनीं सारखा चार दिवस जो कंठशोष केला तो तुझ्याकरितां! अथवा केवळ तुझ्याच करितां असे तरी कसें ह्मणतां येईल? ब्रिटिश न्यायदेवतेचा हिंदुस्थानांत आज दोन वर्षे छळ चालला आहे; त्या न्यायदेवतेचा खून होऊं नये ह्मणून त्यांनीं हा आटोकाट प्रयत्न केला? परंतु तिची वेळ आल्यामुळे अखेर बुधवारीं रात्रीं त्या न्यायदेवतेचा मुंबई हायकोर्टांत खून झालाच !"—काळ.

* * * *

" टिळकांसारखा राजकीय तपस्वी उभ्या हिंदुस्थानांत दुसरा कोणी नाहीं. टिळकांचा हरिश्चंद्राच्या तोलाचा सत्वधीरपणा, टिळकांची दगडाचे पाणी करून टाकणारी विलक्षण चिकाटी, टिळकांचा अद्भुत दृढनिश्चय आणि अनन्यसाधारण धैर्य, टिळकांचा प्रांजळ, परोपकारी, निष्कपट, निर्मळ स्वभाव आणि राष्ट्राची अव्यभिचारिणी भक्ति, इत्यादि दिव्य गुणांचा विचार मनांत आला ह्मणजे भरतभूमीच्या उद्धारार्थ परमेश्वरानें पाठविलेला हा एक महापुरुष आहे असे वाटते. "—मुमुक्षु.

* * * *

" The tone favoured by some of our Anglo-Indian contemporaries in reviewing the result of the Tilak trial is much to be regretted. With all the faults of a demagogue, Mr. Tilak is still a citizen and a scholar; and this may be the reason why he is not to undergo rigorous imprisonment. What-

ever one's differences, one cannot resist a thrill of compassion at this moment for the able and intrepid publicist......... Laboring under the dead weight of all possible adverse circumstances, Mr. Tilak presented his own case to the Jury in a manner which has evoked universal admiration in the country. Professional Advocates could not have put forth the case with an equal mastery of the subject, with equal forensic ability, intellectual force and moral fervour. He has by his powerful address vindicated the right, such as ought to exist, of the liberty of the Press in this country, for which all lovers of national progress ought to feel grateful to him. Mr. Tilak's dauntless courage in rising superior to his surroundings and subordinating self-interest to the country's cause, are the rare qualities of an ardent patriot. Mr. Tilak's remarkable address, though it has failed to convince the Jury and the Judge, has strengthened his hold on the minds of the people of this country as a steadfast, unflinching patriot, and a man of transcendant abilities. "—*Indian Spectator*.

" In a remarkable speech which occupied in delivery 21 hours and 10 minutes and which will ever remain a monument to his undoubted ability and a public record of his views on Indian politics....... Moderates and Extremists alike cannot help regarding it as fatal to the liberty of the press in India. With inflammatory and seditious writing no one, least of all those of us, who accept British as essential and indispensable to the well-being, happiness and progress of India, will have any sympathy. But it must be conceded that the Indian press should be given some measure of freedom in criticising the actions of the bureaucracy and in repelling the venomous attacks of a certain section of the Anglo-Indian press."-*Madras Standard*.

" We have differed from Mr. Tilak in many matters and on the vital points, but the calamity that has befallen him has grieved us beyond measure. His speech in self-defence in the state of health in which he was and his last brave and touching reply to the question why sentence should not be passed upon him showed the real man. It is inexpressibly sad that a man of his talents, energy and unflinching determination should find himself overwhelmed with such a misfortune from which Providence alone can save him in the present state of his health. "

—*The Gujarathi*.

" We are after all human and cannot press back our tears when high-souled patriotism is reported to be rewarded with a convict's fate in a penal settlement. Solemn thoughts may afterwards prevail, strength may afterwards come to pull up the sinking heart, but the keen anguish of the hour when the stunning news of a great patriot's fate is flashed by the wire for time, is too real to be glossed over with the admonitions of proud philosophy,......We all have not the stuff of Tilak in us and cannot

but indulge in this human frailty. But the hero has himself left us a spell to secure us against the effect of this fearful act of persecution. The brilliant address to the jury which will for ever enrich our patriotic literature was not ment for his own defence but only to put heart into his countrymen. Where is the Indian, nay, the cultured being who, after reading his address to the Jury and watching his conduct in the dock can help exclaming, " here was a man, take him for all in all we shall not look upon his like again. "...... Go, Tilak, wherever you may be sent to crush your body. Your example will hover around us all

[illegible]

months ago that Mr. Tilak was invited by the Governor to inspect the plague research laboratory. To-day Mr. Tilak is an exile in a foreign country, alone and friendless. Only his indomitable spirit is with him. Moderate or extremist, the news will shock all."
—*Reis and Rayyat.*

" His fervent Patriotism brought on him a sentence which, in the words even of the *Pioneer*, is too heavy for a Patriot of 55 years of age....... The news of the punishment inflicted on Mr. Tilak spread from house to house on the morning of the 23rd instant and cast a gloom all over the City. A kind universal sympathy is felf for Mr. Tilak by all—the young, and the old, the learned and the ignorant."—*The Mysore Herald.*

" The arrest of Mr. Bal Gangadhar Tilak the Nationalist leader, of Poona, is by far the most serious and sensational step so far taken by the Government of India in the campaign against sedition. It would be impossible to exaggerate its significance. Mr. Tilak is a Mahratta Brahmin of remarkable ability and of unique standing among his countrymen. He has a personal following larger and more devoted than any other popular leader in India commands. This is not his first experience of a sedition charge.......His is the astutest brain so far placed at the service of the Nationalist cause. He edits two weekly newspapers—the " Mahratta" in English and "Kesari" in the vernacular. Both

have for years waged uncompromising warfare against the administration, though the "Kesari has been more down right in policy and expression than the "Mahratta." Sir George Sydenham Clarke, in deciding upon the arrest of Mr. Tilak has doubtless realised that the Government could not consistently prosecute the smaller fry without striking at the most powerful revolutionary in country, a man by comparison with whom such persons as Bepin Chandra Pal and even Lajpat Rai are inconsiderable."

—*The Manchester Guardian.*

"He has been supported in all his trials and tribulations by the faith that the work he has to do is sacred and that the blessing of God is upon it. Trust in mere earthly instruments and resources cannot inspire a man with the fine moral fervour which is discernible in Sj. Tilak's public utterances. He dose not look upon politics as a mere game of chance or as the art of haggling for a bargain between two countries. He believes in the future destiny of his country and feels that the Power that guides and controls the Universe is devising means and methods for the speedy realisation of that destiny. And let all workers in the country's cause remember the lesson conveyed in Sj. Tilak's pregnant words...If we put our shoulders to the wheel in the spirit of earnest apostles of the religion of Patriotism, we must succeed in the end even though dangers and difficulties may sorely try our faith and mock our enthusiasm. Politics in India have been regarded as mere matters of administration, which are trivial in themselves and meaningless in so far as they are not brought under some general law of progress But Sj. Tilak has raised politics to the level of religion, he has shown that we are called to spend and be spent in great cause, which is indeed a Divine Dispensation for this nation at the time of her greatest need. Let us cast out all fear of the deities of clay whom the world adores; and let us obey the voice of our conscience, which calls us to go forth and sacrifice ourselves for the Motherland."—*Punjabee.*

"An Anglo-Indian correspondent writes:—No step which the India Government could have taken in the present campaign against sedition could for a moment compare with the arrest of Mr. Tilak, the ablest, subtlest and most powerful popular leader in the county. Since his condemnation for sedition eleven years ago, Tilak has been the high-priest of the extremist Nationalism. His creed is taught chiefly in his two papers — the "Mahratta" (English) and the "Kesari," a vernacular weekly. It will be noted that, according to Reuter's summary, the article on which the charge of sedition is based, contains no incitement to violence. The question suggests itself; " If this is the worst that Mr. Tilak has written since the bomb-outrages (which he condemned )has the Government of Bombay not made a grave mistake in committing itself to an action calculated to arouse an unprecedented storm?" —*The Daily News.*

" Mr Tilak remained at the moment of his conviction the most conspicuous politician in India and among large sections of the people he was enjoyed a popularity and wielded an influence that no other public man in the Dependancy could claim to equal. "—*The London Times.*

" We do not know if the trial and sentence will be described in any quarter as a triumphant illustration of the imparatiality of British Justice. It certainly does not strike us in that light and those who have set the engine of the law in motion after this fashion may rest assured, that they have dealt a staggering blow, to the cause of constitutional reform in the Western Presidency. "

—*India.*

" The closing of the markets is perhaps of graver import than the riots, as it serves to show that the feeling of the largest and wealthiest, if not also the most intelligent and enterprising community of Indian merchants and financiers, is on the side of Mr. Tilak....... The feeling is certainly proof of the supreme popularity of the man. "—*The Scotsman.*

" Prior to his arrest, Mr. Tilak was but the leader of a party. He is now a national martyr and a popular hero. "

—*H. E. A. Cotton in the New Age.*

" I defy any one to point to a sentence in Mr. Tilak's articles which incites to bomb-throwing or violence; and I cannot understand how Englishmen, who have always supported peoples struggling for freedom in other countries, and are doing so to-day in regard to Russians or Turks can resort to such measures of repression as those which Lord Morley and Lord Minto, both nominally liberals, are applying in India. "

—*H. M. Hyndman in the London Times.*

" There is no man in India who has such a hold upon the working class as Mr. Tilak, and the result of his conviction will be more far reaching than that of any single individual which has yet taken place. His life-history has been a record which makes him out as one of those men of whom most nations are proud. His standing in literature is on a par with that of Tchaikovsky, the Russian who is in prison without trial in Russia, or with our own Alfred Russel Wallace, in science. The conclusion I formed concerning him was that his temperament had been soured by long, weary years of disappointed waiting, but that whilst he advocated extreme measuaes of agitation he would be satisfied with moderate reforms provided they were genuine and indicated a real desire to improve the condition of India. "—*Keir Hardie in the Labour Leader.*

असो; या खटल्यासंबंधानें सूक्ष्म रीतीनें विचार केला ह्मणजे टिळकांनीं राष्ट्राची अनेक दृष्टीनें या वेळीं कामगिरी बजाविली असें दिसून येईल. अँग्लो–इंडियन पत्रें हिंदी लोकांची प्रसंगविशेषीं कशी व किती नालस्ती करतात, हें भरकोर्टांत अनेक दाखले देऊन त्यांनीं सिद्ध केलें; व मुद्रणस्वातंत्र्याचें हिंदुस्थानांत कशा रीतीनें रक्षण केलें पाहिजे हेंही निस्पृहपणें त्यांनीं सांगितलें. हा खटला राजकीय असून त्यांत चालू राजकीय चळवळींचा संबंध असल्यामुळें हिंदुस्थानची राज्यव्यवस्था कोणत्या प्रकारानें चालली आहे, त्यांत काय दोष आहेत, व ते कोणत्या रीतीनें सुधारले पाहिजेत, याचें त्यांनीं उद्‌घाटण करणें जरूर होतें; व एका वजनदार पत्राचे संपादक आणि लोकांचे पुढारी या दृष्टीनें पाहिलें ह्मणजें हें कर्तव्य त्यांनीं अत्यंत चोखपणें बजाविलें, असें ह्मटलें पाहिजे. राजद्रोहाच्या कलमाची विचक्षणा करून प्रयत्न, हेतु, उद्देश, वगैरे कायद्यांतील कित्येक शब्दांची त्यांनीं जी फोड केली व ज्यूरीची रचना, ज्यूरीचीं कर्तव्यें, इंग्लंडांतील राजद्रोहाचा कायदा, व हिंदुस्थानांतील राजद्रोहाचा कायदा, राजद्रोहाच्या कलमास जोडलेले खुलासे, पुराव्याचा बोजा, इत्यादि कायद्यांतील अनेक गोष्टींचें त्यांनीं जें विवरण केलें, त्यानें त्यांची कायद्यांतील प्रवीणता स्पष्ट रीतीनें दिसून येते. शिक्षा सांगण्यापूर्वी त्यांनीं शेवटचे काढलेले उद्गार तर खऱ्या देशभक्तास साजेसे असून राष्ट्रहिताकरितां झटणाऱ्या प्रत्येक देशबंधूनें ते आपल्या हृत्पटलावर कोरून ठेवण्यासारखे आहेत. अशा विद्वान्, थोर व सन्मान्य देशभक्तास शिक्षा झालेली पाहून वरीलप्रमाणें देशी व विदेशी अनेक पत्रकर्त्यांनीं व थोर गृहस्थांनीं हळहळ प्रगट करावी, हें साहाजिकच आहे. लोकांची ही कळकळ व सहानुभूति टिळक यांना कारागृहवासाचें दुःख सहन करून सुखरूपपणें परत येण्यास कारणीभूत होवो, एवढीच परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

## स्वभाव.

टिळक यांचा मूळचा स्वभाव तापट आहे. पण पारा जसा अनेक रासायनिक द्रव्यांनीं मारून टाकून त्याचें भस्म करितात, तद्वत् विचार, वाचन व अनुभव, यांनीं तापट वृत्तीला मारून टाकून ती शांत केली आहे. मारलेला पारा उत्तम औषध बनून जसें कार्य करतो, तद्वत् शांत केलेल्या

यांच्या तापट वृत्तीनेंच त्यांच्या हातून अनेक सत्कृत्यें घडविलीं आहेत. तापट वृत्तीस कोणी कोणी वाईट ह्मणतात; व नुसती तीच मनुष्यांत असेल तर वाईटही आहे. पण सारासार–विचार, मनन वगैरेंची छाप तिच्यावर असून त्यांच्या तंत्रानें ती चालणारी असेल, तर त्यांत कांहीं गैर नाहीं. उलट, ती नसेल तर मनुष्याच्या हातून जीं अनेक महत्वाकांक्षेचीं कामें होतात, तीं कधीं होतींना असें माझें मत आहे. वाफ जशी बॉयलरांत कोंडून ठेऊन तिचा एंजिन चालविण्याकडे किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या चांगल्या कामाकडे उपयोग करतात, तद्वत् विचारशक्तीच्या दडपणाखालीं आपल्या तापट वृत्तीस ठेऊन तिच्या जोरावर त्यांनीं आजपर्यंत अनेक कामें उठविली आहेत.

अशा प्रकारच्या शांतवृत्तीस त्यांच्या मोकळ्या मनाची जोड चांगली मिळाली आहे. हे केव्हां केव्हां दुसऱ्यावर रागावतात; पण थोडा वेळ गेला न गेला तोंच रागावल्याचें त्यांच्या गांवींही नसतें. या त्यांच्या मोकळ्या मनामुळें आपली योग्यता नसतांही प्रसंगविशेषीं एकाद्या महत्वाच्या विषयासंबंधानें त्यांना प्रश्न करण्याचा किंवा एकादा विचार सुचविण्याचा मला धीर येई; व माझ्या प्रश्नाचें उत्तर देऊन विचार योग्य वाटल्यास त्याचाही ते स्वीकार करीत. इतके जरी ते मोकळ्या मनाचे आहेत, तरी विद्वत्ता व करारीपणा यांचें त्यांच्या तोंडावर असें कांहीं विलक्षण तेज आहे कीं, माझ्यासारख्या नेहमींच्या सहवासांतल्या मनुष्यासही त्यांच्यापुढें हवें तसें बोलण्याचा धाक वाटे; एवढेंच नव्हे, तर त्यांच्या कुटुंबांतील मुलेंमाणसेंसुद्धां नेहमीं त्यांच्यापुढें भीत भीत बोलत. हे जसे मोकळ्या मनाचे आहेत तसेच विनोदी आहेत. पण परिचित मनुष्याशिवाय त्यांच्या विनोदाचा अनुभव फारसा कोणास येत नसे. यांच्या आनंदी वृत्तीचीं व विनोदाची चार दोन उदाहरणें येथें दिल्यास अप्रासंगिक होणार नाहींत, ह्मणून तीं देतों. बाबामहाराजांच्या इस्टेटी संबंधाच खटला संपावयाचे वेळीं आपल्यातर्फे मि. क्लेमंट्स यांच्या कोर्टांत रा. रा. दादासाहेब करंदीकर यांनीं जो डिफेन्स दिला त्याचा गोषवारा केसरीकरितां मराठींत सांगत असतां वरचेवर ' ताईमहाराज ' हा शब्द येऊं लागला. त्या वेळीं हांसून ते ह्मणाले कीं, " महाराजांना आमच्या येथें जागा नाहीं; सबब ' म ' घालून पूर्णविराम दे ह्मणजे झालें." १९०३

सालच्या डिसेंबर महिन्यांत हर्बर्ट स्पेन्सरवरील अग्रलेख सांगत असतां त्यांच्या डोकीची अस्मानी रंगाची वाटोळी टोपी कोठें पडली होती. ती शोधली तरी लवकर सांपडेना. दिवस थंडीचे व खिडक्या उघड्या असल्यामुळें पश्चिमेकडचें गार वारें सुटून डोक्यास झोंबत होतें. त्या वेळीं ते ह्मणाले:—" अरे, टोपी कुठें पडली ? गार वारें लागतें; डोकें थंड झाल्यावर मग लिहावयाचें काय ? " याच सालांत एकदां वासुदेवराव जोशी यांनीं त्यांचेकरतां जपानांतून पाठवून दिलेला रेशमी कोट घेऊन वासुदेवरावांचे पुतणे रा. रा. शंकरराव हे चित्रशाळेंतून आले. कोटाच्या पाठीवर टिळक यांचें सबंध नांव घातलें होतें. तें पाहून टिळक थट्टेनें ह्मणाले:—" हें खासें आहे ! पोरें पाठीस लागावयास कांहीं हरकत नाहीं. स्टेशन—मास्तर, टिकिट—कलेक्टर हीं जशीं नांवें असतात, तशांतलेंच हें झालें ! " मि. क्लेमंट्सच्या निकालाचे आधले दिवशीं आह्मी लिहीत बसलों असतां त्यांचे एक स्नेही तेथें आले आणि ते ह्मणाले:—'काय बळवंतराव ? उद्यां सुटतां कीं नाहीं ? इतके दिवस मार तक्रारीवर तक्रारी केल्या, आतां उद्यां काय तक्रार करणार ? ' हें ऐकून टिळक यांनीं उत्तर केलें:— ' अहो, नाहीं सोडलें तर अपील करावयाचें, जामिनावर सोडा ह्मणावयाचें, ही आमची तक्रार आहेच; आणि सोडूनच दिलें, तर आमची कांहींच तक्रार नाहीं ! ' एकदां १९०४ च्या फेब्रुवारी महिन्यांत केसरी जेथें छापला जात असे, त्या ' आर्यभूषण ' छापखान्याचे मालक रा. रा. हरिपंत गोखले आणि त्यांचे एक दोन स्नेही आमच्या लिहिण्याच्या खोलींत येऊन बसले होते. त्या वेळीं केसरीची बाहेरची बाजू छापून झाल्यावर ती पाहण्याकरितां तेथें पाठविली होती व आंतील मजकूर सांगण्याचें काम चाललें होतें. हरिपंतांनीं छापलेली बाजू वाचण्यास जेव्हां सुरवात केली, तेव्हां ते ह्मणाले:—" अहो, इतक्यांत पत्र काय ह्मणून वाचतां ? असें वाचणें ह्मणजे स्वयंपाक करतां करतांच खाणें आहे ! " बाबामहाराजांच्या इस्टेटीसंबंधाच्या खटल्याचें काम चाललें असतां मधून मधून " मला अमक्याविषयीं सल्ला द्या, माझें कागदपत्र पहा. " असें ह्मणून रोज कोणी ना कोणी तरी त्यांच्याकडे येत असे. एके वेळीं हे अशा एका गृहस्थाचा मला अर्ज सांगत होते व मी तो लिहीत होतों. इतक्यांत त्यांचे एक स्नेही तेथें आले आणि ह्मणाले:—" बळवंतराव, आतांही लोकांचे अर्ज तुह्मी

लिहीतच आहां ! या वेळीं सुद्धां तुमच्याकडून काम करवून घेतल्या-शिवाय तुह्मांला सोडीत नाहींत ?" यावर टिळक थोडे हांसले आणि ह्मणाले:—"अहो, हें असेंच चालावयाचें. चिता पेटली तरी आमची विडी पेटलीच पाहिजे, असें ह्मणणारे कांहीं असतातच !"

यांचा स्वभाव कांहीं अंशीं भिडस्तही आहे. पण हा भिडस्तपणा सार्वजनिक वर्तनापेक्षां खासगी वर्तनांत जास्त दिसून येई; व त्यामुळें केव्हां केव्हां गृहकृत्यांत किंवा स्वतःच्या संस्थेंत कित्येक अडचणी उत्पन्न होत. हा भिडस्तपणा त्यांचे अंगी नसता तर कित्येक आपमतलबी व उपद्व्यापी लोकांना फावून त्यांनीं वेळोवेळीं जो त्यांना त्रास दिला, तो दिला नसता; व अशा लोकांवर भिस्त ठेवल्यानें क्वचित् प्रसंगीं तोंडघशी पडण्याची जी त्यांना पाळी आली तीही आली नसती.

## वर्तन.

वर्तनांत दोन भेद केले पाहिजेत. एक खासगी वर्तन; व दुसरें सार्वजनिक अथवा लौकिक वर्तन. कुटुंबांतील माणसांशीं ममतेने वागणें व त्यांची योग्य काळजी घेणें, मुलांचें संगोपन करून त्यांना शिक्षण देणें व सन्मार्गास लावणें, एकपत्नीव्रत पाळणें, व कोणत्याही व्यसनापासून अलिप्त राहणें, इत्यादि खासगी वर्तनाचीं जीं अंगें आहेत तीं यांनीं चोख राखलीं असल्यामुळें यांच्या वर्तनाचें वजन त्यांच्या कुटुंबांतील माणसांवरच नव्हे तर, त्यांच्याशीं संबंध असणाऱ्या हरएक माणसावर आहे; एवढेंच नव्हे तर, अशा प्रकारचें सद्वर्तन ही एक प्रचंड शक्ति असल्यामुळें पर्यायानें तिचा लौकिक वर्तनाकडेही उपयोग होतो. यांचें लौकिक अथवा सार्वजनिक वर्तन तर चोख असून तें अनेक वेळां कसासही लागलें आहे. थोर पुरुष ह्या राष्ट्राच्या नाड्या आहेत. तेव्हां त्यांतील रक्त जितकें शुद्ध आणि निर्मळ असेल त्या मानानें राष्ट्राचें आयुष्य वृद्धिंगत होऊन त्याची भरभराट होत असते. टिळक यांच्या राष्ट्रीय वर्तनाचीं मुख्य अंगें ह्मटलीं ह्मणजे प्रामाणिकपणा, परोपकार, लोकहितार्थ झीज सोसण्याची तत्परता व देशाबद्दल कळकळ हीं होत; व आपल्या करणीनें हीं अंगें त्यांनीं किती दृढ केलीं आहेत याचा लोकांस वेळोवेळीं अनुभव आलाच आहे. कोणी कोणी देशहिताची कळकळ व सद्वर्तन यांचा कांहीं संबंध नसून

तीं भिन्न आहेत असें मानतात. पण मद्रासच्या ‘ हिंदू ’ पत्रानें एका लेखांत म्हटल्याप्रमाणें तीं एक असून जेथें देशहिताची कळकळ आहे तेथें सद्वर्तनाला मुळींच वाण नाहीं असें म्हटलें पाहिजे. देशाविषयीं खरी कळकळ म्हणजे कांहीं अंशीं स्वार्थाची विस्मृति व स्वाभिमान आणि देशाभिमानपूर्वक आपल्यावरील जबाबदारीची चाड बाळगणें असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं;* व ह्या गोष्टी समजून जो आपलें कर्तव्य नीटपणें बजावतो त्यानेंच लौकिक सद्वर्तन पाळलें असें म्हटलें पाहिजे. बरवे–प्रकरण, सत्याण्णव सालचें राजद्रोहाचें काहूर, बाबा महाराजांच्या इस्टेटीसंबंधाच्या प्रकरणांत सरकारानें घातलेला घोंटाळा, व १९०८ चा राजद्रोहाचा भयंकर खटला, हीं चार संकटेंच कांही लहानसान नाहींत. अशा वेळीं धैर्य धरून व शांत चित्त राखून त्यांनीं देशहिताची कळकळ कायम ठेविली, तेव्हां त्यांच्या सार्वजनिक सद्वर्तनाचा कस पाहण्यास आणखी कांहीं पुरावा पाहिजे, असें मला वाटत नाहीं. लोकांनीं आपलीं भांडणें यांच्यापुढें आणून न्याय तोडणें, कोणी आपल्या इस्टेटीची व्यवस्था करीत असतां यांच्या परोक्ष यांना ट्रस्टी नेमणें, सार्वजनिक कामाकरतां हजारों रुपये विश्वासानें यांच्या स्वाधीन करणें अथवा स्वयंसेवकांची फौज उभी करणें, इत्यादि हरहमेश घडणाऱ्या गोष्टी यांच्या सार्वजनिक सद्वर्तनाच्या सत्तेचीच साक्ष पटवितात. आतां, प्रसंग–विशेषीं केव्हां यांना युक्ती योजावी लागली आहे, केव्हां कडक भाषा वापरावी लागली आहे, व केव्हां तिखट उपदेश करावा लागला आहे. पण हें सर्व केवळ त्यांनीं लोकहितार्थच केलें आहे; व खऱ्या पत्रकर्त्याचें अगर पुढाऱ्याचें हें कर्तव्यही आहे.

## गुण.

टिळक यांच्या अंगीं जे गुण आहेत त्यांत धैर्य हा मुख्य गुण आहे. नेहमींच्या व्यवहारांत येणाऱ्या अडचणींला न जुमानतां हे आपला आयुष्यक्रम सुखासमाधानानें चालवीतच असतात; पण प्रासंगिक अडचण

* “ Where there exists real public spirit, there can be no lack of character. Genuine public spirit means a certain amount of altruism, of forgetfulness of selfish, and a sense of responsibility combined with keen sense of honour both on one's own account and on account of one's country.”—*Hindu*, June-10-1903.

केवढीही मोठी असो, त्यांचें धैर्य त्यांतसुद्धां त्यांस कधीं दगा देत नाहीं; एवढेंच नव्हे, तर आजपर्यंत आलेल्या अशा अडचणींशीं निधड्या छातीनें भिडून त्यांस त्यांनीं जिकलें आहे. सामान्य मनुष्याला मोठी अडचण आली ह्मणजे त्याला तें जिवावरचें संकट वाटतें; पण ज्याला जिवाचीही भीति नाहीं, त्याला मोठी अडचण तरी काय करणार ? बाबामहाराजांच्या इस्टेटीसंबंधानें उद्भवलेला खटला, १९०८ चा राजद्रोहाचा खटला व त्यांच्या वडील चिरंजीवाचा मृत्यु, हे प्रसंग गेल्या आठ सालांतील प्रसंगांत भयंकर होते. उलट, उतार वय व शक्ति क्षीण होत चालली असतां असले प्रसंग त्यांच्यावर येणें ह्मणजे मोठेंच भयंकर समजलें पाहिजे. तारुण्याची धमक कांहीं निराळी असते. त्या वेळीं 'कांहीं होवो, ही अडचण हां ह्मणतां उडवून देईन' असें अनुष्यास वाटत असतें. पण तेंच उतारवय व शक्ति क्षीण झाल्यावर मनुष्य थोडा तरी चाचपटावयास लागतो. पण ही सामान्य मनुष्याची गोष्ट झाली. थोर मनुष्याची गोष्ट याहून अगदीं भिन्न आहे. त्याची शारीरिक शक्ति ज्या मानानें क्षीण होत जाते त्या मानानें मानसिक धैर्य वाढत जातें, किंबहुना उतार-वयांत धैर्याला एक प्रकारचा जूनपणा येतो, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तारुण्यांतील धैर्यास शक्तीचें पाठबळ असतें ह्मणून त्याची धमक उतार-वयांत राहत नाहीं ही गोष्ट जरी खरी आहे, तरी उतार-वयांत धैर्यास विचार व अनुभव यांचें साहाय्य मिळत असल्यामुळें त्याची तेजस्विता अशी कांहीं विलक्षण असते कीं, अडचणीला त्याचें नुसतें दर्शनही घेववत नाहीं. अशा प्रकारचें धैर्य टिळक यांच्यामध्यें बाणून गेल्यामुळें ताई महाराजासंबंधीं खटल्याचें संकट त्यांना कांहींच वाटलें नाहीं; व चिरंजीवांच्या मृत्यूचें दुःख तर त्यांनीं हां हां ह्मणतां आपल्या हृदयांत गाडून टाकलें ! या खटल्याच्या प्रसंगीं त्यांच्या अनेक हालचाली माझ्या पाहण्यांत आल्या; पण सत्याच्या जोरावर मनाचें पूर्ण समाधान ठेऊन त्यांनीं असें कांहीं विलक्षण धैर्य दाखविलें कीं, झंजावातानें जसें भूस उडवून द्यावें तसें आपल्या वाटेंतील लाखों अडचणी त्यांनीं भराभर उडवून दिल्या. या वेळीं कोणा नवख्या मनुष्यानें जरी त्यांना पाहिलें असतें तरी अंगावर खटला आल्याचें यत्किंचितूही चिन्ह त्यांचे तोंडावर दिसलें नसतें. कागद पाहणें, मुद्दे काढणें, पुरावा तयार करणें, वगैरे खटल्यासंबंधीं अनेक

तजविजी त्यांना कराव्या लागत होत्या; व त्यांत त्यांचा बराच वेळही जात असे; पण बाकीच्या वेळांत त्यांनीं नित्याचे व्यवसाय सोडले, असें कधींही माझे पाहण्यांत आलें नाहीं. वेळ सांपडला कीं, मुलांना शिकवीतच असत; कोणी भेटावयास आला, तर त्याची भेट घेतच; संभाषण व वादविवाद तर चालू असेच; सल्लामसलतीस कधींच खळ पडला नाहीं; व शांत मनानें आणि एकाग्र चित्तानें वर्तमानपत्राचा मजकूर मधून मधून सांगतच असत. खटल्याच्या ऐन भरांतही शांत चित्त ठेऊन वर्तमानपत्राचा जो कित्येक वेळां त्यांनीं मजकूर सांगितला आहे, त्यांत पुढील प्रसंग आणीबाणीचा असून तो लोकांच्या मनावर चांगलाच ठसा उमटविणारा आहे. मि. क्लेमंट्स यांनीं आपल्या कोर्टांत युरोपियन पोलिस सुपरिंटेंडेंट, युरोपियन कान्स्टेबल्स, नेटिव पोलिस शिपायांची पार्टी व स्वार, यांची जय्यत तयारी ठेऊन टिळक यांस शिक्षा दिली. त्या दिवशीं शिक्षा सांगितल्यावर त्यांस दहा मिनिटेंही कोर्टांत राहूं दिलें नाहीं. लगेच मोठ्या बंदोबस्तानें त्यांना तुरुं-गांत पाठविण्यांत आलें. पुढें त्याच दिवशीं संध्याकाळीं डि. जज्ज मि. ल्यूकस यांजकडे अपील होऊन ते जामिनावर सुटून आले. वर्ष दीडवर्ष खटला चालून व सुटकेस अनुकूल असा पुरावा झाला असून अखेर त्याचा निकाल अशा रीतीनें लागलेला पाहून त्यांच्या चित्तांत केवढी खळबळ सुरू व्हावी व तो दिवस केवढ्या दुःखांत जावा? पण कांहीं नाहीं! दुःखाचा स्पर्शही न होऊं देतां त्यांनीं त्या दिवशीं रात्रीं नऊ वाजतां शांत व धिमेपणानें ठरावाचा एक कॉलमभर सारांश केसरीकरतां तोंडानें सांगितला! त्यांतल्या त्यांत हीही एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, या वेळीं कोर्टाचा ठराव पुढें नसून पांच दहा मिनिटांतच त्यांनीं कोर्टांत जें ऐकलें होतें व घरीं आल्यावर रा. रा. दादासाहेब करं-दीकर यांनीं ठराव वाचून येऊन जे मुद्दे सांगितले होते, तेवढ्यावरच स्मरणानें त्यांनीं तो मजकूर लिहून टाकला! ही एक केसरीच्या मजकु-राची गोष्ट झाली. तो आठवड्यांतून बहुधां एकदांच लिहिण्याचा प्रसंग येई. पण 'आर्यांचें मूलस्थान' या इंग्रजी ग्रंथाची तयारीही याच वेळीं चालली असून खटला दर घडीस जरी वर डोकें काढूं देत नसे तरी त्यांतल्या त्यांत जो वेळ मिळे तो या ग्रंथरचनेच्या कामीं ते लावीत असत;

यावरून अडचणींच्या चरकांतही मनाची एकाग्रता करण्याच धैर्य त्यांच्या अंगीं किती आहे, हें कोणासही कळून येईल. १९०८ च्या राजद्रोहाच्या खटल्यानें तर यांच्या धैर्याच्या कसाची पुरीच पारख केली! एकाएकीं पकडून अटकेंत ठेवले असतां व जामिनावर खुले नसून अटकेंत पुरावा गोळा करण्याचीं साधनें दुर्मिळ झाली असतां रात्रीं तेथल्या तेथेच कायद्याचीं व इतर पुस्तकें वाचून दिवसां हायकोर्टात एकसारखें भाषण करावयाचें व शेवटीं शिक्षा काय होईल व आपले किती हाल होतील याची कल्पनाही मनांत न आणतां "मी निर्दोषी आहें अशी माझी मनोदेवता मला सांगते; व माझ्या स्वातंत्र्यापेक्षां माझ्या हालअपेष्टांनींच मी अंगीकृत केलेलें राष्ट्रकार्य अधिक भरभराटीस यावें असाही परमेश्वराचा संकेत असेल," असें निधड्या छातीनें त्यांनीं कोर्टास बजाविलें यावरून त्यांच्या ठायीं किती विलक्षण धैर्य व शांति वास करीत आहे याची वाचकांनींच कल्पना करावी.

चिरंजीवांच्या मृत्यूच्या वेळीं तर त्यांच्या धैर्याच्या स्थैर्याची कमालच झाली. चिरंजीव प्लेगच्या वेदनेनें सारखे तळमळत असतां यत्किंचित्‌ही न भितां शांतपणानें जेवढी त्यांची शुश्रूषा करतां आली तेवढी त्यांनीं स्वतः केली, व शेवटीं अंत झाल्यावर त्यांनीं 'माणसानें प्रयत्नापेक्षां जास्त काय करावयाचें आहे?' असे ह्मणून स्मशानविधीपासून एकंदर उत्तरकार्यें निमूटपणें केलीं* ! या प्रसंगीं त्यांच्या धैर्याच्या ज्या कांहीं गोष्टी दिसून आल्या त्यांत पुढील गोष्ट नमूद केल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. वडील चिरंजीव विश्वनाथपंत हे वारल्यावर पुढें दोन तीन दिवसांनीं सोमवार आला. त्या दिवशीं झोंपडींतील सामानाची हालवाहलव करून संसर्ग होऊं नये ह्मणून विश्वनाथपंताचे कांहीं कपडे बाहेर उन्हांत काढून टाकले होते व कांहीं जाळून टाकले होते. खुर्च्या, पलंग, खाटा, पुस्तकें वगैरे सामानापैकीं कांहीं सामान झोंपडीबाहेर अव्यवस्थित रीतीनें पडलें होतें व कांहीं जव-

* टिळकांचे चिरंजीव विश्वनाथपंत हे वारले त्या वळीं त्यांनी एका स्नेह्याजवळ पुढील उद्गार काढले:— "आलेली स्थिति मुकाट्यानें सहन केली पाहिजे. प्लेगनें हल्लीं किती तरी मुलें मरत आहेत! त्यांत माझ्या दुःखाचा काय पत्ता? होळीकरतां शिमग्यांत घरोघर जशा गोवऱ्या गोळा करतात तशी माझ्या घरावर पाळी येऊन प्लेग—देवतेला मलाही एक गोवरी द्यावी लागली. त्याला काय इलाज?"

ळच्या झोंपडींत व तंबूंत टाकलें होतें. ज्या झोंपडींत विश्वनाथपंत वारले होते ती झोंपडी जाळून टाकण्याचें ठरलें असल्यामुळें अगदीं रिकामी केली होती; व या झोंपडी पुढच्याच झोंपडींत पलंग, खाटा वगैरे टाकून पोराबाळांची निजण्याबसण्याची सोय केली होती. जाळावयाच्या व या झोंपडींचें तोंड समोरासमोर होतें. या नुकतेंच सामान टाकलेल्या झोंपडीमागेंच दाहाबारा हातांच्या अंतरावर एक राहुटी ठोकली होती, व त्यांत टिळक यांचा पलंग टाकून त्यावर गादी व चादर पसरली होती. बायकामुलांपैकीं कोणाच्या कपाळास गंध नव्हतें कीं कुंकू नव्हतें. भांडींकुंडीं कांहीं जवळच्या स्वयंपाकाच्या झोंपडींत व कांहीं बाहेर टाकलीं होतीं; व जिकडे तिकडे अशौच व औदासिन्य यांचा देखावा दिसत होता. अशा स्थितींत तेथें कोणासही काम सुचलें नसतें. पण टिळक यांनीं त्या दिवशीं नेटिव संस्थानिकांशीं इंग्रज सरकारच्या झालेल्या तहनाम्याचीं व कराराचीं पुस्तकें आणवून तीं वाचलीं व केसरींतील ‘ श्री. महाराज होळकर यांचा राजीनामा मंजूर झाला, ’ हा अग्रलेख मला तोंडानें सांगितला. हा अग्रलेख लिहितांना विश्वनाथपंत यांच्याशीं माझा सहवास असल्यामुळें मला फार वाईट वाटून वरचेवर त्यांची मूर्ति माझ्या डोळ्यापुढें उभी राही, व नेहमींसारखा त्या दिवशीं माझा हातही जलद चालेना. ही माझी स्थिति झाली. पण टिळक यांची स्थिति याहून निराळीच होती. आपला मुलगा वारला आहे वगैरे कांहीं एक विचार त्यांच्या मनांत न येतां शांतपणानें पुस्तकें वाचून जितक्या जलद व गंभीरपणानें नेहमीं मजकूर सांगत, तितक्याच जलद व गंभीरपणानें त्या दिवशींही त्यांनीं मजकूर सांगितला ! पण याहीपेक्षां महत्वाची गोष्ट आहे ती पुढेंच आहे. हें लिहिण्याचें काम चाललें असतां आमच्या पुढच्या झोंपडींत त्यांचीं मुलें—माणसें येऊन राहिलीं होतीं. त्यांत बापूला ( त्यांच्या सर्वांत धाकटया मुलाला ) आला आहे अशी कुजबूज सुरू झाली; व रामभाऊ ( आतांचा थोरला पण त्या वेळचा मधला मुलगा ) ह्मणाला, ‘ मी दादांना सांगतों. ’ पण इकडे आमचें लिहिणें चाललें होतें, ह्मणून ‘ नको सांगूं ’ असें टिळक यांच्या कुटुंबानें ह्मटलें. हें सर्व भाषण मला स्पष्ट ऐकूं येत होतें व टिळक यांनाही तें ऐकूं आलें असेल. पण मजकूर सांगण्याकडे त्यांचें चित्त

गुंतल्यामुळें तिकडे लक्ष गेलें नसावें. मजकूर संपत आला होता; तेव्हां ताप आल्याची गोष्ट त्यांना मागाहून आपोआपच कळेल ह्मणून मीही बोललों नाहीं. पुढें मजकूर संपला आणि मी लेखणी खालीं ठेवली; इतक्यांत रामभाऊ ' बापूला ताप आला आहे, ' ह्मणून सांगत आला. झोंपडींत प्लेग झालेला, वडिल चिरंजीवास मरून नुकतेंच दोन तीन दिवस झालेले, संसर्गाचा परिणाम किती भयंकर आहे याचा नुकताच अनुभव आलेला, अशा स्थितींत रामभाऊचे शब्द कांनीं पडतांच घाबरून जाऊन बापूला पाहण्यास जाण्याची त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति व्हावी. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, यत्किंचित्‌ही न घाबरतां व घाई न करतां मी लिहिलेला सर्व मजकूर छापून त्याचीं प्रुफें आल्यावर पुन्हां तपासण्याचा त्रास पडूं नये व वेळ लागूं नये ह्मणून त्यांनीं वाचला, व त्यांत दुरुस्ती करून मग तो छापावयास पाठविला. या गोष्टीला निदान दहा मिनिटें तरी लागलीं असतील. पण अशा आणीबाणीच्या वेळीं एक सेकंदाचाही जेथें दम निघावयाचा नाहीं, तेथें स्वस्थ चित्तानें दहा मिनिटें काम करून मग ते बापूस पाहण्यास गेले हें कांहीं लहानसान धैर्य नव्हे ! अशाच प्रकारच्या धैर्याचीं उदाहरणें दोन तीन सालांपूर्वींही घडून आलीं असून त्यांचें एका माहितगार बातमीदारानें साताराच्या ' प्रतोद ' पत्राच्या ता. १८।९।०६ च्या अंकांत जें वर्णन केलें आहे तेंच येथें देतों. तो ह्मणतोः—" परमेश्वरानें यांच्या धैर्याची परीक्षा करण्याकरितांच कीं काय कोण जाणें, कालच्या रायगडच्या स्वारीच्या वेळीं ज्या चिरंजिवाकडून पित्याच्या धैर्याची उजळणी करून पाहविली त्याच चिरंजिवाकडून येवल्यास जाण्याचे वेळीं असें अडवून धरवून सर्व समाजास थक्क करून सोडण्यासारखें खंबीर धैर्य यांचे अंगीं आहे, असें जनास दाखवून ईश्वर त्यांचा ऋणी झाला. पोटचें मूल तापानें फणफणलेलें, घाम नसल्यामुळें सर्वांचीं मुखें म्लान झालेलीं, डॉ. गर्दासारखे धन्वंतरी, अंतःकरणाचा धीर सुटला असतां व अवघ्या वाचेनें ठीक आहे, ईश्वर तारक आहे, इत्यादि शब्दांनीं समजूत करीत आहेत हें माहीत असतां, त्या स्थितींत मुलास त्यांच्या स्वाधीन करून व येवल्यासारख्या आपापसांतील हाणामाऱ्यामुळें रक्तानें भिजलेल्या भूमीवर उभे राहून या भांडणांतील मुळावर कुऱ्हाड घालण्यास तयार होणें, हें सामान्य लक्षण आहे

काय ? " राष्ट्रहिताच्या कामीं धैर्य दाखविण्याची अशी संधी आली असतां माघार न घेतां त्यांनीं आपलें कर्तव्य किती चोख रीतीनें बजावलें आहे, हें १८९७ सालीं त्यांच्यावर प्रसंग गुदरला असतां माफी मागण्याची सूचना करणाऱ्या एका बंगाली मित्रास त्यांनीं जें पत्र लिहिलें होतें, त्यावरून व्यक्त होतें. हें पत्र कलकत्त्याच्या 'वंदेमातरं' पत्रानें कांहीं दिवसांपूर्वीं प्रसिद्ध केलें असून त्यांतील मथितार्थ असा आहेः—" दुसरा पक्ष मला जें करावयास सुचवीत आहे त्याचा अर्थ जवळ जवळ गुन्हा कबूल करण्यासारखाच आहे. मी तसें करण्यास तयार नाहीं. लोकांत माझी जी मान्यता आहे ती केवळ माझ्या दानतीवर ( Character ) अवलंबून आहे; आणि जर मी ह्या खटल्यामुळें घाबरून गेलों, तर महाराष्ट्रांत राहणें व अंदमान बेटांत राहणें हीं दोन्हीं सारखींच आहेत. सरकारचा उद्देश पुण्याच्या पुढाऱ्यांची नाचक्की करण्याचा आहे; आणि या बाबतींत प्रो. गोखले व ज्ञानप्रकाशचे संपादक यांच्याप्रमाणें मी कच्चा आहें असें त्यांच्या अनुभवास येणार नाहीं, असें मला वाटतें. शिवाय तुह्मी ध्यानांत ठेवा कीं, कांहीं विवक्षित मर्यादेपलीकडे आपण सर्व लोकांचे चाकर आहोंत. तेव्हां जर आणीबाणीच्या वेळीं आपण खेदजनक असा धैर्याभाव दर्शविला, तर आपण त्यांना फसविल्यासारखें व निराश केल्यासारखें होईल." १८९७ सालचा कारागृहवास संपल्यावर "आतां पुन्हां तुह्मी पत्रावर आपलें नांव घालूं नका; उगीच जीव धोक्यांत कशाला घालतां ?" असा कांहीं गृहस्थांनीं उपदेश चालविला असतां त्यालाही टिळकांनीं वरील प्रकारचाच जबाब दिला. त्या वेळीं त्यांनीं जे उद्गार काढले ते पुढील प्रमाणें आहेत, असें माझ्या एका स्नेह्यानें मला सांगितलें. " अहो, हें सतीचें वाण आहे ! ज्याचें त्यानेंच त पतकरलें पाहिजे. " ज्या गृहस्थांच धारिष्ट व कर्तव्यतत्परता इतकी उत्कट आहे त्यांच्या कीर्तीचा दुंदुभी सर्वत्र गाजत राहिला तर त्यांत नवल तें कोणतें ?

यांच्या अंगीं **दुसरा गुण** ह्मटला ह्मणजे परोपकार हा होय. आपल्या हातून होईल तितका लोकांवर उपकार करावा, हा परोपकाराचा अर्थ मीं या ठिकाणीं धरला आहें; व अशा दृष्टीनें टिळक यांनीं गेल्या आठ सालांत लोकांवर पुष्कळ उपकार केले आहेत, यांत कांहीं शंका नाहीं. दुसऱ्यावर उपकार करण्याच्या मुख्य तीन रीती आहेत. एक द्रव्य देऊन,

दुसरी अंग-मेहनत करून व तिसरी सल्लामसलत व उपदेश करून. या सर्व रीतींनीं त्यांनीं लोकांवर उपकार केला आहे. कोणी भिक्षुक, शाळेंत जाणारा विद्यार्थी, विद्वान् ब्राह्मण अगर शास्त्री-पंडित आला तर विमुख न पाठवितां आपल्या ऐपतीप्रमाणें त्याला कांहीं तरी देत. कोणी धर्मार्थ फंड काढला, सत्कृत्याकरितां वर्गणी केली किंवा असल्याच एकाद्या गोष्टीबद्दल यादी केली, तर त्यांत यांचें नांव नाहीं असें बहुधां होत नसे; एवढेंच नव्हे, तर कित्येक मंडळी यांनीं पहिल्या प्रथम नांव घालून आंकडा घातला कीं, लोकांकडून भराभर वर्गणी मिळेल अशा समजुतीनें यादी प्रथमतः यांच्याकडेच घेऊन येत; व हेही आढेवेढे न घेतां आपल्या ऐपतीप्रमाणें चटकन् आंकडा टाकीत. अंगमेहनतीनें परोपकार केल्याचीं उदाहरणें गेल्या आठ सालांत विशेष दिसून आलीं नाहींत. तथापि, अतिथी, अभ्यागत किंवा ओळखीदेखीचा कोणी मनुष्य आजारी असल्यास स्वतः जाऊन त्याची विचारपूस त्यांनीं केली आहे; व औषधपाणीही देऊन त्याची व्यवस्था त्यांनीं लाविली आहे. यांच्या अंगमेहनतीचें पुढील एक उदाहरण लक्षांत ठेवण्यासारखें आहे. १९०४ सालांत सातारचे महाराज पुण्यास वारले. त्या वेळीं महाराजांजवळची मंडळी अगदीं घाबरून गेली होती; व परठिकाणीं एकंदर व्यवस्था कशी होते, याची त्यांना मोठी काळजी पडली होती. अशा वेळीं टिळक यांचेकडे येऊन त्यांनीं आपली हकीकत सांगतांच लगेच अंगरखा पागोटें घालून ते बाहेर पडले. रात्रीची वेळ. सुमारें नऊ वाजून गेलेले. लोकांच्या गांठी पडणें मुष्किलीचें होतें. तरी टिळक यांनीं स्वतः जाऊन सरदारांच्या एजंटाची ( ताई महाराजांच्या खटल्यांत यांना शिक्षा देणारे डि. जज्ज मि. ल्यूकस हेच या वेळीं एजंट होते ) गांठ घेतली; व प्रेत वाहून नेण्याच्या पेटीपासून ( Coffin ) तों तहत तारेनें स्पेशल डब्याची ट्राफिक-म्यानेजरकडून व्यवस्था होईपर्यंत सगळी खटपट त्यांनीं केली; व सकाळीं आठ वाजतां सर्व सरंजामानिशीं सन्मानानें रेल्वेनें प्रेत जेव्हां रवाना करून दिलें तेव्हां ते घरीं परत आले. जेवणखाण, रात्रभर जाग्रण किंवा श्रम याची त्यांनीं त्या वेळीं मुळींच पर्वा केली नाहीं ! या प्रमाणेंच स्वामी हंसस्वरूप, श्री जगद्गुरू मठ संकेश्वर, वगैरेंच्या खाऱ्या पुण्यास आल्या असतां दिवस रात्र न ह्मणतां लोकांच्या घरोंवर जाऊन वर्गणी जमा करणें व त्यांच्या सन्मा-

नाची तयारी करणें वगैरे हरएक गोष्टींत जी त्यांनीं अंगमेहनत केली ती अवर्णनीय आहे. सल्लामसलत देऊन यांनीं जो परोपकार केला आहे तितका माझ्या मतें दुसऱ्या कोणीं क्वचित्च केला असेल. खेड्यापाड्यांतला इसम असो कीं शहरांतला इसम असो, श्रीमंत असो कीं दरिद्री असो, त्याला हरएक बाबतींत सल्ला देण्यास त्यांनीं कधीं मागेंपुढें पाहिलें नाहीं; व या सल्लयाबद्दल त्यांनीं कोणाकडून कधीं पैही घेतली नाहीं! त्यांनीं गेल्या आठ वर्षांत लोकांचे किती तरी अर्ज फुकट लिहून दिले आहेत. व किती जणांना तरी कायद्याचा तोंडीं सल्ला दिला आहे. सार्वजनिक काम म्हटलें तर त्यासंबंधीं विचार करून सल्ला देण्यास हे एका पायावर तयार असत; व या त्यांच्या गुणामुळें आजपर्यंत महाराष्ट्रांतील किती तरी लोकांकडून सल्ला विचारण्यासंबंधी पत्रे आली असतील; व किती तरी लोक त्रास सोसून समक्ष भेटीस आले असतील! प्लेगसंबंधी सरकारची व्यवस्था, जमिनमहसुलाचा कायदा, वगैरे गोष्टींची सार्वजनिक सभेमार्फत यांनी पुष्कळ चर्चा केली आहे; व दगदग सोसून स्वतः सार्वजनिक सभेचे अर्जही लिहून दिले आहेत. केसरीपत्राच्या द्वारें सल्ला देऊन जो यांनी लोकांवर उपकार केला आहे तो तर सर्वांना विश्रुतच आहे. या उपकारास कोणी कोणी परोपकार ह्मणणार नाहींत; कारण, तो एक धंदा असून आपल्या फायद्याकरतां ह्मणून त्यांनीं लोकांस सल्ला दिला असेल, असें ते ह्मणतील. पण ही त्यांची चूक आहे. प्राप्तीचा धंदा एवढीच गोष्ट लक्षांत आणून त्यांनी केसरी चालविलेला नव्हता. याहीपेक्षां जास्त कांहीं तरी करावे या हेतूनेंच तें पत्र त्यांनीं चालविलें होतें; व याच प्रेरणेनें त्यांच्या हातून तत्संबंधाचीं धाडसाचीं कामें झालीं आहेत.

यांच्या अंगचा **तिसरा गुण** ह्मटला ह्मणजे परोत्कर्ष—सहिष्णुता हा होय. दुसऱ्याचा उत्कर्ष व्हावा अशी यांची मनापासून इच्छा असे व त्याकरतां हे प्रयत्नही करीत असत. पुण्यास सुधारक व उद्धारक किंवा नेमस्त व राष्ट्रीय असे दोन पक्ष आज कैक दिवसांपासून झाले असून कांहीं बाबतींत हे उद्धारक व राष्ट्रीयपक्षाचे पुढारी असल्यामुळें सुधारक व नेमस्त पक्षाचा हे द्वेष करीत, असा यांच्यावर कोणी कोणी आरोप करतात. पण हा आरोप वृथा आहे. सामाजिक किंवा धार्मिक बाबतींत सुधारक-

पक्षांतील कित्येक लोकांच्या मतांशीं यांचीं मतें जुळत नसल्यामुळें किंवा राजकीय बाबतींत नेमस्त पक्षाच्या लोकांशीं यांचा मतविरोध असल्यामुळें हे त्यांजवर प्रसंगविशेषीं कडक टीका करीत, ही गोष्ट खरी आहे. पण तेवढ्यावरून हे त्यांचा द्वेष करीत, असें ह्मणणें चुकीचें आहे. मनुष्य कोणत्याही पक्षाचा असो व त्याच्याशीं यांचा कितीही मतविरोध असो, मतविरोध आड न येतां त्याचा उत्कर्ष होऊं लागला, ह्मणजे यांना आनंद होई; व असा आनंद त्यांनी अनेक वेळां व्यक्तही केला आहे. अलीकडे पुण्यास टिळक हे जसे एका पक्षाचे पुढारी आहेत, तसेच न्या. रानडे यांच्या पश्चात् ना. गोखले, डॉ. भांडारकर वगैरे गृहस्थ दुसऱ्या पक्षाचे पुढारी आहेत. या दोहों पक्षांच्या पुढाऱ्यांचें एकमत नसून पुष्कळ वेळां त्यांची खडाजंगीही उडत असे, ही गोष्ट खरी आहे. तथापि, ही खडाजंगी खासगी द्वेषाचें द्योतक नसून राष्ट्रहितासंबंधानें जो मतभेद आहे त्याचेंच द्योतक आहे, असें ह्मटलें पाहिजे. तसें नसतें तर योग्य वेळीं टिळक यांचेकडून उलट बाजूच्या पुढाऱ्यांचा गौरव कधींच झाला नसता. असा गौरव त्यांनीं वर्तमानपत्रांतून तर अनेक वेळां केलाच आहे. पण त्याचीं प्रत्यक्ष एक दोन उदाहरणे जीं माझे पाहण्यांत आलीं आहेत तीं मी येथें देतों. सन १९०२ सालीं रा. सा. विष्णु मोरेश्वर महाजनी हे पुण्यास आले होते. त्या वेळीं जुलै महिन्यांत सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत त्यांचें एक व्याख्यान झालें. या प्रसंगीं टिळकांप्रमाणेंच ना. गोखलेही तेथें हजर होते. व्याख्यान सुरू होण्यापूर्वीं टिळकच प्रथम बोलावयास उठले; व त्यांनीं ना. गोखले यांसच अध्यक्ष होण्याविषयीं विनंति केली. ना. गोखले हे आपणास अध्यक्षस्थान नको ह्मणत असत व टिळक हे आग्रहपूर्वक त्यांना तें स्वीकारण्याविषयीं विनंति करीत. हा देखावा पाहून तेथें जमलेल्या दोन्ही पक्षांतील लोकांस जो आनंद झाला होता तो विलक्षण होता. यानंतर ना. गोखले विलायतेंतील डेप्युटेशनची कामगिरी बजावून आले असतां रेमार्केटांत जंगी जाहीर सभा भरली असतां त्यांचें अभिनंदन करण्याचा पहिला ठराव टिळक यांनींच सभेपुढें मांडून त्यांनीं नामदारांचा गौरव केल्याचें पुष्कळांना स्मरत असेल. असो; यावरून टिळक हे उलट बाजूच्या पुढाऱ्यासही योग्य वेळीं मान देण्यास किती तत्पर असत, हें चांगलें कळून येईल. आतां ना. गोखले व टिळक यांची

नेहमीं गांठ पडत नसे किंवा एकमेक एकमेकांच्या घरीं जात नसत, किंवा एकादें काम एकमेकांच्या सल्ल्यानें होत नसे, ह्मणून कदाचित् ना. गोखले यांच्या उत्कर्षाबद्दलचा टिळक यांचा अभिमान वरकरणी असेल असें कोणास वाटत असेल. पण टिळक यांच्याबद्दल मला जितका अभिमान आहे, तितकाच नामदार गोखले यांच्याबद्दल असल्यामुळें* ना. गोखले यांच्या उत्कर्षाबद्दलचा टिळक यांचा अभिमान वरकरणी आहे, असें त्यांच्या कोणत्याही खासगी संभाषणावरून किंवा वागणुकीवरून कधींच माझ्या निदर्शनास आलें नाहीं. उलट, मतभेद बाजूस ठेऊन टेंपरन्स असोसिएशनसारख्या ना. गोखले यांच्या अध्यक्षतेखालच्या संस्थेंत खांद्यास खांदा भिडवून त्यांनीं कामही केलें आहे. सर भालचंद्र यांच्यावर अनेक प्रसगी ते जरी तुटून पडले आहेत तरी पंचांगशोधन—कमिटीचे वेळीं त्यांनीं सर साहेबांशीं सल्ल्याने वागून काम केलें आहे. न्या. रानडे यांच्याबद्दल तर टिळक यांची जितकी पूज्यबुद्धि आहे तितकी दुसऱ्याची क्वचित्च असेल; व ही पूज्यबुद्धि रानड्यांसंबंधाने यांनीं ता. २२।१।०१ च्या केसरींत जो मृत्युलेख लिहिला आहे त्यावरून स्पष्ट होते. तात्पर्य, दुसऱ्याच्या उत्कर्षाबद्दल आनंद वाटणें व त्याची योग्यता जाणून प्रसंगीं त्याचा आदर करणें हा गुण टिळक यांचे अंगीं वास करीत आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे.

स्पष्टवक्तेपणा हा यांच्या अंगचा **चवथा गुण** होय. हा जालीम गुणांपैकीं एक गुण आहे; व तो क्वचित् ठिकाणीं दृष्टीस पडतो. या गुणास मी जालीम म्हटलें याचें कारण असें कीं, जालीम औषध प्रखर असल्यामुळें तें जसें हटकून रोगाचें चंदन करतें, तसें या गुणापुढें वशिला,

---

* ना. गोखले यांच्याबद्दल मला विशेष अभिमान असण्याचे कारण एक तर 'न्यू इंग्लिश स्कूल 'मध्ये मी असतांना कांही दिवस ते माझे गुरू होते. दुसरें असे कीं, त्यांच्या वडिलांचा व माझ्या वडिलांचा घरोबा असून मी भेटीस गेलो असतां आमच्याबद्दलची कळकळ त्यांनीं अनेक वेळां खुल्या अंतःकरणानें व्यक्त केली आहे. पुण्यास आल्यावर त्यांच्या आश्रयानें मी एकादा उद्योग करावा, असें माझ्या वडिलांच्या मनांत फार होतें; व मीं इच्छा दर्शविली असती तर तशी गोष्टही घडून आली असती. पण योगायोग कसा होता, हें या पुस्तकाच्या वाचकांस निराळे सांगावयास नको.

लालूच, स्तुति, इत्यादि गोष्टींचा धुव्वा उडून सत्य तेवढेंच कायम राहतें. स्पष्टवक्त्या माणसापुढें कोणाची भीड चालावयाची नाहीं कीं, कोणास सजवून नटवून आणलेलें घोडें दामटतां येणार नाहीं. त्याच्या कोरडया-खालीं कृत्रिमपणा किंवा मानभावीपणा यांच्या चिंधडयान् चिंधडया उडावयाच्या. टिळक यांच्या स्पष्टवक्तेपणाचा अंमल अशाच प्रकारचा असे; व त्या अंमलाचा धाक मोठमोठ्या मंडळींससुद्धां वाटे. यांच्याकडे कोणी केव्हांही जावो त्याला यांच्या स्पष्टवक्तेपणाचा अनुभव थोडा तरी आल्या-वांचून राहत नसे. गुळमुळीत भाषण, आडपडद्यानें बोलणें किंवा आपल्या हेतूची द्राविडी प्राणायामानें सुनावणी करणें, असें कोणी केलें कीं, 'तुम्हांस काय सांगावयाचें असेल ते स्पष्ट सांगा,' असें ते ह्मणत; व त्याला जो जबाब द्यावयाचा तोही ते स्पष्टपणें देत. कोर्टांत झुंज खेळून थकलेला, किंवा 'तुझें काम करून देतों, तूं काय घाबरला आहेस?' असें म्हणून दुसऱ्या वकिलाने थापा मारून ठेवलेला एकादा खेडगळ कुणबी मुंडासांत कागदांची भेंडोळीं बांधून 'काम होईल काय?' म्हणून मोठ्या आतुरतेनें विचारायास आला, व 'यांत तुला यश येणार नाहीं, उगीच खटपट करूं नको,' असे त्यांनीं त्याला सांगितलें कीं, गांगरून जाऊन 'मग नाहीं काय जी यांत काय व्हायचं?' असे अनेकांनीं उतरलेल्या चेहऱ्यानें निराशेचे उद्गार काढतांना माझ्या पाहण्यांत आलें आहे. पण तेथें कोणाचा काय उपाय? जें स्पष्ट असेल तेंच हे बोलत व अखेर तेंच खरें ठरे. यांच्या निर्भीड व स्पष्ट भाषणाचा केव्हा केव्हां असा परिणाम होई की, गांवढळ लोक येऊन ते लांबलचक कांहीं तरी हकीकत सांगूं लागले म्हणजे 'तुम्ही हें मला कांहीं सांगूं नका, काय तें थोडक्यांत सांगा' असें जेव्हां मोठ्यानें म्हणत, तेव्हां हे रागावले आहेत असें त्यांना वाटे. पण हे रागावलेले नसून यांच्या स्पष्टोक्तीचाच तो परिणाम असे. आणि वास्तविक पाहिलें तर टिळकांसारख्या पुरुषास सल्ला विचारण्यास येण्यापूर्वी विचारणारानें कांहीं तरी पूर्वतयारीच करून यावयास पाहिजे. कारण, यांना त्यांची सर्व कथा ऐकून घेण्याइतका वेळ नसे, आणि ह्मणूनच निर्भीडपणें त्यांना बोलावें लागे. हे वर्तमान-पत्रांतून सरकारी अधिकाऱ्यांवर जशी स्पष्ट टीका करीत, तसेंच त्यांच्याशीं खासगी रीतीनें बोलावयाचें झालें तरी स्पष्टच बोलत. एकदां पोलिस

सुपरिंटेंडेंट मि. ब्रुईन हे कांहीं गुप्त बातमी काढण्याच्या निमित्तानें असो किंवा दुसऱ्या काहीं कामानिमित्तानें असो, ऑफिसमध्यें यांना भेटण्यास आले होते. ब्रुईन साहेब हे नुसते 'दंडुके' साहेब नसून चांगले शिकले सवरलेले होते; व वादविवाद करण्यांतही हुषार होते. हे दोघेही ऑफिसमध्यें खुर्चीवर बसले असतां सहजासहजीं आमच्या देशांतील चळवळी-संबंधानें गोष्टी निघाल्या, व दोघांचा विनोदानें पण मोठ्या कडाक्यानें वादविवाद सुरू झाला. त्यांत हिंदुलोक राज्यकारभारांतील मोठ्या जागा देण्यास लायक आहेत कीं नाहींत हा प्रश्न निघून मि. ब्रुईन व टिळक यांची चांगलीच जुंपली ! ब्रुईन साहेब ह्मणत की, हिंदु लोकांच्या हातून असा राज्यकारभार होणें कठिण; व टिळक ह्मणत कीं, एकाद्या हुषार हिंदूच्या हातांत असा अधिकार देऊन पाहा ह्मणजे तो तुमच्या अधिकाऱ्यांपेक्षांही चांगल्या रीतीनें चालवितो कीं नाहीं हे तुह्मांस दिसून येईल. त्या वेळच्या त्यांच्या कित्येक स्पष्टोक्तींचा नाद अजून माझ्या कानांत घुमत असून त्या वेळचा त्यांचा निर्भयपणाचा चेहरा अजून माझ्यापुढें दिसत आहे !

यांच्या अंगचा **पांचवा गुण** ह्मटला ह्मणजे गुणग्राहकता हा होय. लोकांच्या अंगीं कोणते गुण आहेत, कोणत्या गुणाबद्दल कोणास मान द्यावयाचा, कोणाची कशाकरतां प्रशंसा करावयाची, इत्यादि गोष्टी हे पूर्णपणें जाणत आहेत. त्यामुळें एखादा हुषार कारागीर असो, नेम मारणारा असो, कविता करणारा असो, चित्रें काढणारा असो, किंवा दुसऱ्या कोणत्याही गुणाचा मनुष्य असो, यांच्याकडे येऊन त्याला आपल्या गुणाची पारख करून घ्यावी असें वाटे; व असे लोक आजपर्यंत कैक येऊन गेले आहेत व त्यांची यांनीं तारीफही केली आहे. हे नेहमीं वर्तमानपत्रातून मोठ्या लोकांविरुद्ध टीका करीत, त्यामुळें 'यांना गुण कशांत दिसत नाहीं, नेहमीं दुसऱ्याचे दोष काढण्याचीच सवय यांना लागली आहे,' असा कित्येक लोक यांच्यावर आरोप करीत असतात. पण या आरोपांत मुळींच अर्थ नाहीं. सध्यां आमची राजकीय स्थिति अशी कांहीं चमत्कारिक झाली आहे कीं, सरकारी अमलदारांला लोकांच्यातर्फे काम करून प्रशंसा मिळवायाचें कठिण झालें आहे. तसेंच खासगी लोकही पदव्या, पदकें वगैरे पोकळ डामडौलास भुलून स्वकर्तव्यपराङ्मुख होत

चालले आहेत. अशा स्थितींत केसरीला गुणांची प्रशंसा करण्याचे प्रसंग क्वचित् येतात हा केसरीचा दोष नव्हे. गुणच जर नसले तर गुणांची प्रशंसा तरी कोठून होईल ? त्यांतून प्रसंग-विशेषीं एकाद्याच्या अंगचा गुण दिसून आला तर टिळक हे त्याची स्तुति करण्यास कधीं मागेंपुढें पाहत नसत, हें त्यांच्या वर्तमानपत्राचीं फाइलें बारीक नजरेनें चाळलीं असतां कोणासही दिसून येईल. आतां कदाचित् कोणी असें ह्मणेल कीं, नेटिव लोकांच्या गुणांची अशा लेखांतून त्यांनीं तारीफ केली असेल; पण युरोपियन लोकांची कधीं केली आहे काय ? होय; युरोपियन लोकांची सुद्धां केली आहे. याची उदाहरणें पाहावयाचीं असतील तर मॅक्स मूलर, हर्बर्ट स्पेन्सर वगैरे गृहस्थांवरील लेख पाहा. हें एक असो; अँग्लो-इंडियन पत्रकर्ते नेटिवांचा किती द्वेष करतात हें सर्वांना ठाऊक आहे. तथापि, त्यांच्यातही एकादा चांगला गृहस्थ निपजतो. मुंबईच्या ' ग्याझेट ' पत्राचे माजी एडिटर मि. ग्रॅटेन गेरी हे एक अशांपैकीं होते; व ते ज्या वेळीं मृत्यु पावले, त्या वेळीं टिळक यांनीं ता. ११ सप्टेंबर १९०० च्या केसरींत पुढील लेख लिहिला आहे:—

" मुंबई ग्याझेट वर्तमानपत्राचे मालक व प्रकाशक मि. ग्रॅटेन गरी हे गेल्या आठवड्यात मुंबई येथे मरण पावल्याचें प्रसिद्ध झाले आहे. हे मुंबई म्युनिसिपालिटीचे सन १८८९।९० साली अध्यक्ष होते व सदर म्युनिसिपालिटीचे कामही त्या व इतर वेळीं त्यांनीं आस्थेनें केलें होतें. पण मुंबईबाहेर यांची प्रसिद्धि मुंबई ग्याझेटचे एडिटर या नात्यानेंच विशेष होती. पहिल्यान मि. गेरी हे ' टाइम्स ऑफ् इंडिया'चे एडिटर होते; पण पुढे ह्मणजे १८७९ सालीं म्याक्लीन साहेब विलायतेस गेले तेव्हां त्यांजपासून ग्याझेट पत्राची मालकी त्यांनीं विकत घेतली, व तेव्हांपासून मरेपर्यंत ते या पत्रांत लिहीत असत. अँग्लो-इंडियन लोकांचीं वर्तमानपत्रें बहुधां एकाच धोरणावर चाललेलीं असतात; आणि तें धोरण एतद्देशीय लोकांस प्रायः अनुकूल नसतें. मुंबई ग्याझेट वर्तमानपत्र मि. म्याक्लीनच्या कारकीर्दीत अशाच प्रकारचे होतें. पण गेरी साहेबांनीं तें हातांत घेतल्यावर नेटिव लोकांस प्रतिकूल लेख असला तरी त्यांतील तीव्रता व मात्सर्यबुद्धि कमी झाली. अशा दृष्टीनें पाहिले ह्मणजे मि. गेरी यांच्या मृत्यूनें अँग्लो-इंडियन वर्तमानपत्रकारांपैकीं एक चांगला वर्तमानपत्रकार गेला असें ह्मटलें पाहिजे. नेटिव लोकांशी मिळून मिसळून वागून त्यांच्या अडचणी समजून घेणें व त्यांस कांहीं हक्क आहेत, सर्वच कांहीं अँग्लो-इंडियन लोकांकरितां नाहींत, अशा मताचे इंग्रज वर्तमानपत्रकार उत्तरोत्तर कमी होत चालले आहेत त्यामुळें मि. गेरी यांच्या मृत्यूने येथील इंग्रजी वर्तमानपत्रांची आमच्या दृष्टीनें पुष्कळ हानि झाली आहे व ती भरून येणें कठिण आहे. "

निरभिमान हा यांच्या अंगचा **सहावा गुण** होय. हा गुण विद्वत्ता सुसंस्कार यांचें फळ आहे. ‘ उथळ पाण्यास खळखळ फार,’ तसा चुटपुटत्या विद्येस अभिमान फार. पण टिळक हे विद्वत्तेनें परिपूर्ण असल्यामुळें यांच्या ठिकाणीं अभिमान राहण्यास जागाच नाहीं. एकादा लहान मुलगा असो कीं, वृद्ध मनुष्य असो; सुशिक्षित असो कीं, अशिक्षित असो; कोणाशींही हे बोलूं लागले ह्मणजे ‘ विद्या ददाति विनयम् ’ या वाक्याची आठवण झाल्याशिवाय राहत नसे. हे बोलण्यांत स्पष्टपणा दाखवीत; पण त्यांत आढ्यतेचा अंश बिलकुल नसे. एवढेच नव्हे, तर एकादी गोष्ट आपणास ठाऊक नसली तर त्याबद्दल आपलें अज्ञान ते स्पष्टपणें दाखवीत. ही गोष्ट खासगी संभाषणांतच दिसून येई असें नाहीं, तर वर्तमानपत्रांतील लेखांतही दिसून येई. एकदां एक सताराशिक्षणाचें पुस्तक यांच्याकडे अभिप्रायास आलें. त्या वेळीं हे सतार जाणत नसल्यामुळें त्यांनीं ता. २९।१०।०१ च्या अंकांत पुढीलप्रमाणें अभिप्राय दिला आहे:—

“ रा. रा. रंगो अनंत ठकार यांनीं केलेलें सताराशिक्षणाचें पहिलें पुस्तक आमच्याकडे आलें आहे. या पुस्तकावर अभिप्राय देण्याचा आमचा अधिकार नाहीं. परंतु बज्ञ लोकांनी दिलेले अभिप्राय पुस्तकासोबत जोडले आहेत त्यावरून पाहतां पुस्तकावरून सतार वाजविण्याचें काम शिकतां येईल, अशा रीतीची याची रचना झाली आहे असें दिसतें.”

यांच्या निरभिमानाच्या ज्या एक दोन गोष्टी माझ्या स्मरणांत आहेत त्या सांगितल्या असतां अप्रासंगिक होणार नाहीं, ह्मणून त्या येथें नमूद करतों. सुमारें चार वर्षांपूर्वी ऑफिसमध्यें ( सदाशिव पेठेंतील हौदानजिक गांधी यांच्या वाड्यांत ) आह्मी केसरीचा मजकूर लिहीत बसलों होतों. मजकूर आटपण्यास रात्रीचे आठ वाजले. त्या वेळीं ऑफिस बंद करण्यास तेथें शिपाई वगैरे कोणी नव्हते. अशा वेळीं माडीवरून खालीं येतांना त्यांस दिसावें ह्मणून मी दिवा घेऊन पुढें निघालों, तों त्यांनीं टेबलावरील कुलुपकिल्ली उचलून आपल्या हातांत घेतली व माझ्या पाठोपाठ ते खालीं आले. मी दिवा फुंकावयास लागलों इतक्यांत ते रस्त्यावरील दरवाज्याच्या बाहेर पडले, व मला हाक मारून आपणच दरवाजा ओढून घेऊन कुलूप लावूं लागले. दिवस चांदण्याचे असून त्या वेळीं रस्त्यावर सामसूम झाली नव्हती. लोक इकडून तिकडून जात येत होते. त्या वेळीं मलाच मोठें

चमत्कारिक वाटून मी जबरीनें त्यांच्याकडून किल्ली घेतली आणि दरवाजा बंद केला. दरवाजा बंद करतांना 'एवढे थोर गृहस्थ आपणच दरवाजा लावताहेत हें पाहून लोक काय ह्मणतील?' अशी कल्पना माझ्या मनांत आली, पण ती त्यांच्या गांवींही नव्हती! घरीं (विंचूरकरांच्या वाड्यांत) ज्या ज्या वेळीं रात्रीं मजकूर लिहिण्यास उशीर होई, त्या त्या वेळीं बहुतकरून ते स्वतः हातांत शामदान घेऊन रस्त्यापर्यंत येत व मग दरवाजा लावून घेऊन नंतर ते निजावयास जात! दरवाजा लावण्यास किंवा त्यांना दिवा दाखविण्यास कोणा मनुष्यास त्यांस हजर ठेवतां येत नव्हतें, असें नाहीं. पण एवढी आढ्यता त्यांच्या ठिकाणीं नाहींच! याप्रमाणेंच घरीं, ऑफिसमध्यें किंवा छापखान्यांत कोठेंही ते असोत, हाताखालीं माणसें असलीं तरी प्रसंगविशेषीं स्वतः एकादें हलकें कामसुद्धां ते करीत, व त्याबद्दल त्यांना मुळींच वाईट वाटत नसे. एकदां कोल्हापुराकडील एक कुणबी यांना पाहण्यास ह्मणून मुद्दाम आला होता. त्या वेळीं "मी आतां ह्मातारा होत चाललों, आपल्या सारख्या थोर व श्रीमंत मनुष्याचें दर्शन मला कशानें होणार? मरावयाच्या अगोदर तुह्मांला एकदां बघावें अशी इच्छा होती ह्मणून आलों झालें," असें ह्मणून तो यांच्या पायां पडूं लागला, तेव्हां ते ह्मणाले:—"पायां कशाला पडतां? मी थोर नाहीं आणि श्रीमंतही नाहीं. तुह्मी जसे काबाडकष्ट करून मजुरी मिळवितां, तसेंच मी चार अक्षरें शिकलों त्यावर कांहीं तरी पोटाला मिळवितों झालें." हे उद्गार कांहीं लहानसान निरभिमानाचे आहेत काय?

यांच्या अंगचा **सातवा गुण** ह्मटला ह्मणजे दृढनिश्चय हा होय. एकादें काम मनांत आणलें कीं, पिच्छा पुरवून तें केल्याशिवाय हे कधीं राहत नसत. याची साक्ष त्यांच्या अनेक उदाहरणांवरून लोकांस मागेंच पटली आहे. तथापि, गेल्या आठ सालांतील दोन चार ठळक उदाहरणें लोकांपुढें आहेत. पैकीं एक ह्मटलें ह्मणजे विलायतेंतील 'ग्लोब' पत्रावर त्यांनीं अब्रुनुकसानीची केलेली फिर्याद हें होय.* ही फिर्याद केल्यापासून

* ही फिर्याद करण्याचें कारण काय याची ता. २५।१२।१९०० च्या केसरींत पुढील हकीकत दिली आहे:—

"हल्लींचे गव्हर्नर सर स्टॅफोर्ड नॉर्थकोट यांची लॉर्ड सँढर्स्ट यांचे जागीं जेव्हां नेमणूक झाली तेव्हां त्यासंबंधानें ता. २८ आक्टोबर १८९९ च्या 'ग्लोब' च्या

तो खटला एक वर्ष चालला होता. ' ग्लोब ' वर्तमानपत्र वजनदार व श्रीमंत असल्यामुळें त्याच्यावर खटला चालविणें मोठें कठिण होतें. त्यांतून हिंदुस्थानांतल्या मनुष्यानें लंडनच्या हायकोर्टांत फिर्याद लावणं ह्मणजे किती सायासाचें व खर्चाचें होतें, याची वाचकांनींच कल्पना करावी. अशी जरी स्थिति होती, तरी विलायतेंत दोन बॅरिस्टर देऊन व लागेल तो खर्च करून तेथील कोर्टांत यांनीं दावा केला. पुढें यांची बाजू बळकट आहे असें जेव्हां पाहिलें तेव्हां ' ग्लोब ' नें यांची माफी मागितली, फिर्यादीस लागलेला खर्च दिला, व वर आणखी टिळक यांच्या ह्मणण्याप्रमाणें दुष्काळ—फंडास ५० पौंड दक्षणा देऊन प्रायश्चित्त घेतलें ! असो; या गोष्टीवरून टिळक यांच्या अंगीं केवढा दृढनिश्चय आहे हें कोणाच्याही ध्यानांत येईल. या दृढनिश्चयाची तारीफ करतांना खुद्द न्या. रानडे यांनींसुद्धां " टिळकांनीं म्हणूनच ही गोष्ट केली, इतरांच्या हातून कधीं झाली नसती, " असे स्पष्ट उद्गार काढले म्हणून ह. प. भिंगारकर बुवा एकदां सांगत होते. दुसरें उदाहरण, बाबामहाराजांच्या इस्टेटीसंबंधानें जो खटला त्यांच्यावर उपस्थित झाला होता त्याची शेवटपर्यंत त्यांनीं धरलेली चिकाटी हें होय. त्याची हकीकत मागें आली आहे, तेव्हां त्यासंबंधानें विशेष लिहिण्याचें कारण नाहीं. याप्रमाणेंच इनॅक्युलेशन, पिकेटिंग, राष्ट्रीयसभा, व १९०८ चा राजद्रोहाचा

---

अंकांत एक स्फुट सूचना प्रसिद्ध झाली होती. या स्फूट लेखांत सर स्टॅफोर्ड नॉर्थकोट यांस अशी इशारत दिली होती की, मुंबई इलाख्यांत " प्रमुख बंडखोर टिळक यांस शिक्षा झाली तरी राजद्रोह अद्याप धुमसतच आहे; व तो समूळ नाहींसा करणें हें नव्या गव्हर्नर साहेबांचें काम आहे. " नंतर ' ग्लोब ' कार यांनीं आणखी असेंही लिहिलें होतें कीं, " टिळक यानें काढलेली नसल्यास त्याच्या सल्ल्यानें चाललेली खुनाची मोहीम नजरेस पडेपर्यंत सर स्टॅफोर्ड नॉर्थकोट यांच्या पूर्वीच्या गव्हर्नरास जें ज्ञान नव्हते ते त्यांस आतां प्राप्त झालेलें आहे. ब्राह्मणांवर कधींही विश्वास ठेऊं नये, मग तो कितीही गोड बोलो; हे तत्व नव्या गव्हर्नर साहेबांस आधींच माहीत झालेलें आहे. इ. " सरते शेवटीं महाराष्ट्रांतील ब्राह्मणांस पूर्वीच्या पेशवाईचें अद्याप स्मरण असून इंग्रज लोक आले नसते तर आपणच सर्व हिंदुस्थानचे आज राजे झालों असतों, असें त्यांस सहज वाटत असल्यामुळें त्यांच्या डोक्यांत अद्याप मराटेशाही पुन्हां स्थापन करण्याचें वेड आहे, असें लिहून सर स्टॅफोर्ड नॉर्थकोट यांस त्याची योग्य व्यवस्था लावण्यास सूचना केली होती. "

खटला, या बाबतींतही त्यांनीं कशी चिकाटी धरली होती, हें वर्तमानपत्रांच्या वाचकांस माहित आहेच; म्हणून त्यासंबंधानें येथें अधिक लिहिण्याचें कारण नाहीं.

यांच्या अंगचा **आठवा गुण** म्हटला म्हणजे स्वार्थत्याग हा होय. हा गुण यांच्या ठिकाणीं उज्वल रीतीनें वास करीत आहे. दूध मूळचें गोड असून साखरेनें त्याची गोडी जशी अधिक खुलते तद्वत् धैर्य, निरभिमान, दृढनिश्चय, इत्यादि जे सात गुण वर सांगितले आहेत ते स्वतंत्र रीतीनें श्रेष्ठच आहेत; तथापि, यांच्या अंगच्या स्वार्थत्यागाच्या प्रकाशानें ते अधिकच तेजस्वी दिसतात, असें मला वाटतें. आतां स्वार्थत्याग म्हणजे काय व तो कशा रीतीनें यांच्या ठिकाणीं वास करीत आहे, याचें थोड-क्यांत विवेचन करतों. स्वार्थत्याग म्हणजे आपल्या पोटाला न खातां, पोराबांळाकडे न बघतां किंवा कुटुंबाची काळजी न घेतां, जीव गेला तरी बेहेत्तर आहे, पण लोकांवर उपकार करावयाचा, असा कोणी अर्थ केल्यास तो बरोबर नाहीं, निदान मला मान्य नसून तो नीतिशास्त्राच्या सामान्य सिद्धांताच्या विरुद्ध आहे, असें माझें मत आहे. स्वतःच्या शरिराची, पोरा-बाळांची अगर कुटुंबाची कसलीही काळजी न करतां केवळ लोकांवर उपकार करण्यास जो प्रवृत्त होतो त्यास परोपकार तर साधत नाहींच, पण उलट परोपकारासच तो विघातक होतो. स्वार्थपरार्थाच्या बिकट प्रश्नांत पडण्याचें हें स्थल नव्हे; व त्या प्रश्नांत पडण्याइतकी माझी बुद्धिही नाहीं. मी स्वार्थत्यागाचा सामान्य अर्थ एवढाच समजतों कीं, स्वतःच्या सुखाविषयीं फाजील लालसा न धरतां लोकांवर जितका उपकार करतां येईल तितका करावयाचा. पोटाकरतां किंवा कुटुंबभरणाकरतां मनु-ष्याला एकादा धंदा करावा लागेल, पण एकदा धंद्याची दिशा ठरल्यावर शंभराच्या ठिकाणीं पांचशें रुपये केव्हां मिळतील, पांचशेंच्या ठिकाणीं हजार केव्हां मिळतील व हजाराच्या ठिकाणीं दहा हजार केव्हा मिळतील, अशी सारखी तृष्णा वाढवून आपल्या कर्तव्यास जो विसरतो त्याला स्वार्थत्यागाची मुळीं ओळखसुद्धां नाहीं, असें म्हटलें पाहिजे. आपला निर्वाह सुखानें चालला आहे, कुटुंबाच्या जरूर तितक्या गरजा भागल्या आहेत, असें पाहून निवळ पैशाचे ढीग सांठविण्याची हाव न धरतां जो शक्य तितका लोकांच्या उपयोगी पडतो त्यासच स्वार्थत्यागी असें म्हटलें

पाहिजे; व अशा दृष्टीनें टिळक यांनीं जितका स्वार्थत्याग केला आहे, तितका दुसऱ्या कोणीच केला नसेल, असें माझें मत आहे. सरकारी नोकर असो, व्यापारी असो, शेतकरी असो, किंवा वर्तमानपत्रकर्ता असो, ज्यानें जो धंदा पतकरला आहे, त्याला आपला धंदा चोख रीतीनें करून शिवाय इतर कर्तव्यें योग्य रीतीनें बजावतां येणें शक्य आहे; व असे लोक ज्या राष्ट्रांत आहेत, त्याच राष्ट्राची भरभराट होते यांत कांहीं शंका नाहीं. हिंदुस्थानचा गेल्या पन्नास वर्षांचा इतिहास पाहिला ह्मणजे असे लोक आमच्यामध्यें फार थोडे निपजले आहेत, असे ह्मणावें लागतें. कोणी सरकारी नोकर असला तर सरकारची नोकरी जेवढी व जशी करावयास पाहिजे तेवढी व तशी न करतां आपलें शरीर व मन हीं सर्वस्वीच सरकारास विकतो; कोणी पदवीच्या लालुचीनें लोकद्रोहाचें एकादें कृत्य करतो, तर कोणी पदकाच्या लालुचीनें देशद्रोही बनतो. कोणी सरकारी अधिकाऱ्यांनीं पाठ थोपटली ह्मणून कर्तव्य करण्यास चुकतो, तर कोणी सरकारी अधिकाऱ्यांनीं पाठ थोपटावी ह्मणून जाणून बुजून कर्तव्यास विसरतो. कोणी अधिकाऱ्यांच्या फुकट मर्जीकरतां कर्तव्यावर लाथ मारतो, तर कोणी पदरचे पैसे भरून कर्तव्यशून्यतेचें काळें तोंडास फासून घेतो. याप्रमाणें कोणी द्रव्याची, कोणी अधिकाऱ्यांच्या मर्जीची, कोणी कशाची, अशी फाजील महत्वाकांक्षा बाळगून लोक स्वकर्तव्यास विसरत चालले, ह्मणूनच आमच्या राष्ट्राची हानि होत चालली आहे. अशा अवनत स्थितींत वर सांगितल्या प्रकारचा स्वार्थत्याग करण्याचें मनांत आणून टिळक यांनीं आपलें आयुष्य स्वकर्तव्यांत घालविल्यामुळें त्यांची अलौकिक पुरुषांत आज गणना व्हावी यांत कांहीं आश्चर्य नाहीं. वर्तमानपत्राच्या धंद्यांत पडल्यावर पैसा मिळवावा एवढाच त्यांचा हेतु असता, तर त्यांत त्यांनीं पैसाही मिळविला असता; सरकारची मर्जी सुप्रसन्न करून घेण्याचीच नुसती इच्छा असती तर त्यांनीं ती थोडक्या अवधींतच करून घेतली असती; व लोकांकडून नुसते 'विद्वान्' किंवा 'शाहाणे' ह्मणवून घ्यावयाचें असते तर त्याबद्दल त्यांना एवढी खटपटही करावयास नको होती. लोकांत खऱ्या शिक्षणाचा प्रसार व्हावा, सद्यःस्थितीची त्यांना पूर्ण ओळख पटावी, त्यांचे हक्क त्यांना मिळावे, सारांश, देशाबद्दल आपलीं जीं जीं कर्तव्यें आहेत

तीं तीं यथायोग्य रीतीनें बजावावींत अशाच रीतीनें त्यांनीं वर्तमानपत्र चालविलें होतें; व हेंच धोरण त्यांच्या आचरणांतही दिसून येत होतें. आतां अशा रीतीचा मार्ग बिकट आहे, त्यांत लाखों अडचणी व लाखों संकटें येतात, व तशीं त्यांना आजपर्यंत आलींही आहेत. पण तीं मुकाट्यानें सहन करून त्यांनीं आपलें कर्तव्य बजावलें आहे. देशाकरितां जो हा स्वार्थत्याग त्यांनीं केला, तो लोक पूर्णपणें ओळखून आहेत. त्याची साक्ष १८९७ व १९०८ सालीं त्यांच्याकरितां जो मोठा 'डिफेन्सफंड' गोळा झाला व त्यांच्या संबंधानें लोकांनीं जी सहानुभूति दाखविली. त्यानें चांगलीच पटली आहे. असो; सांगण्याचें तात्पर्य ह्मणून एवढेंच कीं, आपल्या देशाची स्थिति मनांत आणतां खरा स्वार्थत्याग ह्मणून ज्याला ह्मणतां येईल तो टिळक यांनीं केला आहे, व त्याबद्दल कोणीही देशभक्त त्यांची तारीफ केल्यावांचून राहणार नाहीं. यांच्या स्वार्थत्यागासंबंधानें पंडित श्यामजी कृष्णवर्मा यांनीं आपल्या 'इंडियन सोशिआलाजिस्ट' नामक मागें विलायतेंत निर्भीडपणें चालविलेल्या मासिक पत्रांत असे उद्गार काढले आहेत:—

"We know of no other Indian who has made greater personal sacrifices for his country than Mr. Tilak"— Nov. 1905.

ह्मणजे "रा. रा. टिळक यांच्यापेक्षां ज्यानें देशाकरितां अधिक स्वार्थत्याग केला आहे, असा मनुष्य हिंदुस्थानांत असेल असें आह्मांस वाटत नाहीं."

'अमृतबझार पत्रिके'चे संपादक बाबू मोतीलाल घोस यांनीं १९०६ सालच्या कलकत्त्यांतील शिवाजी–उत्सवाच्या प्रसंगीं लो. टिळक यांच्या संबंधानें बोलतांना असें ह्मटलें आहे:—

"Such an example of Self-Sacrifice is not to be found in this country."

ह्मणजे स्वार्थत्यागाचें असलें उदाहरण या देशांत मिळणार नाहीं.

# लो० टिळक यांचीं गेलीं आठ वर्षें.

## [ 'लेखका 'चें निरीक्षण ]

## भाग २ रा.

### सामाजिक सुधारणेबद्दलचीं मतें.

#### सुधारणेची दिशा.

लो. टिळक यांस सामाजिक सुधारणा हवी आहे. पण त्यांचे सुधारणेचे मार्ग इतर कांहीं समाज-सुधारकांहून भिन्न आहेत. स्त्रीशिक्षण, बाळ-विवाह, पोटशाखेंतील अंतर्विवाह, समुद्रयात्रा, इत्यादि बाबतींत समाजाची सुधारणा झाली पाहिजे; पण ही सुधारणा हिंदुत्व ह्मणून कांहीं विशिष्टपणा धरून झाली पाहिजे, असें त्यांचें मत आहे. हिंदुस्थानांत पारशी, मुसल-मान, ख्रिस्ती वगैरे अनेक जाती जरी आहेत, तरी हिंदु लोकांची संख्या जास्त असून इतर जातींवर हिंदुत्वाचा परिणाम आज कैक शतकें झाला आहे. अशा स्थितींत हिंदुत्वाला सोडून समाजाची सुधारणा होणें अ-शक्य आहे. समाज-सुधारणेचें हें तत्त्व लक्षांत न आणतां जे लोक सुधारणा करण्याचा प्रयत्न करतात त्यांचे प्रयत्न निष्फळ झाल्यावांचून राहणार नाहींत, असें त्यांना वाटतें; व ह्मणून आपल्या चालीरीती अगदीं कुचकामाच्या, आपला धर्म ह्मणजे थोतांड, आपली वर्णव्यवस्था अधो-गतीस नेणारी, सारांश, 'आपल्या पूर्वजांमध्यें चांगलेपणा मुळींच नव्हता, ते महामूर्ख होते, व आज आह्मांस जी अवनति प्राप्त झाली आहे त्यास कारण ते,' अशी जी कित्येक पहिल्या सुधारकांची समजूत होती ती किती चुकीची होती, व त्या समजुतीवर पाश्चात्य चालीरीतींची हुबेहुब नक्कल करून कायद्याच्या किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या साधनांनीं इकडील सुधारणेची इमारत उठविण्याचे जे त्यांचे प्रयत्न चालले होते ते किती अप्रयोजक होते हें वेळोवेळीं त्यांनीं दाखविलें आहे; व अद्यापपर्यंत या सुधारकांची ही दिशा बदलावी तशी बदलत नसल्यामुळें त्यांच्या

चांगला विचारही होणें शक्य नाहीं, असें यांचें मत आहे. यासंबंधानें त्यांनीं केसरीच्या २४।१२।९५ च्या अंकांत जे विचार प्रगट केले आहेत तेच आज कायम असल्यामुळें त्यांचे तेच शब्द येथें देणें गैरवाजवी होणार नाहीं. ते ह्मणतातः—

" सामाजिक परिषद ही राष्ट्रीय असूं शकेल ही कल्पनाच हास्यास्पद आहे. आज हिंदुस्थानांत अनेक जाती आहेत व त्यांचे आचारही अनेक आहेत; इतकेंच नव्हे तर, पुष्कळ अंशीं एकमेकांविरुद्ध आहेत. अशा स्थितींत सर्वांना प्रिय होईल अशी सामाजिक सुधारणा करण्याची हाव धरणें ह्मणजे शुद्ध वेडेपणा होय. मग सर्व जातिभेद व धर्मभेद मोडून टाकून सबगोलंकार करण्याचा परिषदवाल्यांचा हेतु असल्यास न कळे ! सुधारणा जर आपणास खरोखर कर्तव्य असेल व केवळ इंग्लिश लोकांस फसवून त्यांना खुष ठेवण्यासाठीं सामाजिक परिषदेचा फार्स रंगभूमीवर जगास दाखवावयाचा नसेल, तर आमच्या मतें प्रत्येक जातीकडून ह्या बाबतींत प्रयत्न झाले पाहिजेत. निरनिराळ्या जातीकडून जर सुधारणेसंबंधी कांहीं प्रयत्न झाला तरच तो सफल होण्याचा संभव आहे. तथापि, अशा वेळीं सुद्धां एक मोठी सावधगिरी ठेविली पाहिजे; ती ही कीं, सर्व सुधारणा एकदम आधाशाप्रमाणें लोकांवर लादली न पाहिजे."

## ज्या त्या जातीनेंच मनावर घेतलें पाहिजे.

एका धर्मांतील चालीरीतीची दुसऱ्या धर्मांतील लोकांनीं चर्चा करून सुधारणा करण्याचा प्रयत्न करणें गैर असून जातीजातींतच यासंबंधानें चर्चा झाली पाहिजे; व धर्माची बाब नाजूक असल्यामुळें केवळ युक्तीकडे लक्ष न देतां, धर्मास अनुसरून त्या जातीस पसंत पडतील अशाच उपायांचें त्यांतील लोकांनीं अवलंबन केलें पाहिजे, असें त्यांचें मत असून तें त्यांनीं ता. ४।७।०५ च्या केसरींत पुढीलप्रमाणें प्रगट केलें आहे. ते ह्मणतातः—

" पारशी लोकांत अलीकडे दोन मोठ्या सामाजिक चळवळी सुरू आहेत. एक परकीय धर्माचे व देशांतले पुरुष किंवा स्त्रिया विवाहानें किंवा अन्य तऱ्हेनें पारशी धर्मांत किंवा ज्ञातींत घ्यावयाच्या किंवा नाहीं ? आणि दुसरी, पारशांचीं प्रेतें गिधाडांपुढे टाकतात तसें न करितां तीं अग्नींत दहन करावीं कीं नाहीं ? या दोन्ही विषयांबद्दल मुंबईच्या पारशी पत्रांत व इंग्रजी पत्रांत बरीच चर्चा चाललेली आहे. परंतु मौज अशी कीं, हिंदुसमाजांत बालविवाहाची सुधारणा करण्यास झटणारे आणि त्याकरितां सरकाराकडे धांव घेणारे मलबारीशेट मात्र या चळवळीच्या बोर्डावर

झळकूं लागलेले दिसत नाहींत ! मलबारी शेटजींवरील आमचा हा आक्षेप नवा आहे असें नाहीं. पारशी लोकांत ज्या कांही सामाजिक सुधारणा हव्या आहेत तिकडे त्यांनी अगोदर लक्ष पुरवावयास पाहिजे होतें, असे आह्मीं मागेंच ह्मटलें होते. असो; मलबारी शेटजींचा कित्ता गिरवून पारशी लोकांतील सामाजिक चालीची विस्तृत चर्चा करण्याची आमची इच्छा नाही. हें काम त्यांचें त्यांनींच केलें पाहिजे, असें आमचें मत आहे. कारण, मृतांचे देह पक्ष्यांकडून खावविण्यापेक्षां अग्नींत दहन करणें हें युक्तिदृष्ट्या जरी अधिक ग्राह्य असले, तरी जेव्हां एखादी चाल धर्मांत रूढ होऊन बसलेली असते, तेव्हां त्या चालीच्या गुणावगुणांचा विचार धर्मदृष्टी बाजूला ठेऊन कधींही करतां येत नाहीं. धर्माची बाजू युक्तिदृष्ट्या कदाचित् लंगडी असेल, पण जगांतील सर्व व्यवहार कांहीं युक्तीनेंच होत नाहींत. प्राचीन कालापासून चालत आलेली धर्मपरंपरा युक्तीपेक्षां शतपट प्रबल असते. आणि ही धर्मपरंपरा कशी सुधारावयाची याचा विचार त्या धर्माच्या बाहेरील लोकांनीं करणें व्यवहारदृष्ट्या अगदीं अप्रयोजक होय. प्रेतें पक्ष्यांपुढें टाकावयाचीं, ही चाल हिंदु लोकांतही पुरातन कालीं असावी असा आमचा समज आहे. परंतु अग्निसंस्कार प्रचारांत आल्यानंतर या जुन्या चालीचें पिंडास कावळा शिवला पाहिजे, एवढेंच चिन्ह अवशिष्ट राहिलें असावें. अशा प्रकारचा प्रतिनिधि करून हल्ली असलेली प्रेतसंस्काराची चाल पार्शी लोकांस सोडून देतां येईल तर बरें. पण याचा विचार आमच्यासारख्या तिऱ्हाइतांनीं करण्यापेक्षां त्यांचा त्यानीच केला पाहिजे. परकीय लोकास स्वजातींत घेण्यासंबंधानेही हाच न्याय लागू आहे. परकी लोक आपल्या ज्ञातींत घेतल्यानें तेच आपल्यावर कुरघोडी करतील कीं आपण त्यास कबजांत ठेवूं, हा वादाचा मुख्य प्रश्न आहे; आणि सर्व समाजास जर असें वाटत असेल की, परकीय लोकांस आपल्या जातींत घेऊन आपली जात बिघडण्याचा संभव आहे, तर या कामीं युक्तीपेक्षां समाजाचेंच मत अधिक ग्राह्य मानले पाहिजे. हीं तत्त्वें कांहीं नवीं नाहींत. नुकताच पार्लमेंट सभेंत 'एलीन्स ॲक्ट' ह्मणजे परदेशांतील लोक इंग्लंडांत कायमचे राहावयास गेले असतां त्यांस इंग्लंडांत जन्मलेल्या इंग्लिश लोकांप्रमाणेंच हक्क द्यावे कीं नाही, याबद्दलचा कायदा जेव्हां पास झाला, तेव्हां इंग्लंडचे मुख्य प्रधान बाल्फोर यांनी जें भाषण केलें त्यांतही वर सांगितलेल्या तत्त्वांवरच हवाला दिला आहे. नदींत ज्याप्रमाणें समुद्राचा पूर सांठविला जात नाही, समुद्रांत नदीचा ज्याप्रमाणें सांठविला जातो, तद्वत् समाजाची स्थिति आहे. पारशी लोक जर्मन, फ्रेंच, व इंग्लिश लोकांबरोबर जर विवाह करूं लागले तर पारशी जात जर्मन, फ्रेंच, इंग्लिश वगैरे जातींत मिळून नाहींशी होईल किंवा विवाहित दंपत्यें पारशी होऊन पारशी जात कायम राहील, हा मुख्य मुद्याचा प्रश्न आहे; आणि त्यासंबंधाने काय करावयाचें हें ज्ञातीतील लोकांच्या बहुमतानेंच ठरविलें पाहिजे. अशा प्रकारचा ठराव करण्याचा अधिकार नि-

सर्गतःच प्रत्येक जातीस असतो, असें मि. बाल्फोर यांनीं आपल्या भाषणांत ह्मटलें आहे; आणि त्याच तत्त्वावर पारशी लोकांनींही या गोष्टीचा निकाल लावला पाहिजे. टाइम्ससारख्या इंग्रजी पत्रकर्त्यांनीं किंवा आमच्यासारख्या हिंदु पत्रकर्त्यांनीं यांत लुडबुडण्याचें कांहीं कारण नाही. आह्मांस बोध घ्यावयाचा तो एवढाच कीं, पारशी लोकांचा समाज आजमित्तीस हिंदुसमाजापेक्षां सरासरीनें जरी अधिक सुशिक्षित आणि मर्यादेनें जरी पुष्कळ कमी आहे, तरी धर्माच्या पायावर रचलेल्या व पुरातन कालापासून चालत आलेल्या सामाजिक चालीचा जेव्हां विचार करावयाचा असतो तेव्हां पारशी लोकांतही केवळ युक्तिवाद चालत नाहीं; मग हिंदुसमाजाची गोष्ट काशाला ?"

## राष्ट्रोन्नतीस जातिभेद व धर्मभेद आड येतात काय ?

जातिभेद व धर्मभेद राष्ट्रहिताच्या कामीं पुष्कळ विघातक आहेत ही गोष्ट खरी आहे, व सामाजिक सुधारणेवर राजकीय सुधारणा पुष्कळ अंशीं अवलंबून आहे, हीही गोष्ट खरी आहे. तथापि, हिंदुस्थानांत एक जात व एक धर्म झाल्याशिवाय राजकीय हक्कांस आह्मी पात्र होणार नाहीं किंबहुना देशोन्नतीस एक जात व एक धर्म यांची अत्यंत आवश्यकता असून सामाजिक सुधारणा हेंच राष्ट्रोन्नतीचें मूळ आहे, असें कित्येक सुधारकांस वाटत होतें व अद्यापही वाटत आहे. पण हा निव्वळ भ्रम असून जातिभेद किंवा धर्मवैचित्र्य हीं वाटतात तितकीं राष्ट्रोन्नतीस आड येत नाहींत असें त्यांनीं अनेक दाखले देऊन सिद्ध केलें आहे; व आज दहा बारा वर्षे ते हाच सिद्धांत लोकांच्या मनावर बिंबवीत आहेत. या सिद्धांताची थोडीबहुत ओळख वाचकांस पटावी ह्मणून १८९६ च्या जानेवारी महिन्यांत 'सामाजिक सुधारणेचे मार्ग' ह्मणून जे दोन लेख त्यांनीं केसरींत लिहिले आहेत, त्यांतील महत्त्वाचा भाग येथें देतों. ते ह्मणतातः—

"आह्मी आपल्या बायकांस शिक्षण दिलें नाहीं तर इंग्रज सरकार आपणांस राजकीय हक्क देणार नाहीं, इत्यादि विधानें आतां सर्वांस अगदीं पोरकट वाटूं लागलीं आहेत. आमचे सुधारक ज्या कांहीं सुधारणा हल्लीं करूं इच्छित आहेत त्या सर्व आयर्लंडांत झालेल्या आहेत. विधवाविवाह आहे, प्रौढविवाह आहे, जातिभेद नाहीं, मद्यमांससेवन यथेच्छ सुरू आहे; पण बिचारें आयर्लंड सात आठशें वर्षे धडपडत असतांही अद्याप परवशतेच्या निरय स्थितींतून बाहेर पडत नाहीं. यामुळे सामाजिक सुधारणा नको असें आह्मी ह्मणतों, असें कोणीही समजूं नये. आमचें एवढेंच ह्मणणें आहे कीं, डा. भांडारकर यांनीं सामाजिक सुधारणेचा व राजकीय

हक्कांचा जो हा संबंध जोडला आहे तो अगदीं भ्रांतिमूलक व निराधार आहे....... आयर्लंड देशांत या सर्व सुधारणा कधींच झालेल्या असतां व इंग्रजांचा व ऐरिश लोकांचा शरीरसंबंधही होत असतां त्यांस हे हक्क अजून कां मिळत नाहींत? सारांश, राजकीय हक्क मिळण्याचे अगर मिळविण्याचे मार्ग दुसरे आहेत.......आधीं सामाजिक सुधारणा करून आणि मग देशोन्नतीस लागलेले किती दाखले डा. भांडारकर यांच्यापाशीं आहेत, हे आह्मांस माहीत नाहीं. आमच्या दृष्टीस जी एक दोन उदाहरणे पडतात तीं त्याच्या उलट आहेत; त्यावरून डा. भांडारकर यांच्या सिद्धांताचें समर्थन होत नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्याचे अगदीं विरुद्ध अनुमान निष्पन्न होतें."

* * * *

" एका प्रसिद्ध इंग्रजी इतिहासज्ञ कायदेपंडिताचें असें मत आहे कीं, युरोपांतील राष्ट्रांची सुधारणा होण्यास त्यांतील वर्णव्यवस्था मोडून समाजाची रचना परस्परांच्या सोई व करार यांवर उभारली गेली हें मुख्य कारण होय. वर्णव्यवस्थेंत प्रत्येक मनुष्याचा धंदा अथवा उद्योग त्याच्या इच्छेहून भिन्न कारणांनी नियंत्रित झालेला असतो. परंतु युरोपांतील स्वतंत्र देशांत हवा तो धंदा हवा त्यास करण्यास मोकळीक असते, त्यामुळे परस्परांची चढाओढ लागून चांगले तेवढेच लोक पुढें येतात व बाकीच्यांस अन्नाचीही भ्रांत पडते, असें आतां पूर्णपणे आढळण्यात आलें आहे.* सारांश, कोणतीही समाज-

---

* सन १८९२ सालीं पुणें येथील औद्योगिक परिषदेपुढें रा. रा. टिळक यांनी "The Hindu caste from an Industrial point of view," या विषयावर एक निबंध वाचला होता. त्यांत धंद्याच्या दृष्टीनें वर्णव्यवस्था कितपत उपयोगी आहे याचें त्यांनी येणेंप्रमाणें विवेचन केलें आहे:—

" The institution of caste owed its origin, like so many other institutions to the circumstances of Hindu Society in ancient times, and as an organisation it has served its purpose by preventing the Knowledge of Industrial arts, by checking the abuse of despotic power, and generally by keeping up feelings of morality, self-respect and superiority amongst people. Excepting the lowest all Hindu castes, are based on difference in occupation, trade, profession or calling. Caste must therefore be regarded as secular and social organisation amongst the members of the Aryan race, for the preservation of hereditary occupations, and for the purposes of mutual help and co-operation, like the institution of Social and Trade Guilds in Europe during the middle ages. ... ... ... Dr. Brintano, in his history and development of Gilds and Trade Unions in Europe, has clearly shown that these institutions always

रचना घ्या, ती सर्वांशीं निर्दोष ह्मणून कधींही असावयाची नाहीं, हें तत्त्व आतां बऱ्याच लोकांच्या लक्षांत येऊन चुकले आहे. 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः' हा हिंदुसमाजाचा पाया आहे; * व इच्छेस येईल तसें करण्यास प्रत्येकास तो करारानें बांधला नसल्यास मोकळिक आहे, हें पाश्चात्य राष्ट्रांतील समाजरचनेचे तत्त्व आहे. आतां रा. ब. रानडे वगैरे कांहीं गृहस्थांचे असें ह्मणणे आहे कीं, आमच्या समाजाची इमारत या पूर्वीच्या पायावरून ओढून या दुसऱ्या पायावर ठेविली पाहिजे. नाहीं-

sprang up when Government failed to give protection to the Industrial classes. " As soon as the disorganisation spread and the gravest abuses became general, while the prospect of a maintenace of order by the state dis-appeared, the workmen formed their Trade Unions, against the aggressions of the then rising manufactoring lords, as in earlier times the old freemen formed their Frith-Gilds against the tyranny of the Medival magnates and free handicrafts men their Craft-Gilds against the agression of the old burghers. " We have seen that the organisation of caste served the same purpose in ancient times. The insitution of Mahajans and panchayats used to regulate the affairs of trade and dispense justice in petty matters more speedily and satisfactorily while the standard of morality especially as regards the connection between the saxes and the use of alcohol in both of which particulars the Indian workmen, is admitted by Mr. Elloit to be superior to his English brother-was rigidly maintained and carried out by the enforcement of caste rules and regulations. Can we not utilize the already existing institution of caste, in a similar way to improve in the material & moral condition of the working classes in India in their prepent state is therefore, the only question before us, and industrially considered I think there can be no two opinions on the point."

* चातुर्वर्ण्यासंबंधानें रा. रा. राजवाडे लिहितातः—" राज्ययंत्र उत्तमोत्तम ठेऊन व सैन्याच्या जोरावर अंतस्थ व बहिस्थ शत्रूंचा नाश करून धर्म, न्याय, नीति, व स्वास्थ्य ह्यांचा लाभ करून घेण्याकरितां, चातुर्वर्ण्याची पद्धत भारतीय आर्यांनी काढली, हे सुप्रसिद्ध आहे. अडीच हजार वर्षांपूर्वी ही पद्धत भारतवर्षांत इतकी नांवारुपास आली होती कीं, ग्रीस देशांत आल्प्लातून नामक जो तत्ववेत्ता झाला त्याला ती सर्वोपरी अनुकरणीय वाटली. अल्प्लातूनानें Republic ऊर्फ सुराज्य-नामक जो ग्रंथ लिहिला त्यांत अथपासून इतिपर्यंत चातुर्वर्ण्याचेच गोडवे गाइलेले आहेत."—मराठ्यांच्या इ. साधनें. खं. ६—प्रस्तावना.

पेक्षां एकोणिसाव्या शतकाच्या राष्ट्रीय झगड्यांत आपला निभाव लागणार नाहीं ! आमच्या मतें हें ह्मणणें सयुक्तिक नाहीं. युरोपांतील राष्ट्रांच्या समाजाची घटना जरी निराळ्या तत्त्वावर झाली असली तरी त्या राष्ट्रांतील समाजपद्धतीपासून वाईट परिणाम होत नाहींत, असें नाहीं. 'गांव आहे तेथें म्हारवडा आहेच,' या ह्मणीप्रमाणे युरोपांतील राष्ट्रांतही समाजसुधारणा होण्यास अद्याप पुष्कळ जागा आहे. चढाओढीच्या तत्त्वावर रचलेल्या समाजांत संपत्तीची सारखी वाटणी न होतां कांहीं अतिशय श्रीमंत व कांहीं अतिशय दरिद्री अशी स्थिति प्राप्त होते; आणि विवाह-संस्कारासही कराराचें स्वरूप आल्यामुळें विधवांच्या ऐवजी कुमारिकांची संख्या वाढून गृहस्थाश्रमाच्या सुखास पुष्कळ स्त्रिया अंतरतात. या दोन उदाहरणावरून अमुकच तत्त्वावर समाजाची रचना झाली असल्यास तें राष्ट्र सुखी होते हें ह्मणणें किती अविचाराचे आहे हें लक्षांत येईल. स्वतंत्रतेचा किंवा राष्ट्रीयत्वाचा अभिमान ह्मणून जो कांही जोम आहे तो जोपर्यंत जागृत असतो तोंपर्यंत समाजरचना कशीही असली तरी त्यांतील दोष राष्ट्राच्या उन्नतीस अथवा भरभराटीस आड येत नाहींत. पण एकदां कां तो जोम नाहीसा झाला, ह्मणजे तेच दोष रावणाच्या धनुष्याप्रमाणें छातीवर बसून जगांत त्या लोकांची उपहास्यता होण्यास कारण होतात ! सारांश, समाजरचनेपेक्षां लोकांमध्यें एक प्रकारचा आपल्या संस्थाबद्दल व देशाबद्दल अभिमान जागृत ठेवण्याची प्रत्येक देशकल्याणाकरितां झटणाऱ्या माणसानें आधीं तजवीज ठेविली पाहिजे."

## जातिभेदाची उत्पत्ति, आवश्यकता व शिथिलता.

जातिभेदाची उत्पत्ति कशी झाली, हिंदु समाजांत त्याची आवश्यकता किती आहे, बेटीव्यवहार निःशंकपणें सर्व जातींत सुरू झाल्यास त्याचा काय परिणाम होईल, सद्यःस्थितींत जातिबंधनें कितपत शिथिल करतां येतील, वगैरे गोष्टींसंबंधानें पंधरा वर्षांपूर्वींच त्यांनीं आपलीं मतें ठाम बनविलीं असून आजही तीं मनन करण्यासारखीं असल्यामुळें तीं येथें नमूद करणें गैरवाजवी होणार नाहीं. ता. ११ मे १८९३ च्या केसरींत ते ह्मणतातः—

"वेदकालीं जे आर्य लोक हिंदुस्थानांत आले, ते मांसाहार निषिद्ध मानीत नसत; तथापि, त्यांचा आणि हिंदुस्थानांतील मांसाहारी काळे लोकांचा 'वर्ण' एक नसल्यामुळें या दोहोंमध्यें जो भेद राहिला, तो अद्यापही नाहींसा झाला नाहीं. जातिभेदाचें आद्य बीज या वर्णभेदांतच आहे, असें आतां पुष्कळ विद्वानांचें मत झालें आहे.......हिंदुस्थानांत उत्तरेकडून आलेल्या आर्य लोकांनीं दस्यूंची पारध केली

नाहीं अगर ती त्यांस करतां आली नाहीं, हें आमच्यांतील जातिभेदाचें मूळ बीज होय. शूद्रादिकांस आर्यांचे कांहीं हक्क देऊन त्यांचा चातुर्वर्ण्यांत समावेश केला व गोडीगुलाबीनें आह्मी त्यांच्याबरोबर बरींच वर्षे काढलीं......आर्य व दस्यू यांच्यामध्यें जो वर्णभेद झाला तोच पुढे कायम राहून तार्तर, मुसलमान, मंगोलियन आणि सरतेशेवटीं इंग्रज वगैरे अनेक जाती पुढे हिंदुस्थानांत आल्यामुळे तो उत्तरोत्तर जास्त होत गेला. आतां एकदां कोणताही वृक्ष वाढीस लागला असतां त्यास जशा फांद्या फुटतात त्याप्रमाणें निरनिराळ्या वर्णांच्या ऊर्फ जातींच्या लोकांमधील वर सांगितलेला भेद वाढत जाऊन त्यास हजारों शाखा फुटल्या; व चातुर्वर्ण्याच्या ऐवजीं आज हिंदुस्थानांत हजारों जाती झाल्या आहेत. या सर्व जाती एकवट व्हाव्या अशी आशा करणें ह्मणजे बहुतेक अमेरिकेंतल्या युरोपियन लोकांनीं नीग्रोशीं सोयरिकी कराव्या असेंच ह्मणण्यासारखे आहे. मानवी स्वभावांत किंबहुना मनुष्याच्या रक्तांत ज्या कांहीं समजुती खिळून गेल्या आहेत त्यांपैकींच वर्णव्यवस्था ही एक समजूत होय. इंग्रज लोक कितीही उदार अंतःकरणाचे झाले, नेटिवांस त्यांनीं कितीही आपल्या बरोबरीनें वागविलें, तरी अखेरसि नेटिव तो नेटिव आणि युरोपियन तो युरोपियनच राहणार. धर्मांतर केलेल्या नेटिवांची ख्रिस्ती राज्यकर्त्यांकडून कशी संभावना होत आहे, हें लक्षांत आणलें ह्मणजे रोटीव्यवहार किंवा धर्मैक्य हीं दोन जातींची एक जात होण्यास कधींच फारशीं कारणीभूत होत नाहींत हें लक्षांत येईल. याखेरीज दुसरा असाही एक प्रश्न आहे कीं, निरनिराळ्या जातींत जे कांहीं विशिष्ट गुण आहेत व जे " चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः " या भगवद्गीतेंतील वचनाप्रमाणें अगदीं सृष्टीच्या आरंभापासून त्या त्या जातींत आढळून येत आहेत, ते कायम राखण्यास त्या त्या जातींतील विवाहसंबंध व सोयरिकी जातींतल्या जातींतच झाल्या पाहिजेत असा प्रतिबंध नसता, तर हिंदुस्थानासारख्या उष्ण प्रदेशांत आमच्या अंगचे गुण केव्हांच लुप्तप्राय होऊन आह्मी अगदीं नीच स्थितिप्रत पावलों असतों, असें एका विद्वान् इंग्रज ग्रंथकाराचें ह्मणणें आहे. इंग्लंडसारख्या थंड देशांतील सगळे लोक सगळीं कामें करण्यास ज्याप्रमाणें तयार असतात तशी स्थिति उष्ण देशांत कधींही रहावयाची नाहीं. करितां कोणत्याही गुणाचें येथें रक्षण करणें असल्यास तो गुण संभाळून ठेवण्याचें काम कांहीं विशिष्ट लोकांनीं आपल्या हातांत घेतलें पाहिजे, व हें काम जे लोक हातांत घेतात त्यांची कांहीं दिवसांनीं एक निराळी जातच बनून जाते. वर भगवद्गीतेंतील जें वचन दिलें आहे त्यांत गुणकर्मविभाग जो सांगितला आहे तो हाच होय.*

---

* प्रो. रंगाचार्य यांचेंही असेंच मत असून त्यांनीं १९०५ सालीं गीतेवरील एका व्याख्यानांत जातिभेदाची आवश्यकता कितपत आहे, निरनिराळ्या जातींत बेटी-

यांत, मूळच्या आर्यदस्यूंच्या वर्णभेदाची भर घातली ह्मणजे हिंदुस्थानांतील हल्लींच्या व्यवहार सुरू केल्यानें काय परिणाम होतील, व वर्णसंकर ह्मणजे काय, याचें येणेंप्रमाणें विवेचन केलें आहे:—

"Whether the free admixture of blood between individuals belonging to different communities, living at different levels of civilization with different ideals and aims and aspirations, is productive of any good in the cause of general human progress, has been only recently discussed by Dr. Bryce in his Romanes Lecture; and the conclusion to which he has come cannot but be interesting to us. He is of opinion that such admixture in the long run tends to diminish the wealth of character and the potency of civilization which human communities possess. Although the weaker community may gain a little in quality and in vigour by the admixture with a comparatively stronger one, community loses a great deal more by its correlated admixture with the weaker one. The loss of the stronger community being more on the whole, than the gain of the weaker community, such admixture is clearly not desirable in the interest of the progress of humanity as a whole. Instead of allowing such a free intermixture, it would therefore be better for mankind to achieve progress in a manner, in which each of the communities which so differ from one another, in point of capacity for culture and civilization, is kept aloof for marriage purposes, at the same time that it is given free scope to develop its own power and fitness to grow in worthiness and to prosper. The enduring worth of every community has always to be altogether self-evolved. External help by means of education, example, and preaching may be given with advantage to any community; but that help directly tells very little even upon the easily changeable mind, and leaves the blood with its hidden potentialites almost untouched. Herbert Spencer is also known to have been of opinion that even such races, as in spite of their differences, occupy similar levels of culture and civilisation, will suffer loss of power through unregulated intercrossing, owing to its tendency to disturb the stability of the physiological equilibrium of all the inherited racial and individual moral endowments. This wholesome fear of the degradation of the power of a race through too free intercrossing may distinctly be seen to be operating even now in all parts of the world.

Indeed this dread of unsuitable racial intermixture has be-

जातिभेदाची उपपत्ति व कारणें करून येतात. ... हल्लींची आपल्या देशाची स्थिति झटली ह्मणजे निरनिराळ्या जातींच्या अंगी असलेले गुण वाढविण्याचा प्रयत्न करून

come quite instinctive in man; nd it is through it that he has been able not only to maintain the purity of his blood but also to go on advancing in power and in civilization. If today in the world as it now is, any universally prevailing authority promulgates a law doing away with all social and racial brrriers in the matter of marriage, and declares that the men of all races and communities at any level of civilization and culture are perfectly at liberty to marry the women of all races and communities at any level of civilization and culture, and that such mixed unions alone are desirable and legitmate, then, in the course of a few generations, what will indeed be the condition of human civilization? A little contemplation, with the help of the valuable evidence bearing upon a question of this kind will enable us to see at once that the result will be degradation, that man will then be seen to be more rapidly going down into savagery than ever be moved up to win the worthiness of civilization. It is thus that we have to understand the dread of *Varna-Sankara*, which is so prominently noticable in all our ancient law-books. The purely racial conception of caste is considerably modified by the teaching given in the Bhagavadgita. But the original idea underlying caste was surely a race-idea. To induce the various contiguous races of mankind to live happily with each other, to enable every one of them to evolve its own power and achieve its own progress by means of well-ordered intrinsic efforts, and to make the various races and communities in the country as largely helpful to each other from outside as possible--such seems to have been the policy of social adjustment adopted so early in ancient India. Even without the internal social intermixture of marriage, it is possible for communities to be helpful to each other in various ways. It cannot be rightly denied that the Aryan and the Non-Aryan communities in India have in past times been on the whole helpful to each other, in spite of there having been no very free intermixture between them through marriage. The dread of *Varna sankara* has therefore a great deal to be said in its favour; indeed it seems to have been largely responsible for the development as well as the maintenance of Hindu civilization."

*The Indian Progress-15-11-05.*

त्यांतूनच होईल तितकें राष्ट्राचें हित करून घ्यावयास पाहिजे आहे. बेटीव्यवहाराखेरीज निरनिराळ्या जाती सारख्याच योग्यतेच्या राहूं शकतात, हें ब्राह्मण जातींतील पोटभेदांवरून उघड होतें. हाच नियम सर्वत्र लागू केला असतां हिंदुस्थानची उन्नति होण्यास देशांतील सर्व जातींची एक जात होईपर्यंत वाट पाहण्याची कांहीं एक जरूर नाहीं, असें अनुमान काढण्यास हरकत दिसत नाहीं. कारकुनी, शिपाइगिरी, व्यापार, शेतकी, इत्यादि जे धंदे आहेत ते तूर्त जातिपरत्वें आहेत तसेच कायम ठेवून धंदा बदलण्याची कोणाची इच्छा असल्यास त्यास तसें करतां येण्याची सवड ठेवावी, आणि व्यवहारांत ज्याचा ज्याचा मान त्याच्या त्याच्या योग्यतेवर व गुणावर अवलंबून रहावा, एवढी सध्यां व्यवस्था होणें इष्ट आहे व शक्यही आहे. ......जातिबंधनें पूर्वीच्या इतकीं आतां कडक राहणें शक्य नाहीं, ही गोष्ट आह्मांसही मान्य आहे; व त्यांपैकीं कांहीं बंधनें तर लवकरच नाहींशीं झालीं पाहिजेत, असेंही आमचें मत आहे. पण तेवढ्याकरितां सर्व जातींच्या व सर्व धर्मांच्या लोकांचे रोटीबेटीव्यवहार सुरू झाल्याखेरीज आमची उन्नति कदापि व्हावयाची नाहीं, असें ह्मणण्यास मात्र आह्मी तयार नाहीं. इतकेंच नव्हे तर, असलीं मतें प्रतिपादन करणें ह्मणजे एका अर्थी खऱ्या सुधारणेच्या ओघास थोडासा तरी प्रतिबंध करण्यासारखेंच आहे, असें आह्मांस वाटतें."

## आड काय येतो—जातिभेद कीं जातिमत्सर ?

**सामाजिक सुधारणेस जातिभेद आड न येतां जातिमत्सर अथवा जातीजातींतील दुही आड येते, ती टाकून सर्व जातींनीं आपापल्या जातीचा व जातींतील विशिष्ट गुणांचा अभिमान बाळगून सुधारणा करण्याचा प्रयत्न केला पाहिजे हें त्यांचें मत ता. २९।१०।१९०१ च्या केसरींतील 'मराठे आणि वेदोक्त कर्म' या त्यांच्या लेखांतील पुढील विवेचनावरून कळून येईल. तसेंच सामान्यपणें वेदोक्तासंबंधानें त्यांचें मत काय आहे हेंही सहज ध्यानांत येईल. ते ह्मणतातः—**

"वेदोक्त मंत्र संस्काराचे वेळीं ह्मटल्यानें कोणत्याही जातीस अधिक श्रेष्ठपणा येतो किंवा संस्कार अधिक शास्त्रोक्त होतो अशी जर कोणाची समजूत असेल तर ती चुकीची आहे. कारण, ब्राह्मण जातींत देखील स्त्रियांचे संस्कार, व्रतें, पूजा वगैरे पुराणोक्तच होतात. पण तेवढ्याकरितां ब्राह्मणांच्या सर्व क्रिया शूद्र जातीच्या आहेत, असें कोणी समजत नाहीं. सोळा संस्कारांत ज्या निरनिराळ्या क्रिया आहेत त्या चालवितांना वेदोक्त मंत्र ह्मणण्याची अवश्यकताच आहे असें नाहीं, व ब्राह्मण जातींतील संस्कार करते वेळीं जे वेदोक्त मंत्र ह्मणतात त्यांचाही विनियोग अर्थावरून न करतां पुष्कळ वेळां शब्दसादृश्यावरूनच केलेला असतो. अशा विनियोगास

लैंगिक विनियोग असें ह्मणतात; व वैदिक मंत्रांचे अशा तऱ्हेचे विनियोग केल्यामुळेंच आज हजारों वर्षे वेदांचे रक्षण झालें असा आमच्याकडील व पश्चिमेकडील विद्वानांचा सिद्धांत झाला आहे. गर्भाधानापासून अंत्येष्टीपर्यंत शास्त्ररीत्या संस्कार होणें हे जितकें अवश्य, तितकेंच ते वैदिक मंत्रानें झाले पाहिजेत हें अवश्य नाहीं; आणि वैदिक मंत्रांनी संस्कार झाले ह्मणजे मराठे व ब्राह्मण एकजातीचे होतील अशी जर कोणाची कल्पना असेल तर तीही निर्मूल आहे. ब्राह्मण जातींतील स्त्रियांस वेदोक्त मंत्र ह्मणण्याचा अधिकार नसताही त्या जातीने ब्राह्मण आहेत; आणि मराठे लोकांनी वेदोक्त मंत्र ह्मटले तरी ते मराठेच राहतील, हे लक्षांत ठेवलें पाहिजे. दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं, मराठे लोकांस आपण खरे क्षत्रिय असे जर वाटत असेल, तर आपले क्षात्रतेज व्यक्त करण्यास वेदोक्त मंत्रानें श्रावणी करणें हा कांहीं खरा मार्ग नव्हे. ज्या लोकांच्या पूर्वजानी गेल्या शतकांत मुसलमानी राज्याची लाट मागे हटवून हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन केलें ते जातीनें अस्सल क्षत्रिय असोत वा नसोत त्यांची योग्यता स्नानसंध्या करून धर्म राखणाऱ्या ब्राह्मणांपेक्षां कोणत्याही रीतीनें कमी आहे, असें आह्मी मानीत नाहीं. हें मत आज आह्मी नव्यानें सांगतों असे नाही. विश्वगुणादर्शांत कृशानूने महाराष्ट्रांतील ब्राह्मणांस "उपनयनविवाहौ उत्सवैकप्रधानौ" ह्मणजे ते लग्नमुंजी उत्सव ह्मणून करतात, शास्त्रोक्त ह्मणून करीत नाहींत, असा दोष दिला असतां "चमूनियमनेन वा जनपदाधिकारेण वा द्विजव्रज उपव्रजन् प्रभुपदं महाराष्ट्रजः ॥ न वृत्तिमिह पालयेद्यदि धरासुराणां ततो। भवेद्यवनवेष्टितं भुवनमेतदब्राह्मणम् ॥" असा विश्वावसूनें त्याचा परिहार केला आहे; आणि हाच न्याय मराठे लोकांसही पूर्णपणें लागू आहे. त्यांच्या घरच्या क्रिया वेदोक्त झाल्याने त्यास विशेष महत्व प्राप्त होईल असे मानणें अगदी चुकीचें आहे. 'क्षतात्किल त्रायत इत्युदग्रः । क्षत्रस्य शब्दो भुवनेषु रूढः' अशी क्षत्रिय शब्दाची कालिदासानें व्याख्या केली आहे. परंतु हल्लीचा काल असा आला आहे कीं, क्षत्रियानें देखील क्षतास मलमपट्टी लावूनच आपलें कर्तव्य उरकले पाहिजे. अशा स्थितींत आपले संस्कार वेदोक्त करण्यास झटण्यापेक्षा खऱ्या क्षात्रधर्मास उचित वर्तन ठेवणें हें खऱ्या क्षत्रियाचे किंबहुना ब्राह्मणांचेही कर्तव्य आहे, हे आह्मी सांगावयास नको. देशाला अनेक प्रकारची जी अनेक क्षते पडलीं आहेत तीं भरून काढण्याची महाराष्ट्रांतील मराठे व ब्राह्मण यांना ईर्षा बाळगली पाहिजे.......
कांहीं मराठे मंडळींनी हट्टानें जरी वेदोक्त क्रिया केली तरी सामाजिक किंवा राष्ट्रीयदृष्ट्या त्यापासून त्यांस कांहीं फायदा नाहीं. कारण, हल्ली कित्येक युरोपियन लोकही जर वेदपठण करतात तर त्या प्रमाणेच वेदोक्त कर्म करणाऱ्या मराठ्यांची स्थिति होईल. यांत कांहीं भूषण नाही, बहुमान नाहीं आणि देशकार्यही नाहीं. महाराष्ट्रांत मराठे लोकांस जो मान आहे तो त्यांच्या वाडवडिलांच्या शौर्यामुळें त्यांस प्राप्त झालेला आहे व

तशा प्रकारचे शौर्य, धाडस व देशाभिमान हे गुण जोंपर्यंत त्यांच्यामध्यें जागृत राहतील तोंपर्यंत त्यांचा मान कधींही कमी व्हावयाचा नाही. वेदोक्त कर्म करणारे ब्राह्मण पाणी भरतात आणि पुराणोक्त कर्म करणारे मराठे राजपदाचा अनुभव घेतात, हे जर आह्मी डोळ्यानें पाहात आहों, तर वेदोक्त मंत्रांनीच आपले संस्कार झाले पाहिजेत असा मराठ्यांनीं आग्रह धरणें चुकीचे नव्हे काय? संस्काराच्या वेळी वैदिक मंत्र ह्मणणें हें आज हजारों वर्षे चालत आलेल्या वहिवाटीने एका विशिष्ट जातींतील पुरुषांचें (स्त्रियांचें नव्हे) लक्षण झालें आहे; परंतु जाती जातीस जो कांहीं मान आहे तो या लक्षणावर नसून त्या त्या ज्ञातींत कार्यकर्ते पुरुष ज्या प्रमाणावर निपजतात त्या प्रमाणावर आहे ही गोष्ट इतिहासावरून सिद्ध होत आहे. असें असतां केवळ अज्ञानानें किंवा मत्सरानें एका जातीने दुसऱ्या जातीच्या विशिष्ट लक्षणाचा अंगीकार करण्याचा प्रयत्न करावा व त्यास शाहाण्या माणसांनी उत्तेजन द्यावे हे बरोबर नाहीं."

## राष्ट्रीयत्वाच्या पायावर सुधारणा.

वरील विवेचनावरून राष्ट्राची प्रगति होण्यास राष्ट्रांतील निरनिराळे धर्म, जाति अगर समाज हे आड येत नाहींत; एवढेंच नव्हे तर, उलट आपण ज्या राष्ट्रांत आहों त्याचा विशिष्टपणा कायम राहिला पाहिजे अशा हेतूनें सुधारणेचें सकाणू फिरविल्यास निरनिराळ्या धर्मांत, समाजांत, अथवा संस्थांत जोम येऊन त्या त्या समाजाची सुधारणा सहजीं होते.*

---

* सुधारणेस जाति, धर्म वगैरे आड न येतां लोकांत कोणते गुण असले ह्मणजे राष्ट्रोन्नति होते यासंबंधी इतर कांहीं विद्वान् लोकांची व पत्रकर्त्यांचीं मतें थोडक्यांत येथें देतों; ह्मणजे त्यांवरून टिळक यांच्या मताचे महत्त्व वाचकांच्या लक्षांत येईल.

'मद्रास रिव्हू' कर्ते नोव्हेंबर १९०३ च्या अंकांत लिहितात:—

"Caste has been said to be the bane of India; but in our opinion, caste is by itself no obstacle to national progress. It is the spirit of caste, the desire for the supremacy of one caste over another, that interferes with the development of national felling and aspirations. ... ... ... When men feel the necessity for national union and co-operation, they are bound to conceal their caste and sectarian feelings, if not actually to suppress them. This itself involves a course of self-discipline which, in the long run, cannot fail to produce an abiding influence on men's attitude and feeling."

## हिंदु लोकांस प्रवासांत खाण्यापिण्यासंबंधीं सवलती असाव्या व परदेश-

अनेक जाति, धर्म किंवा भाषा ही राष्ट्रीयत्वास मुळीच आड येत नाहींत, हे विलायतेंतील ' इंडिया ' पत्रकर्त्यांनी अनेक देशांतील लोकस्थितीवरून सप्रमाण सिद्ध केले आहे. ते ह्मणतात:—

"For nationality our contemporary (Indian Nation) insists, there must be a substatantial unity of language, religion and race. Is it so ? As regards language, Belgium is bi-lingual, the Swiss are divided between three languages, French-speaking Louisiana finds no difficulty in taking her place among the states of the American union, and England was a nation while French was still the language of the Courts of Law, and before the speech of the Eastern Midlands had supplanted the other dialects. Conversely, unity of language does not make the United States and England one nation. It is the same with race and religion. All the nations of modem Europe are of mixed blood. The diversity of sects in England and America is notorious. In Germany, besides the division of the Christians into Protestants and Catholics, there are great numbers, espesially among the workmen of the towns, who do not profess Christianity. In France, the type of an intense nationality, there are three established religions-Catholic, Protestant, and Jewish; and those who stand outside these Churches are now strong enough to threatene the severance of their connection with the State. As to unity of life, that probably exists much more in India than Indians belive. There are certainly many common features which strike the foreign observer. Of course unity in race, religion and language strengthen nationality; but a common fatherland, a common Governmant, common hopes and fears and sufferings are still more important. A great effort for the public good is the most important of all. Such common action may well unite India." 26-8-04.

जातिभेदामुळें हिंदुसमाजाचें नुकसान झाले नसून उलट त्यानें किती कार्य केलें आहे याविषयीं ह्मैसूर संस्थानांतील अॅबे जे. ए. डुबाइस ( Abbe. J. A. Dubois ) नांवाच्या एका मिशनरीनेंही ' हिंदुस्थानचे लोक ' ( People of India ) या फ्रेंच भाषेंत लिहिलेल्या ग्रंथांत येणेंप्रमाणें वर्णन केलें आहे:--

" I consider the institution of castes amongst the Hindu nations as the happiest effort of their legislation; and I am well-

गमनासंबंधीं निर्बंध कमी असावे म्हणून आकांडतांडव करणाऱ्या व त्या बरोबर प्रसंगविशेषीं शास्त्र, धर्म, समाजबंधनें हीं नाहींशीं करा ह्मणणाऱ्या लोकांनीं पूर्वी राघोबादादांचे वेळीं अटकेपर्यंत किंबहुना त्याच्या पलीकडेही हिंदु लोक जाऊन आले तरी त्यांचा धर्म लयास गेला नाहीं, कीं परत स्वज्ञातींत मिसळण्यास कोणाची आडकाठी झाली नाहीं. हल्लींच्या स्थितींतही चीन, जपान, सीलोन वगैरे ठिकाणीं व्यापाराच्या निमित्तानें गेलेल्या व जाणाऱ्या हिंदु लोकांस हिंदुत्व कायम राखण्याची इच्छा असल्यास स्वज्ञातींत येण्यास कोणतीच अडचण पडत नाहीं. तात्पर्य, प्राचीन संस्था व प्राचीन धर्म यांची चाड बाळगणारांस व परिस्थित्यनुरूप शक्य ते जातिनिर्बंध मानण्यास तयार असणारास, अर्थात् राष्ट्रीयत्वाचा अभिमान बाळगून आपलें वैशिष्ट्य कायम ठेवणारास सामाजिक सुधारणा पुढें ढकलण्यास कोणताही प्रतिबंध नाहीं. असें त्यांचें मत आहे; व तें थोडक्यांत त्यांनीं १९०५ सालीं मुंबईस समाजिक परिषदेंत श्री. सयाजीराव महाराज यांनीं जें भाषण केलें त्यावर टीका करतांना पुढीलप्रमाणें ता. १०।१।१९०५ च्या केसरींत व्यक्त केलें आहे:—

" सामाजिक सुधारणा हे राष्ट्रीय उन्नतींचें एक अंग आहे; अर्थात् या अंगाचा राष्ट्रीयत्वाशी जर पूर्ण संबंध नसेल तर सामाजिक सुधारणेस केवळ मनःपूत आचाराचेंच स्वरूप प्राप्त होईल, हे निराळे सांगावयास पाहिजे असें नाहीं. ...... राष्ट्रीयत्वाची दिशा सुटली ह्मणजे समाजसुधारणा झाली काय आणि न झाली काय सारखीच होय. सुधारणा हा शब्दच तारतम्य–बोधक आहे. जगांत अशी कोणतीही संस्था नाही कीं, ती सर्वांशीं निर्दोष किंवा सर्वांशीं सदोष असूं शकेल. प्रत्येक सामाजिक संस्थेंत काही गुण तर काही अवगुण हे असावयाचेच; व जे एका परिस्थितींत गुण असतात तेच पालटलेल्या परिस्थितींत अवगुण होतात. अशा वेळीं जीवनशास्त्रांतील नियमाप्रमाणें गुणावगुणाची अदलाबदल होऊन नूतन परिस्थितीला अनुरूप असेंच स्वरूप प्राचीन संस्थांस मिळालें पाहिजे. परंतु हा फरक होतांना आत्मीयत्व नाहींसे होणार नाहीं अशी व्यक्तिमात्राप्रमाणेंच समाजानेंही खबरदारी घेतली पाहिजे. "

---

convinced that if the people of India never sunk into a state of barbarism, and if when almost all Europe was plunged in that dreary gulf, India kept up her head, preserved and extended the sciences, the arts and civilization; it it is wholly to the distinction of castes that she is indebted for that high celebrity."

सामाजिक सुधारणा राष्ट्रीयत्वाच्या पायावर पाहिजे असें जें त्यांनीं १९०४ सालांत मद्रास येथें जी नवी 'हिंदुसभा' निघाली त्या वेळीं लिहिलें होतें त्यांतील मथितार्थ हाच होय. त्या वेळचे त्यांचे उद्गार असे आहेत:—

"सामाजिक सुधारणेचा प्रश्न हल्लीं ज्या लोकानीं पुढें आणलेला आहे त्यांस हिंदुत्वाचा अभिमान नाहीं. हिंदुत्व म्हणून कांहीं विशिष्टपणा पाहिजे, असें त्यांचें म्हणणें नाहीं; व हिंदुधर्मांतील तत्वें समजून घेण्याचा त्यांनीं कधी प्रयत्न केलेला नाहीं, असें प्रो. रंगाचार्य* यांचें म्हणणें आहे व तें खरेंही आहे. हा परिणाम इंग्रजी शाळांतून मिळत असलेल्या शिक्षणाचा आहे, ही गोष्ट प्रो. रंगाचार्य व आनि बिझांट यांस कबूल आहे. पण त्यांचे असें म्हणणे आहे कीं, केवळ समाजाच्या चालीरीतींत अमुक अमुक फरक झाले म्हणजे सुधारणा होते असें नाहीं. कोणत्याही सुधारणेचा मुख्य उद्देश म्हटला म्हणजे विशिष्ट राष्ट्रीयत्वाचा अभिमान जागृत करणे हा होय. तो अभिमान आम्ही कोणता धरावयाचा? अर्थात् हिंदुत्वाचा होय. आम्हांला धर्माची कांहीं एक परंपरा आहे. त्या परंपरेत जें ज्ञान आहे तें इतर धर्मांतील ज्ञानाच्या बरोबरीनें किंबहुना त्याहूनही श्रेष्ठ आहे; आणि ही परंपरा जर आम्ही सोडून दिली तर आमचें असें म्हणण्यासारखें आम्हास सामान्य बंधन कांहींच नाहीं, या गोष्टी आम्हीं नेहमीं लक्षांत बाळगिल्या पाहिजेत. सामाजिक परिषदेचे पुरस्कर्ते आणि प्रो. रंगाचार्य व बिझांटबाई यांच्यामधील खरा मतभेद जो आहे, तो हाच होय."

## धार्मिक अनुज्ञा, उपयुक्ततावाद व पुढाऱ्याचें आचरण.

हिंदु लोकांच्या समाजसुधारणेचा धर्माशीं विशेष संबंध असल्यामुळें†

---

* प्रो. रंगाचार्य हे मद्रासच्या 'हिंदुसभे'चे मुख्य पुरस्कर्ते असून त्यांनीं "Hindu social reform on National Lines" या नांवाचा जो लेख प्रसिद्ध केला आहे त्यांत "हिंदु-समाजाची राष्ट्रीयत्वाच्या पायावर सुधारणा झाली पाहिजे" या विषयाचें उत्कृष्ट विवेचन केलें आहे.

† कै. न्या. रानडे म्हणतात:—

"Our deliberate conviction has grown upon us with every effort, that it is only a religious revival that can furnish sufficient moral strength to work out the complex social problems which demand our attention. Only a religious revival, a revival not of forms, but sincere earnestness which constitutes true religion, can effect the desired end."

धार्मिक तत्त्वांस व अनुज्ञांस झुगारून देऊन केवळ उपयुक्ततावादी होणें चांगलें नव्हें, असें टिळक यांचें मत असल्यामुळें धर्मशास्त्राचा बदललेल्या परिस्थितींत जेवढा उपयोग करून घेतां येईल तेवढा करून घ्यावा व धार्मिक संस्था आणि धर्मगुरु यांच्या साहाय्यानें सुधारणा प्रचलित करावी अशाविषयीं यांचे प्रयत्न चाललेले असत. नवे पंडित जुन्यांचा मान ठेवीत नाहींत व जुन्या पंडितांस नव्यांची ओळख नाहीं, ही स्थिति बदलून एकमेकांत ऐक्यभाव वाढून परस्परांच्या समत्तीनें सुधारणेचा गाडा ढकलल्यास त्यास प्रतिबंध होण्याचा संभव कमी आहे, एवढेंच नव्हे तर, सुधारणा प्रिय होईल तर अशाच रीतीनें होईल हें जाणून पूर्वीच्या संस्था व नवेजुने पंडित यांच्याशीं सामाजिक बाबतींत खल करून त्यांची अनुकूलता उत्पन्न करण्याचे प्रसंग हे सहसा दवडीत नसत. आतां, राजकीय उन्नति करण्याविषयीं जसें कायावाचामनें करून हे प्रयत्न करीत असत, किंबहुना राजकीय उन्नतीविषयीं झटणें ही यांच्या कर्तव्याची मुख्य दिशा होऊन बसल्यामुळें त्या बाबतींत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असे दोन्ही तऱ्हेचे जसे त्यांचे प्रयत्न चाललेले असत, तसे सामाजिक सुधारणेच्या बाबतींत नसत. तथापि, स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, इत्यादि कांहीं सुधारणा त्यांनीं अमलांत आणल्या आहेत.

पुढाऱ्यानें सामाजिक सुधारणेस स्वतःच्या उदाहरणानें किती गति द्यावी हा एक महत्वाचा प्रश्न असून त्याचा टिळक यांच्या वर्तनाशीं बराच

---

स्वामी विवेकानंद ह्मणतातः—

" Of all the forces that have worked and are still working, to mould the destines of the human race, none certainly, is more potent than that, the manifestation of which we call religion. All social organisations have as a background somewhere, the workings of that peculiar force, and the greatest cohesive impulse ever brought into play amongst human units has been derived from this power of religion. It is obvious to all of us, that in very many cases the bonds of religion have proved stronger than even the bonds of race, or climate or even of decent. It is a wellknown fact that persons worshipping the same god, believing in the same religion have stood by each other, with much greater strength and consistency than people of merely the same decent or than even brothers."

संबंध असल्यामुळें त्या संबंधानें दोन शब्द येथें लिहिणें इष्ट आहे. सामाजिक बाबतींत पुढाऱ्याची बोलण्याप्रमाणें कृति किंवा मताप्रमाणें आचरण झालें तर त्याच्या नीतिधैर्याचा ठसा लोकांच्या अंतःकरणावर उमटतो हें खरें आहे. तथापि, या गोष्टीचा विचार करतांना पुढारी आपल्या आचरणानें ज्या सुधारणा अमलांत आणतो त्याच्या इष्टाइष्टतेबद्दलही विचार करणें अवश्य आहे. हवी ती सुधारणा, हव्या त्या वेळीं व हव्या त्या रीतीने पुढाऱ्यानें आचरणांत आणल्यानें समाजाची केव्हांही प्रगति तर होत नाहींच; पण उलट तिची पिछेहाट होऊन अशा पुढाऱ्याबद्दल लोकांत जो पूज्यभाव असतो तोही नष्ट होतो. लोकांच्या संवयी कोणत्या आहेत, त्यांना शिक्षण कसलें मिळालें आहे, त्यांची मनोरचना व मनोधर्म कशा प्रकारचे आहेत, त्यांची आचारपरंपरा काय आहे, त्यांच्या धर्माचे मर्म कोठें आहे, इत्यादि गोष्टी लक्षांत आणूनच पुढाऱ्याने कोणतीही सुधारणा स्वतःच्या आचरणांत आणली पाहिजे. नाहींपेक्षां त्याच्या आचरणाचा कांहीं एक उपयोग न होतां तोही समाजापासून अलग होतो; व अशा रीतीनें एकदां तो समाजापासून अलग झाला ह्मणजे इतर बाबतींतही लोक त्याचें ऐकत नाहींत. अर्थात् समाज त्याला मुकतो व तोही समाजाला मुकतो. ही स्थिति देशाला घातुक असल्यामुळें लोकनियंत्यानें कोणतींही मतें स्वतःच्या आचरणांत आणतांना फार जपून वागलें पाहिजे. आमच्या समाजांत कित्येक सुधारणा अमलांत येण्यास अद्याप लोकमत असावें तितकें तयार नाहीं. तें अगोदर पुढाऱ्याने तयार केलें पाहिजे; व तेंही इतक्या कुशलतेनें केले पाहिजे कीं, लोकांना सुद्धां आपल्या विचारांत क्रांति झाल्याबद्दल वाईट वाटतां कामा नये. लोकांची विचारक्रांति झाल्यावर आपोआपच आचारक्रांतीबद्दल त्यांची सहानुभूति उत्पन्न होईल; व अशी सहानुभूति उत्पन्न झाली ह्मणजे मग पुढाऱ्याच्या आचरणाबद्दल त्यांना वाईट न वाटतां त्याचा प्रगतीकडे उपयोग होईल. सामाजिक सुधारणेच्या बाबतींत लोकनायकाने अशाच प्रकारचें वर्तन ठेविलें पाहिजे, असें 'ग्रंथमालाकारां' चें मत असून त्यांनीं जुलै १९०४च्या (१२४ व्या) अंकांत पुढील मार्मिक विचार प्रदर्शित केले आहेत. ते ह्मणतातः—

"लोकांस शिक्षण देऊन त्यांचे विचार आपल्या विचारांप्रमाणें करण्यास व त्या

विचारांप्रमाणे गोष्टी घडवून आणण्यास एक गोष्ट जरूर असेल तर ती सामान्य लोक ज्या तऱ्हेने वागतात त्याहून कांहीं निराळ्या तऱ्हेनें आपण वागतो असे शहाण्याने त्यांच्या मनांत येऊं देतां कामा नये. एकदम भलतीच मतें सांगून त्यांच्या मनास अस्थिरपणा आणूं नये. चालली आहेत तशी सर्व कृत्यें चालू ठेऊन त्यांना नकळत त्यांच्या विचारांत क्रांति घडवून आणली पाहिजे. उंच टेकडीवर मुळच्या वाटेनें अशक्त माणसास जातां येत नाहीं व गेला असतां दुष्परिणाम होईल हे जाणून थोडा थोडा कल देऊन तयार केलेल्या लांब पडणाऱ्या रस्त्याने आपण चढती चढत आहों हे त्या अशक्त माणसास न कळेल अशा गतीनेच त्यास नेले पाहिजे. उंच जावयाचें आहे, हे पहा मी कशा भराभर ढेंगा टाकतो तशा तूं टाक, असें त्याला ह्मटले तर तो हालणार नाहीं व इतका पल्ला मला झेंपणार नाहीं असेंच ह्मणेल. याच दृष्टांताप्रमाणें मूढ जनांच्या मनाची प्रपंचावरची आसक्ती सोडवूं पाहणाऱ्या गुरूनें किंवा जनसमूहाच्या मनातील राजकीय किंवा सामाजिक बंधनापासून मुक्तता करूं इच्छिणाऱ्या लोकनायकाने आपले वर्तन ठेविलें पाहिजे. ”

मद्रासच्या ‘ हिंदु ’ पत्राचे माजी एडिटर व ‘ इंडियन पेट्रिअट ’ पत्राचे प्रस्तुतचे एडिटर मि. सी. करुणाकर मेनन हे तेथील हिंदु ‘सोशल रिफार्म असोसिएशन’ च्या एका सभेत अध्यक्ष असतांना तीन वर्षांपूर्वी या विषयासंबंधानें त्यांनीं आपलें मत पुढीलप्रमाणें प्रगट केलें आहे:—

“A question that is commonly asked is whether the reformer ought to wait to act until the mass of the people are prepared to go with him or whether he should not proceed in advance of them. The latter is, indeed, more heroic, and is therefore, recommended by some earnest men. This is a matter which each man should judge for himself. Ram Mohan Roy took the latter view, and Ranade the former. The majority of people would indeed, go with Rande; for it would be widely acknowledged that though it is great virtue to suffer for a cause, the sacrifice is not worth making, unless it is justified by the result. The reformation of society is not effected by the suffering of solitary individuals here and there; it can be achieved only by impregntaing society as a whole with the new ideas and sentiments. Example, no doubt, influences conduct, but in the present state of our society example in advance of the thoughts and sentiments of the community can affect but very few. Those who realise this are content to inflence the thoughts and sentiments of their countrymen, and radually to prepare them for the acceptance of

the new ideas which find favour with the reformers of the day. They consider that the reform of society being the end, no purpose is served by individuals breaking from it, and that the best way of facilitating refrom is to adopt conciliatory meathods, to influence the sentiments of the people, and to harmonise your meathods to the changing feelings among them."

सामाजिक विषयाच्या चर्चेस वाहिलेल्या मद्रासच्या 'इंडियन प्रोग्रेस' नांवाच्या वजनदार पत्रानें सुधारकानें 'बोले तसा चाले' या म्हणीचे कितपत अवलंबन करावे यासबधानें लिहिताना पुढील महत्त्वाचे विचार प्रगट केले आहेत:—

"To take in 'action' a decided step *far in advance* of the prevalent social ideas of the day is often to place oneself in a position of antagonism to the feelings and institutions of the society, and thus far from advancing the progress of the cause of reform, leads to the social ostracism of the reformer and defeats his end. Martyrdom in social life is much greater folly than political martyrdom, for it loses sight of the real end and aim with which the martyr started. 'No progress of the individual which is out of touch with the ebb and flow of the popular life that is around can, in any way, contribute to real social advancement.' In the present condition of Hindu Society the rôle of the reformer is more that of the 'critic' than that of the 'man of action' involving necessarity more of thought and speech than of action. He has first to educate himself to perceive that the reforms he proposes are really needed and truly conducive to the welfare of the society whose advancement he has at heart and carefully to note that the good te be achieved by the proposed reforms is not more than counterbalanced by the injury to society that may ultimately result from mainfold sources originally unseen, in the practical operation of those schemes. His more difficult task is to make the community perceive the need for and the benefits of the proposed reforms and gradually to cultivate among its members a feeling in their favour. The true reformer's attitude is, therefore, to be 'liberal in thought, yet cautious in action.' 'Transformation of thought' rather than practical action must be his aim, far from the former there will in the maturity of time come 'the impulse which alone could lead to any wholesome scheme of social reconstruction. No project of reform can prove successful, at any

rate beneficent, if it does not 'take full cognisance of the actual conditions and limitations' of human nature and of social life. The reformer must be a 'reformer of the future rather than of the present.'—*1st April 1905.*

वरील विद्वान् लोकांच्या मतांवरून सामाजिक सुधारकानें कोणत्या सुधारणा, कोणत्या वेळीं स्वतःच्या आचरणांत आणाव्या हें वाचकांच्या ध्यानांत येईल; व त्यावरून टिळक यांचीं कित्येक सामाजिक सुधारणासंबंधाचीं मतें व आचरण हीं वरील नियमास कां अनुसरून आहेत याचीही त्यांना उपपत्ति करतां येईल.

## सामाजिक सुधारणा व कायदा.

सामाजिक सुधारणेच्या कामीं कायद्याचें साहाय्य कितपत घ्यावें याविषयी टिळक यांचें मत असें आहे कीं, जोंपर्यंत लोकमत अनुकूल नाहीं तोंपर्यंत जबरदस्तीनें त्यांच्यावर कायदा लादल्यानें त्यापासून फारसा उपयोग होणार नाहीं.* सन १८९१ सालीं समर्त्तावयाचा कायदा जेव्हां पास झाला तेव्हां टिळक हे कायदा करूं नये ह्मणणारांच्या बाजूस असून त्या वेळीं त्यांनीं त्याचा जोरानें निषेध केला आहे; व धर्मशास्त्र, आचार, रूढी, मनोधर्म,† वगैरेंच्या दृष्टीनें तो किती निरुपयोगी आहे हें सप्रमाण दाख-

* लोकमत अनुकूल नसतां जबरदस्तीनें एकादा कायदा लोकांवर लादला ह्मणजे त्याचा कितपत उपयोग होतो हें ह्मैसूर संस्थानांतील बालविवाहाच्या कायद्यासंबंधाची १९०५ सालची जी हकीकत प्रसिद्ध झाली आहे त्यावरून दिसून येईल. या कायद्यान्वयें त्या सालीं ७८ खटले झाले, तरी लोकांची बालविवाह करण्यासंबंधानें प्रवृत्ति कमी झालेली नाहीं व त्यामुळें या कायद्यानें फायदा होत नाहीं अशी ओरड ह्मैसूर संस्थानचे पोलिस--इन्स्पेक्टर--जनरल यांनीं केली आहे.

† पाश्चात्य राष्ट्रांतील लोकांचा मनोधर्म आमच्या राष्ट्रांतील लोकांच्या मनोधर्माहून भिन्न असल्यामुळें व त्यांचा बराच व्यवहार केवळ उपयुक्तता, बुद्धिवाद व कायदा यावर रचला असल्यामुळे त्यांच्या अनुकरणाचा परिणाम आमच्या समाजास केव्हांही हितकर होणार नाहीं. पाश्चात्यांच्या व आमच्या मनोधर्मांत किती फरक आहे याचें 'अमृतबझारपत्रिका'कारांनीं १९०५ सालीं "Sentiment and Reoson" या लेखांत थोडेसें विवेचन केलें आहे. तें मौजेचें असल्यामुळे वाचकांकरतां मुद्दाम येथें देतों:—

"Western Civilization is opposed to sentiment. The notion *is*

विलें आहे. यासंबंधाचा वाद जंगी असून तो त्या सालच्या केसरीचे

even held that marriage itself is a sick sentimentality, and therefore a mistake. Why should not men and women live together so long it suits their convenience and let the state take charge of the fruits of such connections? That is the idea of a good many men of light and leading in the West. Adultery is thus considered a Civil offence in Europe and America for which damages are a sufficient punishment. A man in Asia, whose wife or female relation has been led astry by anotner man, demands the blood of the latter as compensation for the wrong done to him. But in the West money wipes out the injury, only the damage must be assessed at in accordance with the beauty and some other circumstances of the seduced woman. It is thus that religion is fast disappearing before modern civilization. In America at least, men, as a rule have very little to do with the church and priests; even the women are not much better. In the midst of the sucess, the wealth, the luxury of American society, Mr. Roosevelt, addressing a Mother's Congress the other day, cried aloud for model wife and model mother!

They in the West have such a contempt for sentiments that many of them blamed the Indians, when during one of their periodical famines, they permitted themselves to die of starvation though they could easily have saved themselves by killing their cows, and eating their flesh. By objuring meat from mere sentiments they could not save the cows, but they only lost their own lives. Here both reason and argument are on the side of the westerners; all the same, the Hindu will die and not touch beef. It is these traits in Hindu character which mark them out from other races. Sir Charles Elliott, a late Lieutenant-Governor of Bengal, was pleased to declare that he could understand the Mussalmans-nay, the Parsis; but the Hindus were a deep mystery to him.

The Hindus, on their part, also find it difficult to understand the westerners, when they seek to trample sentiment under foot. The story, how sentiment came to be undervalued in Europe, may not be generally known. Civilization in Europe came from Greece; and it is a greek Philosopher who proved it, by an unassailable argument, that sentiment was a weakness and ought to be, therefore, crushed without remorse. Human flesh, said he,

अंक वाचल्याखेरीज समग्र वाचकांच्या लक्षांत येणार नाहीं. तथापि,

---

has been proved to be wholesome food; for cannibals thrive upon it. Why should not the civilized man then use it instead of burying the dead? Why if the dead were not buried, but their flesh roasted or converted into soup, men would secure a new scurce of healthy food for themselves in large quantities But men, under the influence of foolish sentiment, throw away such excellent food: and worms fatten upon it.

The philosopher went the length of laying it down that as reason and agrument were on his side, people should give up their prejudice begotten of false sentiment and commence eating their dead parents instead of burying their bodies and making them food for worms. The philosopher eloquently declared that we would show greater reverence to our parents by eating them ourselves than by making the worms do it

हिंदुस्थांनांत कायद्यानें साजाजिक सुधारणा घडवून आणण्यास किती अडचणी आहेत व कायद्यानें सामाजिक सुधारणा घडवून आणावी किंवा नाहीं यासंबंधानें लाला लजपतराय यांनीं 'मॉडर्न रिव्ह्यु'च्या सप्टेंबर १९०८ च्या अंकांत जे विचार प्रगट केले आहेत त्यांत ते ह्मणतात —

Our readers will relize the close connection between social and political questions in free, independent and self-governing countries. The case is, however, entirely different in countries where a foreign nation holds the sway. In such a country, the question of advancing social reform by legislature is always a very delicate one. Both the rulers and the ruled approach it with a great deal of natural timidity. While considerations of policy and finance check the zeal of the former, if there be any, suspicion of too much interference in their domestic affairs affects the other.

In a country like India, however, where social life is so much mixed up with religion, the difficulties are still greater in the way of any legislative action in matters social. In the West as pointed out above, the boundary line between matters social and political is very thin, here the close connection of religion with social life makes it very thick. The safest and the best way therefore in this country to effect social reform was and is by universal education, the lukewarm progress of which has so far stood in the way of social reform making head as it otherwise might have done."

त्यांच्या विचाराची दिशा कोणत्या प्रकारची आहे हे त्या कायद्याचें बिल जेव्हां कायदेकौन्सिलापुढे आलें त्या वेळी त्यांनी जे उद्गार काढले आहेत त्यावरून वाचकांच्या ध्यानांत येईल. ते ह्मणतात:—

“ या बिलाची पतिपत्नीच्या संबंधांत योजना करण्याची वेळ आली ह्मणजे तें कित्येक वेळां धर्माचाराच्या आड आल्याशिवाय राहणार नाहीं. बारा वर्षांच्या वयापर्यंत संभोगवयाची प्रतिबंधक मर्यादा केली ह्मणजे त्या वयाच्या आंत ऋतुप्राप्त झालेल्या स्त्रीचे गर्भाधान करणें गैरकायदा होणार आहे; व ऋतुप्राप्तीनंतर अमुक दिवसाचे आंत गर्भाधान केलेंच पाहिजे अशी शास्त्राची आज्ञा आहे. तेव्हां हा कायदा या एका गोष्टीमध्ये धर्माचारास विरोध करील हे निर्विवाद आहे... शास्त्र व रूढी यांत संभोगास ऋतुप्राप्तीची मर्यादा सांगितली आहे, व बिलांत ती बारा वर्षांची धरली आहे. ऋतुप्राप्ति शेकडा पंचाण्णव स्थली १२ वर्षांपुढे होते; व शास्त्रदृष्ट्या अशा स्थली १२ वर्षांपुढेही मुलीचे संरक्षण होते. पण बिलांत बाराच वर्षे कायम केल्यामुळे बारा वर्षांपुढे कोणत्याही मुलीचें रक्षण होत नाहीं, इतकेंच नव्हे तर, शेकडां पांच स्थली आमच्या धर्मास व आचारास त्यामुळे विरोध येतो... आमचें यासंबंधानें मत इतकेंच आहे कीं, हा कायदा बहुतेक निरुपयोगी होईल, व त्याचा अंमल वधुवरांच्या सर्वकाळ उतरावण्याची पाळी येईल त्यावेळीं समाजाची मनें अस्वस्थ व उद्विग्न होतील. ”

## सुधारणा स्वतःचें आचरण.

सामाजिक सुधारणेची स्वतःच्या उदाहरणानें प्रगति करण्याच्या मार्गाचें कित्येक ठिकाणीं जरी टिळक यांनीं अवलंबन केलें नाहीं तरी सुधारणा ज्या मार्गानें घडून यावी असें यांना वाटे तो मार्ग तयार करण्याविषयीं ते आपल्या हातून होईल तितका प्रयत्न करीत असत. लोकमत तयार करणें, जुन्या धार्मिक व सामाजिक संस्थांस चलन देणें, वगैरे मार्ग अशा प्रकारचे आहेत; व त्या बाबतींत त्यांनी प्रत्यक्षाप्रत्यक्ष बरेच प्रयत्नही केले आहेत. पुनर्विवाह, परदेशगमन, वगैरे प्रश्नासंबंधीं वर्तमानपत्रांतून ऊहापोह करून पुनर्विवाहितास कोणत्या दर्जास बसवावें,’ परदेशगमन

---

* पुण्यास १९०३ साली रा. ब. कोल्हटकर यांच्या पौनर्भव कन्येचा विवाह झाला त्यावेळीं लिहिलेल्या लेखांत त्यांनीं पुनर्विवाहिताची पायरी कोणती असावी याविषयीं आपलें मत येणेंप्रमाणें दिलें आहे:—“ पुनर्विवाह शास्त्रनिषिद्ध आहे असें आमचेंच नव्हे, तर या विषयाचें ज्यांनीं चांगलें अवलोकन केलें आहे अशा आ-

करून आलेल्या मनुष्यास कोणत्या रीतीने स्वज्ञातींत मिसळण्यास अडचण पडणार नाहीं, विवाहविधींत काय सुधारणा झाल्या पाहिजेत, यासंबधीं अनेक सूचना त्यांनीं लोकांस केल्या आहेत. धार्मिक संस्थांत जोर आल्याशिवाय शास्त्रास व पूर्वीच्या निर्बंधास धरून होणाऱ्या सुधारणांस जोर येणार नाहीं, ह्मणून धर्मगुरूंची अगोदर सुधारणा झाली पाहिजे, असें त्यांना वाटतें; व १९०४ सालीं पुण्यास संकेश्वराचे जगद्गुरू श्री शिष्य शंकराचार्य हे आले असतां त्यांच्या मठांतील शास्त्रीपंडित व आपले कांहीं स्नेही ( यावेळीं वे. रा. रा. पाटगावकर शास्त्री, पारखी शास्त्री, इतर एक दोन शास्त्री व दुसरे बरेच गृहस्थ हजर होते ) यांच्या समक्ष त्यांनी या प्रश्नांची चांगली चर्चाही केली होती.

ही चर्चा ता. २३।५।०४ रोजीं केसरीचा मजकूर चालला असतांनाच झाली. त्यांतील ज्या गोष्टी मला आठवतात त्या संवाद—रूपानेंच येथें देतोः—

**टिळक**—जगद्गुरूच्या जागीं नवीन तऱ्हेनें शिकलेला इसम पाहिजे; ह्मणजे तो पुष्कळ कार्य करील. त्यांतून हल्लींच्या काळी अशा मनुष्यास इंग्रजी आलेंच पाहिजे.

**शास्त्री**—इंग्रजी आलें ह्मणजे लोकांची श्रद्धा उडेल व ब्राह्मण्यासही थोडा धोका येईल.

**टिळक**—हें मत चुकीचें आहे. परिस्थितीप्रमाणें ह्या गोष्टी आतां झाल्याच पाहिजेत. खेरीज, इंग्रजी शिकल्याशिवाय सध्यांच्या काळीं आपल्या धर्माचें वजन चोहोंकडे पाडता यावयाचें नाहीं. धर्माचें वजन पाडण्यास तुलनारूपानें त्याचें विवेचन केलें पाहिजे. ख्रिस्ती-धर्म, मुसलमानी धर्म, पारशी धर्म, वगैरे धर्मापेक्षां आमचा धर्म कां श्रेष्ठ आहे हें सांगतां आल्याशिवाय आमच्या धर्माचें वजन कसें पडावे ?

---

मच्या बऱ्याच संस्कृतज्ञ मित्रांचेंही मत आहे. तथापि, ज्यांनीं पुनर्विवाह केला ते ब्राह्मण्यापासून कायमचे भ्रष्ट होतात असे आह्मांस वाटत नाहीं. शास्त्रानें सप्रवरांचा विवाहही निषिद्ध आहे; पण ज्यांचे प्रवर समान आहेत अशा विवाहांची संतती ज्याप्रमाणें ब्राह्मणांत गणली जाते, त्याप्रमाणेंच पौनर्भव संततीही मानण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. ”

परकी भाषा शिकण्यानें कांहीं अपूज्यबुद्धि उत्पन्न होणार नाहीं. आद्य-शंकराचार्यांनीं काय केलें? ब्रह्मसूत्रभाष्याचें विवरण करतांना बौद्ध किंवा जैनमताचें खंडन करण्यास त्यांच्याच मतांचा जो अनुवाद केला आहे तो पाली भाषेंतील ग्रंथ वाचून व ती भाषा शिकूनच केला आहे. त्या वेळीं परकीय भाषेचा प्रश्न कोठें उपस्थित झाला होता? खंडन करणाराला असें केलेंच पाहिजे.

**शास्त्री**—या स्वामींना संस्थानचें उत्पन्न जप्त झाल्यामुळेच अगोदर चिंता उत्पन्न झाली आहे; मग इतर गोष्टी कशा सुचाव्यांत?

**टिळक**—संस्थानचें उत्पन्न जप्त झालें ह्मणून काय झालें? स्वामी कर्तृत्व-वान् असतील तर ते हवें तितकें उत्पन्न मिळवितील. पूर्वीच्या शंकराचार्यांना कोठें उत्पन्न होतें? त्यांनी स्वतःच्या प्रयत्नावर व कर्तृत्वावरच उत्पन्न मिळविलें ना? लोकांची अद्याप धर्मश्रद्धा काहीं कमी झाली नाहीं. वर्गणी पाहिजे तशी मिळेल; व फंड पाहिजे तितका उभा राहील. पण हल्लींचा काळ जाणून हल्लींच्या रीतीनेंच चळवळ केली पाहिजे. स्वतः शुद्धाचरणानें व करारीपणानें वागलें पाहिजे, लोकसमाज अनुकूल करून घेतला पाहिजे, मोठ्या सभा भरविल्या पाहिजेत, वक्तृत्व केलें पाहिजे, सर्व कांही केलें पाहिजे; त्या-शिवाय कार्य होणार नाही. परवां हंसस्वरूप स्वामी येथें आले होते. त्यांनीं दहापांच व्याख्यानें चांगल्या रीतीनें बसविलीं असल्यामुळें व त्यांचे वक्तृत्व आणि आचरण उत्तम असल्यामुळें लोकांवर ताबडतोब छाप पडली. तसेंच प्राणायामाचें महत्व सांगून व तो शिकविण्याकरितां थोडी फी ठेऊन हजार बाराशें रुपयांची रक्कम येथून सहज घेऊन गेले. प्राणायाम ह्मणजे काय, हें अलीकडच्या शास्त्रीय व लोकांना पटेल अशा पद्धतीनें सांगितल्यामुळें त्यांचीं मनें त्याकडे वेधून सहजच त्यांची श्रद्धा बसली.

**शास्त्री**—असे लोक थोडे असतात.

**टिळक**—इंग्लंडमध्यें एम्. ए. झाल्यावर मनुष्य एक्लिझिआस्टिकल डिपार्टमेंटमध्यें शिरतो, तशीं माणसें आमच्या इकडे कां शिरूं नयेत? आतां ह्मटलें ह्मणजे शिकलेल्या माणसांनीं संन्यास घेतला पाहिजे. मध्वा-चार्य, सायणाचार्य, यांच्यासारख्यांनीं जर सन्यास घेऊन कार्य केलें तर आतां तरी शिकलेल्या व विद्वान् लोकांनीं तसा सन्यास घेऊन कां कार्य

करूं नये ? असें होईल तर पंचवीस तीस वर्षांत धर्मक्रांती सहज होईल. स्वामी विवेकानंदानें केवढें कार्य केलें पाहा !

**शास्त्री**—पूर्वींच्यांत आणि आतांच्यांत तफावत पुष्कळ पडली आहे. चातुर्वर्ण्य वगैरे आतां राहिलें आहे कोठें ? चार वर्णाच्या चारशें जाती झाल्या आहेत, आणि त्यांतही पोटजाती रोज होत आहेत. फार काय ? ब्राह्मण, शूद्र, महार, मांग यांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यास त्यांच्यांत सुद्धां ब्राह्मणख्रिस्ती, महारख्रिस्ती, अशा जाती झाल्या असून त्यांच्यात्यांच्यांत विवाह होत नाहींत.

**टिळक**—पूर्वीसारखे आतां जातिनिर्बंध चालणार नाहींत. तसें करावयास गेले तर आगगाडींत सुद्धां ब्राह्मणाकरितां, शूद्राकरितां वगैरे निरनिराळे डबे केले पाहिजेत; आणि सगळींच उलथापालथ केली पाहिजे. ते अशक्य आहे. कालानुरूप लोकांना आतां सवलती दिल्याच पाहिजेत.

**शास्त्री**—तुमच्या मतें हल्लीं कोणत्या सुधारणा होणें इष्ट वाटतें; व स्वामींनीं काय केलें असतां रुचेल ?

**टिळक**—माझ्या मतें धर्मशास्त्रास विरुद्ध नाहींत व थोडया फेरफारानें अमलांत आणण्यासारख्या सुधारणा सद्यः स्थितींत दोन आहेत. ( १ ) लग्नांत सप्तपदी करूं नये. सप्तपदी तशीच ठेऊन ती गर्भाधानाचे वेळीं करावी. सप्तपदी झाल्याशिवाय विवाहाची पूर्तता होत नाहीं. अर्थात् पूर्वींचे सर्व संस्कार करूं द्यावेत व सप्तपदी मागाहून करावी. ( २ ) ऋतु प्राप्त झाल्यानंतर विवाहास परवानगी द्यावी. हें थोडया प्रायश्चित्तानें करावें लागेल; पण धर्मशास्त्राच्या कांहीं विरुद्ध नाहीं. या दुसऱ्या सुधारणेनें हल्लीं लोकांस चांगली सवलत मिळेल. यानें निदान अक्षतयोनी बालविधवा कांहीं मरणार नाहीं. नवऱ्याचा थोडा जरी समागम झाला तरी लोकांना तितकेंच समाधान वाटेल. हल्लीं लहान मुलींचा नवरा मेल्यानें लोकांना जें इतकें वाईट वाटतें त्याचें कारण तिला नवऱ्याचें सुख मुळींच मिळत नाहीं हें होय. तेंच थोडे दिवस कां होईना सुख मिळेल तर आईबापांना इतकें वाईट वाटणार नाहीं. मुलगी तर बोलून चालून लहान असते. तिला कांहींच कळत नसतें. आईबापांनीं लग्न करावें आणि लगेच नवरा मेला ह्मणजे हळहळ करीत बसावें, अशी स्थिति

येते. हल्लीं प्लेग, दुष्काळ वगैरे सारख्या आपत्तींत ही सवलत मिळाल्यास कांहीं तरी फायदा होईल.

**शास्त्री**–स्वामींनीं अशा पुष्कळ सवलती दिल्या पाहिजेत.

**टिळक**–होय, दिल्या पाहिजेत. पण एकदम सर्व गोष्टींस परवानगी देऊन कार्य होईलच असें नाही. समजा, आज स्वामींनीं पुनर्विवाह करण्यास परवानगी दिली तर त्याप्रमाणें करण्यास किती लोक तयार होतील? बरें, ज्यांना पुनर्विवाह करावयाचा आहे ते स्वामीच्या परवानगीची वाट थोडीच बघतात. तात्पर्य, लोकसमाजांतही तशी शक्ती आली पाहिजे, त्याशिवाय नुसतें स्वामींचें आज्ञापत्र किंवा हुकूम काय करणार?

वरील संवादावरून धर्मसंस्था व धर्मगुरू यांची सुधारणा कशी झाली पाहिजे व सद्यः स्थितींत कोणत्या सुधारणा लोकांना पसंत पडतील याविषयीं टिळक यांचीं मतें काय आहेत, हें वाचकांस कळेल. धार्मिक व सामाजिक संस्थांत नवा जोर तर आलाच पाहिजे; पण तो येण्यापूर्वी त्या नामशेष न होऊं देतां जिवत ठेवण्याविषयींही सर्वांनीं झटलें पाहिजे, असें त्यांचें मत आहे; व प्रसंगविशेषीं तें त्यांच्या आचरणांतही दिसून येतें. श्रीजगद्गुरू शिष्यशंकराचार्य हे जेव्हां १९०४ सालीं पुण्यास आले त्या वेळीं बारा वर्षांपूर्वीचें चहाचें ग्रामण्य–प्रकरण पुन्हां उपस्थित झालें, व तो वाद जगद्गुरूकडे आला. त्या वेळीं जगद्गुरू जो निकाल देतील–मग ते प्रायश्चित घ्यावयास सांगोत किंवा न सांगोत–तो आपणास मान्य आहे, असें त्यांनीं सांगितलें. आतां या प्रायश्चित्ताचे कामी त्यांनी किंचित् हेका दाखविला व थोडा मुत्सद्दीपणाही केला हें खरें आहे. पण हा हेका किंवा हा मुत्सद्दीपणा सध्यांच्या काळीं कारण नसतां केवळ ' मेलेल्यांची मढीं पुन्हां उकरून काढून ' भांडण्याचा ज्यांनीं प्रयत्न चालविला होता त्यांचा प्रयत्न विफल व्हावा एवढयाच करितां होता. बाकी, धर्मगुरूबद्दल त्यांनीं दाखविलेली पूज्यबुद्धि व त्या गादीचा मान ठेऊन तिच्यामार्फत स्थापिलेली नवी ' ब्रह्मवृंद सभा ' या गोष्टीवरून आपल्या जुन्या धार्मिक संस्था जिवंत ठेवण्या विषयींची त्यांची तत्परता किती आहे हें दिसून येतें. अशा प्रकारच्या त्यांच्या कृतीवरून ' लोकरंजना ' चा किंवा ' लोकछंदानुवर्तना 'चा दोष कित्येक लोक त्यांच्या पदरीं बांधतात. पण माझ्यामतें हा दोष त्यांच्या

पदरीं येत नसून लोकसंग्रहाचें खरें रहस्य समजून तदनुरूप आचरण करण्यास ते किती तयार असतात याची साक्ष यावरून उत्तम पटते.*

---

* समाजसुधारणा करणाराने आपले वर्तन कसे ठेविले पाहिजे व खरा लोकसंग्रह ह्मणजे काय याविषयी प्रो० भानू हे गीतेचे व्याख्यान करतांना असे लिहितातः—

" उत्कृष्ट मार्ग ह्मणजे लोकांमध्ये जे जे अत्यंत प्रिय असेल त्या त्या प्रियवस्तूंचे खरें रहस्य सद्बुद्धीने इतरांस समजून देऊन त्याच्या भोंवताली जी घाण सांचली असेल ती काढून टाकावयाची हा होय. या मार्गाने जे गेले त्यांचेच हेतु परिपूर्ण झाले आहेत. असे न करितां ज्यांनी सामाजिक मतांवर सर्व बाजूंनीं कुऱ्हाडी घालून समाज सुधारण्याचा प्रयत्न केला ते जसे फसले आहेत, तसेंच सर्वस्वी लोकछंदानुवर्तन करून मात्र समाज सुदृढ होईल असे ज्या ज्या पुरुषांस वाटलें आहे तेही प्रगति-विरोधक ह्मणून समाजघातक होत असे ठरलें आहे. समाजांत घेण्यासारखें कांहीं नाहीं असें ज्याला वाटतें तो सुधारक जसा कुचकामाचा, तसेंच समाजांत जे आहे तें सर्वच चांगलें आहे, असें ह्मणणारा संरक्षकही निरुपयोगी होय. कर्मामध्ये मात्र सक्त झालेल्या लोकांच्या मनांत कर्माविषयी, कर्मरहस्याविषयी अथवा मुख्य पुरुषार्थाविषयी अश्रद्धा उत्पन्न होईल असे कोणतेही कृत्य ( अपकृत्यच ते ! ) लोकसंग्राहकानें करितां उपयोगाचे नाही. आपलें आचरण शुद्ध, सात्विक व पवित्र ठेऊन इतर लोकही भक्तिपूर्वक कर्म करतील व शेवटी नैष्कर्म्याच्या स्थितीला हळूहळू येतील असें आपलें आचरण ठेविले पाहिजे. लोकांची श्रद्धा उडेल असे कधीही कांहींएक करितां उपयोगी नाही. यांत लोकांची हानी होते, इतकेच नाही तर, आपली स्वतःची हानी होत असते. शुद्ध निराकार परमेश्वराचें आराधन करावे असे सेंटपाल, सेट आगस्टाइन, या पुरुषांनी जोरानें प्रतिपादन केले खरें, पण लोकांच्या मनाची तितकी तयारी झाली नव्हती ह्मणून दहाव्या, अकराव्या व बाराव्या शतकांत खिस्तमूर्तीसाठीं, खिस्तभूमीसाठी, खिस्तक्रीडास्थानासाठीं लाखों लोकांस आपले प्राण बळी द्यावे अशी स्फूर्ति झाली ! मूर्तिभंजक मुसलमानांनी ताबुताची संस्था निर्माण केली, आचार्यांचे अनुयायी ह्मणविणारांनी कर्ममार्गाचा पुनः प्रसार केला, वगैरे उदाहरणें काय सिद्ध करतात बरे ? पहिली तयारी नसेल तर आपल्या हेतूच्या उलट अज्ञानी लोकमताचें पर्यवसान होत असतें हेंच सिद्ध होतें ना ? शिवाय, जातिभेद चांगला नव्हे, वेदविहित नव्हे, असें प्रतिपादन करणारे वेदांती व आधुनिकांतील कांहीं धर्मशून्य सुधारक यांच्या जवळ जरी यक्षिणीची कांडी दिली तथापि, ब्राह्मणांचें सात्विकत्व अतिशूद्रामध्यें एका क्षणांत कधीं तरी त्यांच्यानें संचारवेल काय ? तसेंच ज्यांचें आचरण, ज्यांचे विचार व ज्यांची वाणी पिढ्यानुपिढ्या शुद्ध होत चाललीं आहेत, अशा एखाद्या जातीस खालीं दडपण्याचा प्रयत्न

जगद्गुरू पुण्यास आले त्या वेळीं टिळक यांनीं त्यांच्या कडून कांहीं महत्त्वाचे ठराव किंवा लोकांस उपयोगी पडतील अशा सवलती मिळवाव-यास पाहिजे होत्या असें कित्यकांचें ह्मणणें होतें; व टिळक यांनाही तें नको होतें असे नाहीं. पण सवलती मिळविण्यास पुढील तीन गोष्टींची अनुकूलता पाहिजे होती. ( १ ) जगद्गुरू चांगले हुषार आणि चाणाक्ष पाहिजे होते. ( २ ) त्यांच्या पदरीं हुषार पंडित व विद्वान् सल्लामसलत-गार पाहिजे होते. ( ३ ) आपलेच लोक आपणास विरुद्ध नको होते. जगद्गुरू पुण्यास आल्यावर सर्वांत मोठी गोष्ट जी जाचली ती शेवटचीच होय. आपलेच लोक आपणास विरुद्ध नसते तर प्रायश्चित्ताच्या बाबतींतही एवढा तंटाबखेडा माजला नसता. उलट सर्वांच्या संमतीनें कांहीं इष्ट हेतुही साधतां आले असते. रा. रा. टिळक यांचे अशा प्रकारचें धोरण पूर्वीपासूनच होतें. पण 'माणूस योजतो एक आणि होतें भलतेंच' या न्यायानें जेव्हां घोटाळा उत्पन्न होऊन भलत्याच थरावर गोष्ट जाऊं लागली तेव्हां सर्व जेथल्या तेथ राहून जगद्गुरूस आणलें तसें कोणीकडून तरी पोंचतें करण्यापलीकडे जास्त कांहीं झाले नाहीं. त्यांतल्या त्यांत एवढेंच झालें कीं, पुण्यासारख्या चळवळीच्या ठिकाणीं आणून परिस्थितीचा व लोकमताचा थोडासा परिचय जगद्गुरूस करून देतां आला; व सद्यःस्थितीत हीही गोष्ट काही कमी महत्वाची आहे असें मला वाटत नाहीं.

---

हट्टानें आमच्या भाविक लोकांनीं कितीही केला तरी ती जाती दडपून खाली राहील काय? एवंच, तात्पर्य असे आहे कीं, लोकांची खरी सुधारणा व्हावी हे तुझांस इष्ट असेल व त्यायोगे आपला व त्यांचा पुरुषार्थ साधणें हें अगत्याचें वाटत असेल तर लोकांच्या श्रद्धेमध्यें बिघाड न करितां प्रथमतः त्यांचें आचरण शुद्ध होईल, नंतर त्यांची वाणी शुद्ध होईल, आणि शेवटी विचार शुद्ध होतील असा किंवा प्रथम विचार शुद्ध करून नंतर इतर गोष्टी शुद्ध होतील असा कोणता तरी मार्ग **अलिप्त** ह्मणजे **निस्पृह बुद्धीनें** स्वीकारून आपलें जीवमान आहे तोंपर्यंत किंवा आपल्यास साक्षात्कार होईपर्यंत प्रत्येक समंजस पुरुषानें लोकसंग्रहाचा यथाशक्ति प्रयत्न करणें हें त्याचें कर्तव्य आहे."—प्रो. भानूकृत श्रीमद् भगवद्गीता, अध्याय ३ रा, उप-संहार, पानें १२।१३.

# धार्मिक मतें.

## हिंदुधर्माचीं लक्षणें.

टिळक यांना हिंदुधर्माचा पूर्ण अभिमान असून इतर धर्मांपेक्षां हिंदु-धर्मांतील तत्वें फार व्यापक व उदात्त आहेत असें यांचें मत आहे. पारशी, बौद्ध, ख्रिस्ती वगैरे इतर धर्मांत कोठें देवता आणि धर्मवक्ता पुरुष यांच्यामध्यें भेद आहे तर कोठें वैदिक आचार व देवता घेतल्या असून वेदास प्रमाण मानलेले नाही; कोठें ख्रिस्ताशिवाय तारणारा दुसरा कोणी नाहीं असें ह्मटलें आहे तर कोठें बायबल कबूल करून ख्रिस्तास कबूल केलेले नाही. हिंदुधर्मांत असा प्रकार नसून जीवाशिवाचें ऐक्य, देव-भक्तांतील अभेद्य संबंध इत्यादि गोष्टी फार महत्वाच्या असून मनुष्य कोण-त्याही जातीचा, पंथाचा अथवा आचाराचा असला तरी अखेर त्याला मोक्ष प्राप्त होतो. हिंदुधर्म ह्मणजे अठरा जातींचें कडबोळें, त्यास शेंडा ना बुडखा, प्रांताप्रांतात अनेक आचार व अनेक पंथ, अशा वैचित्र्यामुळें व पसाऱ्यामुळें हिंदुस्थानांतील लोकांची धार्मिक उन्नति होणे दुरापास्त आहे असे अनेक आक्षेप लोक काढीत असतात. पण हे आक्षेप बरोबर नसून निष्काम कर्म, अहेतुक भक्ति इत्यादि जीं कांही तत्वे हिंदुधर्मांत आहेत त्यांची कोणत्याही धर्मांतील तत्वांनी बरोबरी होणार नाहीं. तसेंच हिंदु-धर्मासारखा परधर्मासंबंधानें औदार्य दाखविणाराही दुसरा धर्म नाही. पुण्याच्या गणेशोत्सवांत १९०० सालीं ‘ हिंदुधर्माचीं लक्षणें ’ या विषया-वर त्यांनीं जें व्याख्यान दिलें त्यांतील महत्वाचा भाग जशाचा तसाच त्यांच्याच शब्दांनीं येथें देतों. त्यावरून हिंदुधर्माची व्याप्ति किती आहे व तो कोणकोणत्या बाबतींत श्रेष्ठ आहे याविषयीं त्यांचीं मतें काय आहेत हें वाचकांना कळून येईल. ते ह्मणतात:—

“ मला जें हिंदुधर्माचें लक्षण पाहिजे आहे तें अशा प्रकारचें पाहिजे आहे कीं, त्यांत हिंदुधर्मांतील सर्व जातींचा, वर्णांचा, पंथांचा किंवा मतांचा समावेश व्हावा; आणि बुद्ध, जैन, ख्रिस्ती किंवा मुसलमान इ० परधर्मीयांचा त्यांत अंतर्भाव होऊं नये. सारांश, जें लक्षण बांधावयाचें तें न्यायशास्त्रांत ज्यास अतिव्याप्ति व अ-व्याप्ति ह्मणतात त्या दोषानीं युक्त असूं नये; ह्मणजे ज्यांस ह्मणून हिंदु समजतात त्या सर्वांचा सदर लक्षणांत समावेश व्हावा आणि ज्यांस हिंदु समजत नाहींत

त्यांस तें लागू पडूं नये. अशा प्रकारचें लक्षण बांधण्यापूर्वी इतर धर्मांच्या लक्षणाचा आपणास थोडाबहुत विचार केला पाहिजे.

हिंदुधर्म ज्या धर्मांशी टक्कर देऊन राहिला आहे ते धर्म इतिहासदृष्टया ह्मटलें ह्मणजे पारशी, जैन, बौद्ध, मुसलमानी आणि ख्रिस्ती हे होत. पारशी किंवा झोऱ्यास्ट्रियन धर्माचे प्रमाणभूत ग्रंथ जरी वेदासारखेच असले तरी देवता आणि धर्मप्रवक्ता पुरुष यांच्यामध्यें भेद असल्यामुळे या धर्माचा व वैदिक धर्माचा पहिल्यापासून विरोधच आहे. जैन आणि बौद्ध धर्म वेदास प्रमाण मानीत नाहीत. तथापि, वैदिक आचार व देवता निदान जैनांनी तरी बऱ्याच घेतलेल्या आहेत, त्यामुळे त्याचा धर्म हिंदुधर्माशी पुष्कळ सदृश आहे. तथापि, तो हिंदुधर्माहून भिन्न आहे. मुसलमानी आणि ख्रिस्ती धर्म हे अगदीच अलीकडील धर्म होत. बौद्ध धर्मांत बुद्धाची पूजा मागून आली. पण ख्रिस्तीधर्मांत ख्रिस्ताचे जे महत्व आहे तें तो एकटाच जगाचा तारणारा आहे, त्याच्यापूर्वी कोणी तारणारा झाला नाही व पुढे कोणी होणार नाहीं एवढ्यामुळें आहे. या धर्मास बायबल हें प्रमाण आहे खरें, पण तेवढ्यानेच त्याचे लक्षण पुरे होत नाही. कारण, यहुदी लोकही बायबलाचा पूर्वभाग प्रमाण मानतात, पण येशूस कबूल करीत नाहींत. तेव्हा येशूचें प्राधान्य हेच ख्रिस्तीधर्माचे मुख्य लक्षण मानावे लागतें. मुसलमानी धर्माची गोष्ट याहून भिन्न आहे. ख्रिस्ती लोकांप्रमाणे देवाची त्रयी नसून देव एक आहे, आणि देवाचा खरा धर्म लोकांस सांगणारे पूर्वी जरी पुष्कळ झाले असले तरी महमद हा त्यांतील शेवटचा व श्रेष्ठ असून त्यानें केलेलें कुराण हे प्रमाण आहे, असें या धर्मांचे मत आहे. या सर्व धर्मांची लक्षणे किंवा वर्णन समग्र देणें येथें शक्य नाही. आपल्याला हिंदुधर्म यापासून कसा ओळखता येईल एवढेच पहावयाचे आहे, व तशा दृष्टीनें वर दिलेली इतर धर्मांची सामान्य माहिती वस्स आहे.

आतां हिंदुधर्माच्या विशिष्ट लक्षणांकडे वळूं. येशूवर विश्वास ठेविला असतां मनुष्य तरेल, नाही तर तरणार नाही, हे किंवा असल्या प्रकारची मते युक्तीच्या किंवा तर्कशास्त्राच्या कसोटीस कधीही टिकावयाची नाहींत. ईश्वरास जर मनुष्यजातीची करुणा आहे तर मनुष्यजातीस तारणारा परमेश्वर किंवा परमेश्वराचा अंश सृष्टीच्या आरंभी किंवा मनुष्य-जातीबरोबर तरी निदान निर्माण झाला पाहिजे. हजारों वर्षांपर्यंत मनुष्य जातीस तारणाऱ्याखेरीज ठेवून सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीच तो तारणारा ईश्वरानें एशिया खंडांतील एका कोपऱ्यांत जन्मास घातला, हें ह्मणणें सयुक्तिक किंवा विश्वासार्ह नाही. मुसलमानी धर्माचाही प्रकार अशांतलाच होय. महमदानंतर धर्मप्रवक्ता ईश्वरांश कोणीही व्हावयाचा नाहीं, हें ह्मणणें वरच्या ह्मणण्याइतकेंच चुकीचें होय. हिंदुधर्मांत जर कांहीं विशेष असला तर तो हाच होय कीं, अशा तऱ्हेनें ईश्वराची करणी किंवा प्रसाद मर्यादित आहे असें आह्मीं मानीत

नाहीं. सृष्टीच्या आरंभापासून आतांपर्यंत ईश्वराच्या नाना तऱ्हेच्या विभूति उत्पन्न झाल्या आहेत, व पुढेही होतील असें हिंदुधर्माचें कायमचें मत आहे. परमेश्वर एक आहे, अनेक नाहीत हें तत्त्व आह्मी पूर्णपणें ओळखतों; पण पृथ्वीवर अवतीर्ण झालेली परमेश्वराची विभूति ही एकच आहे हें तत्त्व आह्मांस मान्य नाही व युक्तिदृष्ट्याही ते मान्य करण्यासारखे नाही. यामुळे हिंदुधर्माची ख्रिस्ती किंवा महंमदी धर्मापासून व्यावृत्ति करण्यासारखे जर लक्षण बांधावयाचें असेल तर विभूतींचें अनंतत्व आणि ईश्वराचें एकत्व हीं आमच्या धर्मातील विशेष गोष्ट त्यांत घातली पाहिजे. देव एक आहे, पण त्याला लोक अनेक तऱ्हेनें भजतात, हे तत्व ऋग्वेदापासून भगवद्गीतेपर्यंत सर्वांस सारखें मान्य आहे. याचा परिणाम असा झाला आहे की, रुचिवैचित्र्यामुळे उपास्य देवते जरी भिन्न असली तरी एकच परमेश्वर साध्य असल्यामुळें आम्ही त्या सर्वांसच हिंदुधर्मी समजतो. इतर धर्मातील लोकांनी आपापली उपास्ये कायमची व नियमित ठरविली आहेत. हिंदुधर्माचा तसा प्रकार नाही. विष्णूचीच उपासना केली असतां मनुष्य तरेल, शिवाची केली असतां तरणार नाही असे आम्ही ह्मणत नाही. हिंदुधर्मात शैव, वैष्णव, गाणपत्य वगैरे जे पंथ आहेत त्या पंथांतील लोक आपापले उपास्य श्रेष्ठ समजतात, व उपासनेकरितां तशी समजूत असणे जरूर आहे. पण सर्व उपासकांस कोणतें तरी वेदांत–मत कबूल असल्यामुळे उपास्यांच्या भेदामुळे हिंदुत्व नष्ट होत नाही अशी सर्वांचीच समजूत आहे. एवढ्यावरून उपास्यांत चांगला वाईट भेद आह्मी करीत नाही असें मात्र कोणी समजूं नये. कारण, भगवद्गीतेत " यांति देवव्रता देवान् पितॄन् यांति पितृव्रता: " असे स्पष्ट सांगितले आहे. उपास्याचा नियम केल्याने सर्वच लोक एका सद्गुणी उपास्याची आराधना करितात, इतरांची करीत नाहीत असा उपास्यनियमांचा फायदा दाखविण्यांत येतो. पण तोही बरोबर नाही. कारण, उपास्य दैवताच्या अंगी सात्विक गुणाचा कितीही उत्कर्ष असला तरी त्याचें प्रतिबिंब सर्व जशाच्या तसेच उपासकाच्या मनांत उतरतें असे नाही. सबब उपासकाची योग्यता, अधिकार आणि आवड याप्रमाणें उपास्यदैवत स्वीकारण्याची त्यास मोकळीक ठेवून पुढें उत्तरोत्तर त्याच्या अंगी सात्विक गुणाचा जसा विकास होईल त्याप्रमाणें अधिक योग्यतेच्या सगुण उपास्याची त्याजकडून आराधना करवून त्यास अखेरीस ईश्वरप्राप्ती करून देणें हाच मार्ग अधिक सयुक्तिक व समंजस होय. हिंदुधर्मात हाच मार्ग सांगितला आहे व त्यामुळें उपास्यांचा अनियम हेच एक त्याचें विशेष लक्षण होय असें मी समजतों.

उपास्यें अनियमित धरल्यानेंच हिंदुधर्माचें लक्षण पुरें होत नाही. कारण, एवढेंच लक्षण केल्याने बुद्ध किंवा ख्रिस्त यांचे उपासकही हिंदुधर्मात येऊं शकतील. पीर किंवा ताबूत यांसारखीं मुसलमान धर्माचीही कांहीं उपास्यें अलीकडे आमच्यांत

घुसलीं आहेत; इतकेंच नव्हे, तर बौद्ध धर्मानंतर बुद्ध हा ईश्वराचाच अवतार होता हेंही आह्मी मान्य केले आहे. तेव्हां हिंदुधर्मात उपास्यांचा नियम नाहीं एवढ्यानेंच इतर धर्मापासून त्याची व्यावृत्ति होत नाहीं. पारशी धर्मात आणि जैनधर्मात आमच्यापैकीं कांही देवता आहेत. करितां या धर्माची हिंदुधर्मापासून व्यावृत्ति व्हावी एवढ्याकरिता दुसरे एकादे लक्षण पाहिले पाहिजे. वर्णाश्रमव्यवस्था किंवा तन्मूलक आचार हे हिंदुधर्माचे लक्षण केल्यास चालेल, असे कित्येकांस वाटण्याचा संभव आहे. पण वर्णाश्रमव्यवस्था केवळ हिंदूधर्मासच लागू आहे असे नाही. पारशी धर्मातही पहिल्याने तीन वर्ण असावे असे सिद्ध झालें आहे. तसेंच जैनधर्मी वगैरे लोकही थोड्याबहुत प्रमाणाने हा भेद मानतात; इतकेंच नव्हे तर, पूर्वी हिंदु असून हल्लीं ख्रिस्ती झालेले लोकही हा भेद सोडीत नाहींत असें आढळून आलें आहे. शिवाय वर्णाश्रमव्यवस्था ही गुणकर्मविभागरूप समाजरचनेची गोष्ट आहे. पूर्वी चार वर्ण होते, आतां चोहोंच्या ठिकाणीं चारशे जाती झालेल्या आहेत. तेव्हां असली अनिश्चित गोष्ट हिंदुधर्माच्या लक्षणांत गोवणे बरोबर नाहीं. आचार प्रमाण धरावयाचा तर कोणता आचार प्रमाण असा प्रश्न सहजच निघतो. कारण, प्रत्येक धर्मातील लोक त्यांच्या त्यांच्या समजुतीप्रमाणे आचारासच प्रमाण मानतात. तेव्हां असलीं लक्षणें सोडून देऊन त्यांचे मूळ काय ते पाहिलें पाहिजे. आणि तसे पाहिलें असता वेदाबद्दल प्रामाण्यबुद्धि हे हिंदुधर्माच्या मुख्य लक्षणांपैकीं एक लक्षण आहे, असे आपणांस आढळून येईल. वेदांतील धर्म व दैवते हल्लीच्या युगास आरंभ झाल्या दिवसापासून आहेत ही गोष्ट पुराणांत व खुद्द वेदांत सांगितली आहे; इतकेंच नव्हे, तर भूगर्भशास्त्रादि अर्वाचीन शास्त्रांच्या आधाराने ही सप्रमाण सिद्ध करून देतां येते असें मी जे हल्ली वेदावर पुस्तक लिहीत आहे त्यांत दाखविले आहे. सारांश, आर्य लोकाचा इतिहास आणि वेद ही समानमूलक आहेत; व आर्य लोकांचा धर्म जर पहावयाचा असेल तर त्याचे मूल वेदाखेरीज दुसऱ्या कोठेंही सांपडावयाचें नाहीं. वेद तीन माना किंवा चार माना, मंत्रब्राह्मणात्मक माना किंवा मंत्रात्मक माना, पौरुषेय माना किंवा अपौरुषेय माना, ऋषी मंत्रद्रष्टे ह्मणा किंवा मंत्रकर्ते ह्मणा, जोपर्यंत वेद हे आपल्या धर्माचे मूलभूत आणि प्रमाणभूत ग्रंथ आहेत असे एकादां मनुष्य कबूल करितो तोपर्यंत तो हिंदु आहे असे ह्मटले पाहिजे. बौद्ध, जैन व हिंदुधर्म यांतील मुख्य भेद हाच होय. वेद कसे प्रवृत्त झाले याबद्दल मतभेद असूं शकेल, किंवा त्यांतील प्रतिपाद्य अर्थासंबंधानेंही मतभेद होईल. पण जोंपर्यंत वेद मूलभूत असून प्रमाण आहेत अशी एकाद्याची समजूत कायम आहे तोंपर्यंत त्याचा हिंदुधर्मातच समावेश केला पाहिजे. सारांश, वेदाच्या ठिकाणीं प्रामाण्यबुद्धि हें हिंदुधर्माच्या मुख्य लक्षणांपैकींच एक लक्षण होय. स्मृत्यादिकांचे प्रामाण्य वेदावरच अवलंबून असल्यामुळें त्यांचा येथें निराळा विचार करावयास नको. तसेंच कित्ये-

कांस वेद अवगत असतील व कित्येक आप्तमुखानें त्याचें प्रामाण्य कबूल करीत असतील. कसेंही असलें तरी वेदप्रामाण्यास त्यामुळें बाध येत नाहीं.

वरील दोन लक्षणांनीं हिंदुधर्माची इतर धर्मांपासून व्यावृत्ति करतां आली तरी हिंदुधर्मांतील सर्व पंथांचा व्याख्येत समावेश व्हावा एवढ्याकरितां आणखी एक लक्षण सांगणे जरूर आहे. ख्रिस्ती धर्म केवळ उपासनेवर अवलंबून आहे. ख्रिस्तावर विश्वास ठेवाल तर ताराल, नाहीं तर नरकास जाल असें हा धर्म सांगत असतो. हें मत अयुक्तिक व असमंजस आहे असें वर सांगितलेंच आहे. थोडक्यांत सांगणें असल्यास हिंदुधर्मांत उपास्य कोणतेंही असलें तरी चालतें, पण भक्ति मात्र जरूर पाहिजे; आणि ख्रिस्ती धर्मांत भक्तीपेक्षां उपास्यासच अधिक महत्त्व देतात असें दिसून येईल. यांपैकीं तात्विकदृष्ट्या चांगला पक्ष कोणता, हें मी मागे सांगितलेंच आहे. पण याखेरीज हिंदुधर्मांत आणखी विशेष आहे तो येथें सांगितला पाहिजे. तो हा कीं, हिंदुधर्मांत भक्ति हें ईश्वर प्राप्तीचे एकच साधन सांगितलें आहे असें नाहीं. भक्ति किंवा उपासना याची जरूर आहे हें आह्मीं कबूल करतों, पण याखेरीज दुसरा कांहीच तरणोपाय नाही हें तत्त्व हिंदुधर्मास मान्य नाही. ईश्वरप्राप्तीची भक्तीखेरीज ज्ञान, कर्म आणि योग अशी दुसरी साधनें, उपनिषदें व भगवद्गीता यांतून सांगितली आहेत; आणि ती योग्य व सयुक्तिक आहेत. कारण, सर्वव्यापी ईश्वराकडे जाण्यास ईश्वरानें एकच वाट ठेविली आहे हें ह्मणणे ईश्वराच्या घराला रानटी मनुष्याच्या घराप्रमाणें एकच दरवाजा आहे, असें ह्मणण्याइतकेंच उपहासास्पद आहे. हिंदुधर्मांत इतर धर्मांहून ज्या कांहीं विशेष गोष्टी आहेत त्यांतील साधनांची अनेकता ही एक मुद्याची गोष्ट आहे; व त्यामुळे इतर धर्मांपेक्षां हिंदुधर्माची योग्यता अधिक आहे असें सहज कळून येईल. उपास्यांचा अनियम आणि साधनांची अनेकता या दोन गोष्टींचा हिंदुधर्माच्या लक्षणांत समावेश केला ह्मणजे हिंदुधर्मांत शैव—वैष्णवादि जे अनेक पंथ आहेत, त्यांचा व योगी, अग्निहोत्री व संन्यासी यांचा या धर्मांत अंतर्भाव होऊन हिंदुधर्माचें लक्षण अव्याप्तिरूप दोषास पात्र होत नाही. ज्ञानाची योग्यता अधिक किंवा भक्तीची अधिक हा विषय स्वतंत्र आहे, व आचार्यांचें मत जरी मला सर्वांशीं ग्राह्य आहे तरी त्याबद्दल आज विचार करण्याची जरूर नाहीं. साधनें अनेक आहेत ही गोष्ट सर्वांस मान्य आहे; व तेवढाच कायतो हल्लींचा मुद्दा आहे.

वर सांगितलेलीं हिंदुधर्माची तीन लक्षणे हिंदुधर्म इतर धर्मांपासून व्यावृत्त करण्यास किंवा ओळखण्यास आणि हिंदुधर्मांतील सर्व पंथांचा आंत समावेश करण्यास बस्स आहेत अशी माझी समजूत आहे. ही लक्षणें थोडक्यांत लक्षांत ठेवतां यावीं ह्मणून मी तीं एका श्लोकांत ग्रथित केलीं आहेत. तो श्लोक येणेंप्रमाणें:—

**प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ।**
**उपास्यानामनियमश्चैतद्धर्मस्य लक्षणम् ॥**

## सगुणोपासना.

हिंदुधर्मांतील ज्ञान व योग हे मार्ग श्रेष्ठ आहेत; पण या मार्गांचें सामान्यजनाला आकलन होणें दुर्घट असल्यामुळें त्यांच्याकरितां भक्तिमार्ग निघाला व सगुणोपासना सुरू झाली. हिंदुधर्मांत अनेक देवता अथवा अनेक उपास्यें निघालीं याचें कारण तरी हेंच आहे. कोणत्याही देवतेचें ध्यान कोणत्याही रीतीनें केलें तरी अखेरची सिद्धी एकाच प्रकारची आहे. आराधनेचे मार्ग भिन्न भिन्न होणें ह्मणजेच धर्माची प्रगति होणें; व ज्ञानदेव–तुकारामादिकांनीं जी भक्तिपंथाची महती वाढविली त्यांतील बीजही हेंच होय असें त्यांचें मत आहे. सन १९०३ सालांतील गणेशोत्सवांत कै. ह. प. भिंगारकर बोवा यांनीं ' वैष्णव पंथाची प्रगति ' या विषयावर फडक्यांच्या गणपतीपुढें व्याख्यान दिलें होतें. त्या वेळीं टिळक हेच अध्यक्ष असून त्यांनीं पुढील विचार प्रदर्शित केले:—

" विष्णु ही देवता फार प्राचीन काळची आहे. ती वेदांत आहे. इंद्राच्या बरोबरची ती आहे, असा तेथे उल्लेख आहे. हल्लीं हिंदुस्थानांत विष्णूचे उपासक ३/४ लोक निघतील. इतके उपासक निघण्याचें कारण विष्णू ही देवताच तशा प्रकारची आहे, असे ह्मणावें लागतें. सत्व, रज, तम, या तीन गुणांनीं युक्त जे विष्णु, ब्रह्मदेव व महेश या तिघांची उपासना एकदम करतां येणें अशक्य असल्यामुळे सत्वगुणात्मक जो विष्णु त्याची भक्ति विशेष प्रचलित झाली. पूर्वी या देवतेचें ध्यानानें आराधन करीत असत; पण पुढें आराधनेचे मार्ग भिन्न झाले; आणि आराधनेचे मार्ग भिन्न होणे ह्मणजेच धर्माची प्रगति होणें. ख्रिस्ती धर्मांतसुद्धां यज्ञयागाची कल्पना आहे व त्यांतही नरमेधाचे उदाहरण आढळून येईल. खुद्द ख्रिस्ताचाच मेध झालेला आहे. अशी या धर्मांतील लोकांची समजूत आहे. यज्ञाचे अर्थ कालगतीनें भिन्न भिन्न झाले; व पुढे कामक्रोधादिकांचा निग्रह करणें हा यज्ञ या शब्दाचा अर्थ झाला व त्याचा भगवद्गीतेंतही उल्लेख आहे. बौद्ध, चार्वाक वगैरे पंथांच्या लोकांनीं जे आक्षेप घेतले त्यांतील ग्राह्यांश घेऊन आमच्या धर्मांत सुधारणा झाली. विठ्ठल हें नांवसुद्धां विष्णूचेंच आहे. ' ठ ' हा वर्ण ' ष ' व ' ण ' यांचाच बनला आहे. तुकारामादि साधुसंतांनीं जरी या पंथाची महती वाढविली तरी हा पंथ पूर्वीपासून आहे ही गोष्ट विसरतां कामा नये; व ज्ञान किंवा योग हे दोन मार्ग सर्व लोकांना गम्य नसल्यामुळें या भक्तिपंथाची योग्यता सांप्रत मोठी आहे, हें आपण लक्षांत ठेवावें. "

निराकार परमेश्वराची ओळख होण्यापूर्वी साकार परमेश्वराची ओळख

होणें जरूर आहे, किंबहुना पुढच्या पायरीवर चढण्यास सगुण उपासना ही पहिली पायरीच आहे असें म्हटलें तरी चालेल. सगुण उपासनेची आवश्यकता झाल्यामुळेंच मूर्तिपूजा अस्तित्वांत आली; व प्रतिमा, चिन्हें इ. गोष्टींचा त्यांत समावेश झाला. मूर्तिपूजेची अथवा सांकेतिक चिन्हें आणि प्रतिमा यांची कांहीं तरी विशिष्ट हेतूनें पूर्वजांनीं रचना केली असून तिचें ज्ञान नसतें म्हणून कित्येक लोक मूर्तिपूजेसंबंधानें आक्षेप घेत असतात. पण ज्ञान झाल्यावर त्यांचे आक्षेप मुळींच राहणार नाहींत, असें रा. रा. टिळक यांचें ह्मणणें आहे. यासंबंधानें १९०३ सालांत डॉ. गर्दे यांचें गणेशोत्सवांत व्याख्यान झालें* त्या वेळीं अध्यक्ष या नात्यानें टिळक यांनीं पुढील विचार प्रगट केले:—

* या व्याख्यानाचें स्वरूप कळल्याशिवाय टिळक यांचे म्हणणें पूर्णपणें लक्षांत येणार नाहीं म्हणून त्याचा सारांश ( ता० ८।९।०३च्या ) केसरींत दिला आहे तोच येथे देतों:—

"प्राचीन कालीं चंद्र सूर्य, वायु, अग्नि, मेघ वगैरेंची उपासना सुरू होती; व पुढें मुख्य एक ईश्वर असून वरील देवता ह्या त्याच्या निरनिराळ्या विभूती समजल्या गेल्या. पुढें ह्या देवतांची आयतनें झाली. अगस्ती ऋषीच्या आश्रमांत राम गेले असतां त्यानी अग्नि वगैरेचीं स्थानें पाहिली. त्यावरून रामायणकालीं देवतायतनें होती असें सिद्ध होतें. मनुस्मृतींतही देवालयांचा उल्लेख आहे. इतर राष्ट्रांतही फार प्राचीन कालापासून मूर्तिपूजा आहे. इजिप्तमध्यें पांच हजार वर्षांपूर्वी बांधलेलें सूर्याचें देवालय आहे. महमद व यशूख्रिस्त यांचे अनुयायी हे मूर्तिपूजक नाहींत. तरी पण एका तऱ्हेनें पाहिलें तर ते सुद्धां मूर्तिपूजक आहेत असे म्हणावे लागतें. वेदकालीं सर्व विश्व हें ईश्वराचे शरीर व त्याची उपासना करणें म्हणजेच त्या कालीं मूर्तिपूजा करणें होय. भगवद्गीतेंत कृष्णांनीं अर्जुनास विश्वस्वरूप दाखाविल्याचा उल्लेख आहे; तसाच पुरुषसूक्तांत व आरण्यकांतही आहे. मूर्तिपूजेला 'प्रतीक' असें नांव उपनिषदांत आहे. प्रतिक याचा अर्थ प्रतिनिधी. म्हणजे सर्व विश्व आपल्या डोळ्यापुढें ठेवतां येत नाहीं म्हणून त्यांतील एक भाग आपल्यापुढें ठेवावयाचा; व अशा रीतीनेंच मूर्तीची कल्पना आली. व्हाइसराय हे जसे बादशाहा नव्हेत, पण बादशाहाचे प्रतिनिधि आहेत, त्याचप्रमाणें ईश्वराच्या सर्वव्यापी स्वरूपाची मूर्ति ही प्रतिनिधी आहे. मूर्तिपूजेमध्यें कांहीं सूचक चिन्हेंही आहेत. जुन्या पैशावरील तराजू हें जसें ईस्ट इंडिया कंपनीचें चिन्ह आहे तसेंच विष्णूच्या हातांत चक्र ठेवलें आहे तेंही त्याच्या हातांत कालचक्र फिरत आहे त्याचें दर्शक आहे. मूर्ति, ईश्वराचें चित्र किंवा प्रतीक आहे, अशी खात्री झाल्यावर त्याची पूजा करण्यांत कांहीं पातक नाहीं. तशीच

त्याची एकाच तऱ्हेनें पूजा न करितां अनेक तऱ्हांनींही करतां येते. ईश्वराची नुसती स्तुती केली म्हणजे झालें, त्याला नैवेद्यादि उपचार कशास पाहिजेत, असे कोणी कोणी आक्षेप घेतात. पण मी म्हणतों कीं, त्याला स्तुती तरी कशास पाहिजे ? स्तुती जसा मनुष्य करितो तसेच अनेक उपचारही तो करितो. अनेक तऱ्हेच्या उपचारांत अंतःकरण गुंग होऊन भक्ति वाढते व तेंच श्रेयस्कर आहे. एकदां मूर्तिची कल्पना आल्यावर ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणे अनेक मूर्ति अस्तित्वांत आल्या. मूर्तिमध्यें मुख्य तीन प्रकार आहेत; ( १ ) अवतारिक पुरुषांच्या प्रतिमा; ( २ ) सूर्य, चंद्र, बृहस्पती यांच्या प्रतिमा व ( ३ ) सांकेतिक चिन्हें, ह्मणजे इंग्रजींत ज्यांना Symbols असें ह्मणतात तीं. गजाननमहाराजांची मूर्ति ही सांकेतिक चिन्हाची मूर्ति आहे. मुद्गल-पुराणांत गणपतीला हत्तीचें तोंड कां लावलें याचा उल्लेख आहे. पण मी त्याचा तशा दृष्टीनें विचार न करितां तात्विक दृष्टीनें करतों. गणपतीची सोंड विद्येचें दर्शक आहे. विद्येचें आदि अक्षर ॐ आहे; व त्याला जर मूर्तीचें स्वरूप द्यावयाचें आहे तर ते शुंडारूपाने दाखविणें भाग आहे. शरीरामध्ये डोकें प्रधान असल्यामुळे हे चिन्ह तेथे घातले. विद्या किंवा ज्ञान ह्मणजे शक्ति आहे. इंग्रजींत " Knowledge is power " असे ह्मणतात, याचेही दर्शक गणपती आहे. ज्ञानाबरोबर ह्मणजे जेथें ज्ञान आहे तेथें ऋद्धिसिद्धि आहेत; व त्यांचें दर्शक दोन्हीकडे दोन स्त्रिया काढून दाखविलें आहे. ॐ हे नांव वेदांत ईश्वराला आहे व तें सर्व प्रकारांनी सोयीचे असल्यामुळें दिलें आहे. उंदीर हे विघ्नाचें सूचक आहे. अंकुश, परशु, हींही अशीं दर्शक चिन्हेंच आहेत. आतां चतुर्थीच्याच दिवशीं गणपतीचे कां पूजन करावें, याचें उत्तर मी असे देतों कीं, जागृती, सुषुप्ती, वगैरे तीन अवस्थेंत ईश्वरचिंतन करण्यापेक्षां चवथी अवस्था जी तुर्या त्यांत चिंतन करणें चांगलें. ह्मणून चवथ्या अवस्थेवरून चतुर्थीच्या दिवशीं गणेशपूजन करण्याचा संप्रदाय पडला असावा. तसेच त्या दिवशीं चंद्र न पाहण्याचें कारण " चंद्रमा मनसो जातः " इत्यादि वचनांवरून चंद्र हा ईश्वराचें मन आहे व मनांत अनेक प्रकारचे तरंग उत्पन्न होत असल्यामुळे असल्या तरंगी मनाकडे न पाहतां ईश्वराच्या विश्वरूपाकडे पाहा असें सांगण्याचा हेतु असावा. "

" कर्मयुक्त मूर्तिपूजा " आणि " पवित्र चिन्हें " यासंबंधानें स्वामी विवेकानंद यांचेंही मत असेच असून त्याचा रा. रा. टिळक यांच्या मतांवर प्रकाश पडण्यासारखा असल्यामुळें त्यांच्या Divotion ( भक्ति ) या इंग्रजी व्याख्यानांतील एका भागाचें रूपांतर येथें देतोः—

" प्रत्येक धर्मांत कालपरत्वें बरेच सुधारक होत गेले; व त्यांनीं ह्या कर्मयुक्त मूर्तिपूजेचा पुष्कळ प्रकारें निषेध केला. परंतु त्यांचे अवघे यत्न निष्फलच

झाले. कारण, जोंपर्यंत मनुष्यस्थिति बदलली नाहीं तोंपर्यंत जनसमाजाचें विशेष बहुमत मूर्तिपूजेविषयींच पडेल; व त्यांना त्यांच्या कल्पनेंत असणाऱ्या निराकार परमेश्वराचा भास देण्याकरितां वर निर्दिष्ट केलेल्या वस्तुपैकींच ( घंटा, गायन, विधिकर्में, ग्रंथ, आणि मूर्ति ) एकाद्या वस्तूची आवश्यकता लागेल. अगदी पूर्वीपासून महमदी व प्रॉटेस्टंट धर्मांच्या पंथांतील लोकांचेही सगुण भक्तीची कल्पना निर्मूल करण्याकडेच अविश्रांत यत्न चाललेले आहेत. तरी देखील ही विधियुक्त भक्ति त्यांच्यामध्यें आढळून येतेच. ती मुळा नाहींशी करतां येणारच नाहीं. पुष्कळ ‘भवति न भवति’ होऊन एका चिन्हाकरितां दुसरे चिन्ह मात्र बदलले जातें. ज्या महमदी धर्मांतील मुसलमानाला इतर धर्मांतील मनुष्याने विधियुक्त केलेली मूर्तीची पूजा ह्मणजे महत्पाप वाटते, तोच जेव्हा काबा येथील आपल्या पवित्र देवालयांत जातो तेव्हां त्याचा विचार करीत नाहीं. महमदी धर्मात असा एक समज आहे कीं, जेव्हां प्रत्येक मुसलमान निमाज पढण्याकरितां ह्मणून राहतो तेव्हां त्यानें आपण काबा येथील आपल्या पवित्र देवालयात उभे आहोंत, अशी कल्पना केली पाहिजे; आणि जेव्हां यात्रेकरितां ह्मणून तो तेथे जाईल तेव्हां देवालयांतील भिंतीस चिकटविलेला जो एक काळा दगड आहे, त्याचे त्याने चुंबन घेतले पाहिजे. शेवटीं जितकीं त्याने त्या दगडाची चुंबने घेतली असतील, तितकीं त्याच्या मृत्यु अंतीं त्याच्याविषयीं जाब देण्याकरितां यमन्यायासनापुढे तत्पर राहतील. तशीच एक झीम झीम नांवाची विहिर आहे, तींतील जो मुसलमान पाणी काढतो त्याची सर्व पापें क्षालन होऊन त्याला त्याच्या अपराधाची क्षमा मिळते, व तो पवित्र होऊन तेथें सुखानें अक्षय्य राहतो. दुसऱ्या कांहीं लोकांमध्यें ही सगुणभक्तीची कल्पना इमारतीच्या रूपानें असते. प्रॉटेस्टंट पंथांतील लोकांना इतर सर्व स्थलांपेक्षां देवालयेंच अधिक पवित्र वाटतात. देवालय हेच त्यांच्या सगुण रूपाचे दर्शक असतें; किंवा तेथें एकादा बायबला सारखा पवित्र ग्रंथ ठेविलेला असतो. दुसऱ्या एकाद्या वस्तूंपेक्षां ग्रंथाचीच कल्पना त्यांना परम पूज्य असते. प्रॉटेस्टंट लोक क्रूस पूजितात व क्याथॉलिक पंथाचे लोक त्यांच्यांत झालेल्या महंताच्या मूर्ति पूजितात. या सर्व दर्शकांच्या उपयोगाचें खंडन करणें अगदी निरर्थक आहे; आणि त्याची मुळीं आवश्यकताच नाहीं. आणखी अशा चिन्हांच्या सहाय्यानें सगुणभक्ति कां अनुसरूं नये, हा सुद्धां एक प्रश्नच आहे. या जड वस्तु निराकार स्वरूपाची कल्पना आणण्याकरितांच ठेवलेल्या असतात. हे अखिल विश्व देखील एक दर्शकच आहे; व त्याच्या द्वारें त्याच्या पलीकडे व्यक्त केलेलें निराकार स्वरूप शोधून काढण्यास आमचे सारखे यत्न चालू असतात. ही खालची स्थिति झाली व ती होणें स्वाभाविकच आहे. तरी पण आह्मी या जड सृष्टीहूनही वेगळें असें अध्यात्मक स्वरूप शोधण्यास यत्न करीत असतों. आमचा उद्देश आत्म्यालाच जाऊन मिळावयाचा

" प्रतिमा किंवा मूर्ति करावयाला पाहिजे एवढे सिद्ध झालें तर ती कशी करावी हा एक स्वतंत्र प्रश्न आहे, एवढेंच नव्हे तर, तें एक शास्त्र आहे. त्याला कांहीं हेतु आहे; व तो बघावयाचा झाला तर त्या मार्गानेंच बघितला पाहिजे. पूर्वजांनीं जे एवढे केलें ती कांहीं वेडेपणाची कृती नव्हे. ते जर आपणांस समजत नाहीं तर त्यांना वेडे ह्मणण्यापेक्षां आपणच वेडे आहोंत असें ह्मटलें पाहिजे. मूर्तीबद्दल ग्रंथांतून सोपपत्तिक विवेचन केलेले आहे. प्रत्येक मूर्ति अथवा देव श्रेष्ठ असे तो तो भक्त ह्मणतो, याचें कारण तो तें ते ईश्वराचे स्वरूप पूर्ण समजतो, हें होय. नुसता दगड मांडून व तोच काय तो देव समजून पूजा केली तर तो उपहास होईल. पण

---

आहे. आकृति, मूर्ति, घंटा, मेणबत्त्या, ग्रंथ, देवालयें ही सर्व चिन्हें आत्मज्ञानाच्या वाढत्या वृक्षास फारच साह्यकारी आहेत; परंतु त्यांची सीमा तितकीच, त्यांच्यापासून अधिक निष्पन्न होण्याची मात्र आशा दुर्लभ. "

भक्ति—(कृ. ना. अस्नोडकरकृत); पानें २१३.

बिझांट बाईनी १९०६ साली काशी येथील तत्वविवेचक सभेपुढे ' धर्मांत मूर्तिपूजेचें महत्व किती आहे ' या विषयावर व्याख्यान देतांना पुढील उद्गार काढले आहेत:—

"Many people find it very helpful to have an image for the purpose of meditation and concentration. Hence we find the images of Christ and Buddha worshipped with great reverence. Mind is always going out after external objects, so it is very helpful to have an external object of worship on which the mind will very easily rest. To draw the mind from external worlds to which it is always flying it is very necessary to choose one form. According to psychology it is very difficult to turn the mind from one thing to quite a different thing. So we can easily turn our mind from external odjects by fixing a particular external object for our meditation and worship. If you have one object of worship the mind rests on it and other objects vanish from the mind. If you want to get rid of any idea don't fight against it, but try to get rid of it, by attracting to it something contrary. For instance, if you want to control anger don't revolt against it, but employ your mind to its opposite and it will vanish. Don't struggle against it, but deliberately think of its opposites. When a man worships a particular image his mind rests on it and remains fixed to it and other things drop away from it. So the use of image-worship is of an immence help to the people, for it facilitates steadiness and concentration.

संकेत किंवा चिन्ह म्हणून केल्यास उपहास करण्याचें कारण नाही. हल्लीचा काळ असा आहे की, कांहींना माणसाचे पुतळे चालतात, पण देवाचे चालत नाहीत. मूर्तिपूजेबद्दल लोकांचा गैरसमज हळू हळू कमी होत चालला आहे; व परराष्ट्रांतही या गोष्टीचे शास्त्र म्हणून अध्ययन होत आहे. ज्या हिंदुधर्मांत आपण वाढलों त्यांचें तर या गोष्टीचा विचार करण्याचे कर्तव्य आहे; व ते कर्तव्य आपण पूर्णपणें बजावाल अशी मला उमेद आहे."

## विधि, संस्कार व आचार.

विधियुक्त मूर्तिपूजा, स्नानसंध्यादि कर्में, वर्णाश्रमधर्म, संस्कार, इत्यादि आमच्या धर्माचीं जीं जीं अंगें मानलीं आहेत त्यांकडे तिरस्कारानें न पाहतां त्यांचा हेतु समजून घेणें हें प्रत्येक हिंदुधर्माभिमान्याचें कर्तव्य आहे. मूर्ति-पूजा निरुपयोगी आहे, साकार देवाची भक्ती ही खरी भक्ती नव्हे, कर्में व संस्कार हीं अज्ञानमूलक आहेत, इत्यादि प्रकारचे विचार ज्यांच्या डोक्यांत येतात त्यांना धर्माचे रहस्य समजलें नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. अशा प्रकारचे लोक संशयवादी बनतात; व "या धर्मातील हें वाईट दिसतें तें टाका, चांगलें दिसतें ते घ्या;" "त्या धर्मातील अमुक हितकर आहे त्याचा अंगीकार करा, अमुक हितकर नाहीं तें टाकून द्या," अशीं अनेक धर्मातील अनेक तत्वें गोळा करून प्रार्थना-समाजादिकांचे नवे धर्म बनविलें. पण विधि, संस्कार किंवा आचार हें त्या त्या धर्माचें जीवन असून धर्मवैशिष्ट्याचें तें एक लक्षण आहे. या लक्षणाचा त्याग करणें म्हणजेच देशस्थिति व लोकस्थिति यांविषयीं अज्ञान प्रगट करून राष्ट्रीय जीविताला धक्का आणण्यासारखें आहे. अशा प्रका-कारचीं मतें रा. रा. टिळक यांनीं वारंवार प्रगट केलीं असून व्याख्यानद्वारें त्यांचा लोकांना अनेक वेळां उपदेशही केला आहे. १९०४ सालीं पुण्यांतील गणेशोत्सवांत नाइकांच्या गणपतीपुढें " पंढरीची यात्रा " या विषयावर व्याख्यान देत असतां त्यांनीं वरील मतांचा अनुवाद करून लोकांना पुढीलप्रमाणें उपदेश केला आहे:—

" हिंदुधर्माचा सारखा ऱ्हास होत असून तो लवकरच रसातळास जाणार–तो नाम-शेष होणार, अशी ओरड ऐकूं येते. परंतु पंढरपूरसारख्या यात्रेच्या प्रसंगीं दरसाल लक्षावधि लोक अनेक हालअपेष्टा व संकटे सोसून विठ्ठलदर्शनासाठीं जमतात; लक्षा-वधि लोकांचे अंतःकरणांत धर्मश्रद्धा आणि धर्माबद्दल आस्था व कळकळ अजून आहे; यावरून वरील ओरड बरीच साहसाची व चुकीची आहे, असें दिसून येईल.

पण धर्माविषयीं कळकळ, आस्था, श्रद्धा व विश्वास आहे तो खालच्या वर्गांत आहे, वरच्या वर्गांत याचा अलीकडे बराच अभाव झाला असल्यामुळें समाजाची, सेनानायकाशिवाय असलेल्या सैन्यासारखी स्थिति झाली आहे. कोणत्याही देशांत सामान्य जनसमूह धर्माचरण केवळ विश्वासानें व श्रद्धेनेंच करतो. धर्मग्रंथाचें विचारपूर्वक परिशीलन करून धर्माची जागृति करणें, त्याचें संरक्षण करणें किंवा त्याची परंपरा कायम राखून त्यास योग्य वळण देणें ही कामें सर्वत्र व सर्व काळीं सुशिक्षितांचींच आहेत. पण आमच्या समाजाची या बाबतींत चमत्कारिक स्थिति झाली आहे. समाजांत (१) विचारी व सुशिक्षित वर्ग. (२) सामान्य शिक्षण मिळवून नोकरीचाकरींत पडलेला वर्ग आणि (३) कारागीर, शेतकरी वगैरेंचा वर्ग, असे तीन वर्ग घेतले तर त्यांमध्यें धर्मासंबंधानें मिलाफ न दिसतां फाटाफूट मात्र दिसून येते. पहिल्या वर्गामध्यें दोन पोटभेद असून एकांत विद्वान्, शास्त्री, वैदिक व याज्ञिक हे येतात. मनुस्मृत्यादि ग्रंथांतील विधि व संस्कार, स्नानसंध्यादि कर्मे, वर्णाश्रमधर्म व फार झालें तर विशिष्ट अधिकारी लोकांनीं वेदांतादि ग्रंथांचें अध्ययन केलें ह्मणजे त्यांत सर्व धर्म आला अशी यांची समजूत आहे. महाराष्ट्रांतील मोठा जनसमूह ज्या मार्गानें जातो, त्या भक्तिमार्गाकडे या मंडळीचा ओढा कमी आहे. पूर्वीं तर कांहींचा या पंथास विरोधही होता. हा वर्ग इंग्रजी शिक्षणानें मागें पडत चालला आहे. नवे इंग्रजी सुशिक्षित लोक पहावे तर त्यांचा निराळाच पंथ. त्यांस श्रुतिस्मृत्यादिकांचा व संस्कारकर्मांचा धर्म कुचकामाचा वाटला; व पंढरपूरचे यात्रेकरूंचा भक्तिपंथही वेडगळ वाटून सुशिक्षितांची पहिली पिढी संशयवृत्ति (sceptics) बनली. या लोकांची ' संशयात्मा विनश्यति ' अशीच शेवटीं स्थिति झाली. पुढें कांहीं कालानें पूर्वसंस्काराचें प्राबल्य व पगडा बसून ईश्वर ह्मणून कोणी आहे, तो सर्व शक्तिमान् असून आपण पंगू आहों, त्याची उपासना करणें जरूर आहे, इतकें त्यांस वाटावयास लागलें. पण एकदां धिःकारलेल्या हिंदुधर्मांत त्यांस एकदम सामील होण्याचीही लाज वाटूं लागली. तेव्हां सर्व धर्मांतील सार घेऊन त्याचे त्यांनीं प्रार्थनासमाजादि पंचरसी नवे धर्म बनविले. पण एकंदरींत या मंडळींनीं धर्माच्या परंपरेचा उच्छेद केल्यामुळें बहुजनसमाजापासून हे दूर राहून जास्तच फाटाफूट झाली. थोडेंसें शिक्षण मिळवून नोकरींत शिरणाऱ्या वर्गास धर्मशिक्षण मिळण्याची संधीच नव्हती. हिंदुधर्माचें नांवही त्यांच्या कानावर विशेषसें येत नव्हतें. आलें तर तें मिशनरी वगैरे शाळांतून परधर्माचेंच येत असे. यामुळें हा वर्गही उदासीन व बहुतेक श्रद्धाहीन बनला. शेतकरी, कारागीर, व्यापारी वगैरेंच्या तिसऱ्या वर्गानें मात्र आपली धर्मपरंपरा कायम ठेवली. परम विरक्त, निर्लोभ व महाभगवद्भक्त अशा साधुसंतांनीं घालून दिलेला मार्ग आपल्या ऐहिक व पारलौकिक कल्याणाचा आहे, अशा दृढ श्रद्धेनें तो त्यांनीं आजपर्यंत अव्याहत कायम ठेवला आहे. त्यांच्या स्थितींत जर कांहीं फरक झाला असेल तर यापूर्वी

त्यांस वरच्या वर्गाचा त्या बाबतींत आधार असे तो मात्र अलीकडे तुटला आहे. मिशनरी वगैरे लोक स्वधर्मप्रसाराकरितां केवढा उद्योग करितात, कोणत्या संस्था स्थापतात, ते कसा मोह घालतात, भुरळ पाडतात व लालूच दाखवितात हें सर्वांस माहीत आहेच. परधर्मीयांचा हा कट्टा प्रयत्न व आमची उदासीनता, यामुळें सांप्रत धर्मास कोणी त्राता उरला नाही. धर्मावर संकटें कोणतीं आलीं आहेत, हल्लें कोठून होत आहेत, या परधर्मांचें स्वरूप काय, त्यांचे खंडन करतांना हिंदुधर्माच्या मांडणीत कोणता फरक केला पाहिजे, धर्मजागृति करून त्या बाबतींत ह्या तीन वर्गांचा मिलाफ कसा होईल, ह्या सर्वांचा विचार करून उपाय योजणें हें सुशिक्षितांचेंच कर्तव्य आहे....निरनिराळ्या धर्मांमध्यें जो भेद आहे तो परंपरेंतच आहे. ह्मणून हिंदुधर्माची ही परंपरा कायम राहील तरच हिंदुधर्माची उन्नति व रक्षण होईल."—के. २०।९।०४.

## वेदांत व पाश्चात्य तत्वज्ञान यांची तुलना.

आमच्या धर्मविचाराचें केंद्रस्थान वेदांत असून त्यासंबंधानें आमच्या इकडे पूर्वीच शोध झाले आहेत. पाश्चात्य राष्ट्रांत मात्र अलीकडे शतक अर्धशतकांत या शोधांबद्दल अत्यंत प्रयत्न चालले असून मि. हर्बर्ट स्पेन्सरसारख्या विद्वान् गृहस्थांनीं त्यांत जन्माचे जन्म घालविले आहेत. तसेंच आमच्याकडील तत्ववेत्त्यांचे शोध अपूर्व असून त्यांचे सिद्धांत पाश्चात्य राष्ट्रास हल्लीं उपलब्ध झालेल्या आधिभौतिक शास्त्राच्या कसोटीसही ते चांगले उतरले आहेत. ही कसोटी कोणत्या प्रकारची आहे, आमच्या तत्ववेत्त्यांची विचारसरणी व सिद्धांत काय आहेत, व स्पेन्सरसारख्या तिकडील तत्ववेत्त्यांची मजल कोठपर्यंत गेली आहे, व दोहोंच्या तुलनेनें आमचें तत्वज्ञान कसें श्रेष्ठ ठरतें, या संबंधानें टिळक यांनीं १९०१ सालीं रा. रा. दाभोळकर यांनीं प्रसिद्ध केलेल्या 'ज्ञेयाज्ञेयमीमांसा' या पुस्तकांवर अभिप्राय देतांना विवरण केलें असून पुढें १९०३ सालीं स्पेन्सरसाहेब वारले त्या वेळीं त्यांचा मृत्युलेख लिहितांना त्याचा विशेष खुलासा केला आहे. हा खुलासा केलेला लेख मोठा असून तो साग्र वाचण्यासारखा आहे. तथापि, तो साग्र न देतां त्यांतील अत्यंत महत्वाचा भाग येथें देतों; ह्मणजे त्यावरून त्यांची विचारसरणी व मतें कोणत्या प्रकारचीं आहेत हें वाचकांस कळून येईल. ते ह्मणतात:—

"आपण ज्या सृष्टींत राहत आहों ती सृष्टी निर्माण कशी झाली, निर्माणकर्ता या सृष्टीहून कोणी निराळा आहे कीं नाहीं, सृष्टीस पाहणारा आपल्या शरिरांत जो

जीव आहे त्याचें स्वरूप काय, तो नित्य आहे की अनित्य आहे, सृष्टीच्या मुळांशीं जीं आदितत्वें आहेत त्यांचा आणि या जीवाचा कांहीं परस्पर संबंध आहे कीं नाहीं, इत्यादि गूढ प्रश्न आमच्या लोकांस फार प्राचीन कालापासून परिचित झालेले आहेत. परमेश्वराने सात दिवसांत सृष्टी निर्माण केली, आणि प्राण्यांची उत्पत्ती करतांना पशु, पक्षी, कीटक, मनुष्य वगैरे निरनिराळ्या जाती आपल्या शक्तीनें पृथक् निर्माण केल्या, इत्यादि बायबलांत गोंविलेल्या वेडगळ कल्पना बायबल रचिलें जाण्यापूर्वीच आमच्या तत्त्ववेत्त्यांनी झुगारून दिल्या होत्या. जीवकोटींतील पशुपक्ष्यादि निरनिराळ्या जातींतील उपजाति एका सामान्य जातीतून उत्क्रांतित-त्वानें निघाल्या आहेत असें जें मत डार्विन साहेबांनी प्रस्थापित केलें व ...

होतें. सर्व सृष्टीचे जड व चित् असे दोन मोठे वर्ग करून हे दोनही भाग अनादि व नित्य आहेत असे सांख्यतत्ववेत्यांनीं ठरविले होतें. चित् सृष्टीस पुरुष आणि जड सृष्टीस प्रकृति अशीं नांवें त्यांनीं दिलीं होतीं. पुरुष हाच जीव; परंतु तो प्रकृतीहून भिन्न व प्रकृतीच्या गुणांनी अलिप्त आहे, असे सांख्यांचे मत आहे. प्रकृति ही त्रिगुणात्मक ह्मणजे सत्व-रज-तमोगुणात्मक आहे; आणि अगदीं सृष्टीच्या आरंभीं हे तिन्ही गुण साम्यावस्थेंत असतात; आणि त्यांची ती साम्यावस्था बिघडली ह्मणजे तिन्ही गुणांच्या कमजास्त मिश्रणानें प्रथमतः महत् तत्व, अहंकार आणि पंचमहा-भूतांची तन्मात्रें निर्माण होऊन नंतर पुढें सृष्टींतील निरनिराळे पदार्थ प्रादुर्भूत होतात, असा सांख्यांचा सिद्धांत आहे. पुरुष किंवा जीव हा, प्रकृतीपासून वर सांगि-तल्याप्रमाणें उद्भुत झालेल्या हस्तपादादिक स्थूल, किंवा बुद्धि आणि मन आदिकरून सूक्ष्म इंद्रियांनी वेष्टित असून त्यांच्या सानिध्यानेंच सभोंवारच्या संघातांत संज्ञा किंवा संवेदनशक्ति दृश्य होते आणि हा जो प्रकृतीपासून निघालेल्या विकारांचा जीवावर परिणाम तो नाहींसा झाला ह्मणजे जीवास मुक्ति मिळते असे सांख्यांचे ह्मणणें आहे. हा सिद्धांत अर्थात्च स्थूल मानानें आह्मीं दिला आहे. कारण, यापेक्षां विस्तारानें आजच्या लेखांत त्यांचीं मते सांगणें शक्य नाहीं. तथापि, वर दिलेल्या स्थूल सिद्धां-तावरूनही एवढें लक्षांत येण्यासारखें आहे कीं, त्रिगुणात्मक प्रकृतीची साम्यावस्था, जिला अव्यक्त अशीं संज्ञा आहे ती, व्यक्त रूपानें दृग्गोचर होण्यास त्रिगुणांमध्यें वैषम्य उत्पन्न व्हावें लागते, हें मत फार प्राचीन काळीं या देशांत उपस्थित झालें आहे. भगवद्गीतेंतही ' गुणागुणेषु वर्तन्ते ' अशा रीतीनें जें वाढीचे किंवा उत्क्रांतीचें तत्व सांगितलें आहे तेंही हेंच होय. या सांख्यमतांत वेदांत्यांच्या दृष्टीनें जो फरक कराव-यास पाहिजे तो एवढाच कीं, प्रकृती आणि पुरुष हे दोन्ही भिन्न न मानतां या दोन्हींचेंही अगम्य असें कांहीं तरी मूल आहे, आणि तें एक, अविभाज्य व चिद्रूप

असून नित्य असल्यामुळें जड प्रकृती ही त्याचाच अनित्य आभास असून जीव हा स्वतः अज्ञेय स्वरूप मानला पाहिजे. जीव आणि अज्ञेय यांचा हा संबंध कांहीं निराळ्या प्रकारचा आहे असें द्वैत व विशिष्टाद्वैतवादी ह्मणतात. पण त्याचा विचार करण्याची सध्या जरूर नाहीं. चित् आणि जड सृष्टीच्या मूलाशीं काय आहे एवढ्याचाच आपणास विचार करावयाचा आहे; आणि त्याचा बोध वर जे सांख्यांचे आणि वेदांत्यांचे सिद्धांत दिले आहेत त्यांवरून होण्यासारखा आहे. सांख्य आणि वेदांताखेरीज सृष्टीच्या उत्पत्तीबद्दल न्याय आणि वैशेषिक अशींही दुसरीं दोन मतें आहेत. त्यांच्या दृष्टीने जगांतील सर्व पदार्थ द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष, समवाय आणि अभाव या सात कोटींत पडतात; आणि सर्व द्रव्यांची उत्पत्ती परमाणूपासून झालेली असून द्रव्यामधील पृथ्वी, आप, तेज, वायु आदिकरून मूल भेद होण्यास परमाणूमधील भेदच कारण होतात, असे वैशेषिकांचें ह्मणणें आहे. तात्पर्य, त्रिगुणाच्या साम्यावस्थेपासूनच पुढें विषमावस्था होऊन पदार्थांचे भेद होतात, असे जें सांख्यांचें मत आहे तें वैशेषिकांस कबूल नसून भेदाची उत्पत्ती भेदापासूनच झाली पाहिजे, व त्याकरितां विशेष हें तत्व निराळे मानले पाहिजे, असे त्यांचें ह्मणणे आहे. त्याचप्रमाणें प्रकृती आणि पुरुष हीं दोनच तत्वे न मानतां त्यापेक्षां आदितत्वांची संख्या न्याय व वैशेषिक मतांत जास्त धरलेली आहे. या दोन्ही मतांचे तत्ववेत्ते ईश्वराकडे जगाचें कर्तृत्व देतात, पण ते मत वेदांत्यांच्या ईश्वरविषयक मतापेक्षां बरेंच निराळे आहे. सांख्यांचे सेश्वर-सांख्य आणि निरीश्वर-सांख्य असे भेद आहेत. पण विस्तारभयास्तव ते येथें सांगतां येत नाहींत. स्पेन्सर साहेबाच्या तत्वज्ञानाचा प्राचीन तत्वज्ञानाशीं कितपत मेळ आहे एवढेंच थोडक्यांत आह्मांस सांगावयाचे आहे, व वर केलेला प्राचीन मतांचा उल्लेख तेवढ्यापुरता बस्स आहे. याखेरीज प्रस्तुत विषयास दुसरें उपयुक्त मत ह्मटले ह्मणजे चार्वाकाचे होय. वरील सर्व मतांत जीव किंवा चैतन्य हे जडाहून निराळें व नित्य मानलेलें आहे. चार्वाकाच्या दृष्टीनें हें मत बरोबर नाहीं. जडाचेच देहाकार जें दृश्य स्वरूप झालेले आहे त्यांतील द्रव्यसंघाताचाच चैतन्य हा एक धर्म आहे आणि देहाचा नाश झाला ह्मणजे त्याबरोबर तो धर्मही नाहींसा होतो; कारण 'न हि प्रेत्य संज्ञाऽस्ति' असे चार्वाकाचे ह्मणणें आहे. या मताप्रमाणें अर्थात्च परलोक वगैरे कल्पना चुकीच्या होतात. तथापि, जगांतील मनुष्याचें वर्तन नीतीचें व परोपकाराचें असावें असे सिद्ध करण्यास या मताची कांहीं हरकत येत नाहीं. पण तीही गोष्ट चार्वाकमतवाद्यांनीं कबूल केलेली दिसत नाहीं.

असो; या प्राचीन तत्ववेत्त्यांच्या मतांशीं आधुनिक शास्त्रपद्धतीनें स्पेन्सर साहेबानीं ठरविलेल्या मूलतत्वांचा कितपत मेळ आहे याचा आतां विचार करूं. स्पेन्सर साहेबांस अलीकडील रसायनशास्त्र, जीवनशास्त्र, मानसशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र,

वगैरे सर्व आधिभौतिक व अध्यात्मिक शास्त्रें व त्यांतील सर्व नवे शोध पूर्णपणें अवगत होते; इतकेच नव्हे तर, या शास्त्राची प्रगति पुढें कोणत्या दिशेनें झाली पाहिजे यासंबंधी त्यांचे विचार त्या त्या विशिष्ट शास्त्रांतील वाकबगार विद्वान लोकांपेक्षांही पुढे गेलेले होते, हें येथे वाचकांनी लक्षांत ठेविले पाहिजे. उदाहरणार्थ, डार्विन-साहेबांनी जीवकोटीतील उपजातीसंबंधानें उत्क्रांतिमताचे निरूपण करण्यापूर्वीच तें मत स्पेन्सरसाहेबांनी काढलेलें होते, ही गोष्ट आतां सर्वांस मान्य आहे. तत्त्वज्ञान ह्मणजे सर्व शास्त्रांतील सिद्धांताचें एकीकरण करून तद्वारां सृष्टीच्या मुळांशी असलेल्या आदितत्वाचें निदान करणे आणि त्या तत्वांची विकृति कशी होते तें ठरविणें, हे होय असें स्पेन्सरसाहेबांनीच त्याचे लक्षण केलेलें आहे. या लक्षणाप्रमाणें तत्वज्ञ होण्यास जगांतील सर्व शास्त्रांची करतलामलवत् माहिती असणें जरूर आहे. आणि तसें ज्ञान स्पेन्सरसाहेबांच्या अंगांत वसत होते ही गोष्ट त्यांच्या सिद्धांताचा विचार करतांना विसरतां कामा नये. अशा रीतीनें जें ज्ञान प्राप्त झाले त्याच्या साहायान स्पेन्सरसाहेबांनीं प्रथमतः असें ठरविले आहे की, जगांत द्रव्य ( matter ) आणि गती किंवा शक्ति ( force ) अशी दोनच आदितत्वें आहेत. या दोन तत्वांत आणि सांख्यांच्या प्रकृती आणि पुरुषांत थोडासा भेद आहे तो पुढें सांगूं. गती किंवा शक्ति आणि द्रव्य हीं दोन्हीही तत्वें परस्पराशी संलग्न असून त्यांच्या वियोगाचें ज्ञान मनुष्यास होणें शक्य नाहीं; करिता त्यांचा संयोग अविनाशीच कल्पिला पाहिजे असें स्पेन्सरसाहेबाचे मत आहे. तथापि, ज्याअर्थी द्रव्याचें ज्ञान होण्यास त्याचा इंद्रियावर आघात व्हावा लागतो त्याअर्थी द्रव्य व शक्ती या दोन्ही परस्पर-संलग्न तत्वांत गती किंवा शक्तीसच स्पेन्सरसाहेब अधिक प्राधान्य देतात. द्रव्य आणि गती यांची साम्यावस्था असते तेव्हां जें जगाचें स्वरूप तें मूल स्वरूप होय. परंतु ही साम्यावस्था चिरस्थाही नसल्यामुळें तिचा समतोलपणा आपोआपच नाहींसा होतो, आणि तो नाहींसा झाल्यावर ह्यांच्या विषमसंयोगानें सृष्टींतील नानाप्रकारचे भेद उत्पन्न होतात. उत्क्रांति ज्यास ह्मणतात ती हीच होय. साम्यावस्थेची विषमावस्था होणें किंवा अभेदापासून भेदोत्पत्ती होणें हें उत्क्रांतीचे मुख्य लक्षण होय. आणि या तत्वाप्रमाणें उत्क्रांती होऊं लागली ह्मणजे द्रव्याचीं भिन्न भिन्न स्वरूपें होऊन त्यांपैकीं प्रत्येक स्वरूप पूर्णतेस पोहोचते. या पूर्णतेस द्रव्य व गती यांचे ‘ तत्कालीन समतोलन ’ असें स्पेन्सरसाहेबांनी ह्मटले आहे. पण हें समतोलनही कायमचे टिकत नाहीं आणि तें बिघडलें ह्मणजे पुन्हां अपक्रांतीस सुरवात होते, आणि पुन्हां द्रव्य आणि शक्ति ही सम्यावस्थेस येऊन पोहोचतात. द्रव्य व गती यांच्यामध्यें हा जो व्यापार चालू आहे, तोच जगाच्या प्रवृत्तीचें कारण होय. आणि हें त्याचें आंदोलन (खेळ) जोंपर्यंत चालू आहे, तोंपर्यंत जगामध्यें कांहीं ठिकाणीं उत्क्रांति तर कांहीं ठिकाणीं अपक्रांति चालू रहावयाचीच असें स्पेन्सरसाहेबाचें ह्मणणें आहे. यावरून गतासियुक्त

जड द्रव्यच स्पेन्सरसाहेबांच्या मताप्रमाणें सृष्टीचें मूलकारण होय, असें कित्येकांस वाटण्याचा संभव आहे; पण खरा प्रकार तसा नाहीं. द्रव्य ह्मणजे काय, शक्ति ह्मणजे काय, हीं दोन्ही ज्या पदार्थांत अधिष्ठित झालेलीं आहेत त्याचें स्वरूप कोणतें, आणि काल व दिशा इत्यादि ज्या द्रव्याच्या नित्यसंयुक्त उपाधि आहेत, त्या स्वतंत्र आहेत किंवा द्रव्याश्रित आहेत, अनादि आहेत किंवा सादि आहेत, इत्यादि गूढ प्रश्नांचा सूक्ष्म विचार करून अखेरीस ज्योतिष, जीवनशास्त्र, मानसशास्त्र वगैरे शास्त्रांतील अनेक दृष्टांत देऊन तद्वारां स्पेन्सर साहेबांनी असें ठरविलें आहे कीं, द्रव्य व गती हीं ज्या ठिकाणी आविर्भूत होतात अशी कांहीं तरी वस्तु त्यांच्या मुळाशीं आहे; परंतु तिच्या सद्भावनेखेरीज तिचे दुसऱ्या प्रकारचें ज्ञान आपणास होऊं शकत नाहीं. जगामध्ये जें जे कांहीं दृश्यमान होतें तें, आणि त्याची मूल अवस्था—अर्थात् द्रव्य आणि गती यांचा संघात—ही या अज्ञेयाचींच आविर्भूत स्वरूपे होत असे स्पेन्सर साहेब ह्मणतात. पण आपले सर्व विचार दिक्कालादिकांनी मर्यादित असल्यामुळें दिक्कालादिकांच्या उपाधींनीं विरहित असें जें आदितत्व त्यासंबंधाने आपणास अधिक ज्ञान होणें अशक्य आहे, असे त्यांनीं सिद्ध करून दाखविले आहे वेदांतील परब्रह्मही अशाच प्रकारचें अज्ञेय असून तें सत्, चित् आणि आनंदरूप आहे, यापेक्षां जास्त कांहीं सांगवत नाहीं असे जें वेदांत्यांचे तत्व आहे त्याचा आणि स्पेन्सर साहेबांनी सिद्ध केलेल्या सत्तारूप अज्ञेयाचा बहुतेक अंशी पूर्ण मेळ आहे असें यावरून ध्यानांत येईल. सारांश, जगाच्या बुडाशी जें तत्व आहे ते जरी अज्ञेय असले तरी ते आहे आणि चिद्रुप आहे एवढे तरी त्याबद्दलचे ज्ञान आपणास होतें असे स्पेन्सर साहेबांनीं सर्व आधुनिक शास्त्रांचा विचार करून सप्रमाण व व्यवस्थित रितीने सिद्ध केलेले आहे. आणि या बाबतींत सांख्यांपेक्षां एक पाऊल ते पुढें गेले असून वेदांतांतील ब्रह्मवाद्यांच्या मतांशी त्यांची एकवाक्यता आहे. जगाच्या मूलाशी जें हें अज्ञेय तत्त्व त्याचेच दृश्य जग हे आविर्भूत किंवा विकृत स्वरूप आहे असें मानल्यावर सदर स्वरूपास एक प्रकारे साक्षेप अनित्यता प्राप्त होते हें सांगावयास नकोच. स्पेन्सरीय तत्वज्ञानापासून वेदांतमताचें जरी अशा प्रकारे पुष्टीकरण झालें तरी दुसऱ्या एका बाबतींत स्पेन्सर साहेबांचे मत बहुतेक प्राचीन तत्ववेत्यांच्या मतांशी अगदीं विरुद्ध आहे. हें मत चैतन्य किंवा जीव यासंबंधाचे होय. चैतन्यरूप जीव नित्य आहे, अविनाशी आहे, देहाव्यतिरिक्त तो राहूं शकतो असें सांख्य, वेदांत, न्याय किंवा वैशेषिक या सर्वांचें ह्मणणे आहे. पण स्पेन्सर साहेब असें ह्मणतात की, ज्याप्रमाणें गती नेहमीं द्रव्याश्रित असते त्याप्रमाणें चैतन्यही देहामधील विशिष्ट रीतीनें परिणत झालेल्या मेंदूखेरीज अन्यत्र दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. संज्ञा किंवा संवेदनशक्ति मेंदूंतच असते इतकेंच नव्हे, तर या दोहोंचा संयोग नित्य असल्यामुळें मेंदूव्यतिरिक्त संवेदनशक्ति राहते असें मानण्यास कांहीं पुरावा

नाहीं. सारांश, संज्ञा किंवा संवेदनशक्ति ( consciousness ) ही देहाच्या नाशाबरोबरच नाहीशी होते असे स्पेन्सरसाहेब मानतात. ह्मणजे या बाबतींत 'न हि प्रेत्य संज्ञाऽस्ति' हें चार्वाकाचे मत त्यांस ग्राह्य आहे. देहाव्यतिरिक्त संज्ञाशक्ति किंवा आत्मा राहणेंच जर अशक्य तर पुनर्जन्मादि कल्पना किंवा देहाच्या मरणानंतर जीवाची अमुक एक प्रकारची स्थिति होते इत्यादिक मते 'मूले कुठारः' या न्यायानेच उध्वस्त होतात. अर्थात् परलोक आदिकरून धर्मकल्पनांचें मूळ कुंठित होते हे सांगावयास नकोच. देहामध्ये उत्क्रांतितत्वाप्रमाणे एका विशिष्ट प्रकारच्या पूर्णतेस पोहोचलेली जीवरूप जी शक्ति तिचा देहास मरण आलें असता एकदम नाश व्हावा आणि अपक्रांतीच्या नियमास अनुसरून तिचा अनादि अज्ञेयशक्तीत एकदम लय व्हावा असे मानणें चमत्कारिक आहे; व हें तत्व मान्य करण्यास आपली बुद्धि जरा कचरते असेंही स्पेन्सरसाहेब म्हणतात. पण मेंदू आणि संज्ञाशक्ति निरनिराळी मानण्यास पुरावा नसल्यामुळें हाच सिद्धांत कबूल केल्याखेरीज गती नाहीं असें त्याचे ह्मणणे आहे आत्म्यास किंवा जीवास देहाव्यतिरिक्त जर राहतां येत नाहीं तर धर्मकल्पना मनुष्याच्या मनांत कोठून आली, असा प्रश्न सहज उद्भवतो. यास स्पेन्सरसाहेबांचे असे उत्तर आहे की, स्वप्नामधील अवास्तविक अनुभवावरून आणि भूत किंवा पिशाच्च इत्यादिकांच्या गोष्टींवरून जीव हा शरिरास सोडून राहूं शकतो अशी खोटी कल्पना प्रथमतः रानटी मनुष्यांच्या मनांत आली, आणि त्याच कल्पनेची पुढें वाढ होऊन त्यावर धर्माची इमारत उभी करण्यांत आली. स्पेन्सरसाहेबांचे हे मत म्याक्समूलरादिकरून विद्वानांस मान्य नव्हते व त्यांनीं ते खोडण्याचाही प्रयत्न केलेला आहे. शिवाय जीव आणि मेंदू यांचा संबंध स्पेन्सरसाहेब ह्मणतात त्याप्रमाणे नित्य नसून देहास सोडूनही जीव राहूं शकतो अशाबद्दल 'सोसायटी फॉर सायकीकल रिसर्च' इने अलीकडे कांहीं पुरावाही गोळा केला आहे. तेव्हां जीवासंबंधाने स्पेन्सरसाहेबाचे मत केव्हांही सर्वमान्य होईल असे वाटत नाहीं. कसेही असो; जीव किंवा आत्मा यासंबंधाने स्पेन्सरसाहेबाचे मत चार्वाकाप्रमाणे, आणि जगाच्या बुडाशी जे अज्ञेय तत्व आहे त्या बाबतींत त्यांचे मत वेदांत्याप्रमाणें आहे असे यावरून दिसून येईल. जगामध्ये दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या निरनिराळ्या भेदांची उत्पत्ती द्रव्य आणि शक्ति यांच्या साम्यावस्थेपासूनच होते असे जे त्यांचे मत ते वैशेषिक मतास जरी विरुद्ध आहे तरी सांख्याच्या मताशीं मिळते. तेव्हां एकंदर विचार करतां परमेश्वर, जीव आणि जडसृष्टी यासंबंधाची स्पेन्सरसाहेबांची मते अनुक्रमें वेदांत, चार्वाक आणि सांख्य यांच्या मतांच्या मिश्रणानें झालेली आहेत असें ह्मणावें लागते. परंतु यांत जें चार्वाक-मताचें मिश्रण आहे ते जुन्या चार्वाकमताहून अत्यंत भिन्न आहे हें पूर्णपणें लक्षांत ठेवलें पाहिजे. देहाबरोबर जीवाचाही नाश होतो असें जरी स्पेन्सरसाहेब मानतात तरी चार्वाकाप्रमाणें 'ऋणं कृत्वा घृतं

पिबेत्' या चनी तत्वाचा त्यांनीं कोठेही अंगिकार केलेला नाही. इतकेंच नव्हे, तर उत्क्रांतीचें तत्व समाजास व नीतिशास्त्रास लावून सर्व समाजाचे किबहुना मानव जातीचें हित साधून परोपकार करणे हीच जगामध्ये जीवाच्या कर्तव्याची सीमा आहे असें त्यांनी सोपपत्तिक व आपल्या नेहमीच्या पद्धतीनें अनेक शास्त्रांतील दृष्टांत देऊन प्रतिपादन केले आहे. वेदांतमताप्रमाणें ते सृष्टीस केवळ आभास मानीत नाहीत, आणि सांख्याप्रमाणें प्रकृतीपुरुषाच्या पलीकडे कांही नाही असेही ह्मणत नाहीत, हा त्यांच्या आणि वेदांत आणि सांख्य यांच्या मतांत मोठा फरक आहे. जीवासंबंधी त्यांचे मत धर्मप्रवृत्तीस प्रतिकूल आहे खरे, व त्यामुळे केवळ ख्रिस्ती मिशनरी लोकांचेच नव्हे तर कांही तत्वज्ञ मंडळींचेही आघात त्यांस सहन करावे लागले; व कांहीकांनी तर त्यांची नास्तिक-शिरोमणीतही गणना केली होती. पण आमच्या मते असे करणे अगदी गैर आहे. तत्वज्ञ मनुष्याने जगाची पर्वा ठेवून कांही उपयोगी नाहीं, किंबहुना तशी पर्वा न ठेवतां आपणांस सूक्ष्म विचारांती जे खरे दिसेल तेंच जगापुढें मांडणे हे त्यांचे कर्तव्य होय. आणि हे कर्तव्य जर स्पेन्सर साहेबानी पूर्णपणे बजावले तर त्याबद्दल त्यांस नांवे ठेवणें मूर्खपणाचे आहे. जीव देहाव्यतिरिक्त असू शकतो यास स्पेन्सरसाहेबांस जर पुरावा मिळत नाही अथवा मिळालेला पुरेसा वाटत नाही, तर तो पुढे कधींही मिळणार नाही अथवा पुरेसा होणार नाही असें समजणे चुकीचें होय. शिवाय, यासंबंधानें स्पेन्सर साहेबांनीं आपले मत देतांना आपली बुद्धि या बाबतीत कशी कुंठित होते हे जर स्पष्ट सांगितले आहे, तर "दंतभंगो हि नागानां श्लाघ्यो गिरिविदारणे" या न्यायानें त्यांचे आह्मीं अभिनंदनच केलें पाहिजे."–के. १५।१२।०३.

## धर्म, तत्वज्ञान व शास्त्र.

टिळक यांच्या आतांपर्यंत दिलेल्या विवेचनावरून आमच्या प्राचीन तत्ववेत्यांनीं परमेश्वराचें सच्चिदानंदरूप आहे असें जें वर्णन केलें आहे तें खरें असून जीव हा परमेश्वराचाच अंश आहे, जीवाचा व परमेश्वराचा संबंध असून जीवाची अंतिम उन्नति–परमेश्वरस्वरूपीं मिळणें अथवा सायुज्यता प्राप्त होणें–हेंच धर्माचें रहस्य आहे,* धर्मशास्त्रांत व तत्वज्ञानांत विरोध नाहीं, धर्माचे सिद्धांत हल्लीं उपलब्ध असलेल्या आधिभौ-

---

* कलकत्ता येथे १९०१ सालीं 'हिंदुधर्म' या विषयावर व्याख्यान दिलें त्या वेळीं त्यांनी धर्माची व्याख्याच येणेंप्रमाणे केली आहे:—

"Religion in the true sense of the word means and includes the knowledge of the nature of God and soul and of the ways and means by which the human soul can attain salvation."

तिक शास्त्राच्या कसोटीस टिकतात, एवढेच नव्हे तर, शास्त्रानें धर्माचा पाया खंबीर केला, इत्यादि गोष्टी वाचकांच्या मनांत चांगल्या बिंबतील. तथापि, अलीकडे 'धर्मविरुद्ध शास्त्र' व 'शास्त्रविरुद्ध धर्म' अशा मथाळ्यांखालीं अनेक लेख प्रसिद्ध झाले असून त्यांनीं कित्येकांच्या मनांत संशय उत्पन्न होण्याचा संभव असल्यामुळें तो संशय दूर होऊन रा. रा. टिळक यांचे विचार विशेष रीतीनें बिबावे म्हणून १९०९ सालच्या गणेशोत्सवांत त्यांनीं 'देह व आत्मा' या विषयावर सोप्या भाषेंत जं एक व्याख्यान दिलें त्यांतील महत्वाचा भाग पुढें देतों. ते म्हणतातः—

"आपल्या प्राचीन तत्त्ववेत्त्या ऋषींनी आत्म्याचें भिन्नत्व प्रस्थापित केलें आहे. पण नवीन पद्धतीनें शिकलेल्या आपल्या विद्वानांस ही प्रमाणें व या कोट्या सर्वथा मान्य होण्यासारख्या नाहीत. जड-चैतन्याच्या भिन्नरूपत्वासंबंधाचा वाद इकडेच आहे, असें नाहीं; तो युरोपात देखील चालू होता. ख्रिस्ती धर्माचे आधारभूत पुस्तक जे बायबल त्यांत आत्म्याचे अस्तित्व मानलेलें आहे. परंतु अर्वाचीन काळी युरोपांत आधिभौतिक तत्त्वांच्या प्राबल्याची जी क्रांती घडून आली, तिच्या योगानें हें बायबल-प्रणीत आत्म्याचे अस्तित्व झूट होते, असें शास्त्रज्ञांस वाटूं लागले. ख्रिस्तीधर्मग्रंथांतून एक तर आपल्या उपनिषद्-ग्रंथाप्रमाणें अध्यात्मविचार सूक्ष्मपणें कोठेंच केलेला नाहीं. शिवाय अलीकडील शास्त्रांचे सर्व सिद्धांत प्रयोगसिद्ध असतात; आत्मा धरून आणून त्यावर प्रयोग करतां येईनात. म्हणून रसायनशास्त्रज्ञ, पदार्थविज्ञानवेत्ते वगैरे प्रयोगसिद्ध (experimental) शास्त्र खरे मानणारे लोक केवळ जडवादी बनले. सृष्टींतील कांहीं द्रव्यें शरीरांत एकीकरण पावली असतां त्यांस चेतना प्राप्त होते; पण ही चेतना त्या घटकावयवापासून भिन्न नव्हे; त्यांच्या एकीकरणाचा परिणाम होय; सारांश, आत्मा म्हणून कांहीं शक्ति जड सृष्टीच्या पलीकडे असेल असें या शास्त्रज्ञांस वाटेना. फार काय सांगावें, युरोपांत गाजलेला जो **हर्बर्ट स्पेन्सर** तोही पक्का जडवादी होता. 'आत्मा' भिन्न रूपानें अविनाशी आहे, ही गोष्ट त्यास मान्य नव्हती. चेतना ही जड पदार्थांच्या एकीभवनाचा परिणाम असेच त्याचें मत होतें. अखेरीस अखेरीस या मतांत थोडी चलबिचल होऊन त्याच्या सत्यत्वाविषयी स्पेन्सरसाहेब साशंक झाले होते असें दिसतें. शास्त्रवेत्त्यांच्या ह्या नवीन सिद्धांताचा परिणाम धर्मखात्यावर मात्र विशेष झाला. ख्रिस्तीधर्म हा 'आत्म्याचा मोक्ष' ह्या तत्वावरच उभारलेला आहे. ख्रिस्ती धर्माची मोक्षाची कल्पना 'सलोकता' ही आहे. परमेश्वरांतच आत्मा मिळून जावा, इतकी उच्च कल्पना त्यांच्यांत नाहीं. तथापि, जेथं आत्म्याला अस्तित्वच नाहींसें झालें, तेथें त्याला मोक्ष कसचा? जो मुळीं नाहींच त्याला मुक्ति काय देणार!

आत्म्याचे जड सृष्टीहून भिन्न असे अस्तित्व शास्त्रज्ञांस संमत नसल्याकारणानें, ते धर्म ह्मणजे केवळ एक थोतांड आहे असे मानूं लागले. मात्र 'आत्मा' नाहीं, असें मानल्यामुळें दुसरी एक अडचण उत्पन्न झाली. ती ही कीं, धर्माची अशी वासलात लागल्यामुळे धर्माच्या बंधनानें एकत्र बांधलेला समाज हा कोणास कोणी विचारीनासा होऊन, विस्कळीत होईल. नीतीचें बंधन ढिलें होऊन लोक नीतिभ्रष्ट होतील. यास्तव आत्म्याच्या अनस्तित्वाबरोबरच (Maximum good of the maximum number) 'अतिशय मोठ्या जनसमूहाचें अतिशय मोठें कल्याण' हे तत्व सृष्टीशास्त्रवेत्त्यांस प्रसिद्ध करावे लागले. जेणेंकरून मनुष्यजातीचें कल्याण होईल ती नीति, अशी व्याख्या त्यांस बनवावी लागली. तथापि, खिस्ती धर्मखाते व शास्त्रनिपुण विद्वान् लोक यांमध्ये वितुष्ट आलेंच; कारण, धर्मोपदेशक लोकांस सयुक्तिक रीतीनें प्रमाणसिद्ध असे आत्म्याच्या अस्तित्वाचें माप शास्त्री मंडळीच्या पदरांत घालतां येईना! ते फक्त बायबलांतील वाक्यांवर बोट ठेवून, त्यांत सांगितले ह्मणून 'आत्मा' आहे, असे ह्मणत! पण हे बाबावाक्य शास्त्रवेत्त्या मंडळीस कसे पटणार? तथापि, हा वाद तेथेंच थांबला नाही. खुद्द शास्त्रज्ञ मंडळीतच शंका निघूं लागल्या. तेव्हां या प्रश्नाचा कायमचा उलगडा करण्याच्या उद्देशाने इ. स. १८७३ या वर्षी महान् महान् शास्त्रकोविदांचे एक मंडळ स्थापन झाले. ह्या मंडळाचे मोठमोठे रसायनवेत्ते व पदार्थविज्ञानवेत्ते पंडित सभासद होते. 'सोसायटी ऑफ सायकिकल रिसर्च' हे नांव धारण करून ह्या लोकांनी आत्म्याच्या निरनिराळ्या स्थितींत प्रयोग करण्यास सुरवात केली. मनुष्य निद्रास्थितीत असतां काय होते, मरण येते तें काय, अपस्माराच्या लहरीत मनुष्याच्या चैतन्यशक्तीत काय फेरफार होतात, वेड लागल्यानंतर जो चित्तविभ्रम होतो त्याचे स्वरूप काय आहे, अंगांत भूतसंचार झाला असतां एखाद्या मृतमाणसाच्या इच्छेचा पगडा जिवंत माणसाच्या इच्छाशक्तीवर कसा बसतो, मेस्मेरिझमच्या योगानें एका मनुष्याच्या मनावर दुसऱ्याचा अधिकार पूर्णत्वाने कसा चालतो, दूरदूर रहात असणाऱ्या मनुष्यांच्या चित्तवृत्तीत सुखदुःखांचा उद्भव एकाच काळी एकाच कारणास्तव त्यांच्या न कळत होतो, त्यांत 'आंतरः कोऽपि हेतुः' असला पाहिजे, तो काय, इत्यादि अनेक प्रकारचे प्रयोग करून त्यावरून शास्त्रानुरोधाने अनुमाने ह्या मंडळीनें बसविली. ह्या सर्व शोधांचें फळ ह्मणून सदरहु मंडळीचें वतीनें मेयर साहेबाने १९०३ साली या विषयावर प्रमाणभूत असा एक मोठा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला आहे. ह्या ग्रंथांत वर सांगितलेल्या प्रत्येक प्रश्नासंबंधानें केलेले सर्व प्रयोग, त्यांचे परिणाम व त्यावरून निघणारे सिद्धांत, इत्यादि सर्व माहिती संगतवार ग्रथित केली आहे; व त्या सगळ्याचा निष्कर्ष ह्मणून ह्या पंडितांनीं जो ठरविला तो हा कीं, "आत्मा हें जड सृष्टीच्या पेक्षां अत्यंत भिन्न असें आदितत्व आहे. ते अविनाशी आहे. तें सर्व-

व्यापी आहे. तें जड पदार्थांच्या मिश्रणाचें किंवा एकीकरणाचें फल नसून ते स्वतंत्र आहे." याच सिद्धांताचा अनुवाद करणारे दुसरेही ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. सूर्याचे किरण कांचेच्या लोलकांतून पलीकडे दवडले असतां Spectrum ह्मणजे किरणांचा एक पट्टा पडतो. त्यांत सात प्रकारचे मूळ रंग ( Primary Colours ) स्पष्ट दिसतात. ह्यावरून बरेच दिवसपर्यंत प्रकाशशास्त्रवेत्यांची अशी समजूत होती की, सूर्यकिरण ह्मणजे केवळ ह्या सात रंगाचे मिश्रण होय. पण हल्लीं X-rays नांवाच्या किरणांचा शोध लागून लोलकातून पलीकडे जात नाहींत असेही कांही किरण असल्याचे शास्त्ररीत्या ठरले आहे. हल्ली N-rays नांवाचेही नवीन किरण सांपडले आहेत. ह्या प्रकाशशास्त्रांतील शोधाप्रमाणेंच वर सांगितलेला अध्यात्मविद्येतील शोध होय. जड शरीर ह्मणजेच आत्मा हे तत्त्व खोटें ठरून, आत्म्याचे स्वतंत्र स्वरूप आणि मागे व पुढे असणारे अस्तित्व शास्त्रीय पद्धतीनें ठरविण्यांत आले आहे. हा सिद्धात बारीकसारीक क्षुद्र लोकाचा नसून तत्त्ववेत्त्याचा व शास्त्रज्ञांचा आहे, हे आपण विसरता कामा नये! तथापि, पाश्चात्य पण्डितांनीं प्रयोगांच्या साह्यानें जो सिद्धात दोन वर्षांपूर्वी ठरविला, तोच सिद्धांत हजारो वर्षांपूर्वी आमचे वेदांत-ग्रंथांत नमूद होऊन राहिला होता."

---

टिळक यांच्या धर्म-विचारांची प्रभा जास्त खुलून दिसावी म्हणून प्रख्यात पाश्चात्य ग्रंथकार डॉ. पॉल केरस यांनी The Ethical Problem नामक पुस्तकांत एके ठिकाणी थोडक्यांत जे विचार नमूद केले आहेत ते येथे देतोः—

धर्म व तत्वज्ञान यांच्या व्याख्या देऊन त्यांचा परस्पराशी कसा संबंध आहे या-विषयाचे निरूपण ते असे करतातः—

"Religion is a philosophy employed as a regulative principle for action. If there is a difference between philosophy and religion it is this. The word philosophy is mostly employed when we speak of the world-conception of single thinkers; the word Religion signifies a philosophy endorsed by a whole society. In addition to this distinction we notice that religion always include the ethical application of a conception of the world, while a philosophy may imply, but need not necessarily contain its ethical corollaries. In a philosophy the theoretical part, in a religion the practical application, is predominent, yet there is no difference in principle; every philosophy is a religion and every religion a philosophy."

धर्माचा व शास्त्राचा विरोध नसून परस्परांचा संबंध आहे अशा विषयीं प्रमाणें देऊन शवटीं ते म्हणतातः—

"The religion of science recognizes that there is a power, an all-pervading law in the universe, which is not personal, but superpersonal. And this superpersonal power not only obtains in the motions of the stars and in the laws of cosmic life; but also in the society and in the fates of individuals. It wrec-ks those who do not conform to its injunctions.... We need not search the skies in order to find this God. We need but look into our own hearts, for there he lives in our ethical aspirations ond ideals. He is not far from every one of us, for in him we live, and move, and have our being."

'सुबोधपत्रिका'कारांनीही के. रा. रा. मंगेश जिवाजी तेलंग यांच्या 'धर्मविरुद्ध शास्त्र' या 'विविधज्ञानविस्तारां'तून प्रसिद्ध झालेल्या व्याख्यानाचे परीक्षण करतांना १९०४ सालच्या सप्टेंबर व आक्टोबरच्या अंकांत जे विचार प्रदर्शित केले आहेत ते महत्वाचे असून मराठी वाचकांस अत्यंत उपयोगी असल्यामुळें मुद्दाम येथे देतों. ते ह्मणतात:—

"ज्यांनी आपलें सर्व आयुष्य धर्माच्या व शास्त्राच्या अध्ययनांत घालविले; शास्त्राच्या नूतन सिद्धांतांच्या बळावर ज्यांनी आपली उदार तत्वज्ञानप्रवर्तक ग्रंथरूपी इमारत रचिली व ज्यास टेनिसनने आह्मां सर्वांत अतिश्रेष्ठ असे ह्मटले आहे (the greatest among us) त्या प्रसिद्ध तत्ववेत्त्या **डॉ. मार्टिनोनीं** "Science discloses the method of the world, but not its cause; Religion its cause but not its method; and *There is no conflict between them*, except when either forgets its ignorance of what the other alone can know" (शास्त्र सृष्टीच्या व्यापाराची पद्धतशिस्त दाखवितें; धर्म त्याच्या आदिकारणाचें ज्ञान करून देतो. या दोहोंत विरुद्धभाव बिलकुल नाहीं. मात्र ह्या दोहोंपैकी एक दुसऱ्यास काय ज्ञात आहे या विषयींचे आपले अज्ञान विसरला ह्मणजे मात्र घोटाळा व्हावयाचा) असे स्पष्ट उद्गार काढावे; त्याचप्रमाणे सर्व शास्त्रज्ञांस अत्यंत पूज्य असलेले व अद्याप आपला शास्त्रसंशोधनाचा क्रम ज्यांचा चालू आहे असे लॉर्ड केल्व्हिन यांनी मोठ्या आस्थेने सांगावें कीं, उदारमतवादी होण्यास भिऊं नका? जर आपण आस्थेने आणि निर्धाराने विचार कराल, तर शास्त्रच आपल्यास ईश्वरावर विश्वास ठेवावयास लावील. कारण, अशा प्रकारचा भाव हा सर्व धर्मांचा पाया होय; व अंतीं आपल्या हें अनुभवास येऊन चुकेल कीं, शास्त्र धर्मास विरोधक नसून उलटपक्षी धर्मास मदत करणारें आहे. त्याचप्रमाणे **सर ऑलिव्हर लॉज** सारख्या शास्त्रवेत्त्यास शास्त्रानें धर्माचा पाया बळकट केला आहे असें वाटावें; तसेंच

दुसऱ्या एका तत्ववेत्त्यानें असे स्पष्टोद्गार काढावे कीं, शास्त्रानें जे जे ह्मणून शोध लाविले असतील, जे मनुष्यमात्राच्या विवेचन-शक्तीच्या कसास उतरले असतील, सारासारविचारासही जे मान्य होत असतील त्यांजवर पावित्र्याचें आवरण घालणें व सर्व ज्ञान व सामर्थ्य ह्यांस सदसद्विवेकाच्या ताब्यांत आणून सोडणें आणि या सर्वांचे पर्यवसान आचरणांत करावयास लावणें हे धर्माचे काम आहे. (The work of religion is to consecrate what science has discovered, and the intellect has justified and the practical wisdom of life has utililsed; bringing all knowledge & power into the domain of the conscience and crystallising conduct into character.) आणि रा. तेलंगांस शास्त्र व धर्म ह्यांचा बेवनावच दिसावा! वास्तविक पाहतां " खरें शास्त्र आणि खरा धर्म याच्यांत बेवनाव मुळींच नाहीं. तो आहे अशी कल्पना करणें हे शास्त्रास व त्याचप्रमाणें धर्मासही कमीपणा आणणारें आहे. " ... शास्त्रानें आजपर्यंत धर्माची मोठी कामगिरी केली आहे. अज्ञानमूलक समजुती, भ्रामक विचार, पुष्कळ दिवसांच्या सलगीनें अंगीं चिकटलेले दुराग्रह या सर्वांचे बिऱ्हाड शास्त्र उचलावयास लावीत आहे. जे विचार, जे आचार, ज्या समजुती अगदीं निस्तेज झाल्या होत्या त्या किती कमकुवत होत्या हे शास्त्रानें दाखविलें. पण उलटपक्षीं शास्त्रानें धर्माचा पाया खंबीर केला. आणि आमच्या मतें हा असा प्रकार नेहमीं चालावयाचाच. शास्त्र धर्मबुद्धीवर कुऱ्हाड घालीत नाहीं, धर्मसमजुतीवर घालतें, असा आमचा समज आहे. धर्माची कल्पना आली कोठून? आज अनेक कल्पना प्ररूढ आहेत. पाश्चात्य लोकांनीं ह्या विषयाचें अनेक प्रकारें विवेचन केलें आहे; आणि धर्मकल्पनेचें मूळ वस्तुपूजा, स्थलपूजा ( फेटिश वर्शिप ) ह्यांत आहे असें जरी मानलें तरी त्यापासून काय सिद्ध होतें? आपल्यापेक्षां कांहीं तरी श्रेष्ठ आहे, ही जी भावना ती धर्मबुद्धीचा पाया होय. मग, ज्या वस्तूला, प्राण्याला, स्थलाला अगर स्थितीला श्रेष्ठत्व दिलें ती वस्तु, तो प्राणी, तें स्थल किंवा ती स्थिति चुकीची असें जरी ठरलें तरी मूळ विचारास ह्यानें कांहीं बाध येत नाहीं. विचारांस परिपक्वपणा आला, कार्यकारणभाव विवेकाच्या दृष्टीनें शोधण्याकडे कल झाला, पण पूर्वीची जी समजूत, जो दृढ विश्वास कीं, आपल्यापेक्षां श्रेष्ठतर, श्रेष्ठतम शक्ति आहे तो तसाच आहे. अशा प्रकारची जी धर्मबुद्धि तिचा व शास्त्राचा कांहीं संबंध नाहीं. ह्या बाबतींत शास्त्रानें ढवळाढवळ करूं नये, असें एका तत्वज्ञानें ह्मटलें आहे. शास्त्राचें काम जें दृश्य आहे त्यासंबंधानें शोध लावण्याचें, निरनिराळ्या वस्तूंवर चिठ्या मारून त्यांचे योग्य भाग, पोटभाग करण्याचें आहे. ते सोडून अदृश्याच्या भानगडींत शास्त्र पडलें ह्मणजे तें मार्ग चुकलें असें समजावें; आणि

## राष्ट्रीय प्रगति व धर्मशिक्षण.

राष्ट्राच्या प्रगतीस धार्मिक शिक्षणाची अत्यंत जरूरी आहे असें टिळक यांचें मत आहे. कर्तव्याची चाड, सहिष्णुता, दीर्घोद्योग, स्वार्थत्याग, इत्यादि तत्वें आमचा धर्म आह्मांस शिकवीत असून धर्माचा टेका असल्याशिवाय कोणतीही सुधारणा तडीस जाणें अशक्य आहे. या संबंधानें लिहितांना त्यांनीं ता. ५ मे १९०३ च्या केसरींत पुढील उद्गार काढले आहेत:—

"हल्लींच्या शिक्षणांत धर्मशिक्षणाचा भाग कमी असल्यामुळें आमची सुशिक्षित मंडळी कोणत्याही बाबतींत जितकी आस्थेवाईक आणि कळकळीची निघावी तितकी निघत नाही असे जें रा. ब. महाजनी यांनी ह्मटले आहे (धारवाड येथील प्रांतिक सामाजिक परिषदेचे अध्यक्षांच्या भाषणांत) तेंही विचारार्ह आहे. स्वधर्मावर श्रद्धा, आपले राष्ट्र पुरातन असून ते ईश्वराच्या कृपेनें जगांतील इतर राष्ट्रांच्या बरोबरीचे होणें शक्य आहे असा दृढ विश्वास, अभिमान व भरंवसा, आणि या भरंवशास योग्य अशा तऱ्हेचा उद्योग कळकळीनें करण्याची इच्छा किंवा उमेद आणि संवय असल्याखेरीज कोणत्याही सुधारणेचें कार्य तडीस जाणे अशक्य आहे. रा. ब. महाजनी यांनी सांगितल्याप्रमाणे "आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैवरिपुरात्मनः" हे वाक्य समाजास नव्हे तर सुधारकांसही लागू आहे; व जोंपर्यंत मिशनरी लोकांप्रमाणें स्वार्थत्याग करून कळकळीनें समाजास पोटाशी धरण्याचें काम करण्यास कोणीही सुधारक तयार नाहीं, जोंपर्यंत समाजांत जो धर्म प्रचलित आहे त्यावर त्याचा विश्वास नाहीं, अथवा जोपर्यंत केवळ न्यायमीमांसेच्या जोरावर 'यंव चांगले

---

असा मार्ग चुकल्यावर शास्त्र कोठे बहकेल त्याचा नेम नाहीं! सारांश, शास्त्राचा व धर्माचा कोणत्या प्रकारचा संबंध आहे ते प्रत्येकानें जाणण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे. ह्मणजे प्रत्येकाच्या हे लक्षांत येईल कीं, धर्मावर शास्त्र कुठार घालूं शकत नाहीं. कारण, धर्माचा व मनोवृत्तीचा निकट संबंध आहे. आणि दृश्य शास्त्रास हे विषय अतीत आहेत, असेच आह्मांस वाटतें. शास्त्राचे नवीन नवीन शोध लागू लागले तेव्हां जुन्या समजुतीच्या लोकांना हे लोक धर्मच नाहींसा करणार की काय अशी भीति पडली होती. ह्मणून शास्त्रज्ञांच्या विरुद्ध अनेक प्रयत्न झाले, त्यांचा अनेक प्रकारें छल झाला; पण त्याचा अखेर परिणाम काय झाला? शास्त्र आपलें कार्य करीत आहेच, आणि धर्मानेंही आपलें काम चालविलें आहे. एक दुसऱ्याच्या आड यावयाचा नाहीं. ज्याच्या आड शास्त्र येतें तो धर्म नको. ह्मणून पुन्हां पुन्हां हेंच सांगावयाचें कीं, सत्यशास्त्राचा व सत्यधर्माचा प्रदेश एक नाहीं, हें जेव्हां जेव्हां शास्त्रज्ञ विसरतात तेव्हां ते गोंधळ करितात; आणि धर्माचे प्रवर्तक जेव्हां ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करितात तेव्हां तेही घोंटाळाच करितात."

आहे, खंव चांगलें आहे ' असें मुखानें वर्षास एकदां उद्गार काढून आपलें कर्तव्य आपण केलें असे ह्मणून तो आपले समाधान करून घेत आहे, तोंपर्यंत त्याचें किंवा सुधारणेचें पाऊल कधींही पुढें पडणार नाहीं."

ता. १९।१।१९०४ च्या केसरींत याविषयींच पुन्हां ते ह्मणतातः—

" जुन्या काळीं विद्वान किंवा ज्ञानी पुरुष यांचा वर्ग नव्हता असें नाहीं. पण ते समाजापासून हल्लींच्याप्रमाणें कधीं अलग राहत नसत, किंबहुना समाजाची सुधारणा करण्यास लोकांमध्ये मिसळूनच त्यास उपदेश केला पाहिजे असें त्यांस वाटत असे; व त्याप्रमाणें ते आपलें आचरणही ठेवीत. हल्लींच्या सुधारकवर्गाच्या समजुती यापेक्षां अगदीं निराळ्या आहेत. धर्मासंबंधानें त्यांची स्थिति काय आहे हें सर्वांस उघड दिसत आहे. आमच्या प्राचीन धर्मग्रंथांचें कधींही अवलोकन केलेलें नसल्या-मुळें व लहानपणापासून सर्व शिक्षण व्यावहारिक रीतीनें झालेलें असल्यामुळें इंग्रजी शाळेतून तयार झालेल्या मनुष्यास धर्म ह्मणजे काय, तो कशाकरितां पाहिजे, रा-ष्ट्राच्या उन्नतीस त्याची कांहीं आवश्यकता आहे की नाहीं, याबद्दल त्यास कांहीं एक माहित नसतें. समाजांत प्रचलित असलेल्या कांहीं सामाजिक किंवा धार्मिक रीती-भाती तो वरपांगी पाळीत असतो. पण त्यावरील त्याची श्रद्धा बहुतेक समूळ नाहींशी झाली असल्यामुळें या रीतीभाती जरा कोठें नडूं लागल्या कीं, हे राजश्री त्या झुगारून देण्यास एका पायावर तयार असतात; आणि अशा वेळीं जर कां त्यास कोणी कांहीं बोलले की, मिल्ल, स्पेन्सर किंवा बेकन यांच्या जोरावर बरेंच वाक्पांडित्य करण्यास हे तयार असतात. धार्मिक किंवा सामाजिक रीत्या आपला विशिष्टपणा कायम राखण्याकरितां कांहीं प्रसंगीं अडचणही सोसावी लागते; व अशा प्रकारच्या अडचणी सोसण्यास लोकांस तयार करणें हें धर्मशिक्षणाचें एक अंग आहे, ही कल्पनाही यांच्या मनांत नसते. हल्लीं ज्या लोकांनीं सामाजिक सुधारणेचें काम हातांत घेतलें आहे ते बहुतेक याच वर्गांतील आहेत. धर्मशिक्षणा-पासून एका प्रकारचें जे मानसिक धैर्य येतें तें यांच्या अंगांत मुळींच नाहीं; इतकेंच नव्हे तर, धर्माकरितां हें मुळींच काळजी करीत नाहींत. याचें ढळढळीत उदाहरण पाहणें असल्यास फार लांब जावयास नको. मिशनरी लोकांनीं जागो-जाग ख्रिस्ती संस्था स्थापन करून हिंदु लोकांस ख्रिस्ताच्या कळपांत ओढण्यासाठीं ते जारीनें प्रयत्न करीत आहेत; व दुष्काळ हा आह्मांस सहाय्य करण्याकरितांच आकाशांतील बापानें हिंदुस्थानांत पाठविला, असेंही सर्वांनीं कृतीनें व कांहींनीं कंठरवानें जगास जाहिर केलें आहे. ही स्थिति हिंदुधर्माच्या दृष्टीनें शोचनीय होय. याबद्दल कांहीं मतभेद असेल, असें आह्मांस वाटत नाहीं. पण विधवाविवाहाक-रितां जितकी ओरड होते तितकी ओरडही या बाबतींत होत नाहीं; मग उद्योग कोठला? उलट सर्व देश ख्रिस्ती झाला तर बरेंच होईल, असें मानणारे हल्लींच्या

सुधारकवर्गांच्या पुढाऱ्यांत कांहीं लोक आहेत. अशा लोकांनीं सामाजिक सुधारणेबद्दल केलेली ओरड लोकांस ग्राह्य न झाल्यास त्यांत लोकांचा तरी काय दोष ?"

## धर्मैक्य.

राष्ट्रोन्नति होण्यास धर्मोन्नति पाहिजे, व धर्मोन्नति होण्यास धर्मैक्याचीही अत्यंत जरूरी आहे. धर्मैक्य ह्मणजे सर्व धर्मांचा लोप होऊन एक धर्म करणें नव्हे; व तशी गोष्ट हिंदुस्थानांत अशक्यही आहे. आज हिंदुस्थानांत अनेक धर्म असले तरी परधर्माबद्दल औदार्य दाखवून आपापल्या धर्माची उन्नति करण्यास कांहीं हरकत नाहीं; किंबहुना परधर्माबद्दल औदार्य व स्वधर्माबद्दल अभिमान हेंच राष्ट्रीयदृष्ट्या हिंदुस्थानास अत्यंत हितावह आहे असें कोणाही विचारी मनुष्यास वाटेल. हिंदुस्थानांत आज मित्तीस तीनचतुर्थांशाहूनही अधिक लोक हिंदुधर्माचे असल्यामुळें हा समाज वाळूच्या कणाप्रमाणें विस्खलित न ठेवितां—निदान या एवढ्या मोठ्या समुदायानें तरी आपापल्यांतील पंथभेद विसरून जाऊन धर्मैक्य करण्याकरितां अवश्य झटलें पाहिजे. कोणी ह्मणतात कीं, हिंदुधर्माच्या जागृतीनें इतर धर्मांबद्दल द्वेष वाढून राष्ट्रैक्यांत बिघाड येईल. पण हें ह्मणणें सयुक्तिक नसून त्याचें रा. रा. टिळक यांनीं १९०४ सालच्या पुण्यांतील गणेशोत्सवांत नाइकांच्या गणपतीपुढें व्याख्यान देतांना येणेंप्रमाणें निरसन केलें आहे:—

"नुसती हिंदुधर्माचीच जागृती केली तर त्याबरोबर इतर धर्माबद्दलचा तिरस्कार वाढेल व त्यामुळे राष्ट्रैक्याचा विघात होईल; राष्ट्रैक्य होण्यास सगळे धर्म तरी लोपले पाहिजेत किंवा एक धर्म तरी झाला पाहिजे, असे ह्मणणारी अजूनही कांहीं मंडळी आहे. पण धर्माचा नायनाट करून व सर्वसमान धर्मशून्य बनल्यामुळें राष्ट्रैक्य किंवा राष्ट्रोन्नति झाल्याचें जगांत एकही उदाहरण नाहीं. दुसरें असें कीं, हिंदुस्थानांतील विद्यमान सर्व धर्म जाऊन एक धर्म होणें शक्य मानणेंच वेडेपणाचें आहे. शिवाय धर्म एक असूनही समाजाचे तुकडे पडतात हे पाहणे असेल तर युरोप खंडांतील राष्ट्राकडे लक्ष द्यावे. इतर धर्मांबद्दल द्वेष व विरोध वाढूं न देतां हिंदुधर्माची जागृती व उन्नति करून हिंदुधर्मीयांचा मिलाफ करणें शक्य आहे. हिंदुस्थानांतील मोठ्या जनसमूहाचें ऐक्य करण्यास हें एक मोठेंच साधन आहे."

हें ऐक्य कसें करतां येईल व परधर्माबद्दल औदार्य कसें दाखवितां येईल यासंबंधानें बडोद्यास भरलेल्या तिसऱ्या श्वेतांबर जैन परिषदेमध्यें टिळक

यांनीं जे विचार प्रगट केले आहेत तेही महत्वाचे असून सर्वत्र लागू पडण्यासारखे असल्यामुळें त्यांतील महत्वाचा भाग त्यांनीं त्या संबंधानें लिहिलेल्या ता. १३।१२।०४ च्या केसरींतील स्फुट सूचनांतून येथें देतों. ते ह्मणतातः—

"जैन लोकांचे तत्त्वज्ञान जरी आज प्रचारांत नसले तरी जैन लोकांच्या अहिंसादि आचारांची छाप आज ब्राह्मणधर्मावर पूर्णपणें बसलेली आहे. आणि शंकराचार्यांनी जैनमतांचें जरी खंडन केले तरी जैन आचारांची ब्राह्मणधर्मावर बसलेली छाप कबूल करूनच त्यांस आपले काम करावे लागलें. जैनधर्म आणि ब्राह्मण-धर्म यांच्यासंबंधाची ही गोष्ट अत्यंत महत्वाची असून जैन व वैदिक धर्मी या दोघांनीही नेहमी ती लक्षांत ठेविली पाहिजे. जैनपंथांत वेद प्रमाण मानीत नाहीत हे खरें आहे. पण त्याचें कारण श्रौतधर्मांतील हिंसा होय; वैदिकधर्म-परंपरेबद्दल अनास्था नव्हे. हे आह्मी नेहमी लक्षांत बाळगिले पाहिजे. रामायण, महाभारत किंवा पुराणे यांतील कथा किंवा देवता आणि योगशास्त्रांतील तत्वे जैन लोकांस आमच्याप्रमाणेच मान्य आहेत, किंबहुना जैनधर्मी लोक हे हिंदुस्थानांतील आर्य लोकांचेच भाऊबंद आहेत; परकीय देशांतील आलेले नाहीत. एकदां तर अशी स्थिति होती की, वैदिक धर्मांतील लोक जैनधर्मांत आणि जैनधर्मांतील लोक वैदिकधर्मांत स्वेच्छेनें केव्हांही जात येत असत. हा प्रकार अद्यापही थोडाबहुत सुरू आहे; व कांही जैन वैष्णव आणि कांही वैष्णव जैन झाल्याची ताजी उदाहरणें आहेत. सारांश, जैनधर्म जरी वैदिक धर्माहून भिन्न असला तरी त्यांतलि भेद ख्रिस्तीधर्मांतील एस्टाब्लिश्ड चर्च (प्रस्थापित ख्रिस्तीधर्म) आणि डिसेंटर्स किंवा नॉनकन्फारमिस्ट (प्रस्थापित झालेल्या पंथाहून भिन्न) या दोन भेदांप्रमाणेंच राष्ट्रीय दृष्ट्या गौण होय, हें जैन व वैदिकधर्मी या दोघांनीही एकसारखेंच लक्षांत ठेविले पाहिजे. दोन्ही धर्म एकाच शरीराचे उजवा व डावा हात आहेत; व दोघांसही पसंत झालेल्या अहिंसादि तत्वांचा जगभर प्रसार करण्याचे काम जर एकविचारानें दोघेही हातांत घेतील तर अहिंसाधर्माची ध्वजा पृथ्वीतील सर्व राष्ट्रांत उभी राहण्यास कोणतीही हरकत येणार नाही. एका काळी हिंदुस्थानांतील या दोन धर्मांत थोडासा विरोध होता. पण त्या विरोधानें जी कामगिरी व्हावयाची ती झाली असून हल्लीचा असा काल आला आहे की, वैदिक धर्मी लोकही आचारानें जैनधर्मी आणि जैनधर्मी लोकही तत्वज्ञानानें वैदिकधर्मी झालेले आहेत. ही स्थिति लक्षांत आणून जर दोघांनीही आपल्या उन्नतीसाठी प्रयत्न केला तर तो अधिक फलद्रूप होईल हें आह्मी सांगावयास पाहिजे असें नाहीं."

सन १९०५ सालीं पुण्यास दसऱ्याच्या सुमारास मुंबईचे वल्लभसांप्रदायी गोस्वामी श्रीगोकुळनाथजी महाराज हे आले असतां त्यांचा उपदेश

ऐकण्याकरितां जी सभा भरली होती त्यांतही टिळक यांनीं धर्मैक्यासंबंधानें असेंच भाषण केलें होतें. त्या वेळचें त्यांचें भाषण कोठें प्रसिद्ध झालेलें नाहीं. तथापि, माझ्या स्मरणवहीवरून त्यांतील मतलब मी येथें देतों. ते ह्मणाले:—

" आमच्यांत शंकराचार्य, मध्वाचार्य, रामानुजाचार्य व वल्लभाचार्य अशांचे निरनिराळे चार पंथ जरी असले तरी प्रत्येकाला वेद हे प्रमाण असून ईश्वरप्राप्तीचें मुख्य साधन भक्ति किंवा उपासना आहे हे कबूल आहे. या चारही पंथांचे ऐक्य होण्याला या दोन गोष्टी फार चांगल्या आहेत. वेदप्रामाण्य हा बुडखा व भक्ति हा जीव धरला तर वर किती जरी शाखा किंवा फांद्या फुटल्या असल्या तरी त्यांत भेद मानण्याचे कांही कारण नाहीं. मला वाटते एका सांप्रदायांतील लोकांच्या धर्मगुरूनें दुसऱ्या सांप्रदायांतील लोकांना उपदेश केल्याचे निदान माझ्या आठवणींत पुण्यास तरी हें पहिलेंच उदाहरण आहे. धर्माच्या बाबतींत जी लोकांची उदासीनता दिसून येते किंवा मतभेद व संशय वाढत असतात ते नाहींसे होऊन निरनिराळ्या पंथांचें ऐक्य करण्यास असे प्रसंग फार उपयोगी पडतात. आमच्या धर्मगुरूंना आम्ही मान देतो तसाच याही गुरूंस देतों; व आजच्या प्रसंगीं श्रींनीही सर्वांना जे बोधामृत पाजले तेंही अत्युत्तम असून राष्ट्रहिताच्या दृष्टीने अत्यंत ग्रहण करण्यासारखे आहे. धर्मैक्य करण्याचा—निदान पंथांतल्या पंथांत कां होईना—प्रसंग आज श्रीच्या कृपेने आला ही संतोषाची गोष्ट आहे; व या प्रसंगापासून आपणांस जर कांहीं बोध घ्यावयाचा असला तर तो हाच घ्याल अशी मला उमेद आहे."

याच सालीं डिसेंबर महिन्यांत शुक्लयजुर्वेदीय वेदशाळा स्थापन झाल्याबद्दल अभिनंदन करतांना " वेद तेथून एक आहे. कोणत्याही याज्ञिकांत एका वेदाच्या मंत्रांवर काम भागत नाहीं; तर इतर वेदमंत्रांची गरज लागते. ऋग्वेद्यांनीं यजुर्वेद्यांचा व यजुर्वेद्यांनीं सामवेद्यांचा द्वेष करणें चांगलें नाहीं. ऋग्वेद, यजुर्वेद वगैरे चार शाखांची मिळून एक वेदशाळा कां निघूं नये, हें समजत नाहीं, " असें जें टिळक यांनीं सांगितलें त्यावरूनही हिंदुधर्मातील अनेक शाखांच्या मंडळीचें ऐक्य कसें करतां येईल याविषयीं त्यांची कल्पना काय आहे हे वाचकांस कळून येईल.

## शाळांतून धर्मशिक्षण कसें देतां येईल ?

शाळांतून व कॉलेजांतून धर्मशिक्षण अवश्य पाहिजे असें टिळक यांचें मत असून तें कशा प्रकारचें देतां येईल याविषयीं रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर यांच्याशीं एकदां भाषण चाललें असतां ते ह्मणाले:—

" शाळेंतील सर्व मुलांचा धर्म एक नसल्यामुळें अमुक एका धर्माचें पुस्तक प्रिय होणार नाहीं हें खरें; पण अलीकडे जीं नवीं शास्त्रें निर्माण झालीं आहेत त्यांच्या साहाय्यानें सर्व धर्मांतील तत्वांचें एकीकरण करून तत्संबंधीं कांहीं सिद्धांत काढतां येतील. तसेंच तुलनारूपानें सर्व धर्मांतील तत्वें कळूं लागल्यास विद्यार्थ्यांचा कांहीं थोडा फायदा होणार नाहीं. शाळेंत रसायन, ज्योतिष, पदार्थविज्ञान वगैरे शास्त्रें जशीं शिकवितात तसेंच शास्त्र ह्मणून धर्म कां शिकवीत नाहींत? कॉलेजांत Political economy (अर्थशास्त्र) Trigonometry (त्रिकोणमिती) व Chemistry (रसायनशास्त्र) हे विषय शिकवितात; पण Theology (ईश्वरविषयक ज्ञान अथवा धर्म) कोणी शिकवीत नाहीं. हिंदुधर्मांतील सिद्धांत पुष्कळांना पसंत पडतील, व ते शास्त्र ह्मणून शिकविण्यास कांहीं हरकत नाहीं; निदान हिंदुसमाज मोठा असल्यामुळें त्यांतील मुलांस तरी त्या धर्मांतील सिद्धांतांची ओळख करून देणें जरूर आहे."

---

: 'मराठा' कर्त्यांनीं ता. ३ जुलै १९०४ च्या अंकांत या विषयावर एक उत्तम लेख लिहिला असून त्यांत धर्माचे स्वरूप कसे असते, हिंदुधर्मांत मुख्य गोष्टी कोणत्या आहेत, त्या शाळेत कशा रीतीनें शिकवितां येतील इत्यादि गोष्टींचे चांगले विवेचन केले असल्यामुळें त्यांतील महत्वाचा भाग मुद्दाम येथे देतो:—

"The word religion, at all times and in all places connotes three very fundamental ideas. These are the existence and nature of God, the existence and nature of the human soul and the relation which subsists or which ought to subsist between God and the human soul or to speak in the phraseology of Vedanta the relation which ought to subsist between *Jivatman* and *Paramatman*. All religions in the world are agreed, despite the latter day fulminations of Atheists, Materialists and Agnostics, as to the existence of God and the existence of the human soul. The centre of contention lies in the determination of the exact nature of God-head and the relation which the human soul bears to *Paramatman* or the 'One only Without a second.' Hidusism look, upon the *Paramatman* as Impersonal, and so does Budhism. But Christianity and Mahomedansim look upon God as personal and upon Christ and Mahomet as the only manifestations of him. But Hinduism or our Sanatan Dharma goes behind the personal God of the Christians and the Mahomedans and makes its Paramatman im-

या बाबतींत बिझांट बाईनें लिहिलेलीं पुस्तकें किंवा गोडबोले ( रा. रा. हरि गणेश ) यांनीं लिहिलेल्या ' आत्मविद्ये ' सारखीं पुस्तकें बरींच उपयोगी पडतील. मात्र हिंदुधर्माचें शिक्षण देणारा मनुष्य हुषार पाहिजे. अशा प्रकारचें शिक्षण आह्मी असावें असे ह्मणतों; पण सरकार त्याची मुळींच पर्वा करीत नाहीं, एवढेंच नव्हे तर, उलट सरकारी शाळेंत चालणारीं क्रमिक पुस्तकें सोंवळीं करण्याचा त्यांचा प्रयत्न चालला आहे. आतां खालच्या प्रतीच्या शाळांतून व कॉलेजांतून चालणारीं पुस्तकें निरनिराळीं पाहिजेत ही गोष्ट खरी आहे; पण मुळीं धर्मशिक्षणच नको या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. "

याच विषयावर रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर यांचें ' महाराष्ट्र विद्यालया ' मध्यें व्याख्यान झाल्यावर अध्यक्ष या नात्यानें टिळक यांनी पुढील आशयाचें भाषण केलें:—

" धर्मशिक्षणाचे अभावामुळे समाजावर काय परिणाम होतात व अव्वल इंग्रजी पिढी कशी निपजली, हे सांगण्याची आवश्यकता नाही. सरकार परकी व परधर्मी असल्यामुळें तें याची सोय करणार नाही; ती आपली आपणच केली पाहिजे. धर्मशिक्षणाची दोन अंगे आहेत. बुद्धिग्राह्य शिक्षण हे एक अंग आहे. रा. रा. केळकर यांनीं सांगितलेले धार्मिक वाङ्मयाचेंच नुसते अध्ययन करणे ह्याचा या अंगांत समावेश होतो. परंतु एवढ्यानें धर्मशिक्षण पुरे होत नाही. ज्या धर्मशिक्षणाने पुरुषाचा स्वभाव एक प्रकारचा अभिमानी, श्रद्धाळू, कर्तव्यदक्ष व सत्यनिष्ठ बनेल तेंच खरें धर्मशिक्षण होय व तेंच विद्यार्थीदशेत जरूर आहे. वरील बुद्धिग्राह्य धर्मशिक्षणाची विद्यार्थ्यांस आतांच गरज नाही; ते मोठे झाले ह्मणजे त्याचा त्यांस

---

personal the same time that it looks upon the various Avatars as the personal manifestations of that highest and Absolute Entity. So the ideal textbook of Hindu religion will have to be divided principally into three main divisions—the fiirst treating of the Hindu ideas of God pointing out at the same time how that idea includes and overlaps the Christian and Mahomedan conceptions of God-head. The second great division of the book should treat of the nature and limitations of the human soul, and the third great division or chapter of the book will have to deal with the all important and practically useful question of the relation which subsists or ought to subsist between the human soul and the Paramatman "

विचारपूर्वक अभ्यास करतां येईल, लहानपणीं कोवळ्या अंतःकरणामध्यें सदाचार, स्वाभिमान व स्वधर्मनिष्ठा यांचें बीजारोपण झालें तरच त्याचा मनुष्याचे वर्तनावर परिणाम होईल. यासाठीं शाळेंत जरूर असलेलें धर्मशिक्षण असलें पाहिजे. तें देण्यास जरी अनेक साधनें आहेत तरी शिक्षकांच्या वर्तनाचा कित्ता हें उत्कृष्ट साधन आहे."

उपदेशापेक्षां नैतिक किंवा धार्मिक आचरणाचा ठसा लोकांच्या मनावर किती चांगला उमटतो याचें टिळक यांनीं प्रो. जिनसीवाले यांचा मृत्युलेख लिहितांना पुढील चित्र रेखाटलें आहे. ता. २५।८।०३ च्या केसरींत ते लिहितातः—

" सामान्य प्रतीच्या निश्चयी पुरुषाच्या बुद्धीतही इंग्रजी विद्येनें हिंदु धर्म, हिंदु गृहस्थिति यांसंबंधानें व्यामोह उत्पन्न होऊन त्याबद्दलच्या त्याच्या मतांत आणि आचारांत एक प्रकारचा दुहेरीपणा किंवा द्विधा भाव उत्पन्न होत असतो; आणि पुष्कळ वेळां हें करूं कीं तें करूं, विजार घालूं कां धोतर नेसूं, बायकोस शिक्षण देऊं कां न देऊं, आपल्या देवळांत जाऊन मूर्तीस नमस्कार करूं कां खिस्ती लोकांसारखें बिनमूर्तीचें देवालय करून तेथें प्रार्थना करूं, संध्या करूं, कीं प्रार्थनागीतें ह्मणूं, अशा प्रकारच्या संशयांनीं त्याचें मन घोटाळून जाऊन कित्येकदां तो " न सध्यां संधत्ते नियमितनिमाजान्न कुरुते " अशा प्रकारें कांहींच करीत नाहीं, किंवा कांहीं तरी आचरण करीत सुटतो. इतकेंच नव्हे तर, यांच्यांपैकीं कित्येक लोक हा आपला दोष नव्हे, तर पाश्चिमात्य आणि पौर्वात्य सुधारणांची हल्लीं जी टक्कर चालू आहे, त्यांत इंग्रजी शिक्षणानें सुशिक्षित झालेल्या वर्गाच्या मनाची स्थिति अशी होणें स्वाभाविकच आहे, अशा रीतीनें आपापल्या मनाचें समाधान करून घेत असतात. हे त्यांचे विचार बरोबर नाहींत हें प्रतिपादन करण्यास प्रो. जिनसीवाले हे एक चांगलें उदाहरण होते.... ... ... मी हिंदु आहे, हिंदु राहीन, हिंदु मरेन, आणि हिंदुत्वानेंच आपला अभ्युदय केव्हांना केव्हां तरी संपादन करीन असा त्यांचा पूर्ण विश्वास होता; आणि तो विश्वास बदलण्यास पाश्चिमात्य शिक्षणाची जी सबब इतर सुशिक्षित लोक पुढें आणतात ती खरी नाहीं, असें त्यांनीं आपल्या आचरणावरूनच सिद्ध केलें होतें. प्रो. जिनसीवाले यांच्या चरित्रापासून तरुण मंडळीनें जर कांहीं बोध घ्यावयाचा असेल तर हाच होय. वारा वाहील तशी पाठ करण्याची ज्यांना संवय आहे, उपहासास किंवा त्रासास न जुमानता आपलेपणा कायम ठेवण्याचें ज्यांच्या अंगीं धैर्य नाहीं, अशा लोकांनीं प्रो. जिनसीवाल्यासारख्यांची थट्टा केली आहे व पुढेंही करतील. पण तरुण पिढीनें एवढी गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, देशामध्यें कांहीं करारी पुरुष होऊन त्यांच्या हातून जर

कांहीं देशाचें कल्याण व्हावयाचे असेल तर तें या मार्गानें व्हावयाचें नाही. प्रो. जिनसीवाले यांस सुधारणा नको होती असे नाही, किंबहुना ज्या आपल्या पत्नीस गृहकृत्यांत थोडीशी चूक केल्यामुळें त्यांनीं शिक्षा केली असा बोभाटा झालेला आहे त्या पत्नीस संस्कृत व इंग्रजी शिक्षण देऊन विद्वान् करण्याचे त्यांच्या मनांत होते व त्याप्रमाणे त्यांनीं तजवीज केली होती, हे त्यांच्या मित्रांपैकीं पुष्कळांस माहीत असेलच. पण अशा प्रकारची सुधारणा करणें जरी त्यांस पूर्णपणें संमत होतें तरी इतर बाबतींत ‘ डबल लाइफ ’ ह्मणून जो कांहीं हल्लीं आचरटपणा सुरू आहे तो त्यांस बिलकुल मान्य नव्हता; आणि त्यांचा स्वभाव जात्याच निश्चयी असल्यामुळे ते त्याचा निषेधही मोठ्या निश्चयानें आणि निग्रहानें करीत असत. पाश्चिमात्य विद्येचा ख्रिस्ती धर्मातील विद्वानांवर जर वाईट परिणाम होत नाही असे ग्लाडस्टनसारख्यांच्या चरित्रावरून आह्मांस समजतें तर आह्मांवरच तसा परिणाम होण्यास धार्मिक व गृहशिक्षणाचा अभाव वगैरे दुसरी कांहीं कारणे आहेत अशी इतिहासावरून त्यांची खात्री झालेली होती; व त्यामुळे ‘ डबल लाइफ ’ किंवा वर सांगितलेला द्विधाभाव किंवा चलबिचल त्यांस केव्हांही व कोणत्याही बाबतीत खपत नसे. आमच्या सामाजिक व धार्मिक वर्तनाच्या तराजूची दांडी हल्लीच्या परिस्थितीत उजू राहण्यास विद्वत्तेने आणि स्वतःच्या आचरणाने ही गोष्ट प्रतिपादन करणाऱ्या पुरुषांची आह्मांस अत्यंत जरूर आहे. प्रो. जिनसीवाले हे अशा प्रकारचे पुरुष होते. आणि त्यांच्या मरणाने जे आमचें मोठें नुकसान झाले ते हेंच होय कीं, गृहशिक्षणाच्या अभावामुळे हिंदु रीतीभातींच्या किंवा धर्माच्या अज्ञानामुळें अथवा आपले बापचुलते इंग्रजी शिक्षणाने ‘ डबल लाइफ ’ चे झाले ह्मणून त्याच्या उदाहरणानें ज्यांचीं मने हल्लीच्या कालांत चंचल होतात किंवा होण्याचा संभव आहे, त्यांस अधिकारानें दोन गोष्टी सांगून पुनः ताळ्यावर आणण्याचा उद्योग करणारा आमच्यांपैकीं एक मोठा पुरुष नाहीसा झाला. ”

पुण्याच्या फर्ग्यूसन कॉलेजचे प्रिन्सिपाल रँग्लर परांजपे यांनीं शाळेंत धर्मशिक्षण दिल्यानें राष्ट्रीयत्वाची हानी होईल, हिंदुधर्म ह्मणजे केवळ वेडगळ समजुतींचा व आचारांचा एक भारा आहे, वगैरे हिंदुधर्मासंबंधी आक्षेप घेऊन आमच्या शाळांतून धर्मशिक्षण देऊं नये अशा अर्थाचा जो लेख १९०४ सालांत ‘ ईस्ट अँड वेस्ट ’ मासिक पुस्तकांत लिहिला होता त्याचें खंडन करतांना टिळक यांनी पूर्वीच्या आपल्या व्याख्यानांतील व लेखांतील अनेक मतांचा अनुवाद करून असें स्पष्ट सांगितलें आहे कीं,:——

" धर्मशिक्षण शाळांत न दिल्याने हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती किंवा पारशी यांच्यामधील धर्मविरोध नाहीसा होईल अशी जी प्रि. परांजपे यांची कल्पना आहे ती अगदी वेडेपणाची आहे. हिंदुधर्माइतका आग्रहशून्य धर्म दुसरा कोणताच नाहीं. ज्याने त्यानें आपापल्या धर्मात राहून आत्म्याचे कल्याण करावे, असें हिंदुलोक समजतात; आणि असे आहे तर मग शाळांत हिंदुधर्मशिक्षण दिल्यानें राष्ट्रीयत्वाची हानी होईल असें मानणें असमंजसपणाचे लक्षण होय....... जीव आणि परमेश्वर यांचा संबंध काय, तो संबंध कायम राखण्याकरितां जीवाचें कर्तव्य कोणतें आणि जीवाची उन्नति होण्यास काय उपाय करावे, इत्यादि धर्माचे जे गहन विचार आहेत, आणि ज्यांचें हिंदुधर्मग्रंथांपेक्षां दुसऱ्या कोणत्याही धर्माच्या ग्रंथांत अधिक उदात्त विवेचन केलेलें आढळत नाहीं, ते धर्मविचार व ती धर्मतत्वे यांचा प्रि. परांजपे यांच्या मनावर बिलकुल संस्कार झालेला नसल्यामुळे धर्म ह्मणजे कांहीं वेड्या समजुतींचा भारा* यापलीकडे त्यांची समजूत गेलेली नाहीं; आणि हा त्यांच्या मनाचा ग्रह नीलीग्रहाप्रमाणे बळकट झालेला असल्यामुळे त्यांनी आपले अप्रगल्भ व अपरिपक्क विचार जगापुढे मांडण्याचे साहस केले आहे. "—ता. ३१ मे.

## पाया कोणता—नीति कां धर्म ?

टिळक यांच्या आतांपर्यंत दिलेल्या विचारांवरून व त्यांनीं वेळोवेळीं काढलेल्या स्पष्ट उद्गारांवरून धर्माच्या पायावर आमची नीति

---

* धर्मातील वेडगळ समजुती ( Superstitious ideas ) ह्मणजे काय, त्यांचा कसा लोप झाला पाहिजे, खऱ्या धर्मांत त्यांचा किती अंतर्भाव होतो, या संबंधाने लिहितांना ' मराठा ' कर्त्यांनी ता. २६ जून १९०४ च्या अंकांत पुढील उद्गार काढले आहेत:—

"It is just because most of the great religions of the world, as a result of the criminal neglect which is persistently shown towards their development and growth have recently come to lose their ancient purest form and are every day tending to become 'a bundle of superstitious ideas' that the need of systematised religious instruction becomes so crying and so imperative. Religion in its highest and purest form, purged of all the accumulated rust of superstition and divested of all the crude and unreasoned interpretations which have wellnigh distorted and mutilated it out of recognition, has strong claims on the sympathy of the educational nstitutions of a big country and it may form part of the training which is given to the young men of every new generation at an enormous cost t he national exchequer."

आहे की नीतीच्या पायावर आमचा धर्म आहे याचाही सहज उलगडा होणार आहे. नीतीच्या पायावर धर्म आहे असें ह्मणणारे पुष्कळ लोक आहेत. (प्रि. परांजपे हे याच मताचे असून त्यांच्या ज्या लेखावर टिळक यांनीं वरील टीका केली आहे त्यांतही या मताचेंच त्यांनीं आविष्करण केलें आहे.) पण टिळक हे या मताचे नसून धर्माच्या पायावर नीति आहे असें त्यांचें मत आहे. देह नाशवंत आहे, आत्मा अविनाशी आहे, आपला आत्मा व दुसऱ्याचा आत्मा एकच आहे, आत्म्याचा परमात्म्याशीं अथवा परमेश्वराशीं संबंध आहे, परमेश्वर सर्वव्यापी आहे, त्याचें ज्ञान करून घेऊन तत्स्वरूपीं लीन होणें हेंच मनुष्यजन्माचें सार्थक अथवा हीच मनुष्यमात्राची अंतिम उन्नति, इत्यादि आमच्या धर्माचे सिद्धांत असून नीतीची इमारत याच सिद्धांतावर उभारली आहे. सत्यभाषण, स्वार्थत्याग, परोपकार, किंवा आत्मनीति, समाजनीति, राजनीति इत्यादि जे नीतीचे प्रकार प्राचीन काळापासून आमच्यांत मानीत आले आहेत त्यांचा उगम वरील धर्मसिद्धांतांतच आहे. इतर धर्मांत जीवशिवाचें आमच्यासारखें ऐक्य मानलेलें नाहीं. अर्थात् सायुज्यतेची कल्पना नसून कोठें सलोकता श्रेष्ठ तर कोठें समीपता श्रेष्ठ असें मानलें आहे, कोठें देह गेला कीं आत्मा नाश पावला असा समज झाला आहे, त्यामुळें पारत्रिकाविषयींच्या कल्पनेंत फरक पडून व ऐहिक आणि पारत्रिक यांचा सांधा सुटून सर्व कांहीं ऐहिक उन्नतीकरतांच आहे असें मानण्याकडे त्यांतील लोकांची—विशेषत:पाश्चिमात्य लोकांची—प्रवृत्ति होत चालली; व तदनुरोधानें सुखप्राप्ति हेंच जीविताचें साफल्य, अनेक लोकांचें सुख तेंच खरें सुख, बहुजनसमाजाचें कल्याण तेंच मुख्य कल्याण अशा प्रकारच्या नीतीच्या व्याख्या होऊन त्याप्रमाणें नीतीचेही सिद्धांत बनत गेले. पण पुढें आधिभौतिक शास्त्रांचा उदय होऊन व उत्क्रांतितत्वांचा प्रसार होऊन त्यांच्या कसोटीनें जेव्हां नीतिशास्त्राच्या सिद्धांतांचें परीक्षण होऊं लागलें तेव्हां नीतीच्या व्याख्या बदलत चालल्या, धर्मावर जास्त श्रद्धा बसत चालली व धर्माचा आणि नीतीचा कायमचा संबंध आहे असें ह्मणूं लागले. अलीकडे अलीकडे तर निरनिराळ्या धर्मांचेंही परीक्षण होऊन आमच्या धर्मांतील सिद्धांतच पाश्चात्य तत्ववेत्त्यांना ग्राह्य वाटूं लागले व त्याप्रमाणें नीतीच्या कल्पनाही उच्च

प्रकारच्या होऊन आमच्या धर्मांत सांगितलेली नीति हीच खरी आणि श्रेष्ठ प्रकारची नीति, या तत्वास ते येऊन मिळूं लागले.*

## भगवद्गीता काय सांगते?

टिळक हे कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेहून परत येत असतां १९०२ सालांत नागपूर येथें भगवद्गीतेवर त्यांनीं एक व्याख्यान दिलें. या व्याख्या-

* प्रो. भानू यांनीं गीतेचे व्याख्यान करतांना तिसऱ्या अध्यायाच्या उपसंहारांत पाश्चात्य तत्ववेत्त्यांच्या मतांचा विचार करून इतर धर्मांपेक्षां आपला धर्म किती श्रेष्ठ आहे व इतरांच्या नीतिसिद्धांतांपेक्षां आपले नीतिसिद्धांत किती उदात्त आहेत याचें चांगलें विवरण केलें आहे. तें विवरण मोठें असल्यामुळे येथे न देतां स्वतंत्र रीतीने वाचण्याची वाचकांस विनंति करून शेवटीं थोडक्यांत त्यांनी जे त्याचे सार दिलें आहे ते येथे देतो:—

"तिसऱ्या अध्यायांत स्वसुखवादी ( Egoists ) सकाम याज्ञिक, कर्मठ, उपासक व लोकसंग्राहक ( Utilitarians ) इत्यादि नीतिमार्गांचा येथे विचार केला. स्वसुखवादानें मनुष्यास शुद्ध सुख मिळत नाहीं व पूर्णत्व येत नाहीं, सकामकर्मानें चित्तशुद्धि होत नाही आणि लोकसंग्रहापुरतेच निष्काम कर्म केलें तरी मुक्ति मिळत नाहीं, असे सांगितले. खरी चित्तशुद्धि करून अद्वैतज्ञानाचा बोध झाल्याशिवाय व त्या बोधास आत्मसाक्षात्काराचे स्वरूप आल्याशिवाय मोक्ष नाहीं ह्या सिद्धांतास अनुलक्षून अनेक–विध कर्मांचा विचार केला व कर्मास लागणारे स्वातंत्र्य मनुष्य प्राण्यास मिळालेले आहे असें सांगून पापबुद्धि ही स्वातंत्र्यापासूनच उत्पन्न होते, तेव्हां मुमुक्षूनें सावध राहून प्रकृतीहून पलीकडे असणारे जे नित्य, शुद्ध, बुद्ध व पूर्ण असें जे आत्मस्वरूप तिकडे दृष्टी ठेवावी व निवृत्तिमार्गानें जावें अशी सूचनाही देऊन ठेविली; सारांश, स्वसुखकारी कर्म पापात्मक आहे, सकामकर्म प्रपंचात घालणारे आहे, लोकसंग्रहाचे निष्कामकर्म चित्तशोधक आहे, परमेश्वरार्पित कर्मानें विश्वस्वरूप प्राप्त होऊन पापाचे निर्मूलन होतें व ज्ञानविज्ञानास अधिकार पोहोंचतो, हे या अध्यायाचें तात्पर्य होय. विज्ञानसंपादन करण्यापूर्वींचीं हीं कर्मे आहेत हे सांगावयास नकोच.

असो; या विवेचनावरून सुखवाद ( मग ते सुख स्वतःचें असो वा इतरांचे असो ) खरें सुख देण्यास असमर्थ आहे, कर्तव्यप्रीत्यर्थ कर्म करणे त्यानं चित्तशोधन मात्र होतें, खरें सुख प्राप्त करून घ्यावयाचें असेल तर अद्वैतसिद्धांतांच श्रवण, मनन करून निदिध्यास व गुरुपदेशासह परमेश्वरी अनुग्रह संपादन केला पाहिजे व पुढे साक्षात्कार होईपर्यंत हा अभ्यास चालविला पाहिजे हें जर लक्षांत येईल तर इतर धर्मांपेक्षां अद्वैत धर्म श्रेष्ठ आहे व इतर नीतिवादापेक्षां आमचे धर्मशुद्ध नीतिसिद्धांत श्रेष्ठ आहेत ही समजूत दृढ होईल."

नावरून धर्म हा नीतीचा पाया असून आमचीं नीतितत्वें किती उदात्त आहेत याविषयीं त्यांचीं मतें स्पष्टपणें दिसून येतात. या व्याख्यानाचा गोषवारा ता. २१।१।०२ च्या केसरींत पुढील प्रमाणें प्रसिद्ध झाला आहे.

" भगवद्गीतेत वेदांत सांगितला आहे, त्यांत मोक्षप्राप्तीचा उपाय दिला आहे, इत्यादि या ग्रंथाबद्दल बरींच मते प्रचलित आहेत. परंतु आजचें माझे विवेचन तद्विषयक नसून मनाला व्यामोह होऊन कर्तव्याची दिङ्मूढता आली असतांना आणि अंतःकरण अस्वस्थ झाले असता धर्मबुद्धि जागृत ठेऊन कर्तव्याची योग्य दिशा दाखविणारा ग्रंथ जगाच्या वाङ्मयांत भगवद्गीता हाच एक होय, हे मी प्रतिपादन करणार आहें...भारती युद्धाच्या वेळी विषादग्रस्त झालेल्या अर्जुनास संदेह पडला की, लढाईत जयश्री प्राप्त होण्यास आपल्या आप्तांवर हात टाकला पाहिजे व वडिलांचा उपमर्द केला पाहिजे, अथवा क्षत्रिय धर्म सोडून देऊन युद्धापासून तरी पराङ्मुख झाले पाहिजे. सारांश, दोन कर्तव्यांपैकीं कोणतें तरी सोडून दिले पाहिजे. तें कोणते सोडावें अथवा ही दोन परस्पर विरुद्ध कर्तव्यें कशीं पाळावीं, ह्याबद्दल भ्रांत झाल्यामुळे त्याने श्रीकृष्णास यांतून तरण्याचा उपाय विचारला आहे. आप्तांच्या रक्तानें विटाळलेली राज्यश्री घेऊं की, युद्ध सोडून वनांत जाऊं, हा अर्जुनाचा प्रश्न होता. हा भगवद्गीतेचा उपक्रम झाला. आणि ' नष्टोमोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाऽच्युत । स्थितोऽस्मिगत संदेहः करिष्ये वचनं तव ॥ " हा गीतेचा उपसंहार झाला. अर्जुनाचा व्यामोह श्रीकृष्णाने गीतेतल्या उपदेशानें घालविला. आपणासही असाच व्यामोह उत्पन्न होतो. अशा वेळीं त्यांतून आपली निवृत्ति व्हावयास भगवद्गीता हेंच एक चांगले साधन आहे. ह्या कार्याकार्य-विचारणेचें निर्णायक नीतिशास्त्रात ( ethics ) सांपडते. आणि भगवद्गीतेत पूर्वीच्या हिंदु-शास्त्रास धरून केलेले नीतिसंबंधाचे सिद्धांत आहेत. वडिलांविषयी पूज्यभाव ठेवण्याचे एक व क्षत्रिय ह्मणून धर्मयुद्धापासून पराङ्मुख न होणें हें दुसरें; अशा या दोन कर्तव्यांपैकी कोणतें करावे, या अर्जुनाच्या प्रश्नास जर श्रीकृष्णांनीं समाजाला पुष्कळ हितकारक गोष्ट ती चांगली, तादितर वाईट, ह्या उपयुक्तता ( Utility ) तत्वास अनुसरून उपदेश केला असता तर तो अर्जुनास कितपत ग्राह्य झाला असता याबद्दल बराच संशय आहे. बेन्थाम-मिल्ल प्रभृतींची नीतितत्वे धर्मापासून स्वतंत्र अशी आहेत. परंतु हिंदूची नीति धर्माशीं एकरूप झालेली आहे. आत्म्याची मोक्षप्राप्ति हें प्रत्येक हिंदूचे आदिकर्तव्य आहे. इतर कर्तव्यें मोक्षानुकूल हवीत, प्रतिकूल नकोत. आमच्या आर्यांच्या पूर्वापार परंपरेस अनुसरून जेथें वेदांत, योग, कर्ममार्ग, आदिकरून लोकमान्य शास्त्रें जीवाच्या निरंतर कल्याणाकडे लक्ष पुरवितात तेथें नीतिशास्त्राचा पाया नुसत्या संख्येवर मांडणें हें मुळींच नापसंत आहे. नीतीनें व न्यायानें वागणारे लोक अल्प प्रमाणांत आणि अन्यायानें व अनीतीनें वागणारे लोक

पुष्कळ प्रमाणांत सांपडत नाहींत कीं काय? आणि आह्मी लोकांचे कल्याण तरी का ह्मणून करावें? हा प्रश्न लागलाच उद्भवतो. दुसऱ्या कित्येकांचें असें मत आहे की, हा प्रश्न स्वतःसिद्ध मनोधर्माचा ( Moral Intuition ) आहे. "सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमंतःकरणप्रवृत्तयः" हे खरें. पण हें कर्तव्यदर्शक साधन फारच ठोकळ असे आहे. कारण, कोणाची वृत्ति सात्विक व कोणाची गैरसात्विक हे समजणे फार कठिण आहे. आतां कोणी सुखाकडे बोट दाखवून सुखाचा मार्ग स्वीकारावा असे ह्मणतील आणि उपयुक्तता व सुख यांची सांगड बांधून पुष्कळ माणसांचें पुष्कळसे हित होईल ते कर्म उत्तम असें मत देतील. परंतु ह्या सुखवादांत ( Hedonism ) सर्वांचा मेळ जमावयाचा नाही. ह्या तिन्हीपेक्षां श्रेष्ठ असें जर कांहीं तत्व असेल तर ते गीतेत सांगितले आहे, आणि ते मोक्षास धरून आहे. ज्ञान, कर्म, योग आणि भक्ति या चारीचाही गीतेत समावेश केलेला आहे. परंतु तो परस्पर तुलनेसाठीं किंवा एकवाक्यतेसाठी नाही. या चारी मार्गांत सांगितलेल्या तत्वांचा गीतेंतल्या नीतितत्वांशी मेळ आहे, व तें तत्व चारी मार्गांनीं निरूपित करून शेवटीं ग्रंथांत त्यांचा पुनरुच्चार केला आहे. आमचा सिद्धांत पाश्चात्य सिद्धांताहून फारच श्रेष्ठ आहे. संसार हा मोक्ष-प्राप्तीस विघातक नाहीं. मनुष्यानें जिवंत असणे ह्मणजेच कर्म करणे आहे, मेल्याशिवाय कर्माचा त्याग व्हावयाचा नाही. जिवंत असणें आणि कर्म करणें हे समानार्थक आहे; कर्म व जीवित हे पर्याय शब्द आहेत; असें श्रीकृष्णांनी गीतेंत स्पष्ट सांगितले आहे. परंतु वेदांतांत कर्मास प्राधान्य नसल्याने अर्जुनास मोह पडून त्याने भगवंतास असे विचारलें की, एकदां कर्मत्यागाशिवाय मोक्ष नाहीं असें सांगतां, आणि एकदां कर्म करणें हें अवश्यच असें ह्मणतां, तेव्हां त्यांतील खरे तें कोणते? त्यावर 'कर्म केलें कीं, त्याचा परिणाम भोगावा लागणारच; पण कर्म करणें मनुष्याचे काम आहे. जगाच्या धडामोडींत कांही कार्य व्हावें ह्मणूनच मनुष्याला घडविलें आहे. तथापि, कर्मानें जीव बद्ध होतो आणि त्यापासून अलिप्त राहिल्याशिवाय जीवाला मोक्ष मिळावयाचा नाहीं,' असे श्रीकृष्णांनीं उत्तर दिले. कर्मत्यागाखेरीज मोक्षप्राप्ति नाही, या सांगण्यावरून अर्जुनाला पुन्हां शंका उत्पन्न झाली. त्याला श्रीकृष्णानी उत्तर दिलें कीं, कर्म बद्ध करीत नाहीं; फलाशा ही जीवाला बद्ध करते. फलाशा सोडून कर्म केल्यास मोक्षप्राप्ति होते. फलाशेला भिऊन कर्मत्याग करणें हा भित्र्यांचा मोक्ष आहे. रानांत जाऊन बसण्यांत फारसा पुरुषार्थ नाहीं. आपणास मोह संसारांत पाडील ह्मणून त्याच्या समोर न जाणें हा भित्रेपणाचा मार्ग होय. जगांत राहून 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या तत्वाप्रमाणें फलाशा सोडून कालासही न भितां जो धीरानें कर्म आचरतो तोच खरा धीर पुरुष होय मोहाशीं सामना देऊन त्याचा पाडाव करण्यांत खरा पुरुषार्थ आहे. कर्म हें कधीं वायां जाणारें

नाहीं. आज, उद्यां, केव्हां तरी त्याचें फळ हें मिळणारच. कर्माचे फल काळ, वेळ व परिस्थिति इत्यादिकांवर अवलंबून असते. तथापि, ज्याला फलाशा नाहीं त्याला निराशा होण्याचीही भीति नको. मग कर्तव्य ह्मणूनच मनुष्य कार्य करूं लागतो. निर्हेतुक कार्य करावयास प्रवृत्त असणे हेच गीतेंतलें मुख्य सार आहे. निर्हेतुक क्रिया कधींच पापमय होऊं शकत नाही. धैर्य खचलें असतां धीर देणें, कर्तव्याची जागृति करणें, आणि आपली सारीं कर्मे ईश्वरास अर्पण करणें, हे गीतेत सांगितलें आहे....गीतेत सांगितलेलें अहेतुक काम करावयास मनांत सात्विक वृत्तीचा उदय झाला पाहिजे; परमेश्वरावर दृढभक्ति पाहिजे; आणि आपणास करावयाचें काम ईश्वरानें अगोदरच नेमून ठेविले आहे असा भरंवसा असला पाहिजे. आणि ह्मणूनच गीतेंत " मामनुस्मर युद्धय च " असा उल्लेख केलेला आहे. "

---

आमच्या धर्मातील तत्व उदात्त असून त्यांवरच नीतीची इमारत उभारली आहे हें टिळक यांच्या वरील विचारसरणीवरून कोणाच्याही ध्यानांत येईल. हें मत किती सयुक्तिक व महत्वाचे आहे हे लक्षांत यावे म्हणून प्रख्यात पाश्चात्य नीतिशास्त्रज्ञ डॉ० पॉल केरस यांनी अनेक धर्मवादी व नीतिवादी लोकांच्या मतांचें परीक्षण करून जो " The Ethical Problem " म्हणून ग्रंथ लिहिला आहे त्यांतील दोन तीन उतारे येथें देतो.

प्रथमतः उपोद्घातासच त्यांनी अशा रीतीनें सुरवात केली आहे:—

" In endeavoring to establish ethics as science the author's aim has been on the one hand to point out the intimate and inalienable connection of morality with religion, and on the other hand to show that ethics can by no means be derived from mere sentiment. Both the intutionist and the hedonist are wrong, the former in seeking the ultimate foundation of ethics in the sentiment of moral impulses called conscience and the latter in determining moral worth by a consideration of pleasure and pain.

In order to find the objective element that constitutes the nature of morality, we must discover the objective element of man's soul. Man's soul is not merely subjectively. The fact that he feels is an indispensable condition of his existense as living and thinking being, but it is not the essential feature of his humanity. He does not consist of feelings pure aud simple, but of feelings of a definite kind and nature. The most important part of man's existence is his character, and character is quality; a man's character is not the feelings, but is determined by the forms of his feelings, by his thoughts, and his intentions. And forms are, if our philosophy be right, not mere subjective semblances ( As Kant would have it ), but objective realities.

In reply to the question, what am I myself? we say, the self of every man is his character. I am not my body, but that which determines the actions of the body. I am the longings, the impulses, the ideals which inspire me, and, above all, the actions which I do. In brief, the soul consists of thoughts and volitions. Accordingly I am a certain form of life,—a form formed and forming. I am formed by formative factors that existed before I was combined into this peculiar idiosyncrasy, and I in my turn am forming the idiosyncrasies of future generations with whom I come directly, or indirectly into contact. In this sense, I ( that is, the forms of life which make up my personality ) existed to a great extent before I was born and shall exist in the reproductions of my most personal features after the dissolution of my body. The indestructibility of every event that ever happened is especially true of the form of life, the soul, which at every moment of its existense is simply the summed up result of its entire previous history, beginning with the first appearence of life on earth. And as the past is immortalised in us so we shall be immortalised in the future, and this immortality of the soul is a fact in spite of the transiency of every successive moment of our life as well as the final dissolution of the body.

Morality is a formation of character; it is the acquistion and preservation of those forms of life which, in our best judgment, must be deemed worthy of existence. We have been built up by the soul-life of the past, and we are building up the soul-life of the future. Our self extends into both directions, into the ages that have been and into the ages to come. The present temporary incarnation of the soul-life is transient, while its forming factors are enduring.......If, however we understand by self the form of our soul-life, our charcter, the ideals that inspire us, and the aims which we pursue, ethics would be simply the science of self-culture and self-preservation. In this sense morality is the highest, the best, and most consistent selfishness."

* * * *

"We insist, therefore, on the truth that religion is closely connected with morality. And how could it be otherwise? For, religion is the conviction we have of the truth,-the conviction which comprises our conception of the universe, and becomes as such the determining factor of all our actions.

Religion need not be a belief, but it is always a faith. Belief is opinion ; it is a taking for granted, without having evidence but faith is a synonym for conviction. Faith is the determination to be true to one's ideal. It is true that many deem belief to be an essential element of religion, but this is only an emergency for those who are lacking in comprehension The belief that justice extended to enemies is the proper thing to do, does not become less religious when through a deeper insight into the interrelations of human life it is changed into positive knowledge. We would here call attention to the fact that the Hebrew word for belief *amuna* means firmness, or character (connected with the word *amen* which means ' it is established ' ); and the Greek word for belife, *Ŏɩotıs* means fidelity, and ought to be translated by the English word " faith " and not " belief. "

It goes without saying that religion originates with mere opinion, but it progresses more and more to a clear comprehension. First we know in part and we prophesy in part; but when that which is perfect is come, then that which is part shall be done away."

* * * *

Mr. Goldwin Smith continues·

"Evolutionary philosphers give excellent precepts for healthy and comfortable living; but these precepts apparently the man fulfils, and thus he fulfils all righteousness. They may talk to him, indeed, of a more perfect state ot society to be some day brought about by ethical science, in which he would be out of place; but he, having only one life, takes the world as he finds it, and makes the best of it for himself. Why should he sacrifice himself to the future of humanity. "

Why should he sacrifice himself for the future of humanity ? Because the future of humanity is his own future. Why shall a boy sacrifice the hours of his childhood for the future days of his manhood ? Why ! Because the man is the continuance of the boy. The objection may be made that the comparison does not hold good; the future generations of mankind are not we ourselves, while the adult man is the same person as the boy. What, however does "the same person" mean ? The word "person" represents a history, a continuance, nothing more. Persons are not unchangeable units, there is not one atom of the boy left in the man. Materially

considered the adult man is as exactly as much and not more different from himself when he was a boy, as the present generations of mankind are different from the past generations, for in both instances the continuity is preserved in exactly the same degree and measure.

It is said that a man "having only one life takes the world as he finds it, and makes the best of it for himself." The truth is man has *not* "only one life."

"The soul that rises with us, our life's star,
Hath had elsewhere its setting
And cometh from afar."

Man's life, his humanity, does not consist of the material particles of his body. The properly human in man consists almost entirely of his relations with other men. His very language is superindividual and if we could cut out the superindividual from his brain, there would remain a mere brute. There is a great truth in the idea of immortality, although there need not be an immortality either of bodily resurrection or in a purely spiritual heaven beyond.

The immortality of the soul is a truth; the immortality of the individual is an error. We must cease to consider the ego of the individual as a reality. It is no reality and the belief in it is an illusion; it is the veil of Maya. The antiquated view of regarding the personality of a man as an entity, as a kind of mysterious soul-unit, produces most intricate sham-problems; but these problems will disappear as soon as the veil of Maya has been lifted from our eyes.

As soon as we lose sight of the truth that mankind is one great whole and that the individual is a man only in so far as mankind lives in him, we shall not be able to understand and to account for morality. The super-individual in man, whatever it may be called, is as much a reality as is the shape of his body, and it is the super-individual elements in man which constitute his soul. The recognition of the immortality of man's soul, not in the old sense, but in a scientific sense, will be found to be the only satisfactory solution of the ethical problem and at the same time of the religious problem " pp. 196-198.

( डॉ. पॉल केरस यांचे वरील विचार वाचून " अंतवंत इमे देहा:"; " न जायते म्रियते वा कदाचित् "; " वासांसि जीर्णानि यथा विहाय " इत्यादि भगवद्गीतेच्या कित्येक श्लोकांतील उदात्त विचारांची कल्पना कोणालाही आल्यावाचून राहणार नाहीं. )

## थिऑसफीसंबंधीं त्यांचीं मतें.

टिळक हे हिंदू असून थिऑसफीचे पुरस्कर्ते आहेत, आनी बिझांट सारख्या विधर्मी बाईनें सांगितलेला हिंदुधर्म यांना पसंत पडतो, हिंदुधर्माचा पाडाव करून ख्रिस्ती धर्मांत ओढण्याकरितां 'मुक्तिफौजे' सारख्या संस्थांचे जसे प्रयत्न चालले आहेत तसेच थिऑसाफिस्टांचे व त्यांनीं चालविलेल्या काशी येथील 'सेंट्रल हिंदु कॉलेजा'चे आहेत, या कॉलेजांत जें 'नॅशनल सॉंग' (राष्ट्रीय गीत) गाण्यांत येतें तें सबगोलंकार करण्याच्या हेतूनें येतें, बिझांट बाईचा कावा कळल्यामुळेंच 'सेंट्रल हिंदु कॉलेज'च्या चालकांत बाचाबाची होऊं लागली तरी हे थिऑसफीची कड घेतात, वगैरे अनेक आक्षेप टिळक यांच्या संबंधानें १९०४ सालांत लोकांनीं घेतले होते. पण या आक्षेपांत अर्थ आहे असें मला वाटत नाहीं. ज्या गृहस्थांनीं हे आक्षेप घेतले होते त्यांपैकीं पुष्कळांनीं थिऑसफीसंबंधीं ग्रंथ वाचलेले नसावेत; एवढेंच नव्हे तर, कित्येकांना इंग्रजींत प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांचे आकलन करण्याइतकेंही ज्ञान नसल्यामुळें त्यांची टीका एकांगीं, अज्ञानमूलक, अर्थात् हेकटपणाची होती. वास्तविकपणें थिऑसफी हा धर्म नसून तत्वज्ञांची संस्था आहे; व त्यासंबंधाचे ग्रंथ टिळक यांनीं वाचले असून प्रख्यात विदुषी आनीबिझांट यांच्याशीं त्यासंबंधानें त्यांचें भाषणही झालें आहे. तसेंच बनारस येथील 'सेंट्रल हिंदु कॉलेजा'चीही थोडीबहुत त्यांना माहिती आहे. अर्थात् त्यांनीं जें मत प्रतिपादिलें आहे त्याला चांगला आधार असून त्यांच्या मनाचीही त्याबद्दल खात्री आहे. एकदां थिऑसफीसंबंधानें मुंबईचे रा. रा. गजानन भास्कर वैद्य यांच्याशीं बोलत असतां ते ह्मणाले:—

"शिकलेल्या लोकांवर धर्मतत्वांचे वजन पडण्यास नव्या तऱ्हेनेंच त्या विषयाचें प्रतिपादन केलें पाहिजे. बिझांटबाई परधर्माची झाली म्हणून काय झालें? तिला जर अंतःकरणपूर्वक हिंदुधर्मांत कित्येक उच्च तत्वें दिसतात व तीं तत्वें जर चांगल्या रीतीनें लोकांपुढें मांडते तर लोकांनी तीं कां ग्रहण करूं नयेत? बिझांटबाईची कळकळ तिच्या ग्रंथांवरूनच चांगली कळून येते.* युरोपियन लोकांत ह्मणजे उदार

---

* बिझांटबाईच्या पुस्तकासंबंधाने टिळक यांनीं ता. ३।११।०३ च्या केसरीतील अग्रलेखांत एके ठिकाणी येणेप्रमाणें मत दिलें आहे:—

"मिसेस आनी बिझांट यांनीं बनारस येथें आपण स्थापिलेल्या हिंदुकॉलेजाकरितां तीन हिंदुधर्मपुस्तकें छापून प्रसिद्ध केलीं आहेत. तिन्ही पुस्तकें इंग्रजींत आहेत.

बुद्धीनें काम करणारीं माणसें नसतात असें नाहीं. कोणास हा कावा वाटेल तर वाटो. पण त्यांतलें चांगलें तरी घेण्यास हरकत नाही ना? यासंबंधानें बिझांटबाईचें आणि माझें भाषणही झालें आहे. त्यांत ती ह्मणाली "आह्मी तुह्मांला शिकविलें आहे आणि मार्ग दाखविला आहे; यावर उचल करून धर्मजागृति करणें तुमचें काम आहे."

थिऑसफी ह्मणजे काय, हिंदुधर्माशीं त्याचा कितपत संबंध आहे, बिझांटबाईचे प्रयत्न कोणत्या दिशेचे आहेत व त्यांनीं हातीं घेतलेल्या कामाचें स्वरूप कोणतें, यासंबंधानें खुद्द टिळक यांनींच ता. २९ मार्च १९०४ च्या केसरींत ऊहापोह केला आहे. त्यांतील महत्वाचा भाग खालीं देतों, त्यावरून वरील गोष्टीसंबंधानें त्यांचे काय विचार आहेत हें वाचकांस कळून येईल. ते ह्मणतातः—

"थिआसफी हा कांहीं स्वतंत्र धर्म नाहीं. हिंदु, पारशी, मुसलमान, बौद्ध आणि ख्रिस्ती, या सर्व धर्मांतील लोकांनी आपापल्या धर्माप्रमाणें चालावें, परंतु एकमेकांचा द्वेष न करतां सर्व धर्मांतील गूढ तत्वें एकच आहेत हें ओळखून बंधुत्वाचे नात्याने वागावे असें थिआसफी सांगतें. थिआसफी कोणासही आपला धर्म सोडण्यास सांगत नाही किंवा त्याचा जो परंपरागत धर्म आहे, त्याऐवजी दुसरा धर्म त्यास स्वीकारण्यासही सांगत नाहीं. अर्थात थिआसफी हा धर्म नव्हे; सर्व धर्मांतील लोकांस धर्माचें तत्व ओळखून प्रेमानें वागण्यास सांगणारी तत्त्वज्ञांची संस्था आहे. आतां या तत्वज्ञानांत कांही गुप्त आणि गूढ (Occult and Mystic) तत्त्वें आहेत; व तीं सर्वच सर्वांस मान्य होतील असें नाहीं.* तथापि, भिन्न

---

पैकीं पहिलें चवथ्या पाचव्या यत्तेपर्यंत; दुसरें साहाव्या सातव्या यत्तेंत, आणि तिसरें कॉलेजांत त्यांनीं सुरू केलें आहे; व इतर शाळांतूनही हीं सुरू करण्यासारखीं आहेत. या पुस्तकांतून हिंदुधर्म ह्मणजे काय, त्यांतील प्रमाणग्रंथ कोणते, ईश्वरप्राप्तीचे कोणते मार्ग ग्राह्य धरले आहेत, नीतिविषयक कल्पना त्यांत कोणत्या प्रकारच्या आहेत, इत्यादि गोष्टीचा सोप्या भाषेंत ऊहापोह केला आहे. हे ग्रंथ सर्वांशीं निर्दोष आहेत असें नाहीं. त्यांत अद्याप कांहीं ठिकाणीं बरीच सुधारणा करण्यासारखी आहे. तथापि, हा पहिलाच ग्रंथ आहे अशा दृष्टीनें पाहिले तर हिंदुविद्यार्थ्यांनी तो एक वेळ तरी वाचण्यासारखा आहे यांत संशय नाहीं; किंबहुना तो वाचावाच अशी आमची त्यांस शिफारस आहे."

* महात्मा अगम्य गुरू यांच्यावरोबर पुण्यास आलेली त्यांची शिष्या स्टॅनर्ड बाई या विद्वान् असून पाश्चात्य राष्ट्रांतील अनेक थिऑसाफिस्टांची त्यांना चांगली माहितीही होती. या बाईची गांठ घेऊन थिआसाफिस्टांच्या गुप्त आणि गूढ चमत्का-

धर्मांतील लोकांमध्यें प्रेम वाढविण्याचा व प्रत्येक धर्मांतील लोकांस त्या त्या धर्मांतील रहस्य समजून देण्याचा थिआसफीचा जो हेतू आहे तो स्तुत्य आहे हें कोणीही कबूल करील. कांहीं थिआसफीस्ट हिंदु आहेत, तर काहीं बौद्ध आहेत, आणि कांही मुसलमान व पारशीही आहेत. बनारस येथील हिंदु कॉलेज थिआसफिस्टांनीं चालविलेलें असलें, तरी तें 'थिआसफिस्ट कॉलेज' नसून 'हिंदु कॉलेज' आहे, हा भेद लक्षांत ठेवला पाहिजे. थिआसफीचे कर्नल अल्कॉट व बीझांटबाई हे जे दोन मुख्य पुरस्कर्ते आहेत, त्यांपैकीं कर्नल आल्कॉट यांचा भर बौद्ध धर्माकडे व आनी बीझंट यांचा भर हिंदुधर्माकडे आहे, हें सर्वश्रुत आहे. अर्थात कर्नल आल्कॉट यांनीं सीलोनांत बौद्ध शाळा काढल्या आहेत आणि बीझंटबाईंनीं बनारसेस हिंदु कॉलेज काढलें आहे. थिआसफीचें सामान्य मत कबूल असले तरी प्रत्येक थिआसफिस्ट कोणत्या तरी विशिष्ट धर्माचा अभिमानी असणे शक्य आहे व असतोही; आणि तो ज्या विशिष्ट धर्माचा अभिमानी असेल त्याप्रमाणें एखाद्या विशिष्ट धर्माचें शिक्षण देण्यास तो पात्र किंवा अपात्र होतो. बीझंटबाई थिआसफिस्ट खऱ्या, पण त्या धर्मानें हिंदु असल्यामुळें हिंदुधर्म हिंदु लोकांस समजून देण्यास त्या पात्र आहेत; व त्यांच्या अंगची ही पात्रता विद्वत्ता, वाचन आणि व्यासंग, यांनीं दृढतर झाली आहे. एवढी गोष्ट खरी कीं त्या विदेशी आहेत; आणि वर सांगितल्याप्रमाणें त्यांच्या सर्व गुणांवर विरजण पाडण्यास एवढी गोष्ट कित्येकांचें मतें पुरेशी आहे. पण आमचे तसें मत नाहीं; उलट आह्मांस असे वाटते की, प्रो. मॅक्समूलर, प्रो. ड्यूसन किंवा बिझांटबाई यांच्याकडून आमच्या धर्मास जें सर्टिफिकट मिळत आहे, व आमच्या धर्मांतील तत्वांच्या प्रसारास त्यांच्याकडून जो उद्योग होत आहे, तो विशेष योग्यतेचा आहे.

---

रासंबंधानें त्यांचें मत काय आहे हे एका गृहस्थानें 'मराठा' वर्तमानपत्रांत संवादरूपानें प्रसिद्ध केले आहे. त्यांत ह्या बाई ह्मणतातः—

"Q.—What do you think about the occult power of Theosophists like Blavatsky or Besant?

A.—As one who has studied occult phenomena very closely in Paris and London I can say that their powers are not real. They are clamied but never demonstartated as has been done even by some other occult bodies. But neither these nor Theosophists can give the same genuine demonstration as a real yogin. Psychical phenomena must not be mixed up with yoga. The former are manifestations of natural forces with which human beings are endowed and which are slightly above the normal activities of mind or the senses."—4-3-06.

थिआसफींतील कांहीं गुह्य तत्वें हिंदु धर्मांत नसतील, पण तेवढ्यामुळें धर्मानें हिंदु झालेल्या थिआसफिस्टांस हिंदु कॉलेजांत हिंदुधर्माचें शिक्षण देण्यास अधिकार नाहीं, असें आह्मांस वाटत नाहीं. हिंदुधर्म हा थिऑसफीच्या आधीं किती तरी हजार वर्षें चालत आलेला आहे; व आज थिऑसफिस्ट पंथ निघाला नसता तर हिंदुधर्माची उन्नति झाली नसती असेंही आह्मी ह्मणत नाहीं. तथापि, आमच्या सनातन धर्माचें स्वरूप लोकांपुढें मांडण्याची जी प्राचीन पद्धत आहे, तींत कांहीं तरी सुधारणा करून हिंदुधर्माची मांडणी ( धर्म नव्हे ) हल्लींचा काळ लक्षांत आणतां निराळ्या तऱ्हेनें करणें जरूर आहे, असें आमचें मत आहे. हिरा जरी खरा आणि मौल्यवान असला तरी ज्याप्रमाणें निरनिराळ्या काळीं प्रवृत्त असलेल्या रुचीप्रमाणें त्यास निरनिराळें कोंदण करावें लागतें, तसाच धर्माचाही प्रकार होय. मग तो धर्म हिंदु असो, बौद्ध असो वा ख्रिस्ती असो. आधिभौतिक शास्त्रांच्या प्रसारानें ख्रिस्ती धर्माच्याही मांडणींत पुष्कळ फेरफार झालेला आहे, आणि तशा प्रकारचा फेरफार हिंदुधर्माच्या मांडणीत ( धर्मांत नव्हे ) होणें जरूर आहे. थिआसफीनें हिंदुधर्मापासून पराङ्मुख झालेल्या पुष्कळ सुशिक्षितांस पुनः हिंदुधर्माकडे वळविलें यांतील बीज हेंच होय. ”

सेंट्रल हिंदु कॉलेजांत शिकविलें जाणाऱ्या नॅशनल सॉंग ( राष्ट्रीय गीत ) संबंधानें ता. ५।४।०४ च्या केसरींत ते येणेंप्रमाणें लिहितातः—

“ हिंदु कॉलेजांत मुलांस शिकविलें जाणारें ‘ नॅशनल सॉंग ’ हिंदुधर्माच्या विरुद्ध आहे असें भासविण्याचा कित्येकांनीं प्रयत्न केला आहे, हें गेल्या अंकी आह्मी लिहिलेंच आहे. हिंदु कॉलेज सनातन हिंदुधर्माच्या विरुद्ध आहे असें दाखविण्यास जर कांहीं पुरावा असेल तर त्यांत कांहीं अर्थ नाहीं. हिंदुंमध्यें शैव, वैष्णव, शाक्त, माध्व, वारकरी, पाशुपत, वडगल, तेंगल वगैरे अनेक पंथ व मतें आहेत. या सर्व पंथांतील लोकांनीं एकमेकांशीं मारामाऱ्या करून ‘ शिवस्य हृदये विष्णुः विष्णुस्य(?) हृदये शिवः ’ याप्रमाणें सनातन धर्माची थोरवी गाजवावी असें जर हिंदु कॉलेजावरील आक्षेपकांस वाटत असेल तर त्यांस आमचें कांहीं ह्मणणें नाही. आमच्या मतें हा सनातन हिंदुधर्म नव्हे. हिंदुधर्माप्रमाणे ख्रिस्ती धर्मांतही रोमन कॅथोलिक, प्रॉटेस्टंट, प्युरिटन्स वगैरे पुष्कळ शाखा आहेत, पण ते सर्व ख्रिस्ती या नात्यानें जसे एकच आहेत त्याप्रमाणें हिंदुधर्माच्या सर्व पंथांतील लोक हिंदु या नात्यानें एकच आहेत आणि हीच गोष्ट नॅशनलसॉंगमध्यें सांगितली आहे. तूं वैदिक असलास तर केवळ वैदिकत्वाचा अभिमान बाळगूं नकोस, तूं वेदांती असलास तर केवळ वेदांतीपंथाचा अभिमान ठेऊं नकोस, वैष्णव असलास तर केवळ वैष्णवत्वाचा अभिमान बाळगूं नकोस, अशा प्रकारें सर्व पंथांतील लोकांस उपदेश करून त्यांस सर्व सामान्य हिंदुत्वाचा अभिमान बाळगण्यास सांगणें हें खऱ्या हिंदुधर्माचें लक्षण होय, व तसें केल्या-

बद्दल जर हिंदु कालेजास दोष द्यावयाचा असेल तर कॉलेजच्या आक्षेपकांनीं खुशाल द्यावा. आह्मांस हें मत ग्राह्य नाहीं इतकेंच नव्हे, तर खऱ्या हिंदु धर्माचें रहस्यही असें नाहीं असें आह्मी साफ सांगतो. हिंदु ह्मणजे नुसता शैव नव्हे, नुसता वैदिक नव्हे नुसता वैष्णव नव्हे, किंवा नुसता भागवतधर्मही नव्हे. एका नदीतून फुटून ज्याप्रमाणें निरनिराळे कालवे जातात त्याप्रमाणें हे हिंदुधर्माचे कालवे आहेत; व या निरनिराळ्या पंथांचीं जीं विशिष्ट लक्षणें आहेत तीं बाजूस ठेऊन जें सामान्य स्वरूप राहतें तें हिंदुधर्माचें खरें स्वरूप होय. आणि तें ' प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु। साधनानामनेकता ॥ उपास्यानामनियमः। एतद्धर्मस्य लक्षणम् ॥ या नियमास विरुद्ध येत नाहीं; किंबहुना हिंदुधर्माचें हें लक्षण वरील तत्वांचा विचार करूनच बांधलेलें आहे असें ह्मटलें तरी चालेल. निरनिराळ्या पंथांतील मतभेदांचे तंटे सामान्य हिंदुधर्मसंमत नाहींत ही गोष्ट नव्या पिढीच्या मनांत जितक्या स्पष्ट रीतीनें बिंबेल तितकी बिंबवून देणें हें प्रत्येक हिंदुधर्माभिमान्याचें कर्तव्य होय. हिंदुकॉलेजाकरितां तयार केलेल्या नॅशनल सॉंगमध्यें हेंच तत्व घातलेलें आहे; व तें अगदीं योग्य आहे. तथापि, हें तत्व संभाळून जर त्यांतील शब्दांत कांहीं फेरबदल करावा असें कोणास वाटत असेल तर त्याच्या सूचनांचा कॉलेजाच्या व्यवस्थापकांकडून अनादर होईल असें आह्मांस वाटत नाहीं. "

## गणेशोत्सव.

राष्ट्रांत धर्मजागृती होऊन त्याची अनेक तऱ्हेनें उन्नति होण्यास उत्सव हें एक चांगलें साधन आहे. तसेंच ऐक्याची वृद्धि होण्यास एक उपास्य असणेंही अत्यंत इष्ट आहे. हिंदु लोकांतील निरनिराळ्या जाती एके-ठिकाणीं येऊन चार दिवस आनंदानें बोलतील, बसतील, विचार करतील, अशी जागा ह्मटली ह्मणजे गणेशोत्सवाचें ठिकाण हीच होय. हिंदुधर्मांत अनेक सण व उत्सव आहेत; पण प्रत्येकानें आपापल्या घरांत उत्सव करण्यापेक्षां सार्वजनिक रीतीनें उत्सव करणें हितावह आहे. या उत्सवाची स्थापना टिळक यांच्या हातूनच पहिल्यानें झाली व त्यांचेंच अनुकरण महाराष्ट्रांतील सर्व लोकांनीं केलें. उत्सव सुरू करण्यास हिंदुमुसलमानांतील दंगे जरी प्रत्यक्ष कारण झाले असले तरी उत्सवाचा हेतु हिंदुमुसलमानांतील दुही वाढविण्याचा नसून वर सांगितल्याप्रमाणें राष्ट्रैक्य करण्याचा आहे; व जुन्या जोत्यावर नवी इमारत बांधल्याप्रमाणें हा उत्सव असल्यामुळें लोकांच्या आदरास तो लवकर पात्र झाला व महाराष्ट्रांतील सर्व लोकांचें चित्त त्याकडे वेधलें. हा उत्सव सुरू होऊन सुमारें

चवदा वर्षें झालीं. इतक्या अवधींत त्याला बरींच विघ्नें व संकटें आलीं. पण त्यांतून तो निभावून दिवसेंदिवस त्याचें महत्व लोकांस कळूं लागलें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. हा उत्सव म्हणजे निवळ ताबुताची नक्कल, मुसलमान-बंधूंस चिडविण्याच्या हेतूनें ते सुरू केले आहेत, मेळ्यानें विद्यार्थ्यांचें पुष्कळ नुकसान होतें, उत्सवांत पैशाची उधळपट्टी पुष्कळ होते, वगैरे आक्षेप प्रथमारंभीं निघाले होते. पण हळूहळू ते नाहींसे होऊन उत्सवाला इष्टस्वरूप येत चाललें आहे. आणि कोणत्याही संस्थेची गोष्ट अशीच असते. आरंभीं आरंभीं ती अमक्या एका व्यक्तीनें काढली आहे म्हणून कोणी दोष देतो, तर कोणी आमक्या वेळीं व अमक्या कारणाकरितां काढली आहे म्हणून दोष देतो; कोणी त्यांत अमुक नाहीं म्हणून दोष देतो तर कोणी त्यांत अमुक आहे म्हणून दोष देतो. पण ह्या गोष्टी पुढें आपोआप कमी होतात. संस्थेंत प्रथमतः दोष नसतात असें नाहीं. पण कालावधीनें ते नाहींसे होतात. दोष काढणारांची प्रथमतः तीव्र दृष्टी असते ती नाहींशी होते, उदासीन असतात ते त्याचा विचार करावयास लागतात, ज्यांची कित्येक गोष्टींबद्दल खात्री झाली नसते त्यांची खात्री होऊन ते त्यास येऊन मिळतात, पूर्वींच जे येऊन मिळाले असतात त्यांच्यांत अधिक जोम व उत्साह येऊन ते नेटानें काम करावयास लागतात, व विरुद्ध अथवा प्रतिकूल टीकेपासून खुद्द संस्थापकांस अथवा पुरस्कर्त्यांस आपल्या चुका दिसावयास लागून सरळ मार्गानें जाण्याची त्यांची प्रवृत्ति होते. गणेसोत्सव हा मुसलमानांस चीड आणण्याच्या उद्देशानें काढला आहे, त्यांत उधळपट्टी फार होते, विद्यार्थ्यांचें नुकसान होतें वगैरे पूर्वोक्त आक्षेप उत्सव सुरू झाल्यापासून अद्यापही कमजास्त प्रमाणानें पुढें येतात. त्यांस टिळक यांनीं आरंभींच ह्मणजे १८९६ सालीं जें उत्तर दिलें आहे तेंच येथें देतों ह्मणजे त्यावरून टिळक यांचीं मतें काय आहेत हें वाचकांस कळून येईल. ते ह्मणतातः—

" दोन वर्षांपूर्वी प्रथम जेव्हां उत्सवास आरंभ झाला तेव्हां मुसलमानांस चीड उत्पन्न करण्याकरितां आह्मी हा उत्सव करतों असा एक आरोप आमच्यावर होता; पण दोन वर्षांच्या अवधीनें तो आरोप आपोआप गळून पडला आहे.... आह्मांस मुसलमानांचा द्वेष करण्यांत कांहीं हाशील नाहीं. एका दावणीला बांधलेल्या

मेंढ्यांनीं आपापसांत दांडगाई केल्यानें कांहीं उपयोग होत नसतो, हें प्रत्येक हिंदूस समजतें. मुसलमानांशी सलोखा करा, त्यांच्याशीं प्रीतीनें वागा; पण प्रीति दाखवावयाची ह्मणजे गणपतीचा उत्सव सोडून द्यावयाचा असा अर्थ धरण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. आपापल्या धर्मानें वागून एकमेकांचा बहुमान ठेवितां येतो. खुषामतगार मात्र आपला धर्म सोडून दुसऱ्याकरितां पाहिजे तो वेष व सोंग घेण्यास तयार असतात. मुसलमानबंधूंची खुषामत करण्याचें कांहीं कारण नाहीं; व हिंदूंनीं आपली वृथा स्तुति करावी अशी आमच्या विधर्मी बंधूंचीही इच्छा असणें शक्य नाहीं. परकीयांचें पोकळ स्तोम माजविणाऱ्या भित्र्या स्तुतिपाठकांच्या ह्या मताकडे जरा देखील लक्ष पुरविण्याचें कारण नाहीं. आतां दोन वर्षांनीं हा आक्षेप जसा सर्वांना शुष्क वाटत आहे त्याचप्रमाणें इतर आक्षेपही कालावधीनें आपोआप गळून पडतील. ते इतके पोकळ आहेत कीं, त्यावर प्रहार करण्याचेंही कारण नाहीं. ह्या उत्सवांत अतोनात खर्च होतो अशी कांहींनीं ओरड माजविली आहे. हिंदुराष्ट्र ह्मणजे कांहीं गुलामांचे राष्ट्र नव्हे. मानवी प्राण्याला कैद्याच्या राहटीनें रहा ह्मणून सांगणें ह्मणजे महा मौर्ख्य आहे. समारंभ व थाटमाट हीं प्रत्येक उत्सवाचीं आवश्यक अंगें होत; व कोणतींही कामे पैशावांचून होत नसतात. इतर वाईट गोष्टींत पैसे खर्च होऊन जाण्यापेक्षां धर्मबाबतींत थोडाबहुत खर्च झाल्यास पुण्यच आहे. ह्या उत्सवांत प्रत्येकजण आपापल्या हौसेनें खर्च करीत असतो. कोणाची कोणावर सक्ती नाहीं. आठ दहा दिवस उल्हासानें जर काढतां येत नाहींत व त्या उत्सवाप्रीत्यर्थ थोडकेसें द्रव्य खर्चण्याचें जर सामर्थ्य नाहीं, तर ते राष्ट्र जिवंत असून मेल्यासारखेंच आहे. ह्या गोष्टीला उधळपट्टी ह्मणणारे ह्मणोत; पण कष्टमय संसाराची यात्रा सुखाची व शांतीची होण्यास असले खर्च आवश्यक आहेत. उत्सवाचे खर्चांतून औद्योगिक कारखाने काढण्याची सूचना करण्यापेक्षां बूट, स्टाकिंग्स व आकडीच्या पोषाखांतील इतर नटवेपणा ह्यांच्या आजपर्यंतच्या वायफळ खर्चांतून किती गिरण्या उभारल्या गेल्या असत्या ह्याचा विचार व्हावयाला पाहिजे होता. राष्ट्रीयसभेस जाण्यायेण्यानिमित्तच दरसाल लाखों रुपये उडत नाहींत काय? पण त्याचा उपयोग नाहीं असें कोण ह्मणेल? राष्ट्राला कोणता खर्च अवश्य आहे कीं नाहीं हें पाहतांना उल्हासवृत्ति जरूर आहे कीं नाहीं हेंही पाहिलें पाहिजे. कोठें वृथा खर्च होत असल्यास तेवढीच गोष्ट लोकांच्या नजरेस आणावी. सरसकट बारा टक्के एकंदर उत्सवावर कोरडे ओढण्यांत निंद्य हेतु दृष्टीस पडतो. मुलांचा अभ्यासाचा वेळ फुकट जातो अशीही हाकाटी आहे. संध्याकाळीं गणपती पाहण्याची घाई असल्यामुळें बायका भात कच्चा करितात, असा उत्सवावर जंगी आरोप अद्याप ह्या वेडगळ मंडळीनें कसा केला नाहीं ह्याचें आश्चर्य वाटतें! क्रिकेटमॅचकरितां वारंवार दोन दोन दिवस शाळा बंद ठेवलेल्या चालतात; पण गजाननाचे नांव घेण्यांत मुलांचा वेळ फुकट जातो! गव्हर्नर साहेब मॅचचे वेळीं हजर असतात. पण आमच्या

उत्सवांत बडा साहेब कोणी नाहीं; ह्यामुळें ह्या उत्सवावर हा पोरकट सुधारकी आक्षेप आलेला आहे. गव्हर्नर साहेब ह्या मंडपांत येऊन बसावयास लागू देत कीं, लागलीच ह्या उत्सवावर तोंड सोडणारीं वर्तमानपत्रें ह्याच उत्सवाच्या पोवाड्यांनीं भरलेलीं आपण पहाल. युनिव्हर्सिटीच्या निकालांत पुष्कळ उमेदवार यंदां नापास होतील अशी कांहींना भीति वाटते; पण ती स्वकपोलकल्पित आहे असे त्यांनीं समजावें. परीक्षांचा निकाल बाहेर पडला कीं, सर्व गोष्टी दिसणाऱ्या आहेत. ह्या दहा दिवसांत विद्यार्थ्यांच्या मनावर जे संस्कार होतील ते शाळेंतील वर्षाच्या शिक्षणाहून अधिक किंमतीचे खास आहेत. अशा उत्सवाचे वेळीं उत्पन्न झालेल्या धर्मबुद्धीचाच सर्व आयुष्यभर उपयोग व्हावयाचा असतो. उदात्त विचार व उच्च मनोवृत्ति ह्याच वेळीं जागृत होतात ज्यामुळें जिवत राहण्यांत एक प्रकारचा थोरपणा आहे त्या गोष्टी शिकण्याच्या शाळा हे उत्सव आहेत शाळेंतील शिक्षण संसारांतील वस्तुस्थितीशीं झोंबाझोंबी करण्यांत फारच थोडके वेळा उपयोगी पडतें. ह्या उत्सवावर चवथा आक्षेप असा आहे कीं, उत्सवाची दिशा चुकली आहे. 'सुपरास्टिशन' माजविण्यापलीकडे ह्या उत्सवांत कांहीं तथ्य नाहीं. गाण्या-बाजविण्यांत सुपरस्टिशन आहे असें ह्मणावें तर हा आरोप आणणाऱ्या समाजिस्टाचें हार्मोनियम व तंबोऱ्याशिवाय कांहींच चालत नाहीं. रस्त्यानें भक्तीचीं गातें गात हिंडणें ह्यांत सुपरस्टिशन भरलेली आहे असें ह्मणावें तर, युनिव्हर्सिटीच्या व्हाइस चान्सलरचे जागयावर बसलेले गृहस्थही हातांत विणा घेऊन पुढे पताका फडकावीत भजनाचा ओरडा माजवीत रस्त्यानें फिरतांना दिसतात. सजविलेल्या मंडपांत सुपरास्टिशन खेंचून भरलेली आहे असें ह्मणावें तर, सुशिक्षित ह्मणविणारांचीही उपासनेचीं मंदिरें नटलेलीं केव्हां केव्हां दृष्टीस पडतात. मग 'सुपरस्टिशन' 'सुपरास्टिशन' ती कशांत उरली? माधवाचार्यांचे अनुयायी असे हे लोक जगजाहीर करीत आहेत; तेव्हां शंकराचार्यांच्या अद्वैतवादांत तर 'सुपरास्टिशन' शिल्लक राहिली नाहीं ना? कोणतीही गोष्ट वाईट असे सिद्ध करावयाचें असल्यास त्या गोष्टीस तरी वाईट नांव द्यावें, अशा अर्थाची इंग्रजीत म्हण आहे तशांतलाच हाही प्रकार आहे. 'सुपरस्टिशन' असे शब्द उच्चारून नाकें मुरडलीं कीं, झाली गोष्ट सिद्ध! ह्या कोटींतील मंडळीच्या लेखांतील 'सुपरास्टिशन' शब्दाचा कांहीं अर्थच नाहींसा दिसतो. सुधारकपंथांतील मंडळीचा ह्या उत्सवांतील कांहीं व्यक्तींशीं द्वेष असल्यामुळें उत्सवांत हे लोक सामील होत नाहीत. उत्सवांतील त्या त्या व्यक्ती मेल्याशिवाय असल्या राष्ट्रीय महोत्सवाच्या उपयुक्ततेची खात्री सुधारक ह्मणविणारांना पटावयाची नाहीं. जर उत्सवात कांहीं कमतरता असली तर त्याचें पाप ह्या उदासीन शहाण्या मंडळीच्याच कपाळीं मारावें लागतें. लोकांत मिसळा, त्यांचे कोठे चुकत असल्यास सर्व गोष्टी नीट जुळवून द्या; सुशिक्षितांचा अधिकार असा आहे; त्यांची कर्तव्यें हीच आहेत."

उत्सवावरील आक्षेपांचें आतां बहुतेक निरसन झालें असून कित्येक आक्षेपकांचींही मतें उत्सवासंबंधानें बदलत चाललीं आहेत. तथापि, टिळक यांनीं हा उत्सव सुरू केला आहे एवढीच गोष्ट मनांत वागवून केवळ व्यक्तिविषयक कलुषित मनानें या उत्सवावर घसरून पडण्यास कित्येक लोक कमी करीत नाहींत. उत्सवांत राजकीय विषयांची चर्चा कशास हवी, सामाजिक सुधारणेसंबंधीं वाटाघाट कशाला पाहिजे, कित्येक व्यक्तींचे दोष विनाकारण कां काढतात, वगैरे आक्षेप कांहीं लोक अद्यापहि घेत आहेत. या आक्षेपांस टिळक यांनीं १९०५ सालांतील एका व्याख्यानांत उत्तर दिलें असून त्यांचें असें म्हणणें आहे कीं, " राष्ट्रीय उत्सव हे राष्ट्राच्या उन्नतीकरितां असतात; व ही उन्नति धार्मिक बाबतींतच नव्हे तर सामाजिक, राजकीय वगैरे सर्व बाबतींत झाली पाहिजे. अर्थात् उत्सवांत सामाजिक, धार्मिक, राजकीय इत्यादि विषयांची चर्चा व्हावयाचीच. आतां ती चर्चा जे लोक करतात त्यांनीं आपापल्या मगदुराप्रमाणें करावी व पुढारी आणि बहुजनसमाज यांच्या मताच्या कसोटीनें करावी. व्यक्तिविषयक निंदा करणें गैर आहे व अशी सहसा कोणी करीत नाहीं. व्यक्तीपेक्षां मतांवर कटाक्ष ठेवणें जास्त जरूरीचें असतें; व मतांवर टीका करण्यानें कोणाची निंदा होत नाहीं, एवढेंच नव्हे तर, समाजसुधारणेस अशी टीका अत्यंत अगत्याचीही आहे. याबद्दल कोणा व्यक्तीस वाईट वाटण्याचें कारण नाहीं, व असें ज्याला वाईट वाटेल त्याला राष्ट्रोन्नतीचीं मूलतत्वेंही माहित नाहींत असें ह्मणावें लागेल." टिळक यांचें हें ह्मणणें सयुक्तिक असून अगदीं खरें आहे. आतां कोणताही उत्सव सुरू झाला ह्मणजे तो एकदम निर्दोष रीतीनें सुरू होतो अशी गोष्ट नाहीं; व ह्मणून मेळ्यांचीं पद्यें, व्याख्यानें किंवा कथापुराणें यांत कित्येक दोष असणें स्वाभाविक आहे; व ही गोष्ट टिळक यांना मान्य असून त्यांनीं गणेशोत्सवांतील अनेक प्रसंगीं आक्षेपकांना उद्देशून असें आव्हान केलें आहे कीं, "तुह्मी या उत्सवांत या; आह्मी काय ह्मणतों तें ऐका; काय करतों तें पहा; दोष असतील तर सांगा, ते आह्मी दुरुस्त करूं. पण तसें न करितां उगीच आडून गोळ्या मारून उत्सवावर आग काय ह्मणून पाखडता? अशानें आपसांतील दुही मात्र जास्त मातवून आपल्या अंगावरील छिद्रांत परक्यांची चोंच जास्त शिरूं देऊन राष्ट्राच्या प्रगतीस जाणून बुजून निरोध

कां करतां ?" टिळक यांचें हें कळकळीचें आव्हान ज्यांनीं ऐकलें असेल त्यांनीं टिळक यांनीं "स्वतःची प्रौढी मिरविण्याकरितां किंवा लोकांवर आपल्या लहरी लादण्याकरितां हे उत्सव काढले आहेत" असें ह्मणणाऱ्या आक्षेपकांस कोणत्या कोटींत घालावें याचा स्वतःशींच विचार करावा. वाह्यात टीकेकडे दुर्लक्ष करून कळकळीच्या टीकेकडे ते कसे काळजीपूर्वक लक्ष देतात हे १९०४ सालच्या सप्टेंबर महिन्यांत त्यांनीं आपल्याच 'मराठा' पत्रांत या उत्सवावरील आक्षेपांसंबंधाचा बाहेरून आलेला जो इंग्रजी लेख छापलेला आहे त्यावरून दिसून येतें. या लेखांत उत्सवाचें स्वरूप कशा प्रकारें ठेवावें या संबंधाच्या ज्या सूचना आहेत त्या स्वतंत्र रीतीनें वाचण्याविषयीं वाचकांस विनंति करून उत्सवावरील कित्येक आक्षेपांस जें योग्य उत्तर दिलें आहे व त्यांतील दोषांचेंही आविष्करण जें निष्कपटपणें केलें आहे तेंच फक्त येथें देतों:—

"It was to be expected that the opponents of Mr. Tilak would leave the Genapati festival alone now that it has established itself beyond redempation. It would be now wise for them only to try to make the most of it and avenge themselves upon him, for stealing a march on them, by annexing it as a permanent factor in the conditions of the religious life of the Hindu society, and directing their criticism upon its patent defects in the hope of turning it in the course of time, into a useful agency of social progress. As a local speaker pointed out on a recent occasion, Art always rests on a kind of a religious sense, that is to say, a deep and steadfast earnestness of mind, and a religious festival, in every country and every age serves as an occasion for the display of the best output of the knowledge and the intuition of the people in the matter of the fine and the æsthetic arts. It would he well if the opponents of the festival, or rather the opponents of Mr. Tilak, remember this, and while thanking him for the creation of a popular institution, which they themselves could not possibly create owing to their want of influence upon and touch with the people, they step in to add so many redeeming features of Art to it that it may prove a distinct dynamical factor for social advancement.

**A writer in the *Sudharak* of the 19th instant has once more taken the field against Mr. Tilak in his capacity as one of the organisers of the Ganapati festival; and which attacking the**

Melawallas as dishonest, he has tried to expose the defects of the festival. Taking him as a representative critic we may point out that the foremost objection alleged is that the Melawallas altogether lack the fervour roused by honest and strenuous faith. One may at once admit that the Melawallas are uneducated and uncultured; but we think it hazardous for any one to say that they lack faith. They are not covered all over with the veneer of religiousness which a man at the Prarthana Samaj, for intance. can show. But for faith pure and simple we do not think that they will yield to the best man that ever conducted a service in any Prarthana Mandir. What perhaps may be attacked with any real force is that the Melawallas do exhibit certain other habits and traits which must be checked or corrected. Their faith is their own, and no body else could supply or take it away. Their culture and habits are likewise their own, but these can very easily be improved and, what is more, will not be improved if the Melawallas would be left to themselves. Looking at the question from this point of view, we think that certain defects pointed out by the writer in the *Sudharak*, do deserve, an unbiased attention. It is said that the Ganapati festival is an imitation of the Mohorum of the Mahomedans It is a good point for a critic of the festival to be able to taunt with the remark that though the festival was inspired by a spirit of disagreement with and retaliation upon the Mahomedans, still after all what was substituted for the Mohorum was nothing better than a Hindu edition of it. But a little reflection will shew that when the organisers of the festival proposed to divert the mind of the Hindus from the Mohorum, they did not step in as reformers of the *fashion* in which the Mohorum was carried on; they did not create a parting of the ways because of Mahomedans were hopelessly inattentive to counsels of reform but because they wanted to give their Hindu followers a religious festival of their own, and it was but natural that the Hindu entered upon the diversion only with their latest tastes and habits. It might, therefore, be plausibly said that the Ganapati festival being in certain of its features an exact imitation of the Mohorum is a fact on which its organisers may congratulate themselves for the singular adaptability that they could command and that stood them in good stead in their spirited object of weaning away the Hindus from the Mohorum. Retaliation may no doubt be effectively done by creating in the mind a total blank about the object to which the retaliation refers, but it may

also effectively be done by having it constantly before the mind but shrouding it with associations which only accentuates the feelings that originally prompted the departure. If it comes to that, we may as well ask whether the conduct of service in the Prathana and Brambo Samaj is unhappily is or is not a poor and wretched imitation of Christian worship in churches? The two instances, however, when put side by side only shew whether a departure be undertaken in a spirit of antagonism or otherwise, imitation is more or less inevitable as the party departing always carries with it its latest tastes, impressions and habits.

Another defect pointed out by the writer in the *Sudharak* is that the Melawallas sing songs referring to social and political matters. In this matter we are at one with him, though we cannot be so unreasonable as to blame Mr. Tilak personally for this as the writer in question does. It is doing Mr. Tilak an unfairness to suppose that he either instigates or actively encourages the singing of songs objected to by the writer and those that think with him Perhaps Mr. Tilak has not yet established a strict and regular censorship over the poetical literature that floods Poona in the festival. But the question is whether he can and may do so; and Mr. Tilak will, we think, soon decide the question for himself. When reformers who have not learnt even the A B C of Sanskrit religious literature can think themselves competent to sit in judgment over and bestow rank abuse on our Rishes, surely the Melawalla who redicules the egg-eating and brandy drinking reformer aught not to look presumptuous. Then, again, when we know that even ecclesiastics can make references to controversial political matters from the pulpit we do not see why Melawallas are to be debarred from saying a thing or two about the political condition that they see all around them. It will be seen, therefore, that there is not much wrong in principle *occasionally* if we find songs treating a subject not strictly religious; and it is disingenuous to attack this essentially religious festival as a cloak for political education Saying so much, again, we must admit that there are limits to the mixture of the religion and pobities in a festival of this kind, and ihe organisers will have to exert hemselves to cut down all that may appear like a license in this matter."

गणेशोत्सवास आज चौदा वर्षे झालीं असून त्यानें आजपर्यंत काय कार्य केलें आहे, उत्सवाची पहिली हालचाल किंवा चळवळ अलीकडे थंडावत चालली असून कालांतरानें हा उत्सव निरुपयोगी ठरेल, उत्सवांत

दहापांच दिवस व्याख्यानें दिल्यानें किंवा मेळ्यांचें प्रदर्शन केल्यानें काय होणार आहे ? अशा प्रकारचे कांहीं नवे नवे आक्षेपही अलीकडे कित्येकांकडून येऊं लागले आहेत. पण याही आक्षेपांत तथ्य आहे असें मला वाटत नाहीं. उत्सव दिवसें दिवस थंडावत चालला नसून त्याचें महत्व लोकांस अधिक वाटूं लागलें आहे हें दरवर्षी नव्या नव्या ठिकाणीं अधिक उत्सव सुरू होत आहेत यावरून कोणाच्याही नजरेस येईल. तसेंच चीन, जपान, एडन या सारख्या दूरदूरच्या ठिकाणींही महाराष्ट्रांतील जे हिंदु लोक गेले आहेत त्यांच्या ठिकाणीं या उत्सवाबद्दल जागृती उत्पन्न होऊन ते एकनिष्ठपणे हा उत्सव करीत आहेत. आतां उत्सवाचा वरवरचा पहिला आवेश किंवा प्रदर्शनात्मक कित्येक गोष्टी कमी झाल्या असतील हें खरें आहे. पण तेवढ्यानें उत्सव थंडावत चालला आहे असें ह्मणतां येणार नाहीं. उलट अशा गोष्टींस थंडपणा येऊन त्यांतील मुख्य कार्य बळावत जाणें हेंच उत्सवाचें खरें स्वरूप आहे. मिरवणूक, रोषनाई, बाह्य थाटमाट, भपका हीं पाहिजे आहेत. पण तीं मुख्य अंगें नसून धर्मजागृती व एकी हीं उत्सवाची मुख्य अंगें आहेत व तीं दिवसें दिवस अधिक दृढ होत चाललीं आहेत, हें हा उत्सव हिंदूंना प्रिय होत चालला आहे यावरूनच नव्हे तर, मोहरमांत जसे कित्येक हिंदु लोक सामील होतात तसें या उत्सवांतही कित्येक मुसलमान लोक सामील होऊं लागले आहेत यावरूनही दिसून येईल. निजाम सारख्या मुसलमानी राज्यांतही या उत्सवास कोणत्याही प्रकारें अडथळा होत नसून कित्येक ठिकाणीं मुसलमान लोकांनीं आपण होऊन व्याख्यानें देणें, व्याख्यानाचे प्रसंगीं अध्यक्ष होणें किंवा उत्सवांतील लहानमोठीं कामें करणें, अशाही गोष्टी जर घडून येत आहेत तर उत्सव दिवसें दिवस थंडावत चालला आहे असें ह्मणण्यापेक्षां उत्सवाचीं मुळें अधिकाधिक खोल जात चाललीं आहेत असें ह्मटलें पाहिजे. आतां अशा प्रकारच्या गोष्टी दिवसें दिवस अधिक होऊन राष्ट्रैक्य व धर्मजागृति यांचें बीज लोकांत अधिक रुजलें पाहिजे ही गोष्ट खरी आहे. पण अनेक धर्म, अनेक जाती व अनेक भाषा असणाऱ्या हिंदुस्थानच्या अफाट लोकांत हें बी रुजण्यास कालावधी व प्रचंड प्रयत्न पाहिजेत ही गोष्ट लक्षांत आणली ह्मणजे हल्लींची सुरवात ही योग्य दिशेची सुरवात असून ती राष्ट्रीय पायावर आहे हें कोणासही नाकारतां

यावयाचें नाहीं. उत्सवास कायमचें स्वरूप यावें व त्याची भरभराट व्हावी ह्मणून पुण्यांतील आगरवाले किंवा भाऊराव रंगारी यांच्या सारख्या मध्यम वर्गांतील लोकांनींही आपल्या इस्टेटीचा कांहीं भाग कायमचें उत्पन्न ह्मणून या उत्सवाकडे आपखुषीनें द्यावा या गोष्टीवरून उत्सवाचें महत्व लोकांच्या मनांत दिवसें दिवस किती बिंबत चाललें आहे व त्याकरितां ते किती झीज सोसण्यास तयार झाले आहेत याचीही साक्ष पटते. ह्या उत्सवाचा पाया अशा प्रकारानें चुनेगच्चींत बसवून बळकट करण्यास टिळक यांस अनेक सुशिक्षित देशाभिमानी गृहस्थांनीं आपापल्यांतील मतभेद व दुही विसरून जाऊन मदत केली पाहिजे व तशी गोष्ट ज्या वेळी होईल तोच महाराष्ट्राच्या भाग्योदयाचा पहिला दिवस ह्मटला पाहिजे; व असा दिवस यावा अशी इच्छा करण्यांतही पुण्य आहे; व आपल्या हयगयीनें, निष्काळजीपणानें, पक्षाभिमानें, हट्टाने किंवा द्वेषानें असा दिवस न आणण्याची किंवा तो लांबणीवर टाकण्याची इच्छा करणें यांत पातक आहे हें येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं.

गणेशोत्सवाचा मुख्य हेतु धर्मजागृति हा असल्यामुळें परिस्थितीस योग्य अशा रीतीची धर्मचर्चा व योग्यतेनुरूप धर्मकार्याची चळवळ या दोन गोष्टी सुरू झाल्या आहेत. नव्या तऱ्हेनें शिकलेल्या लोकांत हिंदुधर्माविषयीं आस्था उत्पन्न होऊन धार्मिक विषयांचा ते खल करूं लागले आहेत, ही गोष्ट मुंबई व पुणें येथील गणेशोत्सवांतील कार्यक्रमावरूनच नव्हे तर इतर ठिकाणच्या उत्सवांतील कार्यक्रमावरूनही दिसून येईल. रा. रा. देशमूख, जिन्सीवाले, गजानन भास्कर वैद्य, महादेव राजाराम बोडस, श्रीकृष्ण नीलकंठ चाफेकर, गोपाळ कृष्ण देवधर, वामन रामचंद्र जोशी, डॉ. गर्दे, प्रो. भानू, काळकर्ते शिवराम महादेव परांजपे, वे. रा. रा. शंकर दाजी शास्त्री पदे, काशिनाथ वामन लेले, रा. ब. चिंतामणराव वैद्य, का. ब. पेंडसे, वगैरे सारख्या गृहस्थांचीं व्याख्यानेंच या गोष्टीची साक्ष देतील. खुद्द टिळक यांनाही 'हिंदुधर्माचीं लक्षणें,' 'गजाननाचें वैदिक व पौराणिक काळाचें स्वरूप,'* 'मृत्यूनंतर आत्म्याचा मार्ग,'† 'देह

* हा १९०३ सालीं पुण्यास दिलेल्या व्याख्यानाचा विषय असून तें व्याख्यान कोठेंच प्रसिद्ध झालेलें नाहीं.

† हेंही व्याख्यान वरील प्रमाणेंच कोठें प्रसिद्ध झालें नाहीं. पण या विषयावर

आणि आत्मा,' 'सैतानाचें साम्राज्य'* इत्यादि विषयांवर व्याख्यानें देण्याची किंवा कांहीं प्रसंगीं एक दोन ठिकाणीं गीतेवर पुराण सांगण्याची प्रवृत्ती होऊन त्यांत त्यांनीं धर्मविचारांची दिशा लोकांस दाखवून दिली आहे. हा उत्सव हेंच एक धर्मविषयाच्या चर्चेचें स्थान नसून मुंबईत किंवा इतर ठिकाणीं धर्मालयाचीं पुराणें, गीता-पाठशाला, सनातनधर्म-नीति-शिक्षण-प्रवर्तक मंडळी, सनातन आर्यधर्मतत्वप्रसारक मंडळी वगैरे सारख्या ज्या अनेक संस्था निघाल्या आहेत तेंही या धर्मजागृतीचेंच फळ होय असें ह्मटलें पाहिजे. फार काय, गणेशोत्सवानेंच नामदेवासारख्या पूर्वीच्या साधुसंताचे व शंकराचार्यासारख्या धर्मसंस्थापकांचे उत्सव नव्या नव्या ठिकाणीं करण्याची प्रवृत्ती होऊन त्यांतून धर्मविषयाची चर्चा अलीकडच्या पद्धतीनें होऊं लागली आहे. नव्या लोकांप्रमाणेच जुन्या शास्त्रीपंडितांनाही या उत्सवांतून व्याख्यानें, पुराणें किंवा कीर्तनें करण्याची प्रवृत्ती झाली असून त्यांचें वळणही परिस्थितीस अनुरूप असेंच बदलत चाललें आहे ही गोष्ट वे. रा. पारखीशास्त्री, गाडगीळशास्त्री, विनायकशास्त्री अभ्यंकर, ह. प. रामभाऊ दांडेकर, पांडुरंग सखाराम लोढे, भिंगारकर बोवा वगैरे गृहस्थांच्या पुराणांवरून व कीर्तनांवरून कळून येईल. याखेरीज इतर वेळींही ठिकठिकाणीं जी धर्मचर्चा चालते, उदाहरणार्थ, वे. रा. रा. रामचंद्र गोविंद कान्हेरे बोवा यांचें गीताव्याख्यान, हंसस्वरूप किंवा स्वामी विवेकानंदांच्या शिष्यांचीं पुण्यांतील व्याख्यानें, नारायणस्वामी यांचीं १९०६ सालीं सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत झालेलीं व्याख्यानें, महात्मा अगम्य गुरू व त्यांची शिष्या स्टॅनर्ड बाई यांचीं व्याख्यानें व सभाषणें, कृष्णानंद सरस्वतींचें १९०६ सालांतील आनंदाश्रमांत भगवद्गीतेवर झालेलें व्याख्यान,—तीही कोणत्या दिशेनें चालते याचा सूक्ष्म रीतीनें विचार केला ह्मणजे नुसत्या उत्सवांतच दहापांच दिवस धर्मविषयावर चर्चा होत नसून वर्षातील अनेक महत्वाच्या

---

मायावती येथें प्रसिद्ध होणाऱ्या 'प्रबुद्ध भारत' नामक मासिक पुस्तकाच्या सप्टेंबर १९०४ च्या अंकांत एक इंग्रजी लेख त्यांनीं प्रसिद्ध केला आहे तो वाचला असतां त्यांच्या या व्याख्यानाचें स्वल्प वाचकांच्या ध्यानांत येईल.

* हें व्याख्यानही कोठें प्रसिद्ध झालें नाहीं. तथापि, त्याचा सारांश माझ्या स्मरण-वहीवरून पुढें तिसऱ्या भागांत 'वक्तृत्व' या सदराखालीं दिला आहे.

प्रसंगींही ती होत असते हें कोणाच्याही लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. सारांश, नव्या जुन्या लोकांचें संमेलन होऊन धर्मजागृती करण्यास हा उत्सव पुष्कळ अंशीं कारणीभूत झाला आहे ही गोष्ट कोणासही नाकारतां यावयाची नाहीं. आतां धर्मजागृतीस मेळे, मिरवणुकीसारख्या गोष्टींची काय आवश्यकता आहे असा कोणी प्रश्न करील तर त्यास एवढेंच उत्तर आहे कीं, अज्ञ लोकांना अशा गोष्टी अवश्य कळल्या पाहिजेत. निराकार ईश्वराचें स्वरूप ध्यानांत येण्यापूर्वी साकार ईश्वराच्या स्वरूपाची जशी आवश्यकता आहे तसेंच धर्मसंबंधीं सूक्ष्म विचारांस लागण्यापूर्वी तत्संबंधीं स्थूल गोष्टी सामान्य जनापुढें आल्या पाहिजेत; व ह्मणून मेळे व मिरवणुकीसारख्या बाह्यांगांचीही अत्यंत आवश्यकता आहे. यासंबंधानें बोलत असतां टिळक एकदां असें ह्मणाले कीं, "धर्मसंबंधीं विचार किंवा ईश्वराची भक्ति ही एकांतांत बसून केली तरी चालते. पण सामान्य जनाच्या जागृतीकरितां थाटमाट किंवा समारंभ ( Demonstration ) अवश्य पाहिजे." असो; वरील विवेचनावरून गणेशोत्सव हें धर्मजागृतीचें स्थान असून राष्ट्रैक्य व सामाजिक उन्नति करण्यास तें अत्यंत उपयोगी आहे हें कोणाच्याही लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. टिळक यांनी आपल्या हातानें ज्या संस्था स्थापन केल्या आहेत, व स्वतः पुढाकार घेतल्यानें ज्या थोडक्याच कालांत लोकांना प्रिय होऊन त्यांचीं फलें पाहावयास मिळाली आहेत त्यांपैकीं ही मुख्य असून या उत्सवाची परंपरा अशीच जोमानें पुढें चालू राहिल्यास आमच्या राष्ट्राच्या इतिहासांत तो महत्वाची क्रांति केल्याखेरीज कधींहि राहणार नाहीं.

## भागवतधर्मानें पंगूपणा आणला काय ?

ज्ञानेश्वरादि साधुसंतांनीं प्रचलित केलेल्या भागवतधर्मानें महाराष्ट्र पंगू बनलें व पुढें रामदासांनी जेव्हां महाराष्ट्रधर्म स्थापन केला तेव्हां राष्ट्र उदयास आलें असा जो रा. रा. राजवाडे यांनीं कांहीं दिवसांपूर्वी एक मुद्दा पुढें आणला होता* त्यांत कांहीं अर्थ नाहीं असें टिळक यांचें ह्मणणें

* या मुद्याचें स्वरूप लक्षांत यावें ह्मणून रा. रा. राजवाडे यांनीं 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें,' ( खंड चवथा पान ११६ पाहा ) यांत जें विवरण केलें आहे त्यांतील एक उतारा येथें देतों:—

" संत ह्मटला ह्मणजे अत्यंत पंगूपणाचा केवळ मूर्तिमंत पुतळाच होय. संताला

असून १९०४ सालांत पुण्यास सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत रा. रा. ल. रा. पांगारकर यांनीं ' तुकाराम व रामदास ' या विषयावर व्याख्यान दिलें असतां अध्यक्ष या नात्यानें त्यांनीं त्यासंबंधानें आपलें मतही प्रदर्शित केलें आहे. त्यांच्या ह्मणण्याचा मथितार्थ असा आहे कीं,:—

" भागवत धर्म कांहीं आजकालचा नाहीं. नारद-पांचरात्र, भागवत, इत्यादि ग्रंथांत तो सांगितला आहे. हा धर्म कोणास पंगू करीत नाही. तसेंच भगवद्गीता ह्मही भागवत धर्माचा मुख्य ग्रंथ असून त्यांत सुद्धां अर्जुनास मोह उत्पन्न होऊन तो पंगू झाला असतां श्रीकृष्णानें उपदेश करून त्याच्याठायीं कर्तव्यजागृती उत्पन्न केली. गीतेच्या धर्माकडे जो ज्या रीतीनें लक्ष पुरवील त्याला त्याप्रमाणें फल मिळेल. ' ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् ' असें प्रत्यक्ष भगवंतांनींच सांगितलें आहे. ' मऊ मेणाहूनी आह्मी विष्णुदास, कठिण वज्रास भेदूं ऐसे ' अशी तुकारामाचीही उक्ती नाहीं काय ? आतां ऐहिक सुखाची निवृत्ति होऊन परमार्थाकडे लय लागलेल्या साधुसंतांची प्रत्यक्ष कृति जरी आपल्या नजरेस येत नाही तरी त्यांचें

---

खाणें नको, पिणें नको, वस्त्र नको, प्रावरण नको, कांहीं नको; एक विठोबा मिळाला ह्मणजे सर्व कांहीं मिळालें. ऐहिक सुखदुःखें, ऐहिक उपभोग, ऐहिक व्यवहार ह्यांच्यांत मन घालणें संताचें काम नव्हे. इहलोक हा संताचा नव्हेच. राजा कोणी असो, सारा कोणी घेवो, संताला त्याचें कांहीं नाहीं. असल्या या संतमंडळीच्या हातीं विचाराची दिशा जाऊन, महाराष्ट्र तीन शतकें पंगू बनून राहिलें. सनातन धर्माला त्रासून महाराष्ट्रांतील लोकांनी जी धर्मक्रांती केली तिचें स्वरूप हें असें होतें. ह्या धर्मक्रांतीनें धर्मोन्नति व राष्ट्रोन्नति होण्याचें एकीकडेच राहून उलटी धर्मावनति व राष्ट्रावनति मात्र झाली. कालांतरानें यवनांच्या अमलाखालीं पायमल्ली झालेली पाहून मराठ्यांचे डोळे उघडले, ह्या पंगू संताळ्यांचा त्यांना वीट आला, आणि सनातन धर्माकडे, गोब्राह्मणप्रतिपालनाकडे व चातुर्वर्ण्याकडे त्यांनीं पुन्हां धांव घेतली. ह्या उपरतीच्या वेळीं, रामदासस्वामी, रंगनाथस्वामी, मोरयादेव वगैरे सनातनधर्माभिमानी विचारी साधु पुरुष उत्पन्न झाले व महाराष्ट्रास महाराष्ट्र-धर्माचा उपदेश करते झाले. ह्या सनातनधर्माभिमानी साधुपुरुषांच्या वेळी संताळे आपला संथ मार्ग आक्रमितच होते. परंतु इहलोकींचे अर्थ साधण्यास संताळ्याचा उपयोग कांहीं नाहीं हें तुकाराम पूर्णपणें जाणून होता. शिवाजी तुकारामाकडे उपदेश घेण्याकरितां गेला असतां त्या प्रामाणिक साधूनें आपल्या सारख्या पंगू माणसाकडे न येतां समर्थाकडे जाण्यास शिवाजीस उपदेश केला. संताळ्यांतील पंगुत्वाला उपदेशूनच समर्थ हें नांव अस्तित्वांत आलें हें लक्षांत घेतलें असतां तुकारामाच्या उपदेशाचें महत्व व त्यानें स्वतः स्वीकारलेल्या पंथाचें लघुत्व कळून येईल."

अस्तित्व हीच एक मोठी जागृती आहे. त्यांची निरपेक्षता, त्यांचा स्वार्थत्याग, त्यांचे दयालुत्व इत्यादि गोष्टीच इतर मनुष्याचे ठिकाणीं स्वधर्म व स्वकर्म आचरण्याची प्रवृत्ती करतात. रामदासांनीं जें कार्य केलें त्याला ज्ञानदेवादि पूर्वीच्या संतांचाच पाठिंबा होता ही गोष्ट विसरतां कामा नये."

## वेदांत व व्यवहार.

वेदांत मनुष्याला पंगू किंवा निरुत्साही करीत नसून त्याचा योग्य रीतीनें उपयोग केला तर व्यवहारांत त्याचें फार महत्व आहे; मात्र योजक चांगला पाहिजे व त्यानें योग्य वेळीं त्याचा उपयोग केला पाहिजे. वेदांतांत जर नीतीच्या व धर्माच्या सिद्धांताचा अंतर्भाव होतो व व्यवहारांत धर्माला आणि नीतीला जर मान आहे तर वेदांत व्यवहारोपयोगीं नाहीं असें ह्मणण्यापेक्षां तो व्यवहारोपयोगी करणारा मनुष्य नाहीं असेंच ह्मटलें पाहिजे असें त्यांचें मत आहे; व हें मत स्पेन्सरसाहेबांवरील मृत्युलेखांत त्यांनीं एके ठिकाणीं असें स्पष्ट नमूद करून ठेविलें आहे:—

" नीतितत्वांचें उदात्त स्वरूप उत्क्रांतितत्वाच्या साहाय्यानें सिद्ध करण्याचें श्रेय स्पेन्सर साहेबांनींच संपादिलें आहे, इतकेंच नव्हे तर वेदांती लोकांप्रमाणें आत्म्यास अमुक एक प्रकारची शुद्धावस्था प्राप्त झाली असतां तो मुक्त होतो, इतर गोष्टींची आह्मांस जरूर नाहीं असें ह्मणणाऱ्यांपैकीं स्पेन्सर साहेब नव्हते. तसेंच जीवाच्या कर्तव्याची सीमा परोपकार आहे असें सांगून ते स्वस्थ बसले नाहींत. अगदी रानटी स्थितीपासून मनुष्याची सामाजिक स्थिति सुधारतां सुधारतां उत्क्रांति-तत्वानें हल्लींचा समाज कसा बनला गेला याचेंही त्यांनीं एक स्वतंत्र शास्त्र बनविलें आहे; व प्रत्येक मनुष्याचें, समाजाचें, राजाचें आणि प्रजेचें कर्तव्य काय, आणि त्याच्या अभिवृद्धीची दिशा कोणती, अथवा या प्रश्नांचा विचार कोणत्या दिशेनें केला पाहिजे या बाबतींत शास्त्रीय ग्रंथ लिहून त्यांनीं अशा प्रकारच्या प्रश्नांचा विचार करणाऱ्या लोकांस एक प्रकारचा कायमचा मार्ग दाखविला आहे. फार लांब कशाला ? शिक्षणावर जो त्यांचा निबंध आहे व ज्याचें आज दहा पंधरा भाषांत भाषांतर झालें आहे तोच घेतला तरी व्यावहारिक गोष्टींस तत्वज्ञाच्या हातांत किती उदात्त स्वरूप प्राप्त होतें व त्यापासून समाजास किती फायदा होतो याची वाचकांस कल्पना येईल. वेदांतांतील किंवा सांख्यांचें तत्वज्ञान अशा रीतीनें व्यवहारोपयोगी करण्याचा आमच्यामध्यें पूर्वी कधींच प्रयत्न झालेला नव्हता. नाहीं ह्मणावयास भगवद्गीता हाच कायतो अपवाद आहे; पण वेदांत्यांच्या हातांत या अपूर्व व्यवहारोपयोगी तत्वज्ञानात्मक ग्रंथाची बरीच दुर्दशा झालेली आहे. स्पेन्सर साहेबांच्या ग्रंथापासून जर कांहीं नवे वळण आपणास घ्यावयाचें असेल तर तें हेंच होय कीं, सृष्टीच्या बुडाशीं जी

कांहीं अगम्य तत्वें आहेत त्यांचा विचार करून तत्ववेत्यांनीं आपणास मुक्ति मिळाली ह्मणून उगीच बसावयाचें नाहीं. या गूढ तत्वांचा विचार करणें तत्वज्ञाचें जितकें कर्तव्य आहे तितकेंच हीं तत्वें व्यवहारास कशीं लावावीं हें जगाच्या नजरेस आणून देऊन मानव जातीची पूर्णावस्था कशी संपादावी ह्याचा त्यास बोध करणें हेंही त्यांचें काम होय."

## ब्राह्मणधर्माचें साम्राज्य.

श्रेष्ठ धर्मविचार व तत्वज्ञान शिकविण्याचा अधिकार हिंदुस्थानाचा असून त्यांवर कोणाचीही राजकीय सत्ता चालत नाहीं; उलट राजकीय सत्तेवरच ती अंमल गाजवितात. सध्यां आमच्या धार्मिक तत्वांचें जे साम्राज्य वाढत चाललें आहे त्यावरून ही गोष्ट कोणाच्याही लक्षांत येईल. पाश्चात्य देशांत या तत्वज्ञानाचें अध्ययन चालले आहे व तिकडील लोकांच्या व्यवहारावर व वागणुकीवर त्याचा परिणाम घडूं लागला आहे. तें तत्वज्ञान आधारभूत धरून तिकडे नवे नवे पंथ सुरू होत आहेत व त्यांचा इकडे प्रसार होत आहे. वास्तविक या तत्वांचा प्रसार करणें आमचें कर्तव्य आहे व हें कर्तव्य नव्या पद्धतीनें शिकलेल्या लोकांनीच केलें पाहिजे असें टिळक यांचें मत आहे. पुण्याच्या १९०३ सालांतील गणेशोत्सवांत 'ब्राह्मण धर्माचें साम्राज्य' या विषयावर रा. रा. गजानन भास्कर वैद्य यांचें व्याख्यान झालें त्या वेळीं अध्यक्ष या नात्यानें टिळक यांनी पुढील मत प्रगट केलें:—

"सांप्रत युरोपियन राष्ट्रें आमच्यावर राज्य करोत, परंतु सर्वांना श्रेष्ठ प्रकारचे धर्मविचार व तत्वज्ञान शिकविण्याचा आशिया खंडाला व विशेषतः हिंदुस्थानाला उपजत अधिकार आहे, ही गोष्ट कोणाला नाकबूल करतां यावयाची नाहीं. रोमन लोकांनीं ग्रीक लोकांस जिंकलें परंतु ग्रीक तत्वज्ञानाचा त्यांवर पगडा बसून त्यांच्या जेतेपणाला कसा कमीपणा आला, हें इतिहासावरून उघड कळणारें आहे. स्वामी विवेकानंदांची जी मान्यता झाली व त्यांचे पाश्चिमात्य देशांत जे अनेक अनुयायी झाले त्यावरून आपल्या धर्मविचारांची योग्यता उघड ठरत आहे. आजच्या मन्वंतरांत धर्मकार्याची जबाबदारी शास्त्रीमंडळावर नसून ते काम आमच्या नव्याच मंडळीनें अंगावर घेतलें पाहिजे, असें माझें मत आहे. आज अनेक बाजूंनीं ज्ञानप्रसार होत असतां त्याचें अध्ययन ज्यांनीं केलें नाहीं, अशा जुन्या लोकांवर जर नवे लोक भिस्त टाकतील तर तो त्यांचा मित्रेपणा होईल. तत्वज्ञानाची योग्यताच अशी आहे कीं, त्यावर राजकीय सत्ता चालूं शकणार नाहीं, उलट तें मात्र आपला अंमल सर्वत्र

बसवील. हत्ती एवढा मोठा तरी त्याला ज्ञानानें मनुष्यानें कह्यांत ठेविलें आहे. ज्ञान हें तीक्ष्ण व शक्तिमान असून त्याला दुसऱ्याच्या साहाय्याची अपेक्षा नाहीं. सत्य कोणतें? तर सत् ह्मणजे जें टिकेल ते-जे चिरकाल राहील तें. ब्राह्मण-धर्माचे सिद्धांत जर सत्य असतील तर ते कोणत्या तरी रूपानें कायमच रहातील. मात्र प्रश्न इतकाच की, ब्राह्मण-धर्माचा अंमल तुह्मी बसवणार किंवा असेच मरून जाणार? संकटसमयीं ज्यानें मदत केली असा स्नेही जो आपला धर्म त्याला आपण तसाच टाकूं तर राष्ट्राला व सर्व लोकांना केवढें लांछन येईल, ह्याचा आपणच विचार करावा. ह्या दृष्टीनें व्याख्यात्यांनीं आपणापुढें आज हा विषय मांडला आहे व तो फार विचार करण्यासारखा आहे. राज्य कोणतेंही असलें तरी धर्मकार्य केलेंच पाहिजे. शाक्य मुनीनें उत्तर हिंदुस्थानांत एके काळीं दोन हजार भिक्षु तयार केले होते व त्यांनी आर्य तत्वज्ञानाचें सर्वत्र पुनरुज्जीवन केलें. जपानांत आज मितीलाही सर्व कार्यांच्या आरंभीं गणपतीसारख्याच शोडन (शुंडिन्) देवतेचें पूजन होत असतें, हा ब्राह्मण धर्माच्याच प्रसाराचा परिणाम होय. बुद्धाचे अनुयायी हे आपलेच धर्मबंधु आहेत व धर्माच्या कामीं तरी त्याचें व आपलें एकमत होण्यास कोणतीही अडचण नाहीं. अशा विचारानें जर समजूत करून कांहीं काम करूं तर निदान आशियाखंडांतील शंभर कोट लोक तरी ब्राह्मण धर्माच्या छत्राखालीं आणतां येतील. ब्राह्मण धर्म जर सर्वस्वी सत्य असतांही बुडाला तर त्याचें पातक कोणाला ह्याचा विचार करा."

## टिळकांचें धार्मिक आचरण.

असो; आतां टिळक यांच्या धार्मिक आचरणासंबंधानें दोन शब्द लिहून हा विषय पुरा करतों. टिळक यांच्या धार्मिक आचरणांत कर्मनिष्ठे-चा प्रकार कमी असून ज्ञाननिष्ठेचा प्रकार जास्त आहे. ह्मणजे स्नान-संध्या सोंवळेओवळे, व्रतउद्यापन, होमहवन, इत्यादि नित्यनैमित्तिक कर्मांविषयीं ते विशेष जपणारे नाहींत. असें आहे तरी धार्मिक आचार व धार्मिक संस्कार हे कांहीं उद्दिष्ट हेतूनें अस्तित्वांत आले असून त्याला परंपरा आहे, आपण ते टाकणें गैर आहे असा त्यांचा विश्वास आहे. उपनिषदादि वेदांत-ग्रंथ वाचल्यानें, निरनिराळ्या धर्मांचें व शास्त्रांचें परिशीलन केल्यानें व निरंतर तत्वविचारांत निमग्न असल्यामुळें त्यांचे ठायीं जें ज्ञान उत्पन्न झालें आहे त्याचा त्यांच्या कर्माचरणावर बराच परिणाम झाला आहे; व त्यामुळें प्रो. सेलर यांनीं रोमनतत्ववेत्ता ल्युक्रीटस

याच्यासंबंधानें ह्मटल्याप्रमाणें* एखाद्या जुन्या भाविकाला यज्ञमंडप किंवा होमहवनादि विधी पाहून जितकी पूज्यबुद्धि उत्पन्न होते तितकी यांना सृष्टीच्या गूढ तत्वाचा उलगडा झालेला पाहून होते, व धर्मगुरूबद्दल त्याला जो पूज्यभाव वाटतो तितका यांना तें गूढ सांगणाऱ्याबद्दल वाटतो. तात्पर्य, तत्वविचारांचा कर्माचरणावर परिणाम होऊन ज्ञान्याची कर्माबद्दल जशी अनास्था असते तशीच यांचीही कर्माबद्दल अनास्था दिसून येते. तथापि, धर्मावर पूर्ण श्रद्धा असल्यामुळें लोकसंग्रहाची मर्यादा ते कधींही उल्लंघून जात नाहींत; एवढेंच नव्हे तर आपण कर्माचा त्याग केला असतां जेथें समाजाचें पाऊल वांकडें पडतें किंवा आपल्या कर्माचरणानें समाजांत जास्त बळकटी येते असें दिसतें तेथें कर्माचरण योग्य रीतीनें बजावण्याविषयीं ते कधींही हयगय करीत नाहींत. सामाजिक बाबतींत ' लोकरंजना'चा किंवा ' लोकछंदानुवर्तना'चा दोष जसा कित्येक लोक यांना देतात तसाच धार्मिक वर्तनाच्या बाबतींतही यांना ते देतील यांत कांहीं संशय नाहीं. पण जुन्या लोकांत हिंदुधर्माची आस्था कायम राहण्यास व नव्या पिढींत धर्माविषयीं खरी कळकळ उत्पन्न करण्यास हल्लींच्या स्थितींत यांचें वर्तन किती कारणीभूत झालें आहे हें ज्याच्या लक्षांत येईल त्यालाच त्यांच्या वर्तनाचें रहस्य कळून येईल. अध्ययन हें धर्मविचारांचें मुख्य अंग आहे व अध्यापन आणि लोकसंग्रह हीं धर्माचीं कार्यें आहेत. हीं तीन्हीं हल्लींच्या परिस्थितींत त्यांनीं इतकीं चांगल्या रीतीनें सांभाळलीं आहेत कीं आमच्या प्राचीन धर्माच्या उन्नतीची आशा महाराष्ट्रास पुन्हां वाटूं लागली आहे.

---

* प्रो. सेलर ल्युक्रीटस संबंधानें ह्मणतातः—

" The reverence which other men felt in presence of the ceremonies of religion he feels in presence of the mystery of Nature, and to the interpreters of her meaning he ascribes a holiness claimed by the ministers of religion "

# राजकीय मतें.

## आधीं कोणतें—सामाजिक—कीं राजकीय ?

हिंदुस्थानची उन्नति कशानें होईल? या प्रश्नाचें उत्तर निरनिराळे लोक निरनिराळ्या रीतीनें देतात. कोणी ह्मणतात सामाजिक सुधारणा झाल्यानें होईल; कोणी ह्मणतात धार्मिक सुधारणेनें होईल; कोणी ह्मणतात राजकीय सुधारणेनें; आणि कोणी ह्मणतात औद्योगिक सुधारणेनें. याप्रमाणें अनेक लोक अनेक मार्ग सुचवितात. या मार्गांचा आज पंचवीस तीस वर्षे कमजास्त प्रमाणानें खल होत असून त्याबद्दल महाराष्ट्रांतील पुढाऱ्यांतही कडाक्याचे वाद झालेले आहेत. टिळक यांचें मत असें आहे कीं, "अमुक सुधारणा आधीं आणि अमुक मग, असें ह्मणत बसण्यांत कांहीं हांशील नाहीं; सर्वांचा परस्पर संबंध असून त्या एकमेकांशीं अशा रीतीनें जोडल्या आहेत कीं, त्यांपैकीं अमुक आधीं आणि अमुक मग, असा भेद करतां यावयाचा नाहीं;"* ह्मणजे सुधारणा सर्व बाजूंनीं झाली पाहिजे, असें त्यांचें ह्मणणें आहे. तथापि, देशकालस्थितीकडे पाहिलें असतां राजकीय सुधारणेचा प्रश्न हिंदुस्थानास अत्यंत महत्वाचा असून त्या बाबतींत हिंदुस्थानांतील सर्व लोकांचें ऐक्य लवकर झालें पाहिजे व हें ऐक्यच लवकर होण्याचा संभव जास्त आहे. सामाजिक व धार्मिक बाबीसंबंधानें पाहिलें तर निरनिराळ्या समाजाच्या निरनिराळ्या चालीरीती, व भिन्नभिन्न धर्मांतील लोकांच्या भिन्नभिन्न समजुती, आचार व पंथ आहेत. अशा स्थितींतही आपापल्या चालीरीतींत सुधारणा करून, स्वधर्माचा अभिमान बाळगून, दुसऱ्या जातीबद्दल व धर्माबद्दल औदार्य दाखवितां येईल व राष्ट्रीय ऐक्य करतां येईल, पण त्याला कालावधि पाहिजे. कारण, लोकांत अद्याप मुरावें तसें सुशिक्षण मुरलेलें नाहीं. पण तत्पूर्वी राजकीय अवनतीमुळें प्रत्यक्ष माध्यान्ह कालाची लोकांस पंचाईत पडली असून तिनें हिंदु, मुसलमान, पारशी, असा भेद न करतां सर्वांना एका दावणींत गोंवल्यामुळें राजकीय उन्नतीसाठीं सर्व लोकांचें ऐक्य अगोदर होण्यास कांहीं हरकत नाहीं. औद्योगिक उन्नति, शेतकीची सुधारणा,

---

* केसरी, ता. १२ जुलै १९०४ पाहा.

या गोष्टी राजकीय उन्नतीहून भिन्न आहेत असें मुळींच नाहीं. कारण, आमचे लोकांजवळ भांडवल, कौशल्य व हिंमत हीं असलीं तरी सरकारचें लक्ष आपल्या देशांतील जातभाई व्यापाऱ्यांच्या उत्कर्षाकडे जास्त असल्यामुळें आमच्या व्यापारास उत्तेजन मिळत नाहीं, एवढेंच नव्हे तर, दिवसेंदिवस उद्योगधंद्याच्या पाठीमागें कायदेकानूचे दुट्टे जास्त लागत चालल्यामुळें त्यांचीं हाडें पिचत चाललीं आहेत. शेतकी तर जबर साऱ्यामुळेंच बुडाली असून शेतकऱ्याचें दारिद्र्य हा सरकारी राजकीय धोरणाचाच परिणाम आहे ही गोष्ट आतां जगजाहीर झाली आहे. राजकीय अवनति जास्त जास्त होत गेल्यास दुसऱ्या बाजूने वर डोकें निवण्याची आशा कठिण आहे. हिंदुस्थानांतील हरएक चळवळीचा संबंध राजकीय प्रश्नाशीं येत असल्यामुळे व उत्तरोत्तर तो अधिकाधिक बळावत जाण्याचीं चिन्हें दिसत असल्यामुळें राजकीय उन्नतीची महत्वाकांक्षा सर्व लोकांत उत्पन्न झाली पाहिजे; व ही महत्वाकांक्षा जितकी जितकी दृढ होत जाईल तितका तितका उन्नतीचा काल जवळ येत जाईल असे टिळक यांना वाटतें; व वर्तमानपत्रांतून आणि भाषणांतून आज कित्येक वर्षे ते याच मताचें विशेष प्रतिपादन करीत आहेत, किंबहुना या मताच्या प्रसारार्थच त्यांनीं आपलें आयुष्य वाहिलें आहे असें ह्मटलें तरी चालेल.*

---

* हेंच मत हिंदुस्थानांतील ठिकठिकाणच्या प्रमुख पुढाऱ्याचें आहे याविषयीं हवे तितके दाखले देतां येतील. तथापि, विस्तार होईल ह्मणून तसें न करतां सामाजिक-सुधारणा–वादी एक दोन वजनदार पत्रांचीच मते येथें देतों.

राजकीय उन्नतीची महत्वाकांक्षा धरल्यानें आमच्या राष्ट्रीयत्वाचा पाया कसा भरभक्कम होतो याचें 'मद्रास स्टँडर्ड' नामक इंग्रजी दैनिक पत्राने 'आधीं कोणतें ?' या मथळ्याखालीं ता. २३ जून १९०४ च्या अंकांतील अग्रलेखांत येणेंप्रमाणें विवेचन केलें आहे:—

"Political agitation brings together a large mass of people on a common platform. It imbues them with common ideas and common aspirations. It infuses into them a spirit of co-operation and fellowship. It makes them feel as brethren, born together and bound to work together. It creates sympathy, confidence and trust in a manner that cannot be mistaken. It unites them all and nerves them with all the strength of union. People coming from various parts of the country, people professing

different beliefs, and people having different ways and manners, all meet together and exemplify a great unification of a vast variety of thought and conviction. Is this not also social reform? Is this not laying the foundation of social reform ? Is not this union of so many classes of people the first step in social reform ? Social differences and provincial distinctions will always exist. If our critics mean by social reform that India should become one nation, professing one faith, speaking one language, and following one ideal in every respect they are mistaken. Speaking for the present, we cannot undertake to say whether it will be even desirable. The ingredients that may go to build up our nationality must be sought elsewhere than in common faith and common language. *Our nationality can be broad-based only on political aspirations.* Political agitation alone can brin us together. For what has the Mahomedan and the Hindu in common, the Parsee and the Rajput, the Sikh and the Pariah ? They have the same grievances. They are under the same Government. They have to represent their grievances to one and the same anthority. What rules and regulations and restrictions that affect one class of people affect other classes of people also. It may not be in the same degree. One community may receive more favour; but that makes no distinction. All suffer or enjoy together. And it is scarcely a surprise that the feeling is growing in the minds of the people that all should work together. Herein lies the germ of nationality and the begining of national vitality What accidental and occasional favours that may be shown to one particular class of people can never be of a permanent character. The people have begun to realise that. And to-day it has taken a visible shape."

'राष्ट्रीयत्वाच्या पायावर सामाजिक सुधारणा झाली पाहिजे' या मताचा प्रसार करणारें मद्रासचें 'इंडियन प्रोग्रेस' पत्र (ता. १५ जुलई १९०५) ह्मणतें—

"What will be the bond that will link together the various races of this country speaking different religions ? Love of the land of their birth, the memory of their having worked together in the making of her history-and not an inglorious one-and the necessity of their working together to make her future glorious; in short, common memories, common hopes and common interests. Neitger the adoption of common habits and modes of living, nor the acceptance of a ready-made electic religion, nor the introduction of a common language is necessary for the growth of an Indian nationality."

## उन्नति करण्यापूर्वी अवनतीचें ज्ञान पाहिजे.

आतां राजकीय उन्नति ह्मणजे काय, ती कशी झाली पाहिजे, तिला कोणकोणते अडथळे येतात, व लोकांनीं काय केलें पाहिजे, याविषयीं टिळक यांचीं मतें क्रमाक्रमानें येथें देतों. राजकीय उन्नतीची बरोबर कल्पना येण्यास प्रथमतः राजकीय अवनतीचें चित्र रेखाटणें जरूर आहे. हें चित्र केसरीपत्रांत अनेक ठिकाणीं अनेक रीतींनीं त्यांनीं रेखाटलें आहे, किंबहुना केसरी पत्र ह्मणजे आमचीं राजकीय अवनति किती झाली आहे हें दाखविणारा मोठा थोरला आदर्शच आहे असें ह्मटलें तरी चालेल. हा आदर्श आज सर्वांपुढें असल्यामुळें राजकीय अवनतीचें विस्तृत चित्र येथें रेखाटण्याचें प्रयोजन नाहीं. फक्त अवनतीची सामान्य कल्पना यावी या हेतूनें कांहीं विषयांवरील थोडक्यांत ग्रथित केलेले विचार त्यांच्याच शब्दांनीं येथें देतों.

हिंदुस्थानच्या **दारिद्र्या**संबंधानें ते ह्मणतातः—

"दोनशें वर्षांपूर्वी ज्या वेळेस इंग्लिश, डच, फ्रेंच, पोर्तुगीज वगैरे पश्चिमेकडील लोकांनीं सुवर्णभूमीची आख्या ऐकून आमच्याकडे धांव घेतली तेव्हां हिंदुस्थानच्या संपत्तीबद्दल पश्चिमेकडील लोकांची जी समजूत झाली होती तींत व हल्लीच्या वस्तुस्थितींत जमीनअस्मानाचें अंतर पडले आहे. आमच्या देशास सुवर्णभूमि हें नांव राहिलेलें आहे; पण 'नांव सोनूबाई आणि हातीं कथलाचा वाळा' अशी आतां स्थिति येऊन ठेपली आहे. डिग्बीसाहेबांनीं आपल्या बुकाच्या पाठीवर बुकाचें सोनेरी अक्षरानें जेथें नांव घातलें आहे त्या खालींच सोनेरी अक्षरांनीं हिंदुस्थानचे १८५० सालीं दर माणसीं रोजचें उत्पन्न २ पेन्स किंवा हल्लींच्या हुंडीच्या भावाप्रमाणें दोन आणे; १८८० सालीं १॥ पेन्स किंवा १॥ आणा; आणि १९०० सालीं  पेन्स किंवा ८।॥. आणा होतें असें लिहिलें आहे; व त्याच्या पुष्टीकरणार्थ सरकारी रिपोर्टांतील उतारे घेऊन केवळ सरकारी कागदपत्रांवरूनच हें ह्मणणें सिद्ध करून दाखविलें आहे. कोणत्याही देशांतील लोक समृद्ध आहेत कीं नाहींत हें पाहणें असल्यास त्या देशांतील अगदीं हलक्या प्रतीच्या लोकांस कोणतें अन्नवस्त्र व राहण्याची जागा असते हें पाहिलें पाहिजे. दक्षिणेंतील गरीब कुणब्यास पोटास दरसाल निदान १८ शिलिंग ह्मणजे सुमारें १४ रुपये लागतात असा स्पेन्ससाहेबांचा अदमास आहे; व प्राप्तीचें मान पाहिलें तर त्याहीपेक्षां कमी. तुरुंगांत कैद्यास पोटास दरसाल दरमाणसीं २० रुपये तरी लागतात. या मानानें पाहिलें तर हिंदुस्थानांतील शेतकरी लोकांस तुरुंगांतील कैद्याइतकेंही अन्न मिळत नाहीं, असें उघड उघड सिद्ध होतें. अशा स्थितींत लो-

कांनीं खावें काय, उमेद कोणती बाळगावी आणि वस्त्रप्रावरण तरी कोणतें घ्यावें? या लोकांची खरोखर स्थिति ह्मटली ह्मणजे एका कवीनें वर्णन केल्याप्रमाणें "रात्रौ जानुर्दिवा भानुः कृशानुः संध्ययोरपि ॥ इत्थंशीतं मया नीतं जानुभानुकृशानुभिः ॥" अशा प्रकारची आहे."

—केसरी, ता. १४।१।०२.

शेतकीसंबंधानें ते लिहितातः—

"हिंदुस्थानांतील लोकांचा मुख्य धंदा शेतकी होय; व शेतीच्या उत्पन्नांत गेल्या २० वर्षांत थोडीशी वाढ झालेली आहे हें खरे आहे. पण इतर उद्योगधंदे बुडाल्यामुळें शेतीवर उदरनिर्वाह करणारांची संख्याही उत्तरोत्तर वाढत चालली आहे. उदाहरणार्थ, सन १८९० सालीं शेतकऱ्यांची संख्या सुमारें शेकडा ७० होती ती आतां ८५ झाली आहे. खेरीज चहा, बुंद, कोको वगैरे इंग्लंडांतील किंवा युरोपांतील बाजारांत खपणारे जे नवीन जिन्नस हिंदुस्थानांत उत्पन्न होऊं लागले आहेत त्या सर्वांची लागवड युरोपियन लोकांच्याच हातांत असल्यामुळे त्यांचा नफाही त्याच लोकांस मिळत आहे. सारांश, शेतकीचें उत्पन्न जरी वाढलें असलें तरी त्यापासून आमच्या लोकांस कांहीं फायदा झालेला नाहीं. गेल्या २० वर्षांतील रेलवेची वाढ पाहिली तर ती ९००० मैलांपासून २७००० मैलांपर्यंत झालेली आहे; व त्याकरितां जवळ जवळ ४५० कोट रुपये खर्च झालेला आहे! पण त्याच्या तृतीयांश देखील पाटबंधाऱ्यांवर किंवा कालव्यांवर खर्च झालेले नाहींत. शेतकऱ्यांच्या स्थितीचा विचार करावयाचा असेल तेव्हां दुसऱ्याही एक दोन गोष्टींचा विचार केला पाहिजे. त्यांपैकीं पहिली जंगलखातें ही होय. हें खातें गेल्या २० वर्षांतच विशेषेकरून उदयास आले असें ह्मटलें पाहिजे. सन १८७७।७८ सालीं या खात्याचें उत्पन्न सुमारें ६॥ लक्ष पौंड होतें तें सन १८९७।९८ सालीं सुमारें १२॥ लक्ष पौंड ह्मणजे जवळ जवळ दुप्पट झालें. याखेरीज मीठ व अबकारीखात्याची सक्तीही आमच्या शेतकऱ्यांस जंगलखात्याप्रमाणेंच भोगावी लागते. या सर्व गोष्टींचा विचार केला ह्मणजे गेल्या २० वर्षांत हिंदुस्थानाची शेती सुधारली असे ह्मणण्यापेक्षां हिंदुस्थानच्या लोकांच्या दृष्टीनें ती खालावत चालली असेंच ह्मणणे भाग येतें."

—केसरी, ता. १८।३।०२.

*  *  *  *

"प्राचीन काळीं प्रत्येक खेडेगांव ह्मणजे एक लहानशी स्थानिक स्वराज्याची संस्थाच होती ही गोष्ट हिंदुस्थानच्या इतिहासांत नमूद आहे. शेतकीस लागणारे सुतारलोहारांचे धंदे किंवा खेडेगांवांतील लोकांच्या संसारास अवश्य असे तेली, वाणी, कुंभार वगैरे बलुतदार प्रत्येक गांवांत असून त्यांचा निर्वाह गांवच्या शेतकीच्या उत्पन्नावर होत असे. किंबहुना प्रत्येक खेडेगांव ह्मणजे मोठ्या शहराची एक लहानशी प्रतिमाच असून खेड्यांतील लोकांचा सर्व निर्वाह तेवढ्यावर भागत असे; आणि खेड्यांतील

वर सांगितलेले कारागीर किंवा उदमी आणि शेतकरी हे एकमेकांचें सहाय्यकारित्व जाणून परस्पर मिलाफानें आणि सलोख्यानें वागत असत. ही ग्रामव्यवस्था इंग्रजी राज्याच्या सुधारलेल्या राज्यव्यवस्थेनें अजिबात मोडून टाकली; आणि त्याबरोबरच शेतकरी लोकांच्या अंगांत जो एक प्रकारचा परस्परसहाय्यकारित्वाचा किंवा स्वावलंबनाचा गुण परंपरेनें आलेला होता तोही नाहींसा होऊन नवीन राज्यव्यवस्थेच्या नांगराखालीं पूर्वीच्या ग्रामसंस्थेचीं सर्व बीजें चिरडून नष्ट झालीं."

—केसरी, ता. १७।११।०३.

**व्यापार** व **उद्योगधंद्या**संबंधानें ते ह्मणतात:—

"हिंदुस्थानांत परदेशी माल येण्याचे मान गेल्या २० वर्षांत किती वाढलें याची सबंध याद येथें देणें शक्य नाहीं. परंतु ठळक ठळक जिनसा घेतल्या तरी असें आढळून येईल की, कपडा व सूत हें १८८० सालीं सुमारें १९॥ कोटीचें इकडे येत होतें तें आतां जवळजवळ ३० कोटीचें येऊं लागलें आहे. साखर २० वर्षांपूर्वी सुमारें १ कोटीची येत होती ती आतां ३ कोटीचीं येते. तेल सुमारें ६ लक्षांचें येत होतें तें आतां २४ लक्षांचें येतें. चिनी मातीचीं भांडीं, कांच, लोखंडी सामान, घड्याळें रेशीम वगैरे हजारों जिनसा याच प्रमाणानें वाढलेल्या आहेत, आणि आह्मीं इकडून कापूस, गळिताचीं धान्यें, गहूं, कातडीं वगैरे जास्त जास्त पदार्थ परदेशीं पाठवीत चाललों आहोंत. अशा रीतीनें उद्योगधंद्यांची दर वर्षी जी बूड होत चालली आहे, आणि कोट्यावधि लोक भिकेस लागत चालले आहेत त्यांच्या मोबदला आह्मांस काय मिळते किंवा आह्मीं काय केलें हें पाहूं गेल्यास बहुतेक निराशेचा जास्त भाग नजरेस येतो. नवीन तऱ्हेचे उद्योगधंदे शिकण्यास शास्त्रीय ज्ञान आणि यांत्रिक सामुग्री यांची जरूर आहे. पण आमच्या लोकांस या दोहोंचेंही ज्ञान होण्यास जी साधनें पाहिजेत त्यांसाठीं पैसे खर्च करण्यास आमचें सरकार तयार नाहीं. नाहीं ह्मणावयास गेल्या वीस वर्षांत मुंबईचें व्हिक्टोरिया टेक्निकल इनस्टिटयूट आणि कांहीं ठिकाणीं म्युनिसिपालिट्यांमार्फत लहानसान सुतारकीच्या किंवा लोहारकीच्या शाळा झालेल्या आहेत. पण या विषयाकडे सरकाराचें जितकें लक्ष जावें तितकें आजपर्यंत कोठेंही गेलेलें दिसत नाहीं." —केसरी, ता. १८।१।०२.

वरिष्ठ प्रतीच्या **सरकारी नोकऱ्या**संबंधानें ते लिहितात:—

"हिंदुस्थानसरकारच्या वाढत्या राज्यव्यवस्थेस दरसाल अधिकाधिक नोकर लागतात ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. पण मौज अशी असते कीं, दरमहा हजार किंवा हजार रुपयांपेक्षां वरच्या पगाराच्या ज्या नव्या जागा निघतात त्या सर्व गोऱ्या लोकांस दिल्या जातात, आणि खालच्या जागा मात्र गोऱ्यांत व काळ्यांत विभागल्या जातात. सामान्य नियम पाहिला ह्मणजे दरमहा दोनशें किंवा तीनशें रुपयांपर्यंतच्या जागा बहुतेक एतद्देशीयांसच दिल्या जातात असें ह्मटलें तरी चालेल

दरमहा दोनशें किंवा तीनशें हा इंग्रजी अंमलदाराचा सुरवातीचा पगार आहे. दरमहा तीनशेंपासून आठशें किंवा हजारपर्यंत कांहीं जागा गोऱ्यास व कांहीं जागा काळ्यांस मिळतात. कारण, मुनसफीच्या किंवा डेप्युटी कलेक्टरच्या जागेचा अखेरचा पगार आठशे आहे; व न्यायखात्यांतील दरमहा एक हजाराच्या कांहीं थोड्या जागा नेटिवांस मिळत असतात. या वजा केल्या ह्मणजे बाकी आठशेंच्या किंवा हजाराच्या जागा गोऱ्या लोकांसच मिळत असतात. उदाहरणार्थ, असि. कलेक्टर, असि. जज्ज आणि एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, पोलिस सुपरिंटेंडेंट वगैरे दरमहा एक हजार रुपयांवरच्या जागा बहुतेक गोऱ्या लोकांनीच बळकावलेल्या आहेत. नाहीं ह्मणावयास हायकोर्टाच्या जज्जाच्या कांहीं जागा, विलायतेहून सिविल सर्व्हिस किंवा एंजिनिअरिंग पास होऊन आलेल्या नेटिवांस मिळालेल्या जागा अथवा प्राव्हिन्शियल सर्व्हिसमध्यें नेटिवांकरितां एक दोन राखून ठेवलेल्या जागा हाच कायतो यास अपवाद आहे. बाकी सर्व मोठ्या प्रतीच्या जागा गोऱ्या लोकांच्या हातांत असून त्या जागांच्या पगारांची ओझी त्यांच्याच खिशांत उतरत आहेत."

—केसरी, ता. १४।६।०४.

• देशांतील **शिक्षणाचें** चित्र त्यांनीं असें रेखाटलें आहे:—

" देशांतील शिक्षण वास्तविक ह्मटलें ह्मणजे देशांतील लोकांची उन्नति होण्यासाठीच आहे. जेणेंकरून लोकांचें उद्योगधंद्यांचे ज्ञान वाढून त्यांच्या निर्वाहाची सोय होईल, त्यांची नीति व देशाभिमान वाढेल, स्वतंत्र रीतीनें आणि इभ्रतीनें दिवस काढतां येतील, आणि राजकीय व सामाजिक बाबतींत हितकारक कल्पनांचा प्रसार होऊन, लोकांस आपली स्थिती सुधारण्यास किंवा ज्यास्त सुखकारक करण्यास सांपडेल, अशा प्रकारचें शिक्षण देशांतील सर्व लोकांस मिळणें जरूर आहे. याखेरीज शिक्षणाचा दुसरा मोठा उपयोग ह्मटला ह्मणजे स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा, याबद्दल त्याच शिक्षणानें एक प्रकारची आस्था व कळकळ लोकांचे मनांत उत्पन्न झाली पाहिजे. सारांश, जेणेंकरून राष्ट्रांतील पुरुष, स्त्रिया व मुलें अधिकाधिक ज्ञानसंपन्न होऊन राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक दृष्ट्या राष्ट्राची एकजुटीनें उन्नती करण्यास प्रवृत्त होतील तें खरें शिक्षण होय. अशा प्रकारचें शिक्षण आमच्या देशांत कितपत चालू आहे याचा विचार केला असतां हल्लींच्या शिक्षणाची अनुपयुक्तता सहज नजरेस येईल. इंग्रजी राज्य झाल्यापासून आज सुमारें ७५।८० वर्षे ए. बी. सी. ची घोकंपट्टी आमच्या शाळांतून चालली आहे; पण सरकारी खात्यांतील नोकर तयार करण्यापलीकडे, अर्थात् युरोपियन अधिकाऱ्यांचे चाकर बनण्यापलीकडे आमच्या शिक्षणाची मजल गेली आहे असें दिसत नाहीं. एकाद दुसरा मनुष्य या शिक्षणाच्या चरकांतून निघूनही चांगल्या रीतीनें प्रसिद्धीस आलेला सांपडतो, नाहीं असें नाहीं. पण हा परिणाम शिक्षणाचा नव्हे, त्याच्या अंगच्या नैस-

गिंक गुणांचा होय. अशा प्रकारचीं दोन चार उदाहरणें सोडून दिलीं ह्मणजे असें ह्मणणें भाग येतें कीं, पोर्च्युगीज लोकांनीं हिंदुस्थानांत ख्रिस्तीधर्माचा प्रसार करून ज्याप्रमाणें हल्लीं येथें असणाऱ्या युरोपियनांस बटलर मिळणें सोपें करून ठेविलें आहे, त्याप्रमाणेंच इंग्रजसरकारानें आह्मांस शिक्षण देऊन तद्वारां हल्लींच्या राज्यव्यवस्थेस लागणाऱ्या हलक्या प्रतीच्या नोकरांची रेलचेल करून ठेविली आहे. मुलीकरितां स्थापलेल्या हायस्कुलांतून हल्लीं जे शिक्षण देण्यांत येते ते संसारांत शिरणाऱ्या स्त्रियांस इतकें अनुपयुक्त आहे कीं, थोड्याशा लिहिण्यावाचण्याचा फायदा झाला, तरी इतर गोष्टीत त्या संसारांत अगदी निरुपयोगी होतात. ही स्त्रीशिक्षणाची गोष्ट झाली. धंदेशिक्षण बहुतेक नाहींच, पण त्यांतले त्यांत ते असावे किंवा द्यावें अशाबद्दल तरी चर्चा होऊन विलायतेहून आलेली इंजिनें चालविण्यास किंवा जोडण्यास येथें फिटर तयार करावे लागतात ! पण धर्मशिक्षणाच्या बाबतींत तर भोपळ्यायेवढे पूज्य आहे ! आणि सरकार परधर्मी असल्यामुळे त्यास या बाबतींत उदासीन राहण्यास एक मोठी सबब झाली आहे. खाजगी शाळांतून हे शिक्षण दिले असतें व पंजाबांत आर्यसमाजाच्या ज्या शाळा आहेत तेथे ते सुरूही आहे. परंतु या शाळांचे स्वातंत्र्य, तुह्मी अमुकच पुस्तकें सुरू करा, इत्यादि निर्बंध करून हिरावून घेण्याचा जो प्रयत्न होत आहे, त्यावरून या शाळांचा या कामीं पुढे कितपत उपयोग होईल याची शंकाच आहे. राहतां राहतां युनिव्हर्सिट्या राहिल्या पण त्याही परीक्षा घेण्याचीं यंत्रे आणि तीही युरोपियन लोकांच्या ताब्यांतली बनल्यामुळे खऱ्या राष्ट्रीय शिक्षणास कोठेंच थारा नाहींसा झाला आहे. आज युनिव्हर्सिट्या स्थापन होऊन जवळ जवळ पन्नास वर्षे झालीं. पण इतक्या मुदतींत आमच्या देशांत प्रसिद्ध ग्रंथकार, शोध करणारे किंवा कवी किती निर्माण झाले, हें पाहूं गेल्यास हाताच्या बोटाचा देखील उपयोग करण्याची वेळ येत नाहीं. कालिदासकवी एकच झाला ह्मणून पहिल्या बोटास कनीनिका व दुसऱ्यास अनामिका ह्मणतात अशी एका कवीची कल्पना आहे. पण हल्लींच्या कालांत स्वतंत्र विचाराचे प्रगल्भ ग्रंथकार किंवा विद्वान् किती झाले याची 'गणना' करूं लागल्यास दोन्ही हातांसही 'अनामिक' हे नांव द्यावें लागेल अशी आमची स्थिती झाली आहे ! सारांश, खऱ्या विद्येची पूर्वीच्या राज्यांत थोडीबहुत तरी स्थानें, मठ, किंवा संस्था असत; व त्यांतून त्या त्या कालच्या स्थितीप्रमाणें थोडेबहुत तरी खरे विद्वान् व शोधक पुरुष उत्पन्न होत. पण हल्लीं या सर्व गोष्टींचा अभाव नजरेस येत असून शिक्षण ह्मणजे एक प्रकारचा चाकरी करून भाकरी मिळविण्याचा धंदा झाला आहे ! हे शिक्षण नव्हे हमाली आहे; व त्यापासून राष्ट्राचा उत्कर्ष न होतां उलट अवनती होण्याचा संभव आहे, किंबहुना झालीही आहे, ही गोष्ट विचारी पुरुषांच्या उत्तरोत्तर अधिकाधिक नजरेस येत चालली आहे." —केसरी, ता. ८।१०।०१.

*   *   *   *

" आह्मी एके ठिकाणीं असें वाचलें आहे कीं, जपानच्या शाळेंत सुरू असलेल्या पुस्तकांत नागरिकांच्या अंगीं अवश्य लागणाऱ्या सद्गुणांची जी एक याद असे त्यांत ' राजनिष्ठा ' हा गुण पहिल्यानें घातला होता. पण जपानच्या बादशहाच्या हुकुमावरून या गुणाचा पहिला नंबर काढून तो ' स्वदेशाभिमान ' या गुणास थोड-क्याच वर्षांपूर्वी देण्यांत आला ! शालोपयोगी पुस्तकाची ही दुरुस्ती कोणीकडे आणि स्वदेशाभिमानाचा शेवटचा नंबर तर राहूंद्याच, पण बाराही लहान मुलांच्या मनास लागूं नये अशाबद्दल घेतलेली आटोकाट काळजी कोणीकडे ? अशा तऱ्हेने सोवळी केलेलीं पुस्तकें ज्या देशांत बुद्धिपुरस्सर चालू केली जातात आणि त्या कामास पोटाच्या आशेनें बद्ध झालेले आमचे रावसाहेब मदत करतात तेथे स्वदेशा-भिमानाचें वारें आणखी शंभर वर्षे खेळले नाही, किंबहुना थंडीत ज्याप्रमाणे एखादें झाड सुकून जातें त्याप्रमाणे अजिबात नाहींसें झाले तर त्यांत नवल काय ? जपान व हिंदुस्थान यामध्यें जो मोठा भेद आहे तो हाच होय. जपानच्या मुलांस आपल्या सख्या आईचे दूध मुबलक पिण्यास मिळत आहे; पण आह्मांस निर्मळ असे वरचें दूध देखील प्राप्त होत नाही ! दुधाच्या नावावर अश्वत्थाम्याची जशी पिठाच्या पाण्यावर समजूत काढली होती तसा प्रकार इकडेही उघड रीतीनें चालू आहे; व आह्मी इतके बेशुद्ध झालों आहोत कीं, हे पिठाचें पाणी दूध ह्मणूनच आमच्या पोरांस पिण्यास आह्मी शिकवीत आहो व हल्लींच्या पिढीतील शहाणे लोक त्याचा प्रतिकार करण्याचे मनांतही आणीत नाहींत." —केसरी, ता. ६।६।०५.

एतद्देशीय **राजेरजवाड्यांच्या स्थिती**संबंधानें ते लिहितातः—

" हिंदुस्थानांतील राजेरजवाडे हे इंग्रज सरकारचें राज्य या देशांत होण्यापूर्वीं जीं राज्यें होतीं त्यांचे अवशिष्ट भाग होत. उदाहरणार्थ, राजपुतान्यांतील राजेरज-वाडे हे मोंगल लोकांच्यापूर्वी झालेल्या हिंदुराजांचे वंशज आहेत; शिंदे, होळकर, गायकवाड, कोल्हापूर हे मराठी राज्याचे अवशेष आहेत; आणि निजाम, भोपाळ वगैरे मोंगलांचे पूर्वीचे अंकित आहेत. इंग्रज लोकांस ज्या वेळेस मराठ्यांचा किंवा मुसलमानांचा अम्मल नाहींसा करावयाचा होता तेव्हा या संस्थानिकांशीं दोस्तीच्या किंवा बरोबरीच्या नात्यानें वागून किंवा तहनामे करून त्यांचे साहाय्य कंपनीसरका-रानें मिळविलें होतें. अर्थात् एका वेळीं या संस्थानिकांपैकीं कोणी इंग्रजसरकारचा दोस्त तर कोणी त्यांच्या दौलतीचा खांब ह्मणून आपणास ह्मणवून घेण्यांत भूषण मानीत असे. परंतु ही स्थिति उत्तरोत्तर झपाट्यानें पालटत जाऊन आज हा तर उद्यां तो प्रांत इंग्रजसरकारच्या हस्तगत होऊन हिंदुस्थानचें राज्य त्यांच्या हातीं गेलें. तथापि, बरेच दिवसपर्यंत संस्थानिकांचा व आपला संबंध पूर्वी होता त्याहून निराळा झाला आहे, असें शब्दांनीं व्यक्त करण्याचें साहस इंग्रजसरकारनें केलें नाहीं. संस्थानिकांच्या राज्याचें संरक्षण करण्याकरितां जें सैन्य ठेवावयाचें तें इंग्रज सरका-

रानें ठेवावें, निरनिराळ्या संस्थानिकांनीं परस्परांशीं किंवा परकीय राष्ट्रांशी जो व्यवहार करावयाचा तो इंग्रज सरकारच्याच मार्फत केला पाहिजे, अथवा राज्यांत कोणी युरोपियन नोकरीस ठेवणें झाल्यास किंवा सैन्य अगर दारूगोळा यांच्या संबंधानें सुधारणा करणें झाल्यास ती इंग्रज सरकारच्याच परवानगीनें केली पाहिजे, अशा प्रकारचे अनेक निर्बंध हळूहळू संस्थानिकांवर लादण्यांत आले; व अज्ञानाने, अनन्यगतिकत्वानें किंवा अदूरदर्शीपणाने त्यांनी तें मान्य केले. याचा अखेर परिणाम असा झाला की, दोस्त व स्नेही हे शब्द जरी पूर्वीप्रमाणें इंग्रजसरकारचे अधिकारी लावीत तरी त्याच्या पाठीमागे कमी दर्जाचें विशेषण लावून या राजेरजवाड्यांस "तावेदार दोस्त संस्थानिक" असें ह्मणण्याचा प्रघात पडला. परंतु इतक्यानेंही इंग्रजी अधिकाऱ्यांचें समाधान झाले नाही. लॉर्ड डलहौसी यांनी संस्थानेच खालसा करण्याची युक्ति काढली; परंतु ती एकंदरींत हितावह नाही असें कळून आल्यावर सन १८६२ सालीं दत्तकाच्या सनदा निरनिराळ्या राजेरजवाड्यांस देण्यांत आल्या. तथापि, या राजेरजवाड्यांचे अधिकार संकुचित करून संपुष्टांत आणण्याची जी राजनीति प्रचारांत आली होती ती तशीच राहिली. इसाबनीतींत नखे काढलेल्या सिंहाची जी गोष्ट आहे, त्यांतील सिंहापेक्षांही या राजांची स्थिति गरीब झालेली आहे; कारण नखाची गोष्ट तर राहूद्याच, पण हे जातीने सिंह राहिले आहेत किंवा नाहींत याचीही वानवाच आहे!"

—केसरी, ता. १३।१।०३.

**अनावर राज्यविस्तार** व **वाढता खर्च** यासंबंधानें त ह्मणतातः—

"२० वर्षांपूर्वी जो हिंदुस्थानदेश होता तो आतां राहिला नाहीं. त्याची सरहद्द पूर्वेकडे चीन आणि फ्रान्स यांस जाऊन मिळाली आहे; आणि पश्चिमेकडे बलुचिस्थानांतून आणि चित्रळमधून अफगाणिस्थानास पोटांत घेऊन ती हिरात येथें मिळते कीं काय अशी शंका येऊं लागली आहे. उत्तरेच्या बाजूस हिमालय ही स्वाभाविकच शत्रूस अगम्य अशी सरहद्द आहे; पण या सरहद्दीपलीकडील राष्ट्रांनीं या सरहद्दीच्या दक्षिणेस कोणताही हक्क सांगणें आपल्यास हितकारक नाही, या समजुतीवर सिकीम हिंदुस्थानसरकारानें आपल्या ताब्यांत घेतलें आहे, आणि काश्मीर जरी ताब्यांत घेतलें नाहीं तरी त्याची स्वतंत्रता कमी केली आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ही राज्यतृष्णा पुढें कोठपर्यंत जावयाची, नेपाळसारखें एखादें राज्य स्वतंत्र राहिलें असल्यास तें तीस बळी पडावयाचें कीं काय, हिंदुस्थानचें राज्य इतकें अवाढव्य रितीनें वाढविण्यास लागणारा खर्च कसा व कोठून निघणार आणि यापासून हिंदुस्थानच्या प्रजेचें कांहीं हित होण्याचा संभव आहे कीं काय, हे प्रश्न प्रजेच्या दृष्टीनें तरी फार महत्वाचे आहेत. पण हिंदुस्थानसरकारानें त्यांचा फारसा विचार केल्याचें आढळून येत नाहीं. हिंदुस्थानच्या राज्याची मर्यादा अशा तऱ्हेनें वाढवि-

ण्यास किती खर्च लागतो याची कल्पनाही फारच थोडया लोकांस असेल. १८८५ सालीं जेव्हां उत्तरब्रह्मदेश हिंदुस्थानास जोडण्यांत आला तेव्हां हिंदुस्थानचें सैन्य १०००० गोरे व २०००० काळे शिपाई ठेवून वाढविण्यांत आलें; इनकमटाक्स पुनः बसविला; आणि तेव्हांपासून आतांपर्यंत दरसाल सरहद्दीवरील लष्करी कामाकरितां लक्षावधि रुपये खर्च होत आहेत. ब्रह्मदेश, मणिपूर वगैरे लढायांसाठीं तर ८।१० कोट रुपये खर्च झालेले आहेत, आणि दरसालच्या लष्करी खर्चाचें मान पाहिलें तर सन १८८१।८२ सालीं लष्कराप्रीत्यर्थ सुमारें १७ कोटींचा जो खर्च होता तो आतां २५।२६ कोट रुपयांपर्यंत वाढत गेलेला आहे. यांखेरीज लढाईच्या किंवा इतर प्रसंगीं जें कर्ज काढलें त्याचें व्याज आणि हुंडणावळीचा भाव उतरल्यानें हुंडणावळीप्रीत्यर्थ होणारा खर्चही अनावर वाढलेला असून दरसाल हें ओझें अधिकाधिकच होत आहे. बरें, एवढ्या मुदतींत हिंदुस्थानचें वार्षिक उत्पन्न वाढलें नाहीं असें नाहीं. हिंदुस्थानसरकारचा सालीना वसूल २० वर्षांपूर्वी सुमारें ७३॥ कोट होता तो आतां १०८ कोटी झाला आहे. ह्मणजे दरसाल ३५ कोट रुपये आजमित्तीस जास्त उत्पन्न होत आहेत; पण आमच्यावर राज्य करणाऱ्या मुत्सद्यांची किंवा लष्करी अधिकाऱ्यांची राज्यतृष्णा इतकी कांहीं अनावर आहे कीं जमाबंदीची वर दाखविलेली वाढ त्यांच्या खर्चास पुरेनाशी झाली आहे, व ते आतां जर अधिक चळवळ करीत नसले तर तिचें कारण केवळ पैशाची अडचण होय. अगदीं रानटी लोकांबरोबर जरी लढाई करावयाची असली तरी ती पैशाच्या मदतीखेरीज होत नाहीं, हें चित्रळच्या मोहिमेवरून आतां स्पष्टपणें अनुभवास आलें आहे. त्यातून प्रतिपक्ष्यांजवळ जर नवीन शास्त्रीय युद्धसामुग्री असली तर लढाई संपण्यासही बराच अवकाश लागतो, हे बोअरलोकांशीं चाललेल्या लढाईनें सिद्ध होत आहे. अशा स्थितींत हिंदुस्थानसरकार राज्यतृष्णेनें भांबावून जाऊन हिंदुस्थानचें दिवाळे निघेपर्यंत राज्य अधिकाधिक वाढविण्याची आपली हौस पुरी करून घेणार, किंवा प्रतिवर्षी वाढत जाणारा जमाबंदीचा वसूल हिंदुस्थानांतील लोकांची स्थिती सुधारण्याकडे लावणार हा एक मोठाच प्रश्न उपस्थित होतो.” —केसरी, २५।२।०२.

हिंदुस्थानच्या **अंतर्व्यवस्थे**बद्दल ते लिहितातः—

“ हिंदुस्थानचें परचक्रापासून संरक्षण करणें हें जितकें महत्वाचें काम आहे तितकेंच हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत दंगेधोपे न होतां नेहमीं शांतता ठेवणें हें होय; आणि त्याकरितां नेहमीं प्रयत्न करणें किंवा डोळ्यांत तेल घालून पाहणें हे शहाण्या राज्यकर्त्यांचें काम आहे. हिंदुस्थानांत आजपर्यंत जे सार्वभौम राजे झाले त्या सर्वांपेक्षां इंग्रजसरकार असल्या कामीं विशेष धूर्त आहे, हें आह्मी सांगावयास नको. कोणताही देश एकदां आपल्या हस्तगत झाला असतां तो कायमचा आपल्या कबजांत कसा राहील आणि त्यासाठीं काय काय तजविजी योजल्या पाहिजेत हें

परकीय राजाच्या राजनीतीपैकीं प्रधान अंग होय. दरबारी भाषेंत बोलावयाचें असल्यास हिंदुस्थानचें राज्य हिंदू लोकांच्या हिताकरितां चालविलें आहे, व हल्लींपेक्षां दुसरे चांगलें राज्य हिंदुस्थानास कधींही मिळणार नाही, असें नेहमी सांगण्यांत येतें; व आमच्यांतील कांहीं मंडळींस ही गोष्ट खरीही वाटते. पण वास्तविक स्थिति अगदीं निराळी आहे. परचक्राची भीति बाजूला ठेवली आणि देशांतील लोकांपासून राज्यकर्त्यांस कोणत्या प्रकारची भीति आहे याचा विचार केला, तर असें आढळून येईल कीं, हिंदुस्थानांतील नेटिव्ह सैन्य, नेटिव्ह संस्थानें आणि इतर सामान्य प्रजा या तीन वर्गांचा आपणास विचार केला पाहिजे. हे तिन्ही वर्ग जर इंग्रजसरकारच्या राज्यास राजी असले तर तें चिरस्थायी होण्यास कांहीच प्रत्यवाय नाहीं. आणि जे जे व्हाइसराय हिंदुस्थानांत येतात त्या सर्वांस या तिन्ही गोष्टींचा विचार करून व्यवस्था लावावी लागते. सन १८५७ सालीं नेटिव्ह पलटणी उलटल्यामुळें जो भयंकर प्रसंग गुदरला तसा पुन्हां गुदरूं नये याकरितां ज्या कांहीं तजविजी करावयाच्या त्या सर्व आतां पुऱ्या झाल्या आहेत. नेटिव्ह सैन्याची संख्या इंग्रजी सैन्याच्या दुपटीपेक्षां अधिक असूं नये असा नियम हल्लीं अमलांत असून जातीजातीच्या स्वतंत्र पलटणी केल्यानें निरनिराळ्या पलटणींची एकी होण्याचा संभव बराच कमी झाला आहे. नेटिव शिपायांजवळ कोणत्या प्रकारचीं हत्यारें असावीं, नेटिव लष्करी अंमलदार कोणत्या जातीचे व दर्जाचे असावे, आणि त्यांस शिक्षण कोणत्या प्रकारचें असावें वगैरे गोष्टींचा निकालही वर सांगितलेल्या तत्त्वांवरच केलेला आहे. ही तत्वें इतर गोष्टींप्रमाणे स्पष्ट रीतीनें कोणी सांगत नाहीं. पण बारीक विचार करणारांस तीं सहज कळून येण्यासारखीं आहेत. हा विचार केवळ सैन्यासंबंधानेंच नव्हे तर एतद्देशीय प्रजेसंबंधानेंही तो सारखाच लागू पडतो. हिंदू लोकांनी आपापसांत भांडून मारामाऱ्या करूं नयेत ह्मणून त्यांस आह्मीं हत्यारें देत नाहीं हें ह्मणणें शुद्ध दरबारी थाटाचें आहे; किंवा ही एक प्रकारची व्याजोक्तीच आहे, असें ह्मटलें तरी चालेल. हिंदुस्थानची प्रजा निःशस्त्र झाल्यानें त्यांनीं केव्हांही कांहीं गडबड केल्यास पांचपन्नास रायफलांनी त्यांचा बंदोबस्त करितां येईल अशी स्थिति आज आहे खरी; पण राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें जरी ही स्थिति योग्य असली तरी लोक निःशस्त्र झाल्यानें चोर किंवा दरवडेखोर अगर हिंस्र पशू यांपासूनही त्यांस आपलें संरक्षण करणें दुर्घट झालें आहे. आणि एकंदरींत लोकांमधील लष्करी बाणा व उमेद कमी होत चालली असून ते हतवीर्य होत चालले आहेत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. सर्व प्रजा अशा रीतीनें हतवीर्य असणें हें राज्यकर्त्यांस सकृद्दर्शनीं जरी हितावह वाटलें तरी परिणामी त्यांच्या गळ्यांत ही एक धोंडच आहे किंवा होईल हें सांगावयास नको. शस्त्रें असणाऱ्या लोकांचें संरक्षण करण्यास जितके पोलीस लागतें त्यापेक्षां निःशस्त्र लोकांचें संरक्षण करण्यास अधिक पोलीस पाहिजे. पण आमच्या राज्यकर्त्यांजवळ जास्त पोलीस ठेवण्यास पैसे नाहींत आणि वरील कारणाकरितां

लोकांसही ते शस्त्रें देण्यास तयार नाहींत, अशी स्थिति हळुहळु येऊन ठेपली आहे. हिंदुस्थानांतील लोकांस अशा रीतीनें निर्बल व परकीयांवर सर्वदा अवलंबून असणारे करून सरकार थांबलें आहे असे नाहीं; तर सरकारचीच व्यवस्था लोकांस गोड वाटावी व त्याबद्दल लोकांनीं सरकारचे नेहमीं आभार मानून स्वस्थ बसावें या हेतूनें प्रजेपैकीं कांही ठळक गृहस्थांस आमिष दाखवून सरकारचे तरफदार बनविण्यांत येतें आणि सरकारच्या राजनीतीची तत्वें लोकांस समजून सांगणारे लोक राजद्रोहाच्या भयंकर आरोपास पात्र होतात. एरवीं निःशस्त्र झालेल्या प्रजेच्या हातून राज्याचें कांहीं एक वांकडें व्हावयाचें नाहीं हे शहाण्यासुर्त्या राज्यकर्त्यांस कळूं नये असें नाही, व कळत नाहीं असेंही नाही. पण जी राजनीति आपण अंगिकारिली आहे ती शेवटपर्यंत एका धोरणानें तडीस नेण्याचा इरादा असल्यामुळें हे प्रकार घडून येतात. आह्मांस किंवा आमच्या लोकांस मात्र ते नीट कळत नाहींत किंवा कळले तरी त्याचा नीट उमज पडत नाही हें आमचें दुर्दैव होय."— केसरी, ता.४।३।०२.

**इंग्लंड हिंदुस्थानास कसें वागवितें** याविषयीं ते ह्मणतातः—

" इंग्रजी साम्राज्यांत हिंदुस्थान सामील झाल्यामुळें कांहीं अंशीं त्याची स्थिति सवतीच्या मुलाप्रमाणें झाली आहे. इंग्लंड देशाबाहेरील इंग्लंडच्या साम्राज्याचे दोन भाग होतात. एक कॉलनीज किंवा वसाहती ह्मणजे विलायतेंतल्या लोकांनीं अमेरिका, आफ्रिका, आस्ट्रेलिया वगैरे ठिकाणीं जाऊन केलेल्या वसाहती, आणि दुसरा डिपेंडन्सीज ह्मणजे हिंदुस्थानासारखे जिंकून घेतलेले देश. कॉलनीज हा इंग्रजी साम्राज्याचा सख्खा मुलगा होय आणि डिपेंडन्सीज हा सावत्र किंवा दासीपुत्र ह्मटला तरी चालेल. हा भेद होईल तितका कमी करावा, जिंकलेल्या राष्ट्रांतील लोकांस वसाहतींतील लोकांप्रमाणे हक्क असावे, दोघांसही विलायत सरकारानें समदृष्टीनें लेखावें अशाबद्दल आज पुष्कळ वर्षे चळवळ सुरू आहे; व याच संबंधानें नुकताच हाऊस ऑफ लॉर्डस् मध्ये हिंदुस्थानचे माजी व्हायसराय लॉर्ड नॉर्थब्रुक यांनीं एक प्रश्न आणिला होता. वर जो सख्खा–सावत्रभाव सांगितला आहे त्याचें ढळढळीत उदाहरण हिंदुस्थानावर कांहीं बाबतींत जो विनाकारण खर्च लादतात तो होय. वसाहतीची व्यवस्था करण्याकरितां विलायतेंत जें वसाहतीच्या सेक्रेटरीचें ऑफिस आहे ते बांधण्याचा सुद्धां खर्च विलायतसरकारानें केला आहे; पण हिंदुस्थानच्या व्यवस्थेकरितां विलायतेंत जें सेक्रेटरी ऑफ् स्टेटचें ऑफिस आहे व ज्यास इंडिया ऑफिस ह्मणतात त्याचा झाडसारवणाचा देखील खर्च हिंदुस्थानच्या गरीब रयतेस द्यावा लागतो; आणि इतकें करून त्याचा मोबदला आह्मांस काय मिळतो ह्मणाल तर विलायतेंतील लोक विलायत सरकारच्या तिजोरींतून दुष्काळ निवारणार्थ हिंदुस्थानच्या पैशाची मदत करण्यास तयार असतां आमचे सेक्रेटरी ऑफ् स्टेट मध्यें आडवे पडून " फुकट मदत करूं नका, पाहिजे तर कर्ज द्या " ह्मणून मोठ्या गंभीरपणानें

पार्लमेंट सभेस उपदेश करितात! सावत्र आई देखील यापेक्षां आपल्या सावत्र मुलाचें कधींही जास्त वाईट करूं शकणार नाहीं....हिंदुस्थानचे ओझें हिंदुस्थान वाहूं शकण्यास समर्थ नसला तरी त्यास तें वाहिलेंच पाहिजे. पण ज्यांत कांहीं हिंदुस्थानाचा संबंध नाहीं असल्या गोष्टींचें ओझें जेव्हां या बिचाऱ्या गरीब देशावर लादण्यांत येते, तेव्हां मात्र अन्यायाची कमाल हाते असें ह्मणणें भाग येतें. अशा तऱ्हेचीं ओझीं ह्मटलीं ह्मणजे एडन येथील लष्करी ठाण्याचा खर्च, इराण येथील वकिलायतीचा खर्च वगैरे होत. अफाट इंग्रजी साम्राज्यांत कोठें कोणताही खर्च होवो त्याचा हिंदुस्थानाशीं बादरायण संबंध जरी जोडतां आला तरी त्याबद्दलची खर्चाची जबाबदारी बिचाऱ्या हिंदुस्थानावर पडत असते." —केसरी, ता. २१।८।१९००.

**लॉर्ड कर्झनच्या** कारकीर्दीचें वर्णन करतांना त्यांच्या **राजकीय धोरणाचें चित्र** त्यांनीं येणेंप्रमाणें रेखाटलें आहे:—

"लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीच्या तोडीस जुना दाखला द्यावयाचा असल्यास तो पुष्कळ अंशीं औरंगजेबाचा घेतल्यास चालेल. साम्राज्य, अखंडित साम्राज्य, अप्रतिहत आणि चिरस्थायी साम्राज्य, अर्थात् साम्राज्यांतील प्रजेचें चिरकालीन दास्य हीं कर्झनसाहेबांच्या राजकीय धोरणाचीं प्रतिपदोक्त लक्षणें होत. हिंदुस्थानांतील किंवा आशियाखंडांतील लोकांबद्दल यांच्या अंगीं थोडीबहुत सहानुभूति आहे, पण ती सहानुभूति आईबाप आपल्या लहान मुलांबद्दल जी ममता दाखवतात अशा प्रकारची आहे. आह्मी ह्मणजे इंग्रजी राज्यकर्ते हेच काय ते शारीरिक व मानसिक गुणांनीं मोठे असून तुह्मी ह्मणजे हिंदुस्थानांतील प्रजाजनांनीं त्यांच्या हाताखालीं पोराप्रमाणें वागावें, त्यांतच तुमचे कल्याण आहे, असा त्या सहानुभूतीचा अर्थ आहे. जोंपर्यंत हिंदुस्थानांतील लोक अशा रीतीने वागतील तोंपर्यंत त्यांस इतर बाबतींत त्रास होऊं नये अशी तजवीज इंग्रजसरकाराकडून मेहरबानीने करण्यांत येईल असें लॉर्ड कर्झन यांचें मत होतें; आणि या मतास अनुसरूनच इंग्रजी सोल्जरांचा सुळसुळाट किंवा खालील दर्जाच्या इंग्रजी अमलदारांचा जुलूम बंद करण्याबद्दल त्यांनीं सक्तीनें हुकूम सोडले होते. साम्राज्य टिकण्याकरितां, साम्राज्य चिरस्थायी होण्याकरितां, अथवा साम्राज्याची बडेजावकी वाढण्याकरितां प्रजेचे हातपाय जितके तोडावयास पाहिजेत, किंवा त्यांचा जितका हिरमोड अथवा छाटाछाट करावयास पाहिजे, तितकी करण्यास लॉर्ड कर्झन यांस कधींही दिक्कत वाटली नाहीं. परंतु याप्रमाणें जिंकलेल्या देशांची किंवा लोकांची छाटाछाट करून त्यांस कायमचें चीत केल्यावर मग त्यांचा विनाकारण कोणी छळ करूं नये याबद्दल लॉर्ड कर्झन यांची मोठी करडी नजर असे; किंबहुना साम्राज्य चालविण्यास अशा प्रकारची जाचणूक अहितकारक आहे असें ते मानीत. आपण ज्याप्रमाणें घरच्या गुरांचीं शिंगें तोडून किंवा वळवून त्यांस निरुपद्रवी बनवतों आणि अशा

रीतीनें त्यांच्यापासून भीति नाहींशी झाल्यावर त्यांच्या संगोपनाची, त्यांस योग्य वेळीं दाणावैरण देण्याची कोणी हयगय केल्यास अथवा विनाकारण त्यांस उपद्रव दिल्यास त्यावर रागें भरतों; तशा प्रकारचें लॉर्ड कर्झन यांचें हिंदुस्थानच्या प्रजेवर प्रेम होतें. शौर्यानें, विद्येनें, व्यापारानें किंवा संपत्तीनें हिंदुस्थान देशानें इंग्लंड देशाचें नेहमीं अंकित राहिलें पाहिजे, राज्यकर्त्यांशीं कधींही स्पर्धा करून उपयोगी नाहीं, अशी या राजश्रींची पक्की समजूत होती. त्यामुळे महाराणीसरकारच्या स्मारका-करितां उभारलेल्या फंडांतून औद्योगिक कॉलेज काढण्याची लोकांनीं सुचविलेली कल्पना यांनीं अमलांत आणली नाही; इतकेंच नव्हे तर, पाश्चिमात्य शिक्षणानें सुशि-क्षित झालेल्या लोकांच्या मनांत स्वातंत्र्याची इच्छा अधिकाधिक उद्भवते, हेंही यांस सहन न होऊन वरिष्ठ प्रकारचें सर्व शिक्षण हिंदुस्थानसरकारच्या किंवा सरकारी अधिकाऱ्यांच्या ताब्यांत आणून हें पाश्चिमात्य बाळकडू जितकें कमी तीव्र होईल तितके करण्याचा यांनीं आपल्या कारकीर्दीत प्रयत्न केला. अंतस्थ सुधारणां-पैकीं नाहीं ह्मणावयास शेतकी आणि पाटबंधारे या कामी यांच्या कारकीर्दीत बरीच रक्कम खर्ची पडली; पण त्याचबरोबर हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, या दोन्ही बाबतींत हिंदुस्थानचा उत्कर्ष झाल्यानें इंग्लंडदेशचें कांहीं नुकसान नाहीं; उलट झाला तर फायदाच होईल. देशी धंद्यास उत्तेजन मिळावें अशी सदिच्छा लार्ड कर्झन यांच्या भाषणांतून वेळोवेळीं प्रदर्शित झालेली आहे. पण त्यांची सात वर्षांची कारकीर्द पाहिली तर ‘ पुराणांतलीं वांगीं पुराणांतच ’ ह्याप्रमाणें ही सदिच्छा केवळ शब्दांतच राहून परलोकवासी मि. टाटा यांनीं दिलेल्या उदार देणगीचाही उपयोग अद्याप त्यांच्या देशबांधवांस मिळूं लागला नाहीं. कमिशनची कर्झनशाहींत अगदीं रेलचेल उडून गेली होती. परंतु यांचा अखेर परिणाम पाहिला तर त्यापासून हिंदुस्थानांतील प्रजेच्या हक्कांत कोणच्याही प्रकारची भर पडली नाहीं, असेच आढळून येईल.

लार्ड कर्झन यांच्या कारकीर्दींतलें कोणचेंही कृत्य घ्या, त्यांत वर सांगितलेल्या त्यांच्या राजकीय विचारांचें व धोरणाचें प्रतिबिंब स्पष्टपणे नजरेस येतें. हिंदुस्था-नांतील लोकांस कांहीं मर्यादेच्या पुढें वाढूं देऊं नये, आणि त्या मर्यादेच्या आंत त्यांजवर विनाकारण जुलूम करूं नये, हीं ह्यांच्या राज्यपद्धतीचीं मुख्य तत्वें होतीं. तसेंच तारुण्यामुळें ह्मणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणांमुळें ह्मणा, यांस असें वाटत असे कीं, अलंकारिक शब्दजाल पसरून त्याच्या अवडंबरानें किंवा दिल्लीदरबारा-सारखे साम्राज्याच्या वैभवप्रदर्शनाचे अधिक प्रसंग आणून आपण प्राच्य देशांतील किंवा हिंदुस्थानांतलि लोकांस मोठ्या शिताफीनें चकवून् टाकूं. पण सात वर्षांच्या कारकीर्दीत हा समज चुकीचा आहे असा त्यांस अनुभव आला असावा; निदान हिंदुस्थानच्या लोकांस तरी, आपण या स्वारीस चांगलें ओळखलें असें पूर्णपणें

वाटत आहे. शंभर वर्षांच्या इंग्रजी शिक्षणानें दिखाऊ विलायती मालास किंवा शब्दास भुलून न जाण्याइतकें शहाणपण आमच्या अंगांत आलें आहे; त्यामुळें दिल्लीदरबारामुळें आमच्यामध्यें समाधानापेक्षां असंतोष जास्त झाला असून लॉर्ड कर्झन यांनीं राणीच्या जाहिरनाम्याचाही जो उघड उपमर्द केला त्याने तर ही बुद्धि अधिकच दृढ झालेली आहे. वरिष्ठ प्रतीच्या सरकारी नोकरींत नेटिवांचा प्रवेश अधिकाधिक करणें अशक्य आहे असे लॉर्ड कर्झनसाहेबांपूर्वी दुसऱ्या कोणत्याही व्हाइसरॉयानें स्पष्टपणें सांगितलें नव्हतें. लॉर्ड लिटन यांनी वर्तमानपत्रकारांचीं तोंडें बंद करण्याचा प्रयत्न केला होता, पण तो उघड होता; व त्यामुळें लॉर्ड रिपनच्या कारकीर्दीत त्याचा प्रतिकार करतां आला. लॉर्ड कर्झन यांनीं तोच प्रयत्न पुनः अप्रत्यक्ष रीतीनें गौप्यगोपनाच्या कायद्यांत हळूच एक कलम घुसडून देऊन केला आहे. याची पुढें कशी काय वाट लागते ती पहावी. स्थानिक स्वराज्याच्या बाबतीतही हीच पिच्छेहाटीचा क्रम कर्झनशाहींत सुरू झाला आहे. किंबहुना यांची पहिल्यानें अतोनात स्तुति करणाऱ्या बंगाली लोकांस स्थानिकस्वराज्याच्या बाबतींतच यांच्या कारकीर्दीच्या धोरणाचा पहिला झटका अनुभवावा लागला! हिंदुस्थानचे व्यापारी खातें, गुप्त चौकशीचें पोलीस खाते, आणि विद्याखातें यांवर हिंदुस्थान सरकारच्या नजरेखालीं देखरेख ठेवण्याकरितां तीन मोठ्या पगाराच्या स्वतंत्र जागा काढून लॉर्ड कर्झन यांनी युरोपियन अधिकाऱ्यां-करितां राखून ठेवलेल्या कुरणाची मर्यादा वाढविली आहे; आणि युरोपियन व युरेजि-अन लोकांस आश्रय देऊन व खालील दर्जाच्या नोकऱ्यांसाठीं अवश्य लागणारी परीक्षा काढून टाकून हिंदी प्रजेस सरकारी नोकरींपासून होणारा फायदाही मर्यादित करून टाकला आहे. सारांश, साम्राज्यांतील वैभवाचा आणि सुखाचा वांटा जेणेकरून गोऱ्या लोकांसच मिळेल अशा रीतीनें यांनी सात वर्षे आपली कारकीर्द चालविली. आणि त्यांतही दुःखाची गोष्ट ही कीं, पुढें पांच पंचवीस वर्षेपर्यंत हें धोरण टिकेल अशा प्रकारची कागदोपत्रीं तयारी करून आपल्या मागून येणाऱ्या व्हाइसरॉयच्या सदबुद्धीसही अवकाश न मिळण्याची तरतूद यांनी करून ठेविली आहे! अर्थात् यांचा उद्योग, यांचें शहाणपण, व यांची तरतरी हिंदुस्थानांतील लोकांस आणखी एक पिढी तरी जाचल्याखेरीज राहणार नाहीं."—केसरी, ता. २९।८।०५

**नेटिव अमलदारांचें मानसिक दौर्बल्य** किती वाढलें आहे व **नैतिक-दृष्ट्या त्यांची** किती **अवनति** झाली आहे याविषयीं ते येणेंप्रमाणें लिहितात:—

"आपला धनी आपल्या धर्मांतील, आपल्या देशांतील किंबहुना आपल्या आप्तां-तील असला, तरी त्याची सेवा करणें, म्हणजे निसर्गतः आपणास प्राप्त झालेलें स्वातंत्र्य गुंडाळून ठेवून आपली बुद्धि, चातुर्य, शहाणपण व धैर्य, यांचा उदरपूरणा-

करितां कांहीं कालपर्यंत तरी विक्रय करणेंच होय. त्यांतून ज्या प्रभूची आपण सेवा करतों तो प्रभु जर स्वदेशांतला असेल अथवा स्वदेशाचें किंवा त्यांतील लोकांचें हित करणारा असेल, तर क्षणभर स्वाभिमान एका बाजूस ठेवून आपण सेवावृत्ति स्वीकारल्याचा देशास कांहीं तरी उपयोग होण्याचा संभव असतो. पण तोच स्वामी जेव्हां परकीय असतो तेव्हां त्याची सेवा करण्यांत स्वातंत्र्याची व स्वाभिमानाची होळी होते इतकेंच नव्हे, तर त्याबरोबर देशाचें अहित होऊं शकतें. हाच हेतु मनांत धरून पंचतंत्रांत " सेवया धनमिच्छद्भिः सेवकैः पश्य यत्कृतम् । स्वातंत्र्यं यच्छरीरस्य मूढैस्तदपि हारितम् ॥ " याप्रमाणें सेवकांची निर्भर्त्सना केलेली आहे. व्यासांनींही जिवंत असून मेलेले पांच प्रकारचे जे लोक सांगितलेले आहेत त्यांतही 'नित्यसेवकः' असा एक वर्ग सांगितला आहे. हा नित्य-सेवकांचा वर्ग ह्मटला ह्मणजे आमच्याकडील पांढरपेशांचा वर्ग होय. हा वर्ग बुद्धीनें इतर वर्गांपेक्षां श्रेष्ठ असून विद्यार्जनाच्या कामींही इतर लोकांपेक्षां अधिक दृढ उद्योग करणारा आहे, ही गोष्ट खरी. पण वंशपरंपरागत आपापल्या कुलांत किंवा ज्ञातींत चालत असलेल्या सेवाधर्मामुळें त्याच्या स्वाभिमानादि मनोवृत्ति थोड्याबहुत तरी बोथटल्याच असतात. स्वराज्यांत या वर्गाचा हा बोथटपणा प्रजेस किंवा राष्ट्रास घातुक होत नाहीं. पण स्वराज्य जाऊन परराज्य झालें ह्मणजे हा सेवकवर्ग परकीय राजांस आपले मतलब साधण्यास चांगला उपयोगी पडतो, इतकेंच नव्हे तर, सेवाधर्मात होणारा स्वाभिमानाचा ऱ्हास अधिकाधिक वाढत जाऊन परकीय राजांच्या अमलाखालीं हा वर्ग स्वदेशाचा शत्रु बनण्याचा प्रसंग येतो. परराज्याखालीं देशांतील बुद्धिमान् लोकही नैतिकदृष्ट्या निकृष्टावस्थेस पावतात असें जें मि. दादाभाई नौरोजी यांनीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे त्याचा प्रत्यय हल्लींच्या कालीं सबॉर्डिन सर्विसमध्यें या देशांत डेप्युटी कलेक्टर, मामलेदार किंवा माजिस्ट्रेट वगैरे जे कांहीं नेटिव कामगार आहेत त्यांची स्थिति अवलोकन केली असतां सहज येणार आहे. अव्वल इंग्रजींत - ह्मणजे ज्यावेळीं परकीय अमलाचें जूं आमच्या मानेवर पूर्णपणें बसलें नव्हतें तेव्हां-दप्तरदार किंवा मामलेदार अशा मोठ्या अंमलदारास वरिष्ठ युरोपियन अधिकाऱ्यांकडून थोडाबहुत तरी मान मिळत होता; आणि त्यांची सल्ला सरकार जमेस धरीत असे. पण तेही दिवस आतां राहिले नाहींत. या अंमलदाराच्याच सहाय्यानें इंग्रजसरकारानें जिल्ह्यानिहाय किंवा गांवोगांवच्या जमिनींची, जंगलाची किंवा अन्य तऱ्हेची खडानूखडा माहिती गोळा करून ती पुस्तकरूपानें वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपयोगाकरितां प्रसिद्ध केलेली आहे. ही माहिती जेव्हां गोळा झाली तेव्हां ती गोळा करणारांच्या मनांत अशी कल्पनाही आली नसेल कीं, या माहितीच्या जोरावर वरिष्ठ युरोपियन अधिकारी पुढें आपली अगदीं पायमल्ली करून टाकतील. कसेंही असो, खालच्या प्रतींच्या किंवा वर दिलेल्या ह्मणीप्रमाणें पहिल्या प्रकारच्या शेतकरी वगैरे वर्गांत " आह्मांस जर कोणी बुडविलें असेल तर तें सरकारापेक्षां पांढरपेशा-

वर्गानेंच बुडविलें," असा जो समज झालेला कधीं कधीं दृष्टोत्पत्तीस येतो तो अगदीं निष्कारण आहे असें नाहीं. लोकांची इनामें खालसा करण्यास काय युक्ति करावी, सनदांतील स्पष्ट शब्दांचा अर्थविपर्यास कसा करावा, पूर्वापार चालत आलेल्या वतनदार लोकांच्या हक्कांस हळू हळू पण पूर्ण आळा कसा घालावा, सारा कसा वाढवावा, लोकांची जंगलें कशीं घ्यावीं अथवा मिठाचा आणि अबकारीचा बंदोबस्त करून उत्पन्न कसें वाढवावें, याबद्दलच्या युक्त्या स्वराज्यांत तयार झालेल्या पांढरपेशा–वर्गानेंच परकीय राज्यकर्त्यास सांगून त्यांस हुषार केलें आहे. सारांश, आम्हीच आमच्या घरचा भेद या राज्यकर्त्यांस देऊन त्यांची शाबासकी किंवा सर्टिफिकीटें मिळविलीं आहेत. परंतु त्याचा पुढें काय परिणाम होईल इकडे त्यावेळीं कोणी लक्ष दिलें नाहीं. ही माहिती इंग्रजसरकारास आतां आमच्याकडून मिळण्याची जरूर उरली नाहीं. यदाकदाचित् थोडीशी जरूर असली तर ती भरून काढणें किंवा भागविणे सेवकवर्गाच्या खालावलेल्या स्थितींत यत्किंचित्‌ही कठिण नाहीं. तेव्हां अर्थात्‌च या सेवकवर्गाचा आतां मान बहुतेक नाहींसा झालेला आहे; आणि त्यांतील सर्व लोक वरिष्ठ युरोपियन अधिकारी जे हुकूम करतील ते अमलांत आणण्याचीं यंत्रें बनून राहिले आहेत. देशांतील बुद्धिमान लोकांचा सगळा वर्ग अशा रीतीनें उदरपोषणाकरितां परकीय राज्यकर्त्यांच्या अगदीं कह्यांत गेल्यावर देशाची उन्नति लवकर झाली नाहीं, तर त्यांत नवल ते कोणतें ? सेवाधर्म हा गुणच असा आहे कीं, त्यांत स्वाभिमानादि इतर गुण लोपून जातात; आणि विशेषेकरून ज्या वेळीं अशा प्रकारचे सेवक तयार करण्याकरितांच शाळा व कॉलेजें स्थापून त्यांतून देशांतील तरुण पिढीस सदर धर्मास अनुकूल असे आरंभापासूनच शिक्षण देण्यांत येतें तेव्हां या वर्गाच्या आंगचे गुण सेवाधर्मापुढें लोपतात इतकेंच नव्हे, तर तरुण पिढींत सेवाधर्मास योग्य अधिकारी होण्यापूर्वीच ते गुण बहुतेक नामशेष होतात. अशाही परिस्थितींत एखादा तरुण विद्यार्थी जरासा तेजस्वी निघाला तर तो नोकरींत पडल्याबरोबर लागलीच थप्पड खातो आणि त्याही थपडीनें ताळ्यावर न आल्यास लवकरच उदरपोषणाकरितां त्याला दुसरा कांहीं तरी मार्ग अंगिकारावा लागतो. ही स्थिति अत्यंत शोचनीय होय, असें कोणीही कबूल करील. पांढरपेशा वर्गाच्या पोषाखाकडे किंवा राहणीकडे दृष्टी दिली असतां हा वर्ग नैतिक दृष्ट्या निकृष्टदशेस पोंचला असेल अशी सहसा कल्पना होत नाहीं. पण जरा खोल विचार केला तर खरी स्थिति काय आहे हें सहज कळून येतें. आम्ही हा जो दोष दाखवीत आहों तो आमच्या लोकांचा असल्यामुळें आमच्यावर कदाचित् कांहीं शाहाणी मंडळी स्वजातिद्रोहाचाही आरोप करण्यास मागें पुढें पाहणार नाहीं. परंतु या परकीय राज्यांत आमच्या देशातील प्रजेच्या हिताच्या आड ज्या कांहीं गोष्टी येताहेत–मग त्या राज्यकर्त्यांबद्दलच्या असोत किंवा स्वदेशी नोकरांबद्दलच्या असोत–त्यांचें निर्भयपणें विवेचन करणें हें आमचें कर्तव्य आहे."—केसरी, ता. २०।६।०५

वरील विचारांवरून हिंदुस्थानास सर्व बाजूंनीं किती निकृष्टावस्था प्राप्त झाली आहे हें वाचकांस कळून येईल. देशांतील शेतसारा जबर वाढला आहे; लाखों लोक अर्धपोटीं राहून दिवस काढताहेत; दारिद्र्य ' आ ' पसरून बसलें आहे; सरकारी परवान्याशिवाय जंगलांतील पानासही हात लावण्याची लोकांस परवानगी नाहीं; लोक निःशस्त्र केल्यामुळें क्रूर श्वापदापासून पिकांचें किंवा स्वतःचें संरक्षण करण्यासही ते असमर्थ आहेत; मिठासारख्या जरुरीच्या पदार्थावरही जबर कर असल्यामुळें तें महाग होऊन त्यामुळें अनेक व्याधी उत्पन्न होत आहेत; व्यापार, कर, पेन्शनें वगैरेंच्या रूपानें इकडील संपत्तीचा ओघ सारखा सातासमुद्रापलीकडे चालला आहे; राज्यव्यवस्था अत्यंत खर्चाची झाली आहे; मोठमोठ्या पगाराच्या बहुतेक जागा युरोपियन लोकांना मिळत आहेत; लष्करी खर्च आतोनात वाढला आहे; हिंदुस्थानच्या खर्चानें इंग्लंडच्या साम्राज्याची मर्यादा विस्तृत करण्याचा प्रयत्न होत आहे; राजेरजवाडयांना बुद्धिबळांतील स्थिति प्राप्त झाली आहे; नाताळ, ट्रान्सवालसारख्या युरोपियन वसहातींतील हिंदी प्रजेला अगदीं गुलामाप्रमाणें वागविण्यांत येत आहे; व पार्लमेंट आणि महाराणी व्हिक्टोरिया यांनीं वेळोवेळीं लोकांस दिलेलीं वचनें पायाखालीं तुडवून अधिकारी-वर्ग लोकांचें शिक्षण, बुद्धिमत्ता व स्वातंत्र्य यांची वाढ जेणेंकरून खुंटेल अशा प्रकारच्या राजकीय धोरणानें हिंदुस्थानचा राज्यकारभार हांकीत आहे. तात्पर्य, हिंदुस्थानची राजकीय बाबतींत सर्व बाजूंनीं अवनति होत चालली आहे हें टिळक यांच्या वर दिलेल्या निरनिराळ्या विषयांवरील मतांवरून कळून येईल. या अवनतीच्या बारिकसारिक अंगांचें वर्णन देण्याइतकें येथें स्थल नाहीं; तथापि, वरील ठोकळ विचारांवरून त्याची कोणासही बरोबर कल्पना आल्यावांचून राहणार नाहीं.

## उन्नति कशी होईल ?—दोन मार्ग.

ही अवनति दूर होण्यास राज्यकर्त्यांनीं प्रजेची खरी स्थिति समजून घेऊन आपलीं कर्तव्यें योग्य रीतीनें बजावलीं पाहिजेत; व दुसऱ्यापक्षीं प्रजेनें आपली स्थिति ओळखून इष्ट सुधारणा घडवून आणण्यासाठीं कायदेशीर प्रयत्न केले पाहिजेत, असें टिळक यांचें मत असून त्यासंबंधीं त्यांनीं जागजागीं जे विचार प्रगट केले आहेत ते थोडक्यांत येथें देतों.

**राज्यकर्त्यांच्या कर्तव्या**विषयीं ते लिहितातः—

"इंग्रजसरकारचें राज्य या देशावर दीर्घकाल राहूं नये असें आह्मी ह्मणत नाहीं; उलट तें आह्मांस लखलाभ होऊन इंग्लंड देशाच्या मदतीनें आमच्या या पुरातन आर्यभूमीचें वैभव पुन्हां जगाच्या निदर्शनास यावें अशी आमची मनापासून इच्छा आहे. आमचें ह्मणणें एवढेंच आहे कीं, इंग्रजी सार्वभौमाचा चिरस्थायीपणा न्याय आणि दया या तत्वांवर अधिकाधिक बळकट रचण्याचें सोडून देऊन केवळ ऐश्वर्याच्या भपक्यानें, अधिकाराच्या दर्पानें आणि बडेजावकीच्या तोऱ्यानें जे मुत्सद्दी तें चिरस्थायी करण्याची हांव धरतात ते बादशहाचे व प्रजेचे खरे हितकर्ते नव्हत. आणि हिंदुस्थानावर सांप्रत बादशहाचे प्रतिनिधी ह्मणून जे मुत्सद्दी राज्य करीत आहेत तेही याच वर्गांतील होत. राजे नवरेपणा ह्मणून गाजवल्यानें ज्याप्रमाणें दंपत्यांतील स्नेह वाढत नाही, तो वाढण्यास खरोखरच प्रेमाचा अंकुर फुटला पाहिजे; तद्वतच राजा आणि प्रजा यांमधील संबंध होय. प्रजेस ममतेनें वागविणें, संकटसमयीं त्यांस मदत करणें, त्यांच्या व्यापाराची व उद्योगधंद्याची अवनती झाली असल्यास ती जेणेंकरून भरून येईल असे उपाय अमलांत आणणें, परराष्ट्रांतील व्यापारी लोकांच्या मोहिमेपासून त्यांचें संरक्षण करणें व त्यांस योग्य हक्क देऊन स्वतःचें संरक्षण करण्यास समर्थ करणें, हें शहाण्या व दूरदर्शी राज्यकर्त्यांचें कर्तव्य होय"—केसरी, ता. ६।१।०३.

* * * *

"गुलामगिरी हा धंदाच असा आहे कीं, गुलामाचा धनी त्यामुळें आपणास कितीही कृतकृत्य समजत असला तरी गुलामाबरोबर धन्याची स्वतंत्रता त्यामुळें कमी होत असते. व्यक्तिमात्रास लागू असणारा हा नियम राष्ट्रांसही लागू आहे. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रास कायमच्या गुलामगिरींत ठेवल्यानें दोन्हीही राष्ट्रें सारखींच अधःपतन पावतात. वैभवाच्या, मर्दुमकीच्या किंवा अभिमानाच्या भरांत ही गोष्ट विजयी लोकांच्या लक्षांत येत नाही, पण त्यामुळें राष्ट्रीय नीतिशास्त्राचे जे कांहीं अपरिहार्य नियम आहेत त्यांस कोणत्याही तऱ्हेचा बाध येत नाहीं. अशा दृष्टीनें पाहिलें ह्मणजे इंग्रजी साम्राज्याची सांप्रतची स्थिति शोचनीय आहे; आणि हल्लीं संचार करीत असलेल्या साम्राज्यकल्पनेच्या पिशाच्यास जर लवकर गति मिळाली नाहीं तर नीतिमत्तेला सोडून नुसत्या तरवारीच्या जोरावर इंग्रजी साम्राज्य कधींही चिरस्थायी व्हावयाचें नाहीं; गळ्यांत धोंडा बांधलेल्या पुरुषाप्रमाणें तें अनीतीच्या समुद्रांत गटंकळ्या खात तळास जाईल हें निर्विवाद आहे. आणि सर हेनरी कॉटन यांजप्रमाणें आह्मांसही अशी उमेद आहे कीं, विलायतेंतील मुत्सद्दी ही अविचाराची व असमंजसपणाची दिशा सोडून राष्ट्रीय नीतिमत्तेच्या पायावर समबुद्धीनें साम्राज्याचा कारभार चालविण्यास लवकरच तयार होतील."

—केसरी, ता. १३।१२।०४.

सरकारानें **शेतकीची सुधारणा** कशी केली पाहिजे याविषयीं ते लिहितातः—

"मुंबई इलाख्यांतच काय पण एकंदर हिंदुस्थानांत शेतकी हें लोकांच्या निर्वाहाचें मुख्य साधन आहे ही गोष्ट निर्विवाद आहे; व शेतीची सुधारणा ह्मणजे लोकांच्या सांपत्तिक स्थितीची सुधारणा हेंही कोणास नाकबूल होणार नाही. तथापि, शेतीची सुधारणा ह्मणजे काय, ती कोणत्या प्रकारानें घडवून आणली पाहिजे आणि त्याकरितां काय काय तजविजी केल्या पाहिजेत, या बाबतींत मतभेद होणें शक्य आहे. आजपर्यंत टी, कॉफी, कोको, नीळ वगैरे कांही नवे पदार्थ हिंदुस्थानांत उत्पन्न करण्याच्या कामीं बरेच प्रयत्न झालेले आहेत. परंतु यांपासून जो फायदा व्हावयाचा तो सर्व युरोपियन शेतकऱ्यांच्या पदरांत पडलेला आहे. शेतकीची पुढील सुधारणा जर याच धर्तीवर व्हावयाची असेल तर ती झाली काय आणि ना झाली काय, हिंदुस्थानच्या गरीब शेतकऱ्यांस त्यापासून कांहींच फायदा व्हावयाच नाहीं............चहा, कॉफी, यांच्या लागवडीचीं उदाहरणें या कामास उपयोगी नाहींत; त्यापासून शेतकऱ्यांची स्थिति न सुधारतां युरोपियन प्लँटरचे ते गुलाम बनून जातात आणि मग गुलामांची वाण पडूं लागली ह्मणजे त्यांचे एकामागून एक एकसारखे तार्फे पाठविण्यास हिंदुस्थानसरकारच्या कायदेकौन्सिलाच्या टांकसाळीची मदत घ्यावी लागते हें आतां सर्वांस माहित झालेलें आहे. शेतकीच्या सुधारणेची ही दिशा सो न दिली ह्मणजे देशांतील हल्लींच्या शेतकरीवर्गास दुसऱ्या कोणत्या रीतीने साहाय करितां येईल हा प्रश्न सहजच डोळ्यांपुढें उभा राहतो. युरोपांतून किंवा इंग्लंडांतून जे कांहीं थोडे शेतकीच्या कामांत प्रविण शास्त्रज्ञ पंडित या देशांत येऊन इकडील शेतीची पद्धत पाहून गेलेले आहेत त्यांचें असे मत झालेलें आहे की, शेतकीची जी क्रिया व पद्धत या देशांत प्रचारांत आहे तींत एकदम विशेषशी सुधारणा होणे शक्य नाहीं. हजारों वर्षांच्या अनुभवानें कोणत्या जमिनीत कोणतीं पिकें करावीं, पिकांचा फेरपालट कोणत्या तऱ्हेचा असावा, जमीन पडीत केव्हां टाकावी, कोणत्या प्रांतांत कोणत्या वेळीं धान्य पेरावें, वगैरेबद्दलचे नियम आमच्या इकडच्या शेतकरी लोकांस परंपरेनें चांगले माहित झालेले आहेत. आणि हा त्यांचा अनुभव आधुनिक शास्त्रपद्धतीच्या साहायानें फारसा सुधारतां येणार नाहीं असें कांहीं पाश्चात्य शेतीशास्त्रज्ञांचें मत आहे. हें खरें असो वा खोटें असो, एवढी गोष्ट निर्विवाद आहे की, शेतकऱ्यांची हल्लींची दरिद्रावस्था लक्षांत आणिली असतां केवळ पावसावर अवलंबून असणाऱ्या जिराईत जमिनीची खत घालून किंवा अन्य तऱ्हेनें सुधारणा करण्याचें काम त्यांच्या हातून होईल कीं नाहीं याचा वानवाच आहे. ज्याच्याजवळ थोडासा पैसा असून बागाईत जमीन आहे त्याची स्थिति निराळी; पण ती सुधारण्यासही सरकार जें शेतीखातें काढणार त्याचा

या लोकांशीं निकट संबंध असून सदर खात्यांतील अंमलदारही चांगल्या अनुभवाचे व शेतकऱ्यांच्या खऱ्या कळकळीचे असले पाहिजेत. एरव्हीं, सरकारानें कितीही पैसे शेती-खात्यावर खर्च केले तरी त्याचा कांहीं एक उपयोग व्हावयाचा नाहीं. शेती-संबंधाचें शिक्षण लोकांस मिळालें पाहिजे, शिक्षणावांचून त्यांची सुधारणा व्हावयाची नाहीं हें सामान्य तत्व आह्मांस इतरांप्रमाणेंच मान्य आहे. पण या सामान्य तत्वाचा अनेकवार उच्चार केल्यानें कांहीं कार्यसिद्धी होत नाहीं. खरें शेतीशिक्षण ह्मटलें ह्मणजे प्रत्येक तालुक्यांतील किंबहुना प्रत्येक खेड्यांतील शेतकऱ्यास अमुक एक पीक तूं हल्लीं करतोस त्यापेक्षां अमक्या एका रीतीनें केल्यास तुला अधिक फायदा होईल असें अनुभवानें सांगणारे व जरूर पडल्यास कृतीनें सिद्ध करून दाखविणारे लोक शेतीखात्यांत असले पाहिजेत. हें काम अर्थातूच बऱ्या पगारांच्या दहा पांच जागा काढल्यानें व्हावयाचें नाहीं. शेतकीच्या नव्या कृति, लावणी, पेरणी किंवा कांपणी यासंबंधाचे नवे शोध, नवीन बियाणें, नवीन जिन्नस व ते तयार करण्याच्या रीति, आपल्याकडे हल्लीं शेतकीचे जे जिन्नस तयार होतात त्यांचे पीक वाढविण्याचे मार्ग, वगैरे सर्व कांहीं ज्या शाळांतून सप्रयोग आणि सशास्त्र शिकविलें जाईल अशी इलाख्यांत एक मोठी, आणि इलाखाभर लहान लहान शाळा निघाल्या पाहिजेत. हल्लीं शाळाखात्याकडून खेडोखेडीं शेतकऱ्यांच्या मुलांस ओनामा शिकविण्याच्या शाळा निघाल्या आहेत; आणि हल्लींच्या डायरेक्टर साहेबांच्या कारकीर्दीत किंडरगार्टन पद्धतीप्रमाणें त्यांत गोट्यांची, रंगाची, ड्राइंगची किंवा इतर बालोद्यानपद्धतीच्या शिक्षणवस्तूंची भर पडत आहे. परंतु या असल्या शिक्षणानें गेल्या पन्नास वर्षांत शेतकऱ्यांच्या मुलांस कांहीं फायदा झाला आहे कीं नाहीं, याचा अद्याप कोणी विचार केलेला दिसत नाहीं. सही करण्यापुरतें लिहितां येणारे शेतकरी अगर शेतकऱ्यांचीं मुलें पूर्वींपेक्षां आतां अधिक झालीं असतील; आणि यांपैकीं कांहीं इंग्रजी शाळांत शिरून ब्राह्मणाबरोबर कारकुनीच्या जागांकरितांही अर्ज करण्यास तयार झालीं असतील. पण आमच्या दृष्टीनें पाहतां हा देशास मोठा फायदा झाला असें आम्ही समजत नाहीं. व्यापारी लोकांस ज्याप्रमाणें पैशाचे दोन पैसे कसे करावयाचे ही विद्या मुख्य समजतात, त्याप्रमाणें शेतकरी लोकांत खंडीचें दोन खंडी पीक कसें येईल ही विद्या प्रधान समजली जाते; आणि खेडेगांवांतील हल्लींच्या सर्व सरकारी शाळा घेतल्या तर शेतकऱ्यांस आवश्यक अशा या विद्येचें बीज या शाळांतून त्यास मिळत नाही असें स्पष्ट ह्मणावें लागतें. जमिनीची मोजणी इंग्रजी राज्य झाल्यापासून तीनदां झाली; आणि तीस तीस वर्षांनीं वाढणारे सारे कांहीं ठिकाणीं तिसऱ्यांदा वाढले आहेत व कांहीं ठिकाणीं वाढविण्याचा क्रम चालू आहे. पण शेतकऱ्यांच्या खऱ्या कल्याणाचा मार्ग सरकारानें अद्याप स्वीकारला नाहीं असें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें. उदाहरणार्थ, आह्मी एकच ह्मणजे कापसाच्या लागवडीची गोष्ट घेतों. या देशांत लांब धाग्याचा कापूस हल्लीं होत नाहीं हें खरें

आहे. पण तो कधींच व्हावयाचा नाहीं असें कोणीही शास्त्रज्ञ कबूल करणार नाहीं. इजिप्त देशांतील कापूसही आमच्याप्रमाणेंच अगदीं हलक्या प्रतीचा असे. पण तो आतां सुधारून पुष्कळ चांगला निघत आहे हे प्रसिद्ध आहे. हिंदुस्थानांत तशा प्रकारची सुधारणा कां झाली नाहीं व कां होऊं नये हें आह्मांस समजत नाहीं. कापसाच्या बाबतींत जर एक सुधारणा होईल तर कोट्यावधि रुपयांचें जें आह्मी बारीक सुताचें कापड विलायतेहून खरेदी करून आणतों तें आह्मांस येथेंच तयार करतां येणार नाहीं काय ? तात्पर्य, एक कापसाच्या लागवडीची सुधारणा करणें ह्मणजे कोट्यावधी रुपयांचें देशाचें कल्याण करण्यासारखें आहे. परंतु या कामास अवश्य लागणारे शोध करण्यास सरकारांतून आजपर्यंत सतत एकसारखे प्रयत्न झालेले मुळींच नजरेस येत नाहीत. मग ते विलायती व्यापारास धक्का येईल ह्मणून होत नाहीत किंवा त्यास दुसरें कांहीं कारण आहे हें आह्मी सांगूं शकत नाहीं. परंतु एवढी गोष्ट खरी आहे की, शेतीची सुधारणा ह्मणजे नुसत्या पिकाची सुधारणा नव्हे तर त्या पिकापासून पुढें जो माल तयार होतो तो माल तयार करण्याचेही कारखाने या देशांत निघाले पाहिजेत. उदाहरणार्थ, उसाच्या पिकाची सुधारणा झाल्यास त्याबरोबर साखर तयार होणाऱ्या कारखान्याचीही अभिवृद्धि झाली पाहिजे. किंवा रबराचा चीक येथें तयार झाल्यास रबराच्या वस्तूचे कारखानेही येथे निघाले पाहिजेत. ज्या जावा बेटाचा दृष्टांत सरकाराकडे गेलेल्या अर्जांत नमूद केलेला आहे त्या बेटांत आह्मीं ह्मणतों त्याप्रमाणेंच स्थिति आहे. डच किंवा पोर्तुगीज हे लोक इंग्रज लोकांप्रमाणें केवळ व्यापारी नसून शेतकरीही आहेत. करितां त्यांच्या राज्यांत शेतकीची सुधारणा हा विषय महत्वाचा मानला जाऊन शेतीसुधारणेचीं मोठमोठीं खातींही कायमचीं काढलेलीं आहेत. चार पांच एकर जमीन प्रत्येक माणसास मिळाली असतां त्यानें शेती करून, त्यावर सरकारी सार जाऊन त्यानें आपल्या कुटुंबाचा निर्वाह कसा करावा, हें प्रत्येक शेतकऱ्यास समजणें अवश्य आहे; व अर्जांत नमूद केल्याप्रमाणें शेतकऱ्यांस या गोष्टी समजून सांगण्याची जबाबदारी अमेरिका, फ्रान्स, हालंड, इटाली वगैरे देशांतून सरकारानें आपल्या अंगावर घेतलेली आहे. हिंदुस्थानसरकार जर याचप्रमाणें ही जबाबदारी आपल्या अंगावर घेईल व शेतीच्या सुधारणेपासून जें जास्त उत्पन्न होईल तें साऱ्याच्या रूपानें पुन्हां तिजोरींत परत घेऊं इच्छिणार नाहीं, तर आपल्या कर्तव्यापैकीं मुख्य कर्तव्य आमच्या सरकारानें बजावल्यासारखें होईल; आणि दुष्काळ आणि त्याचा पाहुणा प्लेग यांची या देशांत फार दिवस वस्ती टिकणार नाहीं. पण ही गोष्ट व्हावी कशी, एवढाच कायतो प्रश्न आहे. सर्व हिंदुस्थानभर पूर्वी एकछत्री राज्य कधींही नव्हतें; तथापि, विजयनगरसारख्या पूर्वीच्या मोठ्या राज्यांतील शिस्त पाहिली तर दरबारचा खर्च भागून बाकी राहिलेला कराचा पैसा पाटबंधारे किंवा तळीं वगैरे बांधून शेतीच्या सुधारणेच्याच कामीं खर्च होत असे, असें आढळून येतें.

परंतु आमच्या हल्लींच्या सरकारानें एकादा कालवा काढला कीं, त्यास खर्च झालेल्या रकमेवर व्याज किती सुटतें इकडे सरकाराचें आधीं लक्ष असतें ! सर मॉँटिथसाहेब ह्मणतात त्याप्रमाणें एक्सपेरिमेंटल फार्मवर व्याज किती सुटतें हें सरकार पाहत नसेल, पण कालव्यांच्या उदाहरणावरून सरकारची दृष्टी कशी काय आहे हें चांगलें दिसून येतें. कराचा वसूल झालेला सर्व पैसा राज्यव्यवस्थेच्या कामी खर्च करून ' तुरीची काठी तुरीवर झाडावी ' या न्यायानें सरकार शेतीची सुधारणा करण्यास प्रवृत्त झाल्यास त्यापासून लोकांस खरा फायदा व्हावयाचा नाहीं, असें जें अर्जदारांचें ह्मणणें आहे तें आह्मांस मान्य आहे; आणि तें सरकारानें लक्षांत ठेवावे अशीही त्यांस आमची विनंति आहे. "—केसरी, ता. २२-९-०३.

**शेतकऱ्यांच्या परस्पर–साहाय्यकारी·पेढ्यासंबंधानें** ते *लिहितात*:—

" शेतकऱ्यांची स्थिति सुधारावयाची असेल तर पूर्वीच्या अमदानींत खेडेगांवांतील लोकांस जे धंदे करतां येत असत ते अगर तशा प्रकारचे धंदे त्यांस मिळावे अशा प्रकारें तजवीज करून हलक्या व्याजानें शेतकऱ्यांस पैसे मिळतील अशी व्यवस्था करा, असें लोकपक्षाचें ह्मणणें आहे आणि त्याप्रमाणें कांहीं उदारबुद्धीच्या सावकारांनीं एकत्र जमून आपणांस सरकार कांहीं सवलती देत असेल तर आपण शेतकीच्या पेढ्या काढून शेतकऱ्यांस हलक्या व्याजानें पैसे देण्यास तयार आहों, असें सरकारांस कळविलें होतें. पण ही व्यवस्था सरकारास रुचली नाहीं व सर डब्ल्यू बेडरबर्न सारखे गृहस्थ मध्यस्थ असतांही अशा तऱ्हेच्या सावकारी पेढ्यांस सरकार मदत करण्यास तयार नाहीं, असा या कामीं उद्योग करणारास जबाब मिळालेला आहे. ही गोष्ट येथें नमूद करण्याचें कारण एवढेंच कीं, सरकारचें या कामीं धोरण कोणत्या प्रकारचें आहे हें वाचकांच्या नीट लक्षांत यावे. शेतकरी किंवा कारागीर आणि सरकार यांच्या दरम्यान नेहमीं जमिनदार किंवा सावकार यांच्यासारखा धनिक वर्ग प्रत्येक देशांत असतो. हिंदुस्थानांतच सावकाराचे कारागिरांवर किंवा शेतकऱ्यांवर प्राबल्य चालतें असें नाहीं, तर इंग्लंडसारख्या देशांतही ही स्थिति शतपट अधिक प्रमाणानें दृष्टीस पडते. ज्या गृहस्थांनीं कोट्यावधी रुपये खर्च करून इंग्लंडांत सूत काढण्याचे, कापड विणण्याचे, लोंकरीचे, लोखंडाचे, वगैरे मोठमोठे कारखाने काढले आहेत त्या कारखान्यांतील बहुतेक मजूर आपल्या जीवनार्थ या कारखानदारांच्या मर्जीवरच अवलंबून असतात. हे मजूर किंवा कारागीर आपापल्या मंडळ्या काढून त्या मंडळीच्या जोरावर संपानें मोठमोठ्या कारखानदारांस अडवतात व हक्कानें अमुक एक मजुरी मागून घेतात असें कधीं कधीं आढळण्यांत येतें. पण एकंदरींत मजुरांचा वर्ग आपल्या धनिक कारखानदारांवर आणि शेतकऱ्यांचा वर्ग धनिक जामिनदारांवर अवलंबून असतो. ही गोष्ट सर्व देशांतून–सर्व पाश्चिमात्य देशांतूनही–चांगली नजरेस येते. परंतु हिंदुस्थानसरकारास तशी स्थिति नको आहे. येथील सरकारचें असें मत

आहे की, शेतकऱ्यांस जर कोणीं बुडविलें असेल तर तें सावकारांनींच बुडविलें आहे; आणि शेतकऱ्यांस सहाय्य करण्याकरितां सावकारांच्या जर पेढ्या निघाल्या तर शेतकरी उत्तरोत्तर अधिकाधिक सावकारांच्या कबज्यांत जातील व त्यामुळें सावकारांचें महत्व पूर्वीपेक्षांही अधिक वाढेल. सर डब्ल्यू वेडरबर्न यांचे मार्फत वीस पंचवीस वर्षांपूर्वी शेतकऱ्यांस मदत करण्याकरितां शेतकीच्या पेढ्या स्थापन करणारास सवलती देण्याचें सरकारानें जे नाकारिलें तें एवढ्याचकरितां होय. सरकारास सावकार नको आहेत, आणि देशांतील उद्योगधंदे सुधारून तद्वारां शेतकऱ्यांस मदत करण्याचेंही फारसें सरकारच्या मनांत नाहीं. सारांश, लोकपक्षाकडून शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचे जे कांहीं उपाय सुचविण्यांत आले आहेत ते सर्व सरकारानें बाजूस ठेवले आहेत; व त्याऐवजी आपल्या दृष्टीनें योग्य दिसतील असे दुसरे उपाय अमलांत आणण्याची सरकार तजवीज करीत आहे. पैकीं पहिला शेतकऱ्यांस ऋणमुक्त करण्याचा कायदा, ( Deccan Agriculturists' Relief Act ) दुसरा, पंजाब एलिएनेशन ॲक्ट व परवां पास झालेला लँड रेव्हिन्य ॲक्ट हा होय. शेतकऱ्यांच्या व कारागिरांच्या पेढ्या स्थापन करण्यासंबंधानें जो कायद्याचा मसुदा हिंदुस्थानसरकारच्या कायदेकौन्सिलापुढें नुकताच आला आहे तो याच धोरणावर रचलेला आहे....हल्लीं सरकारापुढें जो कायद्याचा मसुदा आहे तो कायदा सावकारांनीं पेढ्या काढण्याकरितां नव्हे, तर शेतकऱ्यांनी किंवा कारागिरांनीं आपण होऊन आपापसांत एकमेकांस मदत करण्याकरितां सावकारांची गरज न ठेवतां परस्पर साहाय्यकारी मंडळ्या काढण्याकरितां होय....परस्परसाहाय्यकारी मंडळ्यांचे भागीदार होऊन आपली स्थिति सुधारण्याइतके ऐपतदार किंवा जोमाचे शेतकरी देशांत नसल्यामुळें हल्लींचा कायदा आमच्या ग्रामसंस्थेप्रमाणेंच कायदेबुकांत मृतप्राय पडून राहण्याचा संभव आहे. कलेक्टर व रजिस्ट्रार यांच्या धामधुमीनें, वजनानें व अधिकारानें कांहीं दिवसपर्यंत परस्पर-साहाय्यकारी मंडळ्या सजीव आहेत असा भास होईल; पण अखेरीस हिंदुस्थानसरकारच्या या परस्पर–युक्तीपासून शेतकऱ्यांचें कल्याण होईल असें वाटत नाहीं. यापेक्षां हलक्या व्याजावर शेतकऱ्यांस पैसे मिळतील अशा प्रकारच्या सावकारांच्या पेढ्या काढण्यास जर सरकारानें मदत व उत्तेजन दिलें असतें तर फार चांगलें झालें असतें. पण स्वतःस झीज न सोसतां परभारें लोकांचें कल्याण करण्याची इच्छा अधिक उत्कट असल्यामुळें हलक्या व्याजानें पैसे देणाऱ्या सावकारांच्या पेढ्याऐवजीं शेतकऱ्यांच्या परभाऱ्या पेढ्या निघण्याची वेळ आली आहे. हा प्रयोग परिणामी हितकर होईल किंवा नाहीं याबद्दल सरकारासही थोडी शंका आहे, असें इबेट्सन साहेबांच्या बोलण्यावरून व वर सांगितलेल्या मलबारी शेटजीस दिलेल्या लॉरेन्स साहेबांच्या उत्तरावरून दिसून येतें. तथापि, सरकारचा ओढा परभारें काम भागविण्याकडे असल्यामुळें हें बिल बाहेर पडलें आहे; व आमचें मत कितीही प्रतिकूल असलें तरी तें पास होईल

यांत कांहीं शंका नाहीं. तथापि, आमच्या शेतकऱ्यांचें शिक्षण, त्यांची सध्यांची सामाजिक स्थिति, वगैरे लक्षांत आणतां अनुभवांतीं परस्पर-सहाय्यकारी मंडळ्यांची युक्ति आह्मी वर सांगितल्याप्रमाणें व निरुपयोगीच ठरेल, आणि अखेरीस लोकांच्या ह्मणण्याप्रमाणें शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यास त्यांस हलक्या व्याजानें पैसे मिळ-ण्याची योजना होऊन खेड्यांतील लोकांस करतां येतील अशा प्रकारच्या उद्योग-धंद्यांचीच देशांत अभिवृद्धि करावी लागेल, अशी आह्मांस खात्री आहे."

—केसरी ता. १० व १७ नोव्हेंबर १९०३.

धंदेशिक्षणासंबंधानें सरकारानें काय करावें याविषयीं ते लिहितातः—

" हिंदुस्थान देशांत पूर्वी जे जिन्नस तयार होत होते ते बहुतेक सर्व आतां परदेशांतून येऊं लागले आहेत; आणि ते परदेशांत ज्या पद्धतीने तयार होतात त्या पद्धतीचें ज्ञान आमच्या कारागिरांस झाल्याखेरीज आमच्या देशांतील धंदे पुन्हां कधींही ऊर्जितावस्थेस यावयाचे नाहींत, ही गोष्ट निर्विवाद आहे. हिंदुस्थानसरकारास ही गोष्ट पूर्णपणें माहित आहे, असें हल्लींच्या ठरावावरूनच दिसून येईल. या ठरावांत उद्योगधंद्यांचें दोन विभाग केलेले आहेत. एक सुताच्या व कापडाच्या गिरण्यासारखे पुष्कळ भांडवल व यंत्रसामग्री लागणारे; आणि दुसरे जिल्ह्यांतून किंवा खेडेगांवांतून थोड्या भांडवलानें सुरू होणारे लहान लहान कारखाने. पहिल्या तऱ्हेचे कारखानें मुंबई, कलकत्ता, मद्रास, अलाहाबाद, लाहोर, कानपूर वगैरे मोठमोठ्या शहरांतूनच व्हावयाचे व ते पैसेवाले लोकांनींच सुरू केले पाहिजेत. धंदेशिक्षणाच्या शाळांपासून अशा मोठमोठ्या कारखान्यांस जी काय मदत व्हावयाची ती एवढीच कीं, सदर कारखान्यांत लागणारे वरच्या प्रतीचे कारागीर, मोकदम किंवा कारागिरांवर देखरेख करणारे धंद्याचीं तत्वें समजणारे सुपरिंटेंडेंट या शाळांतून शिकून तयार व्हावेत; अर्थात् ज्या ज्या ठिकाणी जे जे मोठमोठे कारखाने असतील त्या त्या कारखान्यांतून उपयोगी पडणारे वरच्या प्रतीचे कारागीर व नोकर त्या त्या ठिकाणच्या शाळांतून तयार करण्याची तजवीज झाली पाहिजे. उदाहरणार्थ, मुंबईस कापसाचें सूत काढणें व विणणें याच्या मोठ्या गिरण्या आहेत; तर या गिरण्यांतून उपयोगी पडतील असे या धंद्याचें ज्ञान असलेले विद्यार्थी मुंबई येथील धंदेशिक्षणाच्या शाळेंत तयार झाले पाहिजेत. कानपुरास लोंकरीचे कपडे तयार करण्याचे कारखाने आहेत; तर तेथील धंदेशिक्षणाच्या शाळेंत तो धंदा शिकविला पाहिजे. ज्या धंद्यास मोठें भांडवल लागतें त्या धंद्यांतील शिक्षणासंबंधानें ही स्थिति झाली. परंतु वर सांगितल्या-पैकीं दुसऱ्या वर्गांतील ह्मणजे लहानसान धंद्यांसंबंधानें याहून निराळी व्यवस्था करणें जरूर आहे. कारण, या बाबतींत प्रत्येक धंद्यांचें पूर्ण ज्ञान एकाच माणसास देणें शक्य आहे, इतकेंच नव्हे तर जरूरही आहे. कुलपें, आगकाड्या, बटणें, छत्र्या

चष्मे, चाकू, साबण, वारनिसें, तेलें, चामडें कमावणें, रंग देणें, वगैरे लहानसान पुष्कळ धंदे असे आहेत कीं, ते थोड्या भांडवलानें निरनिराळ्या ठिकाणीं चालू शकतील. हे धंदे कसे करावे याचें ज्ञान जेथें मिळेल अशा शाळा हिंदुस्थानांत बहुतेक नाहींत असें ह्मटलें तरी चालेल. धंदेशिक्षण आह्मांस पाहिजे असे पुष्कळांस वाटूं लागलें आहे, आणि कांहीं म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डे यांनीं टेक्निकल स्कूलस् काढून त्यांत थोडेसें ड्राइंग व थोडेसें सुतारकाम शिकविण्याची कांही ठिकाणी तजवीज केली आहे. पण ज्यास खरें धंदेशिक्षण ह्मणतात तें याहून फार भिन्न आहे; व तें हल्लीं चालू आहे अशा प्रकारच्या टेक्निकल शाळा कितीही वाढल्या तरी त्यांत मिळावयाचें नाहीं. देशांतील कच्चा माल बाहेर किती व कोणत्या प्रकारचा जातो आणि तिकडे त्याचें कोणत्या प्रकारचें रूपांतर होऊन तो आपल्या देशांत परत येतो याची पहिल्यानें पुरी चौकशी झाली पाहिजे. अशी चौकशी झाल्या-खेरीज कोणत्या ठिकाणीं कोणता नवा धंदा करतां येईल हें सांगतां यावयाचें नाहीं. अर्थात् त्या ठिकाणीं अमुक एक धंदा शिकविण्याची शाळा काढली पाहिजे असेंही ठरविणें अशक्य आहे. क्रिबनेसाहेबांच्या कमिटीच्या रिपोर्टांतही असाच अभिप्राय दिला आहे, व कोणत्या धंदेशिक्षणाच्या कोणत्या शाळा कोठें काढाव्या हें सध्यां आप-णांस ठरवितां येत नाहीं असें लिहिलें आहे. कमिटीचें ह्मणणें बरोबर आहे. पण त्याचा हिंदुस्थानसरकारानें आपल्या ठरावांत कांहीं विचार केलेला दिसत नाही. कोणत्या प्रांतांत किंवा जिल्ह्यांत कोणत्या प्रकारचा कच्चा माल तयार होतो किंवा मिळतो व त्याचे काय काय पदार्थ तयार करतां येतात, याची पाहणी सरकारानें आधीं केली पाहिजे. ही कल्पना कांहीं नवी नाहीं. अशा प्रकारची सूचना वर्तमानपत्रांतून, औद्योगिक परिषदेकडून किंवा इतर संस्थांकडून आज पुष्कळ वर्षें करण्यांत येत आहे. पण अद्याप कोणत्याही इलाख्यांत अशा प्रकारची औद्योगिक पाहणी झालेली नाहीं. जमिनीची सर्व्हे किंवा पाहणी करून सारे ठरविण्याकरितां किंवा वाढविण्याकरितां सरकारानें काढलेलीं मोठमोठीं खातीं चालू आहेत. पण लहानसान धंदे देशांत सुरू करण्यास अवश्य लागणारी जी औद्योगिक पाहणी ती करण्यास अद्याप सरकार तयार नाहीं. हल्लींच्या ठरावांत हिंदुस्थानसरकार असें ह्मणतें कीं, लहान लहान धंदेशिक्ष-णाच्या शाळा काढण्याचा जो प्रश्न आहे त्याचा विचार स्थानिक सरकारानें करावा. पण या ह्मणण्यांत आह्मांस कांहीं अर्थ दिसत नाहीं. स्थानिक सरकारच्या खर्चाकरितां दर पांच वर्षांनीं प्रांतिक करार करून जी रक्कम किंवा उत्पन्नाच्या बाबी हिंदुस्थान-सरकार प्रांतिक सरकारास देतें त्या उत्पन्नांत प्रांतिक सरकारचा खर्च भागण्याचीच मारामार पडत असते; मग धंदेशिक्षणाच्या शाळा काढण्याकरितां जो पैसा लागणार तो प्रांतिक सरकार कोठून आणणार ? शिवाय कांहीं धंदे असे आहेत कीं, ते चालविण्याचा विचार एका इलाख्यांतील प्रांतिक सरकारानेंच करून उपयोगी नाहीं. अर्थात् हिंदुस्थानसरकारानेंच हें काम हातीं घेतलें पाहिजे, तरच तें नीट तडीस

जाईल. पण लॉर्ड कर्झन तसें करण्यास तयार नाहींत. कर्नेल क्रिबर्न यांच्या कमिटीचें असें मत आहे कीं, लहान लहान धंदे शिकविण्याकरितां ज्या शाळा काढावयाच्या त्यांत धंद्यासंबंधानें नुसतें शिक्षण देऊन उपयोगी नाहीं, तर तो धंदा फायदेशीर रीतीनें कसा चालवावा हें व्यापारी शिक्षणही त्यांत मिळालें पाहिजे. उदाहरणार्थ, चामड्याचा, कांचेचा किंवा साखरेचा कारखाना घ्या. या कारखान्यांत ज्या रासायनिक क्रिया लागतात त्या विद्यार्थ्यांस शिकविल्या तर तेवढयानें हे धंदे फायदेशीर रीतीनें चालविण्यास विद्यार्थी तयार होत नाहींत. यासाठीं फायदेशीर रीतीनें हे धंदे जे लोक चालवितात अशा लोकांच्या कारखान्यांतून विद्यार्थी उमेदवार ह्मणून ठेवावे आणि त्यांस अवश्य लागणारें लिहिण्यावाचण्याचें, ड्राइंगचें आणि रासायनिक शास्त्राचें ज्ञान धंदेशिक्षणाच्या शाळेंत द्यावें अशी कमिटीनें सूचना केली होती; आणि अशा प्रकारची शाळा नेपल्स ( इटली ) येथें चालू आहे त्या नमुन्यावरच इकडे शाळा कराव्या असें ह्मटलें होतें. हल्लीं आमच्या देशांत जे धंदे चालू आहेत त्यासंबंधानें पाहिलें तर ही सूचना कांहीं वावगी नव्हती; किंबहुना नवे धंदे लोकांस शिकविल्यानंतर त्यांपैकीं जे लोक कारखाने काढतील त्यांचे ते कारखाने आणि धंदेशिक्षणाच्या शाळा यांची परस्पर जोड राहणेंही इष्ट आहे. पण हिंदुस्थानसरकार या बाबतींत कांहीं उद्योग करण्यास तयार आहे असें त्यांच्या हल्लींच्या ठरावावरून दिसत नाहीं. कमिटीची सूचना हिंदुस्थानसरकारास मान्य नाहीं तर ती राहूंद्या. पण त्याऐवजीं दुसरी कांही तरी तोड हिंदुस्थानसरकारानें काढावयास पाहिजे होती. तशी तोड काढलेली हल्लींच्या ठरावांत कोठें दिसत नाहीं. सध्यां हिंदुस्थानसरकारानें जें काय केलें आहे तें एवढेंच कीं, धंदेशिक्षणाकरितां दरसाल १५० पौंडांच्या स्कालरशिपा देऊन हिंदुस्थानांतील दहा विद्यार्थी परदेशांत पाठवावयाचे. या विद्यार्थ्यांनीं कायदा, वैद्यकी, जंगल, इंजिनियरिंग आणि शेतकी यांखेरीज दुसरा कोणता तरी विषय घेतला पाहिजे असा सरकारचा ठराव आहे. या स्कालर्शिपा विशेषेंकरून मुंबईतील कापडांच्या गिरण्यांचे कारखाने आणि बंगाल्यांतील कोळशाच्या खाणीचे कारखाने या दोन बाबतींत ज्या प्रकारचें शास्त्रीय ज्ञान लागतें त्या प्रकारचें ज्ञान संपादन करण्याकरितां काढलेल्या आहेत; ह्मणजे वर मोठमोठ्या शहरांतील आणि जिल्ह्यानिहाय चालणारे असे जे धंद्यांचे दोन वर्ग केले आहेत त्यांपैकीं पहिल्या ह्मणजे मोठ्या भांडवलानें चालणाऱ्या धंद्यासंबंधानें ही व्यवस्था केली आहे असें दिसतें. आजपर्यंत सरकारानें या बाबतींत कांहींच केलें नव्हतें त्यापेक्षां सालीना १५० पौंडांच्या दहा स्कालर्शिपा सुरू केल्या याबद्दल सरकारचे आह्मीं आभार मानतों. पण जिल्ह्याजिल्ह्यांतून लहान लहान नवे धंदे लोकांस शिकविण्याकरितां किंवा बुडत चाललेले धंदे सुधारण्याकरितां ज्या शाळा पाहिजेत त्या निघाल्याखेरीज देशाची औद्योगिक उन्नति कधींही व्हावयाची नाहीं. ”

—केसरी, २६।१।१९०४.

संरक्षित अथवा सप्रतिबंध व्यापारासंबंधानें ते ह्मणतातः—

" अप्रतिबंध व्यापाराचें तत्व जरी सयुक्तिक असलें तरी तें ज्या दोन देशांतील व्यापारधंदे सारख्याच उत्कर्ष-दशेस आले आहेत त्यांसच लागू पडतें, इतरांस पडत नाहीं असें आतां अर्थशास्त्रज्ञांनी ठरविले आहे. किंबहुना जेव्हां एकादा देश शेतकऱ्यांनींच भरलेला असतो तेव्हां शेतकीच्या स्थितींतून त्यास काढून त्यांत उदीमधंद्याचें बीजारोपण करण्यास खुल्या व्यापाराचें तत्व सोडून देऊन सप्रतिबंध व्यापाचें तत्वच अंगिकारलें पाहिजे असें अर्थशास्त्रज्ञांचें मत आतां झालें आहे; आणि हेंच तत्व खरें आहे अशी सूक्ष्म विचारांतीं कोणाचीही खात्री होईल. उघडच आहे कीं, दोन समवयस्क आणि सारखे तयार झालेल्या पहिलवानांच्या कुस्तीस जे नियम लागू पडतात तेच नियम एके बाजूस चांगला पहिलवान व दुसरे बाजूस किरकोळ मनुष्य असतां कधीही लागू पडावयाचे नाहीत. पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांनी आपापसांत कराचा वगैरे प्रतिबंध न ठेवतां व्यापाराची सर्वांस सारखी मोकळीक ठेवावी हें समशीलतेचें तत्व बरोबर नाहीं असें कोण ह्मणेल? मात्र ज्या राष्ट्रांमध्ये हें खुल्या व्यापाराचें तत्व अमलांत यावयाचे ती इतर बाबतींतही सारखी सुधारलेली असलीं पाहिजेत. दोन्ही राष्ट्रें सारखींच समंजस, सारखींच उद्योगी आणि व्यापारधंद्यांत सारखींच पुढें सरसावला असल्यावर त्यांच्या दरम्यानचा व्यापार खुला राहण्यास कोणतीही हरकत नाहीं; इतकेंच नव्हे तर, खुला राहणेंच श्रेयस्कर होय. परंतु इतर बाबतींत अशा प्रकारची समता नसतां केवळ सक्तीनें एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर अप्रतिबंध व्यापाराचे तत्व लादणें, ह्मणजे या दुसऱ्या राष्ट्राचे सर्वस्वी नुकसान करणें होय. ही गोष्ट अमेरिका, जर्मनी, फ्रान्स आणि रशिया या स्वतंत्र राष्ट्रांतील लोकांच्या नजरेस येण्यास फारसा वेळ लागला नाहीं. आणि गेल्या ५०।६० वर्षांत त्यांनीं आपल्या हद्दीत येणाऱ्या परदेशी मालावर जबर जकात बसवून, आणि स्वदेशांत उद्योगधंद्यांच्या शाळा काढून, अथवा उद्योगधंद्याच्या उत्तेजनार्थ देणग्या देऊन आपापल्या देशांतील व्यापाराची किंवा उद्योगधंद्यांची अभिवृद्धि केलेली आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं, पूर्वीं ज्या वस्तु इंग्लंड देशांतच तयार होत व तेथूनच परदेशांत जात, त्या आतां जर्मनी किंवा अमेरिका देशांत तयार होतात. इतकेंच नव्हे तर, विलायती वस्तूंपेक्षां त्या अधिक स्वस्त दरानें मिळूं लागल्या आहेत."

—केसरी, ता. १६।६।०३.

वरील विवेचनावरून शेतकी, उद्योगधंदे, व्यापार, या बाबतींत सरकारानें कसें वर्तन ठेविलें पाहिजे याविषयीं टिळक यांचे विचार काय आहेत हें वाचकांस कळून येईल. याखेरीज शिक्षण, नोकऱ्या वगैरे इतर बाबींही महत्वाच्या असून राजकीय अवनतीचें चित्र रेखाटतांना

त्यांची कशी सुधारणा केली पाहिजे याचा त्यांतील विवेचनावरूनच निर्णय हात असल्यामुळें त्याविषयीं निराळा उल्लेख करण्याचें कारण नाहीं. राज्यव्यवस्थेंतील निरनिराळ्या अंगासंबंधानें गेल्या आठ सालांत त्यांनीं जे लेख लिहिले आहेत त्यांत सरकारानें प्राथमिक शिक्षणाचा दिवसेंदिवस जास्त फैलाव करून उच्च प्रतीच्या शिक्षणानें लोकांत स्वाभिमान व कर्तबगारी अधिकाधिक उत्पन्न केली पाहिजे, कायमधाऱ्याची पद्धत सर्वत्र सारखी सुरू करून असह्य झालेल्या करांचें ओझें लोकांच्या डोक्यावरून उतरलें पाहिजे, हत्याराच्या कायद्यांत दुरुस्ती करून लोकांना लष्करी शिक्षण दिलें पाहिजे, वरिष्ठ प्रतीच्या नोकरींत नेटिवांचा शिरकाव होऊन राज्यकारभारांत त्यांचा हळू हळू प्रवेश झाला पाहिजे व अखेर कानडा किंवा आस्ट्रेलियासारख्या वसहातींना ज्या प्रकारचें स्वराज्य ( Self—Government )* देण्यांत आलें आहे तशा प्रकारचें स्वराज्य देऊन हिंदुस्थानास इंग्रजी साम्राज्याचा जिवंत अवयव बनविला पाहिजे असें त्यांनीं सुचविलें आहे.

## राजेरजवाड्यांचीं कर्तव्यें

आतां राजेरजवाडे व इतर लोक यांच्या कर्तव्यासंबंधानें टिळक यांचे काय विचार आहेत ते येथें देतों. हे विचार थोड्या विस्तारानें देणें जरूर आहे. कारण, इंग्रज सरकारासारख्या सुधारलेल्या राजकर्त्यांच्या राज्यपद्धतीवर लोकमताचा विशेष परिणाम होत असल्यामुळें हिंदी लोक हल्लीं कसे वागताहेत व त्यांनीं कोणत्या प्रकारानें वागलें पाहिजे हेंच मुख्यत्वेंकरून येथें सांगितलें पाहिजे; व ते थोडक्यांत सांगतां येणें कठिण आहे. आतां हा विचार करतांना द्रव्य, अधिकार, इत्यादि गोष्टींचें सामान्य लोकांपेक्षां देशी संस्थानिकांस जास्त आनुकूल्य असल्यामुळें आमचे संस्थानिक स्वकर्तव्यास किती जागत आहेत व त्यांनीं स्वीकारलेली राज्यव्यवस्थेची दिशा कितपत सयुक्तिक आहे याचा उल्लेख प्रथमतः करणें जरूर आहे. यासंबंधीं टिळक यांनीं अलीकडे जरी निराळे लेख लिहिले नाहींत तरी प्रसंगोपात्त त्यांनीं जे विचार प्रगट केले आहेत त्यांवरून

---

* " हिंदुस्थानची वाट काय ? या अग्रलेखांत ता. ८।८।०५ च्या केसरींत वसहातींप्रमाणें आम्हांस Self-Government अथवा स्वराज्य पाहिजे असें टिळक यांनीं स्पष्ट म्हटलें आहे.

वरील गोष्टींचा खुलासा होत असल्यामुळ त्यांतील महत्वाचा येथें देतों.

संस्थानिकांनीं केवळ पोलिटिकल एजंटासारख्या वरिष्ट अधिकाऱ्यांच्या लहरीस बळी न पडतां किंवा केवळ अनुकरण म्हणून एकादी गोष्ट करून परकीयांच्या संवयींच्या आधीन न होतां आपलेपणास जागावें; व आपले अधिकार आणि आपले हक्क आपल्याच हातानें न गमावतां देशकालस्थितीकडे लक्ष देऊन प्रजेंत संतोष, स्वाभिमान व कर्तृत्वशक्ति वाढविली तरच त्यांनीं आपलें कर्तव्य ओळखिलें असें त्यांचें मत असून तें त्यांनीं पुढील तीन चार लेखांत निरनिराळ्या रीतीनें व्यक्त केलें आहे. ते ह्मणतात:—

"म्हैसूर व बडोदें येथील जुनें नाणें बंद होऊन इंग्रजी नाणें सुरू करण्यांत आलें आहे. ही व्यवस्था त्या त्या संस्थानांतील कामगारांच्या सल्ल्यानेंच झालेली आहे व बडोद्यांत तर खुद्द मालकाच्या संमतीनें झाली आहे, तेव्हां त्याबद्दल बरेवाईटपणा इंग्रजसरकाराकडे येऊं शकत नाहीं हें उघड आहे. परंतु नेटिव संस्थानच्या मालकांनीं, विशेषेंकरून ज्या संस्थानचे अधिपति स्वतः सुशिक्षित आणि कर्ते आहेत त्यांनीं, ही गोष्ट चांगली केली असें आमच्यानें ह्मणवत नाहीं. बडोद्यांत बाबाशाई रुपयाचा भाव आज बरेच दिवस उतरत चालला असून अखेरीस शेंकडां ४० प्रमाणें बाबाशाईचे सुर्ती करण्यास बट्टा द्यावा लागत असे अशी स्थिति आली होती ही स्थिति सुधारणें हें बडोदा सरकारचें कर्तव्य होते. पण त्याकरितां बाबाशाई नाणें बुडवून टाकण्याची कांहीं जरूरी नव्हती. आपल्या नांवाचें नाणें सुरू असणें हें कोणत्याही राजाच्या स्वतंत्रतेचें एक लक्षण आहे व बडोद सरकारास हा हक्क आज पूर्वापार प्राप्त झालेला असतां त्यांनीं तो बुडवून टाकणें कांहीं चांगलें नव्हे. हिंदुस्थानांतील नेटिव संस्थानें इंग्रजसरकारच्या सार्वभौम सत्तेखाली आहेत ही गोष्ट आतां निर्विवाद आहे. पण असें जरी आहे तरी कांहीं कांहीं बाबतींत स्वतंत्र राजसत्तेची चिन्हें किंवा हक्क इंग्रजसरकारानें त्यांस दिलेले आहेत किंवा पूर्वी असलेले कायम ठेवले आहेत. इंग्रजसरकारच हे हक्क आपण होऊन जेव्हां काढून घेईल तेव्हां त्यास कांहीं इलाज नाहीं. पण तत्पूर्वी आपण होऊनच, ते हक्क सोडून देण्यास तयार होणें हें कांहीं शहाण्या मुत्सद्याचें लक्षण नव्हे. अशा दृष्टीने पाहिलें ह्मणजे गायकवाडसरकारचें या बाबतींतलें वर्तन चुकीचें आहे असें ह्मणणें भाग येतें. नाण्याच्या भावांत जी चलविचल झाली होती ती दुरुस्त करण्याचा हा एकच उपाय होता असें नाहीं. यापेक्षां खुद्द गायकवाडसरकारानें सोन्याचें नाणें सुरू केलें असतें तर इंग्रजसरकार आज जी सुधारणा करण्याचा प्रयत्न करीत आहे ती प्रथमतः अम-

लांत आणल्याचें श्रेय गायकवाडसरकारास मिळालें असतें. बडोद्यांत सोन्याच्या तोफा ठेवण्यापेक्षां सोन्याचें नाणें ठेवणें अशा वेळीं अधिक उपयुक्त व सोईचें झालें असतें. पण अशा प्रकारची कल्पना सुचविण्यास किंवा अंमलांत आणण्यास गायकवाड सरकारच्या पदरीं चांगले लोक राहिले नाहींत ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. आमच्या कित्येक बंधूंनीं बाबाशाई नाणें बुडविल्याबद्दल गायकवाडसरकारचें अभिनंदन केलें आहे, पण तें आह्मांस पसंत नाहीं. हिंदुस्थानच्या नकाशांतीलें तांबड्या आणि पिंवळ्या रेघांची मर्यादा नष्ट होऊन इतउत्तर नकाशा काढतांना फक्त एका तांबड्या ब्रशाचीच जरूर पडावी अशा मतांचे कित्येक लोक आहेत हें आह्मी जाणून आहों. पण हें मत जोंपर्यंत अद्याप सर्वमान्य झालें नाहीं तोंपर्यंत गायकवाडसरकारचें हल्लींचें वर्तन चुकीचें आहे असें जे आह्मी वर ह्मटलें आहे तेंच आमच्या दृष्टीनें अधिक प्रशस्त होय. गायकवाडसरकारानें आपल्या राज्यांत हत्याराचा कायदा सुरू करण्याबद्दल जो हुकूम सोडला आहे तोही अशाच प्रकारचा आहे. पिलवाईचा दंगा लोकांजवळ हत्यारें होतीं ह्मणून झाला नाहीं, तर गायकवाडींतील अधिकाऱ्यांच्या अंगीं पोंच नसल्यामुळें झाला ही गोष्ट उघड आहे. प्रजेचीं हत्यारें काढून घेण्यास नेटिव संस्थानांत तरी निदान कारण नाहीं. पण या गोष्टीबद्दल आह्मी येथें ओरड करून काय उपयोग आहे ? ज्यांच्या हातीं गायकवाडीचीं राज्यसूत्रें आहेत ते चांगले सुशिक्षित आहेत; तेव्हां त्यांस जर या गोष्टी पसंत असल्या तर या कामी त्यांचा हात कोण धरणार ? कोणच्याही संस्थानिकास स्वतः दारूगोळा तयार करण्याचा, स्वतःचें नाणें चालविण्याचा, आपल्या प्रजेस स्वतंत्र रीतीनें शिक्षा करण्याचा, वगैरे हक्क असणें हें उत्तरोत्तर अधिकाधिक दर्जाचें लक्षण आहे. यापैकीं नवीन हक्क संपादन होणे आतां कठिणच आहे, पण आहेत ते हुषारीनें, दक्षतेनें आणि हरप्रयत्नानें रक्षण करणें हल्लींच्या संस्थानिकांचें कर्तव्य आहे. तें कर्तव्य हल्लींच्या प्रसंगीं गायकवाडसरकाराकडून बजावलें गेलें असें आह्मांस वाटत नाहीं. हा प्रश्न असा होता की, त्यांत गायकवाडसरकारचें हित एक प्रकारचें आणि इंग्रजसरकारचें हित एक प्रकारचें अंशी भानगड नव्हती. असें असतांही जर हल्लींच्या प्रमाणें व्यवस्था झाली आहे तर त्याचा दोष संस्थानिकांकडेच येतो हें उघड आहे."

—केसरी ता. २१-८-१९००.

* * *

" ब्रिटिश मुलखांत उद्योगधंद्याबद्दल कांहीं चळवळ नाहीं असें नाहीं; पण ती पुष्कळ अंशीं शाब्दिक आहे, व तिला व्यावहारिक स्वरूप देणें इंग्रजसरकारच्या हातून घडेल तेव्हां घडो; पण त्यापूर्वी मोठमोठ्या संस्थानिकांच्या हातूनच घडून येणें अवश्य आहे. संस्थानचें उत्पन्न संस्थानांतील लोकांकरितांच आहे असा जर कोणाचा समज असेल तर तो चुकीचा आहे. आणि महाराजांच्या हल्लींच्या भाषणावरून

त्यांचा तसा समज नाहीं असेंही दिसून येत आहे. इंग्रजी राजछत्राखालीं आमच्या देशाची जी स्थिति झाली आहे ती सुधारण्यास निर्धन सुशिक्षित लोकांनीं बोलण्यानें आणि सधन व्यापाऱ्यांनीं आणि संस्थानिकांनीं क्रियेनें मदत केली पाहिजे. इंग्रज सरकारास उपदेश करण्यास श्री. गायकवाड सरकारासारख्या संस्थानिकाचीं वाचेनें मदत झाल्यास ती आह्मांस नको आहे असें नाहीं. प्रत्येक संस्थानिक तो धडा जर कृतीनें घालून देईल तर तो अधिक फलप्रद होणार आहे. गुजराथींत अशीं एक ह्मण आहे कीं, "जेनुं काम तेनें थाय, बिजा करे ते गोता खाय" व याच अर्थाचे भगवद्गीतेंतही "स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः" असें वाक्य आहे. अशा दृष्टीनें पाहिलें ह्मणजे श्री. गायकवाड सरकारासारख्या संस्थानिकांनीं भाषणापेक्षां कृतीकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे असें आह्मांप्रमाणें इतरांसही वाटेल."

—केसरी, ता. २३।१२।०२

* * * *

"कोल्हापूरचे महाराज यांनीं आपल्या राज्यांत इतउत्तर रिकाम्या होणाऱ्या जागांपैकीं अर्ध्या जागा मागसलेल्या लोकांस आणि अर्ध्या बामण, सारस्वत, परभू, पारशी वगैरे पुढारलेल्या लोकांस द्यावयाच्या, असा ठराव करून त्याची अंमलबजावणी होण्याकरितां तो आपल्या राज्यांत नुकताच प्रसिद्ध केला आहे. हें ऐकून संस्थानच्या हिंतचिंतकांपैकीं कोणासही सखेदाश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. आमच्या कित्येक बंधूंनीं यांत ब्राह्मणांचें नुकसान होईल ह्मणून ओरड केली आहे. पण आमचें मत त्याहून निराळे आहे. कोल्हापूरच्या महाराजांनी ब्राह्मणांस किंवा पुढारलेल्या जातीस सोडलें ह्मणजे सदर जातीस निर्वाहाचा मार्गच राहिला नाहीं असें नाहीं. समाजाचीं कालानुरूप जी स्थित्यंतरें होत असतात त्यांत निसर्गतः बुद्धिमान् किंवा उद्योगी लोक मागें पडत नाहींत असा सामान्य सिद्धांत आहे; व तो कोल्हापूरचे महाराज किंवा खुद्द इंग्रज सरकार असले तरी त्यांचेही हातून अन्यथा होणें अशक्य आहे. मागसलेल्या जातींत उच्चप्रतीचें शिक्षण वाढविण्याकरितां ही युक्ति केली, अशा प्रकारच्या लिबार्नरी कोटीचा ठरावांत उल्लेख आहे. पण आह्मी महाराजांस खात्रीपूर्वक कळवितो कीं, ही कोटी भ्रामक आणि घातुक आहे; व त्यापासून ब्राह्मणांचें नव्हे तर संस्थानचें नुकसान होण्याचा अधिक संभव आहे. रिकाम्या झालेल्या निम्या जाग्यांवर ज्या मागासलेल्या जातींतील लोकांची नेमणूक करावयाची त्यांची योग्यता पाहावयाची कीं नाहीं? समान योग्यतेचा ब्राह्मण आणि मराठा असल्यास मराठा निवडा, पण कमी योग्यतेचा मराठा निवडल्यानें मराठयांच्या शिक्षणास उत्तेजन नव्हे तर संस्थानचे कामास मात्र खो येणार आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. बरें, कमी योग्यतेचा मराठा नेमावयाचा नसल्यास मग या नव्या ठरावाचाही

जरूरी नाहीं. कारण, सारख्या याग्यतेच्या मराठ्यांस हल्लींही जागा मिळत आहेत. कोल्हापूरच्या महाराजांनीं घालून दिलेला धडा इंग्रज सरकारांनीं गिरविला तर इंग्रजी राज्यांत मुसलमान, युरेशिअन, मराठे, तेली, तांबोळी, शिंपी, कुणबी, नेटिव ख्रिस्ती, याच्याकरितांही जागा राखून ठेवाव्या लागतील; व हीच गोष्ट लॉर्ड कर्झन यांच्या लक्षांत आल्यामुळें त्यांनीं मुसलमानांच्या व युरेशिअनांच्या अर्जास साफ नकाराचे जबाब दिले आहेत."

—केसरी, ता. ५।८।०२.

* * * *

"समाजामध्यें आज शेंकडों वर्षें ज्या रीतीभाती चालत आलेल्या आहेत व विशेषेंकरून ज्या रीतीभातींचा धर्माशीं संबंध आहे त्यांत फेरबदल करणें तो जुलमानें न करतां खुषीनें केला पाहिजे हें तत्व सार्वभौम इंग्रज सरकारनें कबूल केलेलें आहे; व याच तत्वास अनुसरून हिंदुस्थानांतील मांडलिक संस्थानिकांनींही आपलें वर्तन ठेविलें पाहिजे. राजाला जो अधिकार आहे तो समाजाची घडी मोडून समाजांत असंतोष उत्पन्न करण्याकरितां नव्हे; व या अधिकाराचा जर एकाद्या संस्थानिकाकडून दुरुपयोग होईल तर त्याची दाद घेणें सार्वभौम सरकारास भाग पडेल. संस्थानांतील प्रजेमध्यें ज्ञातीज्ञातींतील तंटे संस्थानच्या अधिपतीच्या प्रोत्साहनानें अधिक विकोपास जाऊं नयेत अशाबद्दल खबरदारी घेणें हें इंग्रजसरकारचें कर्तव्य आहे. मराठेशाहींत किंवा ब्राह्मणी राज्यांत जर असे प्रकार घडले असते तर राजा आणि प्रजा यांच्यामध्यें किंवा ज्ञातीज्ञातीमध्यें तंटे माजून अखेरीस दंगेधोपे होण्यापर्यंतही मजल आली असती. हल्लीं इंग्रजसरकारच्या अमलाखालीं तशी गोष्ट होणें शक्य नाहीं; पण त्याबरोबरच असा बंदोबस्त आहे कीं, पूर्वापार धार्मिक वहिवाटींत कोणीही विनाकारण बळजबरी करून बिघाड करूं नये. या तत्वाप्रमाणें पाहिलें असतां असें दिसून येईल कीं, मराठे लोकांच्या घरीं ब्राह्मण वेदोक्त कर्म करीत नाहींत ह्मणून त्यांचीं इनाम किंवा जहागिरी जप्त करण्याचा जो कित्येक ठिकाणीं धाक दाखविण्यांत आला आहे तो अन्यायाचा व संस्थानास अपायकारक आहे. तसेंच ठिकठिकाणच्या देवळांतील, मठांतील वगैरे पूजाअर्चा चालविण्याचे अधिकार किंवा कोणत्याही मराठी संस्थानिकाकडे धर्मकर्म करण्याचे अधिकार ज्यांजकडे आहेत ते वहिवाटीप्रमाणें हे अधिकार चालविण्यास जोंपर्यंत तयार आहेत तोंपर्यंत त्यांचीं वतनें, इनामें किंवा जहागिरी काढून घेणें हेंहीं जुलुमाचें व अन्यायाचें आहे. फार लांब कशाला? महाराष्ट्रांत इंग्रजसरकारचें राज्य झाल्यावर गांवोगांव जें सेटलमेंट झालें तेव्हां देशपांडेपणाची किंवा जोशीपणाचीं जीं वतने होतीं तीं सदर वतनदारांचीं सरकारांस जरूर नसतांही त्यांजकडे चालविण्यांत आलीं. धर्मसंबंधीं देणग्यास व वतनास हाच न्याय लागू आहे. मराठे संस्थानिकांस जर

पुराणोक्त कर्मे करणारे ब्राह्मण उपाध्ये नको असतील तर त्यांस त्यांनीं बोलावूं नये, पण तेवढ्याकरितां सदर उपाध्ये जोंपर्यंत वहिवाटीप्रमाणें कर्मे करण्यास तयार आहेत तोंपर्यंत त्यांचें वेतन बंद करितां यावयाचें नाहीं. सार्वजनिक देवळें, धर्म-मंदिरें, मठ वगैरेसंबंधानें हीच व्यवस्था अथवा तत्व लागू आहे. या ठिकाणच्या पूजाअर्चा बदलण्याचा कोणाही संस्थानिकांस अधिकार नाहीं, व हल्लींच्या पालट-लेल्या मनूंतील व्यक्तिस्वातंत्र्याचे तत्व घेतले तरीही हल्ली कांहीं ठिकाणीं जे प्रकार होत आहेत ते न्यायदृष्ट्या कधीं योग्य ठरणार नाहीत. आमच्या संस्थानिकांस हें तत्व सांगण्याची आज आह्मांवर पाळी यावी ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. हिंदुस्थानांतील हिंदु ज्ञातीज्ञातींमधील तंटे हिंदु राजास तिऱ्हाईतपणें तोडतां येऊं नयेत हें मोठें लाजिरवाणे होय; व या कामीं लोकांस सार्वभौम सरकारची मदत घ्यावी लागली तर आमचे राजे सुधारलेल्या पद्धतीनें राज्य चालविण्यास अद्याप पात्र झाले नाहीत याबद्दल दुसरा पुरावा शोधण्याची कांहीं जरूर राहणार नाहीं. तरी या सर्व गोष्टींचा विचार करून मराठे संस्थानिक आपले वर्तन ठेवतील अशी आह्मांस उमेद आहे."

—केसरी, २९।१०।१९०१.

## नेटिव अम्मलदारांचीं कर्तव्यें.

राजेरजवाड्यांप्रमाणेंच वरिष्ठ दर्जाचे **नेटिव अंमलदार** यांनींही आपल्या कर्तव्यास जागलें पाहिजे. परकीय सरकारच्या नोकरींत आमच्या लोकांच्या हरएक गुणाची राखरांगोळी होते हें जरी खरें आहे, तरी राज-निष्ठेबरोबर देशनिष्ठेचाही विचार त्यांच्या मनांत आल्यास त्यांच्या हातून पुष्कळ कार्य होणार आहे. वरिष्ठ प्रतीचे नेटिव अंमलदार हे राजा व प्रजा यांतील सांधा आहे. हा सांधा फारच लवचिक आहे. तथापि, स्वार्थानें किंवा आपमतलबानें तो विस्खलित करून दोघांची टक्कर न करतां योग्य रीतीनें सांधल्यास दोहोंचाही त्यांना मिलाफ करतां येईल. सरकारचे हेतु प्रजेला जसे त्यांनीं नीट समजावून दिले पाहिजेत तशींच प्रजेचीं गाऱ्हाणींही सरकारचे कानावर घालून तिची दाद लावली पाहिजे. सरकार ही संस्थाच जर प्रजेच्या पैशानें व प्रजेंतून निर्माण झाली आहे तर आपणही प्रजेच्या द्रव्यावर व प्रजेकरतांच पोसलों जात आहों असें त्यांनीं लक्षांत ठेऊन वागलें पाहिजे. अशा अम्मलदारांनीं प्रजेचें कल्याण कसें करावें व असें कल्याण करणाऱ्या अमलदारांची थोरवी किती आहे याचें टिळक यांनीं ता. २०।६।०५ च्या केसरींत सूत्ररूपानें जें विवेचन केलें आहे तें येथें देतों. ते ह्मणतातः—

"बाबांनों, तुह्मी सरकारची नोकरी करा; आह्मी नाहीं ह्मणत नाही. तुमचे वरिष्ठ अधिकारी जे हुकूम करतील त्यांची अंमलबजावणी तुह्मांस केली पाहिजे. पण अशी अंमलबजावणी करणें यांत अंमलदारास खुष करण्याकरितां खोटें मत देणें याचा समावेश होत नाहीं. सारांश, राजाची नोकरी करण्यांत प्रजेशीं बेइमानीपणा केलाच पाहिजे असें नाहीं. आणि एवढें जर तुह्मी लक्षांत ठेवाल तर पतिव्रता वधू ज्याप्रमाणें उभयकुलांस आनंददायक होते त्याप्रमाणे राजा व प्रजा या दोघांसही तुह्मी मान्य व्हाल."

## लोकांचीं कर्तव्यें.

आतां सरकारी नोकर नसणाऱ्या स्वतंत्र लोकांचीं कर्तव्यें काय आहेत यांविषयीं टिळक यांचीं मतें कोणत्या प्रकारचीं आहेत याचें विवेचन करतों. स्वतंत्र लोकांत सामान्यपणें खासगी शाळांचे चालक, वकील–बॅरिस्टर, वैद्य, व्यापारी, कारखानदार, वगैरेंचा समावेश होत असून यांपैकीं कांहीं सुशिक्षित असतात व कांहीं अशिक्षित असतात. सुशिक्षितांनीं अशिक्षितांत ज्ञानाचा प्रसार केला पाहिजे, व आपल्यावरील जबाबदारी ओळखून पुढील पिढीला योग्य वळण लावलें पाहिजे. ज्ञानाचा मुख्य उगम शाळा होय. पण सरकारचें आजपर्यंतच्या शिक्षणाचें धोरण व हल्लींचें धोरण यांत अंतर पडलें असल्यामुळें खासगी शाळांच्या चालकांवर शिक्षणासंबंधानें मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. खासगी शाळेच्या व्यवस्थापकांनीं पुढील पिढी देशाच्या उपयोगी पडेल अशा विचारानेंच आपल्या संस्थेंतील शिक्षणाची दिशा ठेवली पाहिजे. अशा प्रकारचें **राष्ट्रीय शिक्षण** देण्याकरतांच खासगी शाळा निर्माण झाल्या असून त्यांकरतांच त्यांच्या चालकांनीं स्वार्थत्याग केला पाहिजे, असें टिळक यांचें ह्मणणें असून या शाळांच्या इतिहासासहित त्यांच्या कर्तव्याची दिशा ता. ७।११।०५ च्या केसरींत त्यांनीं थोडक्यांत येणेंप्रमाणें रेखाटून दिली आहे. तें ह्मणतात:—

"पंचवीस वर्षांपूर्वी ह्मणजे लॉर्ड रिपनच्या कारकीर्दींत एज्युकेशन कमिशन बसून खासगी शाळांस जेव्हां उत्तेजन मिळालें तेव्हां सरकारची अशी समजूत होती कीं, हिंदुस्थानांत जितका शिक्षणाचा प्रसार करण्याचें सरकारानें योजिलें आहे तितका प्रसार खासगी शाळांच्या मदतीखेरीज व्हावयाचा नाहीं. खासगी शाळा ह्मणजे सरकारी शाळांचें प्रत्येक बाबतींत अनुकरण करणाऱ्या शाळा नव्हेत, तर सरकारी शिक्षणांत जी कांहीं उणीव आहे अथवा ज्या गोष्टी सरकारी शाळांत शिकवितां

येत नाहींत किंवा शिकवीत नाहींत त्या गोष्टी विद्यार्थ्यांस शिकविण्याकरितां देशांतील कांहीं सुशिक्षित वर्गांनीं स्वार्थत्याग करून खासगी शाळा काढलेल्या असतात, हीही गोष्ट सरकारास त्यावेळीं पूर्णपणें माहीत होती. परंतु असें असतांही जाणून बुजून खासगी शाळांस उत्तेजन देण्याचा क्रम सरकारानें सुरू ठेवला; इतकेंच नव्हे तर, खासगी शाळेच्या शिक्षणक्रमांत सरकारी शाळेच्या शिक्षणक्रमापेक्षां अधिक स्वातंत्र्य असलें पाहिजे, हीही गोष्ट सरकारानें प्रांजलपणे कबूल केली. याचा परिणाम असा झाला कीं, मद्रास, मुंबई, बंगाल, पंजाब वगैरे इलाख्यांतून नव्या नव्या खासगी शाळा व कॉलेजें निघून ती भरभराटीस आली; व या प्रत्येक संस्थेस सरकारी शाळेपेक्षां कांहीं विशिष्ट स्वरूप आणण्याची सदर संस्थेच्या प्रवर्तकांनीं खटपट केली. येथील फर्ग्युसन कॉलेज, मद्रासचें पछापा कॉलेज, काशीचें सेंट्रल हिंदु कॉलेज, पंजाबचे दयानंद ॲंग्लो-वेदिक कॉलेज आणि बंगाल्यांतील रिपन कॉलेज आदिकरून पुष्कळ कॉलेजें याच सुमारास निघाली आहेत किंवा भरभराटीस आलीं आहेत. सरकारी कॉलेजांतून ज्या प्रकारचें शिक्षण मिळते तेवढेच देऊन स्वस्थ बसणें हा या कॉलेजांचा उद्देश नव्हता; आणि याकरितां स्वार्थत्याग करून नव्या संस्था काढण्याचा त्यांनीं खटाटोपही केला नव्हता. सरकारी शाळांतून किंवा कॉलेजांतून जें राजकीय, धार्मिक किंवा सामाजिक धोरण शिक्षणक्रमांत राखलें जातें त्याहून एक किंवा अनेक बाबतींत निराळें वळण विद्यार्थ्यांस लागलें पाहिजे, हें तत्व लक्षांत ठेऊनच, किंबहुना या कटाक्षानेंच या नवीन खासगी संस्था निघालेल्या होत्या. आणि सरकारासही, अशा प्रकारें विद्यार्थ्यांस निरनिराळ्या प्रकारचें वळण देणाऱ्या शाळा देशांत असणे अवश्य आहे, सरकारी शाळांच्या एकमुखी रुद्राक्षानें सर्व शिक्षणक्रम सुरू ठेवणें बरोबर नाहीं, असें वाटत होतें. सारांश, कोणत्या राजकीय चळवळी बऱ्या आहेत, धर्म कोणता चांगला आणि कोणता वाईट, कोणत्या सामाजिक अगर राजकीय चळवळींत विद्यार्थ्यांनीं पडावें अगर न पडावें, हें ठरविण्याचा अधिकार सरकार केवळ आपल्याच हातांत घेण्यास त्यावेळीं तयार नव्हते; आणि त्यास ही गोष्ट मान्य होती कीं, राष्ट्रांतील लोकांस जर खरें राष्ट्रीय शिक्षण द्यावयाचें असेल तर तें स्वतंत्र लोकांनीं स्वतंत्र खासगी शाळेंतच दिलें पाहिजे व देणें शक्य आहे.

सन १८९७।९८ सालीं राजद्रोहाची देशभर जी भयंकर वावटळ उठली आणि ज्या वावटळीनंतर लगेच लॉर्ड कर्झन यांनीं आमचें वांटोळें करण्याकरितां हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवलें तेव्हांपासून वर सांगितलेलें सरकारचें धोरण आणि रंग पालटत पालटत जाऊन आतां वर निर्दिष्ट केलेल्या बंगाल सरकारच्या सर्क्युलरानें स्वदेशी चळवळीमध्यें पडणाऱ्या विद्यार्थ्यांस सरकारी किंवा ग्रँट्स-इन-एड मिळणाऱ्या शाळांच्या अधिकाऱ्यांनीं शाळेंतून घालवून लावावें किंवा दुसरें कोणतें तरी शासन करावें, नाहींपेक्षां या शाळा बंद केल्या जातील, असें बंगाल सरकारान

जिल्ह्यांतील कलेक्टर व डिस्ट्रिक्ट म्याजिस्ट्रेट यांच्या द्वारें प्रसिद्ध केलेल्या सक्युं-लरनें सरकारी धोरणाचा झोंपाळा पूर्वी असलेल्या दिशेच्या अगदीं विरुद्ध बहकत गेलेला आहे. वास्तविक म्हटलें म्हणजे खासगी कॉलेजें किंवा त्यांतील शिक्षणक्रम सरकारच्या कह्यांत जितका न जाईल, किंवा त्यांतील शिक्षक सार्वजनिक कामांत पडण्याची आपली मोकळीक सरकारास जितकी विकणार नाहींत तितकें चांगलें. या शाळेच्या चालकांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे की, त्यांच्या संस्था लोकाश्र-यामुळें चाललेल्या आहेत, आणि लोक जो आश्रय देतात तो खासगी कॉलेजें सर-कारी कालेजांच्या नकला बनावींत म्हणून नव्हे. सरकारी कालेजांतून किंवा शाळांतून राष्ट्रीय हिताच्या बाबतींत कोणत्याही प्रकारचें खरें शिक्षण आमच्या विद्यार्थ्यांस मिळणें शक्य नाहीं. खासगी शाळांची व कॉलेजांची जर कशाकरितां जरूरी असेल तर ती याचकरितां होय; व खासगी शाळांच्या प्रवर्तकांनीं जो स्वार्थत्याग कराव-याचा तो याचसाठीं होय. नुसत्या, म्हणजे तो ज्या कारणाकरितां करावयाचा त्या-विरहित अशा, स्वार्थत्यागाला या जगांत कांहीं किंमत नाही. एकाद्या मनुष्यानें आपलें सर्व द्रव्य समुद्रांत नेऊन टाकिलें, किंवा आपण स्वतः विहिरींत जीव दिला, तर तो शब्दशः "स्वार्थाचा त्याग" होईल, पण त्याबरोबरच सदर गृहस्थानें शहाण-पणाचाही त्याग केला असें म्हणावें लागेल. खासगी शाळेच्या प्रवर्तकांनीं जो स्वार्थत्याग करावयाचा त्याचें परीक्षणही याच न्यायानें केलें पाहिजे. सरकारानें 'र र' म्हणून सरकारी शाळांतून जो कित्ता आम्हांस गिरवावयास लावला आहे तोच जर खासगी शाळांतून गिरवावयाचा असेल; व त्या "क्षुण्ण" मार्गापासून "रेखामात्र" ही इकडे तिकडे हालण्याची खासगी शाळेच्या प्रवर्तकांस जर मोकळीक नसेल, तर खासगीशाळा काढण्याच्या कामीं स्वार्थत्याग केल्यानें आमच्या देशास कांही एक फायदा आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. हल्लीं हिंदुस्थानांत गोऱ्या सनदी नोकरांनीं जी जुलमी राज्यपद्धति चालविली आहे, ती हाणून पाहण्याचा यत्न करण्यास पुढील पिढी आम्हांस तयार केली पाहिजे. सरकारी शाळांत किंवा कॉलेजांत हें शिक्षण मिळत नाहीं. सरकार ही गोष्ट करीत नाहीं तर न करूं द्या; ती पण खासगी शाळांनीं अवश्य केली पाहिजे. खासगी शाळांचें अस्तित्व जर कशाकरितां पाहिजे असलें तर तें याचकरितां होय; आणि हें जर काम त्यांच्याकडून होत नसेल, तर त्या असून नसून सारख्याच."

उद्योगधंद्यांची आवड, नवीन शोधांची जिज्ञासा, स्वाभिमान, स्वदेशा-भिमान इत्यादि गोष्टींचे अंकूर विद्यार्थी–दशेंतच मुलांच्या मनांत उद्भवले पाहिजेत. करितां स्वतंत्र असणाऱ्या शाळांनीं आपल्या शिक्षणाबद्दल कशी खबरदारी घेतली पाहिजे हें टिळक यांच्या वरील विचारांवरून

कोणाच्याही ध्यानांत येईल. स्वतंत्र शाळांप्रमाणेंच जर्मनी, अमेरिका, जपान इत्यादि पाश्चिमात्य राष्ट्रांत जशा स्वतंत्र युनिव्हर्सिटया आहेत तशा राष्ट्रीय शिक्षणाच्या युनिव्हर्सिटया हिंदुस्थानांत असणें अवश्य आहे व त्याकरतां सुशिक्षित व धनाढ्य लोकांनीं अशा प्रकारच्या युनिव्हर्सिटया स्थापन करणें अगत्याचें आहे असें त्यांचें मत असून तें त्यांनीं पुढील प्रमाणें व्यक्त केलें आहे:—

" शाळेंतील विद्यार्थ्यांस राष्ट्रीय शिक्षण मिळण्याचा दुसरा मार्ग म्हटला म्हणजे राष्ट्रीय युनिव्हर्सिटीची स्थापना हा होय. सरकारानें आमच्या देशांत शांतता राखली आहे खरी; पण उद्योगधंद्याच्या किंवा इतर बाबतींत आमच्या देशाचें हित होईल, अशा प्रकारच्या शिक्षणापासून त्यांनीं आह्मांस जाणूनबुजून बहिष्कृत केलें आहे. सरकारी शाळांतून जें शिक्षण मिळतें तें हुषार पण नेभळे नोकर तयार करण्याकरितां आहे. राष्ट्रीय शील, उमेद किंवा उद्योग वाढण्याकरितां नाहीं हें आह्मी अनेक प्रसंगी सांगितलेंच आहे. वास्तविक ह्मटलें ह्मणजे हें काम खासगी शाळांनीं करावयास पाहिजे. पण त्याही शाळा सरकारानें आपल्या कक्षांत घेतल्या आहेत. तेव्हां आतां अगदीं स्वतंत्र व सरकारच्या कधींही कक्षांत न जाणारी युनिव्हर्सिटी काढल्याखेरीज गत्यंतरच नाहीं असें झालें आहे. अलाहाबाद येथील प्रसिद्ध राष्ट्रभक्त पंडित मदन मोहन मालवीय हे या उद्योगांत असून त्यांनी येत्या जानेवारींत अलाहाबाद येथें भरणाऱ्या कुंभमेळयाचे वेळीं या प्रश्नाचा ऊहापोह करण्याकरितां राजेरजवाडे व हिंदु धर्मांतील निरनिराळया पंथांचे आचार्य यांस आमंत्रण केलें आहे. मुसलमान लोकांनीं अलीगड येथें स्वधर्मीयांकरितां ज्याप्रमाणें एक मोठें कॉलेज काढलें असून त्याची युनिव्हर्सिटी बनविण्याचा त्यांचा विचार आहे तसाच उद्योग हिंदु लोकांनींही आरंभिला पाहिजे. हल्लींच्या चळवळीमुळें तर या उद्योगाचें महत्व व आवश्यकता अधिक भासूं लागली आहे; व आह्मांस अशी उमेद आहे कीं, या वेळीं या प्रश्नाची ' भवति न भवति ' होऊन आह्मांस लवकरच राष्ट्रीय विश्वविद्यालय प्राप्त होईल " —केसरी, ता. १४।११।०५.

" आमच्याकडील युनिव्हर्सिटया किंवा विश्वविद्यालयें पाहिलीं तर त्यांत इलाख्याच्या मुख्य ठिकाणचे इंग्रजी बॅरिस्टर किंवा जज्ज आणि सरकारी विद्याखात्यांतील किंवा दुसऱ्या खात्यांतील अंमलदार यांचेंच महात्म्य आढळून येतें. आणि लॉर्ड कर्झन यांनीं केलेल्या युनिव्हर्सिटी आक्टाप्रमाणें हेंच महात्म्य उत्तरोत्तर वाढत जाण्याचा संभव आहे. युनिव्हर्सिटयांतील हे बॅरिस्टर किंवा गोरे अंमलदार स्वतःच आधीं तिसऱ्या किंवा चवथ्या प्रतीचे विद्वान् असतात; एकादा दुसरा कदाचित खरा विद्याभिलाषी किंवा विद्वान् असेल. परंतु सामान्यतः पाहिलें तर विलायतेंतून

पैसे मिळविण्याकरितां हे लोक इकडे आलेले असतात, आणि त्यांची विद्याभिरुचि इतकी दांडगी असते कीं, त्यांच्याच स्वदेशांत तिची फारशी किंमत होत नसते. युनिव्हर्सिटीचीं सूत्रें ज्यांच्या हातांत आहेत त्यांची विद्येबद्दल अभिरुचि, लालसा व अभिमान जर अशा प्रकारचा तर मग सरकारच्या राजनीतीचें वर दडपण पडल्यावर त्यांच्या हातांत युनिव्हर्सिटी केवळ सरकारी नोकरखाना बनल्यास त्यांत नवल तें कोणतें? विश्वविद्यालय किंवा खरी युनिव्हर्सिटी ह्मणजे काय याची कल्पनाही या आमच्या खुरटलेल्या युनिव्हर्सिटीपासून कोणासही मिळणें शक्य नाहीं. निरनिराळ्या शास्त्रांत किंवा कलांत पारंगत झालेले शेंकडों विद्वान् ज्या ठिकाणीं आपापल्या आवडत्या विषयांची विद्यार्थ्यांबरोबर चर्चा करीत पडलेले आहेत, आणि स्वतंत्रपणानें निरनिराळ्या विषयांत नवीन नवीन शोध करून जगाच्या ज्ञानांत भर घालीत आहेत, किंवा व्याख्यानांच्या रूपानें आपल्या देशबांधवांस नवीन शोधांचा वेळोवेळीं परिचय करून देत आहेत, असें सरस्वतिमंडल किंवा शारदामंडल कोणीकडे, आणि परिमितज्ञानाचें आणि खुंटलेल्या बुद्धीचें परीक्षण करून त्यावर मर्यादेचा छाप मारण्याकरितां खटाटोप करणाऱ्या आमच्या देशांतील नामधारी युनिव्हर्सिट्या कोणीकडे? स्वतंत्र देशांतील युनिव्हर्सिटया आमच्या देशांतील युनिव्हर्सिटयांहून अत्यंत भिन्न असतात हें जर्मनी, फ्रान्स, जपान वगैरे देशांतील युनिव्हर्सिटींच्या हकीकतीवरून सहज कळून येण्यासारखे आहे. या आमच्या युनिव्हर्सिटया जर खरोखरीच्या युनिव्हर्सिटया असत्या तर गेल्या पन्नास वर्षांत हिंदुस्थानांत पाश्चात्य देशांतील विद्वानांच्या तोडीचे आज पुष्कळ विद्वान् तयार झाले असते. पण विहिरींतच जर पाणी नाहीं तर तें पोहऱ्यांत तरी कोठून येणार? परवां काशीस हिंदु-युनिव्हर्सिटी स्थापण्याचा जो विचार निघाला त्यांतील बीज हेंच होय. ब्रुक्लिन येथील शास्त्रकलाभवनांत 'हिंदुस्थान' या विषयावर कांहीं नुकतींच व्याख्यानें झालीं असून या भवनांत आणखी साडेपांचशे व्याख्यानें व्हावयाची आहेत. व्याख्यानाचे विषय इतके भिन्न भिन्न आणि व्यापक आहेत कीं, या शारदाभवनास खरोखरच विद्योपचयस्थान असे अन्वर्थक नांव देतां येईल. रसायनशास्त्र, विद्युच्छास्त्र, जीवनशास्त्र, प्राणिशास्त्र, इतिहास, नीतिशास्त्र, विणणें, चित्रकला, गाणें, भूगर्भशास्त्र, वगैरे हरएक प्रकारच्या विषयावर या संस्थेंत व्याख्यानें होतात व शिक्षण मिळतें, इतकेंच नव्हे तर यांतील पदार्थसंग्रहालयें आणि पुस्तकालयें इतकीं मोठीं आहेत कीं, त्यांतील कित्येकांस कोटयावधीं रुपये खर्च झालेले आहेत. विद्येची व ज्ञानप्रसाराची खरी आस्था व कळकळ कशी असतें हें यावरून सहज कोणाच्याही लक्षांत येईल. इंग्रज सरकाराच्या मनांत आह्मांस खरें ज्ञान द्यावयाचें होतें तर त्यांनीं एक तरी अशा प्रकारची संस्था हिंदुस्थानांत काढावयाची होती? हिंदु-युनिव्हर्सिटीस एक कोट रुपये कशास पाहिजेत असा कित्येकांचा प्रश्न आहे. पण अमेरिकेंतील या राक्षसी विश्वविद्यालयाकडे किंवा शास्त्रकलाभवनाकडे पाहिलें

ह्मणजे 'कोट रुपयांत काय होणार, हे फारच थोडे आहेत' असें तोंडावाटें सहजच उद्गार निघतात."

—केसरी, २३।१।०६.

## विद्यार्थी व राजकीय चळवळ.

देशहिताची कळकळ ही लहानपणींच विद्यार्थ्यांच्या मनांत बिंबली पाहिजे. कारण, हेच विद्यार्थी पुढें मोठे होऊन देशांतील कर्तासवर्ता प्रजा बनते. कित्येकांचें मत असें आहे कीं, विद्यार्थ्यांनीं सार्वजनिक किंवा राजकीय चळवळींत पडूं नये. पण टिळक यांचें मत याहून भिन्न आहे. विद्यार्थी अगदीं लहान असतील तर त्यांनीं अशा चळवळींत पडूं नये. पण वरिष्ट प्रतीच्या शाळांतील किंवा कॉलेजांतील विद्यार्थी प्रौढ असल्यामुळें व विद्यार्थीदशा संपतांच त्यांना व्यवहारात पडावयाचें असल्या-मुळें राजकीय किंवा सार्वजनिक चळवळींचें त्यांना ज्ञान झालें पाहिजे, इतकेंच नव्हे तर, आपल्या अभ्यासास व्यत्यय न आणतां असल्या चळ-वळींत मिसळून प्रत्यक्ष अनुभवाने ज्या गोष्टींचें ज्ञान संपादन करावयास पाहिजे तेंही त्यांनीं केलें पाहिजे. शाळेंतील किंवा युनिव्हर्सिटींतील अभ्यासक्रम ज्या दिवशीं विद्यार्थ्याचा सुटला त्याच दिवशी तो राष्ट्रांतील मोटा मनुष्य बनून नागरिकाचीं कर्तव्यें करण्यास योग्य झाला असें कोणास तरी ह्मणतां येईल काय? राजकीय किंवा सार्वजनिक चळवळींचें शिक्षण पूर्वी न मिळतां त्यांतील जोखीम एकदम पतकरावयास सांगणें ह्मणजे पूर्वी पाणी मुळींच न पाहतां एकदम पाण्यांत ढकलून एकाद्यास पोहण्यास सांगण्यासारखेंच हास्यास्पद आहे. तात्पर्य, मनुष्याला जी कामगिरी पुढें बजावावयाची असते त्याचें शिक्षण तरुणपणींच त्याला मिळालें पाहिजे. अशा दृष्टीनें पाहिलें ह्मणजे हिंदुस्थानांतील विद्यार्थ्यांना—अर्थात् प्रौढ विद्या-र्थ्यांना—आमच्या राजकीय स्थितींचें व सार्वजनिक चळवळींचें ज्ञान होणें जरूर आहे. स्वार्थानें, आपमतलबानें किंवा अशाच प्रकारच्या अन्य कांहीं कारणानें जे गुरु विद्यार्थ्यांना याविरुद्ध उपदेश करितात ते गुरुही नव्हेत; व जे विद्यार्थी आपल्या कर्तव्यास योग्य रीतीनें जागत नाहींत ते विद्यार्थीही नव्हेत, असें टिळक यांचें मत असून १९०५ सालीं जे लेख लिहिले आहेत त्यांत त्यांनीं आपलें मत पुढीलप्रमाणें स्पष्ट शब्दांनीं व्यक्त केलें आहे. ते ह्मणतातः—

" विद्यार्थ्यांनीं विद्यार्थीदशेंत अभ्यासाकडे आपलें लक्ष विशेष ठेवावें हेंही मत आह्मांस पूर्णपणें ग्राह्य आहे; किंबहुना आह्मीही विद्यार्थ्यांस तसेंच सांगत आलों आहों. परंतु विद्यार्थीदशेंत विद्यार्थ्यांनीं ज्या गोष्टी शिकावयाच्या त्यांतच धार्मिक, राजकीय व सामाजिक बाबतींचा समावेश होतो. हें शिक्षण सरकारी किंवा वर सांगितलेल्या निमसरकारी शाळांत त्यांस मिळत नाहीं. या शाळांतील गुरु खासगी रीतीनें किंवा पडद्याच्या आंत सार्वजनिक चळवळींशीं सहानुभूति दाखविणारे असतील. पण उपयोग काय? हें घरचें सौभाग्य सार्वजनिक रीतीनें प्रसिद्ध करण्याचा त्यांस पारतंत्र्यामुळें अधिकार नाहीं. अर्थात् हे या बाबतींत आमचे गुरु होणें शक्य नाहीं असेंच समजलें पाहिजे. आणि असें जर आहे तर विद्यार्थ्यांनीं अमुक सार्वजनिक चळवळींत पडावें व अमुक सार्वजनिक चळवळींत पडूं नये, असें हे कोण ह्मणणार? कै. न्या. रानडे आणि तेलंग यांचीं नांवें प्रमाण ह्मणून प्रि. सेल्बी यांच्या पत्रांत पुढें करण्यांत आलीं आहेत. पण आह्मांस जी प्रत्यक्ष माहिती आहे त्यावरून ही चूक आहे, असें ह्मणण्यास आह्मांस हरकत वाटत नाहीं. देशांतील हल्लींच्या पुढाऱ्यांनीं ज्या कांहीं राष्ट्रहिताच्या चळवळी सुरू केल्या आहेत, त्यांचें शिक्षण विद्यार्थ्यांस विद्यार्थीदशेंतच मिळालें पाहिजे, असें कै. रानडे यांचें उघड मत होतें, व ह्मणूनच मुंबई, पुणें येथे जेव्हां राष्ट्रीय सभा भरली तेव्हां सदर सभेंत विद्यार्थ्यांनीं पडणें इष्ट आहे असें त्यांनीं सांगितले होतें व त्याप्रमाणें तजवीज झाली होती. उघडच आहे कीं, राष्ट्रीय सभा, सामाजिक परिषद, औद्योगिक परिषद, प्रदर्शनें, शिवाजी उत्सव, गणपती उत्सव, स्वदेशी चळवळ वगैरे राष्ट्रहितास निरनिराळ्या पुढाऱ्यांनीं काढलेल्या सार्वजनिक चळवळींचें तत्व सदर चळवळींत यथारुचि मिसळून विद्यार्थ्यांच्या मनांत विद्यार्थीदशेंतच जर बिंबूं द्यावयाचें नाहीं तर हें शिक्षण त्यांस मिळावयाचें तरी केव्हां? विद्यार्थीदशा संपल्यावर तो नोकर होणार, आणि नोकरी संपल्यावर तो पेन्शनर होणार; आणि अखेरीस मागें आह्मीं दिलेल्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें 'न हिंदुः प्रभुरात्मनः' ह्मणून मरणार! यासाठीं आमचें असें ठाम मत आहे कीं, विद्यार्थ्यांस सार्वजनिक चळवळींत पडूं न देण्याचा नियम करणें ह्मणजे एक प्रकारें राष्ट्राचें नुकसान–राष्ट्राचा घात–करणें होय. विद्यार्थ्यांनीं आपला सर्व वेळ या कामीं लावावा असें कोणीही ह्मणत नाहीं. त्यांचें कर्तव्य अनेक बाबतींत ज्ञान मिळविण्याचें आहे, पण त्या बाबतींतच सार्वजनिक हिताचा किंवा चळवळीचाही समावेश होतो. राष्ट्राच्या उन्नतीकरितां ज्या चळवळी चालू आहेत त्यांत पडून व त्या पाहून त्यांच्या शक्याशक्यतेचा किंवा अधिकउण्या फायद्या–गैर–फायद्याचा विचार विद्यार्थ्यांनीं विद्यार्थीदशा संपण्यापूर्वीच आपल्या मनाशीं करून ठेवला पाहिजे. असें करण्यास जे गुरु सरकारचे नोकर ह्मणून किंवा अन्य तऱ्हेनें बांधले गेल्यामुळें त्यांस सवड देणार नाहींत ते त्यांचे गुरु नव्हेत, शत्रू होत; आणि प्रल्हादानें ह्मटल्याप्रमाणें त्यांस 'पापतरू'ची किंवा आह्मी ह्मटल्याप्रमाणें

'पोटभरू'ची उपमा देण्यास बिलकुल हरकत नाहीं. या उपमेनें ते गुरु अन्य प्रकरणीं ज्या मानास पात्र आहेत तो मान त्या वेळीं त्यांस देऊं नये असें जर कोणी समजत असेल तर ती त्यांची चूक आहे, किंवा आमच्या लेखाचा ते मुद्दाम विपर्यास करीत आहेत......वयांत आलेल्या मुलास स्वतंत्रता न देतां त्याला वडिलोपार्जित मिळालेल्या इस्टेटीवरही बाप जर डोळा ठेवूं लागला, अथवा सरकारच्या प्रत्यक्ष किंवा परोक्ष कह्यांत गुंतून एकादा गुरु जर शिष्यांच्या मनोवृत्तींस व ज्ञानास आळा घालूं लागला तर त्यासही पुत्रानें आणि शिष्यानें मान दिलाच पाहिजे असें जगांतील कोणतेंही शास्त्र प्रतिपादन करीत नाहीं; उलट आह्मी असें ह्मणतो कीं,

कामाल्लोभाद्भयाद्वापि मोहाद्वा भ्रष्टबुद्धितः ।
शिष्याय कुमतिं दद्यात् स गुरू राष्ट्रघातकः ॥

ह्मणजे हे अशा प्रकारचे गुरु या कामीं आमचे गुरूच नव्हेत असे समजून आह्मी चाललें पाहिजे. ''*

—केसरी ७।११।०५

---

* विद्यार्थ्यांनीं स्वदेशी किंवा राजकीय चळवळींत पडावें किंवा न पडावें याविषयीं लिहितांना 'इंडियन पेट्रियट' नांवाच्या मद्रास येथील नेमस्त पक्षाच्या पुढारी पत्रानें चळवळींत पडण्याविषयीं पुढीलप्रमाणें आपलें अनुकूल मत दिलें आहे:—

" The Swadeshi agitation may have undesirable features; the conduct of young men who assist it may be open to question. But the agitation itself is perfectly legitimate, and young men as well as old have a right to interest themselves in it and help it to the best of their ability and power. Nor is it right or legitimate to insist that any portion of the population should be debarred by reason of their age or education from takiug an active interest in public or political affairs. Education itself is a training for the responsibitities of life; and those responsibilities do not consist merely in passive obedience to law and authority, but involve an intelligent appreciation of the country's needs and an active attention to the management of the country's affairs. How are these responsibilities to be discharged if those who are the boys of to-day are not permitted to have anything to do with political affairs. Men do not become politicians suddenly, without training and preparation, simply because they have left school and college, and because they have caused to receive tuition in literature or law. They do not become capable of managing public affairs simply because they have ceased to be students. They must have acquired

## अशिक्षितांचा धिःकार करूं नका.

राजकीय स्थितीचें ज्ञान आमच्या सुशिक्षित लोकांस चांगलें होत चाललें आहे, एवढेंच नव्हे तर, सुशिक्षित लोकांच्या सर्व तऱ्हेच्या महत्वाकांक्षेस आळा पडत चालल्यामुळें त्यांचें लक्ष देशहिताकडे वेधत चाललें आहे; व त्यांना लिहितां वाचतां येत असल्यामुळें वर्तमानपत्रें, व्याख्यानें पुस्तकें, सार्वजनिक संस्थांच्या चळवळी, इत्यादींच्या द्वारें दिवसें दिवस तें अधिक वेधत जाईल. पण अशिक्षित लोकांत मात्र या ज्ञानाचा अद्याप व्हावा तितका प्रसार झाला नाहीं. सद्यःस्थितींत शेतकरी, कारागीर वगैरे सामान्य प्रतीच्या लोकांत या ज्ञानाचा प्रसार होणें अत्यंत इष्ट आहे. शेतकऱ्या सारख्या अशिक्षित लोकांचा आमच्या देशांत जास्त भरणा असल्यामुळें या लोकांत ज्ञानाचा फैलाव झाल्याशिवाय आमच्यांत संघशक्ति उत्पन्न होणार नाहीं; व संघशक्ति उत्पन्न झाल्याशिवाय आमच्या हातून कोणतेंही देशकार्य होणार नाहीं. करितां सुशिक्षित लोकांनीं अशिक्षित लोकांत मिसळून व्याख्यानाने व उपदेशानें त्यांच्यापुढें आपल्या राजकीय अवनतीचें व एकंदर देशस्थितीचें चित्र मांडलें पाहिजे. आज शेतकरी-वर्ग किंवा बहुजन–समाज बऱ्याच गोष्टींविषयीं अज्ञानी असल्यामुळें आपल्या शक्तीचें अनुमान त्यास करतां येत नसून आपण यःकश्चित् कोणी तरी आहों असें त्यांना वाटत आहे. ही स्थिति पालटून देशाचे खरे आधारस्तंभ आपण आहों, आपली कर्तबगारी व शक्ति मोठी आहे व आपण करूं तें होईल असा राजाप्रमाणें त्यांस विचार करावयास लावणें*.

---

the capacity while they were young, and before they were charged with public responsibilities. Men cannot run before they learn to walk; and they cannot certainly manage public affairs before they have had habitual knowledge and experience of them. The attitude of the Government can only mean that they do not want Indians to manage their own affairs or even to take any interest in those affairs. On any other hypothesis it is impossible to maintain the dictum against students having anything to do with politics. "—*1-11-05.*

*** लोकांनीं राजाप्रमाणें विचार करणें ह्मणजे काय, व असा विचार केल्यानें राष्ट्रीयत्वाची कल्पना पुढें उभी राहून लोकांत शक्ति कशी उत्पन्न होते याचें कलकत्ता**

हें सुशिक्षित लोकांचें मुख्य कर्तव्य आहे. शेतकरी कारागीर किंवा सामान्य प्रतीचे लोक ह्मणजे अडाणी, निवळ जनावरें, त्यांचा आपल्यास काय उपयोग आहे, त्यांचें मत कोण जमेस धरतो, अशा रीतीनें कोणीही त्यांचा धिःकार करतां कामा नये, एवढेंच नव्हे तर, सर्व कांहीं या अशि-

---

येथील ' धि डॉन ' नामक इंग्रजी मासिक पुस्तकाच्या कर्त्यांनीं नोव्हेंबर १९०५ च्या अंकांत पुढीप्रमाणें विवेचन केलें आहे. ते ह्मणतातः—

The basis of nationality, then, is to be found in a deep-seated, abiding love and hope for the common people, the land or the soil and people. It is through such love and hope that one learns to *think* of his country *as a whole*. But a people who have been subjected to a foreign domination for a long, long time have ceased to *think* of their country, *as a whole*; and this, above everything else, represents the haviest loss that can come upon an entire community or a people. "*The trick of thinking like a king*," as Sister Nivedita aptly terms it, is nothing but a capacity and also a habit to think of and consider the collective interests of a large community. And as we have said, it is undoubtedly the heaviest loss entailed on a people who are governed by foreigners from a foreign seat—that they *forget* to think of their country as a whole, *the habit that is the secret of rulers.* If I am asked what is the haviest yoke imposed by foreigners on a subject-people, I would not refer to any specific instances of grinding despotism, to any specific repressive measures which might curb their spirit or reduce them to a state of helpless subjection. But I would consider as the heaviest of all yokes—the moral and intellectual enslavement of a whole people, when that people have acquired the slave's habit to think of themselves not in their collective capacity but only as separated and detached units, groups or classes, with separate rights and interests antagonistic to the whole. That represents the vital and fundamental difference or contrast between the attitudes and habits of foreign rulers and their subjects. Indians have lost the habit of thinking like a king and they have got to recover that habit. And as with Ole Bull, so with us also the love of the common people, must be the basis of a national awakening, for through this love and hope for them should we be able once more to think of our country *as a whole*, and so recover a habit which is the secret of all self-government.

क्षित लोकांच्या सहाय्यानें, त्यांच्याच जिवावर करावयाचें आहे हें लक्षांत ठेऊन त्यांच्यांत राजकीय ज्ञानाचा प्रसार केला पाहिजे, असें टिळक यांचें मत असून १८९५ सालीं ता. १२ नोव्हेंबरच्या केसरींत 'जनावरें कोण?' या लेखांत तें त्यांनीं पुढीलप्रमाणें व्यक्त केलें आहे. ते ह्मणतातः—

"लोकमत या शब्दाचा अर्थ तरी काय, असा कोणी प्रश्न करतील तर त्यांस आमचें असें उत्तर आहे कीं, सामान्यतः खाऊनपिऊन सुखी अथवा लिहितां वाचतां येत असून आपल्या कष्टानें आपला व आपल्या कुटुंबाचा नेकीनें व सचोटीनें निर्वाह करणारे असे समाजांत जे लोक असतील—मग ते विद्वत्तेनें, श्रीमंतीनें किंवा अधिकारानें कमी असोत किंवा जास्त असोत—त्या सर्वांचें जें मत तें लोकमत होय. या वर्गाचें मत जोंपर्यंत आपल्यासारखें झालें नाही तोंपर्यंत आपण त्यांस शिव्या देऊन जनावरें ह्मणणें ह्मणजे आपण आपल्या मूर्खपणाची कमाल करण्यासारखेंच आहे. जगांत एकाहून एक इतके विद्वान आहेत कीं, कोणी एकानें आपल्या विद्वत्तेची घमेंड मारणें ह्मणजे आपली क्षुद्रबुद्धि आणि बेपर्वाई यांचें प्रदर्शन करण्यासारखेंच आहे? सुशिक्षितवर्गाच्या मतास जर प्राबल्य द्यावयाचें तर आमचे राज्यकर्ते आमच्यापेक्षां अधिक सुशिक्षित आहेत; मग कॉंग्रेस तरी कशाला आणि कान्फरन्स तरी कशाला? आमच्यावर इंग्रज लोक जें राज्य करीत आहेत तें आमच्यापेक्षां ते अधिक सुशिक्षित आहेत ह्मणूनच होय. मग आमच्या सारख्या त्यांच्याहून कमी सुशिक्षित लोकांच्या मताचें त्यांस महत्व काय ह्मणून वाटावें? इंग्रज राज्यकर्ते जर कशाची पर्वा करीत असले तर ती बी. ए. एम्. ए. च्या मतांची नव्हे. त्यांस असे पक्के ठाऊक आहे कीं, ही युनिव्हर्सिटींतून बाहेर पडलेली मंडळी स्वतः कुचकामाची आहे! सरकार जर कशाची पर्वा करीत असले तर ती आह्मी वर सांगितलेल्या लोकमताची होय. आमच्या विद्वानांस ज्या गोष्टी कळतात त्यापेक्षां दसपटीनें जास्त गोष्टी युरोपियन अधिकाऱ्यांना कळण्याइतके ते विद्वान आहेत; आमच्या टुरटुरीनें आह्मी सरकारास जागें करणार हें ह्मणणें अगदीं चुकीचें आहे. सरकार इतकें शाहाणें आहे कीं, ते आमच्यापेक्षां अधिक जागें आहे; व नुसत्या विद्वानांच्या ओरडीस ते कधींही भीक घालावयाचें नाहीं. करितां ज्या कोणास खऱ्या विद्येचा संस्कार झाला असेल त्यानें आपल्या देशाच्या खऱ्या हिताच्या काय गोष्टी आहेत त्याचा विचार करून त्याप्रमाणें उदमी, व्यापारी, कारागीर, कारकून, सरदार, जहागीरदार, इनामदार, शेतकरी वगैरे लोकांचें मत आपणास अनुकूल करून घेतलें पाहिजे. खरें लोकाप्रणित्व यांतच आहे, लोकांस जनावरें ह्मणण्यांत नाहीं...तुह्मी शहाणे असाल; बर्क, गिबन, बकल इत्यादिकांच्या ग्रंथांचीं पारायणें किंबहुना भाषांतरेंही तुह्मी केलीं असतील; इंग्रजी लिहिण्यांत व बोलण्यांत तुमचा हातखंडा असेल. परंतु ज्याप्रमाणें दारूवांचून नुसत्या गोळीनें कार्य होत नाहीं त्याप्रमाणें देशांतील

खातेपिते, उदमी, धंदेवाले आणि शेतकरी वगैरे लोक जोंपर्यंत तुह्मांस अनुकूल झालेले नाहींत, तोंपर्यंत तुमच्या विद्वत्तेचें कांहीं एक चीज व्हावयाचें नाहीं अथवा तिकडे कोणी ढुंकूनही पाहणार नाहीं. राष्ट्रास ऊर्जितावस्था येण्यास राष्ट्रांतील वर सांगितलेल्या प्रकारच्या लोकांचें मत बदललें पाहिजे व तें बदलण्याकरतां प्रत्येक विद्वानानें खटपट केली पाहिजे. राष्ट्रीय सभा भरभराटीस येऊन राज्यकर्त्यांस तिचें ह्मणणें ग्राह्य होण्याचा जर कधीं संभव असला तर तो ज्या दिवशीं वर आह्मी सांगितल्या प्रकारचें लोकमत सदर सभेस अनुकूल होईल तेव्हांच प्राप्त होईल. सतारीची अगर तंबूरीची तार नुसती वाजविल्यानें जसा तिजपासून आवाज निघत नाहीं; पण तीच तार भोंपळ्यावर चढविली ह्मणजे ज्याप्रमाणें तिच्यांतून कर्णमधुर ध्वनि बाहेर पडतो तद्वत्च देशांतील पुढारी विद्वानांचा व लोकमताचा संबंध आहे. लोकांस जनावरें ह्मणणारे विद्वान् गृहस्थ हे स्वतःच जनावरें होत असे ह्मणण्यास आह्मांस कोणतीही हरकत वाटत नाहीं. आज लाखों रुपयांचा व्यापार करणारे लोक गाढव; आणि बेकनचीं दोन पुस्तकें घोकून नाकावर चष्मा ठेवलेला ग्याज्यु-एट शहाणा हें ह्मणणें कोणास शोभत असेल तें शोभो; आह्मांस तर ते अत्यंत त्याज्य आणि अश्लाघ्य वाटतें."

## व्यापारधंदा व देशाभिमान.

वरील विवेचनावरून शेतकरी, व्यापारी, सावकार वगैरे लोकांचा समाज आमच्या देशांत जरी अशिक्षित आहे तरी तोच अधिक असल्या-मुळें त्यांना आपल्या स्थितीची ओळख पटवून सुशिक्षित लोकांनीं देश-हिताच्या कामीं त्यांना आपलेसें करून घेतलें पाहिजे, ही गोष्ट कोणा-च्याही ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. सुशिक्षित लोकांजवळ ज्ञान व विद्या आहे, पण पैसा नाहीं; आणि पैशाशिवाय तर कांहीं चालत नाहीं. करितां त्यांनीं सावकार, व्यापारी वगैरे सारख्या संपन्न देशबंधूंस स्वतःच्या कल्याणाबरोबरच देशाच्या कल्याणाकरितां कसे पैसे खर्च केले पाहिजेत याचेंही ज्ञान करून दिलें पाहिजे. सरकारी कायदेकानूंच्या जोरावर परदेशी व्यापाऱ्यांस उत्तेजन मिळत असल्यामुळें आमचा व्यापार व उद्योगधंदे जरी बुडाले आहेत तरी शास्त्रीय शिक्षण व ऐक्य यांच्या अभावामुळें ते विशेष ओहटीस लागले आहेत हें जर त्यांच्या ध्यानांत येईल तर अद्यापही ते आह्मांस बऱ्याच अंशानें ऊर्जितावस्थेस आणतां येतील. धंदेशिक्षणाकरतां जर्मनी, जपान, अमेरिका वगैरे सारख्या स्वतंत्र देशांत येथील विद्यार्थी पाठवून ते परत आल्यावर धनिक

लोकांनीं त्यांना भांडवल देऊन नवीन नवीन कारखाने सुरू केले पाहिजेत, व परकी लोकांचें व्यापारी धोरण समजून घेऊन त्याप्रमाणें आमच्याही व्यापाऱ्यांनीं या देशांतील व्यापार सुरू ठेवला पाहिजे. मुंबई, मद्रास, कलकत्ता वगैरे मोठमोठ्या शहरांतील देशी व्यापाऱ्यांजवळ आज मितीस बरेंच भांडवल आहे; व ते मोठ्या प्रमाणावर व्यापारही करीत असतात. पण आपली देशस्थिति ओळखून व्यापार करावा हें अद्याप त्यांच्या डोक्यांत येत नाहीं. अर्थात् पदरास थोडासा खार लावून घेऊन किंवा झीज सोसून देशाभिमानबुद्धीनें व्यापारधंदा कसा करावा याचें त्यांना ज्ञान नाहीं. हें ज्ञान होईल तर अद्याप हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांजवळ असलेल्या पैशाचा चांगला उपयोग होऊन सद्यःस्थितींतही त्यांना मोठें कार्य करतां येईल, असें टिळक यांचें मत असून तें त्यांनीं ता. २४ मे १९०४ च्या केसरींत मुंबईचे प्रसिद्ध देशाभिमानी व उदार व्यापारी मि. जमशेटजी नसरवानजी टाटा यांच्या मृत्युलेखांत पुढीलप्रमाणें व्यक्त केलें आहे. ते ह्मणतातः—

" चांगल्या कामीं टाटा यांची दानशूरता किती असे हे रिसर्च युनिव्हर्सिटीकरिता तीस लाख रुपये त्यांनीं एकदम दिले एवढ्यावरून व्यक्त होतें. परंतु त्यांच्या योग्यतेची सीमा येथेंच संपली असें मात्र कोणी समजूं नये. राजकीय कामांत किंवा चळवळींत ते स्वतः होऊन कधींही फारसे पुढें आलेले नाहींत; मग त्यांच्या मनाची प्रवृत्ती तिकडे नव्हती ह्मणा, अथवा त्यापेक्षां विशेष महत्वाचीं कामें त्यांस कर्तव्य होतीं ह्मणा. हा त्यांचा दोष आहे असें आमचें बिलकुल ह्मणणें नाहीं; व मुंबईच्या एका दैनिक पत्रकारानें ह्मटल्याप्रमाणें हा त्यांच्या अंगीं एक गुण होता असेंही आह्मांस वाटत नाहीं. मि. टाटा यांच्याप्रमाणें ठिकठिकाणीं प्रवास केलेले, बुद्धिवान्, आणि संपत्तिमान् असे जे व्यापारी आणि संस्थानिक आहेत त्यांचीं कर्तव्यें कॉंग्रेसच्या कर्तव्याहून भिन्न आहेत अशी आमची समजूत आहे, आणि ती समजूत मि. टाटा यांच्या चरित्रावरून चांगली दृढ होते. एवढ्याकरितांच त्यांचें चरित्र सर्व श्रीमंत, व्यापारी व संस्थानिक यांनीं अनुकरण करण्यासारखें आहे असें आह्मी ह्मणतों. हिंदुस्थानांत आजकाल जर कोणाजवळ कांहीं संपत्ती असेल तर ती कांहीं देशी संस्थानिकांजवळ आणि व्यापाऱ्यांजवळ आहे हें निर्विवाद आहे. या श्रीमंत गृहस्थांची संख्या फारच थोडी आहे हें आह्मी जाणून आहों. पण दुःखाची गोष्ट ही कीं, ज्या थोड्या लोकांस अशा तऱ्हेची अनुकूलता आहे ते देशहिताच्या कामी मि. टाटा यांच्याप्रमाणें उद्योग करण्यास तयार नाहींत. हिंदुस्थानचा माल परदेशांत पाठवून आणि परदेशांतला माल हिंदुस्थानांत आणून त्यावर मिळालेल्या

कमिशनानें श्रीमंत झालेले व्यापारी मुंबईसारख्या शहरांत बरेच आहेत. पण मि. टाटा यांजप्रमाणें या व्यापाराचा देशहिताच्या दृष्टीनें विचार करणारे आणि अशा दृष्टीनें विचार करून त्यांत असलेले कांहीं दोष काढून टाकण्याचा प्रयत्न करणारे हिंदु, पारशी किंवा मुसलमान व्यापारी क्वचितच सांपडतील. पैसे मिळविणें एवढ्याच उद्देशानें व्यापार करावयाचा झटलें ह्मणजे देशांत येणारा व देशांतून बाहेर पडणारा माल कोणत्या प्रकारचा असतो व त्यानें आपला देश सधन होतो कीं निर्धन होतो हें पाहण्याची कांहीं जरूर राहत नाहीं. बहुतेक व्यापारी अशाच दृष्टीनें व्यापार करितात; व त्याच्या अंगीं जी कांहीं बुद्धिमत्ता असते ती सर्व अशाच प्रकारच्या व्यापारांत खर्च करून ते व्यापाऱ्यांचे राजे बनतात. मि. टाटा यांच्या अंगी हे सर्व गुण तर होतेच, परंतु ते ज्याने प्रसिद्धीस आले तो गुण याहून विलक्षणच लोकोत्तर होता. आपल्या इतर व्यवसायबंधूंप्रमाणें ते केवळ व्यापार करून स्वस्थ बसले नाहींत. हिंदुस्थानांत परदेशी माल जास्त कां येऊं लागला, परदेशांतून या देशांत येणारा माल इकडेच तयार होण्यास कांहीं हरकत आहे कां काय, असल्यास ती कोणती व ती दूर करण्याचे उपाय काय, इत्यादि विचारांत त्यांचें मन नेहमीं गढून गेलेले असे; आणि या अडचणी दूर करण्याकरितां लागेल तितका पदरचा पैसा खर्च करण्यास ते उदार अंतःकरणाने नेहमीं तयार असत. त्यांच्या अंगीं मोठा व अलौकिक गुण झटला ह्मणजे हाच होय, व त्याचें जर सर्व श्रीमंत लोकांनीं अनुकरण केलें तर हिंदुस्थान देश हल्लीं ज्या विपन्नावस्थेंत आहे त्यांतून त्याची सुटका होण्यास फार वेळ लागणार नाहीं. हिंदुस्थान देशाची सांपत्तिक अवनति होण्यास काय कारणें झालीं व तीं दूर कशी करावीं याबद्दल पुस्तकरूपानें किंवा व्याख्यानद्वारें लोकमत जागृत करणें हें विद्वानांचे काम होय. परंतु हीं कारणें समजण्याइतकी बुद्धि असून विपुल द्रव्यसामर्थ्यही ज्यांजवळ आहे अशा गृहस्थांनीं विद्वानांचा अनुवाद करून केवळ बडबड न करितां कांहीं तरी स्वशक्त्यनुसार उद्योग करण्यास लागावें असें मागें एकदां आह्मी झटलें होतें. मि. टाटा यांच्या चरित्रावरून जर श्रीमंत लोकांनीं कांहीं बोध घेण्यासारखा असला तर हाच होय. पहिली गोष्ट ही कीं, पृथ्वीवरील निरनिराळ्या देशांत प्रवास करून आपल्या सूक्ष्मबुद्धीनें यांनीं तेथल्या सांपत्तिक स्थितीचे चांगलें ज्ञान करून घेतलें होतें. जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका, जपान वगैरे देश आपापल्या हिताकरितां कसे झटत आहेत याचें ज्ञान पुस्तकावरून नव्हे, तर प्रवास करून प्रत्यक्ष अवलोकनानें मि. टाटा यांनीं संपादन केलें होतें; आणि त्यांनीं निरनिराळ्या वेळीं देशहिताचीं जीं निरनिराळी कामें हातीं घेतलीं त्या सर्वांचें बीज परदेशांत पूर्व वयांत त्यांनीं जो प्रवास केला तेंच होय. सुताच्या किंवा कापडाच्याच धंद्याची गोष्ट घ्या. विलायतेंतील सूत काढण्याच्या व कापड विणण्याच्या गिरण्यांचीं यंत्रें इकडे पुष्कळांनीं आणलीं आहेत. पण देशी गिरण्यांत बारीक सूत

कां निघत नाहीं याचीं कारणें शोधून काढून त्याच्या प्रतिकारार्थ आपल्या नफ्यांतील कांहीं भागाचा उपयोग करणारे मि. टाटासारखे श्रीमंत व्यापारी क्वचित् आढळून येतील. या देशात लांब धाग्याच्या कापसाची इजिप्तप्रमाणें लागवड होणें शक्य आहे कीं नाहीं इकडे मि. टाटा यांनीं बरेंच लक्ष पुरविलें होतें. हा त्यांचा उद्योग जर पूर्णपणें सफल झाला असता तर लांब धाग्याचा कापूस हिंदुस्थानांत उत्पन्न होऊन लँकेशायर आणि मँचेस्टर येथील लोकांस होणारा कोट्यावधि रुपयांचा फायदा त्यांस न मिळतां आमच्या देशांतील व्यापाऱ्यांस झाला असता. केवळ व्यापार करणें आणि व्यापाराची वृद्धि होण्यास काय काय गोष्टी पाहिजेत याचा शोध करणें या दोन गोष्टी अगदीं भिन्न आहेत. पहिली गोष्ट मुंबईतील बऱ्याच हिंदु, मुसलमान किंवा पारशी व्यापाऱ्यांस साधलेली आहे; पण दुसरी गोष्ट मात्र मि. टाटा यांसच साधली होती असें ह्मटलें असतां त्यांत कांहीं अतिशयोक्ति नाहीं. कापसाच्या व्यापाराची ही गोष्ट झाली. पण ही एकच गोष्ट मि. टाटा यांनीं हातीं घेतली होती असें नव्हे. नागपूर प्रांतांत लोखंडाच्या व तांब्याच्या खाणी सुरू करून या देशांत लोखंडाचें व तांब्याचे कारखाने काढावे अशाबद्दलही त्यांनीं उद्योग केला होता, व त्यास लागणारें एक कोट रुपयांचें भांडवलही उभें करण्यास ते तयार होते. पण दुर्दैवाची गोष्ट ही की, लांब धाग्याच्या कापसाच्या लागवडीच्या कामीं किंवा लोखंडी खाणीचा उद्योग या देशांत सुरू करण्याच्या कामी मि. टाटा यांस सरकारांतून कोणत्याच प्रकारचें साहाय मिळालें नाहीं. ...... चीन देशांत हिंदुस्थानांतून जें सुत व कापड जातें तें तिकडे पोंचते करण्यास मुंबईतलि गोऱ्या आगबोटवाल्या कंपन्या आपापसांतील संगनमताने जबर भाडें घेत असत; व त्यामुळें मुंबईतील गिरण्यांत तयार होणारें सूत व कापड चिनांत जितकें स्वस्त द्यावयास पाहिजे तितकें देतां येत नसे. मि० टाटा यांच्या लक्षांत ही गोष्ट आल्याबरोबर त्यांनीं जपानी आगबोटवाल्यांच्या साहाय्याने हीं भाडीं कमी करण्याचा प्रयत्न केला आणि असें दर्शविलें कीं, हिंदुस्थानांतील मेल कॉंट्राक्ट घेऊन रयतेच्या पैशावर समृद्ध झालेल्या युरोपियन आगबोटवाल्यांच्या कंपन्या अखेरीस हिंदुस्थानांतील लोकांचेंच अनहित करण्यास प्रवृत्त होतात. या कामीं मि. टाटा यांस दोन लक्ष रुपये खर्च आला खरा, पण अखेरीस त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें युरोपियन कंपन्यांस आपलें भाडें कमी करावें लागलें.... व्यापारी बाबतींत असा पुढाकार घेणाऱ्या गृहस्थांच्या अंगीं उत्साह, हुषारी, निस्पृहता, औदार्य, धैर्य, इत्यादि गुण राजकीय बाबतींतील पुढाऱ्यापेक्षां कमी लागतात असें नाहीं. कोणत्याही बाबतींत पुढाकार घेण्यास तयार झालें ह्मणजे त्या बरोबरच पुढारीपणाचीं जीं आनुषंगिक संकटें तींही सोसण्यास तयार असले पाहिजे. मि. टाटा यांची वृत्ती अशाच प्रकारची होती व त्यांनीं योजलेल्या गोष्टी सिद्धीस न गेल्याचा दोष त्यांच्याकडे नसून हल्लींच्या परिस्थितीकडे आहे. त्यांच्या सारखा पुढारी जर पाश्चिमात्य देशांत उत्पन्न झाला

असता तर देशाच्या व्यापारांत त्यानें चांगली क्रांती घडवून आणली असती. आमच्या दुर्दैवानें तशा प्रकारची आमची परिस्थिति नाहीं."

## सुशिक्षितांचें वर्तन बाणेदारपणाचें पाहिजे.

लोकांत देशस्थितीच्या ज्ञानाचा प्रसार करणें हें जितकें सुशिक्षित लोकांचें कर्तव्य आहे तितकेंच देशस्थितीला अनुरूप वर्तन ठेवणें हेंही सुशिक्षित लोकांचें कर्तव्य आहे. सुशिक्षित लोकांतसुद्धां अद्याप देशाभिमान व्हावा तसा जागृत झालेला नाहीं हें सरकारी पदकें, पदव्या, सन्मानाच्या जागा वगैरेंस लुब्ध होऊन लोकांचे कित्येक पुढारी आपल्या स्वतंत्रतेस मुकतात, एवढेंच नव्हे तर, त्या आमिषास भुलून आपण पूर्वी ज्या तऱ्हेची देशहिताची कळकळ दाखविली असते किंवा जशा तऱ्हेचा स्वार्थत्याग केलेला असतो त्याविरुद्धही वर्तन करण्यास ते मागें पुढें पाहत नाहींत यावरून व्यक्त होतें. देशस्थितीचें अज्ञान एकवेळ पुरवलें; पण सज्ञान झालेले चांगले लोक जेव्हां आपण होऊनच देशहिताच्या विरुद्ध वागण्यास प्रवृत्त होतात तेव्हां राष्ट्रांत ऐक्य व बळकटी उत्पन्न होण्याचा काल दूर दूर गेला तर त्यांत नवल तें कोणतें ? स्वहिताविरुद्ध वागणारांना सामदामादि उपायांनीं सरकारी अधिकारी आपलेसें करून घेणार हें खास; पण त्याबरोबरच आपण ज्या देशांत जन्मलों, पोसलों व वाढलों त्या देशाचें आपल्या हातून योग्य ऋण फिटलें कीं नाहीं याचाही त्यांनीं अवश्य विचार केला पाहिजे. हा विचार हल्लींच्या काळीं कित्येक सुशिक्षित पुढाऱ्यांकडून व्हावा तसा होत नाहीं व ह्मणूनच देशांत राष्ट्रैक्याची कल्पना लवकर वृद्धिंगत होत नाहीं. एकीकडे एकाद्या सरकारी अधिकाऱ्याची कारकीर्द वाईट आहे ह्मणावयाचें आणि दुसरीकडे तोच अधिकारी पेन्शन घेऊन निघाला कीं, स्तुतिस्तोत्रें गाऊन त्याच्याकरतां आपल्या गरीब देशबांधवाच्या खिशास चाट देऊन त्याचें स्मारक करण्याची तयारी करावयाची हें दुटप्पी वर्तन अत्यंत वाईट आहे, एवढेंच नव्हे तर, देशहिताच्या दृष्टीनें अगदीं गैर आहे. तसेंच आपमतलबानें केवळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना खुष ठेवण्याकरतां बेजबाबदाररीतीनें पुढें पुढें करून लौकिकस्वातंत्र्यास डाग लावणाऱ्या पुढाऱ्यांचेंही वर्तन अत्यंत अश्लाघ्य होय. यानें आपला तोंडपुजेपणा व्यक्त होऊन स्वाभिमान व देशाभिमान आपल्यांत मुळींच नाहीं असें आपल्याच तोंडानें आपण सांगण्यासारखें आहे.

हें राष्ट्रविघातक वर्तन आमच्या सुशिक्षित लोकांनीं—विशेषतः पुढाऱ्यांनीं—आजिबात सोडलें पाहिजे तरच देशाची उन्नति होईल असें टिळक यांचें मत असून तें त्यांनीं अनेक वेळां व्यक्त केलें आहे. त्याची प्रचीती मागें दिलेल्या कांहीं उताऱ्यांवरून वाचकांस येईलच. तथापि, आणखी एक दोन प्रसंगांचे त्यांचे उद्गार येथें देतों.

सन १९०५ सालीं युवराजांचें आगमन मुंबईस व्हावयाचें होतें म्हणून तेथील कित्येक पुढाऱ्यांनीं लोकांशीं जें वर्तन केलें त्याबद्दल टीका करतांना ता. २४ आक्टोबरच्या केसरींत ते म्हणतातः—

" मुंबईच्या पुढारी लोकांनी युवराजाचें सार्वजनिक रीत्या स्वागत करणें अयोग्य नाहीं; पण हे पुढारी दोन दोन घोड्यांच्या गाडीत बसून खासगी घरवाले लोकांस आपापलीं घरें साफसूफ करून दिवे लावण्यास जेव्हां सांगत हिंडतात तेव्हां राजनिष्ठेला फाजील ऊत येऊन तिनें आमच्या पुढारी मंडळींस घेरलें याबद्दल खेद प्रदर्शित केल्यावांचून आमच्यानें राहवत नाही. असल्या गोष्टी वाजवीपेक्षां फाजील न होण्याची लोकांनीं व विशेषतः लोकांच्या पुढाऱ्यांनी खबरदारी घेतली पाहिजे. युवराज या देशांत आले म्हणून मुंबईच्या प्रत्येक घरवाल्याने ( नोटिशीत Every householder असे शब्द आहेत ) आपलें घर काय म्हणून रंगवावें हें आम्हांस समजत नाहीं. ही राजनिष्ठा नव्हे, चोंबडेपणा आहे हें आमच्या लोकांच्या लक्षांत केव्हां येईल तेव्हां येवो. बरें, घरवाले या कमिटीच्या मेंबराच्या विनंतीवरून रोषनाई करण्यास कबूल झाले, तर त्याचा खर्च श्रीमंत घरवालाही आपल्या पदरचा करीत नाहीं, भाडेकऱ्यांपासून निराळ्या रीतीने वसूल करितो, निदान आज तशा तऱ्हेच्या भाडेकऱ्यांना कांहीं नोटिसा मिळाल्या आहेत हें प्रसिद्ध आहे. याचा उघड असा अर्थ झाला कीं, युवराज मुंबईला येणार म्हणून मुंबईस एकादी खोली घेऊन राहणाऱ्या गोरगरीब भाडेकऱ्यानेंही या पुढाऱ्यांचे चोंचले पुरे करण्याकरितां थोडाबहुत तरी कर भरावा. आम्हांस ही गोष्ट अगदीं अप्रशस्त वाटते. मुंबईच्या श्रीमंत लोकांनीं आपल्या घरांत वाटेल तेवढी रोषनाई करावी. परंतु प्रिन्स ऑफ वेल्सच्या नांवावर किंवा त्यांच्या सन्मानाकरितां म्हणून गोरगरीब भाडेकऱ्यांवरसुद्धां घरवाल्याच्या मार्फत कर वसवावा हें अनुचित होय; इतकेंच नव्हे तर, गरीबांवर हा एक प्रकारचा जुलूमच आहे. मुंबईसरकारास ही गोष्ट कळली आहे कीं नाही हें आम्हांस माहीत नाही. पण जर कळली असेल किंवा आतां कळेल तर सरकारानें आरण होऊन तिचा प्रतिकार करणें जरूर आहे. आगतस्वागत, विशेषतः करून युवराजाचें आगतस्वागत, आम्ही केलें पाहिजे आणि तें सार्वजनिक रीतीनें करण्याची तजवीज होत आहे. पण या स्वागतासाठीं आपलीकडे

जाऊन कोणीही प्रत्येक घरवाल्यास आपलें घर सजवून त्यांत रोषनाई करण्यास सांगणें हें फाजिलपणाचें काम होय. मुंबईच्या पुढाऱ्यांनीं ही गोष्ट करण्याचें नाकारावयास पाहिजे होतें. पण तसें जर त्यांनीं केलें नाहीं तर निदान या कामीं स्वतःचे गाडीघोडे झिजविण्याचा उत्सव तरी दाखवावयास नको होता. आज यांची मजल घरास रंग देणें आणि आंत रोषनाई करणें यावर आली आहे. पण उद्यां कोणी असें सांगतील कीं, प्रिन्स ऑफ् वेल्स येथें येतील तेव्हां तुह्मी आपल्या घरांत गुळाची पोळी करून खात जा, चांगलीं वस्त्रें परिधान करा आणि इतर कांहीं कारणांमुळें तुह्मांस दुःख झाले असले तरी तें विसरून चेहेऱ्यावर आनंदाची मुद्रा दिसेल अशी तजवीज करा. वॉर्ड कमिट्यांनीं ही तजवीज अद्याप केली नाहीं; पण त्यांचा हल्लींचा उद्योग जर त्यांस खरोखरच शहाणपणाचा वाटत असेल तर प्रत्येक घरवाल्यास त्यांनीं याप्रमाणे उपदेश करावा व गरीब असतील त्यांस मिष्टान्न तयार करण्याकरितां गूळ व आटा त्यांच्या घरी पाठवून चेहरा आनंदित दिसण्याकरितां एकादी पावडर असेल तर तीही पाठवावी ! मुंबईतील बडे लोक श्रीमंत आहेत, तेव्हां ते काय न करूं शकतील? बाकी राजनिष्ठा ह्मणजे काय, सार्वजनिक सन्मान कसा करावा व त्याची मर्यादा किती, हें मात्र यांस कळेनासें झालें आहे एवढें निःसंशय आहे."

मि. जाइल्स यांनीं देशी भाषेंतील ग्रंथांवर अभिप्राय देतांना मि. मलबारी यांच्या ग्रंथाबद्दल त्यांजवर राजद्रोहाचा आरोप केला होता. त्याचें निरसन मि. मलबारी यांनीं आपल्या वर्तमानपत्रांतून केल्यावर जाइल्स साहेबांस जाब विचारावा ह्मणून एक निराळें पत्र त्यांनीं सरकाराकडे पाठविलें होतें; व त्यांत कारण नसतां आपल्या राजनिष्ठेची जास्त घमेंड मारली होती. यावर सरकारानें मि. जाइल्स यांना दोष न देतां उलट त्यांची पाट थोपटून मि. मलबारी यांच्याच तोंडास पानें पुसलीं होतीं. यावरून राजकारणी न्याय कसा असतो व नेहमीं सरकारची स्तुती करणारे गृहस्थही प्रसंगविशेषीं कसे फजित पावतात. हें दाखविण्याच्या उद्देशानें टिळक यांनीं ता. २० नोव्हेंबर १९०० च्या केसरींत पुढीलप्रमाणें टीका केली आहे. ते ह्मणतातः—

" सरकारी खात्यावरील एका मुख्य अधिकाऱ्याची चूक झाली असली तरी त्याची उघडपणें नालस्ती करावयाची नाहीं असें जें राजकारणाचें सामान्य धोरण आहे तेंच या ठरावांत चांगलें दिसून येत आहे; व मि. मलबारी शेट यांस ही गोष्ट पूर्वी कळली नसली तर ती त्यांची मोठी चूक झाली असें आह्मी समजतों. राज्यकारभाराचीं कामें करणें किंवा त्यांचें व्यवहारदृष्ट्या खरें धोरण ओळखणें यांत आणि

राज्यकर्त्यांची भाविक रीतीनें नेहमीं स्तुती करीत राहणें यांत किती अंतर आहे हें आतां तरी मलबारी शेटजींस कळून येईलें अशी आह्मांस उमेद आहे....आपण इंग्रजी राज्याचे खरोखरच खांब आहों अशा समजुतीवर सरकारास आपल्याकरतां एका मोठ्या इंग्रजी अधिकाऱ्यास दूषण देण्यास सांगणें ह्मणजे एक प्रकारें आपली नसती बढाई गाऊन आपला उणेपणाच जगास दाखविणें होय, हें मलबारी शेटजींसारख्या सुज्ञ मनुष्याच्या लक्षांत सहज येण्यासारखें होतें....मलबारी शेट यांनीं या प्रसंगीं देवाकडे धांव घेण्याचीच कांहीं जरूर नव्हती. त्यांनीं जाइल्ससाहेबांस जें उत्तर दिलें होतें तें चांगलें वठलें होतें व त्यावर सरकारचें मत घेण्याची कांहीं जरूर नव्हती. पण आह्मी सरकारी शिक्क्याचे राजभक्त या वृथा घमेंडीवर मि० मलबारी शेट यांनीं पुढील पत्रव्यवहार केला व त्याचें त्यांस फलही मिळालें. ईश्वर करो आणि एवढ्यानें तरी त्यांचे डोळे उघडोत ह्मणजे झालें. इंग्रजी राज्य चांगलें आहे, यापेक्षां जास्त चांगलें परकी राजे आह्मांस मिळणें शक्य नाहीं हीं दोन कारणें आमच्या राजनिष्ठेस बस्स आहेत. ग्लॅडस्टनसारखे मुत्सद्दीही यापेक्षां आमची कांहीं निराळी समजूत असावी असें ह्मणत नाहींत. मग उगीच आपणास आपण इंग्रजी राज्याचे खांब बनवून सरकाराजवळ राजभक्तीचीं सर्टिफिकिटें मागत सुटण्यांत अर्थ काय ? मि. मलबारी यांची चूक झाली ती हीच होय; आणि इतउत्तर तरी त्यांच्या हातून अशी चूक घडणार नाहीं अशी आह्मांस आशा आहे. या सर्व प्रकरणापासून जर कोणी कांहीं बोध घ्यावयाचा असला तर तो हाच होय. ”

सर जेम्स मॉंटीथ हे नोकरीची मुदत संपल्यावर विलायतेस निघाले असतां ना. विठ्ठलदास ठाकरसी यांनीं इतर कांहीं कौन्सिलर जमवून एक गार्डनपार्टी दिली. त्यावर टीका करतांना ते ता. ८।८।०५ च्या केसरींत येणेंप्रमाणें लिहितातः—

“ मुंबईसरकारच्या कायदेकौंसिलाचे पहिले सभासद सर जेम्स मॉंटीथ यांची या देशांतील नोकरीची व कौंसिलरपणाची मुदत संपल्यामुळें त्यांच्या जागीं मि. म्यूर-मॅकेंझी यांची नेमणूक होऊन मॉंटीथसाहेब गेल्या मेलनें विलायतेस गेले ! गव्हर्नर किंवा कौंसिलर यांच्याबद्दल लोकांनीं जें मत द्यावयाचें तें सदर व्यक्तीच्या खासगी वर्तनावरून द्यावयाचे नसतें हें तत्त्व लक्षांत आणलें ह्मणजे सर जेम्स मॉंटीथ यांच्याबद्दल चांगलें लिहिण्यासारखें आमच्या मतें कांहीं एक नाहीं; अथवा ते नोकरी संपवून विलायतेस चालते झाले याबद्दल खेदही प्रदर्शित करण्याचें कारण नाहीं. ऑ. विठ्ठलदास ठाकरसीसारख्यांनीं सर जेम्स मॉंटीथ यांचा इव्हिनिंग पार्टीच्या रूपानें गौरव करावा ही आमच्या मतें मोठ्या दुःखाची गोष्ट होय. युरोपियन अधिकारी, विशेषेंकरून मोठमोठे अधिकारी, यांच्याशीं राजकीय दृष्टया आपण कसें वर्तन ठेवावें यासंबंधानें आमच्या लोकांची जर कांहीं चूक होत असली तर

ती ऑ. विठ्ठलदास ठाकरसी यांच्या हल्लींच्या वर्तनावरून चांगली व्यक्त होत आहे. ज्या अधिकाऱ्याच्या कारकीर्दीत अरेरावीपणास ऊत आला त्याच्या कृत्याबद्दल आपलें मत विरुद्ध असतांही तो नोकरी संपवून विलायतेस जावयास निघाला ह्मणजे भराभर आमच्या पुढाऱ्यांनीं हातांत साखरेचीं तार्टे घेऊन त्याचें तोंड गोड करण्याकरितां त्याच्या भोंवतालीं गोळा व्हावें हें, आपलीं मतें हृदयांत बिंबलीं नसल्याचें अथवा आपल्या पोंचटपणाचें चांगलेंच प्रदर्शन आहे; आणि प्रदर्शन चांगल्या रीतीनें कसें पार पाडावें यांत ऑ. विठ्ठलदास ठाकरसी यांनीं प्राविण्य संपादन केल्याचें जगजाहीर आहे. असो; ऑ. विठ्ठलदास ठाकरसी घ्या किंवा सर जेम्स मॉंटीथ घ्या, यांच्या खासगी वर्तनाशीं आह्मांस कांहीं एक करावयाचें नाहीं. ऑ. विठ्ठलदास आणि सर जेम्स यांचा जर स्नेह असला तर तो व्यक्त करण्यास या गार्डनपार्टीखेरीज दुसरी पुष्कळ साधनें होतीं; आणि तशा प्रकारची व्यवस्था ऑ. विठ्ठल""स यांनीं केली असती तर यांस कोणींही नांवें ठेवलीं नसतीं. पण ऑ. विठ्ठलदास ..नीं गार्डन पार्टी द्यावी आणि त्यास ऑ. दीक्षित, ऑ. सेटलवाड, ऑ. गोकुळदास यांच्यासारख्यांनीं हजर राहून मॉटीथ साहेबांचा गौरव केल्याचें श्रेय अंशतः तरी विभागून घ्यावे, ह्मणजे आपल्या कृतीनेंच आपला पोंचटपणा कबूल करून आपल्या मतांची व स्वतः जातीची किंमत कमी करून घेण्यासारखे आहे. ज्या मांटीथ साहेबांच्या कारकीर्दीत जमीनमहसुलाचा कायदा पास झाला आणि सारा न दिला असतां सरकारानें जमिनी विकाव्या असें लोकमतास न जुमानतां—लोकमतांचे प्रतिनिधी कौन्सिलांतून उठून गेले तरी—ठरविण्यांत आलें, त्या मांटीथ साहेबांचे जातेवेळीं गोडवे गाण्यास आमचे पुढारी-जे कौन्सिलांतून उठून आले त्यांपैकींही कांहीं—पुनः इजार बूट चढवून हजर राहतात यापेक्षां देशाचें दुर्भाग्य आणि आमच्या पुढाऱ्यांच्या मतांचा पोंचटपणा तो कोणता? आमच्या मतें ही गोष्ट अत्यंत तिरस्कारार्हच नव्हे तर आपल्या भावी उत्कर्षास विघातक आहे. मांटीथ साहेब जातात ह्मणून रडण्यापेक्षां हासणें चांगलें किंबहुना मांटीथ साहेबांच्या मताचे अधिकारी हिंदुस्थानांतून लौकर नाहींसे होतील, इतकेंच नव्हे तर पुढेंही हिंदुस्थानांत कमी कमी येऊन अखेर मुळींच येणार नाहींत, तो आह्मी सुदीन समजूं. अर्थात् या बाबतींत मुंबईच्या पोंचट पुढाऱ्यांनीं घालून दिलेला कित्ता आह्मांस बिलकुल मान्य नाहीं. आणि असें स्पष्टपणें त्यांस कळविण्यांत जर आमच्या हातून कांहीं आगळिक झाली असें त्यांस वाटेल तर त्याबद्दल त्यांची माफी मागून पुन्हां तीच गोष्ट त्यांस आह्मी प्रेमभावानें कळवितों."

## राष्ट्रीय सभा.

लोकमताचें एकीकरण करणें व राजकीय हक्क संपादणें या हेतूंनीं राष्ट्रीय सभा अस्तित्वांत आली असून गेल्या बावीस वर्षांत या दोन बाबीं-

संबंधानें तिचे प्रयत्न सारखे सुरू आहेत. या सभेचा जन्म झाला त्या वेळच्या लोकमताच्या स्थितींत व आतांच्या स्थितींत महदंतर पडलें असून राष्ट्रीय सभेच्या उद्योगानें राज्यकारभारांत थोडीबहुत सुधारणा जरी झाली आहे तरी ती खंडींत पावरती या प्रमाणानें आहे. अशा स्थितींत राष्ट्रीय सभेनें आपल्या अंगीं योग्य शक्ति आणून कार्यक्रमाची दिशा बदलल्याखेरीज राज्यकारभारांत इष्ट सुधारणा होऊन राजकीय हक्क मिळणें कठिण आहे असें टिळक यांचें मत असून राष्ट्रीय सभेचा जन्म कसा झाला, तिनें कोणती कामगिरी बजाविली, व यापुढें तिनें आपलें धोरण कोणत्या प्रकारचें ठेवलें पाहिजे याविषयीं त्यांनीं जे विचार प्रगट केले आहेत त्याचें क्रमाक्रमानें विवेचन करितों.

ता. २०।१२।१९०४ च्या केसरींत ते ह्मणतात:—

" **कांग्रेसचा जन्म**—

कसा झाला यासंबंधानें मि. डिग्बी व मि. दादाभाई यांचें जें ह्मणणें आहे तें लक्षांत ठेवलें पाहिजे. कांग्रेस सभा ही कांहीं इंग्लंड आणि हिंदुस्थान या दोन देशांचा संबंध तोडण्याकरितां निर्माण झालेली नाहीं असें मि. दादाभाई यांनीं सांगितलें आहे; व त्यांस प्रत्यंतर पुरावा ह्मणून १८५३ सालीं ब्रिटिश इंडियन असोसिएशनची मुंबईची शाखा इतर लोकांबरोबर त्यांनी स्थापन केली तेव्हां तिचे जे उद्देश प्रसिद्ध ले त्याचा हवाला दिला आहे. १८५३ सालीं मुंबईस राजकीय चळवळीकरितां सभा स्थापन करणाऱ्या गृहस्थांपैकीं एकजण पन्नास वर्षांनंतर ह्मणजे १९०४ सालीं विलायतेंत तेच उद्देश तडीस नेण्याकरितां एकसारखा अव्याहत उद्योग करून भांडत आहे हें सदर गृहस्थास व आमच्या देशासही भूषणास्पद आहे. असो; १८५३ पासून १८८३ पर्यंत हिंदुस्थानांत ज्या राजकीय चळवळी झाल्या त्या स्थानिक सभांकडून झाल्या. त्यांचे आणि पुढें झालेल्या राष्ट्रीय सभेचे उद्देश एकच होते; तरी या सर्व उद्योगांचें एकीकरण प्रथम राष्ट्रीय सभेंतच झालें ही गोष्ट निर्विवाद आहे. मि. डिग्बी ह्मणतात कीं, लॉर्ड रिपनच्या कारकीर्दींत इलबर्ट बिलाचा जो वादविवाद झाला त्यानें हिंदी लोकांचे डोळे उघडून कांग्रेससभेचा पाया घातला गेला. लॉर्ड रिपनच्या पाठीमागून लॉर्ड डफरिन गव्हर्नर-जनरल होऊन आल्यावर त्यांनींच मि. ह्यूम यांस राष्ट्रीय सभा काढण्यास उत्तेजन दिलें. इतकेंच नव्हे तर, पहिल्या राष्ट्रीय सभेचे ठराव पास होण्यापूर्वी खुद्द लॉर्ड डफरिन यांस ते दाखविले होते, व त्यांनीं त्यांस हरकत घेतली नाहीं, असेंही मि. डिग्बी यांनीं लिहिलें आहे. राष्ट्रीय सभेचा उत्तरोत्तर उत्कर्ष होऊन तिनें सुचविलेली व्यवस्था सरकारच्या व्यवस्थेस प्रतिकूल आहे असें आढळून आल्यावर

हिंदुस्थानसरकार कांग्रसच्या विरुद्ध झालें, व मि. ह्यूम आणि मि. वेडरबर्न यांस स्वजातीयांकडून ' राजद्रोही ' ह्मणून शिव्या खाव्या लागल्या ही गोष्ट निराळी; पण पूर्वपीठिका पाहूं गेलें असतां असे दिसून येईल कीं, राष्ट्रीय सभा ही कांहीं एकव्या एतद्देशीय देशभक्ताच्या परिश्रमांचें फल नव्हे. कै. न्या. रानडे, मि. डब्ल्यू. सी. बानर्जी, दिवाणबहादुर रघुनाथराव, कै. तैलंग, मि. मेहता, दर्भंगाचे महाराज, मि. सुरेंद्रनाथ बानर्जी, कै. पंडित अयोध्यानाथ वगैरे अनेक देशभक्तांनीं या सभेची इमारत उठविण्याचे कामीं कमजास्त प्रमाणानें सहाय्य केलेलें आहे. पण त्याचबरोबर दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, या कामास मि. ह्यूमसारख्या पेन्शनर सिव्हिल सर्व्हंटचें सहाय्य मिळालें नसते तर अशा प्रकारची सभा इतक्या लवकर अस्तित्वांत आली नसती. सारांश, राष्ट्रीय सभेचा जन्म होण्यास हिंदुस्थानांतील देशभक्त आणि अंग्लो-इंडियन सिव्हिल सर्व्हिसमधील मि. ह्यूम, मि. वेडरबर्न यांसारखे कांहीं उदार गृहस्थ व लॉर्ड डफरिनसारखे व्हाइसरॉय या दोघांचीही मदत झालेली आहे. या युरोपियन अधिकाऱ्यांनीं राष्ट्रीय सभेस कां मदत करावी ? असा एक प्रश्न निघतो. यांचें उत्तर एवढेंच आहे कीं, हिंदुस्थानांतील लोकांस इंग्रजी शिक्षण मिळाल्यानें ते अधिक चौकस होऊन त्यांची महत्वाकांक्षाही वाढत चालली आहे; व अशा स्थितींत जर त्यास राज्यकारभारांत न घेतलें तर हिंदुस्थानच्या राज्यास पुढ मागें धोका आहे अशा विचाराचे कांहीं गृहस्थ सिव्हिलसर्विसमध्यें आहेत. ह्या लोकांच्या मते हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत आतां कांहीं तरी सुधारणा करणें अवश्य आहे; आणि ती सुधारणा कोणती हें जर कायदेशीर रीतीनें हिंदुलोकच सांगत आहेत तर सदर कामी त्यांस मदत करणें आपलें कर्तव्य होय. सारांश, हे अधिकारी राष्ट्रीय सभेस जी मदत करितात ती हिंदुस्थनांतील इंग्रजांचें राज्य कायम राखण्याकरितांच करीत आहेत. त्यांमध्यें आणि त्यांच्या इतर बंधूंमध्यें भेद एवढाच कीं, हिंदुस्थानांतील लोकांस सवलती दिल्याखेरीज आपलें राज्य चिरस्थायी व्हावयाचें नाहीं असें हे समजतात, आणि यांचे दुसरे बंधू अद्याप असें मानतात कीं, हिंदुस्थानचें राज्य मनगटाच्या जोरावर जबरीनें आणि प्रजेस दुर्बळ करून किंवा त्यांचे हक्क मर्यादित ठेऊनच चालविलें पाहिजे. लॉर्ड कर्झन यांनीं परवां हिंदुस्थानच्या राज्यकारभारासंबंधानें दोन पक्ष असूं नयेत असें बोलून दाखविलें. परंतु गोऱ्या सिव्हिल सर्व्हंटांमध्येंच जोंपर्यंत वर सांगितलेला मतभेद आहे: तोंपर्यंत हिंदुस्थानच्या कारभारासंबंधानें दोन पक्ष होणें अपरिहार्य होय. असो; याप्रमाणें राजकीय चळवळीला नवीन वळण मिळाल्यावर गेल्या वीस वर्षांत—

## राष्ट्रीय सभेचें काम

काय झालें हें पाहिलें तर त्याबद्दलही निराश होण्याचें कांहीं कारण नाहीं. सभा स्थापन होण्यापूर्वी ज्या निरनिराळ्या राजकीय संस्था होत्या त्या या सभेंत एकवटून

गेल्या इतकेंच नव्हे, तर ज्या इलाख्यांत तशा प्रकारच्या संस्था न्हत्या तेथें रॉष्ट्रीयसभेच्या शाखा ह्मणून त्या उत्पन्न झाल्या; आणि त्याबरोबरच सर्व देशभर एक प्रकारची राष्ट्रीय उन्नतीसाठीं कळकळ उत्पन्न झाली. तसेंच निरनिराळ्या इलाख्यांतील व प्रांतांतील लोक एके ठिकाणीं आल्यानें त्यांच्यामधील दळणवळण व स्नेहभाव वाढून एककार्यत्वामुळे एकराष्ट्रीयत्वाची बुद्धिही अधिकाधिक जागृत होत चालली. आपले हक्क काय, हिंदुस्थानांत इंग्रजांचें राज्य न मोडतां आपणास कोणत्या प्रकारें राज्यकर्त्यांच्या हक्कांची बरोबरी करून घेतां येईल, किंवा आपली राजकीय उन्नति किती व कशी होईल, या गोष्टींचा वीस वर्षे खल होऊन आमच्या हक्कांची व मागण्यांचीं दिशा बहुतेक ठरून गेली. वीस वर्षे या कामीं झालेला खर्च फार झाला अशी कित्येकांची ओरड आहे. पण यांत कांहीं अर्थ नाहा. तीस कोट लोकांची एकवाक्यता करणें कांहीं लहानसान काम नव्हे; व जरी त्याकरितां थोडाबहुत अधिक खर्च झाला असला तरी तो अनाठायीं झाला असें ह्मणतां यावयाचें नाहीं; किंबहुना अद्यापहि देशांतील राष्ट्रीय एकीचें काम बरेंच पुरें व्हावयाचें आहे. राष्ट्रीय सभा निघालीं तेव्हां आमचे मुसलमान बंधु तिला प्रतिकूल होतें. पण गेल्या वीस वर्षांत मुसलमान लोकांत शिक्षणाचा जो प्रसार झाला आहे त्यामुळें राष्ट्रीय सभेचें महत्व व उपयुक्तता त्यांच्या ध्यानांत येऊं लागली आहे; व हल्लींच्या धोरणावरून असें दिसून येतें कीं, लवकरच मुसलमान लोकही राष्ट्रीय सभेस येऊन मिळतील. राष्ट्रीय सभेचे उद्देश हल्लीपेक्षांही लोकांस जास्त माहित होण्याबद्दल आणखी या देशांतच खटपट व्हावयास पाहिजे हे खरे आहे. परंतु या गोष्टी करण्यास जी उमेद लागते ती कमी होण्यासही मध्यतरीं बरींच कारणें झालेले. आहेत. हीं—

**नाउमदीचीं कारण**

मि० स्मिटन यांनीं आपल्या लेखांत चांगलीं नमूद केलीं आहेत. ह्यूमसाहेब ह्मणतात त्याप्रमाणें कांग्रेस ही संस्था वीस वर्षे तावूनसुलाखून निघालेली आहे; आणि सभेच्या मागण्या नेमस्त असून विचारार्ह आहेत असें पुष्कळ लोकांचें आज मत झालें आहे हें खरें आहे. पण वीस वर्षांच्या उद्योगाचें हक्कप्राप्तीच्या रूपानें कांहीं दृश्य फल झालें आहे कीं काय असें पाहूं गेलें असतां एक दोन किरकोळ गोष्टी खेरीज करून विशेष कांहीं नजरेस येत नाहीं. कांग्रेस जन्मास आली तेव्हां सर्वांस अशी उमेद होती कीं, हजारों देशभक्तांच्या मागण्या व्यवस्थित रीतीनें सरकारापुढे मांडल्या गेल्या तर सरकाराकडून त्याचा योग्य विचार झाल्याखेरीज राहणार नाहीं. पण पुढें अनुभव पहावा तो अगदीं निराळाच येऊं लागला. कांग्रेस सभेच्या ठरावांपैकीं निर्विवाद अशा ज्या गोष्टी होत्या त्याही अमलांत आणण्याचें सरकारानें नाकबूल केलें. इतकेंच नव्हे तर, कांग्रेसचा उत्कर्ष न होऊं देण्याबद्दल अँग्लो-इंडियनतर्फे खटपट सुरू झाली; आणि ब्रॅडलासारखा पुरस्कर्ता मिळाला नसता तर

कौंसिलच्या सुधारणेचा कायदा पास झाला तोही झाला असता किंवा नाहीं याची शंकाच आहे. सारांश, जितकी चळवळ जास्ती तितका सरकारचा किंवा सरकारी अधिकारी–वर्गाचा रोष जास्त असें अनुभवास येऊं लागलें आहे; व कित्येकांस असेंही वाटूं लागलें कीं, यापेक्षां चळवळ न केली तर काय वाईट! लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दींत तर या अरेरावीपणाचा कळस झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हे व्हाइसराय हुषार तर खरेच, पण यांची सर्व हुषारी हिंदुलोकांच्या मागण्या साफ नाहींशा करण्याकडे खर्च झालेली आहे; आणि विलायतेंतील टोरी सरकारानें ही सर्व धूमश्चक्री चालविण्यास जणूं काय यांस मुभा देऊन ताम्रपट दिला आहे. अशा स्थितींत कांग्रेस–पक्षाच्या कांहीं लोकांची नाउमेद झाल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं."

## विलायतेंतील डेप्युटेशन व स्वावलंबन.

अशा प्रकारें झालेली नाउमेद कशी दूर करावी हा प्रश्न राष्ट्रीय सभेपुढें आज बरेच दिवस आहे. मध्यंतरीं हिंदुस्थानच्या वतीनें डेप्युटेशनें पाठवून विलायतेंतील लोकमत अनुकूल करून घ्यावें ह्मणून बूट निघाला होता व तशीं डेप्युटेशनेंही गेलीं होतीं. पण तेथें अनेक पक्ष असून आज कान्सरव्हेटिव पक्षाची सरशी तर उद्यां लिबरल पक्षाची सरशी असा पालट होत जातो, व एके वेळीं या पक्षाकडून हक्क मिळतीलसे वाटतें तर दुसरे वेळीं तो पक्ष कांहीं तरी देईल अशी आशा उत्पन्न होते. पण हें सगळे मृगजळ असून प्रसंग आला ह्मणजे इंग्लंडच्या हितापुढें हिंदुस्थानच्या हितास न जुमानतां कोणत्याही पक्षाकडून ह्मणण्यासारखें कांहीं मिळत नाहीं. अशा स्थितींत विलायतेंतील चळवळीवर विशेष भिस्त ठेवण्यांत अर्थ नाहीं. तथापि, त्यांतल्या त्यांत तात्पुरतें डेप्युटेशन न पाठवितां कायमचें डेप्युटेशन ठेवून ज्या वेळीं जो पक्ष आपणास अनुकूल होईल त्या वेळीं तो करून घ्यावा; पण मुख्य भिस्त स्वावलंबनावर ठेऊन आपल्या हक्कांकरितां आपणच भांडण्यास तयार असले पाहिजे असें टिळक यांचें मत असून १९०४ सालीं डेप्युटेशनसंबंधीं जो एक स्फुट लेख लिहिला आहे त्यांत त्यांनीं पुढीलप्रमाणें तें व्यक्त केलें आहे. ते ह्मणतातः—

" विलायतेंतील ' जस्टिस ' पत्रांत सरकारच्या लष्करी खात्यांतील माजी नोकर मि० हंफ्रेज यांनीं सर हेन्री कॉटन व मि० ओडोनेल यांस जें खुलें पत्र लिहिलें आहे त्यांतील कांहीं गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. मि० हंफ्रेज यांचें असें ह्मणणें आहे कीं, लिबरल पक्षांतील कांहीं लोक कांग्रेसच्या मागण्याबद्दल जरी सहा-

नुभूति दाखवितात तरी वेळ आली ह्मणजे आपल्या पक्षाकरितां मुकाट्यानें ‘ महाजनोयेनगतः स पंथाः ’’ याप्रमाणें आचरण केल्याखेरीज चुकत नाहींत. अधिकारारूढ पक्ष लिबरल असो वा कान्सरवेटिव्ह असो, हिंदुस्थानासंबंधानें त्यांच्या कामगिरींत कांहीं भेद पडत नाहीं. हिंदुस्थानास जर कोणता पक्ष उपयोगी पडला तर सोशलडिमोक्राट लोकांचाच उपयोगी पडेल, बाकी सगळे आपमतलबी आहेत, असें मि० हंफ्रेज यांचें ह्मणणें आहे. वरील विचारसरणींत बरेच तथ्य आहे असें खुद्द मि० ओडोनेल यांनींच कबूल केलें आहे. नुसती सहानुभूतीचीं भाषणें व कृती यांमध्यें पुष्कळ अंतर आहे, ही गोष्ट खरी आहे. हिंदुस्थानांतील लोकांची सहानुभूति आपल्या पक्षास असावी ह्मणून लिबरल आणि कान्सरव्हेटिव्ह असे दोघेही उमेदवार हिंदुस्थानास कांहीं हक्क द्यावे, असें अभिवचन देण्यास तयार होतील. परंतु त्यांची ही कळकळ शेवटपर्यंत निभेल कीं नाहीं याचा वानवाच आहे. कसेंही असो, मि० स्मिटन ह्मणतात त्याप्रमाणे या शस्त्राचा होईल तितका उपयोग करून घेण्यास आह्मी मागेंपुढें पाहतां कामा नये. इंग्लंडचा राज्यकारभार ज्या प्रकाराने हल्लीं चालतो आहे त्यांतूनच आमचा फायदा कसा होईल हें आह्मी पाहिलें पाहिजे; आणि तशा दृष्टीनें या प्रश्नाचा विचार केला ह्मणजे जो ज्या प्रसंगीं आपणास सहाय्य देण्यास तयार होईल त्याचा त्यावेळीं पूर्ण फायदा घेण्यास आह्मी तयार असले पाहिजे. परंतु जस्टिस पत्रकर्त्याच्या ह्मणण्याप्रमाणें एवढी गोष्ट पक्की लक्षांत ठेविली पाहिजे की, आह्मी आपण होऊनच आपल्या स्वतःच्या हक्कांकरितां भांडण्यास तयार झाल्याखेरीज आह्मांस जी कांहीं यशप्राप्ती व्हावयाची ती होणार नाहीं. ’’

—केसरी, २०।१२।०४.

## तत्ववेत्ता व मुत्सद्दी.

राजनीतीचें धोरण कसें आहे, लॉ. मोर्लेसारखे तत्त्ववेत्ते असले तरी स्टेट सेक्रेटरीच्या पदावर आल्यानंतर त्यांना आपलीं उदार मतें कशीं बाजूस ठेवावीं लागतात व अशा स्थितींत कांग्रेसच्या मागण्या सफल होण्याची आशा कितपत धरावी याचें ता. ६।१।०६ च्या केसरींत त्यांनीं असें विवेचन केलें आहेः—

“मोर्लेसाहेब आचरणानें, विद्येनें आणि विचारानें कितीही श्रेष्ठ असले तरी साम्राज्याचीं सर्व सूत्रें त्यांच्या हातांत सध्यांच्या राज्यव्यवस्थेप्रमाणें कधींही येणें शक्य नाहीं, हें औपचारिक पांडित्यानें व गोड भाषणानें भुलून जाणारी मंडळी विसरते. अर्थात् मोर्लेसाहेबांस मूर्ख ह्मणण्यापेक्षां असल्या मंडळींसच मूर्खांच्या कोटींत पहिल्यानें काढलें पाहिजे. इंग्रजी साम्राज्याचा आज जो जगड्व्याळ व्यापार चाललेला आहे तो कांहीं मोर्लेसाहेबांच्या किंवा स्पेन्सरसाहेबांच्या तत्वविचारावर चाललेला नाहीं.

विलायतेंतील लाखों लोक साम्राज्यांतील जिंकलेल्या लोकांच्या उद्योगावर आपलें पोट भरीत आहेत; व या लोकांचे आप्त आणि भाऊबंद, किंवा व्यापारासंबंधानें पाहिलें तर आपलें पोट भरणारे अशा प्रकारचे शेंकडों कारखानदार विलायतेंत आहेत. हे लोक मोर्लेसाहेबांचें तत्वज्ञान शांततेच्यावेळीं क्षणभर ऐकून घेऊन आपली करमणूक करून घेतील; पण मोर्लेसाहेब स्टेट सेक्रेटरी नेमले गेले एवढ्यामुळें जर जिंकलेल्या व गांजलेल्या लोकांस मुक्त करण्याच्या ते खपटीस लागतील तर सर्व विलायतभर आग पेटून त्या आगींत मोर्लेसाहेबांच्या राजकीय अस्तित्वाची राख-रांगोळी होईल! परलोकवासी ग्लॅडस्टनसाहेब यांनीं दीन झालेल्या आयर्लंडाचें काम हातांत घेतल्याबरोबर त्यांच्या पक्षांत त्यांच्याबरोबर कित्येक वर्षें काम केलेले साथी-दारही त्यांस भराभर कसे सोडून गेले, व अखेरीस हाऊस ऑफ लॉर्ड्सकडून थप्पड मिळून जगांतील पहिल्या प्रतीच्या व उदारबुद्धीच्या या मुत्सद्यास कशी हार खावी लागली, हें आमची मंडळी विसरते. विलायतच्या राज्यकारभाराची शिस्तच अशी आहे कीं, एकादा अंमलदार उदारबुद्धीचा आल्यानें त्याचे हातून किंवा खुद्द बादशहांचे मनांत जरी उदारबुद्धी उद्भवली तरी त्यांचे हातून कांहींएक व्हावयाचें नाहीं.... विलायतेंत आमच्याशीं सहानुभूति करणारे कांहीं थोर गृहस्थ सध्यां आहेत व पुढें निघतील. कोणतेंही राष्ट्र झालें तरी त्यांत असे थोडे महात्मे निघणारच. पण एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राचें स्वातंत्र्य हरण करून त्यावर जेव्हां चरत असतें तेव्हां चर-णारा वर्ग अगर त्यांचे आप्त गांजलेल्या लोकांचीं दुःखें ऐकून केवळ परमार्थबुद्धीनें तीं दुःखें निवारण्याचा उद्योग करतील अशी आशा बाळगणें ह्मणजे राजनीचीं तत्वें आपणास माहित नाहीत अगर आपण त्यांत अनुभवलेले नाहीं अतएव फसतो, असें जगाच्या निदर्शनास आणून देणें होय. फार लांब कशाला? हल्लीं लॉर्ड कर्झन किंवा येथील अधिकारीमंडळ यांच्याबद्दल विलायतेस जी आह्मी तक्रार चालविली आहे तशा प्रकारची शिंदे अगर गायकवाड यांच्या विरुद्ध तक्रार राजपुतान्यांतील अगर काठेवाडांतील लोकांनीं पेशव्यांकडे नेली असती तर पुण्यांतील त्यावेळच्या मुत्सद्यांनीं—किंबहुना रामशास्त्र्यासारख्या निस्पृह न्यायाधीशानें—त्याचा काय निकाल केला असता याचा नीट विचार करा. राजनीति पहिल्यानें स्वार्थास ओळखते, आणि मग तर्कशास्त्र तदनुकूल असेल तर त्याकडे वळते. मोर्ले साहेब मोठे विद्वान आहेत, तत्ववेत्ते आहेत, त्यांनीं अमुक ग्रंथ लिहिले आहेत; ह्मणून ते स्टेट सेक्रेटरी झाले ह्मणजे आमचा भाग्योदय होईल अशी आशा बाळगणें आणि त्यांनीं नाहीं ह्मटलें तरी पुनः तीच आशा प्रदर्शित करून पुनः त्यांच्या नादीं लागणें पोरकटपणाचें लक्षण होय. हा लोंचटपणा व पोंचटपणा राज्यकारभाराचीं मोठमोठीं कामें करण्याचा प्रत्यक्ष आह्मांस अनुभव नसल्या-मुळें आमच्या अंगांत शिरत चालला आहे; यानें कधीं काम होणार नाहीं, इतकें नव्हे तर, स्वाभिमानी लोकांजवळ आमची किंमतही राहणार नाहीं. आमचीच ओरड इंग्लंडास ऐकूं येत नाहीं असें नव्हे, तर त्यांच्यांतील प्रसिद्ध तत्ववेत्ता हर्बर्ट स्पेन्सर

यानें दिलेला इषाराही त्याच्या पुस्तकांतच अद्याप पडून राहिलेला आहे. मग मोर्लेसाहेबांची कथा काय? मोर्लेसाहेब उदारबुद्धीचे तत्ववेत्ते आहेत; पण स्टेट सेक्रेटरी या नात्यानें त्यांच्याकडून आमच्या फायद्याची कोणतीही महत्वाची गोष्ट, विना आह्मी जोर केल्याखेरीज, कधींही व्हावयाची नाहीं हें निश्चित समजा. ते गोड बोलतील, आमच्याकडून त्यांस कोणी भेटावयास गेल्यास त्यास एकादा चहाचा पेलाही देतील! पण जोंपर्यंत हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींतील गांजणारीं दुःखें आह्मांस असह्य झालीं आहेत याचा प्रत्यक्ष पुरावा त्यांचेजवळ नाहीं; किंवा जोंपर्यंत आमच्या पाठीवर बसणाऱ्या कोरड्यांचे वळ थोड्याशा कालानें आह्मीं विसरतों, अशी खात्री त्यांस हिंदुस्थानांतील बडे अधिकारी देत आहेत; अगर जोंपर्यंत आमचीं दुःखें निवारण करण्याच्या उद्योगास आह्मींच लागलों नाहीं, तोंपर्यंत कोरड्या शाब्दिक कळकळीपेक्षां मोर्लेसाहेबांकडून आह्मांस कांहीं एक प्राप्त व्हावयाचें नाहीं. मोर्ले ह्मणजे कांहीं तुकाराम नव्हत किंवा ग्लॅडस्टनही नव्हत. जीं दुःखें किंवा गांजणूक आह्मी थोड्याशा कालावधीनें विसणार अशी त्यांस खात्री पटविली गेली आहे, त्यांचे निवारण करून आमच्यावर उपकार करण्याकरितां त्यांनीं आपल्या जातबांधवांस दुखवून ग्लॅडस्टनसाहेबांनीं आयर्लंडाकरितां केलें त्याप्रमाणें आपलें पार्लमेंटांतील आयुष्य काय म्हणून खर्ची घालावें? आह्मीच मूर्ख ह्मणावयाचे कीं, अशा प्रकारची व्यर्थ आशा कांहीं महिने तरी उराशीं बाळगून आपल्या जिवाचें समाधान आह्मीं करून घेतले."

## साध्य व साधनें.

विलायतेंतील लोकमतावर योग्य परिणाम होऊन इष्ट गोष्टी साध्य होण्यास कांग्रेसच्या कार्यक्रमांत सुधारणा होऊन तिच्या अंगीं दिवसें दिवस अधिक शक्ति आली पाहिजे. आजपर्यंत किरकोळ मागण्यांचेच ठराव राष्ट्रीय सभेंत पास होत असत; व राष्ट्रीय सभेचा अंतिम हेतूही विशेष रीतीनें स्पष्ट झालेला नव्हता. सन १९०६ सालच्या ह्मणजे बाविसाव्या राष्ट्रीय सभेंत या हेतूचा खल होऊन "**स्वराज्य**—लोकांनीं आपण होऊन चालविलेलें **स्वराज्य**—आपणास प्राप्त झाल्याखेरीज आपल्या उद्धाराचा दुसरा मार्ग नाहीं" असा कायमचा निकाल झाला. या हेतूसंबंधानें लिहितांना टिळक यानीं ता. ८।१।१९०७ च्या केसरींत येणेंप्रमाणें उद्गार काढले आहेतः—

"हिंदुस्थानास स्वराज्य मिळालेंच पाहिजे एरव्हीं गत्यंतर नाहीं, हें आमच्या राजकीय चळवळीचें आतां कायमचें प्रधान तत्व बनलें आहे; आणि आजपर्यंत एकवीस वर्षांत राष्ट्रीयसभेच्या पूर्व अध्यक्षांनीं या बाबतींत जी कांहीं घरसोडीचीं विधानें

केलीं आहेत तीं आतां सर्व रद्द झालीं आहेत. खुद्द दादाभाई यांनींच असें सांगितलें कीं, २२ व्या राष्ट्रीय सभेंत नवें ह्मणून जें काय झालें तें हेंच होय. स्वराज्य प्राप्त करून घेणें हेंच तुमचें कर्तव्य आहे, असा सिद्धांत मी या सभेंत तुह्मांस सांगतों; आणि तत्प्रीत्यर्थ तुह्मी काम करून हा हक्क संपादन करा म्हणजे मी आजपर्यंत जें कांहीं केलें त्याचें मला बक्षीस मिळालें, असा त्यांचा आह्मां सर्वांस अखेरचा निरोप आहे. आणि हा निरोप एकजुटीनें अमलांत आणणें हें आपलें कर्तव्य नाहीं असें ह्मणणारा पुरुष इतोत्तर निघेल, असें आह्मांस तरी खास वाटत नाहीं. तात्पर्य, स्वराज्य प्राप्त करून घेणें हेंच राष्ट्रीय सभेचें मुख्य कर्तव्य किंवा उद्देश आहे, ही गोष्ट आतां निर्विवाद व बेमालूम सिद्ध झाली आहे."

राष्ट्रीय सभेचें साध्य कोणतें तें ठरलें; पण साधनें कोणतीं याबद्दलही कार्यकारी पुरुषांचे विचार निश्चित व स्थिर असावें लागतात असें याच अंकांत सांगून पुढील तीन साधनें त्यांनीं लोकांपुढें मांडलीं आहेत; व त्यासंबंधानें त्यांनीं आपली उमेद येणेंप्रमाणें प्रगट केली आहे:—

"स्वराज्य आह्मांस साध्य आहे व स्वदेशी चळवळ, बहिष्कार—योग आणि राष्ट्रीय शिक्षण हीं स्वावलंबनाचीं सदर हेतू सिद्धीस नेण्यास तीन मोठीं साधनें आहेत. या साधनांचा योग्य उपयोग करून नव्या पिढीनें दादाभाई नवरोजी यांनीं सांगितल्याप्रमाणें कार्यसिद्धि करून घेतली पाहिजे. वर निर्दिष्ट केलेल्या साधनांचा उपयोग करून स्वराज्याचा हक्क मिळविण्यास झटलें पाहिजे, व अशा रीतीनें उद्योग केल्यास परमेश्वराच्या कृपेनें लवकरच इष्टसिद्धी झाल्याखेरीज राहणार नाहीं अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे."

## लोकमत व पुढारी.

लोकांस राष्ट्रीय सभेचे हेतु कळल्याशिवाय व साधनें कोणतीं याचें ज्ञान झाल्याशिवाय राष्ट्रीय सभेच्या अंगींही यावी तशी शक्ति येणार नाहीं. करितां तात्पुरत्या सभा न भरवितां किंवा राष्ट्रीय सभा भरण्यापूर्वी किंवा सभा झाल्यावर चार दोन व्याख्यानें न देतां खेड्यांतील लोकांपासून तों मोठमोठ्या शहरांतील लोकांपर्यंत देशी भाषेतील व्याख्यानांनीं, ग्रंथांनीं व कायदेशीर आणि व्यवस्थित चळवळींनीं वर्षभर एक सारखें शिक्षण देऊन लोकमत जागृत केलें पाहिजे, व या लोकमतास सतेज स्वरूप देऊन अखेर त्याचा ओघ राष्ट्रीय सभेकडे वळविला पाहिजे. दे. दादाभाई नौरोजी, दत्त, डिग्बी, सब्रह्मण्यआयर वगैरे लोकांच्या ग्रंथांनीं व ना० गोखले, सुरेंद्रनाथ बॅानर्जी वगैरे सारख्या वक्त्यांच्या कायदेकौन्सिलांतील

व इतर प्रसंगाच्या भाषणांनीं राष्ट्रीय सभेचें वाङ्मय इंग्रजींत उत्तम तऱ्हेनें आज तयार झालें असून लोकांच्या गरजा काय आहेत अथवा लोकांना काय पाहिजे याबद्दल सुशिक्षित लोकांत एकमत झालें आहे. पण त्या मताचा प्रसार लोकांत झाल्याशिवाय राष्ट्रीय सभेस जोर कधींही येणार नाहीं. सरकारी राज्यव्यवस्थेचें धोरण लोकहिताच्या विरुद्ध असलें ह्मणजे लोकांचीं मनें क्षुब्ध होऊन त्यांचें ऐक्य होतें व त्यावरून राष्ट्रीयत्वाची कल्पना कांहीं लोकांच्या मनांत येते असें वंगभंगाचे वेळीं पुष्कळांच्या निदर्शनास आलें आहे. तथापि, ही राष्ट्रीयत्वाची कल्पना अधिक वाढून ती राष्ट्रांतील सर्व लोकांच्या मनांत बिंबल्याशिवाय तिला फल येणार नाहीं. करितां सुशिक्षित लोकांनीं व राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनीं या कल्पनेचा होईल तितका प्रसार करण्यास झटलें पाहिजे. अद्याप हिंदु मुसलमान यांचें व्हावें तसें ऐक्य झालें नाहीं; एवढेंच नव्हे तर, राष्ट्रीय सभेशींही कित्येक मुसलमान लोक विरोध करीत आहेत. सुदैवानें ना. बद्रुदिन तय्यबजी (हे मृत आहेत) ना. सयानी, नबाब सय्यद महमद, मि. ए. रसूल, मि. याकूब हुसेन, मि. अल्ली महमद भिमजी वगैरे सारख्या मुसलमान सुशिक्षित पुढाऱ्यांत हा विरोध नसल्यामुळें त्यांनीं आपल्या लेखांनीं किंवा भाषणांनींच नव्हे तर, आचरणानें सुद्धां ज्ञातिबांधवांचे हें अज्ञान दूर करण्याकरितां प्रयत्न चालविले आहेत. पण अद्यापही हे प्रयत्न व्हावे तितके होत नसल्यामुळें राष्ट्रैक्याच्या वृद्धीस जोर येत नाहीं. तसेंच राष्ट्रीय सभेपूर्वीं राजकीय चळवळ करणाऱ्या ज्या लोकपक्षाच्या स्थानिक कमिट्या होत्या त्यांच्यांत जें शैथिल्य येत चाललें आहे तेंही दूर होऊन भाषणें, अर्जें, ठराव यापुढील स्वावलंबनाची कायदेशीर चळवळ या कमिट्यामार्फत राष्ट्रीय सभेनें केली पाहिजे; व खुद्द राष्ट्रीय सभेचे पुढारी किंवा पुरस्कर्त खंबीर विचाराचे, दृढनिश्चयी व देशाकरितां स्वार्थत्याग करणारे असले पाहिजेत, असें टिळक यांचें मत असून तें त्यांनीं व्याख्यानांतून* व लेखांतून अनेक वेळां व्यक्त केलें आहे.

* मिसेस स्टॅनर्ड यांचें १९०६ सालांतील फेब्रुवारी महिन्यांत "हिंदुस्थानच्या संघातसामर्थ्याच्या उत्पत्तीचीं साधनें" या विषयावर पुण्यास जेव्हां व्याख्यान झालें त्या वेळीं टिळक यांनीं स्पष्टपणें असें सांगितलें:—"आमच्यांत बाणीचे पुढारी निपजत नाहींत. राष्ट्राचें काम स्वार्थत्यागबुद्धीनें करणारीं माणसें फार थोडीं

टिळक यांचा पुढाऱ्यांच्या वर्तनावर विशेष कटाक्ष असल्यामुळें त्यासंबंधानें त्यांनीं स्वदेशी चळवळीच्या वेळीं एके ठिकाणीं जे स्पष्ट उद्गार काढले आहेत ते येथें देतों. ता. १९।८।०५ च्या केसरींतील अग्रलेखांत ते ह्मणतात:—

"आपल्या देशांतील हल्लींचें लोकमत ह्मणजे वाऱ्याची मोट आहे, तृणाचें दोरखंड नव्हे, आणि यांत जर कांहीं सुधारणा झाली नाहीं तर त्याचा दोष लोकांपेक्षां पुढाऱ्यांकडे अधिक आहे असें आह्मी समजतों. ही मोठ्या आणीबाणीची वेळ आहे; आणि या वेळीं बंगालचे पुढारी काय करतात इकडे हिंदुस्थानांतील सर्व लोकांचें लक्ष लागून राहिलें आहे. बंगालचे बडे जमीनदार किंवा सुरेंद्रनाथ बानर्जी, भूपेंद्रनाथ बसु, यांच्यासारखे सुशिक्षित पुढारी यांनी या वेळी लोकांस कित्ताच घालून दिला पाहिजे; इतकेंच नव्हे तर, विलायती माल बंद करावयाचा असल्यास बंगाल प्रांतांत चोहोंकडे फिरून ही गोष्ट घडवून आणली पाहिजे. फुकट व्याख्यानें झोडण्यांत कांहीं अर्थ नाहीं, हें तळहातावरील फोडाप्रमाणें आतां अगदीं स्पष्ट कळून चुकलें आहे. शब्द नकोत कृती पाहिजे; आणि तीही निश्चयाची कृती पाहिजे, अशी वेळ आतां येऊन ठेपली आहे. अशा वेळीं आह्मी जर आपल्या कर्तव्यास चुकलों आणि युवराज इकडे आल्याबरोबर विलायती डायमंड लेदरचा बूट चढवून लोटांगण घालीत त्यांच्याकडे गेलों, तर आमच्या व आमच्या मताच्या पोंचटपणास पारावार नाहीं, असें राज्यकर्त्यांच्याच नव्हे तर सर्व जगाच्या निदर्शनास येऊन चुकणार आहे. सारांश, हिंदुस्थानांतील लोकमताच्या वाढीचे इतिहासांत आज असा दिवस येऊन ठेपला आहे कीं, आमच्या पुढाऱ्यांनी निश्चयाने पुढें होऊन एक तर आपली कार्यसिद्धी करून घेतली पाहिजे, नाहीं तर तोंडाच्या वाफाऱ्यानें दूषित झालेल्या वातावरणांत फुकट कुजून मेलें पाहिजे. यांपैकी कोणता मार्ग स्वीकारण्यास आमचे पुढारी तयार आहेत इकडे सर्वांचे डोळे लागले आहेत; व आमची या पुढाऱ्यांस अशी सूचना आहे कीं, या वेळीं जर तुमचें पाऊल नीट पडणार नाहीं किंवा कच्चें पडेल, तर तुमच्या विद्या, तुमचें वक्तृत्व आणि तुमचा देशाभिमान यांवरील लोकांचा विश्वास लवकरच सबंध उडून जाईल."

## स्वदेशी चळवळ.

लॉर्ड कर्झन यांनीं १९०५ सालीं लोकमतास न जुमानतां बंगालची विभागणी केल्यामुळें स्वदेशी चळवळीस विशेष चलन मिळालें. पंचवीस

---

आहेत. "राष्ट्रीय काम ह्मणजे आमचे लोक मानासाठीं व फुरसतीच्या वेळीं करमणूक होण्यासाठीं करीत असतात. तेव्हां नुसत्या संस्था स्थापण्यानें कांहीं व्हावयाचें नाहीं; त्यामध्यें कार्यकारी माणसें पाहिजेत.—ज्ञानप्रकाश.

तीस वर्षांपूर्वी महाराष्ट्र, गुजराथ वगैरे इकडील प्रांतांत या चळवळीस सुरवात झाली असून पंजाब वगैरे दूरदूरच्या प्रांतांतही ती थोडीबहुत अस्तित्वांत होती. प्रारंभीं जेव्हां ही चळवळ सुरू झाली तेव्हां परदेशी जिन्नस वापरल्यानें आपल्या राष्ट्रांतील संपत्ति बाहेर जाते व त्यामुळें आपले उद्योगधंदे बुडतात, करितां देशी जिन्नस वापरून आपल्या उद्योगधंद्यांस उत्तेजन द्यावें—ह्मणजे सांपत्तिक दृष्टीनें आपली जी हानी होत आहे ती दूर करावी-एवढाच तिचा हेतु होता. पण वंगभंगामुळें बंगाल्यांतील लोक खवळून जाऊन लॉर्ड कर्झन ऐकेनात, स्टेट सेक्रेटरी मि. ब्राडरिक ऐकेनात व पार्लमेंटही ऐकेना, तेव्हां ब्रिटिश लोकमत जागृत करून सरकारचे डोळे उघडावे या हेतूनें विलायती माल न घेतां देशांतल्या देशांत उत्पन्न होणारा मालच घ्यावयाचा असा बंगालच्या लोकांनीं निश्चय केल्यामुळें स्वदेशी चळवळीस निराळें स्वरूप प्राप्त झालें व तिचा सर्व हिंदुस्थानभर प्रसार झाला. स्वदेशी उद्योगधंद्यांस उत्तेजन देणें हा या चळवळीचा हेतु तर आहेच; पण "नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाहीं" या ह्मणीप्रमाणें विलायतेंतील व्यापाऱ्यांच्या खिशास चट्टा बसल्याशिवाय अगर व्यापारी दृष्टीनें त्यांस फटकारा लागल्याशिवाय आमच्या राजकीय गाऱ्हाण्यांकडे सरकार लक्ष देणार नाहीं, असा आमच्या लोकांचा समज झाल्यामुळें त्यांनीं विलायती मालास बहिष्कार घालण्याचा प्रयत्न चालविला आहे. अर्थात् स्वदेशी चळवळीसंबंधीं विचार करतांना बहिष्काराचा राजकीय व सांपत्तिक अशा दोन्ही दृष्टीनें विचार केला पाहिजे असें टिळक यांचें मत असून या मताचा त्यांनीं कसकसा खुलासा केला आहे याचें क्रमाक्रमानें विवेचन करतों.

परदेशी मालास बहिष्कार घातल्यानें देशी उद्योगधंद्यास आपोआपच उत्तेजन मिळत असल्यामुळें बहिष्कारांत सांपत्तिक स्थितीचाही विचार होतो ही गोष्ट खरी आहे. पण विलायती मालासच बहिष्कार घालण्याची जी बंगालच्या लोकांची प्रथम प्रवृत्ति झाली तिला मूळ कारण आजपर्यंत आमच्या राजकीय मागण्यांची राज्यकर्त्यांनीं फेंटाळणी केल्यामुळें लोकांचीं मनें क्षुब्ध होऊन त्यांनीं या बहिष्कार-शस्त्राचा अंगिकार केला आहे, ही गोष्ट लक्षांत घेतली ह्मणजे 'बहिष्कार' शब्दांत नुसत्या सांपत्तिक गोष्टींचाच समावेश न होतां राजकीय गोष्टींचाही समावेश होतो हें लक्षांत

ठेऊन ही चळवळ चालविणारांनीं राजकीय दृष्टीनेंही तिचा विचार केला पाहिजे; व प्रसंग पडला तर जर्मनी, अमेरिका, चीन, जपान वगैरे ठिकाणचा माल घेऊं पण इंग्लंडचा घेणार नाहीं, असा लोकांनीं निश्चय करून या चळवळीचें राजकीय स्वरूप कायम ठेवलें पाहिजे, असें टिळक यांचें मत असून ' सर्व माल हिंदुस्थानांत होतो कोठें ?" ' देशी माल मिळाला नाहीं तर विलायती माल वापरण्याचा प्रसंग येणारच, मग ' बहिष्कार ' शब्दाची मातबरी ती काय राहिली ?' इत्यादि कोणत्या ना कोणत्या तरी सबबी पुढें करून बहिष्कारावर थंड पाणी ओतण्याचा ज्यांनीं ज्यांनीं प्रयत्न केला त्यांस त्यांनीं असा जबाब दिला आहे:—

" देशी माल तयार होईपर्यंत तो वापरण्याचा निश्चय करणें लांबणीवर टाका असें ह्मणणारे लोक आमच्या मतें हल्लींच्या चळवळीचा बुद्धिपुरस्सर विपर्यास करीत आहेत; आणि लोकांच्या व आमच्या दृष्टीनें हे वर्तन अत्यंत गर्ह्य आहे. जी गोष्ट कित्येक वर्षांनीं सिद्ध व्हावयाची आहे तिचा उपक्रम ती सिद्ध झाल्याखेरीज करूं नये, असें ह्मणणें जितकें बालिशपणाचें आहे तितकेंच हल्लींच्या आक्षेपकांचें ह्मणणें अज्ञानमूलक होय. इंग्रज सरकारास सरकारी नोकरींत ब्राह्मण नको आहेत; पण त्यांच्या खेरीज नोकरीला लायख, हुषार व पुरेसे लोक दुसरे मिळत नाहींत. तेव्हां सरकारानें असा नियम केला आहे कीं, होईल तितकें करून ब्राह्मणेतरांस पहिल्यानें जागा द्याव्या, त्यांतही पहिल्यानें निमगोऱ्यांस किंवा आठ आणे युरेजिनांस, त्यांच्या मागून मुसलमानांस, त्यांच्यामागून पारशांस, त्यांच्यामागून दुसऱ्या कोणत्या तरी हिंदूस, आणि नाहींच कोणी मिळाला, तर मग अखेर अखेर कोंकणस्थ अगर पुण्याचा ब्राह्मण असा क्रम आहे. या क्रमानें आजच नोकरींतून सर्व ब्राह्मण नाहींसे होतील असें नाहीं, पण कालांतरानें सरकारचा हेतु आठबारा आण्यानें तरी तडीस जाण्याचा संभव आहे. देशी माल वापरण्याचा निश्चय करणारांनीं हाच क्रम स्वीकारला पाहिजे; आणि हा क्रम अशा प्रकारचा आहे कीं, भगवद्गीतेंत म्हटल्याप्रमाणें त्याचा ' नाश ' ही होत नाहीं व त्यास ' अडथळा ' ही येत नाहीं. सर्व प्रकारचा देशी माल आज तयार नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे. पण ही गोष्ट आमच्या डोळ्यांपुढें मांडून आमच्या निश्चयाचा भंग करूं पाहणें अगदीं वेडेपणाचें काम होय. सर्व गोष्ट एकदम आपल्या हातून होत नाहीं ह्मणून ती थोडी थोडी किंवा क्रमाक्रमानें करण्याच्या निश्चयास आपण लागू नये काय ? ' खाईन तर लाडू खाईन, नाहीं तर उपाशी मरेन ' असा निश्चय करणारांस शास्त्रांत पढतमूर्ख ह्मटलेलें आहे. सर्व प्रकारचा माल जर देशांत तयार व्हावयास पाहिजे तर त्यास प्रथमपासूनच उत्तेजन दिलें पाहिजे. आज देशांत उत्पन्न होत आहे तो माल वापरण्यास लागा; हिंदु-

स्थानांत झालेला माल मिळत नसला तर निदान जपानासारख्या आशियाखंडांतील राष्ट्रांत तयार झालेला घ्या; तोही मिळाला नाहीं तर जर्मनी, फ्रान्स किंवा अमेरिका या देशांतला घ्या, आणि इतकें झालें ह्मणजे तुमची अडचण बहुधां राहणार नाहीं. कारण अमेरिका, जर्मनी किंवा फ्रान्स वगैरे देशांत तयार होत नाहीं आणि विलायतेंतच तयार होते अशी वस्तु क्वचितच सांपडेल. हल्लींच्या चळवळींतील हें तत्व न ओळखतां किंवा बुद्धिपुरस्सर त्याचा विपर्यास करून तरुण पिढीच्या उत्साहावर पाणी ओतून ' तूं माझ्यासारखी केव्हां होशील ' असें ह्मणत बसणें भितरेपणाचें, गैर-मुत्सद्दीपणाचें किंवा मूर्खपणाचें लक्षण आहे. हल्लींची चळवळ कोणत्याही प्रकारें राजकीय नाहीं, निवळ औद्योगिक आहे असेंही कित्येक गृहस्थांनीं म्हटलें आहे. आमच्या मतें हा गैरसमज आहे. हल्लीची चळवळ प्रत्यक्ष रीतीने राजकीय नाही, तरी अप्रत्यक्ष रीतीनें तिचा राज्यकर्त्यांवर परिणाम व्हावा असाच चळवळीच्या पुरस्कर्त्यांचा हेतु आहे, हें साफ कबूल केले पाहिजे. इंग्रजी राज्य हिंदुस्थानांत आतां इतके निर्भय झालें आहे कीं, राज्यकर्त्यांस आमच्या मतांची विलकुल पर्वा न राहतां ते अगदीं बेफाम होऊन गेले आहेत. अशा स्थितींत त्यांस ताळ्यावर आणण्यास आमच्याजवळ कोणताही-भिकेखेरीज-राजकीय उपाय शिल्लक राहिला नाही. आणि भीक तर कोणी घालीत नाही. अशा स्थितींत आमच्या म्हणण्याचा राज्यकर्त्यांच्या मनांत प्रकाश पाडण्यास एकच साधन आहे. तें हें की, आमच्या राज्यकर्त्यांच्या अंगीं क्षत्रिय आणि वैश्य या दोन्ही वृत्तींचा समावेश झाला असल्यामुळें त्यांपैकी वैश्यवृत्तीचा तरी निरोध करून त्यांस ताळ्यावर आणावें. चिनी लोकांनी अमेरिकन लोकांस ताळ्यावर आणण्यास हीच युक्ति योजिली आहे व हिंदुस्थानांतील लोकांस ती कां साधूं नये, हें आम्हांस समजत नाहीं. सर्व प्रकारचा माल देशांत तयार होत नसल्यानें आज तारखेस कांही परका माल वापरावा लागेल हे निर्विवाद आहे; पण परकी माल जरी वापरावयाचा असला तरी तो बेफाम झालेल्या राज्यकर्त्यांच्या देशांतील नको, शक्य असेल तेथपर्यंत दुसऱ्याचा वापरूं असा तरी आमचा निश्चय झाला पाहिजे. या निश्चयास अप्रत्यक्ष रीतीनें राजकीय स्वरूप येतें व ते यावें अशीच आमची इच्छा आहे. नाहीं म्हण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आजमित्तीस सर्व देशी माल मिळणार नाहीं म्हणून हे काम दिरंगाईवर टाकून उपयोगी नाहीं. विलायती माल वापरण्याचें सोडून हिंदुस्थानांतील, आशियाखंडांतील किंवा इंग्लंडाखेरीज इतर देशांतील एक पैशाचा माल जर तुह्मी वापरला तर त्यांत अर्ध्या पाव पैचें तरी इंग्लंडचें नुकसान आहे हें खचित आहे. मग तो माल देशांत तयार होत असल्यास तो फायदा देशांत राहील. आणि तसें होण्याबद्दल होईल तितकी खटपट केलीच पाहिजे; नाहीं तर निदान इंग्लंडांत न जातां इतर देशांत जाईल. आमच्या राज्यकर्त्यांस आमचें एवढेंच सांगणें आहे कीं, राज्यकर्ते या नात्यानें तुह्मी जी बेपर्वाई चालविली आहे तिचा राजकीय रीत्या प्रतिकार करण्याचें सामर्थ्य आमच्या अंगीं

नाही हें खरें आहे; पण व्यापाराच्या रूपानें आह्मी जे कोट्यावधि रुपये दरसाल तुह्मांस देतों ते तरी तुमच्यासारख्या बेमुर्वत लोकांस कां द्यावें ? आह्मी पहिल्यानें हा माल देशांत तयार करूं, नाहीं तर तो दुसऱ्याकडून विकत आणूं, पण तुमचा घेणार नाहीं; सर्व हिंदुस्थानचा जर असा निश्चय झाला तर 'पायोनियर' नें अमेरिकन लोकांसंबंधानें जें विधान केलें आहे तशाच प्रकारचें विधान इंग्रजी व्यापाऱ्यांसंबंधानेंही लवकरच करण्याची त्यास पाळी येईल. आज आमच्या देशांतील व्यापार सर्वस्वी बुडालेला आहे; आणि तो इंग्रजांनीं जाणून बुजून बुडविलेला आहे, हें जगप्रसिद्ध आहे. आपल्या देशांतील बुडालेला हा व्यापार किंवा उद्योगधंदे पुन्हां या देशांत सुरू करणें हें आपलें कर्तव्य आहे. परंतु ते पुन्हां सुरू होईपर्यंत इंग्रज लोकांवर रुसूं नका असें ह्मणण्यांत मात्र आह्मांस कांहीं हांशील दिसत नाहीं. हल्लीची चळवळ एकपक्षीय नसून दुहेरी आहे हें प्रत्येकानें लक्षांत ठेवले पाहिजे."

—केसरी, ता. ५-९-०५.

बहिष्कार हा कायदेशीर उपाय असून आजपर्यंत त्याचा अनेक राष्ट्रांनीं उपयोग करून घेतला आहे. हें शस्त्र कायदेशीर व फायदेशीर असल्यामुळें तें उचलण्याचें कामीं हिंदुस्थानांत रंकापासून रावापर्यंत सर्वांची एकजूट होईल व त्यानें राज्यकर्त्यांच्या डोळ्यावरील पटल दूर होऊन आपणांस राजकीय हक्क संपादन करतां येतील. करितां बंगालच्या विभागणीनें उत्पन्न झालेल्या आणीबाणीच्या प्रसंगाचा फायदा घेऊन पुढाऱ्यांनीं लोकांना या शस्त्राचा उपयोग करण्यास अवश्य शिकविलें पाहिजे* असें टिळक यांचें ह्मणणें असून तें त्यांनीं पुढील लेखांत स्पष्टपणें व्यक्त केलें आहे:—

---

* राजकीय हक्क मिळविण्याचे कामीं आयर्लंडांतील लोकांची एकजूट कशी करावी याचा विचार करतांना तेथील पुढाऱ्यांनी स्वदेशी चळवळीसारखाच कोणता प्रसंग साधला याचें 'अमृतबझार पत्रिका'कारांनीं येणेंप्रमाणें वर्णन केलें आहे:—

"For hundreds of years Ireland made repeated efforts to form a national organization of their own, but failed. Because the Irish leaders could not hit upon one subject which concerned all. That far-sighted patriot and statesman Parnell however saw that there was not one Irishman who had not some sort of interest in land, and succeeded in making a long organization in his Land-League." The swadeshi movement can however, be made more far-reaching in its effect than the Irish League."

—13 Sept. 1905.

"इंग्रजांना आमच्या देशावर राज्य करावयाचें असल्यास ते खुशाल करोत, राज्यकर्त्यांच्या विरुद्ध शस्त्र चालविण्याची आमची ताकद नाहीं आणि इच्छाही नाहीं. पण विलायतेंतील व्यापाऱ्यास व मजुरास आह्मी विलायती माल घेऊन जे कोट्यावधि रुपये दरसाल देतों तेवढे तरी आमच्यानें बंद होऊं नयेत काय? विलायती मालावांचून कांहीं कांहीं ठिकाणीं अडेल इतकी आपल्या धंद्यांची स्थिति निकृष्ट झालेली आहे हें खरें आहे. पण जेव्हां देशी माल मिळणार नाहीं तेव्हां निदान विलायती तरी न घेतां दुसऱ्या कोणत्या तरी देशांतला घेऊन विलायतेंतील आमच्या मागण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या लोकांबद्दल आमच्या मनांत उत्पन्न झालेला त्वेष आह्मी कां व्यक्त करूं नये? जे लोक आमचें ऐकत नाहींत अथवा आमच्या विनवणीकडे लक्ष देत नाहीत त्यांचें राज्य आमच्यावर असले तरी निदान व्यापाराच्या कामीं त्यांस सहाय्य करण्याचें आह्मी साफ नाकारलें पाहिजे. थोडे दिवसांपूर्वी चीनच्या लोकांनीं अशाच प्रकारचा निर्धार दाखविला आहे. अमेरिकन लोक आपणास नीट वागवीत नाहींत तर अमेरिकन माल चिनांत खपूं द्यावयाचा नाहीं असा चिनी लोकांनीं निर्धार केल्याबरोबर अमेरिकन लोकांचे डोळे उघडले हें आह्मी पाहत आहों. प्रजा कितीही दुर्बल असली तरी धैर्यानें, जुटीने आणि निश्चयानें अरेरावी राज्यकर्त्यांस शस्त्राविणही ती भारी होते ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. बंगाल्यावर किंवा आमच्या देशावर सध्यां आलेला प्रसंग असाच आहे. विलायती माल ह्मणून घ्यावयाचा नाही, नाइलाज झाला तर जर्मनीचा घेऊं, जपानचा घेऊं किंवा अमेरिकेचा घेऊं असा जर निर्धार केला, तर कायदेशीर रीतीने या निश्चयापासून आह्मांस पराङ्मुख करण्यास कोण समर्थ आहे? राज्यकर्त्याविरुद्ध बंड करणें गैरकायदा आहे किंबहुना गुन्हा आहे; पण बहिष्काराचा तसा प्रकार नाहीं. राज्यकर्त्यांपुढे आपलीं गाऱ्हाणीं सयुक्तिक रीतीनें मांडण्याचें सोडून द्या असें आह्मी ह्मणत नाहीं. परंतु नुसत्या विनवणीनें कार्यसिद्धि होत नाहीं असा जर अनुभव आहे, तर सदर विनवणीस बहिष्काराची पुरवणी देऊन या जोडगोळीच्या बंदुकीनें आह्मी आपले इष्ट हेतु साध्य करून घेतले पाहिजेत. बंगाली लोकांच्या लक्षांत ही गोष्ट आतां पूर्णपणे येऊन चुकली आहे, व त्याप्रमाणें ते आज प्रयत्न करीत आहेत. अशा वेळीं हिंदुस्थानच्या इतर भागांतील लोकांनीं त्यांच्याबद्दल सहानुभूती दाखवून त्यांस मदत करावी हे त्यांच कर्तव्य होय; व आह्मांस अशी उमेद आहे कीं, हे कर्तव्य करण्यास ठिकठिकाणचे पुढारी माघार घेणार नाहींत. देशाच्या इतिहासांत हल्लींच्यासारखे आणीबाणीचे प्रसंग क्वचित्च येत असतात. आणि जेव्हां येतात तेव्हां आपण जर त्यांचा फायदा करून घेतला नाहीं तर आमच्या मूर्खपणाची आणि कर्तव्यशून्यतेची कमाल झाली असें ह्मणावें लागेल."

बहिष्कार हें स्वदेशी चळवळीचें एक अंग असल्यामुळें स्वदेशी चळवळीनें राज्यकर्त्यांकडून आह्मांस कायदेशीर रीतीनें कांहीं हक्क संपादन

करतां येतील ही गोष्ट जरी खरी आहे तरी ती निवळ एकदेशीय न ठेवतां तिजपासून उद्योगधंद्यांची अभिवृद्धि करून सांपत्तिक दृष्टीनेंही आम्ही आपला फायदा करून घेतला पाहिजे. आज लाखों रुपयांचा ओघ हिंदुस्थानांतून जो विलायतेकडे जात आहे तो जर्मनी, अमेरिका, चीन, जपान, या देशांकडे वळविण्यांत आह्मांस फायदा नसून परदेशी मालावर कर बसवून सरकार जें देशी उद्योगधंद्यांस उत्तेजन देत नाहीं तें लोकांनीं परदेशी माल न वापरतां देशांतल्या देशांत तयार होणारा माल घेऊन दिलें पाहिजे; ह्मणजे आपल्याच हातानें आपल्या उद्योगधंद्यांची वाढ केली पाहिजे. स्वदेशी मालास आमच्या लोकांनीं उत्तेजन दिलें ह्मणजे देशी मालाची मागणी जास्त वाढते, आणि मागणी वाढली कीं पुरवठा सहज होतो. अशा रीतीनें अर्थशास्त्रांतील मागणी–पुरवठ्याचा नियम अमलांत आणल्यास देशांतील उद्योग वाढून आमचे हजारों कारागीर जे भिकेस लागले आहेत त्यांना धंदे मिळून सांपत्तिक दृष्टीनें देश सधन होईल. स्वदेशी चळवळीचा उद्देश हिंदुस्थान व परराष्ट्रें यांच्यामधील व्यापार अजिबात बंद करण्याचा नसून परकीयांच्या अवाढव्य व्यापारानें व भांडवलानें आमच्या उद्योगधंद्याच्या ज्या नाडया आंखडत चालल्या आहेत त्या या चळवळीनें सशक्त करून परकीय व्यापारास आपल्या दाबांत ठेविलें पाहिजे व त्यायोगानें देशाच्या संपत्तींत भर टाकली पाहिजे असें टिळक यांचें मत आहे व तें त्यांनीं १९०५ सालांतील अनेक लेखांत व्यक्त केलें असून स्वदेशी चळवळीवरील आक्षेपांचें निरसन करतांना याच मतांचा त्यांनीं ता. १२।१२।०५ च्या केसरींतील अग्रलेखांत येणेंप्रमाणें खुलासा केला आहे:—

" अर्थशास्त्रदृष्ट्या पाहिलें असतां स्वस्त परकीय मालापेक्षां महाग स्वकीय माल घेतल्यानें गिऱ्हाइकांचें व त्याबरोबर राष्ट्राचें सांपत्तिक नुकसान होतें, असा जो जुन्या अर्थशास्त्रज्ञांचा सिद्धांत पंचवीस तीस वर्षांपूर्वी सांगण्यांत येत असे तो अलीकडील अर्थशास्त्रज्ञांच्या मतानें निराधार ठरण्यांत आला आहे, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. देशांतील उद्योगधंद्यांस उत्तेजन येण्याकरितां परदेशी मालावर जकात बसविण्याचें तत्व बहुतेक सुधारलेल्या राष्ट्रांस आतां मान्य झालेलें आहे; व राजकीय जकात बसवून जो हेतु सिद्धीस न्यावयाचा तोच हेतु लोकांनीं स्वदेशी माल वापरल्यानें तडीस जातो. अर्थात् सरकारानें जी गोष्ट करावयाची ती लोकांनीं करण्यास हरकत नाहीं हेंही तत्त्व आतां सर्वांस मान्य झालें आहे. परंतु अद्याप एकादा

वेडापीर मध्येंच असें सांगत सुटतो कीं, स्वदेशी चळवळीमुळें गेल्या तीन चार महि-न्यांत बंगालप्रांताचें व त्याच मानानें इतरांचें मिळून एकंदर दीड दोन कोटी रुपयांचें नुकसान झालें आहे! चार दोन महिन्यांत दीड दोन कोटींचें नुकसान तर वर्षानुवर्षे ही चळवळ राहिल्यास काय अनर्थ होईल, अशा प्रकारचा ध्वन्यर्थही वरील सांग-ण्यांत भरलेला आहे. सकृद्दर्शनीं कित्येकांस या आक्षेपाचा कदाचित् मोठा बाऊ वाटेल. पण जरा विचार केला असतां यांतील पोंचटपणा कोणाच्याही सहज नज-रेस येणार आहे. पहिल्यानें क्षणभर आपण असें गृहीत घेऊं कीं, जो विलायती माल एक रुपयास मिळतो तोच स्वदेशी घेतल्यास त्यास चार आणे जास्त म्हणजे सव्वा रुपया द्यावा लागतो. ह्मणजे पांच कोट रुपयांचा स्वदेशी माल घेतल्यास गिऱ्हाइकांस एक कोट रुपये अधिक पडले किंवा कांहीं आक्षेपकांच्या ह्मणण्याप्रमाणें एक कोटीचें त्यांचें नुकसान झालें. परंतु अशा रीतीनें विचार करतांना दुसऱ्या एका महत्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें जातें, हें नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. ती ही कीं, चार कोटीचा विलायती माल घेतला तर चार कोटींच्या चार कोटी विला-यतेस जातात आणि तितकाच देशी माल पांच कोट रुपयांस खरेदी केला तर सर्व पांच कोट रुपये स्वदेशांत राहतात! अर्थात् पांच कोटींचा स्वदेशी माल घेण्यांत एक कोटीचें नुकसान होतें ही समजूत चुकीची आहे. गिऱ्हाइकास एक कोट रुपये जास्त पडतात हें खरें; पण ते देशांतल्या देशांत राहून त्याचा अखेर विनियोग भांड-वलाच्या रूपानें नवीन कारखाने काढण्यांतच होत असतो. स्वदेशी चळवळीनें किंवा परदेशी मालावर अधिक जकात बसविल्यानें देशांतील उद्योगधंद्यांस जें उत्तेजन मिळावयाचें त्याचा मार्ग हाच होय. जकात वाढवून किंवा स्वदेशी माल घेण्याचा लोकांनीं निग्रह केल्यामुळें किंमती वाढून कारखानादारांस आपल्या मालावर जो फायदा मिळतो तोच फायदा सदर कारखाने वाढविण्यांत किंवा दुसरे कारखाने घालण्यांत भांडवलाच्या रूपानें तो खर्च करीत असतो; आणि अशा रीतीनें नवीन कारखाने वाढून देशांतल्या देशांत जास्त माल निघूं लागला ह्मणजे पुन्हां किंमती कमी होऊन परकीय मालाच्या किंमतीबरोबर देशांतील मालाची किंमत होऊन व्या-पाराचें समीकरण नीट बसतें. स्वदेशी चळवळीनें मालाच्या किंमती चढून लोकांचें नुकसान होतें, असा जो कित्येक आक्षेप घेतात तो व्यापाराच्या समीकरणाची ही क्रिया नीट न समजल्यामुळें होय. सप्रतिबंध ऊर्फ संरक्षित व्यापार आणि स्वदेशी चळवळ हीं दोन्हीही स्वदेशी व्यापार वाढविण्याचीं कृत्रिम साधनें आहेत; व त्या दोहोंचाही अखेर परिणाम असा आहे कीं, परदेशी मालावर जकात बसविल्यामुळें किंवा त्यास बहिष्कार टाकल्यानें स्वदेशी वस्तूची किंमत वाढून त्यायोगें कारखान-दाराच्या हातांतील भांडवल वाढतें; आणि हें भांडवल वाढलें ह्मणजे नवीन कार-खाने निघून स्वदेशी मालाच्या किंमती उतरत उतरत अखेर परदेशी मालाच्या किंमतीबरोबर होतात. अर्थशास्त्रांत मागणी आणि पुरवठा यांच्या समीकरणाची जी

क्रिया सांगितली आहे ती अशाच प्रकारची होय. एकाद्या जिनसाची मागणी वाढली म्हणजे पहिल्यानें तो जिन्नस महाग होतो, जिन्नस महाग झाला म्हणजे त्याचा जास्त पुरवठा करण्याकडे भांडवलवाले लोक जास्त प्रयत्न करतात, आणि तसें त्यांनीं जास्त लक्ष पुरविलें म्हणजे पुन्हां वाढलेल्या मागणी इतका पुरवठा होऊन किंमत मूळपदावर येते. हल्लीं म्हणजे स्वदेशी चळवळीच्या प्रारंभकालीं हीच क्रिया चालू आहे. एका आंकडेशास्त्र्यानें असें काढलें आहे कीं, हिंदुस्थानांत हल्लीं जे पंचवीस तीस कोटींचें विलायती कापड येतें तें अजिबात बंद पडण्यास या देशांत चौदा लक्ष वाफेच्या चात्या व एक लक्ष साठ हजार वाफेचे माग नवीन सुरू झाले पाहिजेत; व त्यास सुमारें २५।३० कोट रुपयांचें भांडवल लागेल. म्हणजे दहा वर्षांत ही सुधारणा व्हावयाची असल्यास दरसाल २॥ किंवा ३ कोटी रुपये या धंद्यांत भांडवलाच्या रूपानें व्यापाऱ्यांनीं घातले पाहिजेत. इतके पैसे किंवा भांडवल हिंदुस्थानांतील लोक दरसाल कसे उभारणार, असाही या आंकडे-पंडितानें प्रश्न विचारला आहे; आणि स्वदेशी चळवळ अखेरीस व्यर्थ कशी होणार हें दाखविण्याचा त्याचा रोख आहे. पण वर आह्मी सांगितलेली व्यापाराच्या समीकरणाची क्रिया लक्षांत आणली म्हणजे त्या प्रश्नाचें उत्तर देणें कठिण नाहीं. स्वदेशी मालाचा पुरवठा जर कमी असेल तर सदर मालाच्या किंमती मागणीच्या मानानें पहिल्यानें थोडथोड्या चढल्याच पाहिजेत; आणि किंमती चढल्या म्हणजे कारखानदारांच्या हातांत भांडवल जमून पुन्हां नफ्याच्या आशेनें तें भांडवल याच धंद्यांत खर्च होऊन जास्त जास्त माल तयार होणार आणि अखेरीस पहिल्यासारखी किंमत होऊन पूर्व स्थिति येणार, हें निश्चित आहे. दरसाल ३ कोटी रुपयांचें भांडवल अशा रीतीनें उभारण्यास तीस कोट मनुष्यांस दर माणशीं दीड पावणेदोन आणे अधिक द्यावे लागतील. हिशेबाकरितां दर माणशीं तीन किंवा चारही आणे अधिक द्यावे लागतील असें आपण समजूं; कारण तीस कोट मनुष्यें सर्वच कांहीं समजूतदार असणें शक्य नाहीं, व त्यांतलीं निम्म्यापेक्षां अधिक गैरसमजुतदार धरलीं तरीही माणशीं चार आण्यापेक्षां सरासरीनें जास्त रक्कम बसत नाहीं. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे समजूतदार माणसांनीं दरसाल दरमाणशीं तीन किंवा चार आणे देशी मालाकरितां जास्त दिल्यानें दहा वर्षांत इष्ट हेतु साध्य होतील, असें उघड होतें. तीस कोट प्रजेच्या हिंदुस्थान देशास ( तो कितीही गरीब असला तरी ) अशा रीतीनें तीस कोट रुपये भांडवल जमविणें अशक्य नाहीं. याच तीस कोट लोकांपासून हिंदुस्थानसरकार दरसाल कराच्या रूपानें शंभर सव्वाशें कोट रुपये उत्पन्न करीत आहे; व स्वदेशी उद्योगधंद्यांच्या संरक्षणार्थ परदेशी मालावर जर सरकारानें जास्त जकात बसविली असती तर लोकांवर या जकातीचें ओझें सारखें वांटून गेल्यानें तें त्यांच्या लक्षांतही आलें नसतें. सरकारी कराच्या रूपानें हें ओझें जसें लोकांवर वांटलें गेलें असतें तसें स्वदेशी चळवळीमुळें वाढलेल्या किंमतीच्या रूपानें तें लोकांवर आतां वांटलें जात आहे. फरक एवढाच कीं, जी क्रिया

सरकारच्या हुकमानें झाली असती तीच आतां बहिष्कारयोगानें किंवा लोकांच्या निश्चयाने होत आहे. देशांतील उद्योगधंदे वाढण्यास या क्रियेची सर्वत्र अपेक्षा आहे; इतकेंच नव्हे तर, त्याखेरीज गत्यंतर नाहीं. अशा स्थितींत किंमती वाढल्यानें लोकांचें नुकसान झालें असें प्रतिपादन करणें साहसाचें व असमंजसपणाचें लक्षण होय. पैसा देशांतल्या देशांत राहतो ही गोष्ट प्राधान्यें करून लक्षांत ठेविली पाहिजे. दहा कोट रुपये अजिबात या देशांतून जाण्यापेक्षां या देशांतील कांहीं लोकांच्या खिशांतील एक कोट रुपये या देशांतीलच पण दुसऱ्या लोकांच्या खिशांत पडून जर दहाच्या दहा कोट रुपये देशांत राहत असतील तर त्यांत एकंदर राष्ट्राचें हितच आहे. आतां एवढी गोष्ट खरी कीं, देशी मालाची किंमत विनाकारण चढणार नाहीं अशी या चळवळीच्या पुढाऱ्यांनीं खबरदारी घेतली पाहिजे, व तशी तजवीज झटली ह्मणजे मुख्यत्वेंकरून स्वदेशी मालाची सार्वजनिक भांडवलानें ठिकठिकाणीं दुकानें काढणें हीच होय, व त्याप्रमाणें हल्लीं उद्योगही चालू आहे. तसेंच स्वदेशी मालाचा जितका जितका जास्त लवकर पुरवठा करतां येईल तितका करण्याविषयीं व्यापाऱ्यांनीं झटलें पाहिजे. पण ही गोष्ट होईपर्यंत कांहीं काल तरी स्वदेशी मालाची किंमत थोडीबहूत जास्त पडणारच; आणि ती गिऱ्हाइकांनीं सोसली पाहिजे. देशांतील उद्योगधंद्यांच्या उत्तेजनार्थ लोकांनीं कांहीं दिवस जो स्वार्थत्याग करावयास पाहिजे तो हाच होय; आणि तो करण्याचा निश्चय करणें हेंच स्वदेशी चळवळीचें किंवा बहिष्कार–योगाचें रहस्य आहे. स्वदेशी चळवळ ह्मणजे केवळ सुखाचा मार्ग नव्हे; त्यांत थोडी गैरसोय आहे व ती लोकांनीं सोसली पाहिजे. आतां कोणी असें ह्मणतील कीं, किंमती जास्त चढल्यानें पूर्वी इतका माल घेण्यास जास्त खर्च करावा लागेल; व तसा खर्च करण्यास प्रत्येकास सामर्थ्य नाहीं. गोष्ट खरी आहे; पण ज्यास अशा रीतीनें सामर्थ्य नाहीं त्यानें विलायती मालापेक्षां थोडा कमी स्वदेशी माल तितक्याच किंमतींत खरेदी करून त्यास त्यांत आपला निर्वाह करतां येण्यासारखा आहे. उदाहरणार्थ, कपडाच घेऊं. दरसाल एका कुटुंबास वीस रुपयांचा विलायती कपडा लागतो तर ह्याच वीस रुपयांत जितका देशी कपडा येईल तितका घेऊन कांहीं वर्षे त्यास जास्त खर्च न करितां निर्वाह करतां येणार नाहीं, असें नाहीं. कारण देशी कपडा विलायतीपेक्षां थोडा अधिक टिकाऊ असतो, हें प्रसिद्ध आहे. अशा दृष्टीनें विचार केला ह्मणजे विशेष खर्च न होतां पण थोडीशी झीज सोसून स्वदेशी चळवळीस सर्वांना मदत करतां येणार आहे. यांत कोणाचेंही नुकसान नाहीं व कांहीं अशक्यही नाहीं. जी गोष्ट सरकार परकीय नसतें तर त्यानें केली असती तीच आपल्यास करावयाची आहे. यांत अडचणी पुष्कळ आहेत; पण त्या सर्व निश्चयानें उद्योग केल्यास हळूहळू नाहींशा होण्यासारख्या आहेत. नुकसानीची भीति व्यर्थ आहे; इतकेंच नव्हे तर, केव्हांही झालें तरी यापासून हितच होणार आहे. सारांश, " स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् " असें जें याबद्दल मागें

आह्मी लिहिलें आहे तें अक्षरशः खरें आहे; व आह्मांस अशी उमेद आहे कीं, लोक या योगाचें अवलंबन करण्यांत कदापिही मागें घेणार नाहींत. ”

परदेशी माल वापरल्यानें हिंदुस्थानची जी संपत्ति बाहेर जाते ती स्वदेशी माल वापरून देशांतल्यादेशांत कायम ठेवावी व त्यापासून देशी उद्योगधंद्यांची अभिवृद्धि करून राष्ट्र सधन करावें हा स्वदेशी चळवळीचा मुख्य उद्देश आहे हें वरील विवेचनावरून कोणाच्याही ध्यानांत येईल. माल तयार करणें ( Production ) व त्याचा लोकांत प्रसार करणें ( Distribution ) ह्या स्वदेशी चळवळीच्या पुढील मुख्य क्रिया असल्यामुळें कोणता माल अगोदर तयार केला पाहिजे व त्याचा प्रसार आणि खप कसा वाढविला पाहिजे हें या चळवळीच्या पुरस्कर्त्यांनीं अवश्य लक्षांत ठेविले पाहिजे. हिंदुस्थानांत कापसाचें पीक जास्त असून कापडाची मागणीही अधिक आहे; व हल्लीं परदेशी मालांपैकीं जास्त माल जो हिंदुस्थानांत येतो तो कापडाचाच येतो. करितां सुताचा व विणकामाचा बुडालेला आमचा धंदा लोकांनीं प्रथमतः हातांत घेतला पाहिजे; व गिरण्यासारख्या मोठ्या उद्योगाच्या नादीं तूर्त न लागतां प्रथमतः खेड्यापाड्यांतूनही चालवितां येतील अशा प्रकारचे सुधारलेले हातमागाचे कारखाने घातले पाहिजेत. कापडाप्रमाणेंच साखर, तेलें, यंत्रें वगैरे जिन्नसही परदेशांतून इकडे पुष्कळ येत असल्यामुळें याही धंद्यांची बेताबातानें लोकांनीं सुधारणा केली पाहिजे. ही सुधारणा करतांना देशी मालाच्या वखारी, शास्त्रीय शिक्षण, व संघशक्तीनें भांडवलाची उभारणी, इत्यादि स्वदेशी चळवळ जोरानें चालण्याचीं जीं साधनें आहेत त्यांचाही लोकांनीं अंगिकार केला पाहिजे असें टिळक यांचें मत असून या विषयाची माहिती व आंकडे येथें देणें अशक्य असल्यामुळें १९०५।०६ सालच्या केसरी पत्रांतील या विषयावरील लेख वाचण्यास वाचकांस विनंति करतों.

## शिवाजी—उत्सव.

आपल्या थोर पूर्वजांचें स्मरण, त्यांच्या कृतीची आठवण व त्यांनीं केलेल्या उद्योगांचें मनन हीं जागृत असणें हें कोणत्याही राष्ट्राच्या जिवंतपणाचें लक्षण असून त्यांतच त्याच्या भावी उन्नतीचें बीज असतें. हिंदुस्थानासारख्या सर्व बाजूंनीं खालावलेल्या व परतंत्र झालेल्या राष्ट्रानें तर शिवाजी सारख्या विभूतीची आठवण अवश्य धरली पाहिजे. मुसलमानांनीं

सबंध देश पादाक्रांत करून हिंदु लोकांचा छळ चालविला असतां शिवाजी महाराजांची विभूति अवतीर्ण होऊन त्यांनीं धर्म, नीति, व स्वातंत्र्य हीं स्थापन केलीं; व हिंदु लोकांस प्रगतीचा मार्ग दाखविला. हिंदुसमाजाचें अथवा राष्ट्राचें अस्तित्व नष्ट होण्याचा प्रसंग आला असतां ज्यानें स्वपराक्रमानें राष्ट्रांत जीव घालून त्यास राष्ट्रीयत्व दिलें त्या शिवाजी महाराजांचा उत्सव आपण अवश्य केला पाहिजे. हा उत्सव एकट्या हिंदूंनीं न करतां हिंदुस्थानांतील सर्व लोकांनीं करणें अगत्याचें आहे. कारण, विभूति ह्मटली कीं, ती येथून तेथून सर्वांना सारखीच पूज्य असते; व त्याच्या चारित्र्यांत राष्ट्रोन्नतिकारक अशीं सर्वसाधारण तत्वें वास करीत असतात. अशा विभूति परराष्ट्रांतही पुष्कळ होऊन गेल्या आहेत. पण शिवाजी-महाराज आपले आहेत; ह्मणून ते इतरांपेक्षां आपणांस जास्त पूज्य आहेत. शिवाजी–उत्सव हा शिवाजी महाराजाकरतां करावयाचा नसून तो आपणाकरतांच करावयाचा आहे. शिवाजी महाराजांच्या वेळची परिस्थिति काय होती व हिंदु राष्ट्राला वर आणण्याकरितां त्या वेळीं त्यांनीं काय उपाय योजिले याचें मनन करून केवळ कृतज्ञता प्रगट न करतां हल्लींची स्थिति ओळखून राष्ट्रीयत्वाची कल्पना किती विस्तृत केली पाहिजे व हल्लींच्या अडचणी, गरजा अथवा अवनति कोणत्या प्रकारची झाली आहे व त्यांतून वर डोकें काढण्यास कोणते मार्ग आहेत याचाही विचार हा उत्सव करणारांनीं केला पाहिजे. शिवाजी महाराजांचा अवतार केवळ धर्मोन्नति करण्याकरितां नव्हता किंवा केवळ राजकीय उन्नति करण्याकरतां नव्हता; तर एकराष्ट्रीयत्व ज्या गोष्टींनीं येतें त्या गोष्टी राष्ट्रास देण्याकरतां होता, ही गोष्ट उत्सव करणारांनीं अवश्य लक्षांत ठेऊन तदनुरोधानें या उत्सवाचें धोरण ठेविलें पाहिजे, असें टिळक यांचें मत असून १९०५ सालच्या उमरावती व पुणें येथील उत्सवप्रसंगीं आणि १९०६ सालच्या कलकत्त्यांतील उत्सवांत तें त्यांनीं स्पष्ट शब्दांनीं येणेंप्रमाणें प्रगट केलें आहे.

उमरावती येथील आपल्या भाषणांत ते ह्मणतातः—

“ खरा उत्सव कोणता तर ज्यापासून आपल्या प्रगतीला मदत होते तो. संसारांत मनुष्य आपला सर्व वेळ खावयाला प्यावयाला कसें मिळेल याच काळजींत घालवीत असतो, हें बरें नव्हे. पोट हें प्रत्येकाचे पाठीमागें लागलेंच आहे. परंतु

त्यांतल्यात्यांत वर्षांतून एकादा दिवस तरी मनुष्यानें आपल्या गांवाची, देशाची, समाजाची व एकंदर राष्ट्राची स्थिति चांगली आहे किंवा वाईट आहे याचा विचार केला पाहिजे. देशस्थिति वाईट असल्यास ती सुधारण्यास कोणते मार्ग आहेत ते शोधून काढिले पाहिजेत. या व अशा तऱ्हेच्या गोष्टी आपल्या अंतःकरणांत चांगल्या बिंबाव्या ह्मणूनच छत्रपती शिवाजीचा उत्सव करण्यांत येत असतो. ह्या उत्सवाचा हेतु आपली प्रगति व्हावी असा आहे. आपला सर्व जन्म जर संसारांतल्याच गोष्टी करण्यांत घालविला तर आपली प्रगति होणे संभवनीय आहे काय? आपल्या मनोवृत्ती उच्च तऱ्हेच्या बनतील असे उपाय योजणें, त्यांना उदात्त स्वरूप आणणे हा उत्सवाचा खरा हेतु आहे. आपण असें पहा कीं, आपण बाराही महिने संसारांत घालविले तर आपला देश व आपले देशबांधव कोणत्या स्थितींत आहेत याचा विचार तरी आपल्या मनांत येईल काय? कधींहि येणार नाहीं. वर्षांतून एकदां कांग्रेस भरते तीही अशा प्रकारची जागृति करण्याकरितांच होय. पण तिची बैठक मोठमोठ्या शहरांतून होत असल्यामुळें तिचा इष्ट हेतु पूर्णपणें तडीस जाण्यास इतर साधनांचीही अपेक्षा असते. सगळ्या वर्षांत असा एक दिवस पाहिजे कीं, त्या वेळीं आपण आपलें मन संसारांतल्या नित्यक्रमाच्या गोष्टींतून काढून आपल्या समाजाच्या व राष्ट्राच्या स्थितीचा विचार करण्यांत घालावें. एवढ्या अवाढव्य इंग्रजी राज्याला जुबिली करण्याचें काय कारण आहे? साठ वर्षांत आपल्या साम्राज्यांत भर किती पडली, ती भर पुरीशी आहे किंवा जास्त पाहिजे आहे, असे विचार प्रत्येक इंग्रजांच्या डोळ्यांपुढें या जुबिलीनें मूर्तिमंत उभे राहतात. हल्लीं शाळेंत मुलांच्या शिक्षणांत बालोद्यानपद्धति सुरू केलेली आहे. बालोद्यानपद्धती ह्मणजे वस्तुस्वरूप मुलांना प्रत्यक्ष दाखवून त्यापासून त्या वस्तूविषयीं खरी कल्पना मनांत आणून देण्याची पद्धत आहे. त्याचप्रमाणें छत्रपति शिवाजीसारख्या आपल्यापैकीं महापराक्रमी पुरुषाचे उत्सव हे सामान्य लोकांत आपल्या अभ्युदयाची इच्छा उत्पन्न करणारे व त्याचे मार्ग दाखविणारे वस्तुपाठ होत. सर्व राष्ट्र या कामांत विद्यार्थी आहे; व प्रत्येक विद्यार्थ्यानें या कामी आपलें कर्तव्य करण्यास उद्युक्त असलें पाहिजे. इ. स. १८१८ पासून तों सुमारें १८८५ पर्यंत अशा तऱ्हेचा राष्ट्रीय उत्सव कोठेंही झालेला नाहीं. आह्मी कोणताही उत्सव करीत नाहीं असें नाहीं. कमिशनरसाहेबांची स्वारी आली कीं झाला समारंभ, पदवीदान किंवा दरबार असले कीं झाला समारंभ. अशा प्रकारचे समारंभ किंवा उत्सव हल्लींही कमी होतात असें नाहीं. परंतु गुरांच्या पौर्णिमेच्या दिवशीं गुरांचे जसे उत्सव होतात तसेच हे होत. हे उत्सव गुरांच्या सुखाकरितां नसून यजमानाची हौस पुरविण्याकरितां होत असतात! आह्मांस ज्या उत्सवांची जरूर आहे ते यापेक्षां निराळे होत. आपल्या स्थितीचें चित्र ज्यांत सांपडेल अशा तऱ्हेचे उत्सव आह्मांस पाहिजे आहेत. हल्लींच्या आपल्या स्थितीला अनुकूल किंवा ती सुधारण्याकडे ज्याचा

उपयोग होईल असा उत्सव असणें अत्यावश्यक आहे. शिवाजी–उत्सव अशा प्रकारचा आहे. सुमारें वीस वर्षांपूर्वी कै. न्या. रानडे यांच्या प्रेरणेनें पुण्यास सभा भरवून छत्रपति शिवाजीचा उत्सव करण्याचा जो ठराव झाला, तेव्हांपासून आतांपर्यंत हा उत्सव अनेक संकटांतून पार पडत आला आहे. ज्यांना ज्यांना म्हणून इंग्रजी शिक्षण मिळालेलें आहे त्यांच्या मनांत राष्ट्रजागृती करणारे उत्सव असावेत असें येतें. परंतु हल्लींची राजकीय स्थिति व पूर्वीची राजकीय स्थिति यामध्यें जमीन-अस्मानची तफावत आहे. हिंदुस्थानांत अनेक राजे असले तरी ते सर्व एतद्देशीयच जेव्हां होते, तेव्हां त्यांपैकीं एकाद्या राजानें आपल्या प्रांतांतील लोकांच्या अभ्युदयाची इच्छा धरणें हें त्याचें त्या वेळचें कर्तव्य समजलें जाई. शिवाजीचे वेळीं या कर्तव्यांत बदल झाला होता. मुसलमानांचा छळ त्या वेळीं असह्य झाला होता, व तो दूर करणें हें तेव्हांचें कर्तव्य होतें. हल्लींच्या कर्तव्याची दिशा याहूनही भिन्न आहे. हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती वगैरे भरतभूमींतील सर्व लोकांच्या अभ्युदयाकरितां आपणास उद्योग करावयाचा आहे. तथापि, सर्वांच्या मुळाशीं अभ्युदयाची जी बुद्धि आहे ती एकच होय, व ती जागृत करण्यासच आपणांस हल्लींच्या उत्सवासारखे उत्सव पाहिजे आहेत. कोणत्याही रीतीनें पाहिलें असतां आपल्यावर आज सावट आलें आहे व तें काढून टाकण्याकरितां आपणास आपल्या स्थितीचा विचार केला पाहिजे....जो प्रगती व्हावी अशी इच्छा करतो तो साधु व प्रगतीला अडथळा करतो तो दुष्ट समजला पाहिजे. तो अडथळा काढून टाकला म्हणजे प्रगतीचा मार्ग सुकर होतो. छत्रपति शिवाजीनें आमच्या प्रगतीच्या आड येणारे अडथळे काढून टाकून मार्ग मोकळा केला. त्यांचा उद्देश अफझुलखानास मारण्याचा नव्हता तर तत्कालीन प्रगतीच्या मार्गाच्या आड येणाऱ्या विघ्नांचें निराकरण करावयाचें होतें. केवळ मुसलमान म्हणून त्याला मारण्याचाच जर हेतू असता तर छत्रपति शिवाजीनें खानाच्या बायकोला दागिने वगैरे देऊन विजापुरास परत पाठविली नसती.

प्रत्येकानें जातीकडे व धर्माकडे न पाहतां सर्व राष्ट्राकरितां प्रयत्न केला पाहिजे; व प्रगतीस विघ्न आणणारांचें निवारण केलें पाहिजे. अशा प्रकारची राष्ट्रीय कामगिरी स्वकालीन कर्तव्याच्या दिशेनें छत्रपति शिवाजीनेंच केली. म्हणूनच त्याचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेऊन त्याचा उत्सव आपण करीत असतों. छत्रपति शिवाजी मोठा राजा होता, तो क्षत्रिय होता, किंवा त्यानें अफझुलखानाचा वध केला, म्हणून त्याचे आम्ही उत्सव करतों असें नाहीं. त्या वेळेची आमच्या लोकांची स्थिति ओळखून तत्कालीन संकटांतून आम्हांस सोडवून आम्हांस प्रगतीच्या मार्गास त्यानें लावलें म्हणून त्याचा आम्ही उत्सव करितों. छत्रपति शिवाजीचे ठिकाणीं एकादा मुसलमान जरी असता तरी त्याचा आम्हीं गौरव केला असता. जें कांहीं आमचें

आहे तें आह्मांस मिळवून देणारा थोर पुरुष आहे. राष्ट्रकार्याच्या ठिकाणीं आह्मांला रस्ता सुचत नाहीं, रस्ता सुचला तर धैर्य नाहीं, धैर्य असलें तर पराक्रम होत नाहीं, अशा अनेक अडचणी दूर करून आह्मांस विपन्नस्थितींतून काढणारा छत्रपति शिवाजीच होता; व ह्मणूनच त्याचा उत्सव करणें आह्मांस उचित आहे. छत्रपतीकरितां आपण उत्सव करीत नाहीं, तर आपण तो आपल्याकरितां करतों हें लक्षांत ठेवा......धर्माचे उत्सव आपणांत पुष्कळ आहेत. परंतु राजकीय उत्सव आपणास पाहिजे आहेत. त्याच्या योगानें राजकीय गोष्टी आह्मांस समजतील व आमची स्थिति हल्लीं कशी आहे, हें जाणतां येईल. मोठ्या पुरुषाचे उत्सव करावयाचे तर छत्रपति शिवाजीचाच उत्सव आपण कां करावा, नेपोलियन बोनापार्ट किंवा वाशिंग्टन् यांचा कां करूं नये, अशीही एक शंका कित्येक घेत असतात. परंतु परदेशांतील महापुरुषापेक्षां आमच्याच पूर्वजांपैकीं किंवा ज्यांचें रक्त आमच्या अंगांत खेळत आहे अशा महापुरुषाचेच उत्सव आपणामध्यें कर्तव्यजागृति करण्यास अधिक उपयोगी पडतात, हें तत्व वरील शंका घेणारे गृहस्थ विसरतात असें मला वाटतें. आमच्या लोकांत कांहीं कर्तबगारी आहे कीं नाहीं हें दाखविण्यास दुसऱ्याचें उदाहरण काय उपयोग? एका ग्रंथकारानें ह्मटलें आहे कीं, एशियांतील लोक नेभळे आहेत; त्यांच्याच्यानें राष्ट्रीय कृत्य कांहीं एक व्हावयाचें नाहीं. हा भ्रम जपाननें नुकताच दूर केला आहे. पण आपण याचा पूर्वीच जर विचार केला असता, तर आपला भ्रम आज शिल्लक राहाताना. आमच्याच लोकांच्या सहाय्यानें आपण जित झालों आहों हें आतां नव्याने सांगावयास नको. सेनानायकत्वही करण्याचें आमच्या अंगीं सामर्थ्य आहे; परंतु विपरीत परिस्थितीमध्यें आपण पडल्यामुळें तो गुण दिसून येत नाही. तो करंड्यामध्यें झांकलेला आहे. तो करंडा सगळा नाहीं तर थोडा तरी कसा उघडेल याचा विचार आपण केला पाहिजे. सारांश, छत्रपति शिवाजीच्या उत्सवानें आपल्या अंगचे झांकलेले गुण प्रगट होण्यास जसें उत्तेजन मिळेल किंवा छत्रपतीच्या उत्सवानें जशी आपली प्रगती होईल तशी परकीय वीरांचे उत्सव केल्यानें कधींही होण्याची आशा नको हें निर्विवाद आहे. शिवाजीपासून आपण काय उपदेश घ्यावयाचा? शिवाजीनें सुरत लुटली ह्मणून आह्मी तसेंच करावें की काय? अशा तऱ्हेचे आक्षेप घेणें अगदीं चुकीचें आहे. ही चूक आक्षेपकांची आहे, उत्सवाच्या प्रवर्तकाची नाहीं, हें लक्षांत ठेवा. नेपोलियन, नेलसन, वेलिंगटन यांच्या चित्रांतील प्रत्येक गोष्टींचें जसें अनुकरण करणें योग्य होणार नाहीं त्याचप्रमाणें छत्रपति शिवाजीनें केलेलें प्रत्येक कृत्य करणें आपणास इष्ट नाहीं. आपल्या राष्ट्राची परिस्थिति लक्षांत आणून आपल्या कर्तव्याची दिशा जशी छत्रपति शिवाजीनें बदलली तशी आपणासही हल्लींची परिस्थिति लक्षांत आणून त्याप्रमाणे आपल्या कर्तव्याची दिशा आपणांस बदलली पाहिजे. शिवाजीनें कोणाला धर्मासंबंधानें त्रास दिला नाहीं; त्यानें मुसलमानांच्या मशिदी फोडल्या

नाहींत. त्यावेळेस राजसत्ता मुसलमानांच्या हातांत असल्यामुळें हिंदु लोकांस होत असलेला असह्य जुलूम त्यानें नाहींसा करून टाकिला. आमची सध्यांची स्थिति याहून भिन्न आहे. आपल्या बादशहाचे मनांत आह्मांस जे हक्क किंवा ज्या गोष्टी पाहिजे आहेत त्या द्यावयाच्या आहेत; परंतु मध्यें कोठावळ्याचें पोट दुखत असतें. शिवाजीनें आठ बायका केल्या ह्मणून आपण आठ बायका करावयाच्या नाहींत; अगर अफझूलखानासारख्या दुसऱ्या कोणा खानाचा खून करावयाचा नाहीं. राष्ट्रीय प्रगतीच्या कामांत जो अडथळा असेल त्याचें निवारण करून प्रगतीचा मार्ग आपणास खुला करावयाचा आहे. विघ्नसंतोषी मंडळी प्रत्येक राष्ट्रांत असावयाचीच. पण अशा अडाणी जितक्या असतील तितक्या चांगल्याच; कारण त्यामुळें कर्तव्य बजावण्यास अधिक स्फुरण येतें. प्रगतीच्या मार्गांत आलेला अडथळा काढून टाकणें हाच खरा पुरुषार्थ. छत्रपति शिवाजीने अशाच प्रकारची कामगिरी केली, व ह्मणूनच हिंदुस्थानांतील लोक त्याचा उत्सव करितात. अनेक संकटांतून पार पाडणारा तोच पुरुष थोर होय, व त्याचाच लोक उत्सव करितात. सुखाने व चैनीनें कालक्रमणा केलेले राजे आजपर्यंत थोडे झाले आहेत असें नाहीं; पण नल–राम–युधिष्ठिरांप्रमाणें त्यांची महती कोणी गात नाहीं व गाणारही नाहीं."

—केसरी, १६।५।१९०५.

पुणें येथील भाषणांत ते ह्मणतात:—

"शिवाजीनें हिंदूचें राज्य स्थापिलें तें केवळ धार्मिक बुद्धीने गोब्राह्मणप्रतिपालनेच्छेनें स्थापिले असें कित्येकांचें ह्मणणें आहे. कालचे व्याख्याते रा. मराठे यांच्यासारखी मंडळी शिवाजी 'जे कां रंजले, गांजले' या साधुवृत्तीने प्रेरित झाला होता, असें ह्मणते, व कांहीं गृहस्थ शिवाजी हा राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेनें व देशाभिमानानें प्रेरित होऊन कर्तव्यास उद्युक्त झाला होता, असें ह्मणतात. पहिल्या दोन प्रकारच्या मंडळीच्या मते, शिवाजी राष्ट्राभिमानानें प्रेरित झाला होता, असें ह्मणणे ह्मणजे steam-engine च्या जोरावर नलराजानें रथ चालविला असें ह्मणण्यासारखेंच आहे. परंतु मला त्यांचें मत पसंत नाहीं. 'Patriotism' 'Nationality' हीं नांवें नवीन आहेत; पण तद्दर्शक कल्पना जुनी आहे. शिवाजीच्या पराक्रमाच्या व राज्यस्थापनेच्या मुळाशीं राष्ट्रीयत्वाची कल्पनाच मुख्यत्वें होती हें प्रथम परलोकवासी रा. ब. नीळकंठराव कीर्तने यांनीं प्रस्थापित केलें. त्यांचा लेख पुढें तेलंगांच्याकडे गेला. परंतु त्याची परिसमाप्ति ग्रंथरूपानें शेवटीं न्या. रानडे यांनींच केली. शिवाजी राष्ट्रभक्त होता असेंच विवेचन ह्या ग्रंथांत सर्वत्र आहे. राजनीतीला धर्मांतून अजीबात फांटा मिळण्याची कल्पना अलीकडची आहे. शिवाजीमहाराजांची राष्ट्रीयता अशी फारकत करून बाहेर पडलेली नाहीं. धर्म हा तिचा पोषक होता. परंतु महाराजांचा

हेतु कोणताही मानला तरी त्यामुळें राष्ट्रोदय व राष्ट्रोन्नति खरोखरी झाली हें प्रत्येकास मान्य आहे. गोब्राह्मणप्रतिपालन हा त्यांचा राज्यस्थापनेंत मुख्य हेतु खास नव्हता. त्यांनीं कोठें गोशाळा स्थापल्या नाहींत किंवा ब्राह्मणभोजनें घातलीं नाहींत. स्वराज्यस्थापनेबरोबर गोब्राह्मणप्रतिपालन हें आनुषंगिक फळ सहज प्राप्त झालेलें आहे. कित्येक दैववादी ह्मणतात–' परमेश्वरावर भरंवसा टाकावा, त्यासच कालेंकरून करुणा येईल. काळाची स्थिति पालटली, काळ बदलला, ह्मणजे एकच मनुष्य निरनिराळीं कमीजास्त महत्वाचीं कार्यें करूं शकतो !' दैववाद्यांचें हें ह्मणणें बऱ्याच अंशीं खरें आहे; पण तें सर्वस्वी खरें नाहीं. कालचक्राचा मोठा जोर आहे खरा; परंतु सबंध आगगाडीच्या चक्रांचा मार्ग जर एक सांधेवाला फिरवूं शकतो तर कुशल पुरुषाला कालचक्र फिरवून आपणास अनुकूल करून घेतां यावयाचें नाहीं असें नाहीं. ' राजा कालस्य कारणम्. ' राजा हाच काळांत फेरफार करूं शकतो असें भारतांत वचन आहे. परंतु राजांत प्रजेचेच एकीकरण झालेलें असतें. जी गोष्ट एका दृष्टीनें एक व्यक्ति करते तीच अनेक व्यक्तींना संघशक्तीनें कां करतां येऊं नये ? आपले राजे उद्योगानेंच मोठे झाले हा डोळ्यांसमोरचा कित्ता आपण वळविला पाहिजे. परमेश्वराचे साहाय्य आपण स्वत: उद्योग केल्याशिवाय मिळत नाहीं. राष्ट्राला वर येण्याकरितां परमेश्वरानें ज्या वाटा तयार करून ठेवल्या आहेत, त्यांचा आपण अवलंब केला पाहिजे. अशा उपायांनीं आपण कालचक्र जर फिरविलें नाहीं तर त्याच्याखालीं आपण सर्व चिरडून जाऊं. तें कालचक्र आपोआप फिरत नसतें, किंवा तें ईश्वरही फिरवीत नाहीं. इंग्रज राज्यकर्ते फार धूर्त आहेत. त्यांची दृष्टी फार बारीक आहे. मुलांच्या मनांत पुढे ज्या गोष्टी यावयास त्यांना नको आहेत त्या आरंभापासून न येऊं देण्यास ते सदैव दक्ष आहेत. मुलांच्या क्रमिक पुस्तकांवर त्यांनीं लाविलेली दृष्टि लक्षांत आणा. अशा रीतीनें सरकारी अधिकारी उद्योग करीत आहेत. आह्मांला या बाबतीत त्यांच्या उलट वाटत असले तर आह्मी उलट उद्योग केला पाहिजे. इंग्रजी राज्यनीतीचें खरें स्वरूप लोकांना सामान्यत: नीट कळावयास लागले तरी देखील शिवाजी उत्सवाचा हेतु बराच तडीस गेला असें ह्मणण्यास हरकत नाहीं."

—केसरी, २०।६।०५.

कलकत्ता येथील भाषणांत ते ह्मणतात:—

" Human nature is so consitituted that we can not do without festivals. It is the nature of man to love festivals. We must have festivals. If you want to keep up your spirit you should assemble once a year at least and you should concentrate your intellectual and spiritual force for a particular idea. The *utsabs* were originat-

ed and celebrated simply to keep the memories of days gone by. Unfortunately we had no political festival to keep up the memory of our heroes except the National Congress. This is the reason why the Shivaji festival was started in Maharashtra with the hope that it will spread all over India without distinction of caste and creed. There is no reason to object to the festival because Shivaji was a Marhatta, because the life of Shivaji was not up to the standard of the twentieth century. These are minor points. If Shivaji was a Marhatta—it was because he was born at Poona. If you look at the ethnology you will find Shivaji belonged to the same stock of the Rajputana. You may call him a Rajput if you like, and you may call him a Bangali if you like ( loud cheers. ) And therefore you should continue the celebration from year to year. It is such an inspiring festival that in these days we cannot afford to do without it. The central idea is that you must take the spirit from the life of Shivaji. There had been various objections started not here but in my own province. Some objected to it because they were Mahomedans. That objection no longer exists. Shivaji did not fight against the Mahomedans but against the tyrannical power that existed at that time. There are instances in his career. A Lieutenant ofSivaji had defeated aMahomedanChief and his family was captured and was taken to Sivaji. Sivaji at once sent the lady to the private chamber and asked his Lieutenant to send her back to her husband. That is the sprit in which you must read the life of Shivaji and if you read the life of Shivaji in the proper sprit I can assure you that you are sure to derive an inspiration, a sentiment in life which will serve you in these days which you can not draw from the history of any other country. Sivaji was essentially a man and that is the reason why we should celebrate his life. The Goddess Kali is the presiding deity in Bengal. The same Goddess was the protectress of Shivaji. I am told that some persons objected to the worship of Kali here to-day. I see no reason in fact, no logical reason why such objections should be raised. We are all Hindus and idolators and I am not ashamed of the fact. And I must declare from here my conviction. We cannot cenceive of Shivaji without Bhavani. His whole life was, as it were, engulfed and inseparable from Bhavani. And we cannot read of Shiviji without Bhavani. There was a grand festival at Raigar a month and a half ago at the temple of Shivaji. There we took the palanquin with the portrait of Shivaji. And these temples in

various places of the Deccan were aided and kept up by the British Government. Gentlemen, I do not mean to say that Mohomedans should come to worship the Goddess but surely they should take part in the festival just as we take part in the Mahomedan festival of Moharam in Poona. Abstaining from the worship is no reason why we should not take part in the festival itself. It is to give a corporal shape to our political ideas that we Hindus should have festivals like these. History tells us that in the worst days of Mahomedan rulers Mahomedans worshipped Sivaji with the same enthusiasm as the Hindus."

शिवाजी–उत्सवांत आपली राजकीय उन्नति कशी होईल याचा विचार विशेष रीतीनें होत असल्यामुळें आमच्यापैकीं कित्येकास भीति वाटून या उत्सवांत राजद्रोह भरला आहे अशी शंका घेऊन ते दूर दूर राहतात. पण ही शंका निरर्थक असून या शंकेमुळें ते आपल्याच हातानें आपल्या पायावर कसा धोंडा पाडून घेत आहेत, याविषयीं वरील उमरावती येथील भाषणांतच टिळक यांनीं असा स्पष्ट उल्लेख केला आहे:—

"आपल्या स्थितीचा विचार करणे हा राजद्रोह आहे काय? आपली स्थिति सुधारणे हें काय राजद्रोहाचे लक्षण आहे? माझें तर असे साफ मत आहे कीं, आपल्या प्रजेची स्थिति सुधारूं नये असें प्रतिपादन करणारा राजा नव्हे व हें तत्व ऐकून घेणारी प्रजाही नव्हे. कांहींना अशी शंका येते कीं, अशा रीतीचे राष्ट्रीय उत्सव करण्याने राज्यकर्त्यांची वक्रदृष्टी होते, व ह्मणून अशीं राष्ट्रीय कामे होऊं नयेत ह्मणून त्यांचा सतत प्रयत्न चाललेला असतो. असल्या विघ्नसंतोषी मनुष्यांनी मुकाट्यानें बसणे चांगले. आपल्यांत एक ह्मण आहे कीं, उगीच बसशील तर काय घेशील? आमची प्रगति होऊं नये अशा तऱ्हेचा राजकर्त्यांचा हेतु मुळींच नाहीं. १८५८ सालीं झालेला जाहीरनामा पाहिला ह्मणजे हा आपला भ्रम दूर होईल. त्या जाहीरनाम्यांत लिहिलेलीं अक्षरें खरीं करण्याकरितां झटण्यांत राजद्रोह आहे किंवा तीं खोटीं पाडण्याचा उद्योग करण्यांत राजद्रोह आहे, याचा तुह्मीच विचार करा. आपल्या प्रगतीचा मार्ग ज्यांत आढळून येईल अशा तऱ्हेचा उपाय कांहीं तरी आपणांस योजला पाहिजे. असल्या उत्कृष्ट कार्याला विरुद्ध लोक निपजावे हें आमच्या अवनतीचें लक्षण आहे. विघ्न आणणारांस कोणत्याही प्रकारें त्रास देऊं नका. आपला उद्दिष्ट हेतु सिद्धीस गेला ह्मणजे ही मंडळी आपोआप आपल्याला येऊन मिळतील. ही मिळाली नाहींत तरी त्यांचीं मुलें मिळतील."

शिवाजी–उत्सव हा राष्ट्रीय उत्सव होईल कीं नाहीं, असा १९०६ सालीं प्रश्न निघाला होता, व त्या वेळीं वर्तमानपत्रांतून आणि सभांतून

याची बरीच चर्चाही झाली होती. टिळक यांचें मत हा उत्सव राष्ट्रीय होऊं शकेल असें आहे. शिवाजी महाराज हिंदु असून ते महाराष्ट्रांत जरी जन्मले असले तरी विभूति या दृष्टीनें ते सर्वांना सारखे पूज्य आहेत. विभूति कोठेंही जन्मास येवो व ती कोणत्याही जातींत वाढो; जात, धर्म किंवा स्थान यापेक्षां राष्ट्रीय गुणांनीं ती लोकांना वंद्य होत असते. शिवाजी महाराज सर्वांना वंद्य असण्याचें कारण, त्यांच्या अंगचें धैर्य, स्वावलंबन, स्वार्थत्याग, स्वधर्माभिमान, शुद्धाचरण, राष्ट्रहिततत्परता इत्यादि गुणच होय; व ह्मणूनच या उत्सवास दिवसेंदिवस राष्ट्रीय स्वरूप येत चाललें असून, प्रतापादित्याबद्दल जो अभिमान बंगाल्यांतील लोकांस वाटत आहे तोच अभिमान शिवाजी महाराजांबद्दल लोकांस वाटावयास लागला आहे, हें कलकत्ता वगैरे ठिकाणीं होणाऱ्या उत्सवावरून वाचकांच्या सहजी ध्यानांत येईल. फार काय, शिवाजी उत्सवानें महाराष्ट्रांत नाना फडणवीस, बाजीराव वगैरेंचे उत्सव करण्याची जशी लोकांस स्फूर्ति झाली आहे तशीच कलकत्त्याकडील शिवाजी-उत्सवानें अकबरासारख्यांचे उत्सव करण्याबद्दलही लोकांत जागृति होत चालली आहे. हा जागृतीचा परिणाम शिवाजी महाराजांच्या उत्सवांत राष्ट्रीयत्वाचें बीज वास करीत असल्याचाच आहे, हें कोणाही सुज्ञ वाचकांच्या लक्षांत येईल. आता लोकांत शिक्षणाचा प्रसार अद्याप व्हावा तितका न झाल्यामुळें व राष्ट्रीयत्वाची कल्पना जागृत न झाल्यामुळें कांहीं मुसलमानांना शिवाजी-उत्सव जसा तूर्त अप्रिय वाटेल तसाच कांहीं हिंदूंना अकबराचा उत्सवही अप्रिय वाटेल. पण राष्ट्रीयत्वाची कल्पना जागृत होऊन ती जसजशी वृद्धिंगत होत जाईल तसतशी शिवाजी महाराजांच्या उत्सवाचीच महती वाढेल असें नाहीं तर अकबरासारख्याचा उत्सवही सर्वत्र सुरू होईल. थोर पुरुषांच्या अंगचे कित्येक गुणच असे असतात कीं, ते राष्ट्रांतील विस्कळितपणा मोडून राष्ट्रैक्य करतात. मात्र या गुणांचें महत्व लोकांच्या मनांत बिंबविण्याचें काम लोकांच्या पुढाऱ्यांचें असून निरनिराळ्या समाजाचें एकीकरण करतांना त्यांतील प्रत्येक समाजाच्या वैशिष्ट्यांतही दृढपणा आणण्याचा त्यांनीं प्रयत्न केला पाहिजे. अठरा पदरी दोरी एकत्र वळली तर बळकट दोरखंड होईलच; पण त्याबरोबरच प्रत्येक पदर बळकट केला तर तें दोरखंड अधिक बळकट होईल हें कोणासही सांगावयास नको.

शिवाजी महाराजांचें पाठीमागून आलेल्या मराठी राज्यकर्त्यांनीं बगालवर निर्दयपणें स्वारी केल्यामुळें बंगाली लोकांना शिवाजीचा उत्सव कधीं प्रिय होणार नाहीं; व जोंपर्यंत शिवाजीनें कपटानें अफझुलखानास ठार मारल्याची आठवण मुसलमानांना आहे तोंपर्यंत शिवाजी–उत्सवाबद्दल मुसलमानांची किंवा बंगाल्यांतील लोकांची सहानुभूति कधीं उत्पन्न होणार नाहीं, असेही १९०६ साली कलकत्त्यास जेव्हां जंगी शिवाजी–उत्सव झाला त्या वेळीं कित्येक अँग्लो–इंडियन पत्रकारांनीं किंवा त्यांचीच री ओढणाऱ्या कित्येक नेटिव पत्रकारांनी आक्षेप घेतले होते; व त्यांचाच ध्वनि अजूनही कित्येक ठिकाणीं निघत आहे. पण या आक्षेपांतही कांहीं अर्थ नाहीं असें टिळक यांनी अनेक वेळां लोकांस दाखवून दिलें आहे. शिवाजीच्या पाठीमागून मराठ्यांच्या गादीवर येणाऱ्या राजकर्त्यांनीं बंगालवर स्वारी केली ह्मणून शिवाजीबद्दल बंगाली लोकांना कां वाईट वाटावें? खुद्द शिवाजीनें कांहीं बंगालवर स्वारी केली नव्हती. दुसरें असें कीं, स्काटलंड व इंग्लंड यांचें पूर्वी हाडवैर होतें. पण हल्लीं एकमेकांना एकमेकांच्या राष्ट्रांतील शूर व कर्त्या पुरुषांबद्दल अभिमान वाटून त्यांचा तीं राष्ट्रें उत्सव करतात कीं नाहीं? राजकारणास्तव त्या त्या वेळीं त्या त्या परिस्थितीप्रमाणें प्रत्येक योद्धयाला परराष्ट्रावर स्वारी करावी लागली. अर्थात् त्या वेळीं खून व रक्तपात करणें त्यांना भाग पडलें. अफझुलखानाच्या वधाची जागृति जोंपर्यंत मुसलमानांत आहे तोंपर्यंत जर मुसलमान लोक हिंदूंस येऊन मिळणार नाहींत तर अफझुलखानाचा ज्या कारणाकरतां व ज्या रीतीनें वध केला त्यापेक्षांही अधिक क्रूरपणानें अवरंगजेबानें संभाजीस जर मारलें आहे आणि ही आठवण जोंपर्यंत हिंदूंस आहे तोंपर्यंत हिंदूंनीं तरी मुसलमानांस कसें येऊन मिळावें? पण वरील प्रकारचे आक्षेप केवळ 'आपापसांत दुही माजवून राज्य करण्याची पद्धत' (Divide and rule) शिकविणाऱ्या कित्येक अँग्लो–इंडियन लोकांच्या कुचक्या नासक्या मेंदूतले असल्यामुळें त्यांस आतां कोणी भीक घालीत नाहीं. राष्ट्रैक्य करण्याचे वेळीं असले खून व रक्तपात विसरावे लागतात; किंबहुना यांचा विसर पडेल तरच खरें राष्ट्रैक्य होईल; व शिवाजी–उत्सव करतांना लोकांनीं जी गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती हीच होय, असें

टिळक यांचें मत असून ता. २४।६।०६ च्या ' मराठ्यां 'त ' शिवाजी ही हिंदुस्थानची राष्ट्रीय विभूति होणार नाहीं काय?' या मथळ्याखालीं त्यांनीं जो लेख इंग्रजींत लिहिला आहे त्यांत तें स्पष्ट रीतीनें येणेंप्रमाणें नमूद केलें आहे. ते ह्मणतात:—

Hero-worship is a feeling deeply implanted in human nature; and our political aspirations need all the strength which the worship of a Swadeshi hero is likely to inspire into our minds. For this purpose Shivaji is the only hero to be found in the Indian history. He was born at a time when the whole nation required relief from misrule; and by his self-sacrifice and courage he proved to the world that India was not a country forsaken by Providence. It is true that the Mahomedans and the Hindus were then devided; and Shivaji, who respected the religious scruples of the Mahomedans, had to fight against the Mogul rule that had become unbearable to the people. But it does not follow from this that, now that the Mohamedans and the Hindus are equally shorn of the power they once possessed and are governed by the same laws and rules, they should not agree to accept as a hero one who in his own days took a bold stand against the tyranny of his time. It is not preached nor is it to be at all expected that the methods adopted by Shivaji should be adopted by the present generation. The charge brought by the Anglo-Indian writers in this connection is a fiction of their own brain and is put forward simply to frighten away the timid amongst us. No one ever dreams that every incident in Shivaji's life is to be copied by any one at present. It is the *spirit* which actuated Shivaji in his doings that is held forth as the proper ideal to be kept constantly in view by the rising generation. No amount of misrepresentation can succeed in shutting out this view of the question from our vision; and we hope and trust that our Mahomedan friends will not be misled by such wily methods. We do not think that the Anglo-Indian writers will object to England worshipping Nelson or France worshipping the great Napolean on the ground that such national festivals would alienate the sympathies of either nation from the other, or would make the existence of amicable relations between the two nations an impossibility in future. And yet the same advice is administered to us in a patronising

tone by these Anglo-Indian critics, being unmindful of the fact that we have now become sufficiently acquainted with their tactics to take their word for gospel truth. The Shivaji festival is not clebrated to alienate or even to irritate the Mahomedans. Times are changed. and, as observed above, the Mahomedans and the Hindus stand in the same boat or on the same platform so far as the political condition of the people is concerned. Can we not both of us derive some inspiration from the life of Shivaj under these circunistances? That is the real question at issue; and if this can be answered in the affirmative it matters little that Shivaji was born in Maharashtra This aspect of the question has been clearly perceived and explained by the leading Indian papers in Bengal such as the *Patriki* and the *Bengalee*; and there is little chance of the serpentine wisdom of the Anglo-Indian writers being blindly accepted by the parties for whom it is meant. We are not against a festival being started in honour of Akbar or any other hero from old Indian history. Such festivals will have their own worth; but that of Shivaji has a peculiar value of its own for the whole country, and it is the duty of every one to see that this characteristic of the festival is not ignored or misrepresented. Every hero, be he Indian or European, acts according to the sprit of his times; and we must therefore judge of his individual acts by the standard prevalent in his time. If this principle be accepted we can find nothing in Shivaji's life to which one can take exception. But as stated above we need not go so far. What makes Shivaji a national hero for the present is the sprit which actuated him throughout and not his deeds as such. His life clearly shows that Indian races do not so soon lose the vatality which gives them able leaders at critical times. That is the lesson which the Mahomedans and the Hindus have to learn from the history of the great Mahratta Chief; and the Shivaji festival is intended to emphasise the same lesson. It is a sheer misrepresentation to suppose that the worship of Shivaji includes invocations to fight either with the Mahomedans or with the Government. It was only in conformity with the political circumstances of the country at the time that Shivaji was born in Maharashtra. But a future leader may be born anywhere in India and who knows, may even be a Mahomedan. That is the right view of the question, and we do not think that the Anglo-Indian writers can succed in diverting our attention from it."

टिळक हे शिवाजी-उत्सवाचे मुख्य पुरस्कर्ते असून आकस्मिक रीतीनें १८९७ सालीं त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला झाल्यामुळें कित्येक लोकांचीं मनें विनाकारण साशंक होऊन उत्सव नेटानें सुरू करण्याच्या व फंड जमविण्याच्या कामीं त्यांच्या हातून व्हावें तसें सहाय्य झालें नाहीं. पण मनें साशंक होण्यास काल जसा कारणीभूत होतो तसाच तीं शुद्ध होण्यासही तोच कारणीभूत झाला असल्यामुळें गेल्या दहा सालांत या उत्सवासंबंधानें लोकांचीं मनें बदलून त्याला दिवसेंदिवस इष्ट स्वरूप येत चाललें आहे, हें या उत्सवाचें निरीक्षण करणाराच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. १९०४ सालीं तर लॉर्ड कर्झन यांनीं जुन्या इमारतींच्या संरक्षणाचा कायदा केल्यामुळें व जुन्नर येथील किल्ल्यांत शिवाजी महाराजाचें स्मारक करण्याचा व 'व्हिक्टोरिया मेमोरियल इन्स्टिटयूट'मध्यें त्यांच्या तसबिरींचा व हत्यारांचा संग्रह करण्याचा ठराव झाल्यामुळें मुंबई सरकारच्या कारभारांतही या बदललेल्या धोरणाचीं फळें दृष्टीस पडावयास लागलीं; व १९०७ सालीं सरकारानें रायगड येथील समाधीच्या जीर्णोद्धारासाठीं पांच हजार रुपये देण्याचा ठरावही केला. सरकारानें अशा रीतीनें सहाय्य केल्यामुळें हळू हळू समाधीच्या जीर्णोद्धारास व फंडास सर्व लोकांची चांगली मदत होईल अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अभिमान बाळगून उत्सवाबद्दल व पर्यायानें राष्ट्राबद्दल झीज सोसणें हें सर्वांचें कर्तव्य आहे अशी ता. १ मे १९०६ च्या केसरींत खुद्द टिळक यांनीं फंडाच्या चळवळीचा इतिहास देतांना आपली इच्छा प्रगट केली असून ती सफल करणें हें महाराष्ट्रीयांचें काम आहे. राष्ट्रीय सभेप्रमाणेंच राष्ट्रोन्नतीची कल्पना जागृत करून राष्ट्रैक्य करणाऱ्या ज्या संस्था आहेत त्यांतच शिवाजी उत्सवाची गणना करण्यास कांहीं हरकत नाहीं; आणि उत्सवाच्या आजपर्यंतच्या कार्यक्रमावरून या उत्सवांत 'राजकीय महत्वाकांक्षा तृप्त होण्यास कोणते सद्गुण व मनोवृत्ति राष्ट्रांत वृद्धिंगत झाल्या पाहिजेत ह्याचा ऊहापोहही होत असतो.' करितां या कामीं आपआपसांतलि भेद विसरून जाऊन सर्वांनीं एकजुटीनें वागावें म्हणजे या संस्थेस थोडक्याच काळांत राष्ट्रीय स्वरूप येऊन तिच्या द्वारें निःसंशय देशहित साधेल.

## विभागणी–कमिशन पुढील साक्ष.

अधिकार विभागणीनें राज्यकारभारांत किती फरक होईल, त्यापासून लोकांचा किती फायदा होईल, व लोकांच्या वाढलेल्या आकांक्षा तृप्त करण्याचा मुख्य उपाय कोणता यासंबंधानें टिळक यांनी १९०८ च्या मार्च महिन्यांत विभागणी–कमिशनपुढील साक्षींत आपले मत येणेंप्रमाणें दिलें आहे:—

" अधिकाऱ्यांच्या हातांतील सत्तेचें केंद्रीकरण किंवा विभागणी यामध्ये राज्यकारभाराची एकरूपता, विनबोभाट व नियमितपणे काम करण्याची टीप, सर्वसाधारण चोखपणा, वेळेची, कामाची व पैशाची काटकसर इत्यादि गोष्टींचा अंतर्भाव होतो. ठोकळ मानानें सांगावयाचे म्हणजे ह्या सर्व गोष्टींचा ( १ ) चोखपणा, ( २ ) काटकसर, ( ३ ) व लोकप्रियता या तीन सदरांखालीं समावेश करतां येईल. या तिहींपैकीं पहिल्या मुद्यासंबंधाने विचार करता केवळ सत्तेच्या अतिरिक्त केंद्रीकरणामुळेच राज्यकारभाराच्या चोखपणांत बिघाड झाला आहे असें विशेष जोरानें प्रतिपादण्यांत येत आहे असे मला वाटत नाही. उलट अधिकारविभागणी करून राज्यकारभार हल्लीपेक्षां पुष्कळच अधिक लोकप्रिय करणे श्रेयस्कर आहे; तसे करण्यांत राज्यकारभाराच्या चोखपणांत अंमळसा उणेपणा उत्पन्न झाला तरी चालेल, असेच लोकांचें विशेष आग्रहाचे म्हणणें आहे. आपल्याकडे सोंपविलेल्या भागांतील राज्यकारभार चालविण्यांत आपल्यास अधिक स्वतंत्रता हवी अशी जी स्थानिक अधिकाऱ्यांची इच्छा, तिच्यामध्यें अधिकारविभागणीबद्दलच्या ओरडीचें बीज आहे. सत्तेच्या अतिरिक्त केंद्रीकरणामुळें आपला जीवनक्रम अगदी यांत्रिक अगर निर्जीव झाला आहे; व स्वाभाविकपणेंच अधिकारी व लोक यांमधील वाढत जाणाऱ्या दूरीभावाचे अपयश अतिरिक्त केंद्रीकरणाच्या माथी मारून ह्या आपत्तीचा निरास करण्याचा उपाय म्हणून त्यांनी अधिकारविभागणीचा तोडगा सुचविला आहे.

लोकांना अधिकाऱ्यांची ही विचारसरणी मान्य आहे असे मला वाटत नाहीं. अधिकाऱ्यांच्या सत्तेच्या कमीअधिक विभागणीमुळें राज्यकारभार चोखपणानें व काटकसरीनें चालतो किंवा अन्य कारणामुळें चालतो याविषयीं लोक उदासीन असतात. वरचे व खालचे अधिकारी, सेक्रेटरीयट व स्थानिक कामगार व वरिष्ठ आणि प्रांतिक सरकार यांच्यामधील हा प्रश्न आहे. अधिकाराच्या केंद्रीकरणामुळें राज्यकारभारांत एकरूपता व नियमितपणा येतो व खालच्या अधिकाऱ्यांकडून हातांतील सत्तेचा जाणून बुजून किंवा सहजवृत्त्या दुरुपयोग होण्याचा संभव कमी होतो असा लोकांचा अद्याप भरंवसा असल्यामुळें निरनिराळ्या अधिकाऱ्यांमधील सत्तेची वांटणी लोकांना रुचण्याचे ऐवजीं अप्रियच वाटेल. माझ्या माहितीप्रमाणें अस्तित्वांत

असलेल्या अधिकाराच्या विभागणीबद्दल किंवा केंद्रीकरणाबद्दल लोकांच्या तक्रारी आहेत त्या अशा:—( १ ) अंमलबजावणी करणें व न्याय देणें या दोन्ही कामांचें एकाच अधिकाऱ्याचे हातांत एकीकरण ( २ ) प्रांतिक करारपद्धतीमध्यें दिसणारें पैशावरील सत्तेचें केंद्रीकरण ( ३ ) बंगालची फाळणी. ( ४ ) लोकांच्या हक्कांची पायमल्ली करणारें सरकारी खात्याचे फाजील स्तोम. सत्तेच्या अतिरिक्त केंद्रीकरणाबद्दलची अधिकाऱ्यांची कुरकुर वरील चारींपैकी फक्त दुसऱ्याच कारणासाठी आहे. राज्यकारभाराच्या निरनिराळ्या शाखांतील अंतर्गत व्यवस्थेचें माझें ज्ञान फार मर्यादित आहे, सबब राज्यकारभार अधिक काटकसरीनें चालविण्याच्या हेतूनें निरनिराळ्या अधिकाऱ्यांत अधिकारांची फेरवांटणी कशी करावी याबद्दलची निश्चित योजना मला सुचवितां येत नाही. वर ग्रथित केलेल्या चार तक्रारी व अधिकारविभागणीच्या प्रश्नाचा लोक ज्या दृष्टीनें विचार करतात ती विचाराची दिशा याचसंबंधानें मी विवेचन केलें आहे. पूर्वीच्या शिथिल व अव्यवस्थित पद्धतीचें अवलंबन केल्यानें अधिकारी व लोक यांमधील हल्लीचा दुजाभाव नाहीसा करण्याची अपेक्षा करणें वेडेपणाचें आहे. पूर्वी अधिकारी व लोक यांमध्यें अधिक सलोखा होता ही गोष्ट खरी आहे, परंतु त्या वेळच्या सलोख्याचें कारण त्या वेळीं प्रचलित असलेली शिथिल पद्धति हें नव्हे. ब्रिटिश राज्यकारभाराची घडी नीटशी बसलेली नव्हती, तेव्हां नव्या प्रांताचा कारभार लोकांशीं घासाघीस न होतां चोख चालवितां यावा ह्मणून लोकांच्या पुढाऱ्यांची मदत घेतल्यावांचून गत्यंतर नसे, व अधिकारी ती मदत मोठ्या आस्थेनें घेत असत. केवळ भलेपणा किंवा सहानुभूति यांमुळें नव्हे, तर लोकांच्या पुढाऱ्यांपासून पुष्कळ गोष्टी समजून घ्यावयास पाहिजे होत्या ह्मणून अधिकारी लोकांशीं मिळून मिसळून वागत व लोकांच्या मनोवृत्तीचें त्यांना ज्ञान असे. नव्या आकांक्षा त्या वेळीं उत्पन्न झाल्या नव्हत्या यामुळें लोक तेवढ्यावरच राजी असत. ती स्थिति आतां उरलेली नाहीं. निरनिराळ्या खात्यांची स्थापना व त्यांची क्रमाक्रमानें बसत चाललेली घडी; खात्यांचीं कामें आडफाटा न येतां चालावीं ह्मणून करण्यांत आलेले नियम; जुन्या लढ्यांचा निकाल; रेव्हिन्यु सर्व्हेची पूर्तता; लोकांच्या शस्त्रांचा अपहार; मोठमोठ्या वतनदारांदिकांसुद्धां सर्व जुन्या घराण्यांचें दिवसें दिवस कमी होत असलेलें वजन, अधिकाऱ्यांना मार्गदर्शक होण्यासारख्या व ज्यांत तात्काल माहिती मिळेल, अशा पुष्कळ वर्षांच्या अनुभवाच्या माहितीनें भरलेल्या पुस्तकांची रचना; सरकारच्या मुख्य ठाण्यांशीं दळणवळण ठेवण्याचीं साधनें व अन्य कांहीं कारणें यामुळें अधिकाऱ्यांना लोकांच्या मदतीची जरूर दिवसेंदिवस कमी वाटूं लागली आहे; व त्यांना लोकांच्या मनोवृत्तीची ओळखही होत नाहीशी झाली आहे. अतिरिक्त केंद्रीकरण हें फार झालें तर असंतोषाच्या अनेक कारणांपैकीं एक असेल, पण मला त्याची मातब्बरी फारच कमी वाटते. ब्रिटिश राज्याच्या अव्वल अमदानींत कांहीं अपरि-

हार्य कारणांमुळे अंमलदार व लोक यांच्यामध्यें जशा प्रकारच्या गोडीगुलाबीचा संबंध होता, तसा वाटेल तितकी अधिकारविभागणी केली तरी नुसत्या अधिकारविभागणीमुळें फिरून उत्पन्न होणे शक्य नाही; व हल्लीच्या अंमलदारांमध्यें पूर्वीच्या अंमलदारांइतकी सहानुभूति असली तरी त्यांचेकडून वाढत्या लोकमताला पूर्वीच्या अधिकाऱ्यांकडून मिळत होता तसा मान मिळेल अशी अपेक्षा करणें व्यर्थ आहे. अशा परिस्थितींत खालच्या अधिकाऱ्यांच्या हातांत अधिक सत्ता जाऊन स्थानिक जुलमाला अधिक प्रोत्साहन मिळेल अशा प्रकारच्या अधिकारविभागणीने शासनपद्धति लोकांस अधिक अधिकच अप्रिय होत जाईल.

सलोखा करण्याचा उपाय अव्वल अमदानीत ज्यावेळीं देशांत स्थिरस्थावर झालें नव्हतें, तेव्हां मुत्सद्देगिरीच्या दृष्टीने पूर्वीचे अंमलदार ज्या लोकांची सल्लामसलत घेत असत किंवा ज्यांच्या सल्ल्याप्रमाणे चालत त्यांचा सल्ला हल्लीच्या अधिकाऱ्यांना घेतलीच पाहिजे असा कायदेशीर निर्बंध घालणे हाच एक अंमलदार व लोक यांमधील सलोख्याचे पुनरुज्जीवन करण्याचा खराखुरा मार्ग आहे. हा मार्ग ह्मणजे एका अधिकाऱ्याच्या हातांतील अधिकार व सत्ता दुसऱ्याच्या हातीं जाणे नसून अधिकाऱ्यांच्या हातांतील सत्तेचे लोकांकडे संक्रमण व्हावयास पाहिजे व हे संक्रमण खरोखरी अंतःकरणपूर्वक झाले पाहिजे. लोकहिताच्या प्रश्नांचा निकाल अधिकारी आपली सल्ला घेऊन करतात, ही भावना लोकांच्या पुढाऱ्यांच्या मनांत उत्पन्न झाली पाहिजे. पूर्वीच्या अंमलदारांना लोकांची सल्ला घेणे भाग पडे म्हणून ते घेत असत. लोक व अधिकारी यांमध्यें पूर्वीसारखी गोडी उत्पन्न व्हावी अशी इच्छा असेल, तर लोकांना स्वराज्याचे हक्क देऊन अधिकाऱ्यांना लोकांची सल्ला घेण्याची आवश्यकता कायद्यांनीं उत्पन्न केली पाहिजे. अशी व्यवस्था झाली ह्मणजे लोकांच्या मताला व इच्छेला राज्यव्यवस्थेंत योग्य मान मिळत जाईल.

ही गोष्ट एकदम किंवा सपाट्यासरशी करतां येईल, असा माझ्या ह्मणण्याचा आशय नाही. हल्लीच्या राज्यांतील खात्यांच्या फाजील बडेजावीमुळें ज्यांची स्वतंत्रता पार नष्ट झाली आहे, त्या खेड्यांच्या ग्रामपद्धतीचें पुनरुज्जीवन प्रथम हातीं घ्यावयास पाहिजे. गांव हा स्वराज्याचा एक घटक समजला जावा व ग्रामसंस्था किंवा ग्राममंडळे यांजवर शिक्षण, न्यायमनसुबा, जंगल, अबकारी, दुर्भिक्षदुःखनिरसन, पोलीस, औषधोपचार व आरोग्यरक्षण या संबंधाच्या सर्व किंवा बहुतेक प्रश्नांची व्यवस्था लावण्याचे निश्चित अधिकार सोपविले पाहिजेत. स्वराज्याचीं घटक जीं खेडी त्यांजवर तालुका व लोकबोर्डांची देखरेख असावी व तालुका आणि लोकबोर्डे पूर्णपणें लोकमतनिदर्शक व स्वतंत्र असावीं. अशी व्यवस्था करावयाची म्हणजे प्रांताच्या जमाखर्चावर लोकांचा कांही अंशीं ताबा असला पाहिजे. प्रांतिक सरकारांस आपल्या जमाखर्चावर अधिक ताबा मिळावा म्हणूनच केवळ नव्हे, परंतु

खात्यांची वाढच वाढलेला वसूल गट्ट करून बसते. भाषासादृश्य व वंशसादृश्य या दोहोंच्या पायावर प्रांतांची पुनर्घटना व्हावी व मध्यवर्ती सत्तेखाली त्यांचें एक संघटित मंडळ व्हावें अशीही एक सूचना करणें मला योग्य वाटतें.

अधिकार व सत्ता यांच्या केंद्राचें एका अधिकाऱ्याकडून दुसऱ्या अधिकाऱ्याकडे संक्रमण झाल्यानें पूर्वीप्रमाणें लोक व अधिकारी यांमध्यें प्रेमभाव उत्पन्न होईल असें मला वाटत नाहीं. इंग्रजी शिक्षणानें लोकांमध्यें नव्या आकांक्षा व नव्या कल्पना उत्पन्न झाल्या आहेत. जोंपर्यंत या राष्ट्रीय आकांक्षांचें समाधान होणार नाहीं, तोंपर्यंत अधिकारी–मंडळांत अधिकारांची वांटणी केल्यानें दुसरा काय परिणाम होईल तो होवो; परंतु लोक व अधिकारी यांचेमधील तेढ नाहींशी होईल ही अपेक्षा करणें व्यर्थ आहे. लोकांची जी तक्रार आहे ती दूर किंवा कमी करण्याचा देखील अधिकाऱ्यांतील अधिकारांची वांटणी हा उपाय नाहीं व तो लोक किंवा त्यांचे पुढारी यांनीं कधीं सुचविलेला नाही. अधिकारविभागणीच्या तरल तरंगानें अधिकारी मंडळांतील व्यक्तींत कमीअधिक चैतन्य उत्पन्न होण्याचा संभव आहे; पण त्यामुळें राज्यकर्ते व प्रजा यांमधील वाढती फूट बुजणार नाहीं. हिंदुस्थान राज्यकर्त्या राष्ट्रांच्या बरोबरीचें करण्यासाठीं सदैव वृद्धिंगत होणाऱ्या उदारपणानें व सहानुभूतीने स्वतःचा राज्यकारभार चालविण्याचे लोकांस पुरेसे हक्क दिल्याशिवाय अधिकारी व लोक यांमध्यें सलोखा उत्पन्न होणार नाहीं ”

–टिळकांवरील खटल्याचें पुस्तक, ( शारदा प्रेस ).

## राजकीय बाबतींतील आचरण.

आतां टिळक यांच्या राजकीय बाबतींतील आचरणासंबंधानें दोन शब्द लिहून हें प्रकरण आटोपतों. टिळक यांचीं राजकीय मतें ज्या प्रकारचीं आहेत त्यांस अनुसरूनच त्यांची वागणूक आहे. सरकारच्या राज्यपद्धतीचे जे मार्ग त्यांना पसंत नाहींत व ज्याविरुद्ध ते नेहमीं लेख लिहीत असत त्यासंबंधानें स्वतःची वागणूक ठेवण्याचा प्रसंग आल्यास ते बोलण्याप्रमाणेंच चालत; एवढेंच नव्हे तर, बोलण्यापेक्षां कृतींत त्यांचा जास्त तिखटपणा दिसून येई; व या तिखटपणामुळेंच अथवा करारी स्वभावानेंच आजपर्यंत कैक संकटें त्यांजवर ओढविलीं आहेत. प्लेगसंबंधाची जुलमी व्यवस्था, सारावसुलीची सक्ती, हिंदुमुसलमानांचे दंगे, गणेशोत्सव, शिवाजीउत्सव, स्वदेशी चळवळ, इत्यादि प्रसंगीं सरकार व लोकपक्ष यांच्या मतांची झुंज लागली असतां व त्यांत पुढारी या नात्यानें

लोकमताप्रमाणें वागण्याचा प्रसंग आला असतां कित्येक वेळां निर्भयपणें व निक्षून सरकारास जाब दिला असून त्याप्रमाणेंच त्यांनीं वर्तन ठेविलें आहे; व त्याबद्दल सरकारच्या रोषाचीही त्यांनीं पर्वा केली नाहीं, हें त्यांच्यावरील दोन्ही वेळच्या राजद्रोहाच्या खटल्यावरून सहजी व्यक्त होणार आहे. उलटपक्षीं लोकमत जागृत करण्याकरतां वर्तमानपत्रद्वारेंच नव्हे तर संभाषण, वादविवाद, भेटी, सल्लामसलत, सभा, इत्यादिकांच्या द्वारें कोणाची भीड न ठेवतां आपल्यांस वाटतो त्याच मार्गाचें त्यांनीं अवलंबन केलें आहे, हें प्रांतिक सभा, राष्ट्रीय सभा, स्वदेशी चळवळ किंवा इतर राजकीय चळवळी यांत त्यांनीं बजावलेल्या कार्यावरून कोणाच्याही ध्यानांत येईल. यासंबंधानें विशेष विवरण पुढील भागांत स्वतंत्र रीतीनें करण्याचें योजिलें आहे. तथापि, एवढें येथें सांगणें जरूर आहे कीं, हिंदुस्थानासारख्या सर्वस्वी परावलंबी देशांतील हल्लींच्या राज्यपद्धतीचा विचार करतां त्यांनीं ठेवलेले निर्भय व करारीपणाचें वर्तनच योग्य असून त्यानेंच हल्लींच्या स्थितींत आपल्या प्रगतीचा मार्ग कोणता आहे याचें ज्ञान लोकांस झालें आहे. या ज्ञानाचा लोक योग्य उपयोग करून घेऊन राष्ट्रहित साधोत एवढीच परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

# लो० टिळक यांचीं गेलीं आठ वर्षें.

[ 'लेखका 'चें निरीक्षण ]

———:०O०:———

## भाग ३ रा.

### टिळकांचें वक्तृत्व.

टिळक हे उत्तम वक्ते आहेत काय? असा जर कोणी प्रश्न केला तर त्याला "नाहींत" असेंच उत्तर दिलें पाहिजे. न आडखळतां जलद भाषण करणें, उपमाअलंकारांनीं भाषा खुलविणें, प्रेक्षकांचे मनोविकार जागृत होतील असे आविर्भाव करणें, इत्यादि जे गुण वक्त्याचे अंगीं असावे लागतात ते जरी यांचें अंगीं नाहींत तरी प्रगल्भ विचार, वादविवाद करण्याची खुबी, समयसूचकता, विनोद, कोटिक्रम, हे जे कांहीं गुण वक्त्याचे ठिकाणीं पाहिजेत ते यांच्या अंगीं असल्यामुळें पुष्कळ वेळां यांच्या भाषणाचे समाजावर वजन पडून अनेक कार्यें झालीं आहेत.* तसेंच मुद्दा न सोडतां व अधिक न बोलतां जितकें पाहिजे तितकेंच बोलण्याकडे यांची प्रवृत्ती असते† व हे केव्हांही बोलावयास उठले कीं, यांच्या भाषणांत कांहीं तरी नवा मुद्दा व नवी माहिती आपणांस मिळाल्यावांचून राहणार नाहीं असें वाटून श्रोते मोठ्या उत्कंठेनें यांच्या भाषणाकडे लक्ष देतात. तसेंच कित्येक विचारांनीं स्वतःचे अंतःकरण खळबळत असल्यामुळें ती खळबळ लोकांच्या अंतःकरणांत नेऊन

---

* भाषणाकडे समाजाचें लक्ष वेधण्यास वक्त्याचे अंगीं कोणते गुण असले पाहिजेत हें सांगतांना लॉके ह्मणतोः—

"The man who speaks with culture and ability will always command willing listeners."

† रॉची फोकल्ड यानें वक्तृत्वाची व्याख्या अशीच केली आहे. तो ह्मणतोः—

"True eloquence consists in saying that is proper and nothing more."

भिडाविण्याचें सामर्थ्य यांचे अंगीं असल्यामुळें प्रेक्षकांची सहज एकाग्रता त्यांना करतां येते‡ सन १९०७ सालच्या जानेवारी महिन्यांत कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेहून परत येतांना टिळक हे जेव्हां अलाहाबाद येथें गेले त्या वेळीं त्यांचीं तेथें कांहीं व्याख्यानें इंग्रजींत झालीं. या व्याख्यानांस उद्देशून लिहितांना त्यांच्या वक्तृत्वासंबंधानें तेथील "सिटीझन" व "इंडियन पीपल" नांवाच्या पत्रांनीं वरील प्रमाणेंच उद्गार काढले आहेत.

"सिटीझन" पत्र ह्मणतें:—

"Mr. Tilak is not an orator. He never indulges in flashy rhetoric. His words move from him in keeping with his Physiognomy—plain and blunt. But his earnestness, the almost Biblical simplicity of his diction, and the matter-of-fact style of his argument weave a magic web in the minds of his audience."

"इंडियन पीपल" पत्र ह्मणतें:—

"As a speaker, Mr. Tilak has nothing of the demagogue or the impassioned platform orator about him. There are no high-sounding phrases, no flights of rhetoric. His manner is subdued and free from gesticulation. The sentences are terse; the language is simple and direct. What he spoke was perfectly suited to the comprehension of his audience. He appealed, as he himself said, to their intelligence and not to their sentiment. The real power lay in the matter of his speech and not in the manner. There was no generalisation, no enuuciation of abstract principles in a flowery language. Every statement was clear and every point was driven home with a readiness of illustration and power of antithesis, that showed the power of the speaker and the subtelty of his intellect. Every issue was put plainly and uncompromisingly. But there was no violence of language or denunciation, not a trace of passion either in word or gesture. After hearing him it was not difficult to understand that he is the most powerful and the most influential leader of the new or extremist party, a party which is by no means confined to Bengal."

‡ गोल्डस्मिथ ह्मणतो:—

"A man may be called eloquent, who transfers the passion or sentiment with which he is moved himself into the breast of another."

लिहिण्याप्रमाणेंच यांच्या भाषणांत मार्दव कमी असते; तथापि, सुसंस्कृत कोट्या व खुबीदार विनोद करून केव्हां केव्हां श्रोत्यांच्या मनोवृत्ति हे अगदीं उचंबळून सोडतात. लिहिण्यांतील किंवा संभाषणांतील या खुबीचीं उदाहरणें मागें दिलींच आहेत. सभाप्रसंगाच्या भाषणांतील कांहीं उदाहरणें येथें देतों ह्मणजे झालें.

ताईमहाराजांसंबंधाच्या फौजदारी खटल्यांतून हे मोकळे झाल्यावर पुढें एक दोन दिवसांनीं १९०४ चे मार्च माहन्यांत पुण्यांतील "सद्वर्तन-प्रवर्तक-मंडळी"नें यांचें अभिनंदन केलें त्यावेळीं ते ह्मणाले:-"सरकारनें या खटल्याकडे ६० हजार रुपये खर्च केले; पण वास्तविकपणें त्यापासून तुह्मांला किंवा मला कांहीं तरी फायदा झाला काय? नाहीं ह्मणावयास माझा जो विनाकारण छळ होत होता तो वाचला! साठ हजार रुपयांचा अपव्यय ह्मणजे कांहीं लहानसान अपव्यय नव्हे. आम्ही जसे बाबा महाराजांच्या इस्टेटीचे ट्रस्टी होतों व तो ट्रस्ट चांगल्या रीतीनें बजावला नाहीं असें ह्मणून जर सरकारानें खटला केला तर हा जो सरकाराने रयतेच्या ६० हजार रुपयांचा ट्रस्ट घेतला होता त्याचा त्यांनीं किती चांगल्या रीतीनें उपयोग केला?"

अशाच प्रकारच्या अभिनदनाचा योग शनिवारांतील नेने यांच्या घांटाजवळील मंडपांत तेर्थाल मंडळींनी आणला होता. त्या वेळीं 'खटल्याचे प्रसंगीं आपण फार धैर्य दाखविलें व लोकोत्तर कामगिरी बजावली' अशी जमलेल्या लोकांनीं आपली केलेली स्तुति निष्कारण आहे असें सांगून ते ह्मणाले:--"खटल्यांत मजवर जे आरोप करण्यांत आले होते त्यांतून मुक्त होण्यास हायकोर्ट तरी होतें; पण आतां जे तुह्मी आरोप केले आहेत त्यांतून मुक्त होण्यास मात्र दुसरें हायकोर्ट नाहीं!"

सन १९०६ सालीं पुण्यास भरलेल्या ग्रंथकाराच्या द्वितीय संमेलनांत 'वर्तमानपत्रांनीं भाषाभिवृद्धीस कितपत साहाय केलें आहे?' या विषयावर भाषण करतांना त्यांनीं अशी प्रस्तावना केली कीं, "राजकीय विषयाशीं संबंध न आणतां हद्दींत राहूनच भाषण करावें अशी अध्यक्षांनीं (रा. सा. कानिटकर हे या संमेलनाचे अध्यक्ष होते) सूचना केली आहे; व मीही ती होईल तितकी पाळीन. पण अशी सूचना करणें-निदान या विषयासंबंधानें करणें-ह्मणजे एकाद्या आचाऱ्याला अमटींत मीठ न

घालतां नुसता गूळ घालूनच चांगली आमटी कर असे सांगण्या-सारखें आहे ! "

मराठींत जसें यांचें भाषण भारदस्त असतें तसेंच इंग्रजींतही असतें हें प्रांतिकसभा, राष्ट्रीय सभा, किंवा कलकत्ता, मद्रास, पंजाब या प्रांतांत गेल्या वेळीं तेथें भरलेल्या सभा यांतील त्यांचीं भाषणें ज्यांनीं ऐकिलीं असतील किंवा वाचलीं असतील त्यांना सहजी कळून येईल. तसेंच मराठीप्रमाणें इंग्रजींतही यांचा कोठें कोठें विनोद आणि कोटिक्रम असतो. त्यांचीं एक दोन उदाहरणें येथें देतों.

सन १९०६ सालीं शिवाजी-उत्सवाचे वेळीं 'बंगालची फाळणी व स्वदेशी चळवळ' या विषयांची वाटाघाट करण्याकरितां कलकत्त्यास मि. ए. चौधरीं यांच्या अध्यक्षतेखालीं जी सभा भरली होती त्यांत भाषण करतांना टिळक यांनीं जो विनोद व कोटिक्रम केला तो 'मद्रास स्टँडर्ड' पत्रामध्यें त्या भाषणाचा तारेने त्याच वेळीं जो पुढील गोषवारा दिला आहे त्यावरून कळून येईल:--

"Mr. Tilak who began by saying that when he came to the meeting he had no intention to speak, but he obeyed the mandate from the chair; disobedience of which would place him on a level with Sir B. Fuller who has disobeyed Mr. Morley's mandate. Mr. Morley says, he sympathises with us, but in the difficult position in which Mr. Morley a liberal statesman found himself at the head of a despotic bureaucracy he (speaker) sympathised with Mr. Morley (Laughter) Mr. Morley's sympathy sounded like a message of condolence, but the Bengalees would send him condolences it he was not prepared to undo the partition. We are blackmen but not block-heads and they could see through such arguments as that of accomplished facts &c."

सन १९०४ सालच्या राष्ट्रीय सभेंत विलायतेला डेप्युटेशन पाठविण्याच्या ठरावावर त्यांनीं जें भाषण केलें त्यांतही पुढीलप्रमाणें त्यांनीं विनोद व कोटिक्रम योजिला आहे:--

"I think this is one of the most important resolutions on our programme today, and for this reason, you know very recently the function of the Congress has been to focus the rays of public opinion annually. We accept that definition; but I do not think

that by merely accepting the definition we would do our duty in that behalf ( hear hear ) in behalf of focussing the public opinion. That pharse of focussing public opinion is taken, so far as I know, from the science of Heat and Light and in the domain of science, we do not focus the rays of heat and light to burn our own hands ( Hear, hear). We focus them for a purpose, and we have to see what that purpose is in the present case. We focus the rays of public opinion in India annually and go away; that has been the charge against us. I say that we focus the rays of public opinion for a purpose and not merely to bottle them up ( hear, hear and laughter ), and that purpose is to direct this focus of rays to illumine the hearts of the bureaucracy that rule in India, to throw a flood of search—light in their hearts and to make patent to the world the bodies that lurk there ( Hear, hear )........As Sir William Wedderburn said in the Subjects' Committee, yesterday, we prepare our brief here, but that brief has to be carried over to England. It is there that the judges sit ( cheers ), and our advocates must plead our case before the English judges and not before the judges in India ( hear, hear ). The Government of India is impervious to our cries. It can only be pierced from within ( Laughter ) and we must try to have sometime or other control over and influence with the machinery which will succeed in piercing through the Government of India and making an opening in it on our side ( laughter ). That is the work that we have before us. We have tried the experiment that is suggested in this resolution twice before, and this is the third time that we are sending our delegates to England, (hear, hear), and I trust that this experiment will result in the establishment of a permanent political Mission in England (cheers). That is what our object ought to be. I know that our distinguished leaders whom I need not mention, will go to England on this occasion, (hear, hear) even for a mouth or two, but then their expedition must be followed by another force ( laughter )...... Indian Empire is a dead body and a foreign body; if that foreign body is not assimilated with the British Empire, we shall have to perform a surgical operation and take out that foreign body from the living Empire (hear, hear and laughter). I hope such a time will not come. We want that body to be assimitated into a political body of the British Empire. We should have the same rights and the same privileges

as the other members of the British Empire have ( hear, hear, ). India should not be allowed to remain a dead-weight and a foreign body; it would trouble the body-politic if it is not assimilated with the system."—*Congrss Report.*

वक्त्यांच्या अंगीं सहृदयता, ह्मणजे जो विषय प्रतिपादन करावयाचा त्याबद्दल खरा कळवळा अथवा कळकळ हाही गुण असावयास पाहिजे; व तो टिळक यांच्या ठिकाणीं आहे. "जाळाशिवाय कढ नाहीं आणि मायेशिवाय रड नाहीं" ही ह्मण यांच्या कित्येक लेखांस जशी लागू पडते तशीच यांच्या भाषणासही लागू पडते. यासंबंधीं जें एक चांगलें उदाहरण माझे लक्षांत आहे तें मी येथें नमूद करतों. ता. १।९।०३ रोजीं पुण्यांत रविवार पेठेंतील फडक्याच्या वाडयांतील गणपतीपुढें ह. प. भिंगारकरबुवा यांचें "वैष्णव पंथाची प्रगती" या विषयावर व्याख्यान होतें. त्या वेळीं टिळक हे अध्यक्ष होते. व्याख्यान झाल्यावर अध्यक्ष या नात्यानें ते भाषण करण्यास उभे राहिले. तेव्हां नुकत्याच घडलेल्या प्रो० जिनसीवाले यांच्या मृत्यूचा उल्लेख करून धार्मिक विषयाचें अध्ययन केलेला एक सत्पुरुष आपल्यामधून नाहींसा झाला, व अशा धार्मिक विषयावरील व्याख्यानास प्रो० जिनसीवाले हे अध्यक्ष होण्यास किती पात्र होते हें त्यांनीं सांगितलें. या वेळीं प्रो० जिनसीवाले यांची मूर्ति ध्यानांत येऊन त्यांचे डोळे पाण्यानें भरले व त्यांच्याच्यानें कांहीं वेळ बोलवलें नाहीं. या वेळपर्यंत यांच्यावर कठिण अशीं किती तरी संकटें आलीं, बाबामहाराजांच्या इस्टेटीच्या खटल्याचा चरक वर्ष-दीड वर्ष चालून अखेर क्लेमंट्स साहेबांनीं शिक्षा दिली, फार काय, प्रत्यक्ष त्यांचे वडील चिरंजीव रा. रा. विश्वनाथपंत हे वारले त्या वेळींही धैर्यानें त्यांनीं आपलें दुःख बाहेर पडूं दिलें नाहीं. परंतु या वेळीं त्यांनीं आपल्या डोळ्यांतून पाणी काढलें यावरून प्रो० जिनसीवाले यांच्याबद्दल व देशाबद्दल त्यांना किती कळकळ आहे हें सहज व्यक्त होतें. तसेंच "टिळक हे पाषाणहृदयाचे आहेत' असे कोणी कोणी त्यांच्या कडक लेखांवरून व भाषणावरून म्हणत असतात. पण या म्हणण्यांत अर्थ नाहीं. सामान्य लोक जेथें गांगरून जातात तेथें हे धैर्य दाखवितात त्यामुळें तसें त्यांना वाटतें. बाकी यांचें अंतःकरण कोंवळें आहे ही गोष्ट निर्विवाद आहे, व यासंबंधीं दुसरें प्रत्यंतर त्यांच्या पुढील शब्दांवरूनच व्यक्त होईल. न्या. रानडे

वारल्याची बातमी ज्या दिवशीं कळली त्या दिवशीं गोष्टी निघाल्या असतां ते म्हणाले:—“ याहीपेक्षां आगरकरांच्या मृत्यूच्या वेळीं मला फार वाईट वाटलें. सहवासाचा हा परिणाम आहे. त्या वेळीं दोन दिवस माझ्या डोळ्यांतून पाणी येत होतें; व मला कांहीं सुचत नव्हतें. ”

## टिळक यांच्या विचारांची परिणतता आणि उत्क्रांति.

मनुष्याचा विचार, उच्चार व आचार यांत एक प्रकारची सांखळी असून विचार जितके उच्च तितक्याच जोराचा त्यांचा उच्चार असला पाहिजे व जितक्या जोराचा उच्चार तितकीच आचारांतही बळकटी असली पाहिजे. थोर मनुष्यांत व सामान्य मनुष्यांत एवढेंच अंतर असतें कीं, थोर मनुष्य पूर्ण विचार करतो व त्याचाच प्रत्यय तो उच्चार व आचार यांत आणून देतो. आणि सामान्य मनुष्याचे विचार कोते असतात; अर्थात् त्याचप्रमाणें उच्चार व आचार यांतही त्याचा कोतेपणाच दिसून येतो. मागें टिळक यांचीं सामाजिक, धार्मिक व राजकीय विषयांवरील जीं मतें दिलीं आहेत त्यांवरून या तिन्ही विषयासंबंधीं त्यांचे विचार किती परिणत आहेत हें वाचकांस कळून येईल. देशोन्नतीच्या कामीं एकराष्ट्रीयत्वाची कल्पना लोकांच्या मनांत बिंबल्यावर जातिभेद, विविधधर्म किंवा भाषावैचित्र्य हीं आड येत नाहींत; व हिंदुस्थानांत आज कैकवर्षे अनेक जाति, अनेक धर्म व अनेक भाषा अस्तित्वांत असूनही सर्व जाती सलोख्यानें वागून त्यांनीं राष्ट्रोन्नति केल्याची साक्ष आमचा प्राचीन इतिहास देत आहे. अशी स्थिति असल्यामुळें सद्य:स्थितींत सर्व जाती, धर्म व भाषा हीं मोडल्याशिवाय एकराष्ट्रीयत्व आपणास येणार नाहीं अशा विचारांनीं प्रेरित होऊन जे लोक प्रयत्न करीत असतात त्यांचे प्रयत्न हजारों ओहोळ किंवा लहान लहान नद्या बुजवून महानदीचा प्रचंड ओघ एकदम उत्पन्न करण्याच्या प्रयत्ना इतकेच अप्रयोजक आहेत असें जें टिळक यांचें मत आहे त्याची सत्यता त्यांच्या मागील विचार-सरणीवरून कोणाच्याही ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. तसेंच रोटीबेटी—व्यवहारानें काय दुष्परिणाम उत्पन्न होतात, जाती कशा उत्पन्न झाल्या व त्यांची कोणत्या कारणाकरतां आवश्यकता आहे, जातीजातींतील चालीरितींची कोणी व कशी सुधारणा केली पाहिजे, सामाजिक सुधारणेचा धर्माशीं संबंध असल्यामुळें धर्मगुरु व धार्मिक संस्था यांचा उच्छेद

न करतां त्यांचा कसा उपयोग करून घेतला पाहिजे, याविषयीं त्यांनीं जे विचार प्रगट केले आहेत तेही किती महत्वाचे आहेत याची त्यांना खात्री पटेल. आतां सर्व देशांची सर्व काळीं कांहीं सारखी स्थिति नसते; व बदललेल्या कालांत बदललेल्या परिस्थितीप्रमाणें समाजरचनेंतही फेरफार होणें इष्ट आहे; व असा फेरफार स्त्रीशिक्षण, विवाहपद्धति, पोटजातींतील अंतर्विवाह, परदेशगमन वगैरे गोष्टींत झाला पाहिजे. पण हा फेरफार करतांना फेरफार करणारांनीं आपल्या देशाची रचना कोणत्या प्रकारची आहे, लोकांची मनोरचना व मनोधर्म कसे आहेत, व आपली पूर्वपरंपरा काय आहे हें जाणून निवळ दुसऱ्यांचें अनुकरण न करतां आपणास काय पचेल व कसें पचेल याचा विचार करून योग्य तीच सुधारणा समाजांत प्रचलित केली पाहिजे तरच राष्ट्रीय ऐक्य उत्पन्न होऊन राष्ट्राची प्रगति होते असें टिळक यांचें सामाजिक सुधारणेसंबंधाचें तत्व असून तें कोणास अमान्य होईल असें मला वाटत नाहीं.

सामाजिक सुधारणेसंबंधांचे हे त्यांचे विचार जसे प्रगल्भ आहेत तसेच त्यांचे धार्मिक विचारही अत्यंत प्रगल्भ आहेत; एवढेंच नव्हे तर, त्यांच्या धार्मिक विचारांची महती फारच मोठी आहे, असें ह्मटलें पाहिजे. इंग्रजी राज्य होऊन इंग्रजी शिक्षण जेव्हां इकडे सुरू झालें तेव्हां धर्मासंबंधानें आमच्या पुढाऱ्यांच्या विचारांतही एकप्रकारचा विलक्षण फरक पडून आमचा धर्म कुचकामाचा आहे; देशांत अनेक धर्म असल्यामुळें आमच्या राष्ट्राची हानी होत आहे; मूर्तिपूजा हें एक घातक बंड आहे; स्नानसंध्या, वर्णाश्रमधर्म, विधि किंवा संस्कार हें थोतांड असून तें अनीतिमूलक आहे; वेदांत किंवा तत्वज्ञान ही एक फसवणूक असून ती अनर्थमूलक आहे व त्यानें प्रवृत्तीमार्गापासून आह्मांस निवृत्त केलें असून आमचा समाज त्यामुळें अगदीं शिथिल झाला आहे, इत्यादि जे विचार त्यांचे बनले होते व हल्लींही या विचारांचीं जीं माणसें आहेत त्यांचे हे विचार किती कोते व अप्रयोजक होते किंवा आहेत याची खात्री त्यांचे मागें दिलेल्या धार्मिक विचारांवरून कोणासही पटणार आहे. आमचा धर्म सनातन कां आहे, त्यांतील तत्वें इतर धर्मापेक्षां कां श्रेष्ठ आहेत, वर्णाश्रमधर्म किंवा संस्कार कशाकरतां केले आहेत, वेदांताचें रहस्य काय आहे, सामाजिक किंवा राजकीय उन्नतीचें मूळ धर्मांत कसा रीतीनें वास करीत आहे,

इत्यादि विषयांचें विवरण त्यांनीं सप्रमाण अशा कांहीं रीतीनें सिद्ध केलें आहे कीं, आमच्या धर्माविरुद्ध आक्षेप घेणारा कोणीही असो, त्यानें त्यांच्या धार्मिक मतांचें मनन केल्यास आमच्या धर्माच्या महतीबद्दल त्याची खात्री झाल्यावांचून कधींही राहणार नाहीं. सामाजिक सुधारणेप्रमाणें धार्मिक सुधारणेसही देशकालपरिस्थितीप्रमाणें चलन मिळालें पाहिजे असें यांना वाटतें; पण आपली पूर्वपरंपरा न टाकतां व देशाचें वैशिष्टय कायम राखूनच तें केलें पाहिजे; व निरनिराळ्या धर्मांतील लोकांचें ऐक्य होऊन जेणेंकरून राष्ट्रीयत्वाची वाढ होईल अशाच बस्तानानें तें केलें पाहिजे; आणि आपल्या धर्मावर ख्रिस्ती मिशनऱ्यांचा व पाश्चात्य आधिभौतिक शास्त्रांचा असे जे दोन घाले हल्लीं पडत आहेत त्यांतून त्याची वाढ काढून देऊन त्याचें सनातनत्व स्थापित करणें, नीतीच्या दृष्टीनें आमच्या धर्माची श्रेष्ठता किती आहे हें दाखविणें, व आमच्याच धर्मांतील तत्वें घेऊन ज्यांनीं निरनिराळ्या संस्था किंवा समाज स्थापन केले आहेत व मूळ धर्माला एका बाजूस ठेऊन आपल्याच संस्थेची किंवा समाजाचीं तत्वें जास्त खरीं आहेत, किंबहुना आपला एक निराळाच धर्म असून तो सर्व धर्मांहून श्रेष्ठ आहे, असा भास उत्पन्न करणारांचे प्रयत्न कोणत्या योग्यतेचे आहेत याचा सर्व जगास प्रत्यय आणून देणें हीं कामें आमच्यांतील सुशिक्षित लोकांचीं आहेत, असें त्यांनीं स्पष्टपणें नमूद करून ठेविलें आहे. असो; टिळक यांचीं सामाजिक व धार्मिक विषयासंबंधाचीं मतें अशा प्रकारें परिणत अवस्थेस पोंचलीं असून हळू हळू त्यांची उत्क्रांतिही इष्ट दिशेनें होत आहे, असें त्यांच्या विचारांच्या परिशीलनावरून कोणाच्याही नजरेस आल्यावांचून राहणार नाहीं, टिळक यांच्या या मतांस प्रगल्भावस्था येऊन आज बरेच दिवस झाले आहेत; व आज पंधरा वीस वर्षांत त्यांच्या मतांत फारसा फरकही पडलेला नाहीं. तथापि, प्रचलित मत अमुक एक प्रकारचें आहे, त्यावर आपण टेकलों असत्तां सुरक्षित मार्ग आहे अशा विचारांनीं त्यांनीं केवळ 'लोकरंजना'-करतां तीं बनविलीं नसून पूर्ण विचारांतीं, पाश्चात्यांचे ग्रंथ वाचून, तिकडील समाजस्थितीचें परिशीलन करून व सर्वांत महत्वाची गोष्ट ही कीं, अंतःकरणाची खात्री होऊन बनविलीं आहेत. तसेंच त्यांच्या मतांची आज हळू हळू जी उत्क्रांती होत आहे तीही पूर्वीची विचारसरणी

न सुटतां होत असून अलीकडील आधिभौतिक शास्त्रांच्या कसोटीसही ती पूर्णपणें उतरत आहे. ह्मणजे या उत्क्रांतीचें स्वरूप असें आहे कीं, आमच्या समाजशास्त्रांतील किंवा धर्मांतील गूढ तत्वांची उपपत्ति नव्या पद्धतीनें जी लोकांपुढें ठेवावयास पाहिजे आहे ती त्यांना ठेवतां येऊं लागली असून आमच्या धर्माचें रहस्य परधर्मीयांच्या मनांतही त्यांना चांगलें बिंबवितां येऊं लागले आहे, हें धर्माची स्थापना कोणत्या तत्वावर झाली आहे, वेदांताची व्याप्ति किती आहे व त्याचा प्रवृत्तीकडे आणि निवृत्तीकडे कसा उपयोग होतो, धर्म व शास्त्र यांत काय संबंध आहे, आत्म्याचें अमरत्व कसें सिद्ध होतें, जाती मोडल्यानें किंवा निरनिराळ्या जातींत परस्पर विवाह सुरू झाल्यानें काय परिणाम होतील, वगैरे गोष्टींसंबंधानें त्यांनीं जें विवेचन केलें आहे त्यावरून वाचकांच्या प्रत्ययास येईल.

सामाजिक व धार्मिक विचारांप्रमाणेंच टिळक यांचें राजकीय विचारही अत्यंत उच्च प्रतीचे आहेत. सामाजिक, धार्मिक व राजकीय बाबतींत परस्पर संबंध आहे व सुधारणा सर्व बाजूनें झाली पाहिजे असें जरी त्यांना वाटतें तरी सद्यःस्थितींत हिंदुस्थानांतील भिन्न भिन्न जातीच्या व भिन्न भिन्न धर्माच्या लोकांत लवकर एकी होऊन राष्ट्रीय प्रगति जर कशानें होईल तर ती राजकीय सुधारणेनेंच होईल असें त्यांचें ठाम मत झालें असल्यामुळें इतर सुधारणांपेक्षां राजकीय सुधारणेकडे त्यांच्या मनाची ओढ फार आहे; व ह्मणून वीस पंचवीस वर्षांपूर्वींपासूनच या सुधारणेच्या बाबतींत त्यांचे एकसारखे प्रयत्न चालू आहेत. इंग्रजी राज्यव्यवस्थेला हिंदुस्थान अगदीं अपरिचित असल्यामुळें प्रथमतः राजकीय सुधारणेचें सुकाणू कोणत्या बाजूस वळवावें हें पुढारी ह्मणविणारांच्याही नीट लक्षांत आलें नसल्यामुळें; किंबहुना राजकीय सुधारणा ह्मणजे काय याचीही बरोबर कल्पना नसल्यामुळें इंग्रजी शिक्षणानें स्वाभाविकपणें उद्भवलेल्या कांहीं महत्वाकांक्षा तृप्त व्हाव्या ह्मणून सरकारापाशीं वजन असलेल्या गृहस्थांच्या मार्फत लोकांकडून खटपट होऊं लागली; व राजकीय व्यवस्थेची घडी जोंपर्यंत बसली नव्हती तोंपर्यंत सरकारही एकादा दुसरा भाकरीचा तुकडा टाकून लोकांचीं तोंडें बंद करीत असे. पण एकीकडे राज्यव्यवस्थेची घडी जेव्हां अधिकाधिक चोपून बसूं लागली व दुसरीकडे लोकांच्या महत्वाकांक्षा वाढून त्या तृप्त

व्हाव्या ह्मणून ते प्रयत्न करूं लागले तेव्हां लोकपक्ष व सरकारपक्ष अशा दोन बाजू स्पष्टपणें पुढें उभ्या राहिल्या व त्यांची हरएक बाबतींत चकमक सुरू झाली; व अलीकडे अलीकडे तर स्थानिक सभा, प्रांतिक सभा, राष्ट्रीय सभा वगैरे संस्थांच्याद्वारें लोकमतांत जसजशी वळकटी येत चालली तसतसा राज्यव्यवस्थेचा चरकही अधिक बळकट होऊन राज्यव्यवस्थेच्या अनिष्ट धोरणाबद्दल लोकांकडून कायदेशीर रीतीनें जितका अडथळा होऊं लागला तितकें सरकार लोकांना जास्त खालीं दडपूं लागलें. पण रबर जितका जास्त खालीं दाबावा तितका तो जास्त जोरानें वर उडतो किंवा सुरुंग जितका जास्त जोरानें ठासावा तितका भडका जास्त होतो तद्वत् लोकमत व सरकारी राज्यव्यवस्थेचें धोरण यांची स्थिति झाली असून आपला जोर कोणत्या रीतीनें अधिक होईल याचा जो तो आपापल्या परीनें विचार करीत आहे. टिळक यांच्या मागें दिलेल्या विचारसरणीवरून परावलंबनापेक्षां स्वावलंबनावर त्यांची भिस्त जास्त आहे हें कोणाच्याही नजरेस आल्यावांचून राहणार नाहीं. सरकारास अर्ज करूं नयेत, सभा भरवूं नयेत, ठराव पास करूं नयेत, डेप्युटेशनें पाठवूं नयेत, असें कांहीं त्यांचें ह्मणणें नाहीं. पण अर्ज किंवा विनंति याची दाद लागण्यास स्वतः लोकांत जोर असला पाहिजे असें ते ह्मणतात. शेतकी, उद्योगधंदे, शिक्षण, राजव्यवस्था, इत्यादि बाबतींत त्यांनींही केसरीपत्रद्वारें सरकारास अनेक वेळां सूचना व विनंति केली आहे. पण ही विनंति करतांना त्यांनीं लोकांनाही आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावण्याविषयीं प्रेरित केलें आहे. सशस्त्र व बलाढ्य सरकाराशीं हातघाई करण्यांत अर्थ नाहीं, तशी लोकांची ताकद नाहीं व करणेंही इष्ट नाहीं, तर लोकांनीं आपलें शिक्षण वाढवून, आपणांत करारीपणा आणून व स्वार्थत्याग करून स्वः-तच्या कायदेशीर वर्तनानें सरकारी राज्यव्यवस्थेस आळा घातला पाहिजे, असें त्यांनीं वेळोवेळीं ह्मटलें असून त्यांच्या या विचारांची उत्क्रांतिही हळू हळू इष्ट दिशेनें होत चालली आहे. शिक्षणासारखी इंग्रजी राज्यव्यवस्थें-तील कांहीं गोड फळें चाखावयास मिळाल्याबद्दल आपण सरकारचें जितकें आभारी असलें पाहिजे तितकेंच राज्यव्यवस्थेंतील व्यंगें दाखविणें आपलें कर्तव्य असून हें कर्तव्य निर्भीडपणें बजावण्यासही आपण तयार झालें पाहिजे, असें त्यांना वाटतें. हिंदुस्थानास 'स्वराज्य' मिळावें असें हिंदुस्थानच्या राज-

कीय उन्नतीच्या कल्पनेचें अंतिम स्थान जरी अलीकडे नक्की ठरलें आहे तरी त्या स्थानास पोंचण्यापूर्वी सरकारी वरिष्ठ नोकरींत हिंदी लोकांचा प्रवेश होणें; राज्यकारभारांत लोकांचें मत घेणें; लष्करी, उद्योगधंद्याचें व इतर उच्च प्रकारचें शिक्षण मिळणें, इत्यादि आरंभींच्या ज्या पायऱ्या आहेत त्या कशा चढून गेल्या पाहिजेत हाच आमच्या पुढाऱ्यांपुढें आज कैक वर्षे मुख्य प्रश्न असल्यामुळें त्याची दिशा टिळक यांनीं मागें दिलेल्या विवेचनांत स्पष्टपणें रेखाटून दिली असून सरकाराकडून जर योग्य प्रोत्साहन मिळालें नाहीं तर लोकांनीं स्वतःच्या हिंमतीवर व स्वतःच्या प्रयत्नांवर वरील बाबतींत आपली सुधारणा आपण करून घेतली पाहिजे असें नमूद केलें आहे. शिक्षण सर्वस्वी सरकारच्या हातीं न देतां तें लोकांनीं आपल्या हातांत ठेविलें पाहिजे हें स्वतंत्र युनिव्हर्सिटीच्या अलीकडील प्रयत्नापूर्वीच त्यांनीं सांगितलें असून विद्यार्थ्यांनीं राजकीय चळवळींत पडावें किंवा नाहीं, सरकारी नोकरींत बद्ध झालेल्या अलीकडच्या गुरूच्या विचारास सद्यःस्थितींत कितपत मान द्यावा याचा ' हे आमचे गुरूच नव्हेत ' या अलीकडच्या लेखांतच त्यांनीं विवेचन केलें नसून अशा प्रकारचे विचार त्यांनीं डे. ए. सोसायटी स्थापन झाल्यावेळीं व पुढेंही व्याख्यान-प्रसंगीं व्यक्त केले आहेत.* व्यापार व उद्योगधंद्यासंबंधानें टिळक यांनीं तर

---

* विद्यार्थ्यांनीं गुरूच्या विचारास वर्तनास कितपत मान द्यावा या विषयींचे टिळक यांचें पूर्वींचेंही मत अलीकडच्या मताप्रमाणेंच होतें हें ' धर्म ' कर्ते वे. लेले यांनीं जेष्ठ शु० ८ शके १८२८ च्या अंकांतील एका लेखांत पुढीलप्रमाणें जो उल्लेख केला आहे त्यावरून दिसून येईल. ते ह्मणतातः—" सुमारें १० वर्षांपूर्वी कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांच्या पुण्यतिथीसंबंधानें हिराबागेंत सभा भरली होती. त्या सभेंत कै० सदाशिव श्रीधर करंदीकर यांनीं शास्त्रीबोवासंबंधानें निबंध वाचलेला होता व अध्यक्षस्थान गुरुवर्य टिळक यांनी मंडित केलें होतें. वाचल्या गेलेल्या निबंधांत रानडे, पंडित, तेलंग, मोडक इत्यादिकांचा योग्यतेनुरूप परामर्श घेतलेला होता व तो परामर्श तदनुयायी मंडळींना जरा झोंबण्यासारखाच होता. नंतर अध्यक्षांचें जें भाषण झालें त्यांत त्यांनीं परशुराम व भीष्म ह्याच्यांतील युद्ध-प्रसंगाचा उल्लेख केलेला होता आणि

गुरोरप्यवलिप्तस्य कार्याकार्यमजानतः ।
उत्पथ-प्रतिपन्नस्य न्याय्यं भवति शासनम् ॥

स्पष्टपणें असें सांगितलें आहे कीं, अलीकडे परदेशी व्यापाराशीं आमची चढाओढ चालल्यामुळें शास्त्रीय शिक्षणानें त्यांत सुधारणा करून देशहित-बुद्धीनें हे उद्योग चालविले पाहिजेत; व मोठमोठ्या श्रीमान् लोकांनीं त्या-करतां स्वार्थत्यागही करण्यास तयार झालें पाहिजे. कांहीं वर्षांपूर्वी युरोप-खंडांत अप्रतिबंध व्यापारी तत्वाचें प्रस्थ माजल्यामुळें हिंदुस्थानांतही त्याचा फैलाव झाला व येथील राज्यव्यवस्थेचें धोरण पूर्णपणें लक्षांत न आल्या-मुळें इतर कित्येक पुढाऱ्यांवर या तत्वानें बराच अम्मल केला होता. पण हिंदुस्थानास हें तत्व घातक आहे अशी टिळक यांची पक्की खात्री असल्या-मुळें ते पूर्वीपासूनच खुल्या व्यापाराच्या विरुद्ध होते; व स्वदेशी चळवळ निघाल्यापासून तर त्यांच्या या विचारास दृढता येऊन सरकारानें सप्रति-बंध अथवा संरक्षित व्यापाराचें तत्व हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंत अंगि-कारिलें नाहीं तर लोकांनीं तरी परदेशी माल न वापरतां देशांतल्या देशांत उत्पन्न होणारा मालच वापरून आपल्या व्यापारास व उद्योगधंद्यास उत्ते-जन दिलें पाहिजे असें त्यांनीं जोरानें प्रतिपादन केलें आहे. लोकमताचें केंद्रीकरण करून राजकीय हक्क संपादन करण्याकरितां राष्ट्रीय सभा अस्ति-त्वांत येऊन तिनें वीस एकवीस वर्षें सारखा प्रयत्न चालविला असतांही सरकार राज्यव्यवस्थेंत इष्ट सुधारणा करीत नाहीं; उलट नवे नवे कायदे करून लोकांच्या स्वातंत्र्यावर गदा येत आहे त्याअर्थी राष्ट्रीय सभेच्या कार्य-क्रमांत फरक केला पाहिजे; व नुसत्या ‘ भिक्षांदेही ’ वृत्तीचें अवलंबन न करतां ‘ स्वदेशी चळवळ ’ व ‘ बहिष्कार ’ यांचें अवलंबन करून सरकारास आपल्या म्हणण्याकडे लक्ष देण्यास आपण लावलें पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे. आज राजकीय हक्क संपादन करण्याकरितां जवळ जवळ शंभर वर्षे आमचे लोक निरनिराळ्या रीतीनें प्रयत्न करीत असून व वंगभंग रद्द करण्याच्या कामीं हातांत होते तितके सर्व कायदेशीर प्रयत्न केले असूनही मि. मोर्लेसारखे उदारमतवादी स्टेटसेक्रेटरीही निवळ शब्दानें

---

हें वचनही त्यांनीं ह्मणून दाखविलें होतें.......सदरहु प्रसंगीं अध्यक्षांचें जें भाषण झालें त्यांत त्यांनीं “ गुरूचीही लोकापवादास पात्र असलेलीं कृत्यें आपणाला संमत नाहींत असें विद्यार्थ्यांनीं प्रसंग आल्यास स्पष्ट कळविणें व तेवढ्या कृत्याबद्दल तिर-स्कार दर्शविणें हें त्यांचें कर्तव्य होय ” अशा अर्थाचे शब्द जमलेल्या विद्यार्थ्यांना उपदेश ह्या नात्यानें उच्चारिल्याचें आह्मांला पक्कें स्मरत आहे.”

सहानुभूति व्यक्त करण्यापलीकडे कांहीं करीत नाहींत त्याअर्थी परावलंबनानें राजकीय हक्क मिळविण्याचें काम किती कठिण झालें आहे हें लोकांस सहजी कळून येईल. अशी स्थिती आहे तरी अजून 'अर्ज करा!' 'विनंति करा!' 'चळवळ करण्याचा आपला आजपर्यंतचा मार्गच पुढें चालवा!' असें कित्येक लोक म्हणत आहेत! हा मठपणा आपण टाकला पाहिजे, हा मनाचा दुर्बळपणा आपण सोडला पाहिजे, ह्या ब्राह्मणी याचकवृत्तीचा अथवा भिक्षुकीच्या मार्गाचा त्याग केला पाहिजे; व स्वावलंबनाचाच आश्रय करून आपली उन्नति आपल्याच हातानें करून घेतली पाहिजे. "याचकवृत्तीनें आपण हक्क मिळवूं या, जगाच्या इतिहासाला अद्याप पूर्णता आली नाहीं; करतां आपण याच वृत्तीचें अवलंबन करून राजकीय हक्क संपादण्याचा इतिहासांत नवा भाग घालून देऊं या,' असें जे ह्मणत असतील त्यांचा हा विचार कमकुवतपणाचा असून हा कमकुवतपणा आपण होऊनच जगास दाखवितों, "हक्कांसाठीं रडून किंवा भीक मागून कांहीं उपयोग नाहीं; ते हक्क आपणांस मिळतील असा आग्रह धरून आपल्या हातून शक्य असेल तेवढा उद्योग आपण केला पाहिजे; आणि जरूर पडल्यास ही गोष्ट आपल्या निश्चयानें सरकारास कायदेशीर रीतीनें जितकें अडवितां येईल तितकें अडवून साध्य करून घेतली पाहिजे," असें टिळक यांचें मत असून तें त्यांनीं राष्ट्रीय सभेच्या कामाची दिशा, स्वदेशी चळवळ, बहिष्कारयोग इत्यादि लेखांत स्पष्टपणें व्यक्त केलें आहे.

आपणांस स्वराज्याची प्राप्ती होऊन आपलें राष्ट्र सर्व रीतीनें पाश्चात्य राष्ट्राच्या योग्यतेस चढावें असें टिळक यांना आज कैक वर्षे वाटत असून तदनुरोधानें लोकमत तयार करण्याचे मार्ग त्यांनीं अंगिकारिले आहेत. हल्लींच्या राज्यव्यवस्थेचें धोरण बदलणें ही तर मुख्य अडचण आहेच; पण इतर ज्या कांहीं अडचणी आहेत त्यांत इंग्लंडांतून व्हाइसराय, गव्हर्नर वगैरेसारखे बडेबडे अंमलदार हिंदुस्थानांत येऊन प्रसंगविशेषीं जो अवरंगझेबी अंमल तें गाजवितात व पार्लमेंट आणि स्टेट सेक्रेटरी यांसही धाब्यावर बसवून हम करेसो कायद्यानें जो शिरजोरपणा चालवितात ती अडचण प्रमुख असून ती नाहींशी व्हावी यावर त्यांचा विशेष कटाक्ष असल्यामुळें हिंदुस्थानांत जशी राजकीय चळवळ सुरू

ठेविली पाहिजे तशीच विलायतेंतही हिंदुस्थानच्या वतीनें सारखी खटपट करणारें डेप्युटेशन अथवा कायमचें मिशन ठेऊन त्यांनीं तेथें चळवळ करावी असें त्यांनीं एक दोन प्रसंगीं ह्मटलें आहे. पण हल्लीं बर्क, ब्राडलासारखे आमचें काम अंगावर घेऊन तें नेटानें चालविणारे कोणी वजनदार पुढारी किंवा मुत्सद्दी विलायतेंत नसल्यामुळें व तेथील लोकांनाही हिंदुस्थानच्या स्थितीसंबंधाच्या अज्ञानाबरोबर साम्राज्यवैभवाची धुंदी आली असल्यामुळें तेथील कोणत्या एका पक्षास मिळाल्यानें खात्रीनें आमचें काम होईल असें वाटत नसल्यामुळें ‘ देग बाई जोगवा ’ ह्मणून कोणी जोगवा घालणार नाहीं, करतां जो पक्ष आपणास अनुकूल होईल त्याचा होईल तितका फायदा तर करून घ्यावाच; पण मुख्य भिस्त स्वावलंबनावर ठेवावी व या डेप्युटेशनास किंवा मिशनास सहाय्य देऊन आमच्या लोकांनीं विलायतेंतील लोकांस आपले डोळे उघडावयास लावावे असें ते ह्मणतात. सामदामादि शिष्टसंमत मार्गांचें लोकांनीं अवलंबन करूं नये असें त्यांनीं कधीं प्रतिपादन केलें नाहीं. त्यांचें एवढेंच ह्मणणें आहे कीं, शिष्टाई फलद्रुप होण्यास स्वतःच्या अंगीं एक प्रकारचें क्षात्रतेज पाहिजे; व तें तेज पुढाऱ्यांनीं व लोकांनीं मिळून स्वावलंबनानें उत्पन्न केलें पाहिजे. ‘ शिष्टाईनें कार्यनिष्पत्ति होणार नाहीं काय ? असा कोणी प्रश्न करील. त्यास उत्तर ‘ होईल ’ असेंच द्यावें लागेल; एवढेंच नव्हे तर, उलट शिष्टाईनें कार्यनिष्पत्ति झाल्याचीं अनेक उदाहरणेंही आमच्या प्राचीन इतिहासांतून दाखवितां येतील. पण फलद्रुप झालेल्या शिष्टाईचा विचार करतांना ती निव्वळ शिष्टाई ह्मणून फलद्रुप झाली नसून शिष्टाईच्या पाठीमागें स्वावलंबनाचा जोर होता ह्मणून ती फलद्रुप झाली हें अशा वेळीं सर्वांनीं लक्षांत ठेवावें. असा दुजोरा उत्पन्न होणें हेंच सद्यःस्थितींत अत्यंत इष्ट असून हेंच टिळक यांच्या राजकीय विचारांचें सार आहे.

## टिळक हे आशावादी आहेत कीं निराशावादी आहेत ?

हिंदुस्थानची सर्व बाजूंनीं निकृष्टावस्था झाली असल्यामुळें त्याचें कधीं काळीं वर डोकें निघेल काय ? त्याची राजकीय व सामाजिक बाबतींत सुधारणा होऊन त्याला एकराष्ट्रीयत्व कधीं येईल काय ? अथवा तो ‘ राष्ट्र ’ या संज्ञेस कधीं पात्र होईल काय ? अमेरिकेंतील तांबड्या इंडियनाप्रमाणें हिंदुस्थानांतील लोकांचा नायनाट होऊन ‘ हिंदु ’ हें नांवही

नाहींसें होणार कीं, पाश्चात्य राष्ट्रांच्या हरएक प्रकारच्या चढाओढीस टक्कर देऊन येथील लोक आपला अभ्युदय करून घेणार? त्यांचा धर्म विलयास जाणार कीं, त्याचें 'सनातनत्व' ते कायम राखणार? नीतिदृष्ट्या त्यांची सदोदित अवनति होत जाणार कीं, आपल्या अढळ नीतितत्वांचा ते जगास प्रत्यय आणून देणार? इत्यादि शंका मोठमोठ्या तत्ववेत्त्यासही येऊन त्यांनीं आपापल्यापरी अनुकूल प्रतिकूल अभिप्राय प्रगट केले आहेत. टिळक हे आशावादी असून "आह्मी कांहीं नैराश्यवादी नाहीं; आमची उन्नति केव्हां तरी झालीच पाहिजे," असें त्यांचें ठाम मत आहे;* व सामाजिक विषयासंबंधानें लोकांत जागृती होत चालली असून निरनिराळें समाज आपापल्या मताप्रमाणें कां होईना, पण सुधारणा करण्याच्या प्रयत्नास लागले आहेत; व त्यांतील पुढाऱ्यांच्या कित्येक प्रयत्नांस यशही येत चाललें आहे असें जें प्रसंगोपात्त त्यांनीं ह्मटलें आहे त्यांत त्यांनीं तें व्यक्त केलें आहे. सामाजिक परिषद, आर्य-समाज वगैरे सस्थांचीं कित्येक मतें जरी यांना मान्य नसलीं तरी त्यांतील कांहीं पुढाऱ्यांची कळकळ, उत्साह व अंतःकरणपूर्वक काम करण्याची पद्धत याबद्दल त्यांना समाधान वाटत असून आजच्या चळवळींत जरी कोणी चुकीच्या मार्गाचें अवलंबन केलें असलें तरी "चुक्यांबद्दल नांवें ठेवण्यांत अर्थ नाहीं; चुक्यांची परंपरा चालेल तेव्हांच राष्ट्राची प्रगति होते;"† असें त्यांनीं पुष्कळ वेळां बोलून दाखविलें आहे. खुद्द हिंदुसमाजाच्या प्रगतीबद्दल जी खटपट चालली आहे व तींत प्राचीन परंपरा राखण्याकडे किंवा प्राचीन तत्वांचा बदललेल्या परिस्थितींत होईल तितका उपयोग करून घण्याकडे जी लोकांची प्रवृत्ति होत चालली आहे तीवरून या समाजाला पुढें मागें स्वतःच्या मताप्रमाणें इष्ट वळण लागेल अशी त्यांची आशा आहे; इतकेंच नव्हे तर, त्याबद्दल त्यांना चांगला भरंवसाही वाटत आहे. राजकीय उन्नतीबद्दलची त्यांची आशा तर दिवसें दिवस बळावत चालली आहे. "परराज्याच्या मोठ्या रुळाखालीं सर्वच आपापल्या मानानें चिरडून गेलेले आहेत. तथापि, निराश होण्यांत कांहीं हांशील

* केसरी, ता. ६।३।०६ पाहा.

† कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या श्राद्धतिथीच्या वेळीं अध्यक्ष या नात्यानें १९०६ सालीं केलेल्या भाषणांत हे उद्गार काढले आहेत.

नाहीं. आपणास करतां येतील अशा बऱ्याच गोष्टी आहेत; व. आज मितीस तरी ते करण्याचे मार्ग खुले आहेत "* असें त्यांना वाटत असून त्या मार्गाचें अवलंबन करण्याविषयीं लोकांस व त्यांच्या पुढाऱ्यांस वरचेवर ते प्रोत्साहन देत आहेत. सन १९०६ सालीं पंढरपूर येथील स्वदेशी संमेलनांत भाषण करतांना तर त्यांनीं असे स्पष्ट उद्गार काढले आहेत:— " आम्ही स्वराज्य विसरलों तेव्हां शिवाजी, रामदासादिकांनीं त्याचा लाभ आम्हांस करून दिला. हल्लीं आम्ही स्वदेशास विसरलों आहों. हल्लींचें मोठें संकट गाढ दारिद्र्य आहे. .... हें दारिद्र्य, ही उपासमार काढून टाकण्यासाठीं स्वदेशी चळवळ सुरू झाली आहे. इंग्रजी राज्य कितीही चांगलें असलें तरी हा त्याचा मोठा दोष आहे. ही गोष्ट जेव्हां कुळंब्यास व शेतकऱ्यांस समजेल तेव्हांच ही चळवळ यशस्वी होईल. हें यश लवकर येणार नाहीं. मोक्षासाठीं जसे अनेक जन्म घ्यावे लागतात तसें हिला यश येण्यास अनेक पिढ्या खर्ची पडतील. पण केव्हां तरी आह्मांस यश आलेंच पाहिजे असा खास ईश्वरी संकेत आहे. "† आमच्यांतील पुढारी पंचवीस तीस किंबहुना पन्नास साठ वर्षे राजकीय हक्काच्या प्राप्तीसाठीं सतत प्रयत्न करून थकल्यामुळें निराशेनें कांहींना आपला मार्ग सोडून द्यावासा वाटत आहे व कित्येक राजकीय सुधारणेची पताका खालीं ठेऊन स्वस्थ ' हरि हरि ' म्हणत बसावें असेंही म्हणूं लागले आहेत. पण टिळक यांना राजकीय सुधारणेबद्दल निराशा वाटत नसून उलट ती कधींना कधीं तरी सफल होईल अशी बळकट आशा वाटत आहे; मात्र प्रयत्न योग्य दिशेनें झाले पाहिजेत असें ते ह्मणतात. त्यांचें असें ह्मणणें आहे कीं, लोभमूलक परावलंबी आशा करण्यांत अर्थ नाहीं; व ती कधींही सफल होणार नाहीं. निराशेनें जी आशा उत्पन्न होते तीच शुद्ध आशा असते; व तीच स्वावलंबी बनून कार्य करिते. करितां अशा तऱ्हेची आशा धरून धैर्यानें उद्योग केला तर खात्रीनें यश येईल, असें त्यांना वाटत असून कोल्हापूर येथें प्रसिद्ध झालेल्या ' विश्ववृत्ता 'च्या पहिल्या अंकांत " आशेची निराशा आणि निराशेची आशा ह्मणून जो

* केसरी, ता. २६।२।०१ पाहा.

† केसरी, ता. २०।१०।०६ पाहा.

एक लेख त्यांनीं लिहिला आहे त्यांत त्यांनीं यासंबंधानें पुढीलप्रमाणें आपले विचार स्पष्टपणें प्रगट केले आहेत. ते ह्मणतात:—

"ज्या आशेनें पंचवीस तीस वर्षांपूर्वी नवीन सुशिक्षित लोकांनीं राजकीय उन्नतीच्या कामीं पुढाकार घेऊन उद्योग करण्यास सुरवात केली ती आशा आतां राहिलेली नाहीं. अशा स्थितींत आह्मी करावें तरी काय ? हा मोठाच प्रश्न आहे. आह्मांस जें पाश्चात्त्य शिक्षण मिळालें आहे त्यानें हल्लींची आमची स्थिति आह्मांस दुःसह झालेली आहे. राज्यकर्ते उदारबुद्धीनें या कामीं आह्मांस मदत करतील असें वाटत होतें, पण तीही आशा व्यर्थ झाली. आतां पुढील कर्तव्याची दिशा कोणती ? निराशेनें उगीच बसणें हा कांहीं पुरुषार्थ नव्हे, आणि आशेवांचून तर अशा दुःखदायक परिस्थितींत जगणेंही अशक्य आहे. मोठमोठ्या संकटांत सांपडलेल्या लोकांच्या अंगीं हुरूप कायम रहाण्यास पुनः अभ्युदय होण्याची आशाच कारणीभूत होते ही गोष्ट सर्वसंमत आहे. असें जर आहे तर आह्मीं निराश होऊन करणार काय ? आणि आशा धरावयाची ह्मटली तरी ती कसली धरणार ? या प्रश्नांस एकच उत्तर आहे; आणि तें शिरोभागीं निर्दिष्ट केलेल्या श्लोकांत ( आशा बलवती राजन्नैराश्यं परमं सुखम् । आशां निराशां कृत्वातु सुखं स्वपिति पिङ्गला ॥ —महाभारत ) व्यासांनीं सांगितलें आहे. आशेवांचून आयुष्य अळणी आहे हें तत्त्व आह्मांस मान्य आहे. आह्मी कांहीं इंग्रजींत ज्यांस 'पेसिमिस्ट' किंवा आमच्या भाषेंत 'रड्ये' ह्मणतात त्या पक्षाचे नाहीं. आमचें इतकेंच ह्मणणें आहे कीं, आतां आह्मांस जो उद्योग करावयाचा, तो अमक्यावर भिस्त ठेवून अगर अमका तमका गृहस्थ आपणास साहाय्य करील अशा आशेनें करून उपयोगी नाहीं. आशेचेही दोन प्रकार आहेत. एक लोभमूलक परावलंबी; आणि एक निराशेच्या पोटीं उत्पन्न झालेली स्वावलंबी. या दुसऱ्या आशेसच निर्वाणीचें धैर्य असें ह्मणतात; आणि याच धैर्यानें खऱ्या साधुसंतांनीं परमेश्वरप्राप्ति करून घेतलेली आहे. राजनीति किंवा एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करण्याची पद्धत ही कांहीं औदार्याच्या किंवा परमार्थाच्या पायावर रचलेली नसते. हा एक स्वार्थाचा धंदा आहे; आणि तो चालवतांना जिंकलेल्या लोकांचीं मनें विशेष न दुखवितां अर्थात् आपला फायदा चिरस्थायी कसा होईल या गोष्टीकडे अवश्य लक्ष पुरवावें लागतें. पण तसें लक्ष पुरविलें तरी तेवढ्यानें अधिकारिवर्ग उदार आणि परोपकारी ठरत नाहीं. इंग्रजी शाळांतून जी गोष्ट आह्मांस शिकविली जात नाहीं किंवा आमच्यापासून लपवून ठेवण्यांत येते ती हीच होय. ह्यासाठीं राजकीय चळवळींत पडणाऱ्या गृहस्थांस आमचें एवढेंच सांगणें आहे कीं, 'उद्धरेदात्मनात्मानम्' हें तत्त्व विसरूं नका, प्राचीन ऋषींचा हा सिद्धांत अर्वाचीन इतिहासानें अधिक मजबूत झालेला आहे. ह्या इंग्रजी राज्यांतही अशा पुष्कळ गोष्टी आहेत कीं, निराशेच्या आशेनें, धैर्यानें आणि स्वार्थत्यागानें जर तुह्मी

त्या हातीं घेतल्या तर तुह्मांस त्या खचित साध्य होतील. हिंदुविश्वविद्यालय, स्वदेशी चळवळ, वगैरे अलीकडे निघालेल्या गोष्टी याच मासल्याच्या होत. या जर तुह्मी घडवून आणाल तर तुमच्या अंगांत कांहीं जोम आहे असें राज्यकर्त्यांस कळून येऊन ते तुमच्या शब्दास व कृतीस कांहीं मान देतील; नाहींपेक्षां आज बाबू सुरेंद्रनाथ यांची जी स्थिति झाली आहे तीच तुह्मां आह्मां सर्वांची पुढें व्हावयाची आहे. ज्याच्या हातीं ससा तो पारधी या न्यायानें अधिकारारूढ मंडळी इतरांस आपल्या अधिकारमदानें तुच्छ मानीत आहेत, व मानतील. त्यांच्या औदार्यास, परोपकार-बुद्धीस किंवा न्यायदृष्टीस शरण गेल्यानें आपलें काम व्हावयाचें नाहीं, ही गोष्ट आतां निर्विवाद सिद्ध झालेली आहे. अशा वेळीं कार्यसिद्धीसाठीं आह्मांस एकच उपाय राहिला आहे आणि तो निराशेची आशा हा योय. ह्या आशेच्या जोरावर भवाब्धि पार पडून अनेक लोकांनीं जर ईश्वरपदाची प्राप्ति करून घेतली आहे, तर आपल्यावर आलेल्या संकटांचा सागर तरून जाण्याची शक्ति आपल्या अंगीं उत्पन्न करण्यास हें साधन समर्थ आहे याबद्दल शंका घ्यावयास नको. मात्र हें साधन किंवा हा गुण आपल्या अंगीं पूर्ण बिंबला पाहिजे; आणि तो तसा बिंबून त्याप्रमाणें आपल्या हातून जर उद्योग झाला तर 'नैराश्यं परमं सुखं' ह्या व्यासोक्तीचें बीज आह्मांस सांपडलेंसें होऊन आह्मी लवकरच हल्लीच्या दुःसह परिस्थितींतून पार पडूं. लोभमूलक परावलंबी आशेची निराशा होणें स्वाभाविकच आहे. पण अशा निराशेनें हताश होण्याचें कांहीं कारण नाहीं. निराशेनें मनुष्य खचतें हें खरें आहे, व एवढ्या कारणामुळें कांहीं लोक कोणत्या तरी आशेच्या कांसीं लागलेले आढळतात. पण आमच्यामतें ही चूक आहे. परावलंबी आशेचा भंग झाल्यानें एकादा मनुष्य खचल्यास तो दोष मनुष्याचा आहे, निराशेचा नव्हे. कारण, निराशेच्या पोटीं उत्पन्न होणारी आशाच खरी कार्यकारी व सिद्धिप्रद असते असा अनुभव आहे."

धार्मिक उन्नतीबद्दल—विशेषतः हिंदुधर्माच्या उन्नतीबद्दलही टिळक यांना मोठी आशा वाटत आहे. पाश्चात्य मिशनऱ्यांच्या हल्ल्यांतून हिंदुधर्म आपला मार्ग काढीत आहे, एवढेंच नव्हे तर, आनि बिझांट, मॅक्समुलर, यांच्यासारख्या परधर्मी लोकांकडून हिंदुधर्माचें खरें स्वरूप पाश्चात्यांच्या नजरेस येऊं लागल्यामुळें तिकडील पंडितही या धर्माचा आस्थेनें अभ्यास करूं लागले आहेत व थिऑसफी आदिकरून संस्थांच्या मार्फत या धर्माचें उज्वल स्वरूप सर्व जगाच्या निदर्शनास येत चालल्यामुळें व आधिभौतिक शास्त्रांच्याही पूर्णपणें तो कसोटीस उतरत असल्यामुळें हिंदु-धर्माचा लोप न होतां उलट त्याचाच पगडा सर्व जगावर बसेल अशी आजमितीस त्यांना आशा वाटूं लागली आहे. स्वामी विवेकानंद,

अभेदानंद, अगम्यगुरु, हंसस्वरूप, सिस्टर निवेदिता, आनीबिझांट, वगैरे अनेक पौर्वात्य व पाश्चात्य लोकांच्या प्रयत्नानें या धर्माच्या महतीची जगभर पताका फडकूं लागल्यामुळें प्राचीन राजवैभव नष्ट झालें व परकीय शक्तिमान अंमल सुरू झाला तरी धर्माचें वर्चस्व ज्या अर्थी अनेक साम्राज्याशीं टक्कर देऊन राहिलें आहे त्याअर्थी आमचा धर्म आपलें साम्राज्य कायम ठेवील अशी त्या धर्मात शक्ती असून त्या धर्माचा केव्हां ना केव्हां तरी अभ्युदय खास झाला पाहिजे असा त्यांचा दृढ विश्वास आहे; व हा विश्वास त्यांनीं मागें दिलेल्या अनेक लेखांतून व भाषणांतून पुष्कळ वेळां व्यक्त केला आहे. तात्पर्य, राष्ट्रीय दृष्टया आमची सर्व बाजूंनीं उन्नति खचित होईल अशी त्यांना पक्की आशा वाटत आहे. परराष्ट्राच्या स्थितीकडे अवलोकन केलें असतां रूसो—जपानी अथवा बोअर युद्धानें युरोपियन राष्ट्रांना एकप्रकारचा आपल्या शक्तीबद्दल अविश्वास उत्पन्न झाला असून जपानच्या विजयानें आशियाटिक राष्ट्रांना आपण आजच कांहीं मेलों नाहीं, आपणास कधीं नाहीं कधीं तरी चांगले दिवस येतील असा विश्वास वाटूं लागला आहे; व खुद्द हिंदुस्थानांत आजपर्यंत आपण जरी एकमेकांचीं डोकीं फोडलीं तरी आतां हिंदु-मुसलमानादि सर्व जातींना—निदान त्यांतील कित्येक पुढाऱ्यांना तरी—आपलें राष्ट्रीय ऐक्य वाढलें पाहिजे, असें वाटूं लागलें आहे, हें राष्ट्रीयसभा, स्वदेशी चळवळ, शिवाजी उत्सव, धर्ममहामंडल, हिंदुविश्वविद्यालय, इत्यादि अनेक संस्थाच्या व प्रसंगाच्या हालचालींवरून व्यक्त होत असून कार्य करण्याची वेळ हीच आहे व तुह्मी प्रयत्न कराल तर ‘अशी राष्ट्रदेवता खचित खचित उत्पन्न कराल’ असा लोकांना त्यांनीं पूर्ण भरवंसा दिला आहे.*

---

* ता. ९।९।०५ रोजीं रेमार्केटमधील गणपतीपुढें प्रो. शि. म. परांजपे यांच्या व्याख्यानाचे वेळीं अध्यक्ष या नात्यानें भाषण करतांना टिळक ह्मणाले:—“व्याख्यात्यांनीं ‘राष्ट्रदेवता तुह्मी केव्हां उत्पन्न करणार? अशा प्रश्नानें व्याख्यान संपविलें आहे. जोंपर्यंत शरीरांत प्राण आहे, आपलीं सगळीं इंद्रियें शाबूत आहेत तोंपर्यंतच कांहीं हित साधण्याचा उद्योग केल्यास ठीक. मृतावस्था आल्यावर काय कार्य होणार आहे? आपली स्थिति काय झाली आहे, आपणास कोणता रोग जडला आहे, याचें ज्ञान जोंपर्यंत तुम्हांस आहे तोंपर्यंत तुह्मी प्रयत्न केल्यास अशी राष्ट्रदेवता उत्पन्न होण्याचा संभव आहे. थांबा, वाट पाहा असें ह्मणून वाट पाहत

सन १९०५ सालच्या आगष्ट महिन्यांत टिळक हे यवतमाळ येथें गेले असतां तेथें सार्वजनिक रीतीनें त्यांचें स्वागत करण्याकरतां रा. रा. भाऊसाहेब मुंडले यांच्या अध्यक्षतेखालीं जी जंगी जाहिर सभा भरली होती त्यांत भाषण करतांनाही त्यांनीं वरील मतांचाच अनुवाद करून "सर्व कांहीं आपल्या प्रयत्नावर आहे, जो स्वतःला सहाय्य करतो त्याला ईश्वर साहाय्य करतो; करितां प्रयत्न करा आणि ईश्वराचा धांवा करा, म्हणजे राष्ट्रकार्याकरितां तो खचित अवतरेल" असा त्यांनीं भरंवशाचा उपदेश केला आहे. त्या वेळचे त्यांचे उद्गार तेथील 'हरिकिशोर' नांवाच्या वर्तमानपत्रानें ता. २१।८।६ च्या अंकांत येणेंप्रमाणें दिले आहेतः—

"आपण आज जो कांहीं प्रयत्न करतों त्याचा परिणाम झालाच पाहिजे. तो डोळ्यादेखत होवो कीं, पश्चात् होवो; केव्हां ना केव्हां तो झालाच पाहिजे. आह्मी जे कांहीं कार्य करीत आहों त्याचें फळ मिळेल असा दृढ विश्वास ठेविला तर ईश्वर-इच्छेनें फळ मिळेलच मिळेल. मात्र अशा प्रकारचा दृढ विश्वास ठेवण्याला मन संस्कृत लागते; याला एक प्रकारचे वळण, निश्चय, निरपेक्षता इत्यादि मानसिक गुण लागतात. हे गुण केवळ तर्कानें, अनुमानानें किंवा वाचनानें येण्यासारखे नाहींत. ते आनुवंशिक संस्कारानें व कांही अंशीं परिस्थितीनें व शिक्षणानें येतात. मानसिक धैर्य वगैरे गुण दाखविण्याला तशी स्थिति उत्पन्न व्हावी लागते; त्याच वेळीं अलौकिक पुरुष उत्पन्न होऊन मागच्या लोकांनीं बांधलेल्या देवळावर ते कळस चढवितात. 'परित्राणाय साधूनाम्' याचा खरा अर्थ हाच कीं, देव ह्मणतो मी अवतार घेतो, पण त्याला एक विशिष्ट प्रकारची स्थिति असावी लागते. (Hero worship) विभूतीपूजेचें तत्व हेंच होय कीं, तशी परिस्थिति असली की कोणी तरी अलौकिक पुरुष निर्माण होतो. तशी परिस्थिति आणावयाला सर्वांचें साहाय्य पाहिजे. नुसत्या काडीनें जसा दिवा जळत नाहीं, त्याला तेलवातीची जरूर आहे; त्याचप्रमाणें असे अलौकिक पुरुष निर्माण होऊन त्यांच्या हातून कार्य होण्याला इतरांचे सहाय्याची अपेक्षा आहे. अलेक्झांडर, नेपोलियन, वगैरे पुरुष निर्माण होऊन त्यांनीं छाप बसविली; पण तशी स्थिति सर्व लोकांच्या सहाय्यानें जुळून आली. ह्मणून सामान्य लोकांच्याही मनाची तयारी लागते. त्यांनीं निराश होतां कामा नये. आपल्या इकडे पुराणांत जशा अवतार–कथा आहेत; तशी Hero-

---

स्वस्थ बसाल तर कांहीं होणार नाहीं. आपली उन्नति करून घेणें आपल्या हातांत आहे. याविषयीं तुमच्यांत जागृति झाली आहे व ह्मणून अशी राष्ट्रदेवता आज नाहीं उद्यां, उद्यां नाहीं पन्नास वर्षांनीं, शंभर वर्षांनीं आपण खचित उत्पन्न कराल अशी आशा आहे."—स्मरणवही.

worship ही अवतार-कथा आहे. अवतार घेण्याला जसे सर्व देवाचे अंश लागतात त्याप्रमाणें अलौकिक पुरुष निर्माण होण्याला सर्वांचा प्रयत्न लागतो. श्रीरामानें अवतार घेतला त्या वेळीं सर्व देवही अंशरूपानें खाली आले; म्हणून मोठ्या मनुष्याप्रमाणें आपणांतही ईश्वरी अंश आहे, असा दृढ विश्वास ठेवून व तो ओळखून लोकांनी प्रयत्न केला पाहिजे. स्वस्थ बसून चालावयाचें नाहीं. हजारों घडामोडींत मी, माझा निश्चय, माझें कर्म हीं विसरतां कामा नये. एक लक्ष गोष्टी व माझें कर्म मिळून एक लक्ष एक गोष्टी आहेत हें लक्षांत ठेविलें पाहिजे. आमच्या अंगांत हिंमत पाहिजे, निश्चय पाहिजे. निश्चय नसेल तर कांहीं प्राप्त व्हावयाचें नाही. स्वतःचा निश्चय ही मूळ गोष्ट आहे. इसाबनीतीत एका गाडी-वाल्याची गोष्ट आहे. त्याच्या गाडीचें चाक चिखलांत रुतले असतांना त्यानें साह्या-य्याकरितां देवाला बोलाविले तेव्हां तो ह्मणाला:—बाबारे, अगोदर तूं खांदा लाव ह्मणजे मी मदत करीन. याकरितां अशा कार्याला आपण अगोदर खांदा लावला पाहिजे. आमचा निश्चय लोकांचे नजरेस येईल तेव्हां ते सहानुभूति दाखवून साहाय्य करावयास प्रवृत्त होतील. जगांत मताला किमत नाही, निश्चयाला असते. मत खरें कोणाचें? जो आपल्या मताकरितां मरणास तयार होतो त्याचें. येशू इतका पूज्य कां? तर तो सुळी गेला; पण त्यानें आपलें मत सोडले नाहीं ह्मणून! तुह्मी निश्चयानें व धैर्यानें उद्योग करा ह्मणजे यश येईल. ईश्वराची आपणावर इतकी कांहीं इतराजी झाली नाही की, आपण निश्चयानें प्रयत्न केला असतां तो साहाय्य देणार नाही. मार्गांत अनेक अडचणी आहेत हें खरे, पण जो त्या बाजूला सारून पुढें पाऊल टाकतो त्यालाच यश मिळते. अलीकडच्या तीरावर बसून जो नुसता संकल्प करतो त्याला यश मिळावयाचे नाही.... सावटाखाली जसें झाड वाढत नाहीं तसेंच परकीय सत्तेखालीं अभिवृद्धि होणे कठिण आहे. तथापि, अभिवृद्धि होणें अशक्य नाहीं. उशीर लागेल. जितक्या अडचणी अधिक बिकट तितकें डोकें अधिक खर्च केले पाहिजे. निश्चयाची तयारी अधिक पाहिजे. तेव्हां यश मिळेल."

## लोकमत तयार करणें व पुढारी या नात्यानें त्यांची योग्यता.

लोकमत तयार करण्याचीं जीं अनेक साधनें आहेत त्यांत वर्तमानपत्र हें एक मुख्य होय. सामान्य जनापासून सुशिक्षित लोकांपर्यंत देश-हिताची एकादी गोष्ट जर सर्वांच्या मनांत बिंबवावयाची असेल तर सद्यः-स्थितींत ती वर्तमानपत्राच्या द्वारें जितकी बिंबवितां येते तितकी दुसऱ्या कशानेंही येत नाहीं. सामान्य जनांत सुशिक्षित लोकांइतकी वाचनाची जरी अभिरुचि नसते व त्यांपैकीं पुष्कळांना लिहितां वाचतांही जरी येत नाहीं, तरी देशहिताच्या प्रश्नासंबंधीं वर्तमानपत्रांतून एकदां चर्चा सुरू

झाली ह्मणजे सहजी ती त्यांच्या कानावर जाते व त्याचा ते विचार करूं लागतात. आतां एकाद्या भानगडीच्या प्रश्नावर किंवा मुत्सद्दीपणाच्या डावपेंचावर त्यांना ताबडतोब ठाम मत देतां येणार नाहीं, व असें ठाम मत दिलें तर तें चुकीचें असण्याचा जरी संभव आहे तरी, सार्वजनिक प्रश्नांच्या चर्चेनें व खलानें त्यांची सारासारबुद्धि जागृत होऊन स्वपर-हिताहितांतील भेद त्यांना कळूं लागतो; व पत्रकर्ता ज्या मानानें विद्वान्, चाणाक्ष, मनाचा बळकट व आचरणानें खंबीर असेल त्या मानानें त्यानें उमटविलेल्या या भेदाचा ठसा त्यांच्या मनावर बिंबतो. उलटपक्षीं जागृत झालेल्या लोकमताचा परिणामही पत्रकर्त्यावर होत असून त्याला लोकमताप्रमाणें लिहिण्याचाही अनेक वेळां प्रसंग येतो. पुष्कळांचें असें ह्मणणें असतें कीं, वर्तमानपत्रांतील मत हें एका व्यक्तीचें मत असून वर्तमानपत्राला लोकमताचा आदर्श ह्मणतां येणार नाहीं. पण हें ह्मणणें चुकीचें असून या बाबतींत "वर्तमानपत्रांचें सामर्थ्य" या मथळ्याखालीं ता. ६।९।०५ च्या अंकांत "ज्ञानप्रकाश"—कर्त्यांनीं जे विचार प्रगट केले आहेत तेच पुष्कळांना मान्य होतील असें मला वाटतें. सदर पत्रकर्ते ह्मणतातः—

"पुष्कळ वेळां असें होतें कीं, वर्तमानपत्रांतील मत हें त्याच्या चालकव्यक्तीचें एकटे मत असते; परंतु त्या मताच्या पुष्टीकरणार्थ लेखकास अनेक कारणें व मुद्दे वगैरे द्यावे लागतात. अर्थात् आपल्या मताचे समर्थन करून तें लोकांस ग्राह्य होईल असें करूनच लोकांपुढे मांडावें लागते. अर्थात्च लोकांच्या मतास कांही तरी वळण त्यापासून मिळण्याचा संभव असतो. पुष्कळ लोक वर्तमानपत्रांतील मत हे लोकमत ह्मणण्यापेक्षां व्यक्तिमत ह्मणावें असें ह्मणून वर्तमानपत्रांतील मतांची चष्टा करितात; आणि वर्तमानपत्रास लोकमताचा आदर्श असें ह्मणणें चुकीचे आहे असें ह्मणतात. परंतु हे विधान अगदीं रास्त नाहीं. वर्तमानपत्रकारांचें ह्मणणें ते सभा भरवून लोकांस विचारून लिहीत नाहीत हे खरें आहे; परंतु तेवढ्यामुळें 'लोकमता'चें आविष्करण वर्तमानपत्रांत नसतें असें विधान करणें किती चुकीचें आहे पाहा. वर्तमानपत्र काढणारा गृहस्थ लोकमत विचारण्यास गेला, तरच त्याच्या हातून लोकमताचें आविष्करण होतें आणि नाहीं तर त्याच्या लिहिण्यास लोकमताचें आविष्करण असें नांव देतां येणार नाहीं असें विधान करणें बरोबर नाहीं."

टिळक यानीं केसरीपत्रद्वारें सामाजिक, धार्मिक व विशेषतः राजकीय बाबतींत विशिष्ट प्रकारचें लोकमत तयार केलें आहे, हें कोणासही नाकबूल

करतां यावयाचें नाहीं. पण असें लोकमत तयार करतांना लोकरंजना-करतां केवळ कित्येक गोष्टींचें अवास्तविक किंवा अतिशयोक्तीचें वर्णन न करतां किंवा लोकांत भलताच ग्रह किंवा वेड उत्पन्न न करतां लोकांना खरें ज्ञान देऊन जो विषय प्रतिपादन करावयाचा त्यास साधक-बाधक प्रमाणें देऊन, निर्भीडपणें व सरळ रीतीनें त्यांच्यापुढें त्यांनीं तो मांडला आहे, हें मागें दिलेल्या निरनिराळ्या विषयांवरील त्यांच्या लेखांवरून स्पष्ट-पणें वाचकांस कळून येईल. आतां पुष्कळ वेळां त्यांनीं स्थानिक संस्था, काँग्रेसचे पुढारी किंवा खुद्द राष्ट्रीय सभा यांजवरही अनेक प्रहार केल्यामुळें ' यांना चांगलें असें कशांत दिसत नाहीं; विधायक धोरणापेक्षां विघा-तक धोरणाकडे यांचा जास्त कल आहे, व जातील तेथें व हातीं घेतील ती संस्था रसातळास पोंचवून तिचा विध्वंस केल्यावांचून कधींही राहणार नाहींत,' असे भलभलते आरोप विरुद्धपक्षाच्या पत्रांनीं यांच्यावर आज-पर्यंत अनेक वेळां केले आहेत. पण या आरोपांत सत्यांशापेक्षां समाज-प्रगतीच्या अज्ञानाचा किंबहुना दोषैकदृष्टीचा अंश जास्त आहे असें ह्मणावें लागते. यांचा संबंध असलेल्या कित्येक संस्था आजपर्यंत खालावल्या असतील व कित्येक मोडल्याही असतील, नाहींत असें नाहीं. पण त्या केवळ यांचा संबंध होता म्हणून मोडल्या असें म्हणणें म्हणजे ' स्वदेशी चळवळीचे वेळीं बंगाल्यांत दुष्काळ पडला म्हणून तो स्वदेशी चळवळी-नेंच पडला, असें म्हणण्यासारखेंच अप्रयोजक आहे ! कोणतीही सार्व-जनिक संस्था जशी एकाच्याच मतानें उभारत नाहीं तशीच ती एकाच्याच मतानें मोडतही नाहीं. ती मोडण्यास एका व्यक्तीच्या मतापेक्षां दुसरी बलवत्तर कारणें असतात. असेंही गृहीत धरून चाललें कीं, ती एका व्यक्तीच्या मतानें मोडते. पण यावरून सिद्ध काय होतें कीं, त्या व्यक्तीचे मत विरुद्धपक्षाच्या मतांपेक्षां अधिक जोमदार असतें व त्यामुळें विरुद्धपक्षाचें कांहीं चालत नाहीं. उलटपक्षीं विरुद्धपक्षाच्या मतांत जर जास्त जोम असेल तर त्यानें एका व्यक्तीचें मत चालू न देतां आपलें मत जोरदार करून ती संस्था कां तारूं नये ? तात्पर्य, कोणतीही संस्था चालण्यास त्यांतील चालकांवर जरी बरीच जबाबदारी असते तरी ती ज्या वेळीं मोडते त्या वेळीं त्यांतील एका व्यक्तीच्या मतापेक्षां किंवा जबाबदारी-पेक्षां दुसरींही अनेक कारणें असतात; व या कारणांतच परिस्थिति,

लोकशिक्षणांत व, लोकमतांत फरक, राजकीय बंधनें इत्यादिकांचा समावेश होतों, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. आतां पुढाऱ्याचे अंगीं समेट करण्याची व प्रसंगविशेषीं हार खाण्याची विशेष शक्ति पाहिजे; ती असावी तितकी यांच्या ठिकाणीं नाहीं असें गृहीत धरून चाललें तरी कांप्रोमाईच्या किंवा समेटच्या सबबीवर एकादी संस्था मोडल्याचें पातक यांच्या माथीं येत असेल तर यांना विरुद्ध वागूं देऊन आपलेंसें करून घेण्याचें सामर्थ्य नसल्याचा आरोपही विरुद्धपक्षावर येईल. सार्वजनिक सभा यांच्या दुराग्रहानें मोडली असा आरोप करणारांना यांच्याशीं समेट करतां आला नाहीं ह्मणून दुराग्रहानें डेक्कनसभा विरुद्धपक्षानें स्थापिली असेंच ह्मणणें कबूल करावें लागेल. काँग्रेसचे पुढारी किंवा काँग्रेस यावर जेव्हां १९०६ सालीं टिळक यांनीं टीका केली व प्रत्यक्ष १९०७ सालीं जेव्हां काँग्रेसचें काम बंद पडलें, तेव्हांहीं विरुद्धपक्षाच्या वर्तमानपत्रांनीं वरच्याप्रमाणेंच काहूर करून या संस्थेचाही टिळकांनीं विध्वंस केला अशी त्यांच्यावर टीका केली. पण या पक्षाला असें कळेना कीं, काँग्रेसचा विध्वंस करून टिळकांना काय मिळणार होतें? ' कावीळ झालेल्या मनुष्याला सर्व जग जसें पिंवळें दिसतें, तद्वत् उत्कर्षासहिष्णुतेनें अंध झाल्यामुळें म्हणा किंवा राजकीय प्रगतिशास्त्रास पारखे असल्यामुळें म्हणा किंवा अन्य कांहीं कारणांमुळें ह्मणा यांची टीका किंवा यांच्या आचरणाचें तेज त्यांना सहन न होऊन त्यांनीं वरील प्रकारचे विचार ध्वनित केले असावे. वास्तविकपणें टिळक यांची त्या वेळची टीका किंवा आचरण विघातक नव्हतें एवढेंच नव्हे तर, बदललेल्या परिस्थितींत लोकमताच्या वाढत्या जोमास पुष्टिदायकच होतें.* इंग्रजी राज्यव्यवस्था व

* ता. २३ डिसेंबर १९०७ रोजीं सुरत येथें राष्ट्रीय सभा भरण्यापूर्वी बालाजी मैदानावर टिळक यांनीं तेथें जमलेल्या प्रतिनिधींस व लोकांस उद्देशून जें भाषण केलें त्यांत त्यांनीं सांगितलें:—

" We have not come to cause a split in the Congress, we do not want to hold a separate Congress, we want to see that the Congress does not go back. We solemnly say that we want to see the Congress moving with the time, we would not allow it to go back. Our views are misrepresented. It has been told that the new movement is an impediment to progress. *Our policy is not destructive*, we intend to make an effort to move the Congress on. Times are changed ; and so we want some modifications"—Tilak's speeches.—*By* H. R. Bhagvat.

इंग्रजी शिक्षण हिंदुस्थानांत सुरू झालें त्या वेळची स्थिति, किंवा अगदीं अलीकडचें उदाहरण म्हणजे कॉंग्रेस सुरू झाली त्या वेळची स्थिति व आतांची स्थिति यांत बरेंच अंतर जर पडलें आहे तर लोकमत तयार करण्याच्या साधनांतही फरक पडणें अवश्य आहे. ' लहानपणचें आंगडें मोठेपणीं येत नाहीं म्हणून मोठेपणीं मोठा आंगरखा शिवला पाहिजे, ' हें सामाजिक सुधारकांचें तत्व राजकीय सुधारणेसही बरोबर लागू पडत असून पालटलेल्या परिस्थित्यनुरूप राजकीय पुढारी व राष्ट्रीय संस्था यांच्यासंबंधानें जोरदार, निर्भीड व स्पष्टोक्तीची टीका होणें अत्यंत इष्ट आहे; व तशीच टीका टिळक यांनीं केली होती. अशी टीका करतांना त्या त्या संस्थांची किंवा पुढाऱ्यांची ते किंमत जाणत नव्हते असें नाहीं. पण नुसत्या गुणांची किंमत करून कोणत्याही संस्थेच्या प्रगतीचा मार्ग खुला होतो असें नाहीं. " मूल जेव्हां रांगेल, पडेल, टेंगळें येतील, बोलून घेईल, थोबाड्या खाईल तेव्हांच तें शरीरानें व मनानें बळकट होईल" असें जें डॉ. भांडारकर यांनीं विधवाविवाह–प्रतिबंध–निवारक–मंडळीच्या १९०६ सालच्या वार्षिक उत्सवाचे प्रसंगीं अध्यक्ष या नात्यानें सामाजिक प्रगतीसंबंधानें बोलून दाखविलें होतें तोच न्याय राजकीय स्थितींतही लागू पडतो. राजकीय संस्था किंवा पुढारी यांच्यावर सरळ बुद्धीनें कडक टीका झाल्याशिवाय त्यांत सुधारणा होणें कठिण आहे, किंबहुना राजकीय अडचणी जास्त जास्त उपस्थित होऊन लोकांच्या विचार व आचार-स्वातंत्र्यावर गदा येऊं पाहत असतां आणि लोकमताच्या प्रवाहास चलन न देतां जाणून बुजून त्यास बांध घालण्याचा प्रयत्न होत असतां दोषा-विष्करणात्मक कडक टीका करण्याचें पुढारी पत्रकर्त्यांचें कर्तव्य आहे. यासंबंधानें कलकत्त्याच्या ' न्यू इंडिया ' पत्रांत बाबू बिपिनचंद्रपाल यांनीं " Our criticism and Public life in India " या मथळ्याखालीं बनारसच्या कॉंग्रेसनंतर १९०६ सालीं लिहिलेल्या लेखांत जे विचार प्रगट केले आहेत तेच पुष्कळांना पसंत पडतील म्हणून त्यांतील महत्वाचा भाग येथें देतों. ते म्हणतातः—

"In the present stage of our national life which, as we have often said in these columns, is more of intellection than action. Those who shrink for whatever reasons it may be, from bringing out the acts and utterances of our public men into the full and

fierce light of truth and reason, do, it seems to us, a great and almost fatal disservice to the national cause. If the acts and utterances of the congress leaders had been subjected all these years to frank and fearless criticism, both the intelligence of the country and the characte: of the leaders would have improved far more than these seem to have done in course of the last twenty years. Freedom from frank criticism tends to develop autocratic habits of thought even in the most radical and democratic of leaders. Men whose acts and utterances are never questoned or opposed, gradually become the shoilt children of our over-indulgent and considerate public, and ultimately grow absolutely impatient of even the most honest differences of opinion. It is impossible to deny that these characteristcis have already been developed to a visible extent in the leadership of our present public life; and they are sappi.ɟg almost the very soul of that life in every Indian province, creating fatal factions among the more intrepid and active of our public men, and driving the more peace-loving and un-obstructive away from all public movements."

पत्रकर्ते या नात्यानें टिळक यांनीं पुढाकार घेऊन जसें लोकमत तयार केलें आहे तसेंच सामाजिक, धार्मिक व राजकीय बाबतींतही पुढाकार घेऊन सल्लामसलतीनें, संभाषणानें व उपदेशानें आपल्या मताप्रमाणें लोकमतासही चलन दिलें आहे हें ग्रामण्यप्रकरण, समत्तीवयाचा कायदा, हिंदुमुसलमानांचे दंगे, गणेशोत्सव, शिवाजी—उत्सव, राष्ट्रीय सभा, स्वदेशी चळवळ इत्यादि प्रसंगीं चांगलें व्यक्त झालें आहे. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं सामाजिक व धार्मिक बाबींवर लेख लिहून " पूर्वीचे आपलें सगळेंच कांहीं वाईट नाहीं व नव्यांत गृहण करण्यासारखें कांहींच नसतें असें नाहीं, अशा प्रकारच्या प्रवृत्तीकडे लोकमत वळविण्याचा जो पाया घातला त्यावर टिळक यांनीं पुढाकार घेऊन चांगली इमारत उठविली, एवढेंच नव्हे तर, ती चिरस्थाई करण्याचाही त्यांनीं प्रयत्न चालविला असें म्हटलें तरी चालेल. सामाजिक व धार्मिक बाबतींत त्यांच्याकडून अशा प्रकारचे प्रयत्न झाले आहेत कीं, एकीकडून सुधारणावादी लोक त्यांची सुधारकांत गणना करूं लागले आहेत; व दुसरीकडून धर्माभिमानी त्यांना धर्मोद्धारक म्हणूं लागले आहेत; आणि या गोष्टीस मुख्य कारण त्यांची व्यापक बुद्धि, तत्वदृष्टी व देशकालपरिस्थित्यनुरूप

होईल तितकें प्रगतिकारक स्वतःचें आचरण ठेवण्याविषयींची प्रवृत्ति हेंच होय." राजकीय प्रगति करण्याविषयींचा त्यांचा पुढारीपणा तर कोणासहीं नाकारतां यावयाचा नाहीं. राज्यव्यवस्थेचें धोरण सामान्य लोकांना माहित नसल्यामुळें यांनीं ते आपल्या प्रयत्नानें व आचरणानें लोकांस समजून दिलें आहे, हें सार्वजनिक सभेमार्फत लोकांना दुष्काळकोडाचें रहस्य समजावून देणें, स्वदेशी चळवळीचे वेळीं मुंबईच्या गिरणीवाल्यांच्या भेटी घेऊन मालाच्या फाजील किंमती न चढविण्याविषयीं त्यांना विनंति करणें, लोकांना घाऊक व खरा माल मिळावा म्हणून 'स्वदेशी स्टोअर' स्थापन करणें, जागजागीं व्याख्यानें देऊन उद्योगधंद्यांकडे व बहिष्कारयोगाकडे लोकांना उद्युक्त करणें, व राजद्रोहाच्या कायद्याचें तत्व समजावून देऊन आपणावर प्रसंग घेतला असतां तो निभावून नेऊन लोकांना पुढें पाऊल टाकण्याविषयीं धडा घालून देणें, इत्यादि गोष्टीवरून चांगले कळून येईल. सन १९०० सालीं साताराच्या प्रांतिकसभेंत मुंबई-सरकारच्या पिछेहाटी धोरणाबद्दल ठराव पास करण्याबद्दल व सन १९०६ सालीं बहिष्काराचा ठराव राष्ट्रीय सभेपुढें येण्याबद्दल व १९०७ सालीं राष्ट्रीय सभेनें पिछेहाटीचें धोरण न स्वीकारण्याबद्दल त्यांनीं प्रयत्न केल्यामुळे कित्येक लोक त्याबद्दल यांना दोष देतात. पण हा दोष यथार्थ नसून राजकीय प्रगति कशानें होते हें ज्यांना समजत नाहीं किंवा समजलें तरी जे जाणूनबुजून वेड पांघरतात त्यांच्याकडूनच आलेला आहे. वर राष्ट्रीय सभा किंवा तिचे पुढारी यांच्यावर लेखनद्वारें कडक टीका यांनीं कां केली यांत या आक्षेपाचें निरसन केलें असून बदललेल्या परिस्थितींत व वाढत्या लोकमताचा जोम पाहून सार्वजनिक संस्थांवर निर्भीडपणाची टीका करून स्वतःच्या आचरणानें टिळक यांनीं लोकांना सरळ मार्ग दाखवून दिल्याचेंच हें द्योतक आहे असें पुन्हां ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. राष्ट्रीय सभेंतील कित्येक नेमस्त लोकांना टिळक यांचें हें वर्तन फारच धोक्याचें वाटले. पण "पुढाऱ्याला देशाचें केवळ तात्कालिक कल्याण करावयाचें नसून सार्वकालिक कल्याण करावयाचें असतें; करितां केवळ वर्तमानकालाकडेच न पाहतां भविष्य कालावरही त्याची नजर असली पाहिजे" असें जें 'ज्ञानप्रकाश' कारांनीं १९०६ सालच्या एका लेखांत देशभक्त लोकनायकाचें जें एक लक्षण ठरविलें आहे त्या लक्षणास अनुस-

रूनच हें त्यांचें वर्तन होतें असें कोणाच्याही नजरेस आल्यावांचून राहणार नाहीं. आपल्या वर्तनानें राष्ट्रीय किंवा प्रांतिक सभेंतील कित्येक पुरस्कर्ते आज नाखुष झाले तरी पुढें मागें त्यांचे डोळे आपोआप उघडतील व राष्ट्रकार्याकरितां मग ते आपणास आपोआपच येऊन मिळतील असा पूर्वीपासून त्यांचा पक्का समज होता; व या समजाप्रमाणें गेल्या ८।१० वर्षांत इष्ट फळेंही दृष्टीस पडूं लागलीं आहेत. सामाजिक, राजकीय व औद्योगिक विषयांचा परस्पर संबंध असला तरी एकाच वेळीं एके ठिकाणीं अर्धवट रीतीन त्या सगळ्यांची चर्चा करून धड हेंही नाहीं आणि धड तेंही नाहीं असें करण्यापेक्षां राजकीय चळवळीसाठीच अवतीर्ण झालेल्या सभेंत राजकीय विषयांची सांगोपांग चर्चा व्हावी व औद्योगिक, सामाजिक वगैरे सभा घाईतल्या घाईत उरकून न घेतां त्यांना निराळा वेळ देऊन त्यांचीं कामें मनोभावें झटणाऱ्या त्या त्या लोकांकडून केल्यास विशेष कार्य होईल ही भावना आज सर्वांना वाटूं लागली आहे; व राष्ट्रीय सभेच्या पुरस्कर्त्यांपैकींच पुष्कळ पुरस्कर्ते सामाजिक व औद्योगिक परिषदेचे चालक असले तरी एकाच वेळीं सतरा घोडीं एके ठिकाणीं दामटल्यानें पुष्कळ नुकसान होत आहे, असेंही त्यांना कबूल करावें लागत आहे. तसेंच सातारच्या प्रांतिक सभेच्या वेळीं सरकारच्या पिछेहाटी धोरणाविरुद्ध ठराव पास करण्यास जे लोक कांकूं करीत होते त्याच लोकांना पुढें (१९०५ सालच्या एप्रिल महिन्यांत) लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दीच्या पिछेहाटी धोरणाबद्दल नापसंती दाखविण्याकरितां मुंबईस जंगी जाहीर सभा भरवून आपला नेमस्तपणा टाकावा लागला यावरून टिळक यांची त्या वेळची कटुता सार्थ होती किंवा नाहीं व त्यांचें त्या वेळचें वर्तन केवळ आपापसांत दुही माजविण्याचें होतें कीं, भावी उन्नतीच्या खऱ्या मार्गदर्शकाचें होतें याची साक्ष वाचकांस सहज पटेल. सातारच्या प्रांतिक सभेच्या प्रसंगीं, कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं, किंवा सुरतेच्या नेमस्त व राष्ट्रीय पक्षाच्या झटापटींत व्यक्ती किंवा स्नेही यांच्या संबंधापेक्षां स्वतःच्या मनाची खात्री व राष्ट्राचें खरें हित यांकडेच त्यांनीं विशेष लक्ष दिलें असून दुराग्रहास बळी न पडतां मिल्लनें म्हटल्याप्रमाणें "सदसद्विवेकबुद्धीच्या व मोठ्या योग्यतेच्या मनुष्यानें दुसऱ्यांचें

न जुमानतां स्वतःची मनोदेवता सांगते त्याप्रमाणेंच वागल्याचा "† त्यांनी प्रत्यय आणून दिला; किंवा सुशिक्षित पण अर्धवट अथवा दुटप्पी वर्तन ठेवणाऱ्या लोकांच्या मतप्रवाहाबरोबर आपण स्वतः वाहत न जातां अमेरिकेंतील प्रख्यात प्रेसिडेंट मि. गारफील्ड यांनीं एके प्रसंगीं ह्मटल्याप्रमाणें "दुसऱ्याच्या मतांबद्दल मी पूर्ण अभिमान बाळगतों; पण त्याहीपेक्षां अधिक महत्व मी माझ्या स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीस देतों."* याची सार्थता त्यांनीं पटविली. आतां राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाचा मान आजपर्यंत यांस मिळाला नाहीं हें त्यांच्या पुढारीपणास गौणत्व आणणारें आहे, अशी कित्येकांस शंका येईल. पण जोंपर्यंत राष्ट्रीय सभेचीं सूत्रें कांहीं विशिष्ट व्यक्तींच्या मतानें व तंत्रानें चालत आहेत; व जोंपर्यंत हीं मतें व हें तंत्र राष्ट्रीय उन्नतीच्या मार्गी कमकुवतीचें आहे असें स्पष्टपणें निदर्शनास आलें नाहीं ( हळू हळू तें येत चाललें आहे ) तोंपर्यंत टिळक यांना त्या सभेच्या अध्यक्षाचा मान मिळणार नाहीं; व उलटपक्षीं जोपर्यंत राष्ट्रीय सभा आपल्या मतास येऊन मिळणार नाहीं तोंपर्यंत हा मान ते स्वीकारण्यास तयार होतील किंवा नाहीं याचीही शंकाच आहे. मि. दादाभाई नौरोजीसारखे खुद्द राष्ट्रीय सभेचे तीन वेळ अध्यक्ष झालेले व सर्वानुमतें पुढारी ठरलेले गृहस्थच "राष्ट्रीय सभेनें आतां आपल्या मतांत व कार्यक्रमांत फरक करून बदललेल्या लोकमतानुसार तिनें आपलें वर्तन ठेविलें पाहिजे" असा कंठशोष करीत असतां, "या दादाभाईना आतां खूळ लागलें आहे," असेंही ह्मणणारे कित्येक कॉंग्रेसभक्त दृष्टीस पडतात, यावरून राष्ट्रीय सभेचे चालक आपलीं सूत्रें खुबिदार रीतीनें हालवून आपलीं अनियंत्रित सत्ता न गमविण्याविषयीं किती प्रयत्न करतात याची कल्पना करतां येण्यासारखी आहे. खुद्द राष्ट्रीय सभाच जेथें एका विशिष्ट राजकीय पंथाची

---

मिलनें ह्मटलें आहे:—

† "A man of conscience and known ability should insist on full freedom to act as he in his own judgment deems best and should not consent to serve on any other terms."

* गारफील्ड ह्मणतात:—

"I have great respect for the opinions of my constituents, but greater regard for my own conscience."

सभा झाल्यासारखी आहे तेथें टिळकांसारखे गृहस्थ आपल्या पुढारीपणानें ती आपल्या हातांत घेऊं पाहत आहेत अशी शंका येणें स्वाभाविक आहे. तात्पर्य, आज राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाचा मान ह्मणजेच पुढारीपणाचा सर्व मान नसून राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष न झालेल्या अशा कित्येक गृहस्थांचीही आज मितीस पुढाऱ्यांत गणना होत आहे; व राष्ट्रहिताचे कामीं आपल्या मतानें व वर्तनानें बहुजनसमाजास ते आपल्याकडे वळवून घेत आहेत. राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाचा जो गौरव होतो त्याहूनही टिळक हे कलकत्ता, मद्रास, नागपूर वगैरे ठिकाणीं गेले असतां त्यांचा जो गौरव झाला ( आणि गौरव करणारांत कित्येक सुशिक्षित व पुढारी कॉंग्रेसभक्तही होते ) यावरून त्यांच्या योग्यतेची व पुढारीपणाची खात्री पटली आहे. केसरींतील लेखांचीं हल्लीं हिंदी, कानडी, गुजराती वगैरे भाषांत भाषांतरें होऊन त्याचीं जीं निराळीं पत्रें निघत आहेत यावरूनही ही गोष्ट सिद्ध होत आहे. खुद्द मुंबई इलाख्यांत तर केसरीपत्राच्या द्वारेंच नव्हे तर, गणेशोत्सव, शिवाजी—उत्सव, स्वदेशी चळवळ वगैरे प्रसंगीं आपलीं मतें सुशिक्षित—अशिक्षित अशा सर्व लोकांपुढें मांडून त्यांनीं बहुजनसमाज आपलासा करून घेतला आहे हें नाशिक, बेळगांव, धारवाड, पंढरपूर वगैरे ठिकाणीं त्यांचा जो गौरव झाला त्यावरून सर्वांना ठाऊकच आहे. कोणी कोणी असा आक्षेप घेतात कीं, केवळ अडाणी लोकांचें रंजन करून अथवा लोकछंदानुवर्तन ठेऊन टिळक यांनीं पुढारीपणा उपटला आहे. पण या आक्षेपांत मुळींच अर्थ नाहीं. हल्लींचा काल कांहीं अगदीं अडाणीपणाचा काल नसून साधारण लिहितां वाचतां येणारा व व्यवहारदक्ष इसम आपल्या सदसद्विवेकबुद्धीनें खरें देशहित कशांत आहे याची उघडपणें चर्चा करीत नाहीं तरी मनांत गांठ घालूं लागला आहे. अर्थात् आपणास पसंत पडतो त्यासच पुढारी ठरवून त्याचींच मतें तो ग्रहण करूं लागला आहे. अर्थात् टिळक यांचीं मतें बहुजन—समाजास पसंत आहेत ह्मणूनच त्यानें त्यांस आपले पुढारी केलें आहे; व टिळक यांनींही आपल्या मताच्या व आचरणाच्या जोरावर समाजास आपणाकडे वळविलें असून त्याचें पुढारीपण त्यांनीं पतकरिलें आहे; व कलकत्त्याचे ‘ न्यूइंडिया ’—कर्त्यांनीं ह्मटल्याप्रमाणें “ पुढारी व अनुयायी हीं एका काठीचींच दोन टोंकें असून अनु-

यायांना अनुसरण्याची ज्याच्यांत खुबी आहे तोच पुढारी विजयी होतो."* याची प्रचीती त्यांनीं आणून दिली आहे.

लोकमत तयार करतांना पुढाऱ्यानें समाजाचें शिक्षण, ग्राहकशक्ति, काम करण्याची योग्यता, त्यास लागणारीं साधनें, इत्यादि गोष्टी लक्षांत आणून ज्या योग्यतेचा समाज असेल त्या मानानेंच देशहिताचीं तत्वें त्याच्या मनांत बिंबवून त्यांना प्रगतीच्या मार्गास लाविलें पाहिजे; व त्यांच्या चुका सुधारून, त्यांजवर आलेलीं संकटें आपणावर आलीं आहेत असें समजून त्यांचा त्यानें प्रतिकार केला पाहिजे. टिळक यांच्या समाजधुरीणत्वाचें हेंच एक मुख्य अंग असून गणेशोत्सव, शिवाजी–उत्सव, स्वदेशी चळवळ, इत्यादि प्रसंगीं याचा त्यांनीं चांगला उपयोग केलेला दिसतो. " खानेकु हं और लढनेकु मेरा भाई " या ह्मणीप्रमाणें मानाचे वेळीं पुढारीपणाचा मान तेवढा स्वीकारावयाचा व लोकांवर प्रसंग बेतला ह्मणजे " परस्परं समर्पयामि " हा मंत्र जपावयाचा, असें त्यांच्या हातून कधीं झालें नाहीं, हें १८९६ सालीं 'सार्वजनिक सभे'च्या वक्त्यांवर प्रसंग गुदरून जेव्हां खटले झाले, रायगडच्या शिवाजी–उत्सवास प्रथम जेव्हां अडथळा झाला, १८९४ सालीं पुण्यांतील गणेशोत्सवांत जेव्हां हिंदु-मुसलमानांत दंगा झाला; १९०४ सालीं जेव्हां पुण्यांतील कांहीं मेळेवाल्यांची व पोलिसांची चकमक उडून पोलिसांनीं मेळेवाल्यांवर खटला केला; व १८९७ सालीं ' प्रतोद ' आणि ' मोदवृत्त ' व १९०६ सालीं ' भाला ' पत्रावर जेव्हां राजद्रोहाचे खटले झाले, व १९०८ सालीं पुण्यास पिकेटिंगसंबंधीं खटले झाले, त्या वेळीं सल्लामसलतीनेंच नव्हे तर, अंग–मेहनतीनें व पदरचे पैसे खर्च करून त्यांनीं लोकांस मदत करून राजकीय अडथळ्यांचें निवारण केलें आहे. तसेंच जेथें तत्व प्रतिपादन करणें योग्य आहे तेथें त्यांनीं तत्व प्रतिपादिलें आहे; व जेथें तत्वज्ञान कळण्यास बिकट असतें तेथें तत्वाचें विवरण सोप्या व सुलभ दृष्टांतांनीं किंवा गोष्टींच्या रूपानें समाज पाहून त्यांनीं प्रतिपादन केलें आहे; व तत्व, दृष्टांत किंवा गोष्टी यांचाही उपयोग होत नाहीं तेथें निष्ठेनें अमुक

' न्यू इंडिया ' कर्त्यांनीं ह्मटलें आहे:—

* "Leader and led are only two ends of the same stick; and he who has the knack of following his own follows makes the most successful leader among them."

एक करा, असा सरळ उपदेश त्यांनीं केला आहे. यासंबंधीं जुनीं उदाहरणें पुष्कळ सांपडतील; पण अगदीं अलीकडचें उदाहरण ह्मटलें ह्मणजे स्वदेशी चळवळीचा प्रसंग हें होय. या चळवळीच्या वेळीं तात्विक दृष्टीनें त्यांनीं आपले विचार तर लोकांपुढें मांडलेच आहेत; तथापि, तात्विक विचारांपेक्षां लोकांच्या मनोवृत्ती जास्त जागृत ज्यानें होतील अशा विचारसरणीचें त्यांनीं पुष्कळ वेळां अवलंबन केलें आहे. या त्यांच्या विचारसरणीवरून कित्येकांनीं असे आक्षेप घेतले आहेत कीं, टिळक हे अर्थशास्त्र बाजूला ठेऊन ही चळवळ लोकांपुढें मांडतात व हट्टानें किंवा खुनशीपणानें बहिष्कारयोगाचें घोंगडें मुद्दाम त्यांच्या गळ्यांत अडकवितात. पण या आक्षेपांत अर्थ नसून स्वदेशी चळवळीसारखी कपिलाषष्ठीप्रमाणें कधीं काळीं उत्पन्न होणारी चळवळ राष्ट्रांत सुरू झाली ह्मणजे पुढाऱ्यानें त्या प्रसंगीं काय केलें पाहिजे याचें त्यांना ज्ञान नसतें ह्मणूनच ते असे आक्षेप घेतात अशी माझी समजूत आहे. तत्वप्रतिपादन सर्वच ठिकाणीं योग्य असतें, किंवा उठलें कीं सुटलें, अर्थशास्त्र पुढें ठेवल्यानेंच कार्यनिष्पत्ति होते असें नाहीं. पुढाऱ्यानें तात्विक दृष्टीनें विचार करूं नये किंवा अर्थशास्त्राकडे ढुंकून पाहूं नये असें माझें ह्मणणें नाहीं. त्यानें हें एकच शास्त्र काय, पण असलीं हजारों शास्त्रें पाहावीं. पण तीं केवळ आपल्या मनाची तयारी करण्याकरितां पाहावीं; व मनाची एकदां तयारी झाली ह्मणजे मग तीं शास्त्रें वेळीं अवेळीं लोकांपुढें मांडण्यांत अर्थ नसून उद्दिष्ट कार्याकडे लोक कसे वळतील हेंच त्यानें पाहिलें पाहिजे. घरास आग लागल्यावर 'पाण्यानें अग्नि विझतो कीं नाहीं, पाणी जमिनींत किती अंतरावर सांपडतें, अमुक ठिकाणीं विहीर काढल्यास पाणी लागेल किंवा नाहीं' इत्यादि रसायन-भूगर्भादि शास्त्रें धुंडाळून त्यांतील तत्वें घरवाल्यास सांगण्यानें घराची आग कधींही विझणार नाहीं. अशा वेळीं हाताखालचें असेल नसेल तितकें पाणी एकदम आणूनच आग विझविली पाहिजे. त्याचप्रमाणें पुढाऱ्यानें वेळीं अवेळीं शास्त्राची पोथी पुढें सोडून कधींही कार्य व्हावयाचें नाहीं. संधी काहीं वरचेवर येत नसते; व एकदां एक प्रसंग गेला ह्मणजे फिरून तसाच लवकर येतो असें नाहीं. राष्ट्रीय उलाढालींत तर असे प्रसंग शतकाशतकांनीं येत असतात. तेव्हां या प्रसंगीं लोकांच्या मनोवृत्ति जागृत करूनच पुढाऱ्यानें राष्ट्रकार्य केलें पाहिजे; व

अशाच रीतीनें राष्ट्रकार्यें झाल्याचीं उदाहरणेंही इतिहासांत सांपडतात. लोखंड निवल्यावर जसें तें बडवून वाढवितां येत नाहीं, तद्वत् मनोवृत्ति उचंबळून सोडणारे प्रसंग एकदां दवडले कीं, राष्ट्रीय प्रगतीला चलन मिळत नाहीं. बंगालच्या फाळणींतून उदय पावलेल्या स्वदेशी चळवळीची गोष्ट अशीच होती; व काय झालें आहे आणि काय केलें पाहिजे याकडेच लोकांच्या मनोवृत्ति ओढल्या पाहिजे होत्या; व ह्मणून टिळक यांनीं तशा ओढण्याचें प्रयत्न केले हें पुढाऱ्याच्या कर्तव्यांपैकींच एक कर्तव्य केलें असें म्हटलें पाहिजे. धर्म, देशभक्ति, इत्यादि शब्दांच्या टिळक यांनीं निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या व्याख्या कां केल्या आहेत, याचेंही कारण वरील विवेचनावरून कळून येईल. तात्पर्य, ज्या योग्यतेचा समाज असेल त्या मानानें प्रसंग पाहून राजकीय, सामाजिक अथवा धार्मिक विषयांचें प्रतिपादन करून आलेल्या संधीचा राष्ट्रीय प्रगतीकडे त्यांनीं किती उपयोग करून घेतला आहे, हें त्यांच्या चरित्रक्रमावरून सहजी वाचकांस कळून येईल.

नैतिक आचरण हें एक पुढारीपणाचें मुख्य लक्षण आहे; व तें टिळक यांनीं आपल्या वर्तनांत वेळोवेळीं लोकांच्या निदर्शनास आणलें आहे. उपदेश करण्याचें काम सोपें आहे; पण त्याप्रमाणें स्वतः आचरण करण्याचें काम बिकट आहे. परंतु टिळक यांनीं लोकांना ज्याप्रमाणें उपदेश केला आहे तशीच त्याची अंमलबजावणी आपल्या आचरणांत केली आहे. लोकांना स्वदेशी कपडा वापरा ह्मणून जसें सांगितलें आहे तसाच तो त्यांनीं स्वतः वापरला आहे. आज पंधरावीस वर्षें देशी कपडा त्यांच्या अंगावर असून दुसऱ्याच्या हलगर्जीपणामुळें चुकून एकदां परदेशी कापडाचे अंगरखे तयार झाले असतां ते त्यांनीं फेकून दिले. तसेंच काशीस गेल्यावर धर्मश्रद्धेनें कोणी भोंपळा सोडतो तर कोणी वांगीं सोडतो, तसेंच टिळक हे १९०५ सालच्या कॉंग्रेसला काशी येथें गेलें असतां धर्माभिमानास्तवच नव्हे तर देशाभिमानास्तव त्यांनीं परदेशी साखर न खाण्याची शपथ वाहिली व ती त्यांनीं आजपर्यंत पाळलीही आहे. केसरी वर्तमानपत्रास शक्य तितका वेळ स्वदेशी कागद ते वापरीत; व मेणबत्त्या, साबण, काडयांच्या पेटया इत्यादि किरकोळ जिन्नसही ते देशीच घेत. देशी वस्तु कोठें मिळतात, स्वदेशी उद्योगधंदे कोठें

चालतात, इत्यादि गोष्टींची वर्तमानपत्रांतून तर हे नेहमीं माहिती देत असतच; पण देशी धंद्यांचें प्रत्यक्ष ज्ञान लोकांना व्हावें व त्यांस उत्तेजन मिळावें ह्मणून त्या कामाकडे त्यांनीं पदरचे कांहीं पैसेही खर्च केले आहेत. अमदाबाद येथील खालावत चाललेल्या काड्यांच्या पेटीच्या कारखान्यास चलन देऊन, तो धंदा शिकण्याकरितां पदरच्या पैशानें कांहीं विद्यार्थी निरनिराळ्या कारखान्यांत पाठवून, उद्योगधंद्यांच्या अभिवृद्धीस्तव 'पैसा—फंड' ह्मणून जो एक फंड जमत आहे तो जमविण्याचें कामीं एका लायख इसमाचा खर्च स्वतः कांहीं दिवस चालवून, देशी मालास उत्तेजन मिळावें ह्मणून त्याचा बाजार अथवा प्रदर्शनें भरवून, घाऊक किंमतीनें व मुबलक माल लोकांना मिळावा ह्मणून त्याचा प्रसार करण्याच्या हेतूनें मुंबईस 'स्वदेशी स्टोअर' या नांवाची संस्था स्थापन करून व रसापासून एकदम गूळ व साखर कशी तयार होते, हें प्रत्यक्ष लोकांस दाखविण्याच्या हेतूनें स्वतः त्यासंबंधीं यत्रें आणवून त्यांनीं बोलण्याप्रमाणें होईल तितकें वागण्याचें अथवा नैतिक आचरणाचें जें उदाहरण त्यांनीं घालून दिलें आहे तें राष्ट्रीय प्रगतीस खरोखर अत्यंत हितावह आहे. लोकांचा विश्वास बसून त्यांच्यांत कर्तव्यजागृति उत्पन्न होण्यास ज्या कित्येक गोष्टी कारणीभूत होत असतात त्यांत पुढाऱ्यांचें हें नैतिक वर्तनच पुष्कळ अंशीं कारणीभूत होतें, ही गोष्ट कोणासही नाकारतां यावयाची नाहीं. टिळक यांच्या हातीं कांहीं सरकारी सत्ता नाहीं, पैशाच्या जोरावर काय पाहिजे तें करीन ह्मणण्याइतका त्यांच्याजवळ पैसा नाहीं, त्यांनीं कांहीं फौजफांटा ठेवलेला नाहीं, किंवा त्यांच्याजवळ शस्त्रास्त्रें आणि दारूगोळा नाहीं. त्यांच्याजवळ फक्त नैतिक आचरण्याची शक्ति आहे; व ही शक्ति वरील सर्व सामग्रीपेक्षां मोठी आहे. लोकांस निरपेक्ष रीतीनें योग्य सल्ला देणें; त्यांचीं संकटें तीं आपलीं संकटें समजणें; व प्रामाणिकपणा, धैर्य, स्वावलंबन आणि कर्तव्यतत्परता दाखविणें, हीं या शक्तीचीं दृश्य स्वरूपें असून या शक्तीवर त्यांनीं हवीं तीं कामें उठविलीं. या त्यांच्या शक्तीवरून सेनेकानें सॉक्रेटिसाला उद्देशून पुढाऱ्याचें जें लक्षण बांधलें आहे किंवा प्लेटोनें 'लोकनियंता' या शब्दाची जी व्याख्या केली आहे तेंच लक्षण व तीच व्याख्या टिळक यांस बरोबर लागू पडते. वरील थोर गृहस्थांचें उद्गार असे आहेतः—

"मनुष्यास लोकनियंता अशी संज्ञा प्राप्त होण्यास त्याला न्यायाधीशाचें वगैरे सरकारी काम खरोखरी असलें पाहिजे असें नाहीं. असे लोक बहुत आहेत कीं, ज्यांस वर सांगितलेलीं सरकारी कामें असतात व सरकारांतून अंमलदाराचीं चिन्हें व इतमामही मिळालीं असतात. तसेंच किताबांनीं थोरपणा येतो, असें जर कोणास वाटत असेल तर मोठ मोठे रावबहादूर वगैरे किताबही बहुतांस असतात. तथापि, वास्तविक पाहिलें असतां हे कोणी अत्यंत नीच व हलक्या पदवीचे लोक आहेत, असें एखाद्या विचारी मनुष्यास वाटावें अशी त्यांची योग्यता असते. तर, दुसऱ्यांनीं कोणत्याही कामांत आपली मसलत घेतली असतां त्यांस उत्तम शाहाणपणाचा उपदेश करावा, आपल्या नगरांतील लोकांस सदाचरण करण्याविषयीं उत्तेजन कसें द्यावें व त्यांच्या मनांत प्रामाणिकपणा, देवधर्मावर भक्ति, उदारपणा, स्वदेशप्रीति इत्यादि सद्गुण कसे भरवून द्यावे, हें ज्या पुरुषास कळतें, तो मग किती कां दरिद्री असेना किंवा मोडक्या झोंपडींत कां राहीना? फुटार्क ह्मणतो कीं, तो पुरुषच खरा फौजदार, खरा न्यायाधीश व खरा लोकनियंता होय."*

## ग्रंथरचना व इतर लेख.

टिळक यांचा मुख्य व्यवसाय वर्तमानपत्र चालवून राजकीय विषयासंबंधानें लोकमत जागृत करणें हा जरी होता तरी त्यांनीं मधुन मधुन चांगली ग्रंथरचनाही केली आहे. कित्येकांच्या मतें राजकारण व ग्रंथरचना यांचा विरोध असून राजकारणी मनुष्याच्या हातून विद्यादेवीची उपासना होऊन चांगले ग्रंथ निपजावयाचे नाहींत, किंवा ज्या मनुष्याच्या हातून असली ग्रंथरचना होते तो राजकारणांत निष्णात होणार नाहीं. पण हें मत चुकीचें आहे. हल्लींच्या काळीं राजकारणाचीं मुख्य स्थानें जीं इंग्लंड जर्मनी, अमेरिका वगैरे राष्ट्रें आहेत त्यांत राजकारणपटु लोकांनीं चांगले ग्रंथ केल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. खुद्द विलायतेंतील प्रख्यात मुत्सद्दी मि. ग्लॅडस्टन यांचेंच एक मोठें उदाहरण असून त्यांनीं आपल्या ग्रंथरचनेनें व लेखांनीं इंग्रजी वाङ्मयांत किती भर घातली आहे हें सर्वांच्या समोर आहे. तसेंच एकादा विद्याव्यासंगी, वाङ्मयपटु, अथवा तात्विक दृष्टीनें विचार करणारा मनुष्य चांगला राजकारणी निपजतो हें माजी प्रधान मि. बाल्फर यांच्या उदाहरणावरून समजून येण्यासारखे असून राज्यकारभाराची धुरा स्वीकारण्यापूर्वीच ह्मणजे १८८७ सालीं चलनी नाण्याचा प्रश्न निघून कमिशनचे अध्यक्ष नेमलें असतां त्यांतील कित्येक

* चिपळूणकरकृत 'सॉक्रेटिसाचें चरित्र.'

भानगडीच्या प्रश्नासंबंधानें त्यांनीं जी कुशाग्रबुद्धि दाखविली त्याबद्दल मि. जॉन मोर्ले यांनींही त्यांची तारीफ केली आहे. तात्पर्य, " राजकारण आणि ग्रंथरचना यांत विरोध नाहीं, एवढेंच नव्हे तर, उलट विद्वान् मनुष्य राजकारणांत पडला तर त्याची दृष्टी अधिक फांकून त्याला मनुष्याच्या स्वभावाचें व वर्तनाचें बरोबर ज्ञान होतें; व जो राजकारणांत निमग्न असतो त्याची विद्येच्या सहवासानें स्वार्थबुद्धि नष्ट होऊन तो प्रगल्भ विचारांचा व उदात्त मनोवृत्तीचा बनतो "* असें जें त्रिचनापल्ली येथील ' वेन्स्डे रिव्ह्यू ' नें एका लेखांत म्हटलें आहे तेंच खरें आहे. आतां वरील नियमास अपवाद नाहीं असें नाहीं. पण सामान्यपणें राजकारणांत कुशलता दाखविणें व चांगली ग्रंथरचना करणें यांत विरोध नसून एकांत जो हुषार असतो त्याला दुसऱ्या गोष्टींत हुषारी दाखविण्यास मुळींच अडचण पडत नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे.

टिळक यांनीं राजकारणपटुत्वाबरोबर आपलें ग्रंथकर्तृत्वही दाखविलें आहे हें त्यांच्या अलीकडच्या " वेदकालचें आर्यांचें वसतिस्थान " " The Arctic Home in the Vedas. " या ग्रंथावरून कोणासही कळून येईल. यापूर्वी त्यांनीं मृगशीर्ष ( Orion ) म्हणून एक ग्रंथ लिहिलेला आहे व त्यांत ज्योतिषशास्त्राच्या आधारें वेदाचा काल ठरविला आहे. हे दोन्ही ग्रंथ इंग्रजींत आहेत. " हे ग्रंथ इंग्रजींत कां लिहिले ? मराठींत लिहिले असते तर मराठीवाङ्मयांत चांगली भर पडली असती, " अशी कित्येक विद्वान् गृहस्थांनींही शंका घेऊन त्यांनीं टीका केली होती. पण १९०६ सालच्या मराठी ग्रंथकारांच्या संमेलनांत या टीकेस टिळक यांनीं जें उत्तर दिलें आहे त्यानें पुष्कळांचें समाधान होईल असें मला वाटतें.

---

* ' वेन्सडे रिव्ह्यू ' ह्मणतोः—

" There is no necessary antagonism between politics and literature. On the contrary to a man of letters a political life would give a larger outlook and a more accurate measure of his fellows, while a busy politician will find in literature the best corrective to the selfishness so incidental to party-warfare which would enable him to detach himself may be on rare occasions, form its din and live in an atmosphere of right feeling and noble thinking."—*26th July 1905.*

विषयप्रतिपादनाची शैली, प्रमाणें देण्याची रीत, अनुमानें व तर्क करण्याची पद्धत, सामान्य गोष्टींवरून विशेष सिद्धांत काढण्याची किंवा विशेष गोष्टींवरून सामान्य सिद्धांत काढण्याची तऱ्हा, इत्यादि गोष्टी पाहून विद्वान् नेटिव गृहस्थांनीं किंवा पत्रकर्त्यांनींच नव्हे तर या देशांतील व परदेशांतील कित्येक अँग्लो-इंडियन पत्रकर्त्यांनीं व विद्वान गृहस्थांनींही त्यांची तारीफ केली आहे. ही तारीफ कशा प्रकारची आहे हें त्यांच्या पुस्तकासंबंधानें जे अनेक अभिप्राय प्रगट झाले आहेत ते वाचले म्हणजे वाचकांना कळून येईल. तथापि, त्याची थोडी बहुत कल्पना यावी म्हणून तीन चार अभिप्रायांतील महत्वाचे भाग पुढें देतों:—

'बेंगाली' कर्ते म्हणतात:—

"The *Orion* and the *Arctic Home in the Vedas* may be said to have thrown new light upon the antiquity of the Vedas and the real meaning of certain Vedic texts which had so long baffled the ingenuity of Vedic commentators from Sayana to his modern successors. Reading those books one might well exclaim:—

"Vedas and Vedic laws lay hid in night"
"God said "Let Tilak be ! and all was light"

मलबारी शेटजीचें 'व्हॉइस ऑफ इंडिया' (मुंबई) पत्र म्हणतें:—

"Mr. Tilak's is a learned and cleaerly-arranged treatise of more than 450 pages, every one of which testifies to his scholarship and research; the theory is so novel and so facinating that the public will undoubtedly like to know about it."-22-8-03.

"टाइम्स ऑफ इंडिया" कर्ते म्हणतात:—

"We are sure that the book will be welcomed as a most learned and valuable contribution to the solution of an extremely fascinating problem. All the arguments are so well arranged and the exposition of the subject is so admirably lucid that the "Arctic Home in the Vedas" may be read with pleasure and profit by the general reader who has little knowledge of astronomy, philology and geology and still, less of Sanskrit lore."

—Aug-8-03.

अमेरिकेंतील बोस्टन युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट व "पॅराडाइस फाउंड" या ग्रंथाचे कर्ते प्रख्यात विद्वान् गृहस्थ डा. डब्ल्यू. एफ्. वॉरन यांनीं शि-

कागो येथील ' धी ओपन कोर्ट ' नामक मासिक पुस्तकांतून अभिप्राय देतांना पुढील मत प्रगट केलें आहे:—

" In the judgment of the present writer the array of evidences set forth is far more conclusive than any ever attempted by an Indo-Iranian scholar in the interest of any earlier hypothesis. Absolute candor and respect for the strictest methods of historic and scientific investigation characterize the discussion throughout. "

हा ग्रंथ लिहिते वेळीं त्यांना कित्येक पुस्तकांची जुळवाजुळव करतांना मोठा त्रास पडला. कांहीं पुस्तकें तर मद्रास, मुंबई किंवा कलकत्ता येथील कोणत्याही लायब्ररींत मिळालीं नाहींत. ' पॅरॅडाइझ फाउंड ' या पुस्तकासंबंधानें तर त्यांनीं एकदां असे उद्गार काढले कीं, " इकडे जेव्हां हें पुस्तक मिळेना तेव्हां मी ते अमेरिकेहून आणविलें. " तसेंच वैदिक वाङ्मय जर्मन भाषेंत बरेंच प्रसिद्ध झालें असल्यामुळें जर्मन भाषाही शिकण्याचा त्यांनीं थोडा बहुत प्रयत्न केला; व " Whitker's modern method of learning German " अशासारखीं कित्येक पुस्तकें आणवून त्यांनीं तीं वाचलीं; व एक वेळ राजा रविवर्मा यांच्या प्रेसमध्यें जे जर्मन पेंटर्स आहेत त्यांच्याकडे जाऊन जर्मन भाषा शिकावी असेंही त्यांच्या मनानें घेतलें होतें; पण कांहीं कारणानें ती गोष्ट साधली नाहीं. ग्रंथ लिहिण्यापूर्वी वेदांतील कित्येक गोष्टींवर आपल्यांतील जुन्या पंडितांचीं मतें घ्यावीं म्हणून त्यांनीं मद्रास, काशी वगैरे ठिकाणीं जाऊन अशा लोकांच्या भेटी घेतल्या; व श्रीमत् कृष्णानंद सरस्वतीसारख्या विद्वान् गृहस्थांशीं त्यासंबंधानें वादही केला. असो; अशा प्रकारें पूर्व तयारीनें रचलेल्या ग्रंथाची आमच्या देशांतच नव्हे तर सर्व जगभर ख्याति होऊन दोन वर्षांच्या आंतच हजार प्रतीची पहिली आवृत्ति संपून गेली. हर्बर्ट स्पेन्सरसारख्या तत्ववेत्त्याचे कित्येक ग्रंथांची पाहिली आवृत्ती खपण्यास पांच पांच साहा साहा वर्षें जेथें लागलीं तेथें टिळक यांचा ग्रंथ दोन वर्षांच्या आंतच खपला यावरून त्यांच्या पुस्तकाची योग्यता वाचकांस कळून येईल.

गेल्या सात आठ वर्षांत ' आर्यांचें मूलस्थान ' या ग्रंथाखेरीज इतर मोठाले ग्रंथ जरी त्यांनीं लिहिले नाहींत तरी प्रसंगोपात्त 'The Path of the soul ' म्हणजे " मृत्यूनंतर आत्म्याचा मार्ग " या सारखे कांहीं

किरकोळ लेख इंग्रजींत लिहिले आहेत. तसेंच पार्शांच्या एका कोशाकरितां 'अवेस्ता' हा शब्द लिहून त्यासंबंधीं बरीच माहिती इंग्रजींत दिली आहे; व कोल्हापूरच्या 'विश्ववृत्तमासिक' पुस्तकाच्या पहिल्या अंकांत 'आशेची निराशा व निराशेची आशा' हा लेख मराठींत लिहिला आहे. अशा प्रकारचे किरकोळ लेख आपापल्या मासिकपुस्तकास किंवा पत्रांस लिहून द्यावेत ह्मणून चांगल्या चांगल्या लोकांकडून यांस वरचेवर पत्रें येत. पण त्यांनींच एके प्रसंगीं उद्गार काढल्याप्रमाणें " आपल्या पोरास उपाशी ठेऊन दुसऱ्यास जेवूं घालण्यांतला हा प्रकार" असल्यामुळें असले लेख लिहिण्याकडे त्यांची प्रवृत्ती कमी होती; व त्यांनीं अंगिकारिलेल्या उद्योगामुळें त्यांस तसा वेळही मिळत नसे.

## प्रवासाचें धोरण व सूक्ष्म अवलोकन.

टिळक यांनीं आपला व्यवसाय संभाळून आपल्या हातून होईल तितका प्रवास केला. हा प्रवास मुख्यत्वें करून उत्तर हिंदुस्थान, मद्रास, सीलोन, ब्रह्मदेश वगैरे ठिकाणचा असून तो बहुधां राष्ट्रीय सभेस गेल्यानंतर त्या त्या भागांतच केलेला आहे. मुंबई इलाख्यांत मात्र सार्वजनिक चळवळी निमित्त कित्येक ठिकाणीं ते मुद्दाम गेले होते. हिंदुस्थानाबाहेर प्रवास करण्याचें त्यांच्या मनांत होतें; व प्रो. छत्रे यांची सर्कस जेव्हां जपानमध्यें गेली होती त्या वेळीं असा योग आला होता; व ते जपान, अमेरिका वगैरे देशास जाणार होते. पण मध्येंच बाबामहाराजांच्या खटल्याचें शुक्लकाष्ठ पाठीमागें लागल्यामुळें हा विचार जेथल्या तेथेंच राहिला. असो; टिळक यांनीं जेवढा प्रवास केला तेवढ्यांत ज्ञानसंचय व संचित ज्ञानाचा व्यय मोठ्या कुशाग्रबुद्धीनें केलेला दिसून येतो. यांच्या प्रवासाचें धोरण निवळ मोठ्या व भव्य इमारती, राजमंदिरें, देवळें किंवा प्रेक्षणीय स्थळें हीं पाहण्याकडेच नसून ठिकठिकाणीं सामाजिक, राजकीय, धार्मिक, औद्योगिक व शिक्षण–विषयक चळवळी कशा होत आहेत व त्यापासून राष्ट्रोन्नत्तीस कितपत साहाय्य होत आहे, हें पाहण्याकडे असे. तसेंच प्राचीन इमारती, त्यांवरील लेख, जुने ग्रंथ, देशभाषा इत्यादिकांवरून हिंदूंचा प्राचीन इतिहास व सुधारणा यांविषयीं त्यांनीं कांहीं अनुमानेंही काढलीं आहेत. सीलोन व ब्रह्मदेश इकडील प्रवास आटोपून आल्या-

नंतर आठ वर्षांपूर्वी त्यांनीं पुणें येथें एक जाहीर व्याख्यान दिलें. त्यांत त्यांनीं पुढील गोष्टी सांगितल्याः—

( १ ) " हिंदुधर्मांत अनेक मते असलीं तरी त्या सर्वांत एकसारखीं सांपडणारीं अशीं कांहीं तत्वें आहेत. या तत्वामुळेंच एवढ्या मोठ्या विस्तीर्ण देशांतील भिन्नभिन्न भाषा बोलणाऱ्या लोकांत एक प्रकारचा धर्मैक्यभाव राहिलेला आहे; निरनिराळ्या प्रांतांतून हिंदुधर्माचीं जी प्रसिद्ध क्षेत्रें किंवा देवालयादि संस्था आहेत त्यामुळें हा ऐक्यभाव आतांपर्यंत जागृत राहिलेला आहे."

( २ ) मद्रासकडील आय्यर, आय्यंगार किंवा आचार्य वगैरे महाराष्ट्र लोकासंबंधानें त्यांनीं असें ह्मटलें आहेः—

" दोनशें वर्षे भिन्न भाषा बोलणाऱ्या हिंदु लोकांच्या समाजांत राहूनही या गृहस्थांनीं महाराष्ट्रभाषेबद्दल जो अभिमान व प्रेम कायम ठेविलें आहे तें खरोखरच वर्णनीय आहे; व त्यापासून भिन्न परिस्थितींत आपलें वैशिष्टय कायम ठेवण्याचा महाराष्ट्र—समाजाचे अंगीं असलेला गुण चांगला निदर्शनास येतो...... या लोकांचा महाराष्ट्राशीं पूर्वी असलेला संबंध चिरकाल कायम राहण्याचें खरें साधन ह्मटलें ह्मणजे इकडील व तिकडील लोकांचा शरीरसंबंध सुरू होणे हे होय. तंजावरचे राजघराण्याचा व बडोद्याचे राजघराण्याचा झालेला संबंध आपणास माहित असेलच. तंजावरचें राजघराणे व मराठे सरदार यांनीं जें उदाहरण घालून दिलें आहे तेच ब्राह्मणमंडळीनें उचलले पाहिजे."

( ३ ) " तंजावरास जीं पुस्तकें आहेत तीं मराठ्यांच्याही पूर्वीच्या 'नायक' नांवाच्या हिंदु राजांनीं गोळा केलेलीं आहेत. त्यांत चार पांच लिपींतील संस्कृत पुस्तकें असून त्यांपैकीं बरींच ताडपत्रांवर लिहिलेलीं आहेत. हिंदुराजे विद्यावृद्धीकडे किती लक्ष देत असत हें हा पुस्तकसंग्रह पाहिल्याखेरीज चांगलें लक्षांत यावयाचें नाहीं."

( ४ ) हिंदुस्थानांतील फ्रेंच वसाहतीचें राजधानीचें शहर जें पोंडेचरी तेथील राज्यव्यवस्थेसंबंधानें त्यांनीं असे उद्गार काढले आहेतः—

" फ्रेंच मुलखांत प्रांतिक खर्चाच्या बाबी बहुतेक लोकांच्याच ताब्यांत आहेत व त्यासंबंधाचें बजेट लोकांच्या प्रतिनिधींच्या सभेंतच मंजूर व्हावें लागतें. याखेरीज म्युनिसिपालिट्यांची व्यवस्थाही लोकनियुक्त सभासदाच्याच हातांत आहे. फ्रेंच प्रांतांत हे हक्क लोकांस दिल्यानें जर कांहीं घोंटाळा किंवा अव्यवस्था झाल्याचें दिसून येत नाहीं तर इंग्रजी मुलखांतच तशा प्रकारची धास्ती सरकारानें कां बाळगावी हें समजत नाहीं. फ्रेंच मुलुखांत सैन्यही फार कमी आहे. पोंडेचरीच्या व्यवस्थेस सुमारें १५० लोक आहेत, व त्यांजकडे लष्करी व पोलिस हीं दोन्हीं कामें आहेत.

हिंदुस्थानांतील इंग्रजी मुलूख विस्तृत असल्यामुळें छोट्या फ्रेंच प्रांतांतील राज्यव्यवस्थेचें त्यांस अनुकरण करतां यावयाचें नाहीं अशी कित्येकांची समजूत आहे. परंतु हें मत सयुक्तिक आहे असें मला वाटत नाहीं. प्रांतिक व्यवस्था किंवा खर्च ठरविण्याचे कामीं लोकनियुक्त प्रतिनिधींचें मत घेतल्यानें कांहीं नुकसान व्हावयाचें नाहीं हें पोंडेचरीच्या उदाहरणावरून उघड दिसत आहे."

( ५ ) सिलोनांतील सिंगली लोकांच्या सामाजिक व धार्मिक स्थितीसंबंधानें त्यांनीं असें ह्मटलें आहे:—

"आह्मी ज्यांस इकडे सुधारणा ह्मणतो त्या सर्व यांच्यांत आहेत. प्रौढ विवाह, ख्रिस्ती व बौद्धधर्मी लोकांच्या सोयरिकी, जातिभेदाचा अभाव, अभक्ष्यभक्षण व अपेयपानाची मोकळिक वगैरे सर्व कांहीं सुधारणा यांच्यामध्यें आहेत; पण तीनशें वर्षें परकीयांच्या सक्त अंमलामुळें यांच्यामधील आपल्या धर्माचा अभिमान व आपलेपणा अगदीं लोपून गेला आहे. हा आपलेपणा पुन्हां जागृत करणें हें तिकडील सामाजिक सुधारणेचें मुख्य कलम आहे. बौद्धधर्माचें ज्ञान करून घ्यावें, आणि सामाजिक संस्कार किंवा रीतिभाति केवळ ख्रिस्ती लोकांच्या वळणार न येतां त्यांतील आपलेपणा कायम राखावा अशी बुद्धि या लोकांस हल्लीं होऊं लागली आहे. सिंगली लोकांनीं केवळ ख्रिस्ती लोकांप्रमाणें विजार, कोट व टोपी असा पोषाख न करतां एक मोठा रुमाल किंवा फडकें इतर हिंदूंप्रमाणे विजारीवरून नेसावे अशी उलटी सुधारणा करण्याचे प्रयत्न सध्यां त्यांच्यांत चालू आहेत. धर्मपाल यांनी काढलेला मठ व कॉलेज या बुद्धीचेंच फल होय."

( ८ ) ब्रह्मदेशांत फार दिवसापासून धर्माचें रक्षण व उपदेश करण्याचें काम 'पुंगी' लोकांकडे आहे. 'पुंगी'ची संस्था अलीकडे मोडकळीस आली आहे. यासंबंधानें त्यांनीं पुढील विचार प्रगट केले आहेत:—

'आतां इंग्रजी राज्यांत सरकारी शाळा स्थापन होऊन शिक्षणाचे काम यांजकडून निघाल्यामुळें व धर्मास पूर्वी असलेला राजाश्रय जाऊन देवस्थानांच्या नेमणुका तुटत चालल्यामुळें या लोकांचें वर्चस्व व महत्व बरेंच कमी झालें असून हळूहळू तें लयास जाईल असा अदमास आहे. ही स्थिति कशी सुधारावी याविषयी माझे एका ब्रह्मी गृहस्थाशीं बोलणे झालें होतें. त्यावरून तिकडील लोकांचें या गोष्टीकडे अद्यापि लक्ष गेलें नाही असें दिसतें. या पुंगी लोकांनीं ख्रिस्ती मिशनरांचें अनुकरण करून इंग्रजी शिक्षणाचें काम आपल्या हातांत घेतल्याखेरीज यांचें पूर्वीचें महत्व कायम राहणार नाही."

## कल्पकता.

टिळक हे जसे विद्वान व राजकारणपटु आहेत तसेच ते कल्पकही आहेत. यंत्रकला, शिल्पकला, चित्रकला वगैरे कांहीं कांहीं कलांसंबंधानें

त्यांचे ठिकाणीं मोठा मार्मिकपणा असून त्या त्या कलेंतील निपुण लोकांस ते प्रसंगविशेषीं कांहीं प्रश्नही करीत असत. नवीं यंत्रें कोणीं काढलीं आहेत, कोण कशाचीं पेटंटें घेतो, रसायनादि शास्त्रांचा कोण कसा उपयोग करून घेत आहे, फोटोग्राफींत काय सुधारणा चालली आहे, याची माहिती व्हावी ह्मणून 'सायंटिफिक अमेरिकन' 'टेक्स्टाइल जर्नल,' 'ट्रेड जर्नल' सारखीं मासिक पुस्तकें, पत्रें व कॅटलॉग फावल्या वेळांत ते चाळीत असत. ही माहिती वाचल्यामुळें व त्यांची बुद्धि शोधक असल्यामुळें केव्हां केव्हां कांहीं खुबीदार कल्पना ते काढीत. आपल्या हाताशेजारी यंत्रें वगैरे किंवा प्रयोगाचीं साधनें नसल्यामुळें या त्यांच्या कल्पना जागचे जागींच राहत. तथापि, वाडा बांधणें, छापखान्याचीं यंत्रें उभारणें किंवा छपाईचीं कामें चालविणें यांमध्यें वरचेवर या कल्पनांचा ते उपयोग करीत. आज कित्येक वर्षे ते वर्तमानपत्रकार असून धंद्याच्या दृष्टीनेंही त्याकडे त्यांची नजर असल्यामुळें त्या धंद्याच्या अडचणी काय आहेत, त्यांत कोणत्या सुधारणा झाल्या पाहिजेत, वगैरे विषयांकडे त्यांचें सारखें लक्ष असे; व एकदां मुंबईच्या 'प्रिंटर्स असोसिएशन'ची कांहीं मंडळी त्यांना भेटण्यास आली असतां त्या संस्थेस चलन देऊन त्यासंबंधीं विशेष कांहीं तरी करण्याचा त्यांचा मानसही होता. छापखान्याच्या धंद्यांत क्रांति करण्यासारखी त्यांच्या कल्पकतेची एक गोष्ट आहे ती येथें नमूद करणें अत्यत इष्ट आहे. ती अशी:-मराठी खिळ्यांनीं जीं पुस्तकें अगर वर्तमानपत्रें हल्लीं छापलीं जातात तीं चांगल्या तऱ्हेनें का निघत नाहींत यांकडे त्यांचें कांहीं वर्षांपूर्वीं लक्ष जाऊन त्या कामीं कांहीं तरी सुधारणा केली पाहिजे अस त्यांच्या मनानें घेतलें. मराठी टाईप तीन ठिकाणीं तुटलेला असतो, किंवा त्याचे तीन भाग असतात असें ह्मटलें तरी चालेल. एक वरची मात्रा, वेलांटी, अनुस्वार किवा डिग्री घालतात तो भाग; दुसरा मधलें अक्षर; व तिसरा खालीं उकार जोडतात तो भाग. हे तीन भाग निरनिराळे असून ते एकत्र रीतीनें चांगले जोडले जात नसल्यामुळें व जोडले तरी ते बळकट बसत नसल्यामुळें पत्र अगर पुस्तक छापतां छापतां ते सरकतात अगर अजिबात उडून जातात; व त्यामुळें ओळींतील एकंदर मजकूर सैल होऊन तो पडतो,

व त्यामुळें छपाई सगळी बिघडून जाते. या अडचणीमुळें 'निर्णयसागरादि' कांहीं छापखान्यांनीं कित्येक अक्षरांचे व शब्दांचेही अखंड खिळे ओतवून काढलेले आहेत व त्यामुळें थोडी सोय झालेली आहे. तथापि, मुख्य खिळयांचे वरीलप्रमाणें तीन भाग असल्यामुळें ते जोडण्यास, दुरुस्त करण्यास व घट्ट बसविण्यास विलंब लागून गैरसोय होत असल्यामुळें ही गैरसोय दूर करण्याची त्यांनीं एक कल्पना काढिली. त्यांनीं इंग्रजीचे जसे अखंड खिळे असतात तसे मराठीचे अखंड खिळे काढले आहेत; व जोडाक्षरें, वेलांटीचीं साधीं अक्षरें, मात्रा, काने वगैरे सर्व कांहीं या अखंड खिळ्यांनीं थोडक्यांत तयार करतां येतें. अशा प्रकारच्या अक्षरांचें वळणही केसरी ज्या अक्षरांच्या वळणाचा निघतो त्याच अक्षरांप्रमाणें असून ८।९ वर्षांपूर्वी या नव्या खिळयांनीं एकदोनदां कांहीं मजकूरही केसरींत छापला आहे. अलीकडे इंग्रजीमध्यें ' लीनोटाईप ' निघाला आहे. ह्मणजे यंत्रानें सबंध ओळच्या ओळ अखंड नवी तयार होते. तसेंच अमेरिकेंत 'मोनोटाइपा'चीं ह्मणजे एकेक अक्षर जळून संबंध ओळ तयार करण्याचीं यंत्रें निघालीं आहेत; व टाइपरायटरवर ज्याप्रमाणें हात चालविला ह्मणजे त्यांतून आपणास पाहिजे तो मजकूर जसा लिहून काढतां येतो तसें या ' लीनोटाइप ' किंवा ' मोनोटाइप 'च्या यंत्रास आणखी दुसरीं यंत्रें जोडलीं ह्मणजे धातु वितळून तिचा खिळा बनून तो जुळून अखेर या यंत्रांनीं मजकुराची ओळ तयार होते. अशा रीतीनें प्रत्येक पत्रास अगर पुस्तकास प्रत्येक वेळीं नवा टाइप मिळून सरकासरकीचा त्रास नाहीं कीं पुन्हां खिळे उचलून ते घरांत टाकण्याचा त्रास नाहीं. अमेरिकेंतील मोनोटाइपाच्या यंत्रांत सुमारें २२५ घरें असतात; व त्या घरांत सर्व खिळे मावतील अशा बस्तानानेंच टिळक यांनीं अखंड खिळे पाडण्याची व्यवस्था केली असून प्रो. भिसे यांच्या मदतीनें त्यांत बरीच सुधारणा करण्याचा त्यांचा मानस होता. टिळक यांनीं हे जे नवे खिळे तयार केले आहेत ते ' निर्णयसागर ' छापखान्यांतील खिळे तयार करणाराच्याच सहाय्यानें केले आहेत. ' हे खिळे मोनोटाईपाच्या यंत्रांत घालून त्यास इतर यंत्रें जोडलीं तर त्यानें एक किंवा दोन हुषार व शुद्धलेखन जाणणारे कंपाझिटर एका दिवसांत सबंध केसरी काढतील ' असें टिळक

एकदां ह्मणाले होते यावरून या खिळ्यांपासून किती फायदे होतील याची वाचकांनींच कल्पना करावी. असो; हे खिळे व त्यांचे सांचे केसरी ऑफिसमध्यें हल्लीं तसेच पडले आहेत व त्यांच्या ऊर्जितावस्थेचा काल केव्हां येणार हें हरि जाणें !

शेवटीं, ज्याच्या कृपेनें या चरित्राचें काम पुरें झालें त्या जगच्चालकास अनन्यभावानें शरण जाऊन वाचकांची रजा घेतों.

# परिशिष्ट—अ.

## संभाषणें व प्रासंगिक उद्गार.

लो. टिळक यांजकडे अनेक ठिकाणचीं व अनेक तऱ्हेच्या चळवळींची माणसें येत असल्यामुळें त्यांचीं संभाषणें बरींच झालीं असून वेळोवेळीं त्यांनीं अनेक महत्वाचे उद्गार काढले आहेत. मला त्यांचीं जीं संभाषणें किंवा उद्गार ऐकावयास मिळाले त्यांपैकीं प्रसंगानुसार थोडे मागील भागांत दिले आहेत. बाकीचे येथें देतों:—

### वैदिक वाङ्मय.

सन १९०१ सालीं वैदिक वाङ्मयासंबंधानें गोष्टी निघाल्या असतां टिळक ह्मणाले कीं, ' ऋग्वेदादि ग्रंथांत पाठभेद मुळींच नाहींत याचें कारण पूर्वी वेदांच्या ऋचाच तोंडपाठ करीत असत असें नाहा तर त्यांतील प्रत्येक शब्द व शब्दांतील वर्ण स्वर देऊन पाठ करीत असत; व अशा रीतीनेंच प्राचीन काळचे वेद एकसारखे कायम राहिले. "

### शंकराचार्य, तुकाराम, प्रार्थनासमाज.

एकदां ब्रह्मसमाजाच्या एका मनुष्याशीं संभाषण चाललें असतां ते ह्मणाले:—

" शंकराचार्यांनीं संन्याशांची संस्था काढली ती बुद्ध लोकांचा पाडाव करण्याकरितां त्यांच्याच अनुकरणानें काढली. यापूर्वी संन्यास होता, पण कलीमध्यें तो निषिद्ध मानला होता. "

" तुकाराम स्वतः संस्थापक ( Organiser ) नव्हता व त्याला जगाची पर्वाही नव्हती. संस्थापनेचें काम त्याच्या जवळच्या त्याच्यापेक्षां कमी दर्जाच्या मनुष्याचें आहे; व त्यानेंच तें केलें पाहिजे. "

" हल्लींचे प्रार्थनासमाज किंवा अशा प्रकारचे इतर समाज पुढें सरसावत नाहींत याचें कारण कळवळा ( Emotion ) किंवा भक्ति ( Devotion ) असणारा मनुष्य त्यांत फारसा नाहीं. ( Churches ) देवालयें वगैरे त्यांचीं ( Bodies ) शरीरें आहेत; पण आंतला ( Soul ) आत्मा नाहीं. "

" आमच्या धर्मांतील यज्ञयाग, श्रौतस्मार्त कर्में वगैरे एक (Old Testament) जुन्या करारासारखेंच आहे. पुढें उपनिषदें, अद्वैतवाद वगैरे जरी झाले तरी वरील तत्वें धर्मांत कायमच राहिलीं; व जुन्या कराराशिवाय जसा नवा करार चालत नाहीं तसेंच हें आहे. "

**प्रश्न**—तात्विक ज्ञानाचा एकदां विचार सुरू झाला आणि मध्यें मायेचा घोंटाळा येऊन पडला कीं, मग संस्थापनेचें ( organization ) काम बंद पडणार; व जग मिथ्या वाटून सर्व कारभार आटपलाच ह्मणावयाचा ?

उत्तर—शंकराचार्यांचें असें कोठें होतें व त्यांना कधीं मायेनें व्यत्यय आणला नाहीं ?

प्रश्नः—हल्लीं सुशिक्षित व सुसंस्कृत मनाचे पुष्कळ लोक आहेत; तेव्हां धर्मग्लानि दूर करून धर्माची स्थापना करणारे लोक कां निपजत नाहींत ?

उत्तरः—त्यांच्यांत तितका धार्मिक कळवळा ( Emotion ) नसतो; आणि कळवळ्याला बुद्धिही ( Intellect ) बरीच आड येते.

## समाज व पुढारी.

समाजस्थिति व पुढारी यांच्यासंबंधानें बोलत असतां एकदां ते ह्मणाले:— " समाजांतील खालच्या लोकांत मिसळल्याशिवाय समाज कशावर चालतो याचें धोरण पुढाऱ्यास समजणार नाहीं. वरच्या वर्तुळांत हिंडल्यानें अहंपणादि दुर्गुण जडतात आणि खालच्यांत गेल्यानें ते लोक वरच्यांचे दोष काढीत असल्यामुळें आपलें चुकतें कोठें हें त्यांना सहज समजतें. "

## धातूंमधील आकर्षणशक्ति व प्रेम.

सन १९०३ सालीं डा. गर्दे यांच्याशीं बोलत असतां ते एकदां ह्मणाले कीं, " धातूमध्यें जीव ( Life ) आहे अशी जी नवी थिअरी ( उपपत्ति ) निघाली आहे ती आमच्या प्रेमासारखीच आहे. आई आणि मुलगा यांच्यामध्यें प्रेम असतें; पण तें त्यांचें त्यांनाच ठाऊक. तिसरा मनुष्य ती ( Attraction ) आकर्षणशक्तीच ह्मणेल. धातूधातूंमध्यें असेंच प्रेम आहे; पण त्याला attraction ( आकर्षण ) किंवा affinity (स्नेहाकर्षण) तो ह्मणतो. ऑक्सिजन आणि हैड्रोजन यांच्यामध्यें असेंच प्रेम किंवा life आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. "

## गणपतीचे मेळे.

गणपतीच्या मेळ्यासंबंधानें गोष्ट निघाली असतां एकदां ते ह्मणाले:—" सुधारक लोक मेळ्यास दूषण देतात व मुसलमानांचें अनुकरण ह्मणून ह्मणतात. पण मुसलमानांनीं तरी हा प्रकार कोठला काढला ? आमच्या वारकऱ्यांच्या मेळ्यावरूनच ना ? मुसलमानांनीं केलेला प्रकार पुन्हां आम्ही हिंदूकडे वळविला तर त्यांत गैर काय झालें ? आमचें आम्हीच पुन्हां करूं नये कीं काय ?

## हिंदी-केसरी.

काशी येथील ' नागरी प्रचारिणी सभे ' चे एक हितचिंतक एकदां केसरीचे लेख हिंदीमध्यें भाषांतर करून तिकडे एक नवें पत्र काढण्याविषयींचा सल्ला विचारावयास आले असतां टिळक म्हणाले:—" केसरींतील सर्व लेखांचें भाषांतर तिकडे लोकप्रिय होणार नाहीं. कारण, यांत बरेच स्थानिक विषय असतात; व ते येथील

कित्येक व्यक्ति, संस्था, स्थलें, प्रसंग वगैरेस उद्देशून लिहिलेले असतात. आतां सर्व साधारण लेखांचें भाषांतर करण्यास कांहीं हरकत नाहीं. पण तिकडचे स्थानिक विषय जोमानें लिहिणारा लेखक असल्याशिवाय नुसत्या या लेखानें कार्य होणार नाहीं. हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं देशी भाषेंत जोमाची पत्रें नाहींतच. मद्रासकडे 'हिंदु' 'स्टँडर्ड' असली पत्रें इंग्रजींत चालतात; पण तेलगु, तामिल किंवा कानडी भाषेंत जोमाचीं पत्रें कमी आहेत. नुकतेंच कोठे मि. जी. सुब्रह्मण्यय्यर यांनीं तिकडे देशी भाषेंत 'स्वदेशमित्रम्' नांवाचें अशा प्रकारचें पत्र सुरू केलें आहे. हीच स्थिति बंगाल्याची. वंगवासी, हितवादी, वगैरे कांहीं पत्रांचा खप मोठा आहे; पण तो पत्रांतील मजकुराच्या जोमावर नसून बक्षिसें वगैरे एक प्रकारच्या लालुचीनें झाला आहे. ही लालुच ह्मणजे एक प्रकारचा ( Gambling ) जुवा आहे व 'पावर' 'गार्डियन'सारखीं कित्येक इंग्रजी पत्रेंही ही जुगार खेळतात. पत्र पुढें यावयाला जोमाचे कांहीं लेख पाहिजेतच; व ते लेख लेखकानें थोडें-बहुत धाडस केल्याशिवाय यावयाचे नाहींतच. आतां कडक लेखावर तुमचा कांहीं तरी अपवाद येईल; पण एकदां अमुक बाजू चांगली व अमुक खोटी एवढी मनाची खात्री झाल्यावर भाषा कडक, लेख कडक, या म्हणण्यांत काय अर्थ आहे? साधा किंवा पचपचीत लेख कोणी वाचावयाचा नाहीं. त्यांत एकादी कोटी किंवा चुरचुरीत वाक्य असल्याशिवाय वाचकांची वाचण्याकडे प्रवृत्तीच होत नाहीं. चहा पितांना पत्र हातांत घ्यावयाचें आणि त्या वेळांत जर कांहीं थोडें-बहुत झालें तर वाचावयाचें तर गोडी लागेल असेच लेख त्यांत पाहिजेत; म्हणजे ओढीओढीनें तो सगळे वाचतो. आणि लेख वाचावयास लावणे म्हणजे लोकांना कांहीं ( Imposition ) शिक्षा देणे नव्हे. त्यांना अशाच रीतीनें वाचावयास लाविले पाहिजे. ( विरुद्ध टीकेसंबंधी या वेळीं प्रश्न निघाला असतां ते म्हणाले ) आम्ही दाजीसाहेब खरे यांच्यासंबंधानेंसुद्धां नुकतीच केसरींत टीका केली आहे. ते माझे स्नेही आहेत खरे. पण ( Public platiorm ) सार्वजनिक पीठावर येऊन लोकमतानें पसंत नसलेली गोष्ट जर ते करूं लागले तर त्यावर आह्मांस टीका करावयास नको काय? ही टीका करतांना ते आमच्याच घरीं होते. पण ते समजदार असल्यामुळें त्यांना वाईट वाटण्याचें कारण नाही; व अशा बाबतींत खासगी द्वेषही वाढण्याचें कारण नाहीं. आतां खासगी गोष्टी वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करूं नयेत हें ठीक आहे. पण पब्लिक प्लॅटफॉर्मवर आल्यावर नापसंत गोष्टींची चर्चा केलीच पाहिजे. पत्रासारख्या संस्था कायम होण्यास व लोकांचा थोडाबहुत फायदा होण्यास अशाच प्रकारानें पत्रें चाललीं पाहिजेत. आतां अशीं पत्रें चालवितांना अडचणी व संकटें पुष्कळ येणार. पण तीं सहन केलीं पाहिजेत; त्याला नाइलाज आहे.

## धर्मजागृति.

धर्मजागृतीसंबंधानें (ता. ३।९।०३) रा. रा. गजानन भास्कर वैद्य यांच्याशीं भाषण चाललें असतां ते ह्मणाले कीं, "एकदां ज्ञानोबा, तुकाराम झाले त्यावरच आज कार्य चाललें आहे. तसा कोण आज (Living) जिवंत आहे काय? वरील प्रकारची परंपरा कायम ठेवावयास नको काय? माणसांनीं तरी आपलें कर्तव्य केलें पाहिजे; कां आपलें 'संभवामि युगे युगे' असा ईश्वराचा अवतार होईपर्यंत स्वस्थ बसावयाचें?

युरोपांतील (Impulse) जोम इकडे (Natural) लोकांच्या आंगांत स्वाभाविकंपणें बाणला पाहिजे. तसेंच तो जोरही सतत राखला पाहिजे. रानडे, कुंटे, यांच्यांतील जोम राखणारीं माणसें नाहींत. अर्थात् स्वतंत्र संस्था निर्माण होत नाहींत. शाळेसारख्या संस्थेस सरकारी ग्रांट घेतली कीं, ती पराधीन झाली. बरें, लोकांकडून पैसे मिळवून चालवावी ह्मटलें तर पैसा जमविण्याइतकी धमक नाहीं."

## सभा व अर्ज.

हिंदुस्थानांतील सार्वजनिक सभा, सरकाराकडे जे अर्ज करतात त्यांचा कितपत उपयोग होतो यासंबंधानें प्रश्न निघाला असतां एकदां ते ह्मणाले:—"महाजनसभा, सार्वजनिक सभा, इत्यादिसारख्या सभांचा अर्ज करण्याच्या कामीं आतां चांगला उपयोग होत नाहीं. कारण, त्यांच्या मार्फत अर्ज पाठविण्यापेक्षां कायदेकौन्सिलच्या मेंबरानें एकादा प्रश्न विचारला असतां त्याचें ताबडतोब 'होय किंवा 'नाहीं' असें उत्तर मिळून लवकर दाद लागते. हल्लीं राष्ट्रीय सभेमार्फत लोकमत काय आहे तें कळतें; व (इंटरपिलेशनच्या) प्रश्न करण्याच्या हक्कानें अर्जानें जें काम व्हावयाचें तें होत आहे. खेरीज अलीकडे वर्तमानपत्रांत जास्त जोम आला असून सभांत जीं माणसें काम करतात तींच इकडे लिहित असल्यामुळें अर्ज करण्यासारख्या कामासंबंधानें मधल्या सभांचा आतां फारसा उपयोग नाहीं."

## दोन कार्यांकरितां एक देवक.

ता. २५।४।०४ रोजीं ह. प. भिंगारकर बुवा यांच्या बरोबर बोलत असतां ते ह्मणाले:—"दुसरी कोणतीही अडचण नसली तर लागोपाट दोन कार्यांकरितां एकदम देवक बसवितां येईल. संकल्पांत फेरबदल करून दोन कार्यांकरितां देवांना एकदम आव्हाहन करण्यास काय हरकत आहे?

## अर्जास मान केव्हां मिळतो?

सरकारी दरबारांत अर्जदारांच्या ह्मणण्यास केव्हां मान मिळतो यासंबंधानें बोलतांना ते एकदां ह्मणाले कीं, "शिवाजीनें जयसिंगामार्फत अवरंगझेबास एक अर्ज पाठविला होता. हा अर्ज इतिहासांत प्रसिद्ध आहे. पण तो जयसिंगाच्या

गांवावर आहे. वास्तविकपणें तो शिवाजीनें पाठविलेला असून त्यांत हिंदूंवरील जिझिया कर कमी करण्याबद्दलचा मजकुर आहे; व त्याची नक्कल कोल्हापूरच्या दरबारांतून घेतलेली मजजवळ आहे. अर्ज करणाराचें दरबारांत वजन असेल तर अर्ज करण्यांत फायदा, नाहीं तर हजारों अर्ज केले काय आणि न केले काय सारखेंच!"

## उद्योगधंदे कसे सावरतील ?

ता. १३।७।०८ रोजीं छिद्रें छापण्याच्या कारखान्याचा प्रास्पेक्टस (हेतुदर्शक पत्र) लिहून घेण्याच्या हेतूनें रा. रा. शेजवलकर वैद्य हे आले असतां सहज उद्योगधंद्यासंबंधानें गोष्टी निघाल्या. त्या वेळीं टिळक ह्मणाले:—"आमचे उद्योग-धंदे बुडतात याचें कारण त्यांत नेमलेल्या डायरेक्टरांस धंद्याची माहिती नसते. पाश्चात्य देशांत असें असत नाहीं. त्यांच्या डायरेक्टरांला त्या त्या धंद्यांतील लहानसान सर्व गोष्टी माहित असतात. आतां इकडेच पाहाना; जी. आय. पी. रेल्वेचा जो म्यानेजर आहे तो कांहीं युनिव्हर्सिटीची परीक्षा पास झालेला नाहीं कीं कांहीं नाहीं. त्याला पगार दोन हजारावर असून बंगला वगैरेची सुद्धां सोय असते. एखाद्या कलेक्टरलाही एवढा पगार नसतो. पण त्याला त्या धंद्यांतलें सर्व ज्ञान असतें. तो इनस्पेक्टरचें काम करतो, स्टेशनमास्तराचें करतो, तारमास्तराचें करतो, सर्व कांहीं करतो. असें आमच्या इकडे आहे काय? डिग्र्या आणि परीक्षा काय करतात? मनुष्य त्या त्या धंद्यांत पूर्ण वाकबगार असला ह्मणजे झालें.

लहानसान छिटाच्या कारखान्यासारखे उद्योग काढण्यास कांहीं फार भांडवल नको. दहा पंधरा हजारांत सहजी तो निघूं शकेल. आणि एवढें भांडवल एकटा मनुष्य सहज घालूं शकेल. येथें पेन्शनर वगैरे कांहीं कमी लोक आहेत काय? एकेकाला चार चार मुलेंही आहेत. त्यांना ते नोकरींत घालतील; पण धंदा शिकविणार नाहींत. नोकऱ्या आमच्या लोकांचें जणूं काय परब्रह्म झालें आहे. धंद्याचें ज्ञान व काम करण्याची संवयच आह्मांस नाहीं. सरकार आह्मांस नोकऱ्या देत नाहीं ह्मणून आम्ही कुरकुर करतों. पण ही कुरकुर मारवाड्यानें कधीं केली आहे काय? त्याला त्याची दादही नसते. पण तो कांहीं उपाशी मरतो काय? त्याला धंद्याची व श्रम करण्याची हौसच असते. मागें जो तारमास्त-रांचा संप झाला तेव्हां ५००।७०० तारमास्तर नोकरीवरून निघाले. त्यांपैकीं कांहीं इकडे आले होते. त्यांना येथील गिरणींत नोकऱ्या लावून दिल्या होत्या. एकेक माग एकेकानें चालवावयाचा. पण ही नोकरी कांहीं त्यांच्या हातून झाली नाहीं. त्यांना तार येण्याचे वेळीं दांड्याजवळ जाऊन उभे राहावयाचें, आणि ती संपली कीं, उडाणटप्पूसारखे हिंडावयाचें अशी संवय झालेली. गिरणींतही दांडाच

असतो. पण त्याच्याजवळ एकसारखें उभे राहिलें पाहिजे. कांहीं दिवस त्यांनीं ती नोकरी केली; आणि मग आले परत. काहीं तरी श्रम केले पाहिजेत तेव्हां धंदा होतो. जर्मनी वगैरे देशांत हातानें किंवा अगदीं सोप्या यंत्रावर धंदा चालवून उदरनिर्वाह करणारे पुष्कळ लोक आहेत. तिकडे रोज पन्नास हजार आगकाड्या तयार करून आपले व बायकोचें पोट भरणारे लोक आहेत.

आमच्या इकडे रंगाचे कारखाने चांगले चालतील. पूर्वी इकडे रंगाचें काम जसें होत होतें तसें कोठेंच होत नव्हतें. पक्का रंग हिंदुस्थान व चीन या दोन देशांतच कायतो होत होता. असला पक्का रंग तिकडे नव्हता. पूर्वी रंग वनस्पतीपासून करीत असत. आतां रंग निराळ्या तऱ्हेचे झाले. डामरापासून रंग होऊं लागल व ते शास्त्रीय पद्धतीनें मिसळूं लागले, त्यामुळें आमच्या लोकांचें धंदे बुडाले. आमचे लोक शास्त्र जर थोडें शिकतील तर इकडे पुष्कळ पैसा मिळवतील. कच्चा माल रगड आहे. तो तयार कसा करावा एवढें ज्ञान झालें म्हणजे झालें. मी एकास यंत्रास लागणारें तेल तयार कर म्हणून सांगितलें. पण तें कांहीं त्याच्या हातून झालें नाहीं. मुंबई वगैरे ठिकाणीं यंत्रास लागणारें तेल किती तरी खपतें? त्यांत फक्त एवढेंच आहे कीं, तें तेल यंत्रांत घातलें म्हणजे घर्षणानें लवकर जळूं नये, एवढ्याबद्दलच तजवीज करावयाची. खळीचे डबे तिकडून भरून येतात आणि त्याला Cornflour अशीं नांवें देतात; पण आमच्या इकडे मक्याची खळ सुरेख होते. परंतु त्यांत डोकें घालतो कोण?"

## भविष्यपुराण केव्हांचें?

१५।७।०४ रोजीं डा. गर्दे यांच्यांशीं बोलत असतां टिळक म्हणाले की, "भविष्य पुराण अलीकडचें म्हणजे अकराबाराव्या शतकानंतरचें असावें. कारण, त्यांत 'नोव्हा' वगैरेच्या गोष्टी आहेत व अॅडम आणि ईव्हचींहीं नांवें आहेत. या गोष्टी बायबलांतून घेतल्या नसतील; पण कुराणांतून घेतल्या असाव्या."

## आमच्या राजकीय चळवळी.

ता. १४।८।०४ रोजीं रा. रा. त्र्यंबक गुरुनाथ काळे वगैरे मंडळी बसली असतां आमच्या राजकीय चळवळीसंबंधानें प्रश्न निघाला होता. त्या वेळीं टिळक म्हणाले कीं, हल्लींच्या पुढाऱ्यांच्या हातून पुढें पाऊल टाकणें कठिण झालें आहे. पुढें पाऊल टाकण्यास नवी मंडळीच तयार होईल. अशी जरी ती तयार झाली तरी हे जुने पुढारी त्यांना मागें ओढण्यास कांहीं कमी करणार नाहींत; आणि म्हणतील कीं, हे एक्स्ट्रिमिस्ट आहेत, आम्हांस त्यांचें करणें पसंत नाहीं. बरें, हे स्वतः कांहीं तरी करतील म्हणावें तर तितका स्वार्थ-त्याग करण्याचें धैर्य व अनुकूलता नाहीं. हिंदी लोकांनीं विलायतेंत जोमानें चळ-

वळ चालविल्यास अगदींच निरर्थक होईल असें नाहीं. पण सगळें एकतंत्रानें झालें पाहिजे व दोन्हीकडचा जोर सारखा पाहिजे. लॉर्ड कर्झन यांनीं ( युनायटेड क्लबमध्यें ) लंडन येथें एकदां असें बोलून दाखविलें कीं, ( India will be lost on the floor of the House of Commons ) हिंदुस्थान हें पार्लमेंटसमेंतच जाईल; आणि हें पुष्कळ अंशीं खरें आहे. तेथें आम्ही जाऊन पांच-पंचवीस वर्षें नेटानें एकसारखें काम केले आणि मागें चांगला जोर असला म्हणजे राजकीय हक्क मिळविण्याचे कामीं यश येईल. ही भीति आहे म्हणून कर्झन साहेबांनीं परवां तेथील लोकांना हिंदुस्थानासंबंधानें पार्टी-पॉलिटिक्समध्यें पडूं नका; अंग्लो-इंडियनांच्या तंत्रानें हिंदुस्थानचा राज्यकारभार चालवा असा उपदेश चालविला होता.

काळे—वीस वर्षें कांग्रेस झाली; पण तिच्यापासून कांहीं झालें नाहीं, मग विलायतेंत आणखी कांही वर्षें झगडल्यानें काम होईल ?

टिळक—वीस वर्षांनीं कांहीं झालें नाहीं, आपल्या प्रयत्नांत कोठें तरी दोष आहेत, एवढे तरी समजलेना ? अशीच खटपट करून आणखी पांच-पन्नास वर्षें घालविलीं पाहिजेत. एक दोन पिढ्या गेल्याशिवाय काय होणार आहे ? अहो, आमच्या इकडे मुसलमानी अंमल तीनशें वर्षें होता ना ? शस्त्रास्त्रें, दारूगोळा, युक्त्या या सर्व बाबतींत सामना सारख्याशींच होता ना ? पण हिंदु लोकांना स्वतंत्र होण्यास किती काल लागला पाहा. मग हल्लीं तर कायदेशीर रीतीनें भांडून हक्क मिळवावयाचे आहेत. त्या मानानेंच याला अवधि पाहिजे.

काळे—आयर्लंडचे लोक एक शतक भांडत आहेत ना ? ते यांचेच जातभाई आहेत; पण त्यांना कोठें हक्क मिळाले आहेत ?

टिळक—आयरिश लोकांची स्थिति कितीही झालें तरी आमच्यापेक्षां पुष्कळ पट चांगली आहे. अहो, त्यांना सुमारें ८० लोक पार्लमेंटामध्यें पाठविण्याचा अधिकार आहे. शिवाय मोठमोठ्या नोकऱ्या देतात. सैन्यांत लॉर्ड रॉबर्टस्सारखे गृहस्थ पुढें येतात. तशा नोकऱ्या किंवा जागा आह्मांस देतात काय ? पण आयरिश लोकांपेक्षां आमची स्थिति एका गोष्टींत समाधानकारक आहे. ती ही कीं, इंग्लंडांतील लोक आयर्लंडामध्यें लँडलार्ड ( जमिनदार ) असल्यामुळें त्यांना हक्क देण्याचें कठिण झाल आहे. तसे गोरे लोक येथें लॅडलॉर्ड झालेले नाहींत त्यामुळें आह्मांस पुष्कळ आशा आहे.

## गीतेंतील युद्ध लाक्षणिक आहे काय ?

ता. ४।८।०४ रोजीं भगवद्गीतेवर डा. गर्दे यांशीं संभाषण चाललें असतां डा. गर्दे ह्मणाले कीं, गीतेंतील युद्ध ह्मणजे पंचेंद्रियांचें युद्ध असा लाक्षणिक अर्थ कोणी करतात. त्यावर टिळक ह्मणाले कीं, " लाक्षणिक वगैरे कांहीं नाहीं. प्रथमतः युद्ध

करावयाचें आहे हा सरळ सिद्धांत आहे; व शेवटीं तुझ्या वचनाप्रमाणें मी करतों, असें अर्जुन ह्मणतो. यावरून युद्धास प्रवृत्त करण्याविषयीं सगळा उपदेश आहे. त्यांत येथून तेथून वेदांत भरला आहे व प्रत्येक श्लोक वेदांतपर आहे असें कोणाचें ह्मणणें असेल तर तें चुकीचें आहे. भक्ति, ज्ञान, वैराग्य वगैरे प्रकरणें निरनिराळीं आहेत. त्यांचा एकमेकांशीं कांहीं संबंध नाहीं. शेवटचें तत्व सर्वांचें एक आहे खरें; पण तीं प्रकरणें स्वतंत्र रीतीनें निरनिराळीं आहेत. त्यांचा मेळ घालण्यास कित्येक लोक पाहतात; पण त्यामुळें पुष्कळ गोष्टींची हानी होते."

## बुद्धिबळाचा खेळ.

रा. रा. टोपे वारल्यानंतर बुद्धिबळाच्या डावांसंबंधानें मिरजेचे रा. रा. नारायणराव जोशी हे त्यांच्याशीं बोलत असतां टिळक ह्मणाले कीं, "आह्मीं जी ही आंकडे देऊन डाव लिहिण्याची पद्धत सुरू केली आहे ती जर्मन पद्धतीवरून घेतली आहे. इंग्लिश पद्धत गैरसोईची आहे. कारण, अमुक मोहरा अमक्याच्या उजव्या हाताच्या किंवा डाव्या हाताच्या अमुक घरांत आहे वगैरे गोष्ट भानगडीची आहे. जर्मन पद्धत तशी नाही. इंग्रजी डावाप्रमाणें मातेचे डाव यावयास कांहीं हरकत नाहीं. मी टोपे यांच्या जवळ एक बुद्धिबळाच्या डावांचें संस्कृत पुस्तक दिलें आहे. ते इंग्रजी डाव जाणणारानें लिहिलें आहे असें दिसतें. मी बुद्धिबळाचा खेळ जाणतों; पण प्रॉब्लेम बरोबर आहेत की नाहींत, त्यांचीं उत्तरें बरोबर आहेत कीं नाहींत, वगैरे गोष्टी करण्यांत कोणी वेळ व डोकें खर्च करावें? त्याला निराळाच मनुष्य पाहिजे. वाचन-मननांतही डोकें घालावयाचें आणि खेळांतही डोकें घालावयाचें अशा दोन्हीं गोष्टी कशा व्हाव्या? खेळास झाले तरी थोडेंबहुत डोकें खर्च केलेंच पाहिजे. माझ्या घरीं कोणतेंच खेळ नाहींत व मी कोणता खेळ खेळतही नाहीं. वाचून शीण आला कीं, (Light Literature) करमणुकीचें वाङ्मय वाचतो व असें वाङ्मय रामायण किंवा महाभारतांत पुष्कळ आहे; व त्यांतील गोष्टीच मी बहुधां वाचीत असतो."

## देवनागरी लिपी.

काशी येथील 'नागरी प्रचारिणी' सभेचे सेक्रेटरी मि. श्यामसुंदरदास बी. ए. हे सभेस मदत मागण्याच्या हेतूनें टिळक यांचेकडे आले असतां ता. १३।५।०५ रोजीं रा. रा. न. चिं. केळकर यांच्या घरीं इंग्रजींत संवाद झाला. त्या वेळीं टिळक ह्मणाले:—"देवनागरी लिपीनें जर मराठीप्रमाणेंच गुजराथी, बंगाली, वगैरे भाषा लिहितां येतील तर देशासंबंधानें पुष्कळ कार्य होईल. एकभाषा नाहीं तरी एकलिपी होण्यापासून कांहीं कमी फायदे नाहींत. एकभाषा असणें हें राष्ट्रीयत्वाचें एक दर्शक (National significance) आहे. या कामीं तुह्मी ह्मणतां त्याप्रमाणें लोकांनीं प्रयत्न करून फारसा उपयोग होणार नाहीं. सरकारचें सहाय्य पाहिजे.

क्रमिक पुस्तकांत त्यांनीं ही लिपी वापरली ह्मणजे आपोआपच लहानपणापासून मुलांना गुजराथी, बंगाली, हिंदी वगैरे भाषांचें ज्ञान होईल; व पुढें त्या त्या भाषा शिकण्याकडे त्यांची प्रवृत्ती होईल."

श्यामसुंदर०—मराठी, गुजराथी, हिंदी, बंगाली वगैरे भाषांत एकादें मासिक पुस्तक किंवा वर्तमानपत्र काढलें तरी पुष्कळ उपयोग होईल.

न. चिंतामण केळकर—उपयोग होईल; पण याहीपेक्षां एकच लेख या सर्व भाषांत देवनागरी लिपीनें दिला तर जास्त उपयोग होईल. आतां पाहा कीं, मला बंगाली भाषा थोडीबहुत येते; पण येते तीही विसरत चालली आहे. हीच जर देवनागरी लिपींत ती भाषा असती तर ती वाचण्याकडे विशेष प्रवृत्ती झाली असती.

टिळक—तें कांहीं खोटें नाहीं. सरकार एक प्रयत्न करीत नाहीं; पण लोकांनीं तरी तो केला पाहिजे. परंतु लोकांचा तरी भरंवसा आणि एकी आहे कोठें? बंगाली लोक तर आम्ही मराठीची जी देवनागरी लिपी लिहितों तीच अपभ्रष्ट आहे असें ह्मणतात आणि आपली लिपी हीच खरी देवनागरी लिपी असें सांगतात. त्यांचें हें म्हणणें अगदींच गैर आहे असे नाहीं. कारण, अलीकडे कित्येक जे जुने शिलालेख सांपडतात त्यांपैकीं पुष्कळांची लिपी जवळ जवळ बंगाली लिपीसारखीच आहे. कसें कां असेना; देवनागरी लिपीचा हल्लीं सर्वत्र प्रसार होणें इष्ट आहे. सार्वभौम सरकार करीत नाहीं तर नाहीं; पण जेथें मराठी, गुजराती अशा दोन तीन भाषा चालतात अशा बडोदें सारख्या राज्यांत संस्थानिकांनीं या बाबतींत प्रयत्न केला तरी चांगले होईल."

## पंचांगशोधन.

सन १९०५ सालीं पंचांगशोधनासंबंधानें मुंबईच्या एका गृहस्थाशीं भाषण चाललें असतां टिळक ह्मणाले:—"२५०० रुपये खर्चून नवीन करण-ग्रंथ जरी तयार झाला तरी त्याचा विशेष उपयोग होण्यास वास्तविकपणें ग्रंथाप्रमाणें प्रवर्तन होण्याची खटपट झाली पाहिजे. या कामाकरतां चांगले हुषार लोक तीन चार वर्षें ठिकठिकाणीं हिंडले पाहिजेत; अनेक ज्योतिष्यांची भेट घेतली पाहिजे; व नवीन ग्रंथाप्रमाणें पंचांगें करून त्यांची अंमलबजावणी करण्याविषयीं त्यांची मनें वळविलीं पाहिजेत. एकपंचांग होणें ही राष्ट्रीयत्वाची एक खूण आहे. प्रथम करण-ग्रंथ करण्यासंबंधानेंही पुष्कळ त्रास पडणार आहे. हा ग्रंथ लिहिण्यास जो प्रवृत्त होईल तो त्यांत सर्वानुमतें दुरुस्ती करण्यास तयार असला पाहिजे. अर्थात् ज्यांच्या देखरेखीखालीं हें काम चालेल त्यांचें अशा ज्योतिष्यांवर वजन पाहिजे."

## वेदांचें भाषांतर.

ऋग्वेदाच्या भाषांतरासंबंधानें एकदां (१९०५ च्या जूनमध्यें) प्रश्न निघाला असतां (या वेळीं रा. रा. घोले यांच्या ऋग्वेदाच्या भाषांतराच्या मासिक पुस्तकाचा

पहिला अंक आला होता;). ते ह्मणालेः—" भाषांतर—कर्त्यास हल्लीं बऱ्याच भाषांचें ज्ञान पाहिजे. वेदासारख्या ग्रंथावर जर्मन भाषेसारख्या युरोपियन भाषेंत अनेक महत्वाचे ग्रंथ झाले आहेत. त्यांत एकेक ग्रंथ असा आहे कीं, एक द्वितीया किंवा तृतीया विभक्ति घेतली तर त्या त्या विभक्तीवरच एकेक स्वतंत्र ग्रंथ आहे. इतके ते लोक प्रचंड उद्योगी आहेत. वेदांत प्राचीन खाल्डियन भाषेंतलेही शब्द आहेत. असे शब्द आहेत असा माझा समज आहे; व असें असणेंही साहजिक आहे. प्राचीन आर्यलोकांचा ज्यांच्या ज्यांच्यांशीं संबंध आला त्यांच्या त्यांच्या सहवासानें त्यांचे त्यांचे शब्द त्यांच्या भाषेंत त्या कालीं यावयाचेच. पुढें झालें तरी द्रविडी शब्द संस्कृत भाषेंत आले नाहींत काय ? पण हे मागाहूनच्या संस्कृतांत ( Later Sanskrit ) आहे; प्राचीन ग्रंथांत नाहीं.

## संस्थानिकांच्या देणग्या.

आपल्या आप्त-इष्टांस पूर्वीच्या महाराजांनीं दिलेल्या देणग्यांपैकीं कांहीं देणग्या श्री. सयाजीराव महाराजांनीं काढून घेतल्यामुळें इंग्रज सरकाराकडे तक्रार करून दाद लावून घ्यावी अशा हेतूनें सल्ला विचारण्याकरतां त्या राज्यांतील एक बडेगृहस्थ आले असतां टिळक यांनीं असें सांगितलें कीं, " याबद्दल वर तक्रार किंवा अर्ज करण्यांत कांहीं हांशील नाहीं. ह्या देणग्या दिल्या तशा काढून घेण्यास त्यांना अधिकार आहे; आणि एका दृष्टीनें तें योग्यही आहे. कारण, प्रत्येक महाराज गादीवर येतांच अशा देणग्या जर ते देऊं लागले व त्या कायम ठेवाव्या लागल्या तर लवकरच संस्थान मोडकळीस येईल. एकदोन पिढींचा जोंपर्यंत संबंध असतो तोंपर्यंत त्या राहतात व संस्थानिकही त्या ठेवतात. पण संबंध उत्तरोत्तर कमी होत चालला कीं अशा देणग्या जावयाच्याच. अहो, पूर्वजाबद्दलची स्मृति किंवा जागृती फार झाली तर दोन तीन पिढ्यापर्यंत असते; त्यापुढें ती राहत नाहीं. आपलेंच पाहाना ? श्राद्धाचे वेळीं आपण पिता, पितामह, प्रपितामह येथपर्यंत स्मरण ठेऊन त्यांचा उच्चार करतों. सगळ्या पितरांचा उच्चार करावयाचा ह्मटलें तर वंशावळ घेऊन प्रत्येक वेळीं नांव उच्चारतां उच्चारतां सगळा दिवस त्यांत जाईल ! तसेंच हें आहे. "

## वैदिक वाङ्मय व जादू.

वेदकालिन वाङ्मयासंबंधानें ता. ३।७।०५ रोजीं बोलत असतां ते ह्मणाले कीं, " अथर्ववेदांत Magic ( जादू ) संबंधानें जें वर्णन आहे त्याचा खाल्डियन विचारांशीं व सुधारणेशीं बराच संबंध आहे; व त्या वेदांत खाल्डियन भाषेंतले बरेच शब्द आहेत; व ह्मणून इतर वेदांपेक्षां अथर्ववेद कमी महत्वाचा मानला आहे याचें हें एक कारण आहे. जगन्नाथराय पंडितांच्या काव्यांत जसे त्या वेळचे कित्येक फारशी शब्द आले आहेत तसेंच वेदांतही त्या वेळचे खाल्डियन भाषेंतले शब्द आले आहेत. "

## मद्यपाननिषेध.

ता. ४।१२।०५ रोजीं केसरीचा मजकूर चालला असतां रात्रीं मद्रासकडील कोणी आयंगार नांवाचे एक इसम त्यांना भेटावयास आले होते. हे इसम सरकारी नोकर असून मद्यपाननिषेधाबद्दल सरकारची खटपट आहे म्हणून तारीफ करूं लागले असतां टिळक म्हणाले कीं, " मद्यपान हिंदुस्थानांत आम्ही कमी करतों असा सरकार आव मात्र घालतें. वास्तविक उत्पन्न वाढविण्याचा त्यांचा प्रयत्न सारखा सुरू आहे. मला ठाऊक आहे कीं, या पुण्यांतच पंचवीस तीस वर्षांपूर्वी एकही दारूचें दुकान नव्हतें. पण आतां गल्लोगल्लीं दुकान झालें आहे. एवढेंच नव्हे तर, एकेका गल्लींत दोन दोन दुकानेंही दृष्टीस पडतात. पेशवाई बुडाल्यानंतर एल्फिन्स्टन साहेबांनीं जो रिपोर्ट केला आहे त्यांत पूर्वी येथे दारूचें दुकान नव्हतें, लोकांना दारू पिण्याचें व्यसन नव्हतें कीं सरकाराला उत्पन्नही नव्हतें, असा स्पष्ट उल्लेख केला आहे. हल्लीं लाखों रुपये उत्पन्न वाढलें कशानें ? सरकारानें उत्तेजन दिल्यामुळेंच ना ? लोकांनीं शपथा घेऊन दारू पिण्याचें सोडलें तर सरकार मक्तेदाराची अप्रत्यक्ष रीतीनें बाजू घेऊन लोकांवर दारू पिण्याची सक्ती करतें असें अनेक उदाहरणांवरून सिद्ध करतां येईल. समजा, आम्ही एक वर्षभर खटपट करून एक दोन तालुक्यांतील लोकांचें दारू पिण्याचें व्यसन अगदीं नाहींसें केले तर सरकार त्या तालुक्यांतील दुकानें घालण्याचें अजिबात बंद करील काय ? मला वाटतें तें कधींही करणार नाहीं. अशीं आम्हीं दुकानें बंद केलीं तर सरकार आमच्या मदतीस येणार नाहीं. कारण त्यांना उत्पन्नाची बाब बघावयाची असते. दुकान कोठें घालावयाचें हें ठरविण्याचें काम म्युनिसिपालिटीच्या ताब्यांत दिलें तरी देखील बरींच दुकानें बंद होतील. मागें आमच्या ब्राह्मणवस्तींत दारूचें एक दुकान आलें तेव्हां आम्ही गवगवा केला. पण सरकार म्हणालें कीं, दारूचा खप होतो तर लोकांना दुकानाची अवश्यकता आहे असें म्हणावें लागतें. पुढें खप कमी होऊं लागून खुद्द दुकानदारानें दुकान दुसरीकडे घालण्याची परवानगी विचारली, तरी सरकार तशी परवानगी देईना. यावरून काय उघड होतें ? उत्पन्न वाढविण्यापलीकडे सरकारची दृष्टी दिसत नाहीं. चीन देशांत अफूचा फैलाव करण्यासंबंधानें सरकारचे कसे प्रयत्न आहेत ते पाहा पण अप्रतिबंध व्यापाराच्या तत्वावर हिंदुस्थानची अफू तिकडे खपविण्याचा त्यांनीं सपाटा सुरू केला. या व्यापारानें हिंदुस्थानाचा फायदा होईल; पण व्यसनाच्या दृष्टीनें चीनचें किती नुकसान होतें याची कल्पना करा."

## अचूक निशाण मारणें.

ता. १४।१२।०५ रोजीं अचूक निशाण मारणारे राणा सरतान सिंहजी, त्यांचे चिरंजीव व मोंगलाईकडील त्यांचे एक शिष्य, असे पांच चार इसम येऊन बसले असतां जें भाषण चाललें होतें त्यांत टिळक म्हणाले कीं, " तुमच्या खेळांत बंदुकी-

संभाषणांत टिळक ह्मणालेः—"आमच्या देशांत लहान लहान उद्योगच प्रथमतः ठिकठिकाणीं निघाले पाहिजेत. काड्यांच्या पेटीचे कारखाने तर एका ठिकाणीं न निघतां प्रांतोप्रांतीं निघाले पाहिजेत. कारण आगगाडीचें भाडें चढल्यानें दूर दूरच्या ठिकाणीं हा माल स्वस्त देतां येत नाहीं. नेपोलियनच्या लढाईनंतर जर्मनीनें ५० वर्षांत लहान लहान धंदे काढूनच आपली ऊर्जितावस्था करून घेतली. काड्या, सिसपेन्सिली, होल्डर वगैरे सारखे किरकोळ पदार्थही परदेशांतून इकडे यावे ह्मणजे काय? सरकारनें हेही धंदे आह्मांस शिकवूं नयेत? यांत इंग्लंडनचे कांही नुकसान नाहीं. पण धंदेशिक्षण आह्मांस देण्याची त्यांची इच्छाच नाहीं. फार काय, उद्योगधंद्यांच्या किंवा (Forestry) 'जंगल' या सारख्या विषयावरील पुस्तकांत सरकारच्या नोकरांनीं काड्यांच्या पेटीस लागणाऱ्या लांकडांची नांवें दिलीं आहेत. पण त्यास तिकडे 'सीडर वुड,' 'पाइन वुड,' अशा प्रकारचीं लांकडें घालतात असें सांगितलें आहे. परंतु आमच्याकडे त्या जातीचीं लांकडें कोठें व कशीं आहेत हें सांगितलें नाहीं. आमच्याकडे सरस मिळतो, लांकूड तर येथेंच असतें. फक्त फास्परस, गंधक हे जिन्नस तयार करण्याची कृती लोकांनीं शिकली पाहिजे. आतां मिश्रणांत कांहीं गुप्तपणा राहिलेला नाहीं. लेबलचा रंग पक्का पाहिजे, वर्षभर पेटी पडून राहिली तरी ती जशीच्या तशीच दिसली पाहिजे असें तुह्मी ह्मणतां तें खरें आहे. लेबलें आमच्याकडे होतात; जर्मनीतूनच आणण्याची आवश्यकता नाही. येथील चित्रशाळेचे म्यानेजर कोटा येथील कारखान्यास तीं पुरवीत असतात; तुह्मांसही देतील, शोध करा. लेबलांत मुख्य खुबी अशी आहे कीं, तीं बरोबर कापलीं म्हणजे पेटीवर बरोबर चिकटून इकडे तिकडे जागा राहूं नये. आमच्या इकडे हें काम साधत नाहीं, त्याला स्वतंत्र रीतीचें कापण्याचें यंत्र पाहिजे. तें प्रथम पाहिजे तर तिकडून आणावें, मग इकडे करतां येईल. वासुदेवरावांशीं तुम्हीं कॉंट्रॅक्ट (करार) केल्यास तसलें यंत्र आणवून ते लेबलें छापून व कापून देतील. तसेंच आंतील काड्या ठेवण्याच्या पेटीभोंवतीं अगदीं पातळ कागद पाहिजे तोही रेपेपर—मिलमध्यें निघतो काय पाहा; तोसुद्धां ते काढून देतील, नाहीं असें नाहीं. आतां कोटा, व्यारा, तेल्हारा, अमदाबाद, तुमचा, वासुदेवरावांनीं स्वतः धौम येथें काढलेला एक कारखाना मिळून ५।६ काड्यांच्या पेटीचे कारखाने निघाले आहेत; व दिवसें दिवस जास्ती निघणारच. तर सर्वांनीं मिळून आपापल्या सोयी करून घेतल्यास चांगलें होईल. आतां याला थोडें भांडवल अधिक लागेल; पण त्याची तजवीज लोकांनीं केली पाहिजे.

सहस्रबुद्धे.—आम्ही सरासरी एक लाख भांडवल काढलें आहे; पण तेवढेंसुद्धां मोठ्या प्रमाणावर कारखाना चालवावयाचा झाल्यास कमीच आहे. आतां पावसाळ्याचे दिवस नजिक येऊन ठेपले. तर चार पांच महिन्यांचें लांकूड एकदम खरेदी करून सांठवून ठेविलें पाहिजे. म्हणजे १०।५ हजार रुपये त्यांत अडवून

ठेविले पाहिजेत. दुसरें असें कीं, हा धंदा नवीन असल्यामुळें फायद्याकडेच ज्यांची दृष्टी आहे ते, व्याज सुटत नसलें तर, भांडवल देण्यास नाखुष असतात. आमचें भांडवल काढतांनाच आह्मी लोकांस असें सांगितलें आहे कीं, बाबानो, कारखाना नवा आहे; प्रथमतः फायदा होईलच ह्मणून आशा धरून बसूं नका; धंदा काढावयाचा आहे व तो नवीन काढून चढाओढीनें चालवावयाचा आहे हें लक्षांत आणा. आणि ज्या लोकांनीं भांडवल दिलें आहे त्यांनींही हें समजूनच दिलें आहे. नाहीं तर कारखाना चालला नाहीं, फायदा झाला नाहीं, ह्मणजे लोक पुन्हां नव्या धंद्यांत पैसे घालण्यास काचकुच करतात. तेव्हां प्रथमतःच ही गोष्ट लोकांच्या मनांत बिंबविण्याचा आह्मी प्रयत्न केला आहे.

टिळक०—खरें आहे. देशाभिमान उत्पन्न झाल्याशिवाय उद्योगधंदे काय किंवा दुसरें काय साध्य होणार नाही. ऐपतदार लोकांनीं प्रथमतः कांहीं भांडवल गेलें ह्मणूनच अशा कमास दिलें पाहिजे. त्याशिवाय होईल कसें ? ”

## कागदाचे कारखाने.

ता. ३।९।०६ रोजी आपले काशीकडील जांवई रा. रा. साने हे रे-पेपर-मिल पाहून परत आले तेव्हां त्यांच्यांशीं बोलत असतां टिळक ह्मणाले कीं, “ इकडील बहुतेक गिरण्यांत चिंध्यांचेच कागद होतात; गवताचा किंवा लाकडांचा ते उपयोग करीत नाहीत. रे–पेपर–मिलमध्यें चिंध्यांत थोडेसें गवत मिसळतात; पण झाडाच्या साली वगैरे बारिक करून मिसळत नाहींत. आमच्या गवतासारखें किंवा दर्भासारखें सहज चिंध्याबरोबर कुटलें अगर कातरलें जाईल असलें गवत मिसळतात; आणि हें गवतही त्यांनीं आपलें पाणी फुकट जातें त्यावर लावलें आहे. इंजिनची शक्ति फुकट जाऊं नये ह्मणून त्यावरच बर्फाचा एक कारखाना त्यांनीं घातला आहे; व कारखान्यास लागणारें सल्फ्युरिक आसिडही तेथेंच तयार करतात. या आसिडाची बाहेर विक्री व्हावयाची नाहीं. कारण, ते कमी प्रतीचें आहे. तें त्यांच्या कारखान्यासच तेवढें उपयोगी पडतें. तिकडल्या राष्ट्रांत अशा निरनिराळ्या जिनसांचे निरनिराळे कारखाने असतात. कागदाच्या गिरणीससुद्धां लांकडाच्या पल्पाचा पुरवठा करणारे कारखाने निराळे आहेत. कागदाच्या गिरणीत पल्प क्वचित तयार होतो. अशा व्यवस्थेनें श्रमविभाग व भांडवलाचा पुरवठा होऊन त्या त्या कारखानदारांस फायदाही होतो. फार काय; इकडच्या कांहीं गिरण्यांसही तिकडील पल्पचा पुरवठा होऊन तो पल्प स्वस्तही पडतो. इकडे चिंध्याचेच कागद पुष्कळ होत असल्यामुळें वर्तमानपत्राच्या कागदास जो टणकपणा पाहिजे तो नसतो. चिवटपणा, टणकपणा, गुळगुळीतपणा, न फुटणें, इत्यादि गोष्टी कागदांत साधल्या पाहिजेत. आमच्या केसरीचा कागद फुटतो, तेव्हां थोडा भाव अधिक घ्या आणि तो चांगला तयार करून द्या ह्मटलें तर तें अद्याप जुळत नाहीं. ”

# परिशिष्ट—ब

## प्रसिद्ध न झालेलीं भाषणें.

लो. टिळक यांचीं १९०४–०६ या सालांतील व्याख्यान-प्रसंगीं झालेलीं कित्येक भाषणें कोठेंच प्रसिद्ध झालेलीं नाहींत. मला ज्या भाषणांचीं टिपणें करण्याची सवड मिळाली त्यांपैकीं कांहीं येथे देतोंः—

### सैतानाचें साम्राज्य.

सन १९०५ सालीं पुणें येथील रेमार्केटच्या गणपतीपुढें त्यांनीं 'सैतानाचें साम्राज्य' या विषयावर पुढील आशयाचें भाषण केलें:—

"हा विषय राजकीय नसून धार्मिक आहे. वाईट-बुद्धि, चांगली-बुद्धि, पाप-पुण्य, ह्मणजेच सैतान आणि इश्वर. वाईट बुद्धीचा नाश करून चांगल्या बुद्धीकडे वळणें ह्मणजेच सैतानाच्या साम्राज्यांतून निघून ईश्वराच्या साम्राज्यांत जाणें. ही सैतानाची व ईश्वराची कल्पना फार प्राचीन काळापासून चालत आली आहे. इंद्र आणि वृत्र, देव आणि दैत्य, धर्म आणि कलि यांचे झगडे हें याचेंच दर्शक आहे. मरडॉक (चांगुलपणा), तैमात (वाईटपण) हे शब्द खाल्डियन लोकांतही आहेत. तैमात हें नांव अथर्ववेदांत आहे. तैमात ह्मणजे सर्प. सैतानाला पूर्वी सर्पाचें रूप दिलें आहे. वेदांत वृत्राचें स्वरूप सर्पाचें आहे. पारशी धर्मांत अहिमन (वाईट) व आरमन (चांगलें) असें मानून चांगलें तेवढें आरमननें (देवानें) व वाईट तेवढें अहिमननें (सैतानानें) उत्पन्न केलें असें ह्मटलें आहे. मार (कामक्रोधादि वाईट गोष्टी) असें बुद्धधर्मांत आहे. सैतान कांहीं वाईट नाहीं; किंबहुना सैतानाच्याच प्रेरणेनें मनुष्याला ज्ञान झालें. अडॅमच्या मनांत फळ खाण्याची इच्छा झाली व त्यामुळें त्याला ज्ञान झालें तें सैतानामुळेंच होय. सैतान ज्ञानाचा जनक आहे असें ह्मटलें तरी चालेल! सैतानाच्या साम्राज्यांतून परमेश्वराच्या साम्राज्यांत जाणें ह्मणजेच मुक्ति मिळणें. मुक्तीची व्याख्या अशी केली तर चुकीची होईल असें मला वाटत नाहीं. सर्व धर्मांचा सिद्धांत असा आहे कीं, सैतानाचा नाश करून परमेश्वराचें वर्चस्व स्थापावयाचें. सैतान नेहमीं खरें बोलतो हा एक आणखी त्याच्या अंगांत गुण आहे! अडॅमला त्यानें फळ खाल्लेस तर ज्ञान होईल अशी जी गोष्ट सांगितली ती कांहीं खोटी नव्हती. उलट देवांनाच खोटें बोलण्याचा किंवा युक्त्या योजण्याचा अनेक वेळां प्रसंग आला आहे. नृसिंहानें हिरण्यकश्यपूस कोणत्या वेळीं व कशा रीतीनें मारलें आहे याचा विचार करा. इंद्रानें वृत्रास फेंसानें मारलें आहे, हेंही त्यांपैकींच एक उदाहरण आहे. सैतानाच्या अंगांत अनेक चांगले गुण आहेत. विषयाला गोडी तोच उत्पन्न करतो.

सैतान नसेल तर सगळें जग आळणी होईल. शाकुंतल नाटकांतील विदुषकास स्वर्गांत जाणें किती जिवावरचें वाटलें यांतील रहस्य ओळखा. स्वर्गांतलें अमृत प्याल्यावर भूकही लागावयाची नाहीं, अशा प्रकारचा त्याचा कोटिक्रम आहे! सैतानावर आपण नेहमीं पहारा ठेवला पाहिजे, ह्मणजे तो आपला घात करीत नाहीं. कृष्ण कोठें उत्पन्न होतो हें जसें कंस शोधीत बसला होता तसें सैतान कसा उत्पन्न होतो हें आपण शोधलें ह्मणजे त्याला ठार मारण्यास बरें पडतें. सैतानाचें स्वरूप जो तो आपल्या कल्पनेप्रमाणें रेखाटतो; त्याला कोणी उत्पन्न केलें नाहीं. जशी ब्रह्मा, विष्णु, महेश यांचीं मनुष्य आपापल्या कल्पनेप्रमाणें चित्रें रेखाटतो तसेंच सैतानाचेंही आहे. इकडच्या चोरांत व पाश्चात्य राष्ट्रांतील चोरांत जें अंतर तेंच या सैतानाच्या स्वरूपाचें चित्र रेखटण्यांत अंतर. इकडचा चोर साध्या रीतीचा व त्याचीं हत्यारेंही साधीं व थोडींच असतात. तिकडचा चोर अट्टल व त्याचीं हत्यारेंही रिव्हाल्व्हर सारखीं असावयाचीं. या चोरांच्या चित्राप्रमाणेंच सैतानाला कोठें पिशाच्याचें तर कोठें दैत्याचें अशीं स्वरूपें दिलीं आहेत; व त्याप्रमाणें चित्रें रेखाटलीं आहेत. सृष्टी जी आहे ती द्वंद्वानें भरली आहे. वैषम्य आणि नैर्घृण्य हे परमेश्वराचे दोष नाहींत. परमेश्वरानें प्रकृती उत्पन्न करून त्यांत एकाच वेळीं सत्व, रज, तम हे गुण उत्पन्न केले आहेत. पापपुण्य त्यानेंच उत्पन्न केलें आहे. परमेश्वर द्वंद्वातीत आहे. पाऊस मीच पाडतों व पाऊस मीच आवरून धरतों, असें भगवंतांनीं सांगितलें आहे. ऋग्वेदांत इंद्र हा पाऊस पाडणारा आहे व वृत्र हा पाऊस आवरून धरणारा आहे, असें दाखविलें आहे. प्रत्यक्ष 'मृत्युश्चाहम्' असेंही भगवंतांनीं ह्मटलें आहे. सैतानाला येणेंप्रमाणें इतिहास आहे; व इंग्रजींत The History of the Devil अशा प्रकारचीं पुस्तकें आहेत. तीं आपण वाचून धर्मांतील कित्येक गोष्टींची कशी संगत लावावयाची याचा विचार करा."

## पशुयज्ञ.

ता. ९।९।०५ रोजीं शनिवारांतील गोडबोले यांच्या गणपतीपुढील व्याख्यानप्रसंगीं रा. रा. खाडिलकर यांच्या "पशुयज्ञ" या व्याख्यानानंतर अध्यक्ष या नात्यानें भाषण करतांना ते ह्मणाले:—

"देवांनीं पुरुषयज्ञ करूनच सृष्टी निर्माण केली. 'यज्ञेनयज्ञमयजंत' असा पूर्वीचा उल्लेख आहे. आपल्यास जी प्रियवस्तु असते ती कोणत्या तरी मोठ्या उद्देशाकरितां द्यावी लागते हें यज्ञांतील रहस्य आहे. ख्रिस्ताचा बळी हासुद्धां अशाच तत्वावरचा यज्ञ आहे. ईश्वरानें प्रत्यक्ष आपल्या पुत्रास बळी दिलें. ख्रिस्ती लोकांत मनुष्याचा बळी देण्याची चाल पूर्वी होती, व त्याच चालीचा आरोप त्यांनीं देवावरही केला. पशू देणें, द्रव्य देणें, अशी यज्ञाची (Evolution) उत्क्रांति होतां होतां इंद्रियांचा इंद्रियांचे ठिकाणीं संयम करणें ह्मणजे यज्ञ करणें वगैरे भगवद्गीतेंत सांगितलेले यज्ञ

सुरू झाले; व आपल्यांतील अज्ञान, तम, यांचा ज्ञानाचे ठिकाणीं यज्ञ करावा अशा प्रकारच्या उच्च कल्पनेचा प्रादुर्भाव होऊन यज्ञाचा विस्तृत व उदात्त अर्थ झाला. उच्च प्रकारचा हेतु साधण्यास आपणास प्रिय असलेली वस्तु बळी दिली पाहिजे हें त्यांतील तत्व आहे. यज्ञ ह्मणजे Sacrifice तुह्मी Self-sacrifice ह्मणजे स्वयज्ञ केला पाहिजे. स्वची व्याख्या नुसती स्वतः पुरती करूं नका; व्यापक करा. स्वमध्यें स्वराष्ट्राचा अंतर्भाव करा. “ सहस्रशीर्षः पुरुषः सहस्राक्षः सहस्रपाद ” असें पूर्वींचें वर्णन आहे. हल्लींसुद्धां सहस्र डोकीं, सहस्र डोळे, सहस्रपाद इत्यादि एकवटून संघशक्तीनें कामें केलीं तर राष्ट्रोन्नतीचें कार्य होईल. ”

## मूर्तिपूजा व भक्तीचें रहस्य.

सन १९०५ सालच्या गणेशोत्सवांत विसर्जन—समारंभाचे वेळीं त्यांनीं पुढील आशयाचें भाषण केलें:—

“ मूर्तीचें विसर्जन केलें ह्मणजे देवतेचें विसर्जन केलें असें नाहीं. मृण्मय मूर्ति ज्या उद्देशानें स्थापिली असेल तो उद्देश संपल्यावर तिचें फक्त विसर्जन करावयाचें; बाकी तिचें ध्यान, भक्ति वगैरे गोष्टी अंतःकरणांत सांठवून ठेवावयाच्या. भक्तीचें रहस्य हेंच आहे. “ यांतुदेवगणाः सर्वे ” हा विसर्जनाच्या वेळचा श्लोक लक्षांत आणा व पुन्हां आपल्या कार्याकरितां किंवा भक्तीकरतां देवतेचें आव्हाहन करा. आपण दुसरी हीही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, गणपतीचें विसर्जन केल्यावर आपण जी वाळू येथून घरीं नेतों तिनें उंदरांचा उपद्रव कमी होतो. हल्लींच्या काळीं दुष्काळ–प्लेग सारखे किती तरी उंदीर चोहोंकडे पसरले आहेत; व भक्तीचें बीज जर आपण येथून परत न्याल तर या उदरांचा नाश होऊन स्वतःची व आपल्या राष्ट्राची अनेक रीतीनें उन्नति करण्यास तें उपयोगी पडेल. आज या उत्सवास बारा वर्षे झालीं. वहिवाटीच्या कायद्याप्रमाणें आतां हा उत्सव कोणासही बंद करतां येणार नाहीं. आजपर्यंत अनेक अडचणींतून सुटून हा उत्सव जसा टिकला तसाच तो यापुढेंही टिकून त्याला उत्तरोत्तर अधिक चांगलें स्वरूप येईल अशी मला आशा आहे. तुमची उन्नति तुमच्याच हातांत आहे हें लक्षांत ठेवा. ”

## परदेशी वस्तूंची होळी.

ता. ७।१०।०५ शनिवारीं दसऱ्याच्या मूहूर्तावर ‘ महाराष्ट्र विद्यालयां’तील विद्यार्थी व गांवचे कांहीं लोक स्वदेशी चळवळीच्या प्रेरणेनें परदेशी वस्तु जाळून टाकण्याकरतां फर्ग्यूसन कॉलेजाजवळील परांजपे यांच्या बखळींतील उघड्या पटांगणावर जमले असतां होळी पेटविल्यावर बोलण्याचा आग्रह केल्यामुळें टिळक यांनीं पुढील आशयाचें भाषण केलें:—

“ प्रो. परांजपे यांनीं अध्वर्यूचें काम केलें आहे; होता व उद्गाता हीं दोन्हीं कामें मजकडेच आलीं आहेत. आमच्या धर्मशास्त्राप्रमाणें कोणतीही गोष्ट अग्निसाक्षी

करावी लागते. त्याप्रमाणें विद्यार्थीमंडळीनें स्वदेशी कपडे वापरण्याचा निश्चय अग्निसमक्ष केला आहे ही गोष्ट फार चांगली आहे. जाळण्यापेक्षां गोरगरीबांना कपडे दिले असते तर पुण्यकारक झालें असतें असे कोणी कोणी उद्गार काढतील; व त्यांत कांहींच अर्थ नाहीं असें नाहीं. पण मनाची प्रवृत्ती किंवा मनोधर्म याचा जोर कांहीं निराळा आहे. जाळण्यानें जो ठसा कित्येकांच्या मनावर उमटतो तो देण्यानें उमटणार नाहीं. कपडे गोरगरीबांना देण्यांत जितका फायदा आहे तितकाच या प्रसंगीं त्यांची होळी करण्यांत आहे; आणि एकाअर्थी पापाचा होम करणेंच चांगलें. दुसऱ्यास द्यावयाचें तर तें चांगलें तरी द्या; पाप देऊं नका. दसऱ्याच्या मुहूर्तानें आज आपण या सीमोल्लंघनास निघालों आहों. हा अपशकून किंवा होळी नसून पुढील कार्याचें बीजारोपण यांत आहे. देशी मालाचा विजय करण्यास आज आपण हा सुमुहूर्त धरला आहे. तो विजय आज नाहीं तर कालांतरानें तरी होईल; फक्त निश्चय पाहिजे. थकलेल्या मेंदूंच्या हातून राष्ट्रहित साधणें आतां कठिण आहे. म्हातारी माणसें अशा कामीं उपयोगी पडतील ही आशा व्यर्थ आहे. हें काम तरुणांनींच अंगावर घेतलें पाहिजे; त्यांनींच तें पुढें तडीस नेलें पाहिजे. 'अमृतबझार पत्रिके'च्या संपादकाचे एक बंधु यांनीं सार्वजनिक काकांच्या सहाय्यानें या चळवळीस इकडे प्रथमतः प्रारंभ केला; व बंगाली मनुष्याच्या प्रोत्साहनानें सुरू झालेल्या या कामास बंगालच्या फाळणीच्या प्रसंगानेंच दुजोरा आलेला आहे व आजच्या प्रसंगींही कांहीं बंगाली लोक हजर आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. कित्येक लोक आंकड्यानें आपणांस भिववितात. पण अनाठायीं व अनवसरीं आंकडे देण्यांत कांहीं मतलब नाहीं."

## वेदांतांतील पंथ.

ता. १५ सप्टेंबर १९०४ रोजीं नारायण पेठेंतील गणपतीपुढे ह. प. भिंगारकरबोवा यांचें ' वेदांतांतील चार पंथ ' या विषयावर व्याख्यान झालें. त्या वेळीं अध्यक्ष या नात्यानें टिळक यांनीं असें भाषण केलें:—" वेदांत याचा अर्थ वेदांचा अंत. वेदांचा अंत म्हणजे उपनिषदें. उपनिषदें पुष्कळ आहेत; व त्यांत निरनिराळ्या ऋषींस ज्ञानाची जसजशी स्फूर्ति झाली तसतसे त्यांनी तें त्यांत ग्रथित केलें आहे. या उपनिषदांत ब्रह्म, चैतन्य, आणि जड यांचा विचार केलेला आहे. आपण कोण, कोठून आलों, व जग हें काय आहे याचा विचार त्यांत आहे. पूर्वी तत्वविवरण करण्याची सरणी निराळी होती आणि अलीकडची निराळी आहे. आतां शेंकडा ८० ग्रंथ काय म्हणतात त्याकडे पाहून जें मत ठरेल तें खरें मानण्याची प्रवृत्ति आहे. पूर्वी अनेक उपनिषदें पाहून आपलें जें एक मत झालें असेल त्याला वेदांताचे सिद्धांत लावून सिद्ध करीत. म्हणजे उपनिषदें, ब्रह्मसूत्र व गीता यांना तें मान्य आहे असें ते समजत; व त्या त्या प्रमाणें त्यांचे अर्थ करीत. सत्, चित्, आनंद,

हीं तत्वें ज्याला जशीं महत्वाचीं वाटलीं त्यानें तशीं मानलीं; व ह्मणूनच द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत वगैरे अनेक मतें निघून अनेक मतवादी झाले. विशिष्ट अद्वैत ह्मणजे विशेष राखून जें अद्वैत तें. इंग्रजींत सुद्धां Double-faced entity ह्मणून आहे. हर्बर्ट स्पेन्सर सारख्या लोकांनीं जगाला आदिकारण काय याचा विचार इंग्रजींतून केला आहे. त्यांच्या विचाराला तत्वज्ञान ह्मणतात; आणि वेदांत ह्मणण्याचें कारण आह्मी आपले सगळे विचार पूर्वी सांगितल्याप्रमाणें वेदांतावर अवलंबून ठेवतों. मी कोण, जग कसें निर्माण झालें, इत्यादि गूढ तत्वें सोडविणें हें बुद्धीचें काम आहे. तें करूनही मनुष्य कदाचित् दुराचारी असूं शकेल. वेदांताचा परिणाम आचरणावर होऊन तामसवृत्तीचा क्षय व सात्विक वृत्तीचा उदय होण्याकडे त्याचा उपयोग झाला तरच वेदांताचें खरें सार्थक होतें. केवळ शाब्दिक ज्ञानाची महती वाटून तेंच सर्वस्व मानणारांची योग्यता ' फाल्गुने बालका ' इतकीच आहे.

## शास्त्रीबोवांची योग्यता.

ता. २२।३।०६ रोजीं कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या श्राद्धतिथीनिमित्तानें सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत प्रो. विजापूरकर यांचें व्याख्यान झालें. सदर प्रसंगीं अध्यक्ष या नात्यानें टिळक यांनीं पुढील आशयाचें भाषण केलें:—" प्रो. विजापूरकरांचा आयुष्यक्रम जवळ जवळ शास्त्रीबोवासारखाच आहे. त्यांत जी थोडी उणीव होती ती कोल्हापूरच्या महाराजांनीं नुकतीच भरून काढली आहे! स्वदेशी चळवळीबद्दल त्यांच्या माझ्यांत जर कांहीं फरक असेल तर तो शब्दांत आहे. बाकी अंतःकरण त्यांचें माझें एकच आहे. मोठ्या लोकांचे जे उत्सव होत असतात ते त्यांच्या गुणांचा प्रसार व्हावा ह्मणून होतात; व शास्त्रीबोवांच्या श्राद्धतिथीनिमित्ताच्या उत्सवाचाही हाच हेतु आहे. शास्त्रीबोवांना मोठे काय ह्मणून समजावयाचें? त्यांनीं टोगो-ओयामा सारख्या लढाया मारल्या नाहींत कीं, मुत्सद्दीपणाची मोठी कामगिरी बजावली नाहीं. मग त्यांनीं काय केलें? याचें उत्तर मद्रासचे मि. पिले यांनीं इंग्रजींत " Representative Men of India " ह्मणून जें एक पुस्तक लिहिलें आहे त्याच्या प्रस्तावनेंतील एक दोन उद्गारांवरून आपणास देतां येईल. ही प्रस्तावना मुंबईचे माजी गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल यांनीं लिहिली आहे. त्यांत ते साहेब ह्मणतात:—" हिंदुस्थानांतील लोकांस कविता, धर्म, तत्वज्ञान, सामाजिक सुधारणा, एवढेच कायते विषय आपला पराक्रम गाजविण्यास उरले आहेत. बाकी दुसऱ्या कोठेंही त्यांचा शिरकाव इंग्रजी अमलांत होणें शक्य नाहीं." या वाक्यांत स्वतंत्र देशांतील थोर पुरुष व हिंदुस्थानांतील थोर पुरुष यांच्यामध्यें एवढें अंतर कां याचें उत्तर आहे. आह्मांला पुढें येण्याला अवकाशच नाहीं! अशा स्थितींत शास्त्रीबोवांनीं लेखणीच्या सामर्थ्यानें कार्य केलें ही गोष्ट ध्यानांत ठेवली ह्मणजे शास्त्रीबोवांची योग्यता आपणांस कळून येईल. लोकांच्या विचारांचा ओघ बदलणें ही कांहीं लहानसान गोष्ट नाहीं. पूर्वीचें सगळेंच कांहीं चांगलें असतें,

त्यात कांहीं दोष नसतात, असें मी ह्मणणार नाहीं; आणि निर्दोष अशी वस्तु किंवा ज्यांत गुण नाहीं अशी वस्तुच या जगांत सांपडावयाची नाहीं. सूर्यावरही डाग असतात आणि गाढवाच्या अंगींही गुण असतात! गुणदोषांसंबंधानें शास्त्रीबोवांचीही दृष्टी अशीच होती, हें मी अनुभवानें सांगतों. चुक्यांबद्दल जुन्या लोकांस नांवें ठेवण्यांत अर्थ नाहीं. चुक्यांची परंपरा चालेल तेव्हांच राष्ट्राची प्रगति होते. पूर्वीच्यांतील दोष काढून त्यांचा खल करून त्यांत चांगल्याची भर टाकणें याचेंच नांव प्रगति; व अशीच प्रवृत्ति शास्त्रीबोवांची होती. त्यांचा कटाक्ष पुष्कळ वेळां मतांपेक्षां व्यक्तीवर जास्त होता याचें कारण आपला धर्म, आपले ग्रंथ, आपला इतिहास यांवर टीका करणारे लोक ज्या रीतीनें लिहीत किंवा बोलत ती रीत होय. कडक भाषा वापरण्यांत शास्त्रीबोवांचा कांहीं हेतु होता. टीका करतांना ज्यावर ती करावयाची त्याबद्दल आदर पाहिजे; पण ती ज्या हेतूनें केली असेल तो हेतुही सफल झाला पाहिजे; आणि असा हेतु सफल होण्याचें मुख्य साधन भाषा हेंच होय. सौम्य किंवा गोड शब्दांनीं नेहमींच कार्य होतें असें नाहीं. कार्य करणाराला वेळप्रसंग पाहून गोडकडू औषधाप्रमाणेंच सौम्य–तिखट भाषा वापरली पाहिजे. भाषा हें लोकमत तयार करण्याचें एक उत्तम शस्त्र असून तें उपयोग करणारालाच कसें वापरावें हें समजत असतें. इतरांना त्याचें ज्ञान काय असणार? इतरांनीं अशी अशी भाषा या वेळीं वापरा ह्मणून सांगणें ह्मणजे योद्धा लढाईस गेल्यावर त्यांतील एकाद्या प्रसंगीं तोफ न वापरतां भाला वापरा असें सांगण्या इतकेंच हास्यास्पद आहे! त्या वेळीं तोफ वापरावयाची कीं भाला वापरावयाचा, हें दुसऱ्यानें सांगून काय उपयोग? कार्य करणारा योद्धा योग्य वाटेल तेंच हत्यार प्रसंग पाहून वापरीत असतो. यावरून सौम्य भाषा वापरूं नये असें माझें ह्मणणें नाहीं. पण सौम्य भाषेचा जेथें कांहींच उपयोग नाहीं तेथें सरळ, निर्भीडपणाची व स्पष्ट रीतीचीच भाषा पाहिजे."

## ॐ तत्सत्.

ता. ३०।८।०६ रोजीं गणेशोत्सवांत टिळक यांनीं गायकवाडांच्या वाड्यांत भगवद्गीतेच्या १७ व्या अध्यायांतील शेवटच्या साहा श्लोकांवर व्याख्यान दिलें. त्यांत ते ह्मणाले:—" यज्ञ, दान, तप इत्यादि क्रिया करतांना ॐ तत्सत् याचा उच्चार करून करतात. असें करण्यांतला हेतु एवढाच कीं, जें जें होतें तें ईश्वरेच्छेनें होतें. मी कर्ता नाहीं अशी बुद्धि ठेवावयाची. हाच त्रिविध निर्देश भगवद्गीतेच्या वेळीं होता. सच्चिदानंद हा निर्देश मागाहून आला असावा. ॐ तत्सत् हा त्रिविध निर्देश ब्रह्मालाच लावावयाचा ॐ हें एकाक्षर ब्रह्म आहे. ब्रह्म शब्दमय आहे. शब्दसृष्टीपासून दृश्य सृष्टी निर्माण झाली. सृष्टी नाहींशी झाली तरी कल्पना पुन्हां दृश्यरूप धारण करतात. याप्रमाणें ॐ ब्रह्मवाचक आहे. तत् या शब्दानें अनिर्वाच्य ब्रह्माचाच निर्देश होतो. इंग्रजींत It rains; it dawns अशीं वाक्यें असतात,

त्याचा अर्थ काय? अर्थ हाच कीं, जेव्हां कळत नाहीं तेव्हांच It अगर 'तत्' याचा उपयोग करतात. जें बुद्धीला अगम्य पण ज्याचा परिणाम दृग्गोचर होतो त्या वेळीं तत् याचा उपयोग करतात. दही हा दुधाचा परिणाम, मृगजळ हा आभास परिणाम. आभास–परिणाम, रूप–परिणाम, असे निरनिराळे परिणाम आहेत. परिणामाचें कारण तत् यापेक्षां त्याचें निराळें स्वरूप दाखवितां येत नाहीं. सत् ह्मणजे टिकणारे. तसेंच सच्चिदानंद हा त्रिविध उच्चारही ब्रह्माचा निदर्शकच आहे. सत् ह्मणजे टिकणारें; चित् ह्मणजे शक्ति, आणि आनंद ह्मणजे दुःखरहित स्थिति. ब्रह्म आनंदरूप आहे. सुखदुःख त्याचे ठिकाणीं नाहीं. जें आहे तें सगळें आनंदमयच आहे. यज्ञादि क्रिया ॐ तत्सत् याचा निर्देश करून करावयाच्या. यालाच पुढें 'ब्रह्मार्पणमस्तु' असें जोडलें. कोणी 'कृष्णार्पणमस्तु' असेंही ह्मणतात. एकांत साकाराचा निर्देश आहे; एकांत निराकाराचा निर्देश आहे. थोराचें वर्तन पुढें ठेऊन आपण त्याप्रमाणें चालण्यांत फायदा आहे. हा जसा व्यवहारांतील सामान्य नियम आहे तसाच ईश्वरानें अहंकार टाकून सृष्टी जशी निर्माण केली तद्वत् आपणही ईश्वराचा कित्ता पुढें ठेऊन सर्व क्रिया अहंकार टाकून कराव्या, ह्मणजे ईश्वरस्वरूपीं आपण लीन होतों. ईश्वर कांहीं दूर नाहीं; आपणाजवळच असतो; पण त्याला आपण ओळखलें पाहिजे. ॐ या अक्षरावर दामलेशास्त्री (जे हल्लीं येथून जाऊन काशीस सन्यास घेऊन राहिले आहेत), बंगाल्यांतील हरनारायण वगैरेंनीं मराठींत व इंग्रजींत ग्रंथ लिहिले आहेत; व आणखीही पुष्कळ टीका झालेल्या आहेत. भगवद्गीतेंतील या साहा श्लोकांचा अर्थ एकत्र लावला पाहिजे. निरनिराळे टीकाकार पृथकपणें निरनिराळे अर्थ करतात ही चूक आहे. त्यांचा परस्पर संबंध आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे."

## सद्यःस्थिति.

ता. ३१।८।०६ रोजीं गणेशोत्सवांत रेमार्केटपुढील गणपतीपुढें सद्यःस्थितीवर त्यांनीं व्याख्यान दिलें. त्यांत त्यांनीं असें सांगितलें:—"बंगालच्या फाळणीनें उत्पन्न झालेली स्वदेशी चळवळ, निरनिराळ्या रेल्वेवरील नोकरांचा संप, मुंबईच्या पोस्टमनांचा संप, इत्यादि गोष्टींवरून हिंदुस्थानांतील लोकांत एक प्रकारची अस्वस्थता उत्पन्न झाली असून लोकांना आपल्या स्थितीचें ज्ञान चांगलें होऊं लागलें आहे. पंचवीस वर्षांपूर्वी आमच्या पुढाऱ्यांचें लोकजागृती करणें हें एकच कर्तव्य होतें. पण आतां पूर्वीचे मार्ग स्वीकारूनच्या स्वीकारून अस्वस्थ झालेल्या लोकांच्या मनोवृत्तींस व्यवस्थित स्वरूप देणें हें एक आणखी पुढाऱ्यांचें कर्तव्य वाढलें आहे. मुंबईच्या पोस्टमनांच्या संपास चांगला जय आला नाहीं याचें कारण लोकांत अशा प्रकारची Organization किंवा संस्था नव्हती हें होय. अद्याप धंदेवाले लोकांच्या 'युनियन्स' इकडे नाहींत. कलकत्त्यास नुकतीच 'पिंटर्स युनियन' स्थापन झाली आहे. पण ती बाल्यावस्थेंत आहे. पोस्टमनांची चांगली 'युनियन' असती

तर त्यांचे ह्मणणें कबूल होईपर्यंत त्यांतून त्यांना पोटाला मिळालें असतें; व ' मुंबईचे पोस्टमन जितका पगार मागतात तितका आह्मांला द्याल तर आह्मी मुंबईस येतों, ' असें सांगून बाहेरचा कोणीही पोस्टमन या वेळीं हलक्या पगारावर तेथें गेला नसता. संप करणें हें कांहीं बेकायदेशीर नाहीं. भांडवलवाले व मजुरदार यांच्यामध्यें पाश्चिमात्य राष्ट्रांत लढे उत्पन्न झाले ह्मणजे असे संप तिकडे वारंवार होतात. कारखानदार व मजुरदार यांचें हित निरनिराळें असतें. मजुरदाराचें मालकाशीं कांहीं वैर नसतें; पण आपल्या पोटास भरपूर मिळावें ह्मणूनच तो रुसत असतो. तिकडे ' युनियन्स ' असल्यामुळें अशी रुसवारुसव चालून मालकांना कारखान्यांतील लोकांचें ह्मणणें कबूल करावें लागतें. शिवाय तिकडील लोकांत ज्ञानाचा प्रसार झाला असल्यामुळें त्यांची सहानुभूति मिळते; व ते मदत करतात. मुंबईच्या लोकांची गैरसोय झाली; कित्येक नेटिव व्यापाऱ्यांचें नुकसान झालें; पण त्यांनीं पोष्टाकडे तक्रारीच्या नोटिसा पाठवून सरकारास कधीं कळविलें आहे काय ? तुह्मी पगार जास्त देत नाहीं; थोड्या पगारावर पोस्टमनांना राबवितां याबद्दल आह्मांस काय ह्मणून शिक्षा ? अशा अर्थाचे हजारों अर्ज मुंबईच्या लोकांचे पोस्टांत जावयास पाहिजे होते. पण असे अर्ज किती गेले ? तसेंच चाळीचाळींत व्यवस्था होऊन तेथें पत्रें वाटणाऱ्या पोस्टमनासच जर लोकांनीं पगार देऊन पोस्टांतून पत्रें आणविलीं असतीं तर नसतें काय कार्य झालें ? संप करणें ह्मणजे रुसून बसणें आहे; आणि रुसून बसणें हा जर कित्येकांना गुन्हा वाटत असेल तर मग आटपलेंच! संपाच्या वेळीं त्याला व्यवस्थित स्वरूप देणें हें मुंबईच्या पुढाऱ्यांचे काम होतें. पण या वेळीं हे पुढारी कोठें दडले होते कोण जाणें ? हिंदुस्थानांत सरकारच मोठा कारखानदार असल्यामुळें पोटाकरितांही जर सरकारावर रुसावयाचें नाहीं व त्या रुसण्याचें फल मिळावावयाचें नाहीं तर आह्मी करावयाचे तरी काय ? हल्लींच्या स्थितींत हक्क मिळविण्याचे नवे मार्ग कोणी सांगत नाहीं ह्मणून कित्येकांची कुरकुर आहे. पण ही कुरकुर करण्यांत अर्थ नाही. संपासारखे सरकाराला अडवून काम करून घेण्याचे मार्ग आहेत; पण या मार्गांचे व्यवस्थित रीतीनें अवलंबन करण्याचें जर आमच्या हातून होत नाहीं तर विनाकारण दुसऱ्याला दोष देण्यांत काय अर्थ आहे ? हल्लींच्या काळच्या परराष्ट्रांतील लोकांच्या हक्कसंरक्षणाच्या हालचाली पाहा, सुधारलेल्या राष्ट्रांतील घडामोडींचा इतिहास वाचा, आणि मग तरी मार्ग नाहींत असें ह्मणा. डोळे उघडून कांहीं पाहावयाचें नाहीं; ओंठावर पडलेलें जांभूळ तोंडांत ढकलण्याचेंही श्रम करावयाचे नाहींत; आणि पोट भरण्याचा मार्ग कांहीं सुचत नाहीं किंवा कोणी सुचवीत नाहीं असें ह्मणावयाचें ही विसंगतता नव्हे काय ? तुमची उन्नति करून घेणें तुमच्याच हातांत आहे. तुह्मी उद्योग केला तर यशस्वी खचित व्हाल; मात्र डोळे उघडा, एवढेंच माझें सांगणें आहे."

# मारोपंत.

## चरित्र आणि काव्य-विवेचन.

रा. रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर बी. ए. यांनीं महाराष्ट्र कविवर्य मोरोपंत यांच्या चरित्राचीं साधनें जुळविण्यांत व त्यांच्या कवितेची लोकांस गोडी लावण्यांत काय परिश्रम केले आहेत हें महाराष्ट्रास महशूर आहेच. ह्या ग्रंथांत एकंदर २१ प्रकरणें असून पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. पूर्वार्धावरून एका कुलीन व सच्छील हिंदुगृहस्थाचें चारित्र्य समजेल व उत्तरार्धावरून पंताच्या कविता-समुद्राचें अवगाहन केल्याचें वाचकांस श्रेय मिळेल. पंत व त्यांची कविता यांचें ज्ञान सदर ग्रंथावरून होणार आहे. हा ग्रंथ महाराष्ट्र भाषेंत केवळ अपूर्व आहे. किं. रु. २ दोन.

# लो० टिळकांचें चरित्र व उक्ति.

"मुमुक्षु" वर्तमानपत्राचे संपादक रा. ल. रा. पांगारकर बी. ए. यांनीं थोडक्यांत चटकदार लिहिलेलें व लोकप्रिय झालेलें **लो. टिळकांचें** चरित्र व त्यांनींच गेल्या ३।४ वर्षांतील टिळकांच्या व्याख्यानांतील सिद्धांतरूप काढलेल्या १५१ संस्मरणीय उक्ति स्वतंत्र पुस्तकरूपानें आह्मी छापविल्या आहेत. किं. ८४ आणे पो. व्ही सह ८६ सहा आणे.

# संगीत सुराविलास नाटक

**राष्ट्रोद्धार** नाटकाचे कर्ते रा. प्रभाकर यांनीं हे पंचाकीं नाटक रचिलें आहे. ह्यांत मद्यपानाच्या दुष्परिणामाचे उत्तम चित्र वठविलें आहे. कि. ८ आठ आणे. व्ही. पी. सह १० दहा आणे.

# बंगाल्यांतील १ ल गुप्त-मंडळ.

सचित्र प्रेमवेडा वगैरे कादंबरीचे कर्ते रा. **नाथमाधव** यांनीं लिहिलेली ही **सद्यःस्थिती वरील** एक सचित्र ऐतिहासिक, मनोरंजक, व चटकदार कादंबरी आहे. भाषा सरळ व साधी. वाणी गोड व सरळ असून ह्यामध्यें पुढील प्रकरणें आहेतः १ प्रणयी जोडपें, २ संकटांत टाकणारें पत्र, ३ बारा वर्षांपूर्वीचें वचन ४ हेमचंद्र बाबूची निराशा ५ वचन तर पाळलें ६ जाजमाखालीं सांपडलेलें पत्र ७ अकल्पित भेट ८ दुर्दैवी जोडपें ९ गुप्तमंडळ, १० स्फोट. किं. १२ बारा आणे. पो. व्ही. सह ८१४ नवदा आणे.

**प्रकाशक—हिंद एजन्सी, बुकसेलर्स अँ. पब्लीशर्स नं० ४ मुंबई.**

# टिळकांचा जयजयकार.

**लेखक.—शंकर गजानन पुरोहित बी. ए. एल. एल. बी.**

या पुस्तकांत १ टिळकांचें वक्तृत्व, २ याचें नांव पुढारी, ३ अद्वितीय पुढारी, ४ केसरीची गर्जना, ५ टिळक आणि राजकारण ६ खासगी वर्तन, ७ वक्तृत्व आणि ग्रंथकतृत्व ८ टिळकांचा स्वदेशाभिमान–पूर्वार्ध ९ उत्तरार्ध १० टिळक आणि धर्म ११ उपसंहार. अशीं प्रकरणें आहेत. क्राऊन सांच्या पायका टाइपाचीं पृष्ठें अजमासें ११० किं. ५ आणे. व्हीपीनें ७ आणे. लोकमान्य टिळकांच्या थोरवीचें खरें रहस्य हें पुस्तक वाचल्यानें कळून येणार आहे. कागद स्वदेशी वापरला असून आरंभी लोकमान्यांचा सुंदर फोटो घालण्यांत आला आहे. पत्रकर्त्यांचे उत्कृष्ट अभिप्राय आहेत.

# देशभक्त बाबू अरविंद घोस यांचीं महाराष्ट्रांतील व्याख्यानें.

सुरतच्या कांग्रेसनंतर बाबु अरविंद घोस आले होते. त्यांनीं महाराष्ट्रांत कांहीं ठिकाणी प्रवास केला व व्याख्यानें दिलीं. या थोर देशभक्ताच्या व्याख्यानांचा लाभ सर्व महाराष्ट्रीयांस व्हावा या हेतूने पुढें लिहिलेलीं सहा व्याख्यानें पुस्तक रूपानें छापलीं आहेत.—१ बंगाल्यांतील राष्ट्रीय चळवळ. २ राष्ट्रीय शिक्षण. ३ सांप्रतची परिस्थिती. ४ स्वराज्य. ५ राष्ट्रीय पक्षाचें धोरण, आणि ६ भविष्य काळांतील काम, इत्यादि. पुस्तकाचें आरंभीं अरविंद बाबूचें संक्षिप्त चरित्र व फोटो दिलेला आहे. कागद स्वदेशी, किंमत तीन आणे. व्ही. पी. नें पांच आणे.

पुस्तकें मिळण्याचा पत्ता:— **व्यवस्थापक—वंदेमातरम्–पुणें सिटी.**

---

# केरळकोकिळ.

२२ वर्षें चाललेलें, सुंदर व सचित्र मासिक पुस्तक.
वा० वर्गणी १ रु. ४ आ.

**केरळकोकिळ एडिटर-कृत—**

# आर्याबद्ध श्रीमद्भगवद्गीता.

भगवद्गीतेवर सुंदर, सुरस, व प्रासादिक आर्या.
किं. ८।१४ आणे ट. व्ही. पी. सह १ रु.

ह्याशिवाय के. को. एडिटर-कृत सर्व पुस्तकें आमचेकडे मिळतील.

**विष्णु कृष्ण आठल्ये.**
**माधवाश्रम,** गिरगांव, **मुंबई.**

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

# महाराष्ट्र स्टोअर्स.

सिताराम बिल्डिंग्स, मुंबई.

## सर्व तऱ्हेच्या स्वदेशी मालाचे व्यापारी.

**आमच्या** स्टोअर्समध्यें सर्व तऱ्हेचे रेशमी, गरम, सुती, उंची व नमुनेदार कापड मिळतें. कानपूर व धारिवाल येथील गरम कापड, शाली, मंगळूर व इतर ठिकाणचें टिकाऊ चेक्स, तलम व टिकाऊ महूची व इतर ठिकाणचीं धोत्रे व उपरणी, उंची फेटे, रुमाल, व कोशे, कद, चुनड्या, मुकटे, मलमल, जगन्नाथी, लॉक्लॉथ, चिटें, टुवाल, हातरुमाल, गंजीफ्राक, हातमोजे, पायमोजे, चादरी, नवीन तऱ्हेच्या पासोड्या, धाबळया, ब्लँकिटें, रग्ज, सत्रंज्या, बिनसांध्याच्या टोप्या, राजमाचिकर-बंधु यांच्या छत्र्या, डॉ. गोखले एम. ए. एम. डी. यांचें बालामृत, सार्सापरिला वगैरे औषधें, डायमंड व ओरिएंटल वगैरे कंपन्यांचे आंगाला लावण्याचे सुगंधी साबण व तेलें. नेने ब्रदर्स यांचा बारसोप, चहा, कोको, चॉकोलेट, सेंटस, बटणें, चाकू, कात्र्या, नोटपेपर्स वगैरे स्टेशनरी, चामड्याच्या बॅग्ज, इतर चामड्याचें सामान, बूट, जोडे, वगैरे स्वदेशी माल आमचे येथें घाऊक व किरकोळ स्वस्त दरानें मिळेल.

व्यापारी लोकांना विशेष सवलती दिल्या जातील. अवश्य अनुभव घ्यावा.

**आमची शाखा**—गिरगांवांत मोहन बिल्डिंगमध्यें उघडली असून तेथें सर्व तऱ्हेचा माल ह्याच भावानें मिळेल.

**बाबूराव सोमण आणि कंपनी.**

# खात्रीचीं देशी औषधें

## महामारीवर रामबाण गोळ्या.

## ( कॉलरा पिल्स )

या गोळ्या खात्रीच्या असून वऱ्हाड वगैरे प्रांतांत त्यांचा चांगला अनुभव आला आहे. **सोळा गोळ्यास १ रु.** एका रोग्यास सोळा गोळ्या पुरतात.

## हिंवतापावर गोळ्या.

तीन दिवसांत हटकून गुण. अठरा गोळ्यांची कि. ८४ आणे.

## अमांशावर गोळ्या.

चवदा गोळ्यास ८४ आणे. १ रुपयास ७० गोळ्या.

## कुमारी आसव.

या आसवानें अन्नपचन, शौचास साफ होणे, कफनाश इत्यादि कार्ये होऊन ल्हान मुलाच्या पोटांतले विकार नाहींसे होतात. **वीस तोळ्यांचे बाटलीस १ रुपया.**

## दशमुळांच्या काढ्याच्या पुड्या.

### बाळंतिणीकरितां

या पुड्या तयार असून **सात पुड्यास साहा आणे.**

## पाचक गोळ्या.

या गोळ्या नेहमींच्या उपयोगाकरतां असून अग्निमांद्य, अरुची वगैरे कुरकुरी नाहींशा होतात. **शंभर गोळ्यास ५ आणे.**

## गुलकंद व मुरावळा.

**प्रवाळमिश्र** खडिसाखरेचा गुलकंद-**शेरास २ रु. साधा-१ रु. मुरावळा-शेरास १ रु.**

**याखेरीज सर्व तऱ्हेचीं खात्रीचीं भस्में, तेलें, मात्रा, पाक, वगैरे स्वदेशी औषधें मिळतील.**

आज कित्येक वर्षें आमच्या दुकानांतील औषधें लोक वापरीत असल्यामुळें औषधांबद्दल लोकांची खात्री पटली आहे.

रोखीनें अगर व्ही. पी. नें बाहेर गांवींही औषधें पाठऊं.

**औषधें मिळण्याचा पत्ता:—**

**वेलणकर आणि कंपनी.**

**सिटी पोस्टाजवळ, पुणें शहर.**

खालील सर्व माल आमचे येथें किरकोळ व घाऊक मिळेल. व्यापाऱ्यांस विशेष सवलती व भरपूर कमिशन दिलें जाईल. **मंगलोर** चेक, इमिटेशन सिल्क व **बंगलोर** येथील **रग्स्** ( यांची **एजन्सी** आमचेकडे आहे. ) कानपूर, धारिवाल, अमृतसर व मुंबई, येथें होणारे **गरम** कापड, हिंदुस्थानांत निरनिराळ्या ठिकाणीं बनणारा हरतऱ्हेचा सुती, गरम, व कातड्याचा माल, पायमोजे, हातमोजे, गंजिफ्राक वगैरे ( होजीअरी ) सेंन्ट, अत्तरें वगैरे (परफ्युमरी) चाकू, कात्र्या वगैरे (कटलरी) टोप्या, सत्रंज्या वगैरे वगैरे.

# श्री डेक्कन स्टोअर्स कंपनी.


## फक्त स्वदेशी मालाचे व्यापारी.—सिताराम बिल्डिंग मुंबई.

येथील गिरण्यांचे मद्रासी प्रख्यात कापड, मुंबईतलि गिरण्यांत बनणारा सर्व तऱ्हेचा माल, बंगलोरची नामांकित होजीअरी, एच्. बोस यांचें उत्तम सेन्ट, काठ्या, छत्र्या, बूट, मोठे बिस्कीट, साबू, सरबतें वगैरे वगैरे.

एक वेळ माल मागविल्यानें खात्री होईल. माल मागविणारानें एकंदर रकमेची १/४ रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे.

# GOKHALAY & Co.

## PASSAGE AND SHIPPING AGENTS.



ENGAGE Passages to all parts of the world by any Liner. Passengers met and assisted. Goods received for shipment and clearance. Foreign drafts issued. Insurances of every description effected. Full information on educational matters supplied.

Apply to:—GOKHALAY & Co.,

London representatives
Pitt and Scott Ltd.
25 Cannon Str. E. C.

GAIETY CHAMBERS,
Bombay.

सतत ५० वर्षांपासून हजारों लोकांनीं अनुभव
घेऊन उत्तम ठरविलेला.

दूषित रक्त शुद्ध करणारा.

डॉ० वामन गोपाळ यांचा

# सार्सापरिला,

किंमत १। रुपया.

पोष्ट खर्च ८५ आणे.

विशेष माहितीचें हँडबिल मागवा.

मालक—गौतमराव केशव.

ठाकुरद्वार—मुंबई.

दक्षिण व्ह. ट्रा. सोसायटीनें पसंत करून बक्षिस दिलेलें.

अगदीं नव्या विषयावरील पहिलें पुस्तक.

# मराठी रंगभूमि.

लेखक—आप्पाजी विष्णु कुलकर्णी.

पृष्ठसंख्या २६४; किं. १। रु. ट. हा. ८१

सदर पुस्तकांत महाराष्ट्रांतील नाटक-मंडळ्यांचा गेल्या साठ वर्षांचा इतिहास असून पौराणिक, बुकिश, ऐतिहासिक, सामाजिक, संगीत वगैरे नाटकांतील गुणदोषांचें विवेचन आहे.

**या पुस्तकासंबंधानें कांहीं अभिप्राय.**

**केसरी**—अशा प्रकारचा ग्रंथ मराठी भाषेंत हा पहिलाच होय. यांत रंगभूमीच्या बहुतेक अंगोपांगाचा विचार केलेला असून प्राचीन व अर्वाचीन नाटक-कंपन्या, त्यांची नाटकें व त्यांतील प्रसिद्ध नट याचीही यांत मार्मिक रीतीनें माहिती दिलेली आहे. मनोरंजनाचे किरकोळ कसेबसे लेख खरडीत बसण्यापेक्षां अशा प्रकारें ऐतिहासिक व मनोरंजक ग्रंथ लिहून मराठी भाषेची सेवा करणें अधिक श्रेयस्कर होय.

**सुधारकः**—अशा प्रकारची रंगभूमीची संकलित केलेली माहिती फारच उपयुक्त आहे.

**ज्ञानप्रकाशः**—या पुस्तकाच्यायोगानें आमच्या नाट्यकलेच्या इतिहासास मराठी वाङ्मयांत कायमचें स्थळ मिळालें; व नाटकें रचणारांस आणि ती रंगभूमीवर आणणारांस एक मार्गदर्शक उपलब्ध झाला.

**सत्यशोधकः**—हा गुरुजी नाट्यकलेला उत्कृष्ट वळण लावील.

'पुस्तकें अगदीं थोडीं शिल्लक असल्यामुळें मागणीची त्वरा करावी.

---

**लो० टिळक यांजवरील खटला.**

१९०८.

[ दे. दामलेकृत ]

**किं. १ रु. ट. हा. ४ आ०**

वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील:—

**वेलणकर आणि कंपनी.**

**सिटी पोष्टाजवळ, पुणें शहर.**